



कुंभश्री



दिपावली विशेषांक

संपादक
संजय राजे

२०२२
वर्ष २९वे



किंमत ₹ 300/-

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



स्वादिष्ट
रुचकर
चटकदार

कर्रम कुर्रम
कुर्रम कर्रम



लिज्जत पापड लज्जतदार !

SYMBOL OF WOMAN'S STRENGTH
Lijjat PAPAD

उडीद, मूग, पंजाबी, चिली (लाल मिरची),
गार्लिक इ. प्रकारात उपलब्ध

श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
(खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त)

घेतो काळजी हातांची,
कपड्यांची आणि पैशांचीही

सासा



लिज्जत पापडाचे
दर्जेदार स्वदेशी
उत्पादन

SYMBOL OF WOMAN'S STRENGTH
Lijjat PAPAD
सासा

श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
(खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त)

With Best Compliments



Our Inspiration



Late Mahadev B. Kunkalienkar



Late Vishnu B. Kunkalienkar



Late Vassu B. Kunkalienkar



Late Vishnu M. Kunkalienkar
(Padmashree Award)



Late Vaman B. Kunkalienkar



Satish V. Kunkalienkar
President
Goa Kumbhar Samaj Mahasangh



Dayanand V. Kunkalienkar



Pravin V. Kunkalienkar



Rajendra M. Kunkalienkar



Sanjay M. Kunkalienkar



Santosh M. Kunkalienkar



Shailesh M. Kunkalienkar



Vinay V. Kunkalienkar

M/s. M. B. Kunkalienkar & Bros.,
General Merchants,
New Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2715233
Office (0832) 2737148

M/s. S. B. Traders,
General Merchants,
"Shanta Chembers",
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2737149
Office (0832) 2737148

M/s. Shanta Prasad Home Industries, Flour Mills,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2737149
Off. 2737148 Res. : 2734450

M/s. Hotel Goa Land,
Lodging Bar & Restaurant,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ (0832) 2733265
Res. 2737148
Off. : 2737148, 2734450

M/s. Kunkalienkar Trading Company, General Merchants,
Below Hotel Goa Land,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop : (0832) 2737066

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. बीना संजय राजे यांचेकरिता संपादक श्री. संजय राजे यांनी
गुरुनाथ प्रिंटर्स व टाईपसेटर्स, ६१, कुणाल प्लाझा, चिंचवड स्टेशन, पुणे १९ येथे छापून तेथेच प्रकाशित केले.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



DRONAGIRI'S FINEST PROJECT - PRAJAPATI MAGNUM COMES WITH A LIFESTYLE & AMPLE AMENITIES

FEATURED AMENITIES

- Well Equipped Gym
- Amphitheatre with Raised Seating
- Elevated Jogging Track
- Swimming Pool
- Skywalk Over The Pool
- Club house with Indoor Games
- Kids Play Area with Equipments
- Leisure Deck Seating
- Party Lawn with Stage

PRAJAPATI

Project Launch in New Panvel

Prajapati Ornate : MahaRERA P52000019057

Prajapati Opal: MahaRERA P52000019078

PROJECT FINANCED BY LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

To avail more offers, contact: 8080 504 056

Site Address: Plot No. 46/B, Sector 47, Dronagiri | info@prajapatigroup.com

www.prajapatigroup.com | Follow us on:

DRONAGIRI LOCATION ADVANTAGES

Dronagiri is one of the Navi Mumbai's Biggest nodes

12 kms. Upcoming International Airport	3 kms. Uran Beach	4 kms. Mora Jetty
6 kms. Proposed Mumbai Trans Harbour Link	5 kms. JNPT- SEZ	200 mtrs. Seawoods - Uran Railway Line



Actual photos of Show Flat, not part of standard amenities

P52000001121 | P52000001425
http://maharera.mahaonline.gov.in

Construction in Full Swing
SAMPLE FLAT READY



अकोले तालुक्यातील एक भव्य शैक्षणिक प्रकल्प

अभिनव शिक्षण संस्था, अकोले

मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल (निवासी पब्लिक स्कूल)

मातोश्री पार्वतीबाई कोते शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड्)

व

अभिनव अध्यापक विद्यालय (डी.टी.एड.)

व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय (एम.बी.ए.)

मारुतीराव कोते ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स

वसुंधरा ॲकॅडमी (सी.बी.एस.ई पॅटर्न)

अभिनव सिनिअर कॉलेज ऑफ सायन्स

अभिनव टुरीझम सर्टीफीकेट कोर्स

मुळा व्हॅली इग्लीश मेडियम स्कूल, कोतुळ

सह्याद्री व्हॅली इग्लीश मेडियम स्कूल,राजूर



श्री. मधुकरराव नवले
अध्यक्ष



श्री. सुरेशराव कोते
उपाध्यक्ष

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे
सेक्रेटरी

श्री. भाऊसाहेब नाईकवाडी
खजिनदार

श्री. रामकृष्ण नवले
सह. सेक्रेटरी

❊ संचालक ❊

विक्रम नवले, उपाध्यक्ष

प्रा. सौ. भक्ती कोते-हिवरकर, सहसेक्रेटरी

रंजना नाईकवाडी, मंदाताई नवले

M/s G.S. KUMBHAR

Class-1(A) Govt. Regd. Contractor

GSK



Mr. Ganeshrao Kumbhar
B.A., L.L.B.



Mr. Parimal Kumbhar
M.E. (Civil, Structure)



Chi. Pratik Kumbhar
B.E. (E & TC)









Office address : Flat No. 201/B "Minakshi Puram" Vadgaon (bk) Pune - 411 041
Mob. No. +91 9850617691, Email ID : kumbhargs1@gmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

श्री

पैशावर विश्वास ठेऊ नका ..... विश्वासावर पैसा ठेवा !

अहमदनगर जिल्हा श्री संत गोरोबा काका कुंभार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

• मुख्य कार्यालय : जामखेड •

पत्ता :- माऊली संकुल, बीड रोड जामखेड, दूरध्वनी क्रमांक -०२४२१ २२३०७०



प्रेरणास्थान



वै.विठ्ठलराव(आण्णा)राऊत
संस्थापक अध्यक्ष

यशस्वी वाटचाल

✹ अटी लागू

सांपत्तीक स्थिती

वसूल भागभांडवल	- ३५ लाख ७९ हजार
एकूण ठेवी	- १९ कोटी २७ लाख
गंगाजळी व निधी	- १ कोटी ८७ लाख
एकूण बँक गुंतवणूक	- ६ कोटी १७ लाख
येणे कर्जे	- ११ कोटी ७२ लाख
नफा	- ७ लाख ४३ हजार

ठेवीवरील व्याज दर

१ वर्षे व त्यापुढे	- १०%
१८१ दिवस (६ महिने)	- ७%
९१ दिवस (३ महिने)	- ६%
४६ दिवस	- ४%
८१ महिने	- दामदुप्पट

लघु उद्योग व वाहन कर्ज उद्योग धंद्यासाठी अल्प दरात कर्ज सुविधा उपलब्ध



सोनेतारण कर्ज सुविधा

कर्ज १० मिनीटात उपलब्ध

१ वर्ष व त्यापुढे मुदत ठेवीवर ज्येष्ठ नागरिक, विधवा व माजी सैनिक १०.५% व्याजदर



श्री विनायक विठ्ठलराव राऊत
चेअरमन
९२२६१३१५७५
९४२२२२२२०६

मासिक योजना	मासिक योजना	कन्यादान ठेव योजना	कन्यादान ठेव योजना
रु.५ लाख भरा व दरमहा पेन्शन स्वरूपात रु.५१५०/- मिळवा.	दरमहा रु. १०००/- भरा व ७५ महिन्यात रु.१०००००/- मिळवा.	दरमहा रु. १०००/- भरा व १५ वर्षानंतर रु.३,७५०००/-मिळवा.	दरमहा रु. १५००/- भरा व १५ वर्षानंतर रु.५,७१०००/- मिळवा.

अधिकृत विज बिल भरणा केंद्र व टेलिफोन बील भरणा केंद्र संपूर्ण संगणीकृत संस्था

पेन्शन ठेव योजना

दरमहा रु.१०००/- भरा ५० वर्षानंतर रु. ११००/- प्रमाणे दरमहा पेन्शन मिळवा व स्किम बंद करतेवेळी रु. १ लाख ५० हजार मिळवा.

• **श्री जयवंतराव पुंजाजी जोर्वेकर** व्हा.चेअरमन • **श्री शहाजी माणिक राऊत** व्यवस्थापक

व्यवस्थापक सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंद व पिग्मी एजंट
सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक सर्व समाज बांधवांना हार्दिक शुभेच्छा...!
नवीन कार्यालयात ग्राहकांसाठी खास सुविधा मनी ट्रान्सफर ऑनलाईन बँकिंग सेवा.RTGS / NEFT



इंजि.श्री महेश विठ्ठलराव राऊत
B.E.I.T
९४२३७८६४०६

गोरोबा सिनेमाज, कुंभार तळ
जामखेड, जि.अहमदनगर

bookmyshow











SHREE DESIGNS, MAJALGAON 9881388081



शिवम् हॉस्पिटल व अतिदक्षता विभाग

बालरोग्णालय, मॅटर्निटी व नर्सिग होम



कै.सौ.डॉ.उर्वशी बालासाहेब सेलूकर



डॉ.बालासाहेब सेलूकर
M.B.B.S. D.C.H.(Mumbai)
बालरोग व नवजात अर्भक तज्ञ



सौ.ज्योति बाळासाहेब सेलूकर
B.A. D.Farm
पांडुरंग मेडीकल ॲन्ड जनरल स्टोअर्स

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री आयुश्यमान भारत योजना संलग्न हॉस्पिटल

1. Pulmonology
2. Gastroenterology
3. General Medicine
4. Critical Care
5. Pediatrics Medical Management
6. General Surgery
7. Poly Trauma
8. Orthopedic Surgery And Procedures.
9. Genitourinary System

परभणी रोड, विश्रामगृहाच्या बाजूला, गार्डन समोर, वसमत, जि.हिंगोली

शुभ
दीपावली!



ROHITRA
INDIA PRIVATE LIMITED
Power to you...!

Distribution & Power Transformers

www.rohitraindia.com info@rohitraindia.com



Arjun R. Kumbhar
+91 98203 10782



Prasad A. Kumbhar
+91 98203 10832



Sanjay A. Kumbhar
+91 98208 01813



Aditya P. Kumbhar
+91 99696 89247

Sankalp
Healthcare And Allied Products (P) Ltd.

A-16, A-17, A-19, M.I.D.C., Tasavade, Karad,
Dist. Satara, Maharashtra – 415 109.
www.sankalphc.in

B. Ramchandra & Co.
Designing, Offset Printing & Packaging

C-38, M.I.D.C., Tasavade, Karad, Dist.
Satara, Maharashtra – 415 109.
www.bramandco.in

SAHAR LIFE SCIENCES

1st Floor, Shriram Building, Near Satyam
Industrial Estate, Station Road, Govandi
East, Mumbai – 400 088.
www.saharlife.in

SAMARTH INDUSTRIES

B-5, M.I.D.C., Tasavade, Karad, Dist.
Satara, Maharashtra – 415 109.

Head Office : 1st Floor, Shriram Building, Near Satyam Industrial Estate,
Station Road, Govandi East, Mumbai – 400 088.

शुभेच्छुक समस्त डाळजकर परिवार



श्री. दत्ता कुंभार

विश्वस्त- कुंभार समाज धर्मशाळा व गोरोबाकाका मंदिर ट्रस्ट, आळंदी
कार्याध्यक्ष - बारामती चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज्
राष्ट्रीय अध्यक्ष - मातीकला सेल अ.भा.प्रजापती (कुंभकार) महासंघ
उपाध्यक्ष - शाळा समिती, श्री संत तुकडोजी विद्यालय दौंड



सौ. अरुणा दत्ता कुंभार



श्री.उदय दत्ता कुंभार



डॉ.सौ.कांचन उदय कुंभार



चि.वरुण दत्ता कुंभार

आमची दर्जेदार उत्पादने









आमची दर्जेदार उत्पादने

फर्म

- **बारामती फुड अँड बिवरेजेस**
- अरुणा इंडस्ट्रिज
- आल्फा प्लास्टिक इंडस्ट्रीज
- हॉटेल उदय
- श्री.दत्ता क्लिनिक
- मातोश्री डेव्हलपर्स
- लक्ष्मी सप्लायर्स्
- आरोग्यसखी आयु. क्लिनिक

निवास - 'तानाई', प्लॉट नं. आर-५९, एम.आय.डी.सी., बारामती, जि. पुणे. मोबाईल-७५८८०३२५९५/९८९०१३३८१०



Visit us : www.dengalegarden.com

बारामती शहरामध्ये

डेंगळे गार्डन
मंगल कार्यालय

माळेगांव रोड,
कसबा, बारामती,
जि.पुणे 413102

व्यवस्थापक :
भगिरथ ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज

त्रिमुर्ती मंगलसेवा केंद्र
प्रोप्रा. डोगळे बंधू, बारामती

मोबा : 9960190015 / 9860258334



S.G. AUTO
DENGALE AUTO TRADERS

सर्व प्रकारच्या चारचाकी गाड्यांचे
रिपेअरींग व सर्व्हिसिंग
बॉश कंपनीचे ओरिजनल स्पेअर्स
पार्ट उपलब्ध.

स.न.132/3/अ माळेगाव रोड,
कुंभार वस्ती, संत गोरोबानगर,
कसबा, बारामती जि.पुणे 413102

Swapnil Gopal Dengalae
M.A., B.E. Mech
Email : sgautoecs@gmail.com

9518308404/8999899759

|| ॐ श्री साईनाथाय नम:||
|| ॐ श्री सद्गुरुनाथ दादाय नम:||

कै. बाबुराव भु. साळवी उर्फ आण्णा





संस्थापक

कुंभश्री मासिक समाज प्रबोधनास वाहिलेले मासिक (कुंभश्री स्थापना १९९४)
संपादक श्री. संजय पांडुरंग राजे

''तव स्मरण सतत स्फुरणदायी ठरो''

*** वर्ष २९ * अंक १ * पुणे * शालीवाहन शके १९४४ * ऑक्टो.-डिसेंबर २०२२ * किंमत रु. ३०० * रजि. नं. दिल्ली : ६६८७४/९४**

◆ Website : www.kumbhashree.com ◆ e-mail : kumbhshree@gmail.com

कार्यालय : वीर एंटरप्रायजेस, प्लॉट नं. ३४४, सेक्टर २४, निगडी प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

अनुक्रमणिका

संपादकीय	**१३**
कथा -मुजोर	१४
कमळीचा भोप्या	१९
घंटानाद	२२
उध्वस्त	३६
जिवलग सखी	३८
करिअर	४२
टुलकिट आपली सांगाती	४५
दैव जाणिले कुणी	४८
प्रवास	५९
मर्मबंधातली ठेव ही!	६५
भक्ष	६८
पुर्वा	७१
मंजूळा	८३
मंगल	८८
भूतदया	९२
काव्यसंग्रह	**९४**
लेख - स्त्री शक्ती	९८
तिची कहाणी	१०७
परत फिरा रे!!	१०९
लढा द्रौपदी मुर्मू यांचा	१११
अर्वाचीन भारतातील शैक्षणिक संस्थांचा विकास	११४
समाजभुषण सुरेश कोते	११८
यशवंत व्यक्तीमत्व नंदू जाधव	१२०
हिमालयाच्या शिखरावर शिवाजी महाराज	१२१
हाडाचे डॉक्टर - उत्तम कुंभार	१२२
डॉ. सुखदेव कुंभार	१३१
डॉ. सुधाकर तायडे	१३५
महिलांसाठी वरदान श्रीवंदन हॉस्पिटल	१३६
आभार डॉ. निलेश शिर्के	१३७
डॉ. सुजाता कुंभार	१३८
वाचकांचे अभिप्राय	१४०
राष्ट्रीय समाचार	**१५५**
महाराष्ट्र आपला - सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय मेळावा	१७९
सांगली येथे सांस्कृतिक भवनाचे लोकार्पण	१८३
कुंभार समाज मुंबई गुणगौरव	१८५
कृष्णराव राजे कॉलेज ऑफ सायन्स उद्घाटन	१८६
सामाजिक संस्थेची बैठक संपन्न	१८९
श्रीक्षेत्र तेर जनगणना अभियानास प्रारंभ	१९०
अमरावती गुणगौरव व धुळे गुणगौरव	१९१/१९४
सटाणा गुणगौरव	२०६
राज्यस्तरीय वधू-वर मेळावा	२०८
सामाजिक संस्था पालघर बैठक	२१२
सिंधुदूर्ग मेळावा	२१३
जुन्नर तालुका गुणगौरव	२१७
गोरोबा काका वाड्याचा वर्धापन दिन	२१९
विकास संस्थेचे फ्लाय ॲश आंदोलन	२२०
पुणे जिल्हा विकास संस्थेची बैठक	२२४
विकास संस्थेचे विविध समाजोपयोगी कार्यक्रम	२२८
आय.एम.अे. अध्यक्षपदी डॉ. बाळासाो सेलुकर	२३५
रक्तदान जनजागृतीसाठी ५७०० कि.मी. पदयात्रा	२३७
आयआयटीयन शिरीष कुंभार	२४३
आम्हांला यांचा अभिमान आहे	२४४
उपनिबंधक डॉ. अशोक कुंभार सेवानिवृत्त	२७३
उपमुख्याध्यापक अनिल शिर्के सेवानिवृत्त	२७७
कुंभार - इतर मागासवर्गातील अतिमागास जात	२८०
शुभमंगल वधु पाहिजे	२८६
वर पाहिजे	२९३

मुखपृष्ठ : कु. यशदा संजय कुंभार, पुणे

अंकामधील प्रकाशित विविध लिखाणाच्या बाबतीत संपादक सहमत असतीलच असे नाही. कुंभश्री विषयी सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत राहतील

'कुंभश्री' संपादकीय मंडळ

संपादक	कार्यकारी संपादक	कायदे विषयक सल्लागार
इंजि. संजय पांडुरंग राजे	**प्रा. विलास जाधव**	**ॲड. बी. के. राजे** (हायकोर्ट मुंबई)
मोबा. : ९८२२८३८१६९		

सल्लागार

सुरेशराव मारुतराव कोते	जी. टी. जाधव	नामदेव श्रीपती कुंभार
मोबा. : ९८२२०३२४२७	**मोबा. : ९०११४६४९४०**	

वधुवर सूचक मंडळ महाराष्ट्र- राज्य

अध्यक्ष - आनंदा कुंभार	कार्याध्यक्ष - व्ही. एम. कुंभार	उपाध्यक्ष - रामचंद्र कुंभार
मोबा. : ९५५२५५४४२०		

मुद्रीत शोधन	विद्यार्थी गुणगौरव मंडळ	व्यवस्थापक
सौ. वंदना बाळासाहेब कुंभार	अध्यक्ष - नारायण ना. कुंभार	ज्ञानेश्वर कुंभार

कुंभश्री अधिकृत प्रतिनिधी

गोविंद प्रजापति, मुंबई	मो.: ९९२०६६८८४८	वसंत विष्णु उकिर्डे नवी मुंबई	मो. : ९८६९४०५३५२
सौ. आर. बी. डेंगळे, बारामती, पुणे	मो.: ९८६०२५८३३४	सुदाम कुंभार बोरीवली मुंबई	मो. : ९८६९७१५६००
सौ. अनिता सुभाष बोर्डे, चिंचवड, पुणे	मो. : ९६२३१५८९३९	सुर्यकांत गोविंद मुचळंबे लातुर	मो. : ९६५७६७९१५३
बाळकृष्ण काळबांडे (सर) दौंड, पुणे	मो. : ९९७५३३९४२५	गुरुनाथ महालिंगप्पा मोहोळकर,	
वैजनाथ पगडे, आळंदी पुणे	मो. : ८६६९११०९३६	निलंगा लातुर	मो. : ८८८८५६१६०८
निलेश पांडुरंग गोरे काष्टी अ. नगर	मो. : ९९६०५९८६३२	बा. की. घटकार डोंगरशेळकी, लातुर	मो. : ९८६०२८१९९३
भगवान श्रीमंदिलकर, पारनेर.	मो. : ९५०३७४७१७८	गंगाधर (आप्पा) जोर्वेकर नाशिक	मो. : ९४२२२५३१६१
गणेश मुरलीधर देवतरसे अ. नगर	मो. : ९८९०२९६६८६	योगेश रोकडे चांदवड-नाशिक	मो. : ९९७०५४८५३४
सुधाकर देवतरसे अ. नगर	मो. : ९७६३८११६७६	तुळशीराम एकनाथ मोरे (सर) नाशिक	मो. : ९४२१५३४८४५
शिवाजी महाशिकारे तरवडी	मो. : ९४०४३८९५१५	शाम जोंधळे निफाड, नाशिक	मो. : ९३७१५२८१५२
बबन मुरलीधर नायकोडे राशीन	मो. : ९४२१३२८७४९	पुरूषोत्तम वाघ मालेगाव, नाशिक	मो. : ९८२३६३३४४३
रामनाथ वाकचौरे गुरुजी, अ. नगर	मो. : ९७६७५५३६८९	ॲड. श्रीधर काळकर नागपूर	मो. : ९८२२५८१४६५
सुरेश नांदुरकर अमरावती	मो. : ९४२३४१३६६२	आर. आर. कुंभार सातारा	मो. : ९४२०४६५१४२
प्रा. दिलीप अमुरकर अकोला	मो. : ९८८१५५९०६१	चंद्रकांत कुंभार फलटण, सातारा	मो. : ९४२३३२८७४२
रामकृष्ण सावीकर अकोला	मो. : ९८५०७२०३७८	चंद्रकांत काशिनाथ कुंभार पाचवड, सातारा	मो. : ९९२२४१८८८३
रमेश वनकर अकोट अकोला	मो. : ९७६६८९२४६०	सुभाष कुंभार पाटण, सातारा	मो. : ९८६९१५२६४४
डि. के. सोनवणे औरंगाबाद	मो. : ९४२२२३९११८	बाळासाहेब कुंभार पलुस, सांगली	मो. : ९८९००१६५४८
ना.ना. सौदागर अकोला-बुलढाणा	मो. : ९०११७३९४७२	सदानंद दिनकर कुंभार इस्लामपूर,सांगली	मो. : ९८९००९७७५८
बाळाजी गोरे देऊळगांवराजा, बुलढाणा	मो. : ९६७३८६२३९२	प्रा. महेश कुंभार कापुसखेड वाळवा, सांगली	मो. : ९८५०९१९८५०
गणेश प्रल्हाद सोनुने बुलढाणा	मो. : ९८५०३३१५८१	सौ. रेखा कुंभार ठाणे	मो. : ७२४८९२८९७१
रामदास अंबादास कुंभार केज, बीड	मो. : ९८६०५७२३८३	मनोहर नामदेव जाधव, मुंब्रा, ठाणे	मो. : ९९२३१५७९०१
उत्तमराव काळे सर चाळीसगांव, जळगांव	मो. : ९८५०१९९९१८	श्रीकांत कुंभार ठाणे	मो. : ९८३३५८५०६९
महादेव तुकाराम हरिमकर भुसावळ जळगांव	मो. : ९४२३९३५४४४	डी.डी. चव्हाण देवपुर, धुळे	मो. : ९४२२२१८८७१
के. एन. मोरे यवतमाळ	मो. : ९८५०७२१३३६	शामराव वाघ देवपुर, धुळे	मो. : ९४२०८४९५८०
माधवराव मेहरे आर्वी, यवतमाळ	मो. : ९९२२८५८४०९	सौ. संगिता बबनराव जगदाळे नंदुरबार	मो. : ८६०५८५४५४४
सदानंद वामन कुंभार, उमरगा, उस्मानाबाद	मो. : ९७६३८५२४१५	हृदयेश दगडुभाई चव्हाण शहादा नंदुरबार	मो. : ९४०३८८४४६४
घन:शाम कुंभार इचलकरंजी, कोल्हापुर	मो. : ९४२३८१६१६३	हिरामण बच्छाव, नवसारी (गुजरात)	मो.: ०९०९९४११६०१
विनायक कुंभार जयसिंगपूर, कोल्हापुर	मो. : ०२३२-२२२१३९०	विनोद प्रजापति, झाँसी (उ.प्र.)	मो. : ०९४१५९४३६७७
अरविंद राणे कोल्हापूर	मो. : ९८९०३३३६९३		



संपादकीय - दिवाळी अंक

दिवाळी म्हणजे दिव्यांच्या ओळी... घरात, घराच्या परीसरात, देवघरात, अंगणात, तुळशी वृंदावनात सर्वत्र दिवेच दिवे लावायचे. सारा आसमंत प्रकाशाने उजळून काढायचा... सारे सारे या उजेडाने 'थुई, थुई' नाचताना दिसले पाहिजे. सकाळी सकाळी अंगणात पारिजातकांच्या फुलाचा सडा पडलेला पाहिल्यावर अंतर्मन कसे खुलून जाते तसेच दिवाळीच्या दिवसात सायंकाळी दिव्यांचा झगमगाट पाहिला की मनाचा मनमोर असाच बहरुन जातो... नव्हे बहरलाच पाहिजे.

परंतु प्रकाशाचा हा आनंद उपभोगत असताना आजूबाजूलाही नजर टाकता आली पाहिजे. 'जग सुखी तर आपण सुखी' हे तत्व लक्षात ठेवता आले पाहिजे. सारे जग दु:खात आकंठ बुडालेले असताना आपल्या वितभर सुखाची ती काय किंमत... अमेरीका, रशिया, चीन, युक्रेन इत्यादी देशांत सुरु असलेला युद्धाचा आगडोंब दूरदर्शनवर पाहतांना आपल्याही काळजाचा ठोका चकतोंच ना.... या झाल्या जगाच्या गोष्टी... भरल्या पोटावरुन हात फिरवताना आपल्याला आपल्या शेजारची, कुटुंबातली, समाजातली, अगदी भावकीतली माणसे रोज कोणत्या ना कोणत्या 'युद्धाला' सामोरे जात आहेत हे पण आपण नको का पाहायला? 'आपण त्यांच्यासाठी आणि ते आपल्यासाठी' हे सूत्र आपण लक्षात ठेवलेच पाहिजे.

'सुख पाहता जवापाडे! दु:ख पर्वताएवढे' असे म्हणून कसे चालेल? एरव्ही ओकेबोके दिसणारे ते डोंगर वर्षाकाळात कसे हिरवेगार होऊन जातात. किती मनमोहक दृश्य असते ते! मग आपल्याभोवती आणि आपल्या स्वजनांभोवतीं असणारे दु:खाचे डोंगर आपणही सुखाच्या हिरवळीने प्रफुल्लीत करु या ना... नव्हे केलेच पाहिजेत. आपले कुटूंबीय, आपले शेजारी, आपला कुंभार समाज, आपला मित्र परीवार यांच्याही मनांत ही सुखाची हिरवळ आपण पसरवू शकतो ना... दिवाळीच्या दिवसात हा 'प्रकाशा'चा दिवा आपण लावू शकतो ना...

'एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ' या न्यायाने यांनाही आपण ह्या सुखाचा मंत्र सांगू शकतो ना... येथे आम्हाला त्यांच्यासाठी 'आर्थिक' मदतच अपेक्षीत नाही तर वेगवेगळ्या स्वरुपात आपण त्यांना, 'मार्गदर्शन' करु शकतो... योग्य वाटेवर आणू शकतो... चांगला व्यवसाय, चांगला अभ्यासक्रम, नोकरी धंद्यातल्या तुम्हाला ठाऊक असणाऱ्या खाचाखोचा यशस्वी वैवाहिक जीवनासाठी योग्य जोडीदार निवडण्यांच्या क्लृप्त्या, आपणाजवळ असलेले यशस्वी जीवनाचे धागेदोरे, आपणाजवळ असलेले अलौकीक ज्ञानामृत आणि आणखी कितितरी गोष्टी या 'समाजबांधवांना' सांगून त्यांच्याही आयुष्यात 'नवनवोन्मेषशालिनी' दिव्यांच्या ओळी प्रकाशमान करु शकतो.

हे नेहमी लक्षात ठेवा की, ''दिव्यांच्या रोषणाईत आणखी दिवे लावण्यापेक्षा ते अंधारात लावावेत अंधाराना त्यामुळे जेव्हढा आनंद होईल त्यापेक्षा काकणभर जास्त आनंद त्या 'प्रकाश' देणाऱ्या दिव्याला होईल.''

ही दिवाळी आणि नुतन वर्ष तुम्हा सर्वांना आनंदाचे, सुखाचे, समृद्धीचे आणि नाविन्याचे जावो हीच परमेश्वरी प्रार्थना.

संजय राजे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

८० जी प्रमाणपत्र मिळवणाऱ्या विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे कार्य अत्यंत प्रेरणादायी... संजय राजे



झेंडावंदनासाठी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते

अमरावती : श्री संत गोरोबा काका भवन बडनेरारोड अमरावती येथे कुंभश्री संपादक संजय राजे यांच्या हस्ते दिनांक १५/८/२२ सकाळी ८.०० वाजता झेंडावंदन करण्यात आले. या प्रसंगी वि.कुं.स.सु. समिती अध्यक्ष सुधाकर शेंडोकार, उपाध्यक्ष ॲड. गजाननराव तांबटकर, प्रमुख पाहुणे संजयजी राजे, संपादक कुंभश्री मासिक पुणे, पंजाबराव काकडे अध्यक्ष, समाजोन्नती समिती, कार्याध्यक्ष सुरेशराव नांदुरकर, सचिव डॉ. श्रीराम कोल्हे, कोषाध्यक्ष सतीशराव गावंडे, महिला अध्यक्ष श्रीमती प्रभाताई भागवत, व सर्व सदस्य श्रीमती नांदुरकर, गजाननराव वडुरकर, विनायकराव तायडे, राजेंद्र भागवत, पंजाबरावजी मेहरे, राऊत साहेब, विषेश उपस्थित संदीपराव काळकर, राहुल काळकर, पंकज माहुलकर, प्रमोदराव, निलेश इ. उपस्थित होते. झेंडावंदन व राष्ट्रगीता नंतर डॉ. कोल्हे यांनी समिती तर्फे चालू केलेल्या स्कील इंडिया अंतर्गत सरकारमान्य विनामूल्य प्लंबिंग व सिक्युरिटी गार्ड कोर्सचे वर्ग आणि प्रॅक्टिकल साहित्य याची इत्यंभूत माहिती संजय राजे यांना दिली. तदनंतर पाहुण्यांची समयोचित भाषणे झाली.

या वेळी बोलताना कुंभश्री संपादक संजय राजे यांनी संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक केले. डॉ. श्रीराम कोल्हे यांनी अथक परिश्रम करून समितीला ८० जी प्रमाण पत्र मिळवून दिले आणि असे प्रमाण पत्र मिळवणारी महाराष्ट्रातील कुंभार समाजाची पहिली संस्था होण्याचा मान मिळवल्या बद्दल डॉ. कोल्हे आणि समितीच्या सर्व पदाधिकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि समितीला सर्व प्रकारची मदत करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

मुजोर

मंदाकिनी डावरे

दुबळ्या जातींना सामाजिक सुरक्षा, त्यांच्या सक्षमीकरणावर भर देणे आणि मुख्य म्हणजे त्यांच्या बाबतची अस्पृश्यता नाकारणे. अशा अनेक गोष्टीबाबत अधिक क्रियाशीलता ठेवण्यावर जरी भर दिला जात आहे तरी सुद्धा देशाच्या काही भागांमधून आजही काही प्रथा खूप खोलवर रुतून बसल्या आहेत.



भाग एक

''यू.पी.एस.सी.''च्या परीक्षेचा माझा अभ्यास चालू आहे. त्यातील एक पेपर असा आहे की ज्याच्या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. अर्थातच त्यातील बारकाव्यांची माहिती करुन घेतांना एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे की, ''तुम्हांला त्या त्या समाजातील ज्वलंत समस्यांची माहिती आणि त्यावरील प्रभावी उपाय नेमके काय असू शकतात हे माहीत असणे अगदी गरजेचेच असते. अर्थातच हा विषय आहे,'' विविध समाजामधील जातीयता आणि त्या व्यवस्थेतील अस्पृश्यता! यांचा सखोल अभ्यासाचा!!

आपल्या संविधानाने काही ठोस पावले याबाबतीत उचललेली सुद्धा आहेतच! त्यानुसार ''दुबळ्या जातींना सामाजिक सुरक्षा, त्याच्या सक्षमीकरणावर भर देणे आणि मुख्य म्हणजे त्यांच्या बाबतची अस्पृश्यता नाकारणे; अशा अनेक गोष्टीबाबत अधिक क्रियाशीलता ठेवण्यावर जरी भर दिला जात आहे तरी सुद्धा देशाच्या काही भागांमधून आजही काही प्रथा खूप खोलवर रुतून बसल्याची माहितीही अनेकदा पुढे येत असते.

''त्यातीलच आहे ही पुढील एक सत्यकथा!''

देशाच्या उत्तरप्रदेशातील हा आहे अगदी लहान असलेला एक कसबा! तेथीलच एका मुख्य शहरापासून खूप लांब आणि अगदी आतवर असलेल्या ह्या कसब्याचे नाव आहे. 'खेरा!' अगदी लहान

असलेल्या ह्या खेडेगावाचे नैसर्गिक सौंदर्य. तेथील शांत जीवन यापेक्षा तेथे मोठ्या प्रमाणावर जाणवत होती ती तेथील उच्चवर्णीय धनिकांची मक्तेदारी! आणि त्यांच्यापैकीच एक मातबर व्यक्ती होती ''राजकुंवरजी''

गावातील निम्म्या जमिनी कुंवरजींकडे गहाण पडलेल्या होत्या. ज्या लोकांनी जमिनीच्या बदल्यात कुंवरजीकडून पैसे घेतले होते त्याची परतफेड न केलेल्या लोकांच्या जमिनी आता कुंवरजींच्याच मालकीच्या झालेल्या होत्या. अमाप अशा पैशांच्या जोरावर तर त्यांची ''हम करे सो कायदा'' ही स्वरचित घोषणा जणु साऱ्या पंचक्रोशीला माहीत झालेली होती. ह्या त्यांच्या कायद्या अंतर्गत दलितांवरील अत्याचारांना तर अंतच नव्हता. वंचित, दु:खी झालेले ते दलित वर्षानुवर्षे निमूटपणे तो जुलुम सहन करीत आलेले होते.

अशावेळी मात्र महात्मा फुले यांची विचारपद्धती आणि त्यातून घडलेला दृष्टीकोन शिरोधार्य मानत स्वत:चे आत्मभान जागृत केलेली एक तरुणी चळवळीकडे वळली होती. आपल्याबरोबर दलितांचा, वंचितांचा असा एक लहानसा गट घेऊन ''जातीव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या प्रश्नांच्या ''घोषणासह ती सारा 'खेरा' गाव पालथा घालीत होती. होय! 'करुणा' हीच ती तरुणी होती.

असे जरी होते तरी गावातील त्या मातब्बर आणि अहंमपणाच्या मग्रूर विळख्यात गुरफटून बसलेल्या लोकांना करुणाच्या त्या घोषणा आणि प्रभात फेऱ्यांशी काही देणे घेणे नव्हतेच.

''बुद्धी, सद्धर्म आणि सृष्टीनियमाविरुद्ध असलेली जाती व्यवस्थेतील ही अस्पृश्यता नष्ट करा, नष्ट करा!!'' ह्या दलितांच्या घोषणा कुंवरजी आणि त्यांच्या सारखेच गाव प्रमुख ह्यांनी कानावर सुद्धा येऊ दिल्या नव्हत्या. अशावेळी मात्र...?? घोषणा देत करुणाबरोबर चाललेल्या ह्या 'प्रभातफेरी' मध्ये एक खणखणीत आवाज उमटला, ''दुबळ्या जातींना सामाजिक सुरक्षा मिळालीच पाहिजे; मिळालीच पाहिजे.'' त्या आवाजाबरोबर फेरीमधील सर्वांचेच आवाज सामील होत राहिले आणि तो संपूर्ण गट करुणाच्या घराबाहेर येऊन थांबला तो सर्व गावभर हिंडल्यानंतरच!

रोजच्या शिरस्त्याप्रमाणे करुणाने घरात जाऊन आधीच तयार करुन ठेवलेला गुळपाण्याचा तो माठ बाहेर आणून समोरच्या लहानशा ओट्यावर ठेवला आणि प्रत्येकाला ती खापराच्या पेल्यातून ते गुळपाणी देत असतांना, एक हात अचानक करुणाच्या पुढ्यात आला आणि त्या हातात ती पेला देणार... तोच ती चमकली आणि.....?

''रावसाहेब! तुम्ही ऽऽऽ?'' असे दचकून म्हणाली... खरं तर! दचकण्यासारखीच होती ती गोष्ट! कारणं तिच्यासमोर प्रत्यक्षपणे कुंवरजींचा मोठा मुलगा 'युवराज' हा उभा होता. ''होय करुणा! आजपासून मी आणि माझे मित्रही आपल्या या गटातून तुझ्या कार्याला हातभार लावणार आहेत!'' असे म्हणत 'दलितांचा स्पर्श सुद्धा होऊ न देणाऱ्या युवराज व त्याच्या मित्रांची करुणाच्या हातून ते गुळपाण्याचे पेले घेतले. आणि समाधानाने प्राशनही केलेले पाहून ''हाच का तो कॉलेजमधील युवराज?'' याच विचारात ती गर्क झाली.

भाग दोन

ज्यावेळी करुणाला बारावीचा अभ्यास करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत होते, तेही बरेचसे अंतर पायी पायी आणि काहीसे अंतर बसच्या माध्यमातून, त्यावेळी तिने त्यांच्या ज्यू कॉलेजमध्ये प्रथम युवराजला पाहिले होते. तेही कॉलेजच्या परिसरात फक्त उनाडक्या करतांना. क्लासरुमस जणू त्याच्यासाठी नव्हत्याच! स्वत:च्या फोरव्हिलर मधून त्याच्या सारख्याच उनाड मुलांना घेऊन तो कॉलेजमध्ये येत असे. आरडा ओरडा करणे आणि आपल्या ज्युनिअर्सना रॅगींग करणे हा त्याचा तेथे रोजचाच परिपाठ झालेला होता. त्याच्या या सवयीमुळे खरे तर त्याला कॉलेजमधून रस्टिकेटच करायला हवे होते. परंतु कुंवरजी स्वत: त्या कॉलेजचे सर्वेसर्वा असल्याने युवराजवर ठपका ठेवण्याची कोणाचीही कधीच हिम्मत झालेली नव्हती.

आज विशेष म्हणजे तोच युवराज करुणाच्या मोर्चात मिसळला गेला होता. तिच्या विचारांशी सहमत होत तो तिच्या बाजूनेही उभा राहिला! अर्थात हे दृश्य कोणालाही आश्चर्यातच टाकणारे होते. करुणाही थक्कच झालेली होती. ''युवराजमध्ये हा बदल कसा काय घडला असावा?'' ह्या विचारात असतांनाच तिला तिच्या मागील काही वर्षापूर्वीचा एक लहानसा प्रसंग आठवला...

''करुणाला बारावीतील चांगल्या गुणांमुळे नर्सिंग कोर्ससाठी एका चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळालेला होता. त्यावेळी अभ्यास क्रमाचे तिचे दुसरे आणि फायनल इयर सुरु होते. पूर्वीसारखेच तालुक्याला शिक्षणासाठी येतांना तिच्या 'खेरा' गावापासून आधी दोन कोस पायी चालणे त्यानंतर मागील गावावरुन येऊन पुढे जाणारी बस पकडून कॉलेजला जाणे. आणि कॉलेजचे तास संपले की निम्मेअंतर बस आणि निम्मेअंतर पायी चालत घराकडे परतणे हा तिचा नित्यक्रमच झाला होता.

त्या दिवशी सुद्धा नेहमीप्रमाणेच बस मधून उतरुन करुणा पायी पायी तिच्या घरी निघालेली होती. तेवढ्यात तिच्या मागून एक व्यक्ती त्याच्या बाईकवरुन भरधाव वेगाने पुढे निघून गेली खरी परंतु पुढच्याच वळणावर त्या 'बायकरचा' आपल्या वाहनावरील ताबा सुटला आणि प्रचंडपणे असलेल्या त्याच्या बाईकच्या वेगामुळे तो त्याच्या बाईकसह रस्त्याच्या कडेला असलेल्या त्या खोल डोहांमध्ये फेकला गेला.

रस्त्याने पूर्ण शुकशुकाट होता. करुणा धावतच त्या डोहापाशी आली आणि पहाते तो काय बाईकवरील त्या तरुणाचा पायच मुळी बाईकमध्ये अडकल्याने दोघेही तळाशी जाऊ लागले होते. अंगावर काटा उभा राहिला करुणाच्या! तशाही परिस्थितीत ''मला त्या बुडणाऱ्या तरुणाला वाचविलेच पाहिजे'' असे म्हणत मोठ्या धीटपणाने तिने डोहात उडी मारली...!

आता करुणाने त्या बुडत चाललेल्या तरुणाला पकडले खरे परंतु त्याचा पाय बाईकमधून ओढून काढताच येत नव्हता. बाईकही भरपूर जड असल्याने तोही खाली खालीच चालला होता. अथक

प्रयत्नानंतर त्या तरुणाचा पाय बाईकमधून सोडविण्यात करुणाला यश आले आणि तिने त्याला घट्ट पकडून डोहाच्या किनाऱ्यापर्यंत आणले. तेथे त्याला पालथे टाकून व्यवस्थितपणे प्रथमोपचार देऊन त्याच्या पोटात गेलेले पाणी काढण्यात तर तिने यश मिळविले परंतु त्याला शुद्धीवर ती आणू शकली नाही. त्यामुळेच त्या तरुणाला हॉस्पिटलमध्ये पोहचविणे गरजेचे होते. परंतु कसे? रस्त्यात तर कोणीच नव्हते आणि तिच्याकडे कोणते वाहनही नव्हते. ''काय करावे?'' ह्या विचारात पडलेल्या करुणाला सुदैवाने समोरुन एक ट्रॅक्टर येतांना दिसला. रस्त्याच्या मध्यभागी जाऊन तिने ट्रॅक्टर चालकाला मोठ्या मिनतवारीने मदतीला घेतले आणि त्या ट्रॅक्टरमध्ये बेशुद्ध तरुणाला ठेऊन तालुक्याच्या हॉस्पिटलमध्ये पाठविले.

ट्रॅक्टरवाल्याने त्याचे काम अगदी प्रामाणिकपणे केले. हॉस्पिटल मधील डॉक्टरांकडे त्या बेशुद्ध माणसाला सोपवितांना, ''एका तरुणीने ह्या माणसाला पाण्यातून बाहेर काढले. परंतु ती स्त्री कोण होती ते मला माहित नाही.'' एवढे सांगून तो उपकारकर्ता तेथूनच आपल्या कामाला निघून गेला होता.

दवाखान्यातील डॉक्टरांनी, ''बेशुद्ध व्यक्ती म्हणजे कुंवरजींच्या धाकटा मुलगा धनराज आहे हे ओळखून ताबडतोब कुंवरजींना तेथे बोलावून घेतले. डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे लवकरच धनराज शुद्धीवर आला. त्यानंतर काही वेळातच त्याने घडलेली हकीगत सांगितली खरी पण, ''मी पाण्यात पडल्या पडल्याच कोणा एका स्त्रीनेही तेथे उडी घेऊन बाईकमध्ये अडकलेला माझा पाय सोडविला. परंतु याच्यापुढे काय घडले ते आणि मला वाचविणारी ती स्त्री कोण होती ते मला काहीच माहीत नाही.'' ही धनराजची जबानी नोंद करुन डॉक्टरांनी त्याला घरी घेऊन जाण्याची परवानगी कुंवरजींना दिली होती.''

''माझ्या मुलाला कोणा दूताकरवीच परमेश्वराने वाचविले आहे.'' याच समाधानात कुंवरजी धनराजसह घरी आले खरे! परंतु ''ती स्त्री कोण?'' याचा शोध घेऊन तिचे आभार मानल्याशिवाय मला चैन पडणार नाही ''हा होता युवराजचा पण!''

भाग तीन

युवराजच्या बऱ्याच प्रयत्नांनी जे नाव पुढे आले ते होते 'करुणाचे!' त्या नावाबरोबरच त्याला आठवले ते कॉलेजमधील करुणाचे वर्कृत्व! मोठ्या धडाडीने ती तिचे विचार मांडीत असल्याने त्या विचारांची खोली अतिशय ही विस्तृत असे त्यातील सच्चेपणामुळेच तिला अनेक पारितोषिकेही मिळाल्याचे युवराजने पाहिले होते. मात्र त्यावेळी आपल्याच धुंदीत असलेल्या युवराजने त्या गुणांची कदर केलेली नव्हती. परंतु धनराजचे जीव वाचविण्यातील करुणाची धडाडी, निस्वार्थीपणा आणि परोपकार ह्या गुणांनी युवराजला जिंकले होते. प्रभावित झालेला युवराज अगदी हल्ली रोजच करुणाच्या कार्याला हातभार लावण्याचे समाधान मिळवू लागला होता.

''आपले कॉलेजचे तास केंव्हा संपतात आणि केव्हा आपण ह्या दलित चळवळीत भाग घेतो असे हल्ली युवराजला वाटू लागले होते. त्यामुळेच करुणा तिची सकाळची नर्सची ड्यूटी संपवून खेराला परत येण्याच्या आत युवराजकडून मोर्चाची संपूर्ण तयारी झालेली असे. त्यासाठी वेगवेगळे बॅनर्स बनविणे, जास्तीत जास्त लोकांशी संपर्क साधून त्यांना मोर्चामध्ये समाविष्ट करुन घेणे ह्यासारखी कितीतरी कामे युवराजने आपणहून स्वत:कडे ओढून घेतली होती. युवराजच्या मदतीने करुणाही सुखावली होती.

आता मोर्चाची व्याप्ती केवळ 'खेरा' गावापुरतीच मर्यादित न रहाता ती अनेक मोठ्या तालुक्यांपर्यंत जाऊन पोहचली होती. युवराजच्या मदतीमुळे दलितांच्या मागण्या सरकारी यंत्रणांच्याही कानावर रोजच्या रोज जात असत! अशाप्रकारे करुणा व युवराज दररोजच एकत्रितपणे काम करीत असता एकमेकांच्या प्रेमात कधी पडले ते त्यांचे त्यांना सुद्धा समजून आले नाही. आणि त्यातूनच पुढे जात दोघांनीही त्यांच्या विवाहाचा निर्णय पक्का करुन विवाहाची तयारी सुद्धा सुरु केली होती.

याचवेळी खेरा गावात ग्रामपंचायतीच्या निवडणुकांची धामधूम सुरु होती. सरपंचांच्या जागेसाठी उभे असलेले कुंवरजी सभा आणि मिरवणुकामधून प्रचाराच्या कामात दंग असल्याने, 'युवराज हा कोणा दलितांच्या चळवळीत गुरफटला गेला आहे' ही गोष्ट कुंवरजींच्या गावीही नव्हती.

''आणि खरोखरच ही गोष्ट जेव्हा कुंवरजींना समजेल तेव्हा ते रागाने बेभान होऊन जातील, युवराजला घराबाहेर काढतील!'' यासंबंधी आसपासच्याच काय तर साऱ्या गावकऱ्यांनाच खात्री होती. परंतु नेमके याच्या विरुद्धच घडले. करुणाच्या साथीने युवराज जेव्हा तिच्याबरोबरीने काम करु लागला तेव्हा सुरुवातीला कुंवरजी संतापले होते. परंतु ''मग्रूरपणे वागणारा आपला मुलगा एवढा विनम्र झाला आहे, उनाडक्या करणारा मुलगा मन लावून काम करु लागला आहे'' ही गोष्ट कुंवरजींच्या दृष्टीने खूपच कौतुकाची असल्याने त्यांचा तो राग केव्हाच निवळूनही गेला होता.

म्हणूनच ''युवराज बेटा! करुणाच्या गुणांपुढे मी तिची शूद्र जाती कधीच विचारात घेणार नसल्याने निवडणुका संपताच मी मोठ्या धुमधडाक्यात तुम्हा दोघांचा विवाह सोहळा संपन्न करणार आहे!'' कुंवरजींनी अगदी खात्रीपूर्वक सांगितले.

त्यानंतर सततपणे आपल्या रोजच्या प्रचारात कुंवरजींनी, ''खेरा'' गांव हे जातीभेदभावमुक्त झालेच पाहिजे! दलितांना त्यांच्या हक्कापासून वंचित होऊ देता कामा नये यासारख्या घोषणांनी गाव दुमदुमून टाकला. गावातील जवळ जवळ पन्नास टक्यापेक्षा जास्त मते ही दलितांचीच असल्याने सहाजिकच कुंवरजींनी ती निवडणूक जिंकली होती. ''खेरागावचे सरपंचपद अगदी निखलसपणे त्यांच्याचकडे आले.

सगळीकडे उत्साहाचे वातावरण होते. गावकऱ्यांचे आभार मानण्यासाठी कुंवरजींनी एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी खास असे पाहुणे म्हणून त्यांनी करुणा आणि तिच्या आईवडिलांनाही आवर्जून आमंत्रण दिल्याची दोन कारणे समोर येत होती ती म्हणजे करुणाच्या परोपकारी आणि स्वाभीमानी विचारांमुळे

युवराज खऱ्या अर्थाने माणसांमध्ये आला होता आणि दुसरे कारण म्हणजे ''आपल्याला आता पूर्वीसारखा माणसामाणसात भेदभाव ठेवणे कितपत योग्य आहे? याचा साक्षात्कार झाल्याचे!''

त्याचवेळी घडून आला तो ''युवराज आणि करुणा'' ह्यांच्या साखरपुड्याचा सोहळा! त्यातच, ''एवढ्या मोठ्या मानाचा माणूस असावा तो फक्त कुंवरजींसारखाच!'' हे कौतुकोद्गार हे सगळीकडे निनादू लागले होते. ''निवडून आल्यामुळे आता प्रथम ग्रामपंचायतीच्या मिटींगा आणि त्यातूनच गावसुधारणेचे काम हाती घेता यावे'' याच विचाराने कुंवरजींनी युवराजच्या लग्नाची तारीख दोन महिन्यानंतरची ठरवून पक्की केली.

भाग चार

युवराज आणि करुणा खुश होते. आपल्या भावी आयुष्याची स्वप्ने रंगवीत दलित चळवळीचे त्यांचे कार्यही मोठ्या कळकळीने सुरु होते. कार्याचा विस्तारच एवढा वाढला होता की दोघांनाही आता स्वतंत्रपणे वेगवेगळ्या गावांमध्ये जावे लागत होते. कधी करुणा घोडेगाव तर युवराज बुधनी गावात कार्यरत असे, दुसऱ्या दिवशी युवराज 'पिंपळी' या वाडीवर तर करुणा 'कौसा' ह्या पहाडी इलाख्यात असे.

आज करुणाचे भाषण बरेचसे दूरवर असलेल्या दुधगाव मध्ये ठरविले गेले होते. तेही तेथील 'शक्ती' ह्या संघटनेच्या विनंतीवरुनच! ''जातीव्यवस्था आणि समस्या'' ह्या विचारांनी त्या गावात करुणाने जागृती घडवून आणावी अशी त्या संघटनेची खरीखुरी तळमळ होती. करुणा तिकडे जाण्यासाठी सकाळी लवकरच निघालेली होती. नेहमीप्रमाणेच आजही कुंवरजींनी त्यासाठी त्यांची कार पाठविली असल्याने करुणाला प्रवासाची फारशी दगदग होणार नव्हती. होय! आपल्या भावी सुनेसाठी कुंवरजीचा मदतीचा हात वारंवार पुढे येऊ लागला होता. युवराज हा सुद्धा त्या दिवशी त्याची स्वत:ची गाडी घेऊन फुलगंज येथे दाखल होत होता.

दुधगावमधील करुणाचे भाषण म्हणजे तिच्या हृदयात उचंबळून आलेल्या भावनांचा कल्लोळ होता. आणि तिच्या त्या कल्लोळानेच तेथील त्या लोकमाणसांच्या मनाचा ताबा घेत त्यांच्यामध्ये चलबिचल घडवून आणीत असल्याने तेथील, ''दलित चळवळ यशस्वी होवो! करुणादीदी अमर रहे'' या जबरदस्त घोषणांनी कळले होते.

आज करुणाचे लक्ष पुन्हा एकदा 'खेरा' गावाकडे लागलेले होते. पुढील महिन्यात होणाऱ्या तिच्या आणि युवराजच्या लग्नासाठीची तयारी पूर्ण होणेही गरजेचे होते. त्यामुळेच दुधगावच्या संयोजकांनी केलेला जेवणाचा आग्रह तिने विनम्रपणाने नाकारला होता आणि त्यांच्या आग्रहाखातर तेथील चहापाणी ती नाकारु शकली नाही. त्यामुळे आता तेथून लवकरात लवकर निघून केव्हा एकदा आपल्या गावी पोहचतो याच विचारात तिचा दुधगावहून परतीचा प्रवास सुरु झाला होता.

मन सकाळपासूनच बरीच धावपळ, प्रवास, भाषणे या सर्व गोष्टींमुळे गाडीत बसल्या बसल्या काही वेळातच करुणाला तिचा डोळा केव्हा लागला ते कळले सुद्धा नाही. इकडे करुणाला 'खेरा'ला पोहचण्यासाठी काहीसा उशीर होत आहे. हे युवराज व कुंवरजीच्या लक्षात येताच सुरुवातीला त्यांना वाटले की कार्यक्रम लांबल्याने करुणाला परतण्यास उशीर होत असावा. त्यामुळे काही काळ ते निश्चित होते. परंतु त्यानंतर मात्र युवराजने करुणाला फोन लावलाच! आश्चर्याचा धक्का बसला त्याला! कारण फोन बंद ठेऊ नकोस असे त्याने तिला बजावले होते. तरीसुद्धा तिचा फोन बंद होता. करुणा वेळेत घरी न पोहचल्यामुळे तिचे आईवडील सुद्धा काळजीत होते. त्यांनीही कुंवरजींच्या वाड्यावर चौकशीसाठी धाव घेतली. सर्वांचीच काळजी आता वाढत चालली होती. दुधगावला फोन केला तर ती दुपारीच तेथून 'खेरा'कडे गेली असल्याची माहिती कळली होती. ''मग एवढा वेळपर्यंत करुणा होती तरी कुठे?.....''

सर्व पोलिसयंत्रणा कामाला लावून कुंवरजी अगदी नेटाने प्रयत्न करु लागले होते. 'दुधगाव-खेरा' या रस्त्याची तपासणी जेव्हा करण्यात आली तेव्हा तेथे ना कुंवरजींची गाडी ना करुणा आणि ड्रायव्हर यांचा तपास लागला. ह्या तीन जणांना एकाच वेळी कोणी व कसे नाहीसे केले? ही समस्या आता यंत्रणेसमोर असतांनाच एक शक्यता त्यांना अशीही वाटली की 'दुधगाव व खेरा' या गावांच्या मधून वहाणाऱ्या विपुला नदीत तर गाडी कोसळली नसेल? आणि त्या शक्यतेनुसारच शोध कार्य सुरु झाले...

बराच वेळानंतर पाणबुड्यांच्या शोधाला यश प्राप्त झाले आणि त्यांना कुंवरजींची गाडी नदीच्या पार तळाशी आढळली. गाडीचे दार उघडे होते मात्र आतमध्ये करुणा आणि ड्रायव्हर नव्हतेच. नदीच्या प्रवाहाबरोबर ते दोघेही वाहून तर गेले नाहीत ना? हीच शक्यता आता तेथे उमटू लागली होती. पाणबुड्यांनी आता नदीची उत्तर व दक्षिण अशा दोन्ही बाजू अगदी पिंजून काढल्या. पण त्या दोघांचाही ना पत्ता लागला ना त्यांचे शव सापडले.

भाग पाच

पंधरा दिवस होऊन गेल्यानंतर सुद्धा दोघां जणांचाही काहीच मागमूस लागत नव्हता पोलिस यंत्रणेच्या कामातही जरासुद्धा खंड पडलेला नव्हता. अशावेळी मात्र एकदिवस अगदी अघटीतच घडले, खेराच्या पोलिसचौकीमध्ये अचानक तीन व्यक्ती येऊन दाखल झाल्या आणि .... आणि? एक थक्क करुन सोडणारी हकीगत पुढे आली...

''कुंवरजींची कार दुधगावहून परतांना एका ठिकाणी एक जोरदार धक्का बसून एकदम एका जागी थांबली. काहीशा गुंगीत असलेल्या करुणाने त्यामुळेच पटकन डोळे उघडून पाहिले तर काय? दोन अनोळखी माणसे ड्रायव्हरला बाहेर काढीत होती. ती त्याच्यावर आवाज चढवणार तोच कारचा मागील दरवाजा उघडून आत घुसलेल्या एका भिल्लासारख्या जाडजूड माणसाचे दोन्ही हात करुणाच्या गळ्याभोवती पडले आणि तो भिल्ल करुणाचा गळा दाबून तिला ठार करणार तोच...?

त्याचे दोन्ही हात झटकन मागे गेले आणि त्याच्या तोंडून शब्द बाहेर आले, ''काय? करुणाताई तुम्ही? अहो तुम्हांला कसा मारेन

मी? ताई! तुम्ही तर आमच्या वाली!'' आणि त्यानंतर तर त्या भिल्लाने करुणाचे पाय धरले. आणि त्याच्याकडूनच एक दुष्कृत्याचा खुलासा झाला...

''त्याचे नाव महादू! त्याला वाड्यावरुन एक निरोप आला होता की, ''दुधगाव खेरा रस्त्यावरुन येणाऱ्या कुंवरजींच्या कार मधील एक बाई आणि ड्रायव्हर यांचा गळा दाबून त्यांना मारुन टाकावयाचे. त्यांना गाडीत तसेच ठेऊन गाडी नदीत ढकलून द्यावयाची. मात्र त्यापूर्वी गाडीची दोन्ही दारे उघडूनच!!'' करुणाला मारण्याचे कारण होते ते म्हणजे, ''करुणामुळेच सारा गाव कुंवरजींच्या वेठबिगारीतून बाहेर येऊ लागला होता. ''आणि नेमके हेच त्यांना नको होते. त्यासाठीच त्यांनी अतिशय धूर्त असा डाव रचलेला होता...''

''पहिली गोष्ट म्हणजे युवराजला करुणाच्या प्रेमात पडल्याचे नाटक करावयास लावणे आणि तिच्याबरोबर 'चळवळीच्या कामात स्वत:ला गर्क करुन घेणे!' दुसरी गोष्ट होती ती युवराज आणि करुणाच्या साखरपुड्याचा खूप मोठा देखावा! शिवाय त्याहून महत्वाची गोष्ट म्हणजे दुधगावच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने करुणाला एकटीलाच तिकडे पाठवून परततांना तिचा खातमा करुन टाकणे! की ज्यामुळे दलितांवरील अत्याचारासाठी कुंवरजींना कशाचाच धरबंध राहणार नव्हता. विशेष म्हणजे फक्त मोठ्या अपघातामुळे कार नदीत पडून करुणाचा मृत्यु झाल्याचे साऱ्या गावाला कळणार होते आणि ते स्वत: नामानिराळे राहू शकणार होते.'' सर्व काही त्यांनी स्वत:च्या मनाप्रमाणे आणि स्वत:च्या भल्यासाठीच घडवून आणले होते. आता काही दिवसात सर्व काही पूर्वीप्रमाणे ठाकठीक होणार असल्याने कुंवरजी निश्चिंत होते.

भाग सहा

कुंवरजींचे संचित मात्र तसे नव्हते. एक जोरदार दणका बसला होता तो त्यांच्या योजनेला आणि तोही त्यांचाच वेठबिगार असलेल्या महादूकडून! करुणा व ड्रायव्हर त्याच्या चांगुलपणामुळे वाचले होते. त्याच्या आयुष्यातील खरेतर एक पुण्यकर्म त्याच्या हातून घडले होते. यापूर्वी अनेक कुकर्मे कुंवरजींनी त्याच्याकडून करवून घेतली होती. परंतु या घटनेमुळे महादू असा पूर्णपणे सावध झाला होता. एक भिल्ल आता 'माणुसकीला काळिमा फासणाऱ्या कुंवरजींविरुद्ध आपल्या संपूर्ण जमातीसह उभा ठाकला होता.'

''मृत्युच्या जबड्यातून सुटका!'' ही गोष्ट करुणा आणि ड्रायव्हर कैलास यांच्यासाठी जरी या घटकेला समाधानांची बाब होती तरी सुद्धा दुसऱ्या कोणत्याही मार्गाने त्यांच्यापुढे संकट उभे राहू शकणार होते. त्यामुळेच काही दिवस तरी ''अज्ञात वास'' हा त्यांच्यासाठी महत्वाचा होता. ''परंतु कुठे?'' हा प्रश्न निर्माण होण्याच्या आतच महादूचा विचार पक्का ठरला आणि...''

''खेरा''पासून बऱ्याच दूर असलेल्या एका लहानशा वाडीत, महादूच्या अगदी निकटवर्ती असलेल्या एका उपकारकर्त्या दांपत्यांचे झोपडीवजा घर, त्यावेळी एक 'आधारवड' म्हणून पुढे आले! महादेव तेथेच करुणा आणि कैलासची रहाण्याची सोय करुन देऊन तो कुंवरजीकडे परतला. आणि काम फत्ते झाल्याचा निरोप देऊन मोकळा सुद्धा झाला.

त्यानंतर मध्यंतरी पंधरा दिवसांचा कालावधी समाप्त झाल्याने करुणा आणि कैलास यांना घेऊन महादू पोलिस चौकीपर्यंत पोहचला होता. कुंवरजींचा दबदबा जसा गावभर होता तसाच तो पोलिस चौकीमध्ये असल्याने एरवी महादूने तेथपर्यंत पोहचण्याची हिंमत केली नसती, परंतु त्या गावचे भाग्य म्हणा की, करुणाचे भाग्य म्हणा तेथे चार दिवसांपूर्वीच बदली होऊन आलेले इन्स्पे. कुरेशी एक जांबाज आणि अतिशय निर्भिड माणूस असल्याचे सगळ्यांना माहीत झालेले होते. तेथे दाखल झालेल्या तिघांचेही जबाब ऐकून घेऊन त्यातील सत्यता पटल्यानंतरच कुरेशींचे पथक थेट वाड्यावर जाऊन पोहचले. इन्स्पेक्टरची जळजळीत नजर आणि कुंवरजींच्या मानेवरील त्यांची पकड काही मिनिटातच काम करुन गेली, आणि पोलिस स्टेशनच्या लॉकअप मध्ये त्यानंतर लगेचच कुंवरजी बंदिस्त केले गेले. मुजोर कुंवरजी आणि त्यांच्यासारख्याच कितीतरी धनाड्यांना कुरेशींसारखे कितीतरी निर्भिड अधिकारीच वठणीवर आणू शकतात नाही का?

करुणाच्या या सत्यकथेप्रमाणे अशाच काही कथांची माहिती आणि त्याचा उहापोह मला आता यू.पी.एस.सी.च्या अभ्यासाच्या निमित्ताने करावा लागणार आहे. त्यातूनच मी बाहेर आणू शकेल ते ''या मुजोऱ्यांच्या एखाद्या गाजर गवतासारख्या पसरत चाललेल्या कुलंगड्या!''

***

कुंभश्री परिवारास दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!!

संतोषी ग्रंथालय कर्वेनगर

हिंगणे होम कॉलनी

संतोषी सदन, कर्वेनगर, पुणे - ४११०५८

साहित्य सेवा सार्वजनिक ग्रंथालय

वारजे माळवाडी, पुणे - ४११०५८

सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, बायोग्राफी व्यक्तीमत्व विकास, स्पर्धा परीक्षांची सर्व विषयांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध. तसेच सर्व दैनिके मासिके उपलब्ध. सभासद नोंदणी चालू आहे.



संस्थापक अध्यक्ष

श्री. चंद्रकांत कुंभार

निवास : दोडके पार्क ए/५०२,
वारजे माळवाडी, पुणे ५२

मोबाईल नं. ८८०५१२०२९

कमळीचा भोप्या

अनसूया कुंभार

भोप्याचा बेरकीपणा व बेजबाबदारपणा पाहून चाणाक्ष गौरीने पुढचे निर्णायक पाऊल उचलले. त्याबरोबर लगेच भोप्यानेही आपली बॅग भरली. आणि तो गौरीबरोबर गाडीत जाऊन बसला. कोणत्याही परिस्थितीत सोन्याची अंडी देणारी कोंबडी त्याला गमवायची नव्हती...!



भोप्या कसातरी काठावर बारावी पास झाला एकदाचा! कमळीचा आनंद गगनात मावेनासा झाला. भोप्याची चाबरट दोस्त मंडळी घरातल्या एकुलत्या एक मोडक्या पण रस्सीने जाम बांधलेल्या खाटेवर उल्हासाने विराजमान झाली. त्यातल्या एकजण उचंबळून म्हणाला-

''अय भोप्याची माय! आमच्या सर्वांमध्ये भोप्यानंच यश मिळवलंय बरं! आता पेढं देताय का न्हाय?''

कमळी पाच-सहा पेढ्यांची पुरचुंडी त्यांच्यासमोर पुढं करत म्हणाली, ''हे घ्या पेढं मुडद्यानो! माझा भूपती तीन वर्ष मेहनत करतुया बरं! आखीर त्याला यश मिळालं बाबानुं! देवाची क्रिपा!

दुसरं काय? आमच्या गरीब परिस्थितीतनं त्योच वर काढणार हाय आमाला! व्हय का नाय धनी! उघडा की आता तरी त्वांड! भूपतीचं कवतिक कराल का न्हाय जरा!''

भोप्याच्या फालतूक मित्रांकडं नजर टाकीत त्याचे वडील रायजी म्हणाले, ''व्हय की रं पोरानुं! तीन वर्स गटांगळ्या खात आखीर भोप्या यंदा काठावर आलाय त्याचं काय कवतिक करावं आता! इतकी वर्स कलासची फी, परीक्षा फी भरताना रोजंदारीत माजं कंबारडं मोडलं, त्याचं काय ग कमळे?''

''व्हय, व्हय! झाली तुमची टेप सुरू! आपल्याच पोरासाठी कष्ट पडल्यात नव्हं! आता वर्षा-दोन वर्षानं भूपती पोलीस हवालदार झाला की तुमच्या कष्टाचं चीज व्हईल बरं!

त्या दोघांची वादावादी ऐकायला नको म्हणून भोप्याच्या दोस्तांनी पेढ्यांवर समाधान मानून काढता पाय घेतला होता.

मग जरा चमकूनच रामजी म्हणाले, ''आँ? भोप्या पोलीस हवालदार हुनार? वाट बघ!''

''व्हय! हुनारच! माज्या दादाची पोलीस भरतीची मोट्टी अकादमी हाय सातारला! तिनं मी शिकायला पाठवनार हाय तेला बरं का! दादा काय पैसं घेनार नाय आपल्याकडनं! कळ्ळं का? व्हय नव्हं भूपती! परवापास्नं मामाकडं जायाचं शिकायला समजलं का?''

आणखी शिकायला लागणार हे ऐकून दचकलेला भोप्या त्वरित आईला म्हणाला, ''आये कायतरीच काय म्हनतीयास? आजपातुर मी तुज्याबिगर कुटं राहिलोय का? मला न्हाय करमनार मामाकडं! हीतं मी रोजंदारी करीन पन त्या शिक्षनाचं नाव काढू नगं! कट्टाळा आलाय मला!''

''भोप्या मुडद्या! बाप रोजंदारी करतुया आन् तुलाबी तशीच करायची हाय व्हय जलमभर? इथल्या टोळभैरावाना सोडायचं न्हाय आन् आभ्यास करायचा न्हाय म्हन की! ते काय न्हाय! जरा मन लावून अभ्यास केलास नि हवालदार झालास तर बक्कळ पैसं मिळवशील, आपलं दळिंदार संपल आसं न्हाय वाटत का लेकरा तुला?'' कमळीच्या डोळ्यात पाणी तराळलं. भोप्या मनात म्हणाला, ''जाऊन तर बघू! आभ्यास काय जमल न्हायतर नाय जमल! इतं आयतं तुकडं मोडतुया म्हणून आय बाचं ऐकावं लागतंय त्यापेक्षा तितं अकादमीत नाष्टा, दोन टाईम भरपेट जेवायला मिळंल आणि जिवाभावाचं टोळकं तितंबी जमवीन की! निघूया मोहिमेवर परवाच!''

कमळीनं दादाला फोन लावला, ''ऐकलंस का दादा! माजं लेकरु बारावी पास झालंया बघ औंदा! आता तुला देखरेखीसाठी अकदमीत त्यो चांगला आभ्यास करल बग! एकदा का त्यो हवालदार झाला की आमी गरिबीतनं वर आलुच म्हणून समज! तुला कल्पना हाय साऱ्याची म्हना! तेवढं संडास-बाथरुम बांधायला धा एक हजार पाठवून दे बाबा! लई लांब जावं लागतंय रोज!''

दादाला बोलायला संधी न देताच कमळीनं फोन ठेवला, जो दादानंच तिला दीड हजाराला घेऊन दिला होता. दोन कपड्याचे जोड, चादर, सतरंजीची पिशवी घेऊन भोप्या सातारला अकादमीत हजर झाला. कडेगावची दोस्त मंडळी मधून मधून आई-बा पेक्षा जास्त आठवत होती. तरीही मेसमध्ये तट्ट फुगून आल्यानंतर निद्रादेवीच्या आधीन होऊन तो अभ्यासासह सर्व काही विसरुन जायचा.

''प्रामाणिकपणे अभ्यास, फिजिकल कराल तर तुम्ही नक्कीच पोलिसात भरती होणार! कठोर प्रयत्न आणि जिद्दीने तयारीला लागा!''... मामाची अशी प्रेरणादायी भाषणं, काटेकोरपणे घेतलेली फिजिकल्स आणि लेक्चर्स, सकाळीच डोंगरावरुन धावून येणे... या सगळ्या गोष्टींचा भोप्याने स्वत:वर काही परिणाम होऊन दिला नाही. पट्ट्या तिथंही बदमाशगिरीनं वागू लागला! श्रीमंतीत वाढलेली, कष्टाची-वेळेची किंमत न जाणणारी चार पोरं त्यानं बरोबर हेरली. मग हे टोळकं फिजिकल व लेक्चर्सना दांड्या मारुन रानोमाळ उनाडक्या करीत फिरायचं! मेसमधल्या चपात्या लंपास करुन त्यांच्या कोंबडी पाट्र्या रानात रंगू लागल्या!

''दोन वर्षानंतर मामाच्या लक्षात भोप्याच्या बऱ्याच गोष्टी आल्या. सरांचा भाचा आहे म्हणून शिकवणाऱ्या स्टाफनेही त्याच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. आपल्या पराक्रमी भाच्याची मामानं दोन-तीन वेळा कान उघडणी केली पण 'बहिणीचा मुलगा' म्हणून जास्त बोलता येत नव्हतं! 'बाकीची पोरं पार होतायत आणि हा आळशी, बेरक्या, कामचुकार भाचा नापास... नको नको ही ब्याद इथं नको! असा विचार करुन मामानं हे कुचकामी पार्सल कडेगावला नवीन कपड्यात सन्मानाने धाडलं!!''

गावाला आल्यानंतर भोप्यानं आईला अकादमीबद्दल खोट्या-नाट्या गोष्टी तिखट मीट लावून सांगितल्या. त्या माऊलीचे हृदय पुत्रप्रेमाने कळवळले! ''दादा! माझ्या देवासारकं गुन असलेल्या भूपतीवर कसलं बसलं आळ घिऊ नगंस! माजं पोरगं काय मला जड नाय! पोलीस भरतीला पाठवलेल्या पोरास तू मागं पाटवलंस, आता ह्यापुढं तुजं त्वांड बी बगनार न्हाय!''

''आगं कमळे नीट ऐकून तरी घे...'' दादावरच्या प्रचंड रागानं कमळीने फोन दात खाऊन कट केला. शिक्षणाची नावड असलेला भोप्या आता मोठा झाला होता. पोरगं हाताखाली काही काम करंल म्हणून रामजींनी पाटलाच्या जमिनीचा एक तुकडा कसायला घेतला. पण भोप्यानं आपली टवाळगिरी आणि भटकंती काही सोडली नाही. या उधळणाऱ्या खोंडाच्या गळ्यात वेळीच लोढणं अडकवायला पाहिजे या विचाराने प्रेरित होऊन कमळीने धाडसी निर्णय घेऊन लाडक्या भूपतीची उमेदवारी जाहीर केली! ''माजा भूपती हायच तसा राजबिंडा! हा हा म्हणता पोरींच्या बापांची रांग लागंल माझ्या दारात! अजिबात चिंतागती होऊ नगा धनी!'' कमळी एका दमात म्हणाली.

''आगं सोड गं! जग काय बोळ्यानं दुध पिनाऱ्यातलं न्हाई कमळे! अंगात न्हाई करनी आन् मला म्हना तरनी! आसं थोडंच होनारे का! काडीची आक्कळ आन् नवा पैसा कमवायची शक्कल न्हायी भोप्याला, त्याला कुठला बाप पोरगी दयाला उदार हुईल सांग की

ग?''... अशी नवरा बायकोची चाललेली सततची जुगलबंदी ऐकून शेजाऱ्यांची बिनपैशाची करमणूक घडायची!

अखेर दोन वर्षांनी एका सांगलीच्या मुलीच्या मनात हा तरणाबांड, देखणा, गोरापान गडी भरला. तशी ती सिव्हिल इंजिनियर पण ठेंगणी-ठुसकी, नाकाने बसकी, अंगाने थोराड आणि भिंगाचा चष्मा... त्यामुळे स्वत:च्या कमतरतेचा अभ्यास करुन, पडीक स्थळांना नाकारुन तिने भोप्याची लाजलाजून मुलाखत घेतली आणि त्याच्या देखणेपणामुळे इतर गोष्टी गौण मानून पप्पांना लग्नासाठी राजी केलं... पप्पांकडे न दिसणारी गडगंज संपत्ती होती... कशाची काळजीच नव्हती!

भोप्यानंही आपल्या बुद्धीला फायदेशीर ताण देऊन विचार केला, ''आपल्या या ऐषारामी आयुष्यात एखादी चिकनी चमेली सांभाळणं आपल्याला शक्य होणार नाही. तेव्हा कशी का दिसेना! ही सिव्हिल इंजिनियर वाली गौरी मागं पुढं नोकरी करील आणि तिच्या बापाचाही जावयाला भरभक्कम आधार मिळंल! काय वाईट? आयुष्याची ददातच मिटली नव्हं!''

गौरीच्या पप्पांनी उगीचच डामडौलाच्या भरी न पडता हुशारीने मोजक्या नातलगांनिशी, जवळच्याच राममंदिरात लेकीचे रखडलेले लग्न बऱ्यापैकी खर्च करुन लावून दिले! यापूर्वीच अर्धी-अर्धी मालमत्ता तिला नि तिच्या भावाला, अशी वाटणीही त्यांनी करुन टाकली होती. लेकीच्या सोईसाठी तिच्या सासरी त्यांनी सर्वसुविधांनी युक्त अशा पाच खोल्या बांधून दिल्या. जणू टुमदार बंगलाच! शिवाय भांडीकुंडी, फर्निचर, कपडालत्ता... भोप्याची कॉलर ताठ झाली. सर्वार्थाने तो सुखावला!

श्रीमंती घेऊन आलेली इंजिनियर सून... कमळीला स्वर्ग दोन बोटे उरला होता! आपल्या ऐश्वर्यवान सुनेचे, व्याहीविहिणच्या उदारतेचे कौतुक करताना कमळीच्या वाणीला धार चढायची आणि ऐकणारा मंत्रमुग्ध होऊन जायचा! भोप्या कधीतरी वडिलांबरोबर रानात हजेरी लावायचा! त्याला मिळालेलं आयतं घबाड पाहून रामजींचे मन दडपून गेले होते! या नवीन जोडप्याचे वर्षभरातले सारे सणवार गौरीच्या आई-वडिलांनी राजेशाही थाटात पार पाडले! सूट-बूट, भरजरी साड्यांचे पोशाख, चांदीची भांडी, सोन्याच्या चेन, नेकलेस, घड्याळे, नवीन टी.व्ही., एसी... दुचाकी... कमळीला पैठण्या... बाबाबाबा!

एकुलत्या एक असलेल्या कन्येच्या प्रवासासाठी तिच्या पप्पांनी दुसऱ्या वर्षी चारचाकी गाडी पाठवून दिली.... मग भोप्या अस्सा काय चेकाळला की बस्स! कमळी तर साऱ्यांना सांगू लागली, ''आमाला सोन्याची अंडी देणारी कोंबडीच मिळाली हाय बरं का! भोप्याने तर त्याच्या वाह्यात दोस्तांबरोबर मौजमजेच्या ठिकाणांनां भेटी द्यायला सुरुवात केली. 'भोप्या किती नशीबवान... त्यामुळे आपलंही नशीब फळफळलं!' असं समजून कमळी आपल्या ऐतखाऊ पुत्राकडे दुर्लक्ष करु लागली होती.

''भोप्या उद्यापास्नं गपगुमान शेतात माझ्याबरोबर कामाला चलायचं! निर्वाणीचं सांगतुया तुला! सगळ्या बाता, फिरनं प्रष्टाप बंद करायचं! सासऱ्याच्या जिवावर बेताल होत चाल्लायस! न्हाय का गं गौरे, ध्यानात येतंया का तुज्या पोरी?'' रामजींनी भोप्याला सुनावलं! भोप्याचं आजपर्यंतचं निष्क्रियतेचे रेकॉर्ड लक्षात घेऊन गौरी सासऱ्यांला म्हणाली, ''मामंजी चार वर्ष मी बघतेय, यांना कामधंदाच करावा वाटत नाही. माझ्या पप्पांच्या पैशावर उड्या मारत हे सतत मनमौजीपणाने वागत आहेत. हे मला अजिबात पटलेलं नाही हो! यांच्या देखणेपणाला भुलून मी अगदी फसलेय हो! पण मी आता गप्प बसणार नाही बरं!''

सोन्याची अंडी देणारी कोंबडी आता चांगलीच फडफडू लागलीय हे भोप्याच्या आणि कमळीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. भोप्यानं आपला मार्ग बदलला. वडिलांच्या काबाडकष्टांकडे दुर्लक्ष करुन तो दूरवरच्या गावात ज्ञानेश्वरीच्या पारायणाला नित्यनेमाने सकाळपासून संध्याकाळपर्यंत जाऊन तिथेच प्रसाद-भोजन खाऊनपिऊन मजेत राहू लागला. या गावाहून त्या गावाला मित्रांबरोबर पारायणाला बसून चिंतामुक्त राहायचे त्याने ठरवले. लोक त्याला ह.भ.प. म्हणू लागले.

त्याचा बेरकीपणा व बेजबाबदारपणा पाहून चाणाक्ष गौरीने पुढचे निर्णायक पाऊल उचलले व बॅग भरुन भोप्याची वाट पाहू लागली. टिळा-माळेसहित घरात प्रवेशलेल्या भोप्याने गौरीला विचारलं, ''कुठं स्वारी चाललीय गाडी घेऊन म्हायेरला का?''

''हो! तुम्हीपण निघायचंय आत्ताच्या आत्ता सांगलीला माझ्यासोबत! तिथे पप्पांच्या सोप फॅक्टरीत नोकरीला बोलंवलंय पप्पांनी! तुम्ही येताय का? नाहीतर मी चालले कायमची माहेरला, तुम्ही बसा इथे गावगुंडासारखे फिरत!'' असे म्हणून गौरीने गाडीच्या चाव्या व बॅग सावरत घराबाहेर पाऊल टाकले! कमळी व भोप्या अवाक् झाले. दोघेजण झटक्यात भुईवर आले. बेडरुममध्ये जाऊन आपली बॅग भरुन भोप्या त्वरित बाहेर आला नि गौरीबरोबर गाडीत जाऊन बसला! कोणत्याही परिस्थितीत सोन्याची अंडी देणारी कोंबडी त्याला गमवायची नव्हती....!!

***

Vilas Kumbhar
Mob. 9960420646 / 8421892375



● **MANIK MEDICAL & BAZAR** ●





AUTO POINT - BUYING & SELLING USED & NEW CAR ON COMMISSION BASIS WITH AUTOLOAN FACILITY

Station Road, A/p. Korochi, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur
Ph.: (0230) 2402684

घंटानाद

सौ. चंद्रलेखा जगताप-बेलसरे



अजूनही रात्रीच्या अंधारात निरव शांततेत तो घंटानाद घुमत आहे. परिसरातील जाग कायम ठेवत आहे. एकविसाव्या शतकात अशा घटना अतार्किक वाटल्या तरी त्या घडत मात्र आहेत. हे अनुभवाने अनेक ठिकाणी सिद्ध होत आहे.



विस्तारत जाणाऱ्या शहराजवळील ती एक वाडी-वस्ती! अलीकडेच महानगरपालिकेत समाविष्ट झाली होती पण तरीही शहराची हवा येथील वाडीत राहणाऱ्या लोकांना लागली नव्हती. अद्यापही ते पारंपरिक पद्धतीने शेती करीत होती. वाटण्या झाल्यावर आपल्या वाट्याला जी जमीन आली त्यात कसत होते. त्यांच्याकडे बैलबारदाना, गायी-म्हशी, औत, पेरणी, कोळपणी यंत्रे होती. त्याचा वापर करून सकाळी भल्लरी म्हणत ते नांगरणी, पेरणी करीत होते. खरीप, रब्बीपिके घेत होते. त्यावाडीत अजूनही पिंपळा खालचा पार शिल्लक होता. जेष्ठ मंडळी सकाळ-संध्याकाळ पारावर बसून शिळोप्याच्या गोष्टी करीत होते.

वाडीत एक शिवकालीन मंदिर होते. ते या वाडीचे ग्रामदैवत! त्या दैवतांवर या वाडीकरांची अगाध श्रद्धा! तेथे पूजा-अर्चा, अभिषेक

यथासांग पार पडत असत. वाडीतील प्रत्येक माणूस ह्या ग्रामदैवताचे दर्शन केल्याशिवाय कामाला लागत नव्हते. वर्षभरात येणारे सण पारंपारिकरित्या साजरे होत होते. काकड आरती, भजने, प्रवचने, भंडारा याचे ही आयोजन नित्य ठरलेले. वाडीतील लेकी-सुना घरापुढे रांगोळी, सडा समार्जन, तुळशीची पूजा नित्यनेमाने करीत असत. वटसावित्रीच्या दिवशी नटून-सजून वाडीतील ललना वडाच्या झाडाची, झाडाला सूत गुंढळून मनोभावे पूजा करीत असत. अगदी वाडीच्या हद्दी बाहेरील मरीआई आणि म्हसोबा, शितलादेवीची पूजा करणे, सणा-सुदीला नैवेद्य अर्पण करण्यास चुकत नसत. घरोघरी होलिका उत्सव उत्साहाने साजरा होत असे. जन्माष्टमी, गोपालकाला, दहीहंडी, रामनवमी, दसऱ्याचे सीमोल्लंघन, दीपोत्सव सर्व सण निगुतीने साजरे होत असत.

दरवर्षी वाडीत यात्रा भरायची. सासरी गेलेल्या मुली-बाळी आपल्या नवऱ्या, मुलांसह माहेरी यात्रेला यायच्या. दर्शनाला प्रचंड गर्दी व्हायची. शहरजवळ असूनही यात्रेत आलेल्या दुकानांवर येथील स्त्री-पुरुष, मुले उत्साहाने खरेदी करायचे. रात्री देवाचा छबिना निघायचा. नवसाचे दंडवत घालत बायका मंदिरापर्यंत जायच्या. यात्रेच्या दिवशी गोडधोड आणि दुसऱ्या दिवशी सामिष जेवणाचा आस्वाद घेऊन पाहुणे मंडळी आपापल्या गावी निघून जायची. यात्रेच्या आधी घरांना रंगरंगोटी व्हायची, अंथरून-पांघरूण, भांडी स्वच्छ व्हायची. दिवाळी सारखी नवीन कपड्यांची खरेदी व्हायची. तर अशी होती त्या महानगरात समाविष्ट झालेली पण आपले ग्राम्यपण जपणारी ही वाडी!

हे गाव महानगर पालिकेत समाविष्ट झाल्यापासून शहरातील लोकांची दृष्टी या वाडीकडे वळली होती. शहरापासून थोडेसे दूर अन् शांत ठिकाणी जागा घेऊन घरकुल उभारण्यासाठी काही लोकं या वाडीला पसंती देऊ लागले होते. जमिनीला सोन्याचे भाव येऊ लागले होते. म्हणून काहींनी येथे भूखंड विकत घेऊन आपले भव्य प्रासाद उभारले होते. दुष्काळी भागातील मजूर लोकांची वस्ती देखील वाढली होती. वाडीतील लोकांनी त्यांच्यासाठी लहान-लहान खोल्या बांधून अल्प भाड्याने त्यांच्या राहण्याची सोय करून दिली होती. हळूहळू वाडीचा कायापालट होऊ लागला होता.

भाऊसाहेब देशमुखांनी देखील याच वाडीत एक भूखंड विकत घेऊन आपला बंगला बांधला होता. फ्री होल्ड प्लॉटवर घर बांधणारे ते या वाडीतील एकमेव परके पण आता वाडीचे ग्रामस्थ बनलेले गृहस्थ होते. बांधकामास लागणारे साहित्य, वाळू, विटा याच ग्रामस्थांनी त्यांना पुरवल्या होत्या कारण वाडीतील काही ग्रामस्थांच्या विटभट्ट्या आणि वाळू पुरवठ्याचा पूर्वीपासूनचा व्यवसाय होता त्यामुळे भाऊसाहेबांची वाडीतील काही पुरवठादारांशी ओळख झाली होती.

आज भाऊसाहेबांच्या घराची वास्तुशांती होती. त्यांनी आपल्या जुन्या घरातून आधीच सामान शिफ्ट केले होते. वास्तुशांत झाल्यावर त्यांनी नवीन घरात अन्न शिजवणे सुरू केले आणि तेथे राहायला सुरवात केली. काही मोजके नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत वास्तुशांत पार पडली. कार्यक्रम उरकता-उरकता संध्याकाळ झाली होती. आज भाऊसाहेबांच्या कुटुंबियांचे याच नवीन बंगल्यात वास्तव्य होते.

दिवसभराच्या कार्यक्रमाने सर्वजणच खूप थकलेले होते. रात्री जेवण झाल्यावर सर्वजण लवकरच गाढ झोपी गेले. रात्रीचा साधारणतः एक वाजला होता. भाऊसाहेबांना घराच्यामागील शेतात बैलांच्या गळ्यातील घुंगरांच्या माळेचा आवाज ऐकू आला तशी त्यांची झोप चाळवली गेली. ते अंथरुणात उठून बसले. प्रथम तर त्यांना वाटले पहाटच झाली पण पक्षांचा गुंजार व अद्याप सुरू झाला नव्हता फक्त बैलांच्या गळ्यातील घुंगुर माळाचा आवाज ऐकू येत होता. त्यांनी भिंतीवरील घड्याळाकडे पाहिले. अजून मध्यरात्रच होती. इतक्या रात्री कदाचित बैल सुटले असतील आणि घरामागील शेतात चरायला आले असतील असे समजून त्यांनी ह्या बाबीकडे दुर्लक्ष्य केले आणि ते परत निद्राधीन झाले.

सकाळचे सहा वाजून गेले होते. पक्षांचा किलबिलाट सुरू झाला होता. मंदिरात ग्रामस्थांची ये-जा सुरू होती. थोड्या-थोड्या वेळाने मंदिरातील घंटेचा कर्णमधुर आवाज कानी येत होता. सौ. देशमुखांना जाग आली. त्या लगबगीने उठल्या. आज खऱ्या अर्थाने त्यांचा ह्या नव्या घरात पहिला दिवस सुरू होणार होता. दूधवाला, पेपरवाला, मोलकरीणबाई या सर्वांची व्यवस्था लावायची होती. जवळच एखादा किराणा दुकानवाला, भाजीवाला आहे का याचा शोध घ्यायचा होता. सौ. देशमुखांनी दरवाजाची कुलुपे काढली आणि त्या मोलकरणीच्या शोधत बंगल्याच्या गेटजवळ येऊन उभ्या राहिल्या. घरकाम करणाऱ्या बायकांना काम करायला वाडीपासून दूर असलेल्या शहरी वस्तीवर कामावर कामाला जायला लागत होते, त्यांची बंगल्यासमोरच्या रस्त्यावरून ये-जा सुरू झाली होती. त्यातील एकीला सौ. देशमुखांनी हटकले. ती बाई गेटजवळ येऊन उभी राहिली. सौ. देशमुखांनी तिला आपल्या घरी भांडी-धुणी, केर-फरशी करण्यासाठी कोणी बाई मिळेल का ते विचारले. त्या बाईने थोडा विचार केला, कामाची वेळ अन् पगाराविषयी विचारले आणि ती त्यांच्याकडे काम करायला तयार झाली. चला, सकाळी-सकाळीच कामाला बाई मिळाली होती. सौ. देशमुखांचा एक प्रश्न मिटला होता. आता तिच्याकडून माहिती घेऊन पेपरवाला, दूधवाला लावता येणार होता. सौ. देशमुख समाधानाने घरात परतल्या होत्या.

घरात रात्री शिल्लक राहिलेल्या दुधाचा त्यांनी चहा ठेवला आणि त्या भाऊसाहेबांना उठवायला शयनगृहात गेल्या. भाऊसाहेबही जागे झाले. त्यांनी मुखमार्जन केले. एव्हाना चहा तयार झाला होता. सौ. देशमुखांनी बाहेर दोन खुर्च्या घेतल्या अन् ते दोघे पती-पत्नी त्यांच्या ह्या नवीन घराच्या परिसरात चहाचा आस्वाद घेऊ लागले.

आज त्यांना ह्या ठिकाणी प्रसन्न वाटत होते. सूर्याची किरणे अंगणात खेळत होती. आजूबाजूला असलेल्या झाडांवर पक्षांची शाळा भरली होती. त्यांचा मधुर गुंजार व कानी पडत होता. असंख्य चिमण्या,

कावळे, पोपट, भारद्वाज पक्षी आजूबाजूला वावरत होते. त्यांचा किलबिलाट ऐकू येत होता. मधूनच खारुताईंचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. कोंबड्याची बाग ऐकू येत होती. निसर्गाच्या सानिध्यात हे दृश्य पाहून देशमुख पती-पत्नीच्या चेहऱ्यावर आनंद विलसत होता. शहराच्या कुंद वातावरणापासून दूर, शांत ठिकाणी घर बांधल्याचे त्यांना मनोमनी अतीव समाधान दिसत होते. आपला येथे घर बांधल्याचा निर्णय योग्यच होता, असे त्यांना वाटू लागले होते. चहा पिऊन ते घरात गेले. त्यांचे दैनंदिन जीवन आता सुरळीत होणार होते.

आजची रात्र त्यांची ह्या घरातील दुसरी रात्र होती. त्याही रात्री परत देशमुख साहेबांना बैलांच्या गळ्यातील घंटेचा आवाज ऐकू आला, तशी त्यांची झोप चाळवली. ते तटकन अंथरुणावर उठून बसले. अरेच्या, आज परत बैल सुटला वाटतं? म्हणून ते दुसऱ्या मजल्यावरील मागच्या खिडकीतून डोकावून पाहू लागले. सर्वत्र निरव शांतता होती. पौर्णिमेच्या टिपूर चांदण्यात घरामागील शेत दृष्टीक्षेपात येत होते पण तेथे कोणतेच जनावर चरताना दिसत नव्हते पण घंटानाद सतत कानावर येत होता. कानोसा घेऊन सुद्धा कुठेच काही दिसत नव्हते. थोडावेळ ते खिडकीपाशी स्तब्ध उभे राहिले. कुठेच काही हालचाल दिसत नाही म्हणून कंटाळून ते परत अंथरुणावर येऊन पडले. थोड्यावेळाने निद्रादेवीने त्यांना आपल्या आगोशात घेतले.

तिसरी, चौथी, पाचवी रात्र देखील भाऊसाहेबांना जागवत राहिली अन् मग ही बाब नित्याचीच होऊन बसली. रोज रात्री एकच्या सुमारास बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज यायचा, त्यामुळे भाऊसाहेबांना जाग यायची. असे बरेच दिवस चालले. एकेदिवशी त्यांनी मागील शेतात जाऊन जवळच गायी-गुरांचा गोठा आहे का ते पहिले पण बंगल्याच्या मागे केवळ शेतच होते. वाडीचे गावठाण बरेच दूर होते आणि त्यांच्या घराजवळच त्यांच्या पशुधनाचे गोठे होते. त्यामुळे नित्याने तेथून गायी-गुरे सुटून येण्याची शक्यता नव्हती मग घंटेचा आवाज कोठून येत होता? एखादा शेतकरी चाऱ्याअभावी त्याची गुरे रात्री चोरून तर आपली गुरे तेथे चरायला घेऊ येत असावा? भाऊसाहेबांना शंका आली पण असे चौर्यकर्म करणारा राजरोसपणे बैलांच्या गळ्यात घुंगुरमाळा घालून कसे चारायला येऊ शकतो? त्याने तर हे कर्म गुपचूप, गावकऱ्यांना सुगावा लागू न देता करायला हवे. एखाद्या वेळी गावकऱ्यांच्या तावडीत जर तो सापडला तर त्याची खैर नव्हती. मग तो कोण होता? ती कोणाची बैल होती? अन् ती भाऊसाहेबांच्या बंगल्याच्या पाठीमागील शेतातच का चरायला येत होती? विचार करकरून भाऊसाहेबांचे मस्तिष्क बधिर होऊन गेले होते. 'असो, कधीतरी लागेल ह्याचा छडा' म्हणून त्यांनी तूर्त गप्प बसायचे ठरविले होते. कुटुंबियांना देखील याबद्दल काहीच सांगितले नव्हते. उगाच त्यांच्या जीवाला कशाला घोर लावायचा? म्हणून त्यांनी मौनच पाळले.

भाऊसाहेबांचा नाथपंथीय गुरुभाऊ आज जळगावहून त्यांच्याकडे येणार होता म्हणून आज भाऊसाहेब घरातच होते. साधारणतः दुपारी १२ वाजता डॉ. पराग कुलश्रेष्ठ त्यांच्या घरी आले. घरात पाय ठेवताच क्षणभर त्यांनी दीर्घश्वास घेत आपले डोळे मिटले अन् ते म्हणाले, 'भावड्या, तुझ्या घराच्या पाठीमागे एक बाभळीचे झाड आहे का?' असा प्रश्न विचारता क्षणीच भाऊसाहेब चांगलेच गडबडले. घरात प्रवेश केल्यावर काहीच विचारपूस न करता, कोणताही प्रकारचा संवाद न साधता परागने प्रश्नांची सरबत्ती सुरू करून दिली होती.

अरे मित्रा, घरात तर ये, जरा सोफ्यावर बस, पाणी पी मग निवांत बोलू म्हणून भाऊसाहेबांनी त्याला हाताने धरून दिवाणखान्यात आणले. त्याला सोफ्यावर बसविले. तेवढ्यात सौ. देशमुख पाणी घेऊन दिवाणखान्यात आल्या. त्यांनी दिलेले ग्लासभर पाणी पिऊन परत त्याने भाऊसाहेबला विचारले, त्या बाभळीच्या झाडाखाली कोणाचे तरी ठाणे आहे आपला मित्र घरी आला पण आपली काहीच विचारपूस न करता हे काय भलतेच बडबडतोय? याचे भाऊसाहेबांना आश्चर्य वाटत राहिले. शेवटी ते म्हणाले, 'थांब मित्रा! जरा रिलॅक्स हो मग निवांतपणे या विषयावर आपण बोलू. तूर्त घरातील लोकांनाही बाब माहीत नाहीय, तेंव्हा दुपारी सविस्तरपणे तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे देतो.'

त्यानंतर बऱ्याच वेळाने डॉ. पराग त्या ट्रान्स अवस्थेतून बाहेर आले आणि मग दोघा मित्रांची गप्पांची मैफल जमली. दुपारचे जेवण झाल्यावर दोन्ही मित्र दिवाणखान्यात निवांत गप्पा मारीत बसले. सौ. देशमुख ही दुपारची वामकुक्षी घेण्यासाठी बेडरूममध्ये गेल्या अन् परागने परत मूळ मुद्द्याला हात घातला. आता त्याला भाऊसाहेबांच्या घराच्या मागील ते झाड, ती जागा लवकरात लवकर पहायची होती. त्यामुळे बायको झोपल्याचा कानोसा घेऊन ते दोघे मित्र लांबून वळसा घेऊन घराच्या मागे गेले. त्या बाभळीच्या झाडाखाली एक लहानसा दगडाचा कोनाडा बांधण्यात आला होता आणि त्यात एक लहानशी पुरुष देवतेची मूर्ती होती. मूर्ती खूपच ओबडधोबड होती. बरेच दिवसांपासून मूर्तीला शेंदूर आणि कोनाड्याला रंग दिलेला नव्हता. सर्वत्र गवत वाढलेले होते. त्या गवतात तो कोनाडा कोणाच्याही लक्षात येत नव्हता. नाही म्हणायला त्या दैवता समोर एक तुटक्या पत्रावळीचे पान पडलेले दिसत होते म्हणजे या देवाला अधून-मधून कोणीतरी नैवेद्य दाखवीत असावे, असे दिसून येत होते.

भाऊसाहेब गवतात लपलेल्या त्या कोनाड्याला पाहून आश्चर्यचकित झाले कारण मागील शेतात फेरफटका मारला तेव्हा ह्या ठिकाणी कसलेतरी ठाणे असावे, याची त्यांनी कल्पना देखील केली नव्हती.

बघ भावड्या, तुझ्या घरात येताक्षणीच मला काही तरी जाणवले म्हणून मी ताडकन बोलून गेलो. त्याचा हा प्रत्यक्ष पुरावा बघ!

मग आता काय करायचे पराग? आता भाऊसाहेब काळजीत पडले होते.

तुला यामुळे कधी वाईट स्वप्ने पडलीत? कधी कोणाचा वावर जाणवला आहे भाऊसाहेब? परागने विचारले.

नाही, असे काही अगम्य, अतार्किक असे काही आढळले नाही पण प्रत्येक दिवशी रात्री बरोबर एक वाजता या शेतात बैल चरताना त्यांच्या गळ्यातील घुंगुरांचा आवाज मात्र ऐकू येतो भाऊसाहेबांनी माहिती पुरवली.

मला वाटलंच होतं अशी काहीतरी भानगड असावीच. पण तू घाबरू नकोस. या मागील रहस्य ही जमीन ज्यांची आहे त्या मालकाकडून जाणून घे. त्याने नाही सांगितले तर वाडीच्या एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीकडून जाणून घे मग यावर काय उपाय करायचा याबद्दल ठरवता येईल. तूर्त तुला फक्त आवाजच ऐकू येतो ना? म्हणजे तूर्ततरी काळजीचे काही कारण नाही. पुढचं पुढे बघू पण सणासुदीला ह्या ठिकाणी नैवेद्य ठेवत जा. मला माहित आहे तुझा ह्या गोष्टींवर विश्वास नाहीय पण अरे प्राणी-पक्षी, किडे-मुंग्या खातील तुझा तो प्रसाद! तेवढाच परमार्थ, असे समज. अन् काही वेगळेच जाणवले तर मात्र मला लागलीच फोन करायला विसरू नकोस. परागने भाऊसाहेबांच्या मनातील भीती काढण्याचा प्रयत्न केला.

मागे काही वर्षांपूर्वी त्या ठिकाणी काही घडले असेल, एखादा बैल त्या ठिकाणी मेला असेल, त्यामुळे रात्रीचे त्याचे वास्तव्य जाणवून देण्यासाठी तो त्या जागी येत असेल पण त्याच्याशी आपला काय संबंध? आपण तर रीतसर ही जागा तिची किमंत चुकवून घेतली आहे. कोणावर अन्याय करून, कोणाचा हक्क डावलून, कोणाला फसवून हा व्यवहार केलेला नाही मग हे सर्व आपल्याला का जाणवतेय? कदाचित त्या बैलाला आणि येथे ज्याचे ठाणे आहे, त्याला काही सुचवायचे तर नसेल? काही सांगायचे तर नसेल? असे भाऊसाहेबांना वाटू लागले पण हा सर्वप्रकार आपल्याला त्रास देण्यासाठी नक्कीच होत नसावा कारण आपला त्याच्याशी कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष काहीच संबंध नाही तर भ्यायचे काय कारण? अशी मनाची समजूत घालून भाऊसाहेब निश्चिन्त झाले.

परत दोन दिवसांनी घुंगरांचा आवाज आला. भाऊसाहेब मध्यरात्री दुसऱ्या मजल्यावर पळत गेले तर त्यांची मुलगी निवेदिता जागीच होती अन् ती खिडकीतून घुंगुरांचा आवाज कोठून येतोय? हे पाहत उभी होती. चाहूल लागल्याने तिने मागे वळून पाहिले. पाठी तिचे वडील उभे होते. तिने विचारले, ''बाबा इतक्या रात्री तुम्ही इथे? काय झालं? यावर बेटा तुलापण घुंगरांचा आवाज येतोय का? असे विचारले.''

''हो बाबा! मागच्या शेतात दररोज बैलांच्या गळ्यातील घंटेचा आवाज ऐकू येतो म्हणून आज मी पाहत होते, कोणाचे बैल इतक्या रात्री अंधारात चरायला येतात?''

स्वतःच्या मनावर काबू ठेवत भाऊसाहेब उद्गारले, अगं, असतील कोणाचे तरी बैल! हिरवा चारा आहे ना, येत असतील खायला. तू लक्ष देऊ नकोस. शांतपणे झोप बरं तू? असे म्हणून त्यांनी तिच्या अंगावर पांघरून घातले आणि बराच वेळ तिला थोपटून ते परत खालच्या मजल्यावर आले. पण आता त्यांची चिंता वाढली होती. ह्या गोष्टीचा लवकरात लवकर छडा लावायलाच पाहिजे, असा निर्धार करून ते निद्रादेवीची आराधना करू लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांनी त्या जमिनीच्या मालकाला गाठले. प्रथम त्यांच्याशी राम-राम, श्याम-श्याम करून झाले. इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्या आणि त्यांनी मूळ मुद्द्याला हात घातला. तो विषय निघताच तो जमिनीचा मालक अस्वस्थ झाला हे भाऊसाहेबांच्या नजरेने टिपले पण त्याने ताकासतूर लागू दिली नाही. उडवा उडवीची उत्तरे देऊन, मला एक अर्जंट काम आहे असे म्हणून त्याने पोबारा केला.

भाऊसाहेबांचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला होता पण ते निराश झाले नाहीत पण आता त्यांची पक्की खात्री झाली होती की कुठे तरी नक्कीच पाणी मुरते आहे, काहीतरी रहस्य नक्कीच आहे, म्हणूनच ही माणसे आपल्याला काही सांगत नाहीत.

दुसऱ्या दिवशी परत त्यांनी वाडीतील विठ्ठलराव मुळीक या वयोवृद्ध इसमाला गाठले. आपली आपबीती त्याला ऐकवली आणि त्यामागील रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावर हे सर्व जाणून घेण्याने तुला काय हशील होणार आहे रे बाबा? ती एक मोठी कहाणी आहे. खूप वर्षांपूर्वी घडलेली! माझ्याच जिगरी दोस्ताबरोबर घडलेली. अन् त्याने अथपासून इतिपर्यन्त भाऊसाहेबांना तो किस्सा सुनवला. तो म्हणाला, त्यावेळी ही वाडी शहरापासून फार दूर होती. सगळीकडे आमची शेती होती. लाईट, पाणी, रस्ते काहीच नव्हते. विहिरीवर मोट धरली जायची. पाटाचे पाणी बायका घरच्या वापरासाठी वापरायच्या. भांडी-धुणी नदीवर धुवायच्या. रात्री कंदील किंवा चिमणीच्या उजेडात स्वयंपाक व्हायचा. शहरात जायला आम्ही बैलगाडीतून जायचो. अगदी मागासलेले हे खेडे होते. दरवर्षी ग्रामदेवतेची जत्रा भरायची. देवाचा छबिना निघायचा. यात्रेला शहरातून खाऊ, खेळण्याची दुकाने यायची. कुस्त्यांचे फड रंगायचे. तमाशाचे फडयायचे, बैलगाड्यांच्या शर्यती व्हायच्या.

त्यावेळी शंकऱ्या या गावाचा पाटील व्हता. त्याची सर्जा-राजाची बैलगाडी शर्यतीत नेहमीच अव्वल यायची. शर्यतीत त्याची बैलजोडी अशी बुंगाट पळायची की डोळ्यांचे पाते लवते ना लवते तोपर्यंत ते हा चढाव चढून जायचे अन् शर्यत जिंकायचे. शंकऱ्या देखील बैलगाडीत त्यांच्या बरोबर असायचा. सर्जा-राजाने शर्यत जिंकल्यावर शंकऱ्याचा उर अभिमानाने भरून यायचा. होतीच तशी त्याची बैलजोडी नजर लागावी अशी! आणि कामाला देखील ती बैलजोडी वाघ होती. किती का उन्हाळा असू दे, सगळं वावर नांगरल्या शिवाय दमच खात नव्हती. शंकऱ्याचा त्यांच्यावर भारी जीव व्हता. शंकऱ्या देखील तसाच ताकतवान गडी व्हता. दररोज नियमाने तालमीत येऊन शरीर कमवायचा. त्याच्या घरी दुधदुभतं मायंदाळ व्हत. घरचं सकस धान्य, ताज्या भाज्या यामुळे शंकऱ्या चांगलाच सुदृढ व्हता. कुस्त्यांच्या फड तोच जिंकायचा. देवस्थानाला, अडल्या-नडलेल्यांना सढळ हाताने मदत करायचा त्यामुळे वाडीत त्याला सर्वजण 'शंकरशेठ'

म्हणायचे. त्याला गावात मान व्हता पण...

शंकराला देण्यात येणारा हा मान, त्याची प्रगती वाडीतील काही लोकांना पाहवत नव्हती. ते सतत त्याचा द्वेष करायचे, त्याला पाण्यात पहायचे, त्याला अपमानित करण्याची एकही संधी सोडायचे नाहीत पण शंकऱ्या सारं हसण्यावारी न्यायचा. त्यांच्या माकडचेष्टानां भीक घालीत नव्हता. त्यामुळे ती दुष्ट माणस अधिकच चवताळायाची. त्यांच्या काहींना काही कुरबुरी सतत चालू रहायच्या. काहीतरी लटपटी करून ती भगतांची पोरं शंकऱ्याला छेडायची, चिडवायची पण शंकऱ्या पहेलवान गडी असला तरी स्वभावाने शांत अन् विचारी व्हता. लहान-सहान गोष्टींनी डोक्यात राख घालून हमरी-तुमरीवर येणाऱ्यातील नव्हता त्यामुळं भगतांच्या पोरांच्या कारस्थानाची पार वाट लागायची, ती तोंडघशी पडायची अन् शंकऱ्या मातूर सहिसलामत सुटायचा. त्याचं दैव लई बलवत्तर हुत.

एकदा तर नदीच्याकाठी रात्रीचं शंकऱ्याच दुश्मन हातात तलवारी घिऊन शंकऱ्याला मारायच्या इराद्याने दबा धरून बसली हुती. राती अकराच्या सुमारास शंकऱ्या सायकलवरून शहरातल्या मित्राकडून येत व्हता. तव्हा काय झालं कळालं न्हाई पण शंकऱ्याची सायकल रस्त्यात पेरून ठेवलेल्या दगडा स्नि येऊन धडकली अन् त्याच्या सायकलची चेनबी निघाली. शंकऱ्या सायकलवरून खाली उतरून चेन लावायची कोशिस करीत व्हता नेमक्या त्याच येळी नदीजवळ दबा धरून बसलेली भगतांची त्याच्यावर चाल करून आली पण शंकऱ्या घाबरला न्हाय. त्याच्या हातात नेमकी सायकलची चेन हुती. त्याने ती चेन दांडपट्ट्यासारखी गरागरा फिरवायला सुरवात केली अन् काय सांगू तुम्हांसनी राजे हो, एकेकाची थोबाड अशी काही फाटली की पार रक्तानी न्हालीच. पाचसहा तरणीबांड तिथंच चारी मुंड्या चित झाली मग जखमा भरून येईपर्यंत गावात फिरकलीच न्हाईत पण शंकऱ्या मात्र ह्या जीवघेण्या हल्ल्यात ही बचावला. वाडीतील महादेवाची त्याच्यावर कृपा होती. या घटनेचा गावात गवगवा झाला. शंकऱ्याला सर्वांनी जपून राहायला सांगितलं. त्याचा घात करायला ती माणस टपून बसली व्हती. पण शंकऱ्याला त्याच्या शक्तीवर, युक्तीवर इश्वास व्हता. त्यो कुणालाच घाबरत नव्हता पण प्रत्येकयेळी नशीब साथ देईल, याचा काय भरवसा? आन् झालंही तसंच!

गावाची जत्रा जवळ आली हुती. यंदाही बैलगाड्यांची शर्यत व्हती. सर्वजण तयारीला लागली हुती. शंकऱ्याने बी आपली बैलगाडी रंगवून घेतली. त्याचे सर्जा-राजा तर तयारीचे हुते. रात्री गुपचूप भगतांच्या पोरांनी त्याच्यागाडीचे आख खिळखिळे करून ठिवले हुते. बैलगाडीची शर्यत सुरू झाली. गाडीवर शंकऱ्या नेहमीप्रमाणे स्वार झाला. बैल बुंगाट धावू लागली आन गाडीचा आख निसटला. बैलगाडी कोलमडून पडली, बैलपण गाडीपासून येगळी झाली आन् शंकऱ्या गाडीतून खाली फेकला गेला. भगतांच्या पोरांनी इथंच डाव साधला. मागून येणारा त्यांचा गाडा शंकऱ्याला चिरडीत पुढे निघून गेला. शंकऱ्या रक्ताच्या थारोळ्यात पडला आन् एकच कल्लोळ झाला. शर्यती थांबल्या. जखमी शंकऱ्याला घेऊन तिथल्याच एका गाडीत शहरात नेण्यात आलं पण रघाट लई वाहल्यानं त्याचा दवाखान्यात पोहचेपर्यंत निधन झालं व्हत. गावावर शोककळा पसरली. समदं गाव शंकऱ्याच्या अवचित जाण्यानं हळहळत व्हत. गावाचा वाघ समाद्यांना सोडून निघून गेला व्हता.

सर्जा-राजा आता पोरकी झाली हुती. त्यांच्या डोळ्यातील पाणी खळत नव्हतं. मुकी बिचारी ती जनावर बोलू शकत नव्हती पण अंतरीच दुःख डोळ्यावाट व्यक्त करीत हुती. शंकऱ्याला त्याच्या शेतातच मूठमाती दिली हुती तवापासून सर्जा-राजानं तिथंच बसकण मारली हुती. ते तिथून हालायलाच तयार नव्हती. तिथंच गवत खायाची अन रातभर धन्याची सोबत करायची. शंकऱ्याच्या पोरांनी त्यांना मस चुचकारल, गोठ्यात न्यायची कोशिस केली पन त्यांनी काही हेका सोडला नाही. शेवटी कंटाळून पोर त्यांचा दाना-पाणी तिथंच द्याया लागली.

एकदा शंकऱ्या बरूबर त्याच्या बैलांचा काटा काढायच्या इराद्यानी भगतांची पोरं त्यांच्या वाट्याला गेली. आता मात्र सर्जा-राजा फारच चवताळली. आपल्या धन्याचा घात करणाऱ्यांचा त्यांना जणू बदलाच घ्यायचा होता जणू! त्यांनी एकेकाला शिंगावर उचलून शेतातून दूर फेकून दिलं. पोरं रक्तबंबाळ झाली. त्यातील सोम्यानतर जागवरच प्राण सोडला. बाकीच्यांना दवाखान्यात भर्ती केलं पण त्यातील कुणीच वाचला न्हाई. अशी त्या पाप्यांना देवान त्यांच्या करतुकीची शिक्षा दिली. बाबा, ह्या हातान केलेलं पाप ह्याच हातान हितच फेडाव लागतया.

त्यानंतर काही दिसांनी सर्जा-राजान देखील एका मागून एक प्राण सोडलं. त्यांना त्यांच्या धन्याच्या शेजारीच मूठमाती देण्यात आली. पुढे शंकऱ्याच्या पोरांनी त्या बाभळीच्या झाडाखाली एक कोनाडा बांधला, त्यात शंकऱ्याची मूर्ती स्थापन केली. सणावारी त्ये त्याला निवद ठेवत्यात. निवद ठिवल्यावर ते बाप-बेटे तो निवद आनंदाने वाटून खात्यात. निवद ठिवल्यावर काही येळतच त्यो निवद फस्त केलेला म्या सवताच्या डोळ्यान बघितला हाय. अशी होती मापल्या जिगरी दोस्ताची ही चित्तरकथा! स्वार्थापायी भगतांच्या पोरांनी दुसऱ्याची वाट लावली आन स्वतःबी जीवाला मुकली.

तवापासून आज ३० वर्ष झाली सर्जा-राजाचा त्यांच्या धन्याच्या वावरत अजूनबी वावर राहतुया. रात्री-अपरात्री सर्जा-राजा आपल्या धन्याची सोबत करीत तिथच रातीची चरतात. त्यांच्या गळ्यातील घंटेचा आवाज अजूनबी रातीला ऐकू येतो पण कुणालाच त्याचं भ्या वाटत न्हाई. ते कुणालाच इजा पोहचिवीत न्हाई. तुम्ही नवीन आहात म्हणून तुम्हांला हे आक्रीत वाटत असल पण ईश्वास ठिवा ते तुमचं काहीही वाईट करणार न्हाई उलट तुम्ही भाग्यवान आहात, तुमचं घर त्यालाच लागून हाय. धन्या बरुबर आमचं सर्जा-राजा तुमच बी रक्षण करतील. शेतातील विंचू काटा, सरपटणारी जनावर तुमच्या हद्दीत ती येऊ देणार न्हाईत. चोर-चिलटी पन तुमच्या आवारात





SPACECRAFTT
ARCHITECTS

Umesh Raje
C.A./96/20417

14 A/1, Plot No.33C, 'Mayuraysh', Near Vakratunda Motors, Nagala Park,
Kolhapur - 413 003.Ph.(0231) 266 3275, Mobile : 98224-32022
E-mail : info@archumacshraje.com, klp_ura3333@sancharnet.in
Website : www.archumacshraje.com





संत उपासनी ट्रस्ट
उपाध्ये कॉलेज ऑफ सायन्स्, नाशिक
UPADHYE COLLEGE OF SCIENCE, NASHIK
Govt. Index No.J 13.07.012

Medicine : NEET, AIIMS, JIPMER
Engineering : JEE-Mains, JEE-Advanced (IIT-JEE), MHT-CET



Board Theory & Entrance Exam Coaching

Features

- Highly experienced faculty/teachers
- Fully residential complex with comfortable stay in hostel.
- Highly secure separate boys & girls hostel
- Vegetarian foods.

Address : A/P, Sayyed Pimpri, Nashik.
Contact : 7722071300
9822010500

IIT-JEE Selections (Nashik Students - हे नाशिकचे विद्यार्थी !!)


Priyanka Walunj
(AIR - 2983)


Mayur Patil
(AIR - 7918)


Vaibhav Aher
(AIR - 8102)


Gurusafal Singh
(AIR - 10677)

- ११ वी व १२ वी सायन्स
- मेडिकल व इंजिनियरींगच्या पूर्वपरिक्षेच्वी तयारी
- For X Std students moving to XI
- १०वी उतीर्ण होऊन ११वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
- for Admission to XI Science 2020-2022



शिवसाई

विट उत्पादक, बिल्डींग मटेरियल सप्लायर्स व
अर्थमुव्हर्स अँड डेव्हलपर्स सवतीर्थ टाकेद बु.
प्रो.प्रा. नंदु शंकर जाधव मो.९८८१८५६८५०

माजी सचिव - अखील महाराष्ट्र कुंभार
(युवा) विकास संस्था, इगतपुरी तालुका
शिवसेना शाखा प्रमुख
सर्वतिर्थ टाकेद बु.





सकाळ आयडॉल्स ऑफ
महाराष्ट्र पुरस्कार २०२२
SUN OF SOIL विजेते



"समाज गौरव" पुरस्कार
विदर्भ कुंभार समाज
सुधार समिती अमरावती





डॉ.राहुल राजे
MBBS DGO DNB (New Delhi)
Fellowship in Infertility
Fellowship in Laperoscopy

डॉ.उज्वला राजे
BAMS



काले ता कराड जि सातारा येथील श्री चंद्रकांत बाबुराव कुंभार यांचे चिरंजीव डॉ राहुल चंद्रकांत राजे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण घेऊन कराड व परिसरातील लोकांसाठी तसेच आपल्या समाज बांधवांसाठी कराड येथे **श्रीवंदन हॉस्पिटल** सुरू केले आहे .दुर्विणीद्वारे शस्त्रक्रिया तसेच वंध्यत्व निवारण यामधील उत्कृष्ट कौशल्य यामुळे कराड पंचक्रोशीत हॉस्पिटल अल्पावधितच नावारूपाला आले आहे.

डॉक्टरांचा अल्पपरिचय

* राष्ट्रीय स्कॉलरशीप व मेरीटलिस्ट (मानकरी १०वी /१२ वी साठी .)
* MBBS मेरीट वर निवड .
* FMT विषयाचे विदयापिठाचे सुवर्णपदक.
* DGO कृष्णा वैदयकीय महाविदयालय येथुन पुर्ण.
* DNB मिशन हॉस्पिटल यशस्वीरित्या पुर्ण.
* फेलोशिप इन लॅपरोस्कोपी : डॉ नितीन घोरपडे व डॉ कुलत्लोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण.
* फेलोशिप इन इनफर्टिलिटी : डॉ नाडकर्णी गुजरात येथुन पुर्ण.
* MBBS विदयार्थ्यांचा शिक्षक Examiner

उपलब्ध सुविधा

दुर्विणीतून गर्भ पिशवी काढणे (TLH). • गर्भाशयाच्या गाठी काढणे (Fibroid). • स्त्री बिजांडाच्या गाठी काढणे. (Ovarian cyst). • गर्भनलिका तपासणे व ब्लॉक काढणे (Tubal Block). • गर्भ नलिकेतील प्रेग्नंसी (Ectopic). • स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया उलटविणे (Tuboplasty). • वंध्यत्वाची तपासणी व उपचार. • संप्रेरकांची तपासणी (Hormonal Study). • शुक्राणुंची तपासणी (Semen Analysis). • सोनोग्राफी व Follicular study. • I.U.I. • टेस्ट ट्युब बेबी (IVF). • हिस्टेरोस्कोपी शस्त्रक्रिया • गर्भाशयाचा अंतर्भाग तपासणे (Hysteroscopy). • गर्भाशयातील पॉलिप काढणे (Polyp). • गर्भाशयातील पडदा काढणे (Uterine Septum) • छोटे गर्भाशय मोठे करणे (Metroplasty). • मॅटर्निटी : • गरोदर माता तपासणी • नॉर्मल डिलीव्हरी व सीझरची सोय. • प्रसुतिपूर्व, प्रसुति पश्चात सेवा उपलब्ध. • स्त्रियांचे आरोग्य • पाळीच्या समस्या • कॅन्सर निदान व उपचार • सोनोग्राफी : • 3D व 4D ची सोय. • स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया : • ५०% सवलतीत व (Day-care) उपचार. सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एकाच छताखाली - वंध्यत्व, लॅपरोस्कोपी, मॅटर्निटी व सोनोग्राफी सुविधा उपलब्ध • अनुभवी स्टाफ. • माफक दरात उपचार • २४ तास सेवा. • जननी सुरक्षा योजना – नॉर्मल प्रसुती, सीझर ३० टक्के सवलत.

* समाज बांधवांसाठी विशेष सवलत *

8329343161

श्रीवंदन हॉस्पिटल

*मॅटर्निटी *लॅपरोस्कोपी *इनफर्टिलिटी *IVF

ओंकार अपार्टमेंट श्री हॉस्पिटल रोड गौरव सर्जिकल समोर मंगळवार पेठ कराड

|| OM SRI SAI RAM ||

PURUS Filtrotech
THE AIR YOU BREATHE...



Mr. Swapnil S. Mehare
MD

Purus Filtrotech Pvt. Ltd.,
we produce innovative
air filtration systems with our genuine ESP technology
for controlling indoor as well as outdoor industrial pollution.
We mainly focused on capturing–filtering–exhausting any kind of
Fumes, Smokes and mists using our standard as well as customized
Systems based on Electrostatic Precipitator (ESP) Technology.

PRODUCTS	APPLICATIONS
Fume Extractors (FEx)	Welding work stations/booths, Welding SPMs, Soldering tables, EDM machines, Induction heating, Heat treatment, brazing fumes, Surface grinding, buffing, polishing and grinding dusts etc.
Oil Mist Extractor (OMEx)	CNC machining centres, SPMs, Gear cutting machines, Threading, Grinding Machines etc.
Customized Based Systems (CuEx)	Welding lines, Large fabrication shops with extensive welding activity, Centralized Fumes Extraction\Mist Collection\Exhausting systems etc.

Purus Filtrotech Pvt. Ltd., No.2, Sr.No.81/4-B, Nr. Agarwal Godown, Dangat Industrial Estate, Shivane,Pune - 411 023 Ph.:+91-20-65224499/09021602131
e-mail:-info@purusfiltrotech.com visit us:- www.purusfiltrotech.com

Natute's Gift Consultancy
Services

Mr. Suresh G. Mehare

CIVIL CONSTRUCTION, PROPERTY DEALING & DEVELOPMENT, PLANTATION AND CONSULTANCY SERVICES

'Prashanti Niwas' Shastri Nager,
Nagaon, Tal. Alibag, Dist. Raigad-402201.
Mob.: 09850217648 / 09158002582
Email : sureshmehare@rediffmail.com

Prop :- Sou Rekha Suhas Hivarkar



KRUTIKA ELECTRICALS

Authorised Dealers For Supply Of
Cast Resin LT/HT CT Of



M/S HUPHEN ELECTROMECH PVT LTD NASIK

Supply Of Metering Cubical, LT/HT Meter & LT/HT Net Meter &
CT Operated Meter Box











Shop No 16, P.V. Park, C.T. No 927, Near Bank Of Maharashtra, Yerwada, Pune - 411006
Mob 9970002940 / 7709344111
Email : krutikaelectricals@gmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


CORPORATE OFFICE DESIGN, NASHIK


APARTMENT DESIGN, NASHIK


COMMERCIAL BUILDING, DHULE


FARMHOUSE DESIGN, NASHIK


CORPORATE OFFICE, DHULE


FIRST PRIZE IN COMMERCIAL INTERIOR CATAGORY 2022

We are Specialised in:

Architecture
Villa/ Bunglow Design
Farmhouse Design

Interior Design
Corporate Offices
Banks
Retails

Projects completed in Nashik, Pune, Dhule, Satara, Baramati & Internationally in Dubai, Abu Dhabi, Sharjah.


Yogesh Kumbhar
Architect
+91 90229 96772


Harshal Kumbhar
Interior Designer


Chandrakant Borse
Project Coordinator
+91 94222 88735


Hrishikesh Borse
Architect

Instill
Architecture • Interior
Nashik - Pune - Dubai

Head Office : 8, Dena Vjay Colony, near CCM, Untawadi Rd., Nashik- 422002. E-mail: instillarch@gmail.com

Follow us on:
#designbyinstill


आमचे आधारस्तंभ
स्व.बाबुराव नरहारी कानगुले

अहमदपूर चे उद्योजक
कानगुले
ब्रदर्स
कुंभश्री परिवारास व सर्व समाज बांधवांस आमच्या
हार्दिक शुभेच्छा..!


श्री.महेश बाबुराव कानगुले
महेश डिजिटल स्टुडीओ
तालुका अध्यक्ष,अखील महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था


साई मेडिकल ॲन्ड जनरल
प्रो.सचिन बाबुराव कानगुले
मो. 8483895959


न्यु.साईराम एजन्सीज्
प्रो.नितीन बाबुराव कानगुले
मो. 9881754586


रोहित मेडिकल ॲन्ड जनरल
प्रो.अमोल बाबुराव कानगुले
मो. 9975168968


साईराम फार्मासिटीकल्स् ॲन्ड सर्जिकल डिस्टीब्युटर्स
प्रो.दिनेश बाबुराव कानगुले
मो. 9960197074

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



सुधीर कुंभार
९३२००७१८५४
९९२०८१७८५४



सौ. संगीता

apollo



सौ.प्रियांका
B.Com, MBA



चि.मानव

Exclusive showroom of
APOLLO Tyres

मानव टायर्स

अपोलो
टायर्सचे होलसेल विक्रेते

बीमा कॉप्लेक्स, शॉप नं. ८, स्टील मार्केट,
कलंबोली-४१०२१८, नवी मंबई.
Tel.: 022-27421854
Email : manavtyres@yahoo.in

शुभेच्छुक - समस्त डाळजकर (कुंभार) परिवार



श्री. गोरख दशरथ कुंभार
मो.: 9096143153
निवृत्त **नायब तहसीलदार**



सौ. सुजाता गोरख कुंभार



श्री. रमाकांत गोरख कुंभार
B.E. (E&TC).
मो.: 9766897873
8805654005



सौ. सुप्रिया रमाकांत कुंभार
B.Sc. (Chemi.)



श्री.अनुकूल गोरख कुंभार
B.Tech (Mech), M.B.A.
मो.: 9175065005
7387330915



सौ.दिक्षा अनुकूल कुंभार
B.B.A.(Agri)



संचालक, श्री गोरोबा ना.
सह. पतसंस्था, बारामती

सुजाता पेट्रोलियम

पुणे-सोलापूर हायवे (NH 65), गट नं. १५३ ब,
डाळज नं. ३, ता. इंदापूर. जि. पुणे - ४१३१३२

Email : sujatapetroleum5454@gmail.com

निवास : चंद्रभागा बंगला, गट नं. १७१/५, सुर्यनगरी,
जळोची, श्री हॉस्पिटलच्या मागे, बारामती (MIDC)-४१३१३३.



बालरोग तज्ञ

डॉ. विजय एन. कमळे

M.D. (Paed), D.C.H.

मोबा.: ९२२४४७५७१२

Pediatrician & Neonatologist
Head Pediatrics Department
MGM Medical College
Kamothe, Navi Mumbai
Ph.: 022 27423405



स्त्री रोग तज्ञ

डॉ. वृषाली वि. कमळे

M.B.B.S., D.G.O.(Mumbai)

Gynaecologist & Obstetrician
Mob.: 9892458778

तेरणा हॉस्पिटल :
नेरुळ, मुंबई.
फोन : ०२२ ६१५७८३००

अपोलो हॉस्पिटल :
बेलापूर
०२२ ३३५०३३५०



चि.डॉ.शार्दुल विजय कमळे
M.B.B.S.

क्लिनिक : सेक्टर नं.२३, प्लॉट नं.२७९, सुयोग आर्केड, जुईनगर, नवी मुंबई. फोन ८९७६००१०६५
क्लिनिक : करंजाडे - दुधे विटेवरी, शॉप नं.७, सेक्टर ३, पनवेल फोन : **8850624313**

डॉ. विकास वि. कुंभार
एम. एस. (पुणे) (नेत्रतज्ञ)



दृष्टी
EYE CARE CENTRE
कॉम्प्युटरव्दारे डोळे तपासणीची सोय
उपलब्ध सुविधा



डॉ. सुषमा वि. कुंभार
बी.ए.एम.एस. (पुणे)
फोन : ०२१६६-२२२२३६



थ्री-डी ओसीटी/फंडस् फोटोग्राफी
कृत्रिम भिंगरोपण
लेसर शस्त्रक्रिया
नेत्रपटल तपासणी

बिनटाका मोतीबिंदू शस्त्रक्रिया
तिरणेपणा उपचार
काचबिंदू शस्त्रक्रिया
फेको सर्जरी
कॉन्टक्ट लेन्सेस



फलटणमध्ये प्रथमच आत्याधुनिक अल्ट्रासोनिक फेको मशीनच्या (Optikon Italy) सहाय्याने मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपलब्ध

पत्ता : प्लॉट नं.४९, बारव बाग, डॉ.सोनवणे हॉस्पिटलमागे, ना.म.जोशी पेट्रोलपंपामागे, फलटण - ४१५५२३, जि.सातारा
वेळ - स.९.३० ते दु. १ व सायं. ५ ते ७ (शनिवार बंद)



With Best Compliments From :

ISO 9001 : 2008
Certified Company



Prop. : M. R. Kajulkar
Mobile : 9823949416

SAI KRUPA SERVICES

Dealing in Landscape Development & Maintainance, Govt. Regd. Contractor

OFFICE NO. 39, SUKHWANI CHAMBERS, STATION ROAD, PIMPRI, PUNE - 411 018.

Tel.: 020 27426964 **Mobile :** 9823311393
Visit us at : http://www.saikrupaservices.in **E-Mail :** sksmrkajulkar@gmail.com
PWD Registration No. : 14741/2005



आव्हाणे येथील सुप्रसिध्द उद्योजक धनलाल शिरसाठ व बंधू यांचा आदर्श परिवार

गीता ब्रिक्स व साईशक्ती ब्रिक्स

अत्याधुनिक मशिनद्वारे व चिमणी विट भट्टीमध्ये उत्पादीत उत्कृष्ट प्रतीच्या विटांचे उत्पादक



सटाणा येथे आदर्श एकत्र कुटुंब पुरस्कार स्विकारताना समाजभूषण सौ.व श्री.धनलालजी शिरसाठ व परिवारातील सदस्य



धनलाल त्र्यंबक शिरसाठ
9823282985



पुंडलिक त्र्यंबक शिरसाठ
9764265321



वासुदेव सदाशिव शिरसाठ
9823282385



पद्माकर धनलाल शिरसाठ
9823181985

कारखाना : मु. पो. आव्हाणे, ता. जि. जळगांव

सेल्स ऑफीस : शामाप्रसाद मुखर्जी उद्यान कॉम्प्लेक्स, संत कंवरराम मार्केट समोर,मु.पो.ता.जि. जळगांव



डॉ. लक्ष्मण खंडाळे
९४२३४६८६५१

लक्ष्मी मंगल कार्यालय



नितीन खंडाळे
९८२२०३६५२३

सर्व सोयींनी युक्त





लग्न समारंभ, वाढदिवस, साखरपुडा व विविध मनोरंजन कार्यक्रमासाठी भव्य हॉल, प्रशस्त पार्किंगची सोय.

पावन गणपती समोर, नेवासा, नेवासा फाटा रोड, ता. नेवासा, जि. अहमदनगर फोन : ०२४२७-२४१३०८/२४१५७३

Our Inspiration



Late Shivajirao P Sonawane



Mangesh S. Sonawane
B.E. (Civil) 1989



Miss Sumedha
B.Arch. 2020

Architects Interior Designer

M.S. ASSOCIATES

Proprietor
Mangesh Sonawane

Consulting Civil Engineers & Govt. Regd. Valuer

4, Himgauri Appts, S.NO. 166, Opp. Ambar Hall, Kothrud 411 029. Phone : 9422001366

E-mail : smangesh009@gmail.com / msassociatespune@gmail.com Website : www.msapune.com

प्रवेश करू शकणार न्हाईत. आली तरी ती तुम्हांला सावध करतील, याचा तुम्हांला अनुभव येईलच. अन् तो वयोवृद्ध म्हातारा विठ्ठलराव बोलायचा थांबला. मित्राच्या व त्याच्या इमानी बैलांची आठवण येऊन त्याचा गळा रुद्ध झाला होता. भाऊसाहेब हे सर्व ऐकून निशब्द झाले होते. आता त्यांची भीती कुठल्याकुठे पळून गेली होती. आता यापुढे सणासुदीला त्या तिघांना न चुकता नैवेद्य ठेवण्याचा त्यांनी निश्चय केला होता.

त्या घटनेला आता २५-३० वर्षे उलटून गेलीत. आजही मध्यरात्री बैलांच्या गळ्यातील घंटेचा आवाज भाऊसाहेबांना आणि त्यांच्या मुलीला ऐकू येतो. आजूबाजूला झाडे-झुडुपे असून सुद्धा भाऊसाहेबांच्या आवारात एक ही इजा करण्याऱ्या प्राण्याचा प्रवेश झालेला नाही. एकदा त्यांच्या आवारात चोरांनी प्रवेश केल्यावर सर्जा-राजाने जोरात फुत्कारायला सुरवात केली, जोरजोरात घंटानाद केला. त्यामुळे शेतकरी जागे झाल्याची शंका येऊन ते चोर मागाच्यामागे पळून गेले. दुसऱ्या ठिकाणी चोरी करताना पकडले गेल्यावर त्यांनी ह्या घटनेची देखील कबुली दिली होती.

आजपावेतो भाऊसाहेबांच्या बंगल्याच्या आवारात कोणतीही दुर्घटना घडली नाही. वाडीत असणारी नाग-नागिनींचा वावर आसपास असूनही त्यांनी पण भाऊसाहेबांच्या कुटुंबियांना कोणतीच इजा पोहचवलेली नाही. आता शहरीकरण त्यांच्या वाडीत येऊन पोहोचलेले आहे. सर्वत्र बांधकाम सुरू आहे. रस्ते, वीज, पाणी, ड्रेनेजची सोय झालेली आहे. येथील राहिवाश्यांचे राहणीमान देखील बदललेले आहे. पूर्वी पेक्षा संपन्नता आलेली आहे पण अजूनही येथील लोकं पूर्वीच्या परंपरा पाळताना दिसतात. उत्सव साजरे करतात. बैलपोळ्याला सर्जा-राजाला न चुकता पहिला घास देतात. शंकऱ्याचे शेत अजूनही शाबूत आहे. त्याचे प्लॉट करून त्याच्या पोरांनी विकले नाहीत. तेथे नियमित पिके घेण्यात येतात. जर ती जमीन विकून तेथे निवासी इमारती उभ्या राहिल्या तर त्यांचे सर्जा-राजा काय खातील? या भावनेपोटी ते जमिनीची शकले करायला तयार नाहीत. आपल्या पूर्वजांच्या प्रतिकृतज्ञतेच्या भावनेपोटी ते आर्थिक निकष लावत नाहीत. केवढा हा मनाचा मोठेपणा? कृतज्ञता भाव? अन् त्यांना त्यांच्या आशीर्वादाने काही कमी देखील पडत नाही. त्या तिघांच्या आशिर्वादाने त्यांच्या घरात आजही सौख्य नांदते आहे आणि अजूनही रात्रीच्या निरव शांततेत तो घंटानाद घुमत आहे. परिसरातील जाग कायम ठेवीत आहेत. एकविसाव्या शतकात अश्या घटना अतार्किक वाटल्या तरी त्या घडत मात्र आहेत, हे अनुभवाने अनेक ठिकाणी सिद्ध होत आहे. याचा अनुभव भाऊसाहेब आजही घेत आहेत.

***

R. S. ENTERPRISES

Reaching out to Serve....

Medical Equipment's & Devices

Following are the Companies & Products we mainly deal with,

- **Drager India Pvt. Ltd. -** ICU Ventilators, Transport Ventilators, Patient Monitors, Gas Lines, Anesthesia Work Stations, Baby Warmers & Many More
- **BBraun Medical India Pvt. Ltd. -** Aesculap (Neuro, Cardiac & General Surgery Instruments), All Transplant Instruments, Dialysis Machines, Syringe & Infusion Pump & Many More
- **Philips India Pvt. Ltd. -** Defibrillators, Monitors, BiPAP Machines & Many More
- **Godrej & Boyce Mfg. Co. Ltd. -** Hospital Furniture, ICU & Ward Beds
- **Johnson & Johnson Pvt. Ltd. -** Sutures, Plasma Sterilizers (ASP), Cautery's, Harmonic Machines, Surgery Equipment's
- **Remi India & Spire Automation -** ALL Lab related equipment's
- **BD/BARD India Pvt. Ltd. -** Onco Ports, Dialysis Permanent Catheters

R. S. ENTERPRISES

Off. No. 10, First Floor, Off. No. 9, Ground Floor, Ruturang Society,
Aranyeshwar Mandir Road, Parvati, Pune - 411009

Mob.: 9371026632 / 9011093989



SANTOSH RAJE

उध्वस्त

श्रीनिवास एडगांवकर

शांतीने कमालीच्या नैराश्यामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली. एका तरुण व होतकरु डॉक्टरची नाहक हत्या झाली होती. एक उमलती कळी खुडली गेली. हंबीरराव, शंकर, बाळकृष्ण यांनाही जन्मठेपेची शिक्षा झाली. अरोरा आणि मोहिते कुटुंबे उध्वस्त झाली. त्यात दोष कुणाला



ककरीत तिन्ही सांजेला राधाबाई एकट्याच डोक्याला हात लावून त्यांच्या चौसोमी वाड्यांत बसल्या होत्या. राहून राहून त्यांचे डोळे पाण्याने भरुन येत होते. असे काय झाले होते? हंबीरराव मोहीते गावातले एक सधन शेतकरी कुटुंब, घरची बक्कळ शेती. गोठा जनावरांनी भरलेला. घर नेहमी धान्याने भरलेले असायचे. हंबीररावांना एक लेक आणि दोन मुलगे होते. गावामध्ये तालेवार आणि सर्वांना मदत करणारे कुटुंब म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी मुलांना चांगले शिक्षण दिले होते. सुनंदा मोठी लेक

बी.ए. झाली होती. दुसरा शंकर बी.एस्सी. (ॲग्रीकल्चर) झाला होता व धाकटा बाळकृष्ण कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होता. सर्वजण हंबीररावांना शेतीत मदत करायचे आणि राधाबाई घरचे खाटल सांभाळायच्या. आला गेला, पै पाव्हणा, एकंदरीत सर्व कुटुंब - सुखासमाधानात होते.

सुनंदाचे लग्न हंबीररावांनी त्यांच्या सारख्या मातब्बर घराण्यांत, संपतराव शिंदे ह्यांच्या धाकट्या मुलाशी लावून दिले होते व सुनंदा तिच्या घरी सुखा समाधानात नांदत होती.

शांती अरोरा एक अतिशय हुशार मुलगी. आई-वडील व लहान भाऊ उत्तर प्रदेशातल्या एका जिल्ह्याच्या ठिकाणी रहात होती. अतिशय हुशार असल्यामुळे वडिलांनी शांतीला मेडीकलला घातले होते. कारण त्यांच्या गावात चांगल्यापैकी एकही डॉक्टर नव्हता. अतिशय हुशार असल्यामुळे शांती एम.बी.बी.एस. ची परीक्षा मेरीट मधे पास झाली.

आणि तिने गायनॅक सर्जन कोर्ससाठी ॲडमिशन घेतली. ही परीक्षा पण उत्तम रीतीने पास होत तिने गोल्ड मेडल पण पटकावले, अरोरा परिवारांत अतिशय आनंद झाला त्यांनी गावभर पेढे वाटले. रितसर इंटर्नशिप पूर्ण केल्यावर तिचा गावामध्येच दवाखाना काढायचा विचार होता. त्या तयारीत असतानाच तिला सरकारी नोकरीचे बोलावणे आले. वडिलांशी व आईशी विचार विनिमय करुन तिने सरकारी नोकरी करायचे ठरविले व थोडाफार अनुभव आल्यावर गावामध्ये दवाखाना काढायचे, रितसर मुलाखत झाल्यावर तिचे महाराष्ट्रातल्या तालुक्याच्या गावात एका छोट्या हॉस्पिटलमधे पोस्टिंग झाले. एवढ्या लांब आपल्या गावापासून दूर जाणार म्हटल्यावर अरोरा कुटुंब चिंतेत पडले. पण शांतीने त्याची समजूत काढली व ती तिच्या कामाच्या ठिकाणी हजर झाली. हॉस्पिटलच्या जवळच तिच्या रहाण्याची सोय करण्यात आली. हॉस्पिटलमधे बाळंतपणाचा एक स्वतंत्र वॉर्ड होता व शांती त्याची प्रमुख होती. हाताखाली परिचारिका आणि वॉर्डबॉय होतेच. हंबीरराव यांचा मुलगा शंकर आता अट्ठावीस वर्षाचा झाला होता व हंबीरराव मुलाच्या लग्नाचे बघत होते. आता त्याची किर्ती लांबवर पसरली होती. अनेक सधन कुटुंबे आपली मुलगी हंबीररावांच्या घरात द्यायला उत्सुक होते. शेवटी शंकरला शितोळ्यांची शकुंतला पसंत पडली. शितोळे घराणे सुद्धा अतिशय सधन व सुशिक्षित होते. त्यांना तीन मुलीच होत्या. थोरली व मधली मुलगी त्याच्या सारख्याच सधन व सरदार घराण्यांत दिल्या होत्या. शकुंतलाचे कॉलेजचे शेवटचे वर्ष होते. ते संपल्यावर शितोळ्यांनी तिची सोयरिक हंबीररावांच्या शंकरशी ठरविली. लग्न अगदी थाटामाटांत झाले. कारण दोन्ही घराणी सधन, सुशिक्षित आणि हौशी होती. लग्न अगदी चार दिवस चालले होते. हंबीररावांनी तर गावजेवणच घातले. शकुंतलेची पाठवणी केल्यानंतर शितोळे परिवार अतिशय जड अंत:करणाने आपल्या गावी परतले. देखणी शकुंतला व शंकरचा राजा-राणीचा संसार सुरु झाला. वर्षभरातच शकुंतलेने राधाबाईच्या कानांत गुडन्यूज सांगितली. ती ऐकताच राधाबाई आनंदाने उड्याच मारायला लागल्या व त्यांनी हंबीररावांना ही बातमी सांगितली. त्यांना ही खूप खूप आनंद झाला. कारण पहिल नातवंड घरामध्ये खेळणार होता. हंबीररावांना तर दमच निघेना. त्यांनी लगेच जिल्ह्याच्या गावी जाऊन नातवासाठी तऱ्हेतऱ्हेची खेळणी आणली होती. शकुंतलेला फारच कडक डोहाळे लागले होते. आणि तिचा जीव अगदी मेटाकुटीला आला होता. कधी एकदाचे नऊ महिने होतायत असे झाले होते.

नऊ महिने भरल्यावर तिला तालुक्याच्या छोट्याश्या हॉस्पिटलमधे दाखल केले. डॉ. शांतीने सर्व तपासण्या केल्या व हंबीररावांच्या घरच्यांना कल्पना दिली की बाळंतपण अवघड आहे व सीझर करावे लागेल. येथे जास्त सोईपण नाहीत तुम्ही तिला शहरातल्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. हो नाही करता करता शकुंतलेला जोरदार कळा येऊ लागल्या. डॉ. शांती आणि नर्सनी तिला टेबलावर घेतले. मुल आडवे आल्यामुळे डॉक्टरांना सिझर करावे लागले. त्यानंतर जो रक्तस्राव सुरु झाला तो थांबता थांबेना. शांतीने शर्थीचे प्रयत्न केले. रक्ताच्या बाटल्या दिल्या. पण शेवटी शांतीचे प्रयत्न फोल ठरले. आणि जे व्हायचे तेच झाले. शंकुतला आणि तिचे बाळ दोघेही हाती लागली नाहीत. ही बातमी कळताच हंबीरराव व त्यांचे कुटुंब शोकाकुल अंत:करणाने घरी परतले आणि त्यांनी आपल्या नशिबाला दोष दिला.

दुसऱ्या दिवशी ही बातमी गावात पसरली. गावामध्ये दोन तीन पुढारी होते ते हंबीररावांना भेटायला आले आणि त्यांनी हंबीररावाच्या कुटुंबाला भडकावयाला सुरुवात केली, असे कसे तुम्ही गप्प बसता? त्या डॉक्टरला जाब विचारायला पाहिजे. गावातील लोकांचेही तेच म्हणणे पडले. मग काय हंबीरराव, शंकर व गावकऱ्यांची डोकी भडकली. त्यांनी सरळ हॉस्पिटलवर हल्ला केला. हॉस्पिटलचे अतोनात नुकसान केले. स्टाफला आणि डॉक्टरांना पण मारहाण केली. पोलीस आल्यावरच सर्व पांगापांग झाली. झाल्या प्रकाराने डॉ. शांतीला प्रचंड मनस्ताप झाला. कारण तिने रक्तस्राव थांबविण्याचे शर्थीने प्रयत्न केले होते. पण रक्तस्राव काही केल्या थांबत नव्हता. तिला प्रचंड प्रमाणात नैराश्य आले. घरी आली तरी तिला काही सुचत नव्हते. तिची काहीही चूक नसताना तिला दोष दिला गेला. रात्री बराच वेळ ती विचार करत बसली होती.

सकाळचे नऊ वाजले तरी डॉ. शांती हॉस्पिटलमधे आल्या नाहीत म्हणून वॉर्ड बॉयला त्यांना बोलवायला पाठवले. पण तो दोन मिनिटातच ओरडत परत आला. शांतीने कमालीच्या नैराश्यामुळे पहाटे गळफास घेऊन आत्महत्या केली होती. एका तरुण व होतकरु डॉक्टरची नाहक हत्या झाली होती. रितसर शांतीच्या घरच्यांना कळविण्यात आले. त्यांचा या बातमीवर विश्वासच बसेना. शांती असले भ्याड कृत्य करणारचं नाही असा त्यांना ठाम विश्वास होता. त्यांना अतोनात दु:ख झाले. एक उमलती कळी खुडली गेली. अरोरा कुटुंबाने झाल्या प्रकाराबद्दल हंबीरराव, शंकर आणि बाळकृष्ण यांच्यावर खटला भरला. दोन महिन्याने हायकोर्टाचा निकाल आला. हंबीरराव, शंकर व बाळकृष्ण यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. अरोरा आणि मोहीते दोन्ही कुटुंबे उध्वस्त झाली त्यात दोष कुणाला द्यायचा?

जिवलग सखी

सौ. मनीषा चिंतामणी आवेकर

अनिका आयुष्यभराचं मनात साचलेलं बोलायला गेली. अन् त्याचवेळी कठोर नियतीनं डाव साधला. पण बोलाफुलाला गाठ पडली अन् असं झालं. प्रत्येकाची वेळ ठरलेली असते.



आज बॅग भरताना माझं मन चलबिचल झालं. आपला फोन बाद झाला, अन् सगळा संपर्कच तुटला. तसे इतर मैत्रिणींचे नंबर मिस्टरांनी घेऊन सुरु केला संपर्क. मी आणि अनिका दोघी सिंथेसायझर शिकायला जायचो, म्हणून मैत्रिणी. त्यात तिसरं कोणी नव्हतंच!! आणि नव्हतं, हेच आमच्या पथ्यावर होतं. अनिका खूप बुद्धिमान. शिकवलेले टिपकागदासारखे टिपून घेई. एक दोन तासात तिचे तयार होई. आपण आपले सर्वसामान्य. खरेतर साहित्याची उर्मी सळसळत असायची. त्यात आई अभ्यासाचा लकडा लावायची. त्यात शनिवारचा क्लास जुम्मे के जुम्मे सिंथचा सराव असायचा. आपण आपले कच्च्या बॅचचे विद्यार्थी!! पण सर कच्च्या बॅचलाही बरोबर ट्रॅकवर आणत असत. झक्कूताड्या करत मी सरांकडे टिकले, गळले नाही ह्यातच समाधान मानायची. तिला प्रगतीनुसार सरांनी स्पेशल क्लास लावायला सांगितलेला. पण माझी कंपनी हवी म्हणून आमच्या दोघींची बॅच शेवटपर्यंत टिकली. नंतरही अनिकाने फोन, ईमेल, वॉट्सॲप द्वारा चांगले संबंध ठेवले. तिला बहिण-भाऊ कोणीच नव्हते, म्हणून ती मला बहिण मानायची. मलाही तिचा स्वभाव, गोड बोलणे आवडल्याने आमचे मैत्रबंध घट्ट झाले. यथावकाश दोघींच्या मुलांची लग्ने झाली. दोघी संसारात बुडलो. तरी आठवड्याने फोन ठरलेलाच असायचा. राहुल अमेरिकेला गेला. आपल्या महिन्या दोन महिन्याच्या ट्रीप दरवर्षी व्हायच्या, पण ह्यावर्षी ऋतुजाचे बाळंतपण

भरोसा खुद पर रखो तो, ताकद बन जाती है।

आल्याने सहा महिने राहून, आता परतीची वेळ येऊन ठेपली.

अनिका माझी जिवलग मैत्रीण!! तिची खुशाली न कळल्याने, मी अस्वस्थ झाले. आता भेटल्यावर बघतेच तिच्याकडे!!

निघायची वेळ झाली. छोट्या राजूला सोडवत नव्हतं. त्याच्या बाललीला मोहक असल्या तरी, सहा महिन्यांपेक्षा जास्त रहाणे शक्य नव्हते. जड मनाने, साश्रू नयनांनी सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन, विमानतळाकडे प्रयाण केले.

आता वय ७० च्या पुढे गेल्यावर, मन फार हळवे होई. कोणाची आठवण आली तरी, डोळे भरुन येत. राजूची आठवण पाठ सोडत नव्हती. त्याला इलाज नव्हता. मन आता पुढे पुढे धावू लागलं. ह्या अनिकाने काहीच कसं कळवलं नाही? कितीही आजूबाजूला बघितलं तरी, तेच तेच विचार मनात यायला लागले. मग जेवल्यावर थोडी गुंगी आली व चार पाच तास गाढ झोप लागली. असं करत करत एअर होस्टेसने आपण मुंबई एअर पोर्टवर उतरत आहोत, अशी घोषणा दिल्याने, तिला हुश्श वाटले. घरी गेल्यावर काही खायची इच्छाच नव्हती.

दुसऱ्या दिवशी दोघांनी विश्रांती घेतली. जेटलॅग गेल्यावर घर स्वच्छ केले. नवीन सामान, भाजी आणली.

मग मात्र मला दम निघेना. मी अनिकाकडे जाऊन येते, म्हणून मी तडक निघालेच.

लिफ्टने उतरल्यावर पॅसेजमधे सिंथचे वेडेवाकडे स्वर ऐकू आले. कोणीतरी बाळ काहीतरी वाजतंय, म्हणून बडवत असेल अशी मी मनाची समजूत घातली. बेलचे बटण दाबताना अधीरतेने हाताची बोटे थरथरु लागली.

तिची सून, नीतानेच दार उघडले. मला बघून ती आश्चर्य चकितच झाली.

''अहो आनिता मावशी, कुठे होतात इतके दिवस?''

नेहमी स्वच्छ, नीटनेटकी, टापटीपीने रहाणारी नीता, गबाळ्या-सारखी, डोळ्यातले तेज गेल्यासारखी बघून, माझ्या पोटात तुटलं.

''अगं नीता, माझा फोन बंद पडला म्हणून माझा अनिकाशी संपर्कच तुटला. काय झालं गं नीता?''

मावशी काय झालं नाही ते विचारा. आमचं हसरं खेळकर घर एकदम कोसळलं हो. सासऱ्यांच्या अचानक जाण्यानी....

''अगं काय सांगतेस नीता?''

''अहो कुठला क्षण कसा येईल, कुणालाच सांगता येत नाही. आम्ही सिनेमाला गेलो होतो. संजय मित्राकडे गेला होता. आई बाबा गप्पा मारत होते. चहा दिला आणि बिस्कीटे आणून देईपर्यंत, त्यांनी टेबलावर मान टाकली. आईंनी शेजारच्यांची मदत घेतली. हॉस्पिटलला नेले पण त्यांच्यावर उपचार होण्याआधीच ते गेले होते.''

नीता गदगदून हमसाहमशी रडू लागली. तिला सावरायला जाईपर्यंत अनिका खोलीच्या दारात येऊन उभी राहिली. तिचे अंग लटलट कापायला लागले. अनिकाचा भेसूर चेहरा बघून मला गलबलून आले. हुंदके दाटून आले तरीही प्रसंगावधान राखून, मी आणि नीताने तिला तिच्या बेडरुममधे नेऊन झोपवले.

नेहमी उत्साहाने सळसळणारी माझी अनिका आज गलितगात्र होऊन वेडीवाकडी पडली होती. डोळ्यांतले अश्रू पुसण्याचा, केविलवाणा प्रयत्न करत होती.

सगळेच काहीतरी अघटित झाले असे मला वाटले. ज्या सिंथला ती जीवापाड जपायची तो बेडवरुन घसरुन पडला अन् माझ्या पोटात तुटलं. सिंथला थोडाही धक्का लागलेला तिला खपत नसे. तिच अनिका पडलेल्या सिंथकडे बघतही नव्हती. काहीतरी भयंकर घडले अन् अनिकाची अशी अवस्था झाली. तिचे भेसूर डोळे मला बघवत नव्हते. तिला जवळ घेऊन थोपटले तशी तिच्या अश्रूंचा बांध फुटला. नीताने तिला गोळी दिली तशी माझा हात हातात घेऊन अनिका रडतरडतच झोपली. मी भेट घ्यायला आले अन् अचानक काय हे समोर आले!!

नीताने मला आत बोलावले. गरम स्ट्राँग कॉफी दिली. खरंतर काहीच घेण्याचा मूडच नव्हता. मनात कल्लोळ माजला अन् अचानक बसलेल्या धक्क्यातून सावरायला मी घोट घोट कॉफी नकळत घशाखाली उतरवायला लागले.

मावशी आजच्या दिवस प्लीज रहाल का? तुम्हांला सगळं सांगून मन... हुंदके आवरेनात, तेव्हा मीच तिला थांबते म्हणाले.

मावशी आमच्या घरात त्या दिवशी इतकं छान वातावरण होतं. नीलेशलाही सुट्टी होती म्हणून आम्ही सिनेमाला जायचे ठरवले. संजयही मित्राकडे खेळायला गेलेला. आई सांगतात, आम्ही गप्पा मारत होतो. चहा केला अन् बिस्कीटे काढायला त्या गेल्या अन् येतात तोवर बाबा मान टाकून बसलेले. त्यांनी उठवायचा खूप प्रयत्न केला. त्यांनी शेजाऱ्यांना बोलावून आणले. अँम्ब्युलन्समधून हॉस्पिटलला नेले, पण तोवर वेळ निघून गेली अन् बाबांना तसेच घरी आणावे लागले. ह्याचा शॉक आईंच्या मनाला इतका बसला की त्या कोपऱ्यात थिजून बसल्या. शेवटी डॉक्टरने नीलेशला त्यांना जवळ घ्यायला सांगितले. तेव्हा कुठे आईंचा बांध फुटला.

माझे डोळे ऐकता ऐकताच झरु लागले. कशासाठी मी आले अन् हे काय अघटीत समोर आले!!

तेव्हापासून आईंनी मनाचे संतुलन गमावले आहे. काही गोष्टी आठवत नाहीत. कधी औषधे घ्यायची विसरतात. कधी ह्यांच्या गळ्यात पडून ढसाढसा रडतात. तुम्ही कशाला रे सिनेमाला गेलात? त्यांच्यावर उपचार तरी झाले असते.

नीलेश काय बोलणार? त्याला थोडेच माहिती होते, असे काही होणार आहे? नीलेश गप्पगप्पच असतो. संजयचेही वय असा धक्का पेलायचे नाही. इतकी बडबड करणारा मुलगा, आता कामापुरतंच बोलायला लागलायं. मी काय करु हो? कसं सावरु मला आणि इतरांना?

माझाही कंठ भरुन आला. अशावेळी शब्दांपेक्षा स्पर्शच बोलके असतात. मी तिला जवळ घेतले. थोपटले. ती थोडी शांत झाल्यावर म्हणाली नुसते घुम्म बसून आईंना किती त्रास होत असेल? आम्ही त्यांना सायकायट्रीस्टकडे नेऊन आणले.

अगं अशा वेळीच गृहिणीची सत्वपरिक्षा असते. मी आहे तुझ्याबरोबर. आपण दोघी मिळून करुयात.

बरं सायकायट्रिस्ट काय म्हणाले? माझा अधीर प्रश्न अचानक बसलेल्या धक्क्याने आणि त्या कोणाशीच बोलत नसल्याने, मनाचे संतुलन बिघडले आहे. त्या मनमोकळे बोलल्या, जवळच्या माणसाजवळ, आय मीन त्यांची बहीण असेल तर त्या जेव्हा मन-मोकळेपणाने बोलतील, तेव्हाच मनात एखादा सल असेल तर निघून जाईल.

मला तेव्हाच तुमची आठवण आली, पण नीलेश म्हणाला, मावशीचा फोन बंद आहे.

खरं आहे. माझा फोन बंद असल्याने, मला काहीच कळू शकले नाही. पण आता आपण काहीतरी मार्ग काढूयात. अनिकाला मी तिचे मानसिक संतुलन परत येईपर्यंत, माझ्याकडे घेऊन जाईन. मी तिची सर्वतोपरि काळजी घेईन.

रात्र सरता सरत नव्हती. शेवटी मी तिला थोडे पडायला सांगून अनिकाकडे आले. अजूनही ती हुंदके देतच होती. तिला साय घातलेला दही दूध भात आवडतो म्हणून बोलत बोलत भात घातला. रात्रीची औषधे दिली. जड मनाने पाठ टेकली अन् मलाच कळले नाही की मी कधी निद्रेच्या अधीन झाले.

दुसऱ्या दिवशी मीच तिची बॅग भरली. काही विपरीत घडले तर, चार दिवस बदलाला माहेरी जायची पद्धत, मन मोकळे होण्यासाठीच आहे.

घरी आल्यावर, ती सगळीकडे शोधक नजरेने पाहू लागली. तिने पटकन् ह्यांना ओळखलेच नाही. नुसतीच पहात राहिली. मग तिची ओळख करुन दिल्यावर जरा भानावर आली. अनिकाचे शब्द, बोलणं, हसणं सगळं काही हिरावून घेतलं गेलं होतं.

सगळं होत्याचं नव्हतं झालं होतं. ती लगेच मन मोकळं करणं शक्यच नव्हतं. दोन चार दिवस असेच जाऊ दिले.

मग एक दिवस तिला सकाळच्या थंड, मोकळ्या हवेत फिरवून आणलं. मोकळा श्वास घ्यायला मिळाल्याने व माझ्याबरोबरच्या गप्पांनी तिच्या चित्तवृत्तीत फरक पडला. मायेच्या माणसाच्या सान्निध्यात, आधार वाटतो. दुःख हलके होते.

शेवटी काळ हेच प्रत्येक दुःखावरचे औषध असते. मला तिच्याशी बोलायला, तिच्या मनातले काढून घ्यायला, थोडा वेळ देणे प्राप्त होते.

त्राता, दाता आणि कर्ता परमेश्वर आहे. अनिकासाठी मी परमेश्वराची मनोभावे प्रार्थना केली. माझ्या प्रयत्नांना यश दे म्हणून विनवणीही केली.

एक दिवस तिच्या नजरेस पडेल, असाच सिंथ ठेवला.

त्याचा अगदी अपेक्षित परिणाम झाला.

अगं अनिता तू सिंथ वाजवतेस का गं?

वाजवते अधूनमधून.

मी तिला एक धून वाजवून दाखवली. तर लहान मुलासारखी टाळ्या पिटून हसायला लागली.

किती नशिबवान आहेस गं अनिता तू!! अजून कला जोपासते आहेस. मी सशासारखी त्यावेळी पुढे गेले अन् लग्नानंतर वाजवणं सोडून दिलं. दिलं म्हणजे १०-१२ माणसांचं घर. मी कामानीच दमून जायची. खरं सांगू का, नवऱ्याच थोडं जरी प्रोत्साहन असतं ना, मी नसतं सोडलं वाजवणं.

पुन्हा अश्रूधारा वाहू लागल्या अन् आज जे काही बाहेर पडलंय, तसेच हळूहळू घेऊ काढून म्हणून आम्ही दोघी विश्रांती घ्यायला गेलो.

आज सायकायट्रिस्टकडे जायचं, तशी कल्पना दिली म्हणजे अनिका तयारीत राहील. नीताचा फोन आला.

मावशी मी येऊ का तुमच्याबरोबर?

अगं दुपारची अपॉइंटमेंट मिळाली आहे. तुझी कामाची वेळ आहे. मी नेते आहे तिला.

मावशी तुम्ही किती करतायं!!

अगं मावशी म्हणतेस ना!! करायलाच हवंय अशा वेळेला. मी करते आल्यावर फोन.

आम्ही सर्व आवरुन सायकायट्रिस्टकडे आलो. आमची पूर्वनियोजित वेळ असल्याने आम्ही लगेचच आत गेलो. जनरल बोलणे झाल्यावर त्यांनी मला थोडा वेळ बाहेर थांबायला सांगितले.

दहा मिनीटांत त्यांनी पुन्हा आत बोलावले.

आत्ता बरीच उत्तरे समाधानकारक दिली. हळूहळू सुधारणा होतीयं. तुम्ही बहीण का?

हो माझी बहीणच आहे. बहीण सुद्धा करणार नाही, एवढं करतीयं माझ्यासाठी मधेच अनिका न राहवून बोलली.

डॉक्टरांनी माझ्याकडे बघून मंद स्मित केले. मी काय समजायचे ते समजून गेले.

नंतर अनिकाला बाहेर बसवून मला डॉक्टरांनी आत यायला सांगितले.

ह्या पेशंटची केस थोडी गुंतागुंतीची वाटते. अशा घटना सर्वसाधारणपणे होत असतात. धक्का बसलेला असतो. काही काळाने कमी होतो. पण मला ह्यांच्या केसमधे ह्या मनात काहीतरी ठेवतायतं असे वाटते. कुठेतरी मनात सल आहे असे वाटते. आत्ता काहीच बोलू नका. तुमच्या - माझ्या बोलण्याचा परिणाम आहे असे वाटेल. एका आठवड्याने कलाकलाने विचारा.

आम्ही घरी आलो. आज चहानंतर मुद्दामच सिंथ काढला. मी वेडेवाकडे वाजवू लागले. तशी मधेच थांबवून ती धून तिने चटकन सुधारुन दिली.

अगं, मी समोर आहे म्हणून बचावलीस, सर असते तर खरडपट्टीच काढली असती.

तिच्या खरडपट्टी शब्दावर आम्ही दोघीही मनमुराद हसलो. मग क्लासच्या गमतीजमती निघाल्या. अनिकाला तिथल्या तिथेच धून जमून जायची. मला मात्र शिकवताना त्यांची डोकफोड व्हायची. पण ते कसे शांतपणे समजावून सांगायचे अशा अनेक आठवणींनी मी तिचे विश्व बदलण्याचा प्रयत्न केला.

अनिता त्यावेळी मला चांगले जमायचे म्हणून तू कधी माझा

हेवा केला नाहीस.

अगं ती कला आहे. सगळ्यांनाच सारखी कशी येईल?

बाईसाहेब तुम्हीपण लगेच स्पेशल क्लास लावला नाहीत.

अगं आपण मैत्रिणी ना!!

अशा प्रेमळ संवादात दु:खाचे ढग विरु लागले.

एक दिवस दोघीही सारसबागेत गेलो. गणपतीचे दर्शन घेताना, मी देवाला मला यश देण्याची प्रार्थना केली.

मग आम्ही एका बाजूच्या बाकावर निवांत बसलो. थंड वारा सुटला होता. जरा वेगळ्या वातावरणात आल्यावर अनिकाच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या. माझा हात हातात घेऊन म्हणाली मला बरेच दिवस तुला एक महत्वाचं सिक्रेट सांगायचंय. तू कोणालाही सांगणार नाहीस ना?

नाही गं अजिबात सांगणार नाही. मी वचन देते तुला. हे तुझं माझं गुपित राहील. सांग. मी अधिरतेने म्हणाले.

माझ्या समोरुन तो चहाचा प्रसंग अजूनही जात नाही. फ्रीझमधल्या दूधाचा चहा लवकर उकळत नव्हता. मी माझे क्लासचे टुमणे ह्यांच्या मागे लावले. माझा नातू लहान असेपर्यंत तोंडून कधी काही काढले नव्हते. पण आता क्लासला जायचे म्हटल्यावर, मुलगा, सून दोघेही गप्पच बसले. संजय तुझ्या मधेमधे करेल. आता कशाला आई अशा फंदात पडतेस? असे नीलेशने म्हटल्याने मी नाराज झाले. माझा नवरा तरी मला प्रोत्साहन देईल अशी मला आशा होती. पण त्या दिवशी हे म्हणाले अगं काही गोष्टी ठराविक वयातच केलेल्या बऱ्या दिसतात. आता संजयही मोठा होतोय. त्याच्या वेळा सांभाळाव्या लागतील. तेव्हा आत्ता तू काही काढू नकोस.

तुम्ही प्रत्येकवेळी मलाच दाबता. तुमचा नकार कधी संपणार कुणास ठाऊक? असं म्हणून मी चहा त्यांच्यासमोर आपटलाच. त्यांचा चेहरा विद्ध झाला. ते काहीच बोलले नाहीत पण त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव मला बरेच काही सांगून गेले. बिस्कीटं आणायला गेले अन् वळून बघते तो ह्यांनी टेबलावर मान टाकलेली.

अनिकाला हुंदके आवरेनात.

अगं आनिका रडू नकोस. कोणताही अपराधी भाव मनात ठेवू नकोस. तू मुद्दाम थोडीच बोललीस. आयुष्यभराचं साचलेलं तू बोलायला गेलीस. अन् त्याचवेळी कठोर नियतीनं डाव साधला. तुला वाटतं तू बोलल्यामुळं असं झालं. पण बोलाफुलाला गाठ पडली अन् असं झालं. प्रत्येकाची वेळ ठरलेली असते.

अगं ट्रीपला गेलेला माणूस बुटाची लेस बांधायला जातो, अन् वर उठतंच नाही अशी उदाहरणे आहेत. तेव्हा आपल्या बोलण्यामुळे काही झालं हे मनातून काढून टाक.

आता तुला नीलेश, नीता, संजय सर्वांना प्रेम द्यायचंय. आहे हे जीवन समाधानाने, शांतपणे, आनंदाने जग. माझी नोटेशनची वही जपून ठेवलीयं. त्याच्या आधारे स्वान्तसुखाय वाजव.

माझ्या खाद्यांवर डोके ठेवून अनिका निवांत बसली होती. मी अतीव समाधानाने तिला जवळ घेतले.

***

स्थापना : १९९८ कार्यक्षेत्र - कोल्हापूर जिल्हा

पन्हाळा-बावडा तालुका कुंभार समाज संघ, पन्हाळा



संघाची कार्यपूर्ती

१. सन १९९५ पासून समाजाशी नाळ जोडलेला.
२. पारंपारिक व्यवसायातील अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध
३. समाजातील प्रत्येक घटकाला समान मानून चांगल्या योजना आखणारा
४. महाराष्ट्रात सर्वात जास्त ओळखपत्र व सर्वात जास्त जातीच्या दाखल्यासाठी स्वतंत्र योजना राबवून दाखले मिळवून देणारा
५. कुंभार समाजाची डाक परिषद घेणारा महाराष्ट्रातील एकमेव संघ.





श्री. रामचंद्र कुंभार
अध्यक्ष
मो.९९२११०८१४४



श्री. सागर कुंभार
सचिव
मो.९४२२८५२२३४



श्री. राजाराम कुंभार
खजानिस
मो.८९७५५३७१४२



श्री. एम. व्ही. कुंभार
मुख्य सल्लागार
मो.९८५००६९३२४



श्री. विक्रम कुंभार
उपाध्यक्ष
मो.९६६५९०८७८४

करिअर

जयंत गणपतराव कोपर्डेकर

अंकिताने करिअर करण्यासाठी आपली माणसं, त्यांचे प्रेम, आपलेपणा सारं सारं गमावलं. ती लग्न, संसार आपली माणसं यांच्यापासून दूर कुठेतरी पोचली होती. परंतु आता तिला एकटेपणाची जाणीव व्हायला लागली होती. तिला परत आपल्या माणसांत जावंसं वाटत होतं.



''हॅलो हा निखीलचा फोन आहे ना?''

''हो, आपण कोण?''

''अरे, निखील मी अंकिता बोलते. कसा आहेस? बोलू ना आता?''

''हो अगं किती वर्षांनी फोन केलास. कशी आहेस? लंडन काय म्हणतय? आज माझी कशी आठवण झाली.''

''अरे हो हो, सगळं सांगते. मी ठीक आहे. मी परत पुण्यात येणार आहे. थोडा प्रयत्न करुन तुझा नंबर मिळवला. तू तूझी फॅमिली कशी आहे?''

''अगं फॅमिली काय म्हणतेस. मी अजूनही सिंगल आहे. लग्न केले नाही. पुण्यात एकटाच राहतो. गेल्या वर्षी आई पण वारली. बरं तू कशी आहेस. लग्न केलेस?''

''अजून तरी नाही. पण आता करावसं वाटतय. खूप एकटं वाटतंय. कंटाळा आलाय. आता कायमची पुण्यात येतेय. म्हणून तर तूला फोन केला. बरं ठेवते. तूझ्याशी खूप बोलायचय. आल्यावर बोलते. बाय.''

अंकिताने फोन ठेवला. तिच्या चेहऱ्यावर अनेक भाव बदलत गेले. कॉफी पिता पिता तिचे मन भूतकाळात गेले. अंकिता एकुलती एक मुलगी. वडील डॉक्टर व आई प्रोफेसर. लहान पणापासूनचं तशी अंकिता हुशार आणि आई वडिलांच्या खूप साऱ्या अपेक्षा. त्यामुळे त्यांनी लक्ष देऊनच तिला लहानाचे मोठे केले. तिने खूप शिकावे, नाव कमवावे असेच त्यांना वाटत होते. ही पण जिद्दी, हुशार, एकुलती, अभ्यासात खुप हुशार कायमच पहिली. बीई झाली गोल्ड मेडलिस्ट, पुढे एम.एस. केले. डॉक्टरेट केले. एका सॉफ्टवेअर कंपनीत जॉइन झाली. ती मॅनेजर म्हणूनच. मन लावून काम केले. कंपनीची डायरेक्टर होण्याची तिची जिद्द. त्यामुळे झोकुन देऊन काम करत होती.

शाळेपासूनचा त्यांचा एक ग्रुप. त्याच्याबरोबर निखील तिचा अत्यंत जवळचा मित्र. त्याच्याबरोबर ती तिची सारी सुख दु:ख शेअर करायची. निखीलही पहिल्यापासून हुशार विद्यार्थी. नेहमी मेरीटमधे येणारा एम.एस. करेपर्यंत दोघेही एकत्र होते. पुढे निखील चेन्नईच्या एका कंपनीत जॉइन झाला. तर अंकिताला पुण्यातच जॉब मिळाला. आता तिची तिशी जवळ येत चालली होती. आई बाबा तिच्या लग्नाचे बघत होते. पण अंकिताला इतक्यात लग्न करायचे नव्हते. तिला तिचे करियर महत्वाचे होते. फार मोठ्या तिच्या आकांक्षा होत्या. तिला नाव कमवायचे होते, पद मिळवायचे होते, पैसा मिळवायचा होता. त्यामुळे बाकी सगळे तिला गौण होते.

याच कारणावरुन आई बाबांचे व तिचे पटत नव्हते. आलेली सारी स्थळे ती नाकारत होती. इतकी शिकलेली स्थळे पण खूपच कमी होती. एकदा लग्नावरुनच घरी भांडण झाले. अंकिता खूप

चिडली. पुन्हा माझ्या लग्नाचा विषय काढू नका म्हणून तिने आई वडिलांना बजावले. आणि घरातले वातावरण पार बिघडून गेले. अंकिता पण डिस्टर्ब झाली.

त्या दरम्यान कंपनीची एक नविन ब्रँच चेन्नईला सुरु झाली. आणि अंकिताची जनरल मॅनेजर म्हणून तिकडे बदली झाली. आणि म्हणून ती लगेचच चेन्नईला शिफ्ट झाली.

थोडे दिवस ती कंपनीच्या गेस्ट हाऊसमधे राहात होती. ऑफीस व्यवस्थित सुरु झाले. एक दिवस तिला निखीलची आठवण झाली. तिने लगेच त्याला फोन केला. गप्पा झाल्या. त्यालाही आश्चर्य वाटले आणि ती चेन्नईला आली म्हणून आनंदही वाटला. संध्याकाळी दोघांनी डिनर एकत्र केले. खूप गप्पा झाल्या. मग दर रविवारी एकत्र भेटणे सुरु झाले. एका रविवारी ती निखीलच्या फ्लॅटवर गेली. पाचव्या मजल्यावर त्याचा फ्लॅट सुंदरच होता. मोठा दोन बेडरुमचा. बाल्कनीतून छान व्ह्यू दिसत होता. मोठी सोसायटी, सगळ्याच ॲमिनिटी. तिला फ्लॅट आवडला. ती म्हणाली,

''अरे निखील तुझा फ्लॅट मस्तच आहे. मला खूपच आवडला. तूला चालत असेल तर मी इथेच शिफ्ट होते. आपण एकत्र राहू.''

निखील विचार करु लागला. तेंव्हा अंकिता म्हणाली,

''अरे आपण खास मित्र आहोत. आणि मित्रांप्रमाणेच राहायचं. संकोच करु नकोस.''

तेंव्हा तो तयार झाला.

लगेचच अंकिता शिफ्ट झाली आणि दोघेही आपापल्या नोकरीत व्यस्त झाले. त्यांचे रुटीन सुरु झाले. रोज एक मावशी येऊन जेवण बनवून जायच्या. रविवारी दोघेही लॉग ड्राइव्हला जायचे. दोघेही कमालीचे हुशार होते. आपापल्या नोकरीत खुष होते. प्रमोशन घेत घेत वर वरच जात होते. जवळ जवळ चार वर्षे दोघेही एकत्र राहिले. या दरम्यान अंकिता कंपनीची डायरेक्टर झाली. आणि तिला लंडनच्या त्यांच्या हेड ऑफीसमधे जाणे भाग पडले. तिच्या एक एक अपेक्षा पूर्ण होत होत्या. पद, पैसा, प्रतिष्ठा, मान, सन्मान आणि सत्ता सारं काही मिळालं. त्यामुळे ती तिच्या करियरवर खुष होती.

सात आठ वर्षे तिने पूर्णपणे कंपनीला वाहून घेतले होते. या सगळ्या गोष्टी मिळवण्यात तिला धन्यता वाटत होती. समाधान वाटत होते. यशाचे अत्युच्य शिखर तिने गाठले होते. या दरम्यान एका पाठोपाठ एक तिचे आई वडील गेले. तेंव्हा तिला मोठा धक्का बसला. ती पुण्यात येऊन सगळे क्रियाकर्म करुन परत गेली. बऱ्याच वर्षानपासून ती आई बाबानं पासून दुरावली होती. गेले कित्येक वर्षे तिला आई बाबांचा सहवास लाभला नव्हता. ते पण याच कारणांनी दु:खी होते. एकाकी होते. सगळी सुख त्यांना होती. पैसा होता. पण मानसिक सुख मात्र नव्हते. त्यांची एकुलती एक मुलगी केवळ करियरच्या हाव्यासापोटी त्यांच्यापासून दुरावली होती. त्यांच्या उतरत्या वयात त्यांना तिचा आधार हवा होता. पण तो न मिळाल्याने ते मनाने खचले होते आणि त्यामुळेच ते लवकर गेले.

इतक्या वर्षात पहिल्यांदाच तिला एकटेपणाची जाणीव झाली. तिला जे मिळवायचे होते. जे कमवायचे होते. ते सारं सारं तिला मिळालं होत. किंवा तीच्या अपेक्षांपेक्षा तिने ते जास्तच मिळवले होते. पण आपल्या माणसांपासून ती दुरावली होती. आता त्याचीच जाणीव तिला झाली. एकटेपण तिला खायला उठला. रोजच घरी आल्यावर तिला घर भकास, उदास वाटू लागलं. तिच मन उडालं आणि परत आपल्या माणसांत आपल्या पुण्यात तिला जाव वाटलं. पण आता कोण होत पुण्यात. सर्वांना तर तिने दूर लोटले होते. दुखावले होते. तिच्या इगोपाई सगळे मित्र, नातलग दूर गेले होते.

तेंव्हा तिला निखीलची आठवण झाली. म्हणूनच तिने निखीलचा नंबर शोधून त्याला फोन केला. त्याच्याशी बोलल्यावर तिला धीर आला. छान वाटले. तोच एक दुवा तिला आधार देईल याची तिला खात्री वाटली. आपली जुनी मैत्री आपल्या कामी येईल असेच तिला वाटले. आता तिला हे तिच एकटेपण नकोस झालं होतं. आई वडील तर तिने आता गमावलेच होते. आता तिला त्यांची उणीव, त्यांचे प्रेम, आपुलकी याची जाणीव झाली.

तिला आता आपली माणसं, आपलं घर, आपला गाव, आपल्या माणसांच प्रेम, आपुलकी, माया हे सारे हवेहवेसे वाटू लागले. पैसा, पद, प्रतिष्ठा आता तिला नकोसे वाटू लागले. याचीच तिला आता जाणीव झाली. आणि म्हणूनच तिने पुण्याला परतण्याचा निर्णय घेतला. त्यातच समाधानाची गोष्ट म्हणजे तिला निखील भेटला. तेही पुण्यात आणि आता तिला पुण्याचे वेध लागले.

निखीलशी बोलणे झाल्यावर तिला धीर आला. पुण्यात शिफ्ट व्हायचा मनोरथ तिने कंपनीला कळवला. रितसर अर्जच पाठवून दिला. तिची मागणी कंपनीने मान्य केली आणि महिन्याभरातच ती पुण्यात पोचली. आई बाबांच्या घरी आल्यावर त्यांच्या आठवणींनी ती आणखीनच बैचेन झाली. साऱ्या वस्तू तशाच जागच्या जागी होत्या आणि प्रत्येक वस्तूभोवती आठवणींचे भरगच्च जाळे होते. तिला हे बघून रडूच कोसळले.

दुसऱ्या दिवशी तिने लगेच निखीलला फोन केला आणि त्याच्या घरी पोचली. त्याला भेटल्यावर तिला खूप बरे वाटले. अजूनही तो तसाच पूर्वीचा कॉलेजमधला होता तसाच तिला दिसला. काही वेळ दोघेही एकमेकांनकडे बघत होते. थोड्या वेळाने निखील म्हणाला,

''अगं आत तरी ये. बैस, कशी आहेस?''

त्यावर ती म्हणाली,

''निखील मी आता हरले सर्व जिंकूनही मी हरले. माझ्या इर्शे पोटी आणि माझ्या सर्वस्व मिळवण्याच्या आकांक्षा पोटी मी ध्येय वेडी झाले होते. जे ठरवले त्यापेक्षा अनेक पटीने मला सर्व मिळाले. पण तरीही मी हरले रे. माझी माणसं, त्यांचे प्रेम, आपलेपणा, सारं

सारं गमावलं. मी एकटी, एकाकी पडले. तुम्हा सर्वांना दु:ख दिलं. आई वडिलांचे प्रेम मला कळलंच नाही. त्यांना सुख दिल नाही. त्यांचा सहवास मला लाभला नाही. पंधरा सोळा वर्षे मी त्यांच्या पासून दूर राहीले. लंडनला गेल्यापासून तर साराच संपर्क तुटल्यासारखा झाला होता. मी त्यांना आधार द्यायला हवा होता. ते राहून गेलं. त्यामुळेच ते लवकर गेले.''

''तुलाही दु:ख दिले. आता सार आठवलं. जरी तू माझा छान मित्र होतास. तरीही तुला माझ्याबद्दल प्रेम होते. मला ते तेंव्हा कळलेच नाही. लग्न, संसार, आपली माणसं यांच्यापासून मी दूर कुठेतरी पोचले होते. वाट चुकले होते. पण आता तुझ्या जवळ आले आहे. माझेही तुझ्यावर प्रेम आहे पहिल्यापासूनच. पण मी ते टाळले होते. व्यक्त केले नव्हते. पण आता मला तू हवा आहेस. मनापासून. प्लिज मला समजून घे. घेशील ना?''

निखील शांतपणे ऐकत होता. त्यालाही हे सारं अनपेक्षीत होत. धक्कादायक होत. अचानकपणे दोघांच्या जिवनात एक वेगळ वळण आलं होतं. तो विचार करत होता. नकळतपणे तो बोलला.

''अंकिता माझेही तुझ्यावर प्रेम आहे. मी तूझ्यासाठीच थांबलो आहे. मला हे सार मान्य आहे.''

आणि दोघेही आता एकमेकांच्या मिठीत विसावले.

***



श्री आर्टस्

गणेश मुर्ती व गौरीचे

* होलसेल विक्रेते *

मु. पो. दत्तवाडी, ऊरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे - ४११ २०२



पंकज ह. कुंभार
मो. ९९२३१९४३९४



चरण ह. कुंभार
मो. ९९२३०६२७०६



श्री. हनुमंत भिकु कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9822394711

विट कारखानदार
राज ट्रान्सपोर्ट
राजेंद्र ट्रान्सपोर्ट

आमच्याकडे सर्व साईजच्या उत्तम प्रतिच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु.पो. पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे



श्री. राजेंद्र हनुमंत कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9049917111



चि. आरुष राहुल कुंभार

प्रेरणास्थान



कै.नामदेव एस. कुंभार



विनायक एन. कुंभार
8007037709
9822919475

सर्व प्रकारची बिल्डिंग व बंगल्यांची कामे केली जातील.

पुजा कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

नवीन वास्तु, कोणत्याही प्रकारचे आर.सी.सी. लोड बेरिंग, अल्ट्रेशन, पत्रा, जुने घर न तोडता वास्तुशास्त्राप्रमाणे विश्वासनीय केले जाईल.

लक्ष्मी निवास, गजानन कॉलनी, सर्वे नं. ५३, प्लॉट नं. १०, काळेपडळ, हडपसर, पुणे ४११ ०२८.

टूलकिट आपली सांगाती

चंद्रकांत नवले

टूलकिट म्हणजे विविध उपयुक्त सामानाची पिशवी, टूलकिट ही वैयक्तिक असते. तसेच व्यवसायिक, शासकीय, वैद्यकीय, स्वयंसेवी संस्थांद्वारे दिली जाणारी ही असते. व्यवसायिक टूलकिट ही उपजिविकेशी संबंधित असते.



काही दिवसांपूर्वी मी वर्तमानपत्रातला 'टूलकिट' हा श्री समीर आठत्ये यांचा लेख वाचला व मी टूलकिटवर मनन करु लागलो तर मला टूलकिट संबंधित कितीतरी आठवणी आठवू लागल्या. तसेच आपण सर्व रोज वापरत असलेली टूलकिट व त्यांचे विविध प्रकार ही आठवू लागले.

टूलकिटचा वापर व संकल्पना फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. एखाद्या संकल्पनेला इंग्रजी नाव मिळालं व तिची मिडीयावर चर्चा झाली की त्या संकल्पनेला त्या शब्दाला वजन प्राप्त होतं.

टूलकिट हे आपण पूर्वीपासून उपयोगात आणत आहोत. टूलकिट म्हणजे विविध उपयुक्त सामानांची पिशवी, इतकी साधी सरळ व सोपी तिची व्याख्या आहे.

टूलकिट ही वैयक्तिक (खासगी) असते तसेच व्यावसायिक, शासकीय, वैद्यकीय, स्वयंसेवी संस्थेद्वारा दिली जाणारी ही असते. व्यावसायिक टूलकिट ही उपजिवीकेशी संबंधित असते.

या लेखाद्वारे मी आपणांस माझ्या काही अनुभूती सांगणार आहे. तसेच या अनुभूती या प्रतिनिधिक स्वरुपाच्या आहेत. आपणा सर्वांच्या अशाप्रकारची अनुभूती येत असते.

माझ्या लहानपणी माझ्या आजीची एक टूलकिट होती ती तिची वैयक्तिक टूलकिट होती. ती म्हणजे माझ्या आजीची चंची (बटवा). ही चंची म्हणजे चार पाच पुडांची लहान पिशवी. ही चंची आजी

नेहमी कडोसरीला खोचून ठेवत होती.

या चंचीमध्ये एक छोटा अडकित्ता, कात-चुन्याच्या लहान डब्या, छाल्यासुपारी, लाल चिकणी सुपारी, बरडी सुपारी व त्यांची खांड असायची. लवंग, वेलदोडे, तंबाखूची पुडी, छोटीशी घडी केलेली नागवेलीची पानं, आसमान ताराची छोटी डब्बी, संदुकाची छोटी किल्ली, खडकू, पैसा, आना, छिद्र असलेला पैसा (चिल्लर) असे साहित्य असायचे.

साळकाया - माळकाया जमल्या की, घरगुती गप्पा व्हायच्या. गप्पा होत असतांना पान खाण्याचा कार्यक्रम असायचा. मी त्यावेळी आजी भोवती घोटाळत असे. मग आजी मला अर्धेपान करुन देत होती. ते पान खाण्यांमध्ये एक औरच मजा असायची. आसमानतारामुळे जीभ चरचर करायची, तोंड रंगलेकी पान करणाऱ्याचे आपल्यावर खूप प्रेम आहे असे वाटायचे. आजीने दिलेलं पान नेहमी रंगायचे.

आजीबाईचा बटवा हा शब्द प्रयोग आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे. हा बटवा म्हणजे औषधांची एक टूलकिटच, काही किरकोळ दुखत असल्यास, मार लागल्यास, खरचटल्यास आजीच्या बटव्यातून औषधी काढून देत असत. तो एक First Aid Box च असायचा. मी शाळेत विज्ञान शिक्षक असतांना सायन्सरुममध्ये असा First Aid Box असायचा. या बॉक्समध्ये टिंक्अर आयोडिन, कापूस, कापडी पट्ट्या, मलक, बोरीक पावडर असे औषधी साहित्य असायचे.

'आजीच्या पोतडीतील गोष्टी' लेखिका सुधामूर्ती यांचा हा कथासंग्रह मी वाचला. या कथासंग्रहात छोट्या-छोट्या गोष्टी आहेत. ज्याला जी कथा वाचावयाची आहे त्याने ती कथा वाचावी.

माझ्या लहानपणी माझी एक टूलकिट होती. ती टूलकिट म्हणजे एक डबडं. हे डबडं डालडा तुपाच्या रिकाम्या डब्यापासून बनवलं जायचं. या डब्यात आमच्या आवडत्या वस्तू असायच्या. जसे कंचे, गोट्या, गुलेल, पतंगाच्या मांज्या, चंफूल खेळायचे चिंचोके, सिनेमाच्या फिल्मचे तुकडे, भिंग, दगडी चिप, जुनेमोडके घड्याळ, पेन, जुने टाक, पेनाच्या निबा, फूगे, टाचण्या, रिकाम्या दौती, सापसिडीचा पट, रंगीत पेन्सिली, स्प्रिंग, सिगारेटचे रिकामे पाकीट (पिवळा हत्ती) क्रेयॉनच्या तुटक्या कांड्या वगैरे हा आमचा खजाना होता. सुट्टी असलीकी आम्ही मित्र एकत्र जमायचो व आपापले किट रिकामे करुन सर्व साहित्य एकमेकांना दाखवायचो. तसेच वस्तूंची आदलाबदल ही करत होतो.

आजही आपल्या घरी एखादा उभटडबा किंवा काचेची रुंद तोंडाची शिशीबरणी असते ही घरगुती टूलकिट असते. यात सुईदोरा, लहानमोठ्या सुया, वेगवेगळ्या रंगाचे दोऱ्याचे बंडल, दाभण, ब्लेड, छोटी कात्री, लहानमोठे सुटे बटण, असे साहित्य असते. टीप मारायची असल्यास किंवा शर्टचे पॅन्टचे बटण लावावयाचे असल्यास आपण चटकन ही टूलकिट काढतो.

बहूतेक महिलांकडे पर्स असते. पर्स म्हणजे त्यांची खासगी टूलकिट. या पर्समध्ये वेगवेगळ्या रंगाच्या टिकल्या, बो, सेप्टीपीना, गंगावण, डिझाईनचा छोटा रुमाल, गोल आकाराचा छोटा आरसा, कंगवा, छोटा पावडरचा डबा, पैशाचे पाकीट, क्रेडीटकार्ड, मोबाईल असं बरचं साहित्य त्या किट मध्ये असतं. विविध प्रसंगी, समारंभात या किटचा उपयोग होतो.

काही कामानिमित्त आपल्याला बाहेरगावी जावे लागते. त्यावेळी आपल्याकडे खासगी-वैयक्तिक शेव्हिंगचे टूलकिट असते. यामध्ये दाढी करण्याचा ब्रश, शेव्हिंग क्रिम, रेझर, ब्लेडचे पाकीट, नाकातले केस कापण्यासाठी छोटी कात्री, छोटा आरसा, तुरटीचा आयाताकृती तुकडा वडी वगैरे या टूलकिटमुळे रेल्वेतही दाढी करता येते.

शेव्हिंग किटप्रमाणे आपल्याकडे आणखी एक किट असते. एका प्लॅस्टिकच्या बॉक्समध्ये टूथपेस्ट, टूथब्रश, लक्स साबणाची छोटी वडी, ऑलमंड ड्रॉपची तेलाची छोटी शिशी, छोटा आरसा, कंगवा, छोटा रुमाल, नेलकटर, हॅन्टीप्लॉस्ट व इतर साहित्य असते. प्रवासात हा किटचा उपयोग होतो.

ज्येष्ठ नागरिक असतील तर त्यांच्याकडे त्यांच्या किटमध्ये बी.पी.च्या गोळ्या, डायबेटीसच्या गोळ्या, कॅल्शिअमच्या गोळ्या, आयड्रॉप, बोरोप्लस ट्यूब, क्रोसिनच्या गोळ्या, अमृतांजन-व्हिक्सची डबी, फॅब्रॅक्सप्लसच्या गोळ्या, हॅन्डीप्लॉस्ट, थोडासा कापूस असे औषधी साहित्य असते. प्रवासात किंवा घराबाहेर एखाद्या कार्यक्रमास गेल्यावर वेळ पडल्यास या किटचा उपयोग होतो.

एखादा साहित्यिक असेल तर त्याच्याकडे चेन असलेली शबनम बॅग असते ती त्यांच्या टूलकिट असते. या शबनम बॅग मध्ये पेन, पेन्सिल, खोडरबर, लिहिण्यासाठी छोटे रायटिंग पॅड, एखादा कथासंग्रह किंवा कविता संग्रह, एखादे मासिक, सुटे पेपर्स, पाण्याची बॉटल, रुमाल असे साहित्य असते.

टूलकिटला फक्त 'किट' म्हणून ही संबोधले जाते. अशाप्रकारचे किट शासनातर्फे गरजूंना दिले जातात.

तेलंगणा राज्यात शासनातर्फे गरोदर महिलांना केसीआर किट दिले जाते. हा खास बनविलेला संच असतो. ज्यामध्ये बेबी ऑईल, साबण, मच्छरदाणी, कपडे, डायपर, पावडर, शॅम्पू, टॉवेल आणि नॅपकिन्स अशा आई आणि बाळासाठी उपयुक्त गोष्टींचा समावेश असतो. सैनिकांना कॅनव्हासची पिशवी किट म्हणून दिली ज्यामध्ये त्यांचे कपडे असतात. करोनाकाळात शासनाकडून तसेच स्वयंसेवी संस्थाकडून गरीब व गरजू लोकांना (कोरडाशिधा) किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये तांदूळ, कणिक, तेल, तूप, साखर, चहापत्ती, डाळी वगैरे खाद्यपदार्थ होते. पूरग्रस्त लोकांना सुद्धा सरकार तर्फे खाद्यपदार्थांचे पॅकेट दिले जाते. व्यावसायिक, कारागीर, कामगार यांच्यासाठी टूलकिटचे फार महत्त्व असते कारण त्यांच्या टूलकिटवरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो.

१९६० चे दशक होते मी परसोडा या ग्रामीण भागात शाळेत विज्ञानशिक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी गावामध्ये सलुनची दुकाने नव्हती. न्हावीदादा घरोघरी जाऊन कटींग दाढी करायचे. न्हावीदादाकडे

पत्र्याची काळ्या रंगाची धोकटी असायची. तीच त्याची टूलकिट होती. पेटीचे झाकण अर्धवर्तुळाकार असायचे.

सरपंच, व्यापारी, पाटील यांच्याकडे बसायला खुर्ची असायची. आम्ही मात्र पोत्यावर बसून कटींग करुन घेत होतो. न्हावीदादा त्यांची धोकटी उघडून केशकर्तनाचे साहित्य एका फडक्यावर मांडून ठेवायचे. त्यामध्ये छोटा आरसा, कैची, मशीन, वस्तरा, कंगवा, दाढीचे गोल साबण, पाण्यासाठी पितळेची वाटी व वस्तरा तेज करायचा लांबट दगड. हे सर्व मांडलेली ज्याची कटींग करायची आहे त्याच्या हातात आरसा देऊन त्यांचे कटींगचे काम सुरु व्हायचे. कटिंग करताना गावातल्या बऱ्याच भानगडी सांगायचे. कटिंग दाढी झाली की सर्व अवजारे धुवून पुसून धोकटीत ठेऊन द्यायचे. मजुरी मिळाली की दुसऱ्या गिऱ्हाईकाकडे जायचे.

त्याकाळी फिरते कारागीर असायचे जसे फुटकी भांडी दुरुस्त करणारे, पत्र्याचे गोल डबे बनवणारे, छत्री दुरुस्त करणारे, भांड्यावर नाव टाकणारे, तांबे पितळेच्या भांड्यांना कल्हई करणारे. पिंजारी हे ओरडत गल्लोगल्ली फिरत असत. यांचे टूलकिट म्हणजे पत्र्याची पेटी व गोणी. या व्यवसायावरचं त्याचा उदरनिर्वाह अवलंबून असायचा.

पत्र्याचे डबे बनविणारे कारागीर गोल डबे व त्यांचे झाकण बनवून द्यायचे, चाळण्याही ते करुन देत होते. बहुतेक गृहिणी धान्य, डाळी, तांदूळ ठेवण्यासाठी असे डबे बनवून घेत होत्या. यांच्या पत्र्याच्या पेटीत पत्रा काढण्याची लांब दांड्याची कात्री असायची, जाड लोखंडी पट्टी, पंच, तारा, लांब तोंडाची पकड असे अवजार असायचे.

कल्हई करणाऱ्याच्या गोणीमध्ये कोळसे, हवा येण्यासाठी भाता, नवसागर. कल्हईचा धातु असे साहित्य असायचे तर भांड्यावर नाव टाकणाऱ्यांकडे पंच, धातूची जाडपट्टी, कागद, पेन्सिल, खडू हे साहित्य असायचे. हे कारागीर भांड्यावर खूप सुंदर अक्षरात नावे टाकायची. लग्न सराईत यांना चांगली कमाई मिळायची. छत्री दुरुस्त करणाऱ्याकडे काळ्या दोऱ्याचा बंडल, सूया, कात्री, काळा कपडा, हुक, छत्र्याच्या काड्या असे बरेच दुरुस्तीचे साहित्य त्यांच्याकडे असायचे.

गवंडी काम करणाऱ्याचे टूलकिट हे एक पोतेच असते. या पोत्यात ओळंबा, थापी, हातोडी, फळी, नॉयलॉनची दोरी खिळे, टेप, टोपले, फावडे, टिकाव, लेव्हल नळी असे साहित्य असते. गवंडी काम करणाऱ्या प्रमाणेच सुताराचे ही टूलकिट हे लहानपोतेच असते. या पोत्यात त्यांना उपयोगी असणारी अवजारे असतात जसे रंधा, वाकस, जंबुरा, पक्कड, टेप, लहान हातोडी, मोठी हातोडी, कानस, स्केलपट्टी, लहान मोठी करवत, पेन्सिल, आयाताकृती दगड, लेव्हलनळी, तसेच वेगवेगळ्या फर्निचरच्या डिझाईनची पुस्तिका असते.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांचे काम चालते. यांच्या मजुरीचा प्रकार दिवसावर नसून कामावर असतो. काम संपल्यावर लाकडी भुसा व कामात न येणारे लाकडाचे तुकडे हे कारागीर त्यांच्या बरोबर घेऊन जातात. खंडे नवमीला हे या अवजारांची पूजा करतात.

केशव टेलर हा आमचा नेहमीचा टेलर, कपडे शिवावयाचे असल्यास त्यास फोन ने कळवावे लागते. रविवारी सुट्टीच्या दिवशी तो माप घ्यायला येतो. त्याची टूलकिट ही एक चेन असलेली कॅनव्हासची पिशवी असते. य किटमध्ये टेप, पेन्सिल, पेन, लेटरपॅड, पावतीचे पुस्तक, डायरी व वेगवेगळ्या ड्रेसचे नमुने असलेल्या फोटो चे अल्बम.

तो सफारीसाठी वेगवेगळे नमुने दाखवतो. त्यातून एक नमुना आपण पसंत करायचा असतो. तसे शर्ट, पॅन्ट, प्लेट असलेली, प्लेट नसलेली, पुना पॅन्ट असे अनेक नमुने पाहून एक नमुना आपण पसंत करायचा. केशव माप घेऊन डायरीमध्ये टिपून घेतो व शेवटी शिलाईची पावती तयार करतो. सर्व काम संपल्यावर त्याचे सर्व साहित्य टूलकिटमध्ये ठेऊन शिलाई व कापड घेऊन जातो.

पुणे येथे मला बरेच कुशल कारागीर भेटले त्यांना (Technician) टेक्निशिअन म्हटलेलं आवडते यातले बहुतेक कारागीर हे आय.टी.आय. झालेले आहेत. व त्यांच्याकडे नावाचे व फोन नंबर असलेले कार्ड असते. यामध्ये गॅसची शेगडी दुरुस्त करणारा, प्लंबींगचे काम करणारा प्लंबर. विद्युत साहित्य दुरुस्ती करणारा इलेक्ट्रिशिअन, केंट दुरुस्त करणारा, वॉशिंग मशीन दुरुस्त करणारा, पेंटर या सर्वांकडे त्यांच्या साहित्यानुसार त्यांची टूलकिट असते.

गॅसची शेगडी दुरुस्त करणारा कुशल कारागीर यांच्याकडे जाड कापडाची आयाताकृती व मोठ्या (रुंद) तोंडाची पिशवी असते. हीच त्याची टूलकिट असते ही पिशवी मात्र कळकट, मळकट व मेनचट असते. या पिशवीत पक्कड, पाना, स्क्रू ड्रायव्हर, गॅस पाईपची आयएसआय मार्क असलेली रबरी नळी, व्हाल्व, प्लॉस्टिकचे बटन (नॉब), बर्नर, पट्ट्या, फडके असे बरेच साहित्य असते. आवश्यकतेनुसार तो पार्ट बदलून देतो.

प्लंबरची सुद्धा अशीच मळकट पिशवी असते. या पिशवीत मोठा पाना, लहान पाना, स्क्रू ड्रायव्हर, तार, स्क्रु, दोरा, क्रिम, वायरस, नट, नळ्याच्या तोट्या फडके वगैरेनी त्याची पिशवी भरलेली असते.

इलेक्ट्रिशिअन, केंट दुरुस्त करणारे तसेच वॉशिंग मशीन दुरुस्त करणारे, यांचेकडे असणारी टूलकिट थोडीवेगळी असते व साहित्यही त्यामानाने कमी असते.

आपण सी.आय.डी. मालीका पाहिली असेलच त्या मालीकेत फोरॅन्सिक लॅबची एक चौकोनी आकाराची टूलकिट असते. त्या टूलकिटमध्ये स्प्रे, बहिर्वक्रभिंग, ब्रश, बॅटरी, स्कॉलवेल, चिमटे, ड्रॉपर, वॉचम्लास, स्लाईड तसेच विविध रसायनाच्या कुप्या असतात. घटनास्थळी झालेल्या हत्त्याबाबत काही पुरावा सापडतो का? हे पाहण्यासाठी शोधण्यासाठी उपयुक्त असतात.

अशा विविध प्रकारच्या टूलकिट्स आपण आपल्या रोजच्या व्यवहारात वापरतो. विद्यार्थ्यांच्या स्कूलबॅग, कंपास, पेंटरचे साहित्य ठेवण्याचा डबा, गृहिणीच्या किचनमध्ये विविध डबे-बरण्या अशी अनेक उदाहरणे टूलकिट बाबत आपण देऊ शकतो. 'टूलकिट' ही आपल्या जीवनाचा एक भागच बनली आहे. म्हणूनच आपण म्हणतो 'टूलकिट आपली सांगाती.'

***

दैव जाणिले कुणी ?

श्रीमती बोन्द्रे शुभांगी मनोहर



काय सांगू मीच माझ्या नशिबाची परवड. लोकांच्या दृष्टीने माझ्यासारखी बाई म्हणजे किती भाग्यवान, दोन मुलगे डॉक्टर पती, घरात सासू व सासरे दोघेही आयुर्वेदिक डॉक्टर, मुंबई सारख्या ठिकाणी बंगला, गाडी, नोकर, चाकर आई म्हणायची सुधाने नशिब काढले.

वरवर पाहता मी खूप भाग्यवान असे कोणालाही वाटणे स्वाभाविकच नाही का? पण...

माझे आयुष्य जळते, अंगाचा दाह होतो. मनात अग्नी पेटलाय शरीर नुसते भाजून काढतेय. नुसती अंगाची लाहीलाही होते. डोळ्यासमोर चाललेल्या काही गोष्टी पटत नाही. पाहवत नाही. अश्या परिस्थितीत माझ्या डोक्यावर परिणाम झाल्याशिवाय राहिल का हो! आता माझे मन इतके सुन्न होऊन मी एक टक बघत बसायची, काहीच करण्याची इच्छा नाही. पार नैराश्यात बुडून गेले. तब्येत उतरली.

अखेर माझे दु:ख मी कोणाला सांगणार आईशिवाय. आईला फोनवर सांगून खूप रडले. आई मला घेऊन डॉक्टरांकडे गेली. बरेच उपचार झाले. औषधे इंजेक्शन झाली. मनच पोखरले तेथे शरीरतरी किती साथ देणार. आत्मविश्वास गमवून बसले. रोजचे व्यवहारही करणे दुरापास्त झाले करणार काय?

अशी ही माझी अवस्था का झाली? याची उत्सुकता असेल ना तुम्हांला तर मग मी सांगतेच माझ्या जीवनाची चितर कथा.

माझे नाव सुधा, लहानपणापासून आई वडिलांची लाडकी, पहिली बेटी अन् धनाची पेटी. आई वडिल दोघेही नोकरी करीत. बाबा कॉलेज मध्ये 'प्रोफेसर'' तर आई ''एअर इंडिया'' मध्ये मोठ्या पोस्टवर. तीन वर्षांनी मला एक लहान बहिण झाली. आम्हांला लाडाकोडात पण शिस्तीत वाढवलेले. कशालाच कमी नाही. मी ''एम.कॉम.'' झाले. एका नेत्रतज्ञ डॉक्टरांकडे अकौन्टटची नोकरी सुरु केली मोहन शहा त्यांचे नाव त्यांची प्रॅक्टिस चांगली होती. थोड्याच दिवसात मोठे हॉस्पिटल बांधले. रोज डोळ्याच्या पाच सहा शस्त्रक्रिया होत. निष्णात हुशार डॉक्टर म्हणून नाव लौकिक ही मिळविला. त्यांची उन्नती होत असता मीच त्यांच्या प्रेमात पडले. यथावकाश प्रेमाचे रुपांतर लग्नात झाले. गुजराथी म्हणून आईचा जरा विरोध होता. आमची मुलगी दिसायला सुंदर, नाकीडोळी निटस, हुशार कोणीही तिच्याशी लग्न मागणी घालून करेल. पण मीच हट्ट धरल्याने हो नाही करता शेवटी वडिलांनी थाटामाटात लग्न करुन दिले.

दोन मुलगे ही झाले. मुलांकडे लक्ष देण्यासाठी नोकरी ही सोडली. सर्व कामाला गडी माणसे त्यामुळे मला बराच वेळ मिळू लागला, पण बाहेरील विश्व माझ्या पुरते संकुचित झाले. अन् मोहन जास्त कामात गुरफटू लागला. त्याचे विश्व वाढले त्यामुळे माझ्याकडे लक्ष देण्यास वेळच नाही असे मला वाटले पण स्वारी त्याच्याच डॉस्पिटलमधील नर्स मध्ये गुंतत चालली ती वारंवार घरी येऊ लागली.

मग आमच्यात तिच्यावरुन भांडणे होऊ लागली. सासू सासऱ्यांना लेकाचे योग्य वाटू लागले. मी घरात एकटी पडले. नंदिनी गुजराथी म्हणून त्यांनाच ती जवळची वाटू लागली. मी फक्त मोलकरीण. मी खूप भांडले. त्रागा केला. दोन दिवस जेवले नाही पण काही उपयोग झाला नाही, मला पाण्यात पाहू लागले.

अन् काय सांगू एके दिवशी तो रजिस्टर लग्न करुन नंदिनीला घरी घेऊन आला. माझ्याकडे तर सर्वांचे दुर्लक्ष झाले.

आता तुम्ही म्हणाल, काय रडत बसली घ्यायचा घटस्फोट अन् व्हायचे मोकळे एवढेही समजत नाही का? नाही तर आई वडिलांकडे जावयाचे. अगदी बरोबर तोही विचार मी केल्याशिवाय कशी राहिन? वडिल कॅन्सरनी बेडवर, आईला दमा, त्यांचच त्यांना होईना. घटस्फोटासाठी हेलपाटे घालायला कोण? बहिण मेव्हणे दुबईला होते. परितोष चौदा वर्षांचा तर अशुतोष दहा वर्षांचा मी त्यांचे शिक्षण कसे करणार? पोटगी दिली तरी मुंबईत जागा मिळणे अशक्य व वेगळा संसार करण्याची हिंमत व धैर्य केव्हांच गमावून बसले. डोक्यावर ह्या गोष्टींचा परिणाम झाल्याने मी कमकुवत झाले. सारखी आजारी माझे करणार कोण? निदान येथे दिमतीला गडी माणसे आहेत. नवरा मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतो. मी तरी मुलांना सोडून एकटी राहिन कशी?

मलाच शारीरिक व मानसिक आधाराची गरज, कारण शरीर आणि मन दोघेही साथ देत नाही. विचार कर करुन, कर करुन मी ह्या निर्णयाला पोहचले.

येथून हलायाचे नाही. त्यांची चूक असल्याने ते मला हाकलवू शकत नाही. जेवण खान, कपडालत्ता बिनबोभाट मिळतोय ना! मुलांच्या दुष्टीने मुलांना आईचा आधार व डोळ्यासमोर आपली मुले आहेत ना!

ह्या निर्णयाप्रत आले खरी पण...

बायकांचे मन, आपल्याच घरात, आपल्याच नवऱ्याचे वर्तन आपण उघड्या डोळ्याने कसे बघायचे? आपली किंमत शून्य. मनात विचारांचे काहूर माजलेले, मग तुम्हीच सांगा. संताप होणारच ना!

इकडे आड अन् तिकडे विहिर अशी माझी अवस्था झाली आहे. परमेश्वर नेत नाही, तो पर्यंत जगायचे. नवऱ्याच्या सुखात आपले सुख मानावयाचे. आला दिवस आनंदात घालवण्याचा प्रयत्न करावयाचा. कधी काळी नवऱ्याला पश्चाताप होईल व तो परत माझा बायको म्हणून स्वीकार करेल. ही आशा मनांत ठेवून जगावयाचे. बरोबर ना!

***

प्रेरणास्थान
तानाजीराव भागवत मो.: **9420857521**

प्रोप्रा. : महेश तानाजी भागवत मो.: **9960825770**

ओम इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रीकल्स
ॲन्ड
मोबाईल शॉपी



विक्री व दुरुस्ती, डिश व मोबाईल रिचार्ज,
झेरॉक्स, फॅक्स, लॅमिनेशन.

पी.डी.सी. बँके शेजारी, कल्याण-नगर रोड,
आळेफाटा, जि. पुणे

शुभ दीपावली



श्री. राजाराम श्रीपात मांडवकर
सेवानिवृत्त पोस्ट मास्तर
मो. : ९४२१४६६६५५

सौ. चंपा राजाराम मांडवकर

*** निवास ***
जे.पी. होम्स, फ्लॅट नं. सी-२/३०४, पुणे सोलापुर हायवे
भारत पेट्रोल पंपासमोर, मांजरी फार्म, पुणे ४१२ ३०७

१९४७ पासुनचे पुण्यातील पहिले

पाषाणकर गॅरेज

PROFESSIONAL SPRAY AND BAKE BOOTH

खास वैशिष्ट : पेन्टींग रुम

सर्व प्रकारच्या कार स्प्रे पेंटींग स्पेशालिस्ट

ॲक्सिडेंट जॉब व इन्शुरन्स क्लेमची कामे खात्रीशीर व योग्य भावात करुन मिळतील.

२५१/१, सदाशिव पेठ, भावे स्कुल समोर, पुणे - ३०.

फोन : ०२०-२४४७५७८८, ४०५८५५५.



* प्रोप्रायटर *

दत्तात्रय नानासाहेब पाषाणकर
मो. ९८२२०००५०३

सुरज सुरेश पाषाणकर
मो. ९८९००५९९९५

कै. बाळासाहेब उर्फ सुरेश नानासाहेब पाषाणकर

आमचे प्रेरणास्थान



श्री. पांडुरंग विष्णु कुंभार
निवृत्त उपअभियंता
जलसंपदा विभाग



सौ. ज्योती पां. कुंभार



डॉ. स्वप्निल पां. कुंभार
बी.डी.एस. (पुणे)



डॉ. सौ. सुचेता स्व. कुंभार
बी.ए.एम.एस.

ओम साई डेंटल क्लिनिक

किरण कॉम्प्लेकस, एस.टी. स्टँड समोर, कडेगाव,
जि. सांगली ४१५३०४.
दुरध्वनी : ०२३४७-२४२१४३

महालक्ष्मी अपार्टमेंट, गाळा क्र. २,
एस.जी.एम. कॉलेजसमोर, विद्यानगर, कराड,
जि. सातारा ४१५१२४



स्वाती इंजिनियरींग कं.
इंजिनियर्स व फॅब्रीकेटर्स
आणि
सारिका केबल्स

आमचे प्रेरणास्थान



कै. कुंडलिक कुंभार



श्री. सागर कुंडलिक कुंभार
Mo. : 9769697677

ऑफिस :
गजानन छाया, रोड नं. ३४, मोदी कंपनी समोर, जे. बी. सावंत बस स्टॉप मागे, वागळे इस्टेट, ठाणे - ४०० ६०४
E-mail : response@swatiengineering.com
Website: www_swatiengineering.com

प्रेरणा स्थान


कै.विठ्ठल रामजी जोंधळे


शांताबाई विठ्ठल जोंधळे


लक्ष्मीबाई विठ्ठल जोंधळे


घनश्याम जोंधळे
कार्याध्यक्ष : नाशीक जिल्हा कुंभार समाज संघटना
कुंभश्री प्रतिनिधी, माजी उपसरपंच सायखेडा
सदस्य : गंगाबिसन भुतडा नागरी पतसंस्था
संचालक : भाग्यश्री ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था


सौ.सविता घ. जोंधळे
मा.सरपंच सायखेडा ग्रामपालिका


कु. चैताली
M.Sc.


चि. पवन
B.E. (Civil)

त्रिमुर्ती विट उत्पादक व सप्लायर्स

मु.पो. सायखेडा, ता.निफाड, जि.नाशिक
9371528152

OUR INSPIRATION


Late Pandurang Vishvase


Smt.Laxmi Vishvase

MATRIX
ENGINEERING TECHNIQUES
ISO-9001-2008


Prashant Vishwase
Mob.: 9273802846


Mrs.Swati Prashant Vishwase

FACTORY PREMISES



Mfg. of Press Tools, Dies Moulds, Jig, Fixtures & Press Parts etc.

D-67, MIDC, Ahmednagar - 414 111.
Email ID : matrixtooling@rediffmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

आमचे प्रेरणास्थान



उद्योगरत्न
श्री. विश्वनाथशेठ फकिरराव आहेर



उद्योजक
श्री. शिवाजीशेठ फकिरराव आहेर

- **रेनाईसन्स वाईनरी प्रा.ली.**
  प्रोप्रा. श्री.शिवाजी फकीरराव आहेर, श्री.योगेश शिवाजी आहेर
- **भारत अश्म उद्योग**(खडी क्रशर)
  प्रोप्रा. शरद विश्वनाथ आहेर
- **श्रीधनश्री एन्टरप्रायजेस**
  अंबुजा सिमेंटचे अधिकृत डीलर
  प्रोप्रा. अनिल भास्करराव आहेर
- **विश्वसत्य गार्डन**
  प्रोप्रा. श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ आहेर

'विश्वसत्य', तांबट लेन, ओझर मिग, ता. निफाड,
जि. नाशिक ४२२२०६ फोन: (०२५५०) २७५१३४



ओझर विकास संस्थेचे विश्वसत्य ज्ञान संकूल

तांबट लेन, ओझर मिग(नाशिक)
फोन : 02550-277133 मोबा. 9326011333

- विश्वसत्य इंग्लिश मिडीयम स्कूल
- विश्वसत्य कला व वाणिज्य महाविद्यालय
- विश्वसत्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय (B.Ed.)
- विश्वसत्य अध्यापक विद्यालय (D.T.Ed.)
- विश्वसत्य नर्सिंग स्कूल (RANM)
- विश्वसत्य एम.बी.ए. कॉलेज(M.B.A.)

सहकार महर्षी वसंतदादा पाटील सह.पतसंस्था मर्या.
तांबट लेन, ओझर मिग(नाशिक)

संस्थापक चेअरमन	चेअरमन	सेक्रेटरी
श्री.शरदराव आहेर	श्री.सुनिल बाफना	श्री.राजेंद्र सोनवणे

आमचे प्रेरणास्थान



कै. पांडुरंगशेठ परबते

सतिश पांडुरंग परबते

इंडस्ट्रियल कॉन्टिन कॉन्ट्रॅक्टर

फोन : ९८२२४५४६४२

संदेश पां. परबते
B.Com.,M.B.A.
मोबा.: ८०९६७२८७६४



सतिशशेठ पां.परबते



शितल रेफ्रिशमेंट
प्युअर – व्हेज रेस्टॉरंट
नेहरूनगर, पिंपरी, पुणे – १८.
फोन : (०२०) २७४२३७४८.



न्यु शितल स्वीट
तळेगाव स्टेशन, तळेगांव.
फोन : ९५-२११४-२२७५८४.



शितल स्वीट होम
७२३, सोमवार पेठ, शाळा चौक,
तळेगांव दाभाडे, पुणे.
फोन : ९५-२११४-२२६०७८



शितल कॉर्नर स्वीट
गजानन महाराज मंदिराजवळ,
तळेगांव.

सर्व प्रकारच्या केटरिंगच्या व स्विटस्च्या ऑर्डस् स्विकारल्या जातील.

वरद एंटरप्रायजेस

फॅब्रिकेशन, बॉयलर इन्स्टॉलेशन व कमिशनींग






मिलींद शेटकर 9833805444

बी.३६/३, एम.आय.डी.सी., आनंद नगर, अंबरनाथ ४२१ ५०६

Email : milind.shetkar@gmail.com

।। संत गोरोबा काका प्रसन्न ।।

प्रेरणास्थान



कै. विठाबाई दत्तात्रय भालेराव

NBC



श्री. विजय दत्तात्रय भालेराव
उपाध्यक्ष जय योगेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चांदवड, नाशिक
मो.: ९४२३१८०९५६



श्री. संतोष दत्तात्रय भालेराव
चांदवड तालुकाध्यक्ष अ.म.कुं.वि.संस्था
संचालक जय योगेश्वर नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड, नाशिक
मो.: ९४२३१८०९३२



श्री. अनिल दत्तात्रय भालेराव
मो. : ९४२२२६९०१४

BBC



।। विठाई दत्त विट सप्लायर्स ।। BBC

विट, वाळू, खडी, डबर, मुरुम व बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स

।। विठाईदत्त अर्थमुवर्स ।।

आमचेकडे शेतजमीन लेव्हल, पाईपलाईन, रोड साईट पट्टी,

इत्यादी कामे योग्य दरात व उत्कृष्ट दर्जाने केली जातील.

पत्ता - विठाई दत्त निवास, शनिमंदिराजवळ, वरचे गांव,

मु. पो. ता. चांदवड, जि. नाशिक ४२३ १०१.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



रामानंद मेडिकल ॲन्ड जनरल स्टोअर्स, लातुर

प्रो. संजय भागवत बेल्लाळे

डी. फार्मसी

मो. नं. : 9923449090 / 9890239090



रामानंद मेडिकल ॲन्ड जनरल स्टोअर्स,

दयाराम रोड, लातुर

प्रो. श्रीकांत संजय बेल्लाळे

डी. फार्मसी



रामचंद्र फार्मासिटीकल डिस्ट्रीब्युटर

लाहोटी कंपाऊंड, लातुर

प्रो. सौ. सुनंदा संजय बेल्लाळे

डी. फार्मसी



फार्मा डिस्ट्रीब्युटर

प्रो. निखील संजय बेल्लाळे

सामाजिक कार्यकर्ता, एनजीओ



डॉ. चि. अमित संजय बेल्लाळे

बी.डी.एस. (एमयुसीएच)

दंतशल्य चिकित्सक,

ओपीडी

विवेकानंद चौक, लातुर

- श्रीकांत मेडिकल ॲन्ड जनरल स्टोअर्स
- भागवत फार्मासिटीकल्स डिस्ट्रीब्युटर
- सावित्रीबाई फुले प्राथ. व माध्य.विद्यालय
- महात्मा ज्योतीबा फुले वस्तीगृह
- कृष्णा शेतकी फर्म
- बेल्लाळे डेव्हलपर्स

आमचे श्रध्दास्थान



कै.आत्माराम अंतु कुंभार कै.कमल आ. कुंभार





Shri Natraj and
Sou.Neeta Kumbhar



Chi. Hrithik
Natraj Kumbhar

Bachelor of
Designing

SAMARTH SALES ENTERPRISES

Gate No.49, Milkat No.3520/383, 413, 518,
Near Industrial Estate, Palus 416310
Tal. Palus, Dist. Sangli, MAH. Mob. 7058226897

M/S. HRITHIK SALES ENTERPRISES

Near Dr.Patangrao Kadam Industrial Estate, Palus 416310
(Behind Shubham Industries) Tal. Palus, Dist. Sangli
Mob : 7058226897



Sau.Neha Sharad Sakharkar
B.E.(Electrical)
Sharad Dattatrya Sakharkar
M.E. Machine (Design)

Suppliers : Sodium, Silicate, Fernues Oil, Foundry Material & Free Sale Kerosene, MS Sig.10, 8, 6 mm Pig Iron, Coke, Lime Stone, Core Guide Patti, Core Gum, Soda Bricks, CI Scrap, MS Scrap

FAST
EARTHING
ENTERPRISES

Approved By

CONTACT US

OFFICE ADDRESS –
Fast Earthing Enterprises
Sr. No. 34/12, Rajgad Torna Chowk,
Mohan Nagar, Mauli Niwas Building,
Ambegaon, Pune - 411043

FACTORY ADDRESS –
Fast Earthing Enterprises
Gat no 204, at Post - Karandi (K.B),
Tal - Bhor , Dist - Pune

Email: fastearthingenterprises@gmail.com | Info.fastearthing@gmail.com
Website - www.fastearthing.com
+91 97 66 818 676 / 90 67 68 6956

Address : Sr. No. 34/12, Rajgad Torna Chowk,Mohan Nagar, Mauli Niwas Building. Ambegaon, Pune 411043.



भरतशेठ एम. जगदाळे
-: संस्थापक अध्यक्ष :-
(श्री. संत शिरोमणी गोरोबा काका मंदीर)
-: जिल्हाध्यक्ष :-
कुंभार समाज, अहमदनगर

मो. ९३७३६५०१११, ९८५०७४७१११

भारत
विट उत्पादक व सप्लायर्स
विट, वाळु, खडी, डबर, व बिल्डींग, मटेरियल सप्लायर्स
शाखा- सुतगिरणी, दिघी रोड, श्रीरामपूर- ४१३ ७०९, जि. अहमदनगर



मो. ९३७०१२८९८४

- आर्किटेक
- इंजिनिअर
- इंटेरिअर
- डिझायनर

शरद जगदाळे
ॲण्ड असोसिएट्स्



पराग प्लाझा,
भल्ला बिल्डींगजवळ,श्रीरामपूर, जि. अ. नगर

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

वरद ब्रिक्स

प्रेरणास्थान



कै. उत्तम कोंडीबा कुंभार

प्रेरणास्थान



बळवंत कोंडीबा कुंभार

प्रदेश आध्यक्ष, वीट भट्टी आघाडी
अ.म.कुंभार समाज विकास संस्था
मोबा.: 9423803383/9320203383

प्रोप्रा : विवेक बळवंत कुंभार



मोबा.: 7722090121

* निवास * कारखाना *

मु. बडेखान, पो.काळज, ता.फलटण, जि.सातारा
शाखा : जगदंबा विट कारखाना, मु.पो.कोऱ्हाळे (बीबी), ता.फलटण, जि.सातारा

निलेश बाळसराफ : ९३०९१८२५५७
संतोष जाधव : ९९६०८३२४७२

ऑफीस : ९०२१०१५९२१
अक्षय शिंदे : ७०५७३४३४८४





साखरपुडा पॅकेज : २५०००/-
बर्थ डे पॅकेज : ११०००/-

साई लॉन्स मंगल कार्यालय

हॉटेल साईकृपा ॲण्ड आईस्क्रीम पार्लर

दादा गेस्ट हाऊस

राहण्याची उत्तम सोय,
२४ तास गरम पाणी

साई मंदिरासमोर, साबरगांव – मुंजाळवाडी रोड, ता. जुन्नर, पुणे



डॉ. गणेश दि. मारुलकर
M.B.B.S., DMRD.
Mob.: 9822213334



डॉ. सौ. सुषमा मारुलकर
M.B.B.S., DMRE.

शुभम्
डायग्नोस्टिक सेंटर

डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी, कलर डॉपलर

जी ८, अजिंक्य प्रेस बिल्डींग, कृष्णा बँक शेजारी, ५१२ बी/१,
अजिंक्य कॉलनी, सातारा फोन (०२१६२) २३२८२१

आमचे प्रेरणास्थान



कै.माधवराव रुंजाझी सोनवणे

आशिर्वाद



गं.भा.विमलाबाई माधवराव सोनवणे



S.M. Sonawane & Associates

Income Tax & GST Consultant

Prop.: Sanjay Madhavrao Sonavane
M.Com. D.T.L.



सरोज संजय सोनवणे
B.Com



सौ.कोमल सरोज सोनवणे
M.Com



S.M. Financial & Accounting Services

Project-Fianance Consultant & Account Writing

Prop. : Alka Sanjay Sonawane

Off.: Shop No. F-7 & F-9, Jajoo Plaza, Opp. Bank of Baroda
Trimurti-Amabad Link Road, Nashik -08.
Ph.: 0253-2375593 email : smstaxcredit@gmail.com
Mob.: 9370318118 / 9890996670

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

High-class Living @ an Envying Location!!!



Niranjan Sector 27



Gitanjali Sector 24



Varad Sector 26

ULTRA PREMIUM PROJECTS IN NIGDI PRADHIKARAN



Mr.Jeevan Vitthalrao Somwanshi

PRACHI LANDMARKS

ENGINEERS & DEVELOPERS

Plot No.02, Sector No.27, Near Dhanvantri Hospital, Pradhikaran, Nigadi, Pune 411044

FOR BOOKING CONTACT - 9822477246

Our Inspriation



Late Kisan Ukirde



DVDC

DR. VIVEK'S DIAGNOSTIC CENTRE



Dr. Vivek Kisan Ukirde
M.D. Gold Medal
Associate Professor, L.T.M. Medical College & General Hospital, Sion, Mumbai
Interventional Radiologist & Sonologist
Mob 9869335336



Dr. Mrs. Gitanjali Vivek Ukirde
M.B.B.S., D.P.B.
Consultant Pathologist
Mob. 9869188680

Shop No. 7, 1st Floor, Suyog Arcade, Sector 23, Juninagar, Navi Mumbai - 400 705. Tel : 022-32598922 / 27717549.

Health care from the heart with professional touch !

druvrays@hotmail.com

प्रवास - आयुष्याला कलाटणी देणारा !

अनुजा कुलकर्णी

नीलिमा आता स्वतंत्र बनत होती. ती मोबाईल सुद्धा सफाईने वापरायला लागली होती. आता छोट्या छोट्या गोष्टींसाठी तिला मुलाकडे किंवा सुनेकडे मदत मागायची गरज पडत नव्हती. त्यामुळे सुनेचे डोके सुद्धा शांत झाले होते. नीलिमा वाचन करत बसली होती... तितक्याच तिचा मोबाईल वाजला. मेघा चा फोन आहे हे पाहून नीलिमा ने फोन लगेच उचलला...



''गिरीश ऐक रे... तुझ्या आईला कुठेतरी बाहेर पाठव... मला त्यांची कटकट होतीये हल्ली... त्या जरा बाहेर गेल्या की थोडी तरी शांतता मिळेल... त्यांची सारखी कटकट झेपेनाशी झालीये...''

''हं? एकदम काय झालं गं?'' गीताकडे न पाहता गिरीश बोलला... त्याचं वागणं पाहून गीता वैतागली...

''इथे बघून बोल रे... माझ्याकडे बघ!''

''हं... ठीके गं... पाहतो तुझ्याकडे... तू काहीतरी कटकट करत असतेस सारखी... मग मी तुझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो.''

''शट अप रे... तुझ्या आईला कुठेतरी गावाला पाठव... मला जरा मोकळीक हवीये...''

''तू वेडी आहेस का? काय बोलती आहेस गीता? तुला माहितीये मी एकुलता एक आहे. मग कोणाकडे जाणार आई...''

''हो ना... तू एकुलता एक... मग आई सारख्या इथेच... त्यांची सारखी लुडबुड... सारखे टोमणे... सारखे सल्ले! कंटाळा आलाय... मला माझी स्पेस हवीये आता... तू काही कर पण काही दिवस तरी मला मोकळा श्वास घेऊ दे... काही दिवस झाले की इथेच येणार न त्या परत...'' गीताचा आवाज थोडा चढला होता.

''स्पेस? ओह... तुला आईपेक्षा स्पेस महत्त्वाची!! ठीके... पण कुठे जाणार आई?''

''आहेच महत्त्वाची माझी स्पेस... तुला कळणार नाही... जाऊ

दे... उगाच स्पेस वरुन आपला वाद नको. त्यांना कोणत्यातरी यात्रेला पाठव.''

''ठीके... मान्य सगळं... तू दमतेस... तुला कंटाळा आलाय... ओके! मी बोलतो आईशी... पण आई नाही म्हणली तर?''

''होच रे... मला जरा निवांतपणा हवाय... नाही म्हल्या तर? काय संबंध रे... ते मला नाही काही माहिती पण त्यांना समजाव. काहीही कर पण मला माझी स्पेस हवीये. काही दिवस तरी... श्रीयु पण बिघडायला लागली आहे...''

''हं... सगळं कळतंय मला... मोठ टास्क दिलं तू...'' गिरीश ने सुस्कारा सोडला आणि तो तिथून निघून गेला. त्याने ओहार विचार सुद्धा नाही केला... आणि तो सरळ एका नामांकित टूर कंपनीत गेला आणि त्याने चारधाम यात्रेच बुकिंग केले. जेवेनारुन आईचा नकार येणार नाही... तो आईशी बोलायला तिच्या खोलीत गेला...

''आई... कशी आहेस गं?''

''मी ठीक रे... आत्ता वाचत बसले होते... तू आत्ता इथे कसा? काही काम आहे का?''

''हं... काम असं नाही पण जरा बोलायचं आहे...''

''बोल की गिरीश...'' गिरीश ची आई बोलली. तिने पुस्तक बाजूला ठेवलं. आणि ती गिरीश कडे पाहायला लागली.... पण गिरीश ला एकदम बर्डन आले. असं न विचारता यात्रेचं बुकिंग करणं त्याला पटलं नव्हतं पण तो गीताचं मन मोडू शकणार नव्हता. तो २ मिनिटे काहीच बोलला नाही. हे पाहून आई परत बोलायला लागली,

''बोल गिरीश... काय वाटतं ते बोल की... का घेतोस आढे वेढे?''

''हं.... ऐक ना आई तू जरा थोडे दिवस कुठेतरी प्रवास करुन ये गं...'' गिरीश मनावर दगड ठेवून बोलला.

''प्रवास? आत्ता?''

''तुला हवां पालट गं.''

''हं... मला कळतंय? माझा त्रास होतो हल्ली.''

''मला त्रास होतो असं नाही गं आई... पण तुझं आणि गीताचं हल्ली फार पटत नाही... उगाच भांडणं होतात तुमची आणि श्रीयु वर पण तुमच्या भांडणाचा परिणाम होतोय असं वाटतंय हल्ली... गीता ला काही दिवस मोकळीक हवी आहे... तिला श्रीयु ला शिस्त सुद्धा लावायची आहे.''

''मी नाही रे भांडत. पण गीताला काही सांगितलं की ती लगेच आवाज चढवते.''

''मी सुद्धा तेच म्हणतो गं... तुम्ही जरा एकमेकींपासून लांब राहा मग आपोआप सगळं नीट होईल. तिला पण स्पेस हवीये थोडी... तू इथेच असतेस सारखी... मग वैतागते गीता! आणि तू करुन ये की मजा! जरा हिंड... नवीन जागा पहा.''

गिरीशच्या आईच्या डोळ्यात पाणी आलं. गिरीशचे वडील गेल्यापासून तशी एकटीच पडली होती ती... सून आधी नीट वागायची पण नंतर मात्र तिने सुद्धा तिचे रंग दाखवायला सुरु केलं होतं. मधल्या मध्ये खरी परीक्षा होती ती गिरीशची... कारण त्याला आई बरोबर बायकोची मर्जी सांभाळणं गरजेचं होतं. त्याचबरोबर त्याला चिंता होती ती त्याच्या लाडक्या मुलीची... श्रीयुची!

''ठीके... पण मला झेपत नाही रे प्रवास...'' आई बोलली.

''जमेल गं आई.. प्रयत्न करायला काय जातंय? आपल्या घरातली शांती टिकवून ठेवण्यासाठी आपण एक प्रयत्न करु शकतो ना? तू काही दिवस बाहेर राहिलीस की गीताला सुद्धा जाणवेल तुझ्या असण्याने नक्कीच फरक पडतो... आणि ती सुद्धा मनासारखं वागून शांत होईल.''

''ठीक...'' मनावर दगड ठेऊन आई बोलली...

''ही तिकिट्स घे... पुढच्या आठवड्यात आहे ही टूर... सो लगेच बॅग भरायला घे...'' गिरीशने आईच्या हातावर चारधाम यात्रेची तिकिट्स दिली... ते पाहून आई उडालीच... पण ती हसली...''

''वा... सगळी तयारी झाली मला बाहेर पाठवायची... काही हरकत नाही... पण मी एकटीच जाऊ? मी एकटी कुठे गेले नाहीये... आणि लगेच पुढच्या आठवड्यात?'' आईने घाबरुन प्रश्न केला.

''अगं आई.... घाबरु नकोस! ११ दिवस तर बाहेर राहायचं आहे तुला. गीता बॅग भरुन द्यायला मदत करेल. तू जाऊन ये... तुला आणि गीताला सुद्धा जरा मोकळीक मिळेल. मग ती खुश होईल आणि आपण आधीसारखे आनंदात राहू शकू. आणि तू एकटी नाहीस! टूर बरोबर जाणारेस... नवीन ओळखी सुद्धा होतील... सगळेच तुझ्या वयाचे असतील चारधाम यात्रेला सो काही काहजी करु नकोस... आणि मी तुला मोबाईल देऊन ठेवतो... हा तुझाच मोबाईल आहे... बाबांनी तुला आणलेला... तो मी वापरात होतो... आणि मोबाईल वापरायला जमले नाही तर टूर लीडर कडून फोन लाऊन घेऊ शकतेस...'' गिरीश ने आईच्या हातावर मोबाईल सुद्धा ठेवला...

''ठीके...'' आई थोडी दु:खी होऊन बोलली. तिला एकदम धक्का बसला होता... तिला थोड टेन्शन सुद्धा आलं होतं... इतका मोठा प्रवास एकटीने करणे तिला कितपत जमेल ह्या बद्दल तिला खात्री नव्हती पण तिच्यासाठी सुद्धा घरात शांती राहणे महत्वाचे होते. नंतर आईच्या खोलीतून बाहेर पडला आणि त्यांनी गीताला सांगितलं की आई ११ दिवस चारधाम यात्रेला जाणार आहे. हे ऐकून गीता खुश झाली... काही दिवस तरी मनाप्रमाणे वागता येणार ह्याने गीताच्या चेहऱ्यावर हसू आले...

''थँक्यू गिरीश! कधी जाणारेत आई?''

''पुढच्या आठवड्यात... आहेस ना खुश आता? ती आली की परत भांडण चालू नका करु तुम्ही... प्लीज गं... आईला आता मी ह्यापुढे तिच्या मनाविरुद्ध वागायला लावू शकणार नाही...''

''हो हो गिरीश... मला थोडी मोकळीक मिळाली की मी पण

थोडी रिलॅक्स होईन... आणि मला कुठे हौस आहे भांडायची? पण आपलं असं आयुष्य... सगळी जबाबदारी आपल्यावर मग माझी पण चिडचिड होते.''

''कळलं गं... दोन बायकांमध्ये माझं उगाच सँडविच होतं... असो, आता आईला मदत कर बॅग भरायला...''

''हो... हो...'' इतकं बोलून दोघांच संभाषण संपले. गीता आनंदी झाली होती. पण तेव्हाच गिरीश मात्र थोडा चिंतेत होता. आई एकटी प्रवास कसा करेल ह्याची चिंता त्याला लागून राहिली होती पण आता काय होईल ते पाहत राहायचं अश्या विचाराने गिरीश थोडा शांत झाला.... गीता ने सुद्धा सासूला बॅग भरायला मदत केली... काहीही न बोलता गीता ने बॅग भरुन दिली... आठवणीने सासूच्या गोळ्या सुद्धा ठेवल्या.

दिवस भराभर पुढे जात होते. गिरीशच्या आईला ट्रीपला जायचा दिवस उद्यावर येऊन ठेपला होता. नीलिमा म्हणजे गिरीशच्या आईच्या मनावर दडपण आले होते. पण कधी न कधी तिला घराबाहेर पडून स्वावलंबी होण्याची गरज होतीच... हीच ती वेळ अश्या विचाराने ती सावरली... तिने गिरीशच्या बाबांचा फोटो बाहेर काढला आणि त्या फोटोकडे पाहून बोलायला लागली,

''दिवस बदलले हो... तुम्ही होतात तेव्हा काहीच टेन्शन नव्हतं... आता मात्र माझी अडचण होतीये असं वाटतंय... पण असो... आयुष्य येते तसे जगायचं ही तुमची शिकवण आता उपयोगी पडते आहे. काहीतरी नवीन करणारे आता...'' इतकं बोलून नीलिमा ने डोळे पुसले... फोटो नीट ठेवलं आणि दीर्घ श्वास घेतला... नीलिमा ने मनाशी गोष्टी पक्क्या केल्या... आणि खंबीर व्हायचा निर्णय घेतला...

दिवस संपला आणि दुसऱ्या दिवशी निलीमांची जायची वेळ आली... त्या निघाल्या आणि श्रीयु त्यांना येऊन बिलगली...

''आज्जी... लवकर ये... आय विल मिस यु...'' नातीच्या ह्या बोलण्यामुळे निलीमांच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनी तिला जवळ घेतलं आणि तिच्या डोक्यावरुन हात फिरवला.

''हो हो... मी येते लवकर! आणि येतांना छान खाऊ आणते... गिफ्ट सुद्धा आणेन...''

''आय लव यु आज्जी... बाय आणि मस्त मज्जा कर! मग पुढच्या वेळी आपण सगळे एकत्र फिरायला जाऊ... मग तुला कंटाळा नाही येणार आणि भीती सुद्धा नाही वाटणार...''

''हो ग श्रीयु... आपण असंच करु!'' आज्जीने श्रीयुचे गाल ओढले आणि तिला परत जवळ घेतलं...

''चल आई... निघू आता! मी बॅग घेतो...''

''हो... निघू! पण बॅग माझी मी घेईन... आता सवय करायला हवी एकटीने सगळं करायची... जाते गं गीता! करा तुम्ही तुमचा वेळ एन्जॉय! स्पेस एन्जॉय करा!'' सासुचं बोलणं ऐकून गीता खोट हसली... आणि तिने बाय केल...

दोघे निघाले आणि स्टेशन वर पोचले... तिथे गेल्या क्षणी गर्दी पाहून नीलिमा जरा घाबरल्या. पण नंतर त्यांनी स्वत:ला सावरुन घेतलं...

''हे बघ आई... ही तुझी बोगी! तिकीट नीट ठेव... मोबाईल पण आणि काही वाटलं तर लगेच फोन कर...''

''हो हो गिरीश! नको करुस तू काळजी... मी घेईन सांभाळून... तू आता गेलास तरी चालेल...''

''नाही गं आई... तुझी ट्रेन निघाली की मी जाईन...''

''नको रे गिरीश... पूर्ण प्रवास एकटीने करायचा आहे मग सुरुवातीपासून का नको? तू जा... करा तुम्ही मजा...''

''बरं... बाय आई... काळजी घे!'' आईचं बोलणं ऐकून गिरीश थोडा उदास झाला... त्याला आई दुखावली गेलीये ह्याची जाणीव झाली होती.''

''हो हो... टूर वर लोकं चांगले असतात... त्यामुळे मला काही प्रॉब्लेम होणार नाही... बाय!''

गिरीशची आई बोगी मध्ये जाऊन बसली आणि तिने खिडकीतून मुलाला बाय केले... आणि नीलिमा डोळे मिटून बसून राहिली... आयुष्य कोणत्या वळणावर आणून ठेवणारे ह्या विचारात ती होती पण हा प्रवास तिचं आयुष्य बदलणार होता पण ह्याचा तिला अंदाज सुद्धा नव्हता... तिने कधी विचार सुद्धा केला नसेल इतक्या सुंदर रीतीने तिचे आयुष्य बदलणार होते.''

बोगी रिकामी होती... अजून कोणीही बोगी मध्ये आलेले नव्हते. तितक्यात तिची तंद्री एका हाकेने गेली, ''सी ५२ इथेच ना?''

''ह... हो... एक मिनिट... मला माझा सीट नंबर पाहू दे...'' निलीमांनी त्यांचा सीट नंबर पहिला... ''हो... माझा सी ५३ आहे....''

''मग खिडकीत माझी जागा आहे...'' त्या बाई हसून बोलल्या...

''ओह सॉरी... मी उठते...'' नीलिमा ओशाळून बोलल्या...

''नाही हो... मी असच चेष्टेने म्हणाले... तुम्ही बसा तिथेच... तसही मला खिडकी जवळची जागा नाही आवडत.'' त्याचं बोलणं ऐकून नीलिमा हसल्या.

''ठीके! तुम्हाला आवडत नाही पण मला तर खिडकीतली जागा फार आवडते... मी नीलिमा... तुम्ही?''

''मी मेघा... तुम्ही चारधामला जाताय ना?''

''हो... तुम्ही?''

'' मी पण... आपण सेम टूर मध्ये आहोत असं वाटतंय मला... तुमची बॅग नी माझी बॅग सेम आहे... टूर कंपनीचा लोगो... तुम्ही पहिल्यांदाच एकट्या आल्या आहात ना?''

''हो... खरं तर, मी एकटी यायला घाबरत होते. म्हणजे माझ्या मनाची तयारी होत नव्हती. तुम्ही पण पहिल्यांदाच?''

''मी बऱ्याच टूर वर एकटीच असते... आता एकटीलाच मजा येते... तुम्ही अजिबात घाबरु नका... मी आहे तुमच्याबरोबर... तुम्हांला

काही अडचण येणार नाही आणि ही टूर संपेल तेव्हा तुम्ही एकदम स्वावलंबी व्हाल हे नक्की...''

''थँक्यू मेघा... आपण समवयस्क वाटतो त्यामुळे मला अहो जाहो नका करु... मला निलीमाच म्हणा...''

''हो हो नीलिमा... आपली छान मैत्री होईल!''

नीलिमा आणि मेघा बोलत होत्या. इतर प्रवासी हळू हळू बोगीत यायला लागले आणि काही वेळातच रेल्वे ची शिट्टी वाजली. रेल्वे चालू झाली. नीलिमा ने दीर्घ श्वास घेतला. मनात देवाचा जप केला आणि तिचा प्रवास चालू झाला... ह्या प्रवासात बऱ्याच गोष्टी बदलणार होत्या आणि ह्या प्रवासाच्या शेवटी एका वेगळ्याच नीलिमाचा जन्म होणार होता. चार धाम यात्रा सर्वाथाने नीलिमासाठी लाभदायी ठरणार होती...

बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्रीचे दर्शन झाले. नीलिमा ने ह्या टूर मध्ये प्रत्येक क्षण एन्जॉय केला होता... आणि टूर चा शेवटचा दिवस उजाडला... मेघा बरोबर चा प्रवास नीलिमा साठी खूप प्रेरणादायक ठरत होता. प्रत्येक वेळी मेघा चे वागणे, तिची समयसूचकता ह्या सगळ्यांनीच नीलिमा भारावून गेली होती. मेघा कडून तिला खूप काही शिकायला मिळत होते. आणि नीलिमा सुद्धा सगळ्या गोष्टी आत्मसात करत होती. दोघींनी बऱ्याच विषयांवर चर्चा केली होती. एकमेकांच्या आवडी निवडी जाणून घेतल्या होत्या. दोघींची स्वयंपाक करण्याची आवड विशेष जुळली होती. स्वयंपाक हा दोघींमधला समान दुवा होता. रेल्वे प्रवास संपला.

सगळे बाय करुन आपापल्या घरी जायला निघाले... पण नीलिमा आणि मेघा मात्र अजूनही थांबल्या होत्या. मेघाच्या मनात काही विचार घोळत होते आणि ते तिला निलीमाशी बोलायचे होते. मेघा ने जरा विचार केला आणि तिने बोलायला चालू केले...

''नीलिमा माझ्या डोक्यात काहीतरी आहे. तुला सुद्धा घरातून बाहेर पडायचे आहे आणि स्वत:च्या हिमतीवर जगायचे आहे. बरोबरे?''

''हो हो मेघा... माझ्यामुळे घरातल्या कोणाला त्रास नको... आणि उगाच माझी सतत लुडबुड चालू असते असं वाटायला नको... पण मला काहीच मार्ग नाही बाहेर पडण्यासाठी... तुला भेटले आणि मला असं वाटतंय, खरंच काहीतरी करता येऊ शकतं... आणि तुला खूप थँक्यू... मला ह्या चारधाम यात्रेबद्दल मनात शंका होत्या... म्हणजे मला जमेल का नाही एकटीने प्रवास ही धाकधूक नेहमीच माझ्या मनात होती... पण तू भेटली आणि अवघड वाटणारी गोष्ट इतकी सहज आणि सुंदर रित्या पूर्ण झाली.''

''नीलिमा... थँक्यू का? मला सुद्धा एक छान मैत्रीण मिळाली ह्या प्रवासात... अगदी माझ्यासारखेच विचार करणारी, माझ्या सारखाच आवडी असणारी... मी आहे खूप स्वावलंबी... पण कधी मला सुद्धा छानशी मैत्रीण असावी असं वाटतंच... मी बऱ्याच ट्रीप एकटीने केल्या पण ही ट्रीप माझ्यासाठी सुद्धा खास आहे. सोबतीला कोणीतरी असलं की छान वाटतं.''

''येस... मला सुद्धा मनमोकळं करण्यासाठी एक खूप खंबीर मैत्रीण मिळाली...''

''बरं ऐक ना... मी काय बोलत होते... आपण एकाच शहरात राहतो... सो भेटू परत.''

''हो हो नक्की भेटू... आता मी तुझा नंबर मोबाईल मध्ये सेव्ह केला आहे. आणि तुझे खूप आभार... मला मोबाईल कसा वापरायचा हे माहिती देखील नव्हतं आणि आता मी सराईतपणे मोबाईलचा वापर करु शकते... सगळं क्रेडीट तुला...''

''अगं आभार कसले... मला माहिती होती ती मी तुला सांगितली इतकंच आणि तू स्वावलंबी आहेस. बरं ऐक न, आणि मला तुझ्याबरोबर काहीतरी महत्त्वाचं बोलायचं आहे. पण आत्ता जरा घरी जाऊ... आपण भेटूच लवकर!''

''चालेल मी पण जरा दमले आहे आज... भेटू लवकरच...''

''तू कशी जाणारेस नीलिमा? मी सोडू की जाशील एकटी?''

''नाही नाही... सोडू नकोस! आता मी स्वावलंबी होतीये... एकटीने सगळं करु शकते...'' नीलिमा हसून बोलली,

''आणि जाईन ग एकटी! पोचले की फोन करेन... तू काळजी नको करुस!'' हसून नीलिमा बोलली आणि तिने मेघाला बाय केल... आणि रिक्षा बोलवून एकटी स्वतंत्रपणे घरी गेली...

नीलिमाने घराची बेल दाबली... खरं तर गिरीश तिला म्हणाला होता की तो तिला घ्यायला येईल पण तो विसरुनच गेला. आणि नीलिमाने सुद्धा घरी फोन केला नाही त्यामुळे गिरीश निवांत बसून राहिला होता. दाराची बेल वाजल्यावर कोण आलं असेल ह्या विचाराने तो दारापाशी गेला... आणि त्याने दार उघडलं... आणि समोर आईला पाहून तो आश्चर्यचकित झाला...''

''आई.... तू आलीस आज? म्हणजे तू एकटी आलीस? तू फोन नाही केलास?''

''हो हो गिरीश! आजच येणार होते. पण तू विसरला असशील... काही हरकत नाही. स्टेशन पासून आपलं घर फार लांब नाही आणि आले की नाही नीट... प्रयत्न केलाच नाही तर कसं कळणार की जमतंय...''

जायच्या आधी घाबरलेली आई एकदमच एकदम शूर कशी झाली ह्या विचारात गिरीश पडला होता. गिरीश काही बोलला नाही हे बघून नीलिमा हसली आणि ती परत बोलायला लागली,

''तुझे धन्यवाद गिरीश... आणि सगळ्यांत जास्ती आभार गीताचे! मी बाहेर पडलेच नसते तर बाहेरचे जग पाहता आलं नसतं.. तू चारधार यात्रेची तिकिट्स दिलीस आणि मला जगण्यातली मजा कळायला लागली. किती दिवस तुम्हाला त्रास देत घरात बसू ना?''

''ओह... गिरीश थोडा विचारात पडला होता...'' आई, बाकी कशी झाली तुझी चारधाम यात्रा?'' आईमध्ये झालेला बदल सकारात्मक होता पण हा बदल किती दिवस राहील ह्याबद्दल मात्र तो साशंक होता.

''खूप सुंदर अनुभव आले बघ गिरीश! तू ट्रीप ला जायला भरीस पाडलं नसतंस तर खूप काहीतरी छान बघायचं राहून गेलं असतं.''

''छान...''

''तुला फोटो दाखवते दुपारी...''

''हं? तू काढलेस फोटो?''

''हो हो... मीच काढले... आधी जमलं नाही... पण आता जमतंय... मी आधीच मोबाईल वापरायला हवा होता... आणि तो मोबाईल माझ्यासाठीच आणला होता ना? मग मी माझ्याजवळच ठेवते मोबाईल...''

''मोबाईल पण वापरता यायला लागला आईला?'' गिरीश पुटपुटला... मग तो मोठ्याने बोलला, ''ही यात्रा तुझ्यासाठी छान ठरली गं आई... आणि तू खुश आहेस ना आई... मग झालं तर...''

''हो हो... माझ्यात बरेच बदल झालेत... बरं आता मी जरा आंघोळ करून पडते जरा...''

''चालेल... मी आणून देतो तुझी बॅग खोलीत...''

''नको रे... इतकीही दमले नाहीये... नेईल मी माझी बॅग... तू बस तुझं काम करत...'' इतकं बोलून आपली बॅग घेऊन नीलिमा तिच्या खोलीत गेली... आणि गिरीश जरा वेळ सुन्न बसून राहिला.

आईच्या वागण्यातला बदल गिरीशने हेरला होता. पण ह्या गोष्टीला कश्याप्रकारे सामोरे जावे हे मात्र त्याला कळत नव्हते. पण झाले ते चांगलं ह्या विचाराने त्याने काही विचार करणे बंद केले. आणि तो त्याच्या कामाला लागला. आता हा बदल टिकू देत ह्याच विचारात गिरीश होता.

नीलिमा आता स्वतंत्र बनत होती. ती मोबाईल सुद्धा सफाईने वापरायला लागली होती. आता छोट्या छोट्या गोष्टींसाठी तिला मुलाकडे किंवा सुनेकडे मदत मागायची गरज पडत नव्हती. त्यामुळे सुनेचे डोके सुद्धा शांत झाले होते. नीलिमा वाचन करत बसली होती... तितक्याच तिचा मोबाईल वाजला. मेघा चा फोन आहे हे पाहून नीलिमा ने फोन लगेच उचलला...

''हेलो... नीलिमा... कशी आहेस?''

''मेघ... मी मस्त बघ... आत्ता पुस्तक वाचत होते... तू कशी आहेस?''

''मी छान... बर ऐक, मी तुला म्हणाले होते काहीतरी महत्वाचे बोलायचे आहे... आता योग्य वेळ आहे असं वाटतंय... तू येशील आज घरी?''

''हो तू म्हणाली होतीस... घरी? येते... तुझा पत्ता देऊन ठेव... म्हणजे तू सांगितलं होतंस पण नीट आठवत नाही...''

''हो हो... त्याची चिंता नको करूस... तुला मेसेज करते फोन बंद केला की....''

''चालेल... आणि काय महत्वाचे?''

''तू ये तर खरं घरी... आय थिंक, तुला पण मजा येईल... म्हणजे आपल्या दोघींना मजा येईल.''

''हं... मी येते जरा वेळात...''

''मी वाट पाहते...'' इतकं बोलून नीलिमा ने फोन ठेवला... आणि लगेचच मेघा ने मेसेज केला... तो पत्ता नीलिमाने चेक केला आणि ती आवरायला लागली. नीलिमा आवरुन हॉल मध्ये आली. आणि तिने गिरीश ला सांगितले,

''बाहेर जाऊन येते गिरीश... बाहेरुन काही आणायचं असेल तर मला मेसेज करुन सांग...''

''ओह आई... कुठे जातीयेस?''

''माझी नवीन मैत्रीण आहे ना... मेघा तिच्याकडे बोलावलंय तिने...''

''बर... कर मजा...''

नीलिमा ने रिक्षा पकडली आणि ती मेघा च्या घरी पोचली... घर मस्त होते... टुमदार छोटा बंगलाच होता. पण तिथे एकटीच मेघा रहायची...

मेघाने नीलिमाचे छान स्वागत केले... तिला गरम वाफाळलेली कॉफी दिली आणि तिने बोलायला चालू केले.

''नीलिमा... डायरेक्ट मुद्याच बोलते... बरेच दिवस माझ्या मनात आहे ही गोष्ट पण एकटीने कितपत जमेल ह्याची खात्री नव्हती.''

''नक्की जमेल तुला सगळं... मेघा तू मला स्वाभिमानाने जगायची शिकवण दिलीस... तुला काही मदत हवी असेल तर मी नक्की करणार मेघा!'' नीलिमा बोलली...

''मला मदत नकोय... म्हणजे माझ्या डोक्यात आहे आपण एकत्र पदार्थांचा बिझिनेस चालू केला तर?''

मेघाचे बोलणे ऐकून नीलिमाचे डोळे लकाकले... आणि ती बोलायला लागली,

''खूप मस्त आयडिया आहे गं... मला घरी बसून तसही कंटाळाच येतो... आणि मी सुगरण होते... आमचे हे नेहमी कौतुक करायचे माझ्या सगळ्या पदार्थाचं... पण हे गेले आणि सूनेच राज्य चालू झाले... मग स्वयंपाक घरात जाण कमी झालं... पण जमेल आपल्याला? आपण फक्त दोघी आहोत...''

''हो... पण कश्या पद्धतीने करायचं? काही ठरवलं आहेस?''

''तू माझ्या बरोबर असशील नं... मग मस्त! मी पण आपण हे ठरवू... म्हणजे माझ्या मनात आहे आधी फक्त छोट्या ऑर्डर घेऊ... माहितीतल्या लोकांकडून... ते कस जमतंय ते पाहू... मग पुढे ठरवता येईल... त्याने वेळ तर उत्तम जाईल पण हातात पैसे देखील येतील... तुला काय वाटत नीलिमा?''

''मस्त... मी कधी असा विचार केलाच नव्हता गं... म्हणजे एकटीच पडले आहे घरी... पण बाहेर पडून असं काही करावं हे मला वाटलेच नाही... तुझी भेट माझ्या आयुष्यात टर्निंग पॉईंट ठरणार

बघ... आयुष्य काही नवीन करायची संधी देतंय तर नक्कीच प्रयत्न तर केलाच पाहिजे... आणि मला काहीच अंदाज नाही बिझिनेस चा... पण एकदम उडी मारण्यापेक्षा हळू हळू छोटी पावले घेण उत्तम होईल...''

''बरोबर... आयुष्य नवीन संधी देतंय... आपल्या दोघींना! बिझिनेस म्हणजे आपण घर खर्च सांभाळतो तसंच फक्त थोड्या मोठ्या प्रमाणात पहायचं. आपल्याकडे वॉट्सअप आहेच. त्यावर जाहिरात देऊ... कसा प्रतिसाद येतो बघू.. माझ्या थोड्या फार ओळखी पण आहेत... तिथे सांगून ठेऊ...'' मेघा उत्साहाने बोलायला लागली... तिचे बोलणे ऐकून नीलिमा सुद्धा एकदम फ्रेश झाली...

''आपण कामाला लागू लगेच... मी आतापासूनच एकदम फ्रेश झालीये. सगळी मरगळ दूर झालीये. तुझे खूप धन्यवाद मेघा...''

''धन्यवाद कशाला? पार्टनर होणार आता आपण... आता आपण एकत्र बिझिनेस करणार आहोत त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठी धन्यवाद नको हं आता...'' मेघा हसली... नीलिमा सुद्धा हसली.

दोघी बराच वेळ गप्पा मारत होत्या आणि दोघीही खूप खुश झाल्या होत्या... हा निर्णय दोघींचे आयुष्य बदलणार होते... ''पोट भर खा...'' हे नाव दोघींनी एकमताने ठरवले... दोघींना खायला घालायची आवड असल्यामुळे दुसऱ्या नावाचा दोघी विचारच करु शकत नव्हता.

दोघी जणींनी काय पद्धतीने काम करायचे ते ठरवून घेतले. सगळी तयारी झाली.. मुख्य म्हणजे दोघींची मानसिक तयारी पूर्ण झाली होती... एके दिवशी दोघी, निवांत गप्पा मारत बसल्या होत्या. आता दोघी वाट पाहत होत्या पहिल्या ऑर्डर ची... तितक्यात मेघाच्या मोबाईलवर कोणाचातरी फोन आला. अननोन नंबर होता. तिने नीलिमाकडे पाहिले आणि फोन उचलला,

''हॅलो...''

''पोटभर खा केटरिंग सर्विस?''

''हो हो.. बोला...''

''मी जोशी... माझ्या नातवाचे बारसे करायचे आहे. बाळ लहान आहे. त्यामुळे बाहेर हॉल घेऊन करण्यापेक्षा घरीच करू अस ठरले आणि वॉट्सअप वर तुमच्या केटरिंग सर्विसची माहिती कळली... तुम्ही नवीन आहात सो मला आधी पदार्थांची चव चाखायला मिळाली तर मी तुम्हांला माझी ऑर्डर देऊ शकतो.''

''हो हो... तुम्हांला काय काय पदार्थ हवेत सांगून ठेवा.. आणि परवा आमच्या इथे येऊन पदार्थ चाखून पहा... आणि आमची जागा सुद्धा पाहता येईल...''

''चालेल... मी मला हव्या त्या पदार्थांची यादी देतो तुम्हाला... आणि परवा येतो तुमच्याकडे...''

''चालेल... आमचा पत्ता आहे ना... नाहीतर मी तो पाठवते...''

मेघा जरा वेळ फोनवर बोलली. मग फोन बंद झाला आणि मेघा खुश होऊन नीलिमाशी बोलायला लागली, ''येस आपल्याला मोस्टली पहिली ऑर्डर मिळेल नीलिमा... म्हणजे आपण नवीन आहोत यामुळे आधी पदार्थ चाखून मग ठरवतील... पण आता हा मागे फिरून बघणे नाही...''

''अरे वा... ही तर मस्त बातमी दिलीस मेघा... कोणते कोणते पदार्थ आहेत सांग आपण लागू तयारीला...''

मेघा आणि नीलिमा पहिली ऑर्डरची चौकशी झाल्यामुळे खूप खुश झाल्या... पदार्थांची यादी मिळाल्यावर त्यांनी सगळी तयारी केली आणि पदार्थ बनवले... जोशींनी ते येऊन चाखले नी ते भलतेच खुश झाले. आणि ही ऑर्डर नीलिमा आणि मेघाला मिळाली. दोघींचा बिझिनेस खऱ्या अर्थाने चालू झाला... दोघींनी मनापासून स्वयंपाक केला आणि तो खाऊन जोशी आणि त्यांचे पाहुणे खुश झाले. आणि त्या बारश्यातच त्यांना दोन नवीन ऑर्डर मिळाल्या... ''पोटभर खा...'' ला काही दिवसातच प्रसिद्धी मिळायला लागली.

पाहता पाहता सगळंच बदलले. दोघींच्या खाण्याचा बिझिनेस चा पसारा एकदमच वाढला... आता दोघींना श्वास सुद्धा घेण्यासाठी फुरसत नव्हती... ज्या दोघींना बिन कामाच्या म्हणून हिणवले जात होते त्या आता एका बिझिनेस यशस्वीपणे चालवत होत्या. त्यांच्या मदतीसाठी ४ बायका सुद्धा घ्याव्या लागल्या. आणि खाण्याची डिलिव्हरी देण्यासाठी एक छोटा टेम्पो आणि २ कामगार सुद्धा ठेवले... हातात पैसे येत होतेच पण त्यापेक्षा खाऊ घालण्याचे समाधान सुद्धा दोघींना मिळत होते. आणि इतरांना सुद्धा काम मिळवून देऊन त्यांना सुद्धा रोजगार उपलब्ध करुन देत होत्या... मेघा ला बिझिनेस मध्ये उत्तम साथ मिळाली आणि नीलिमा चे तर पूर्ण आयुष्य बदलूनच गेले होते... आता घरात सुद्धा तिला मान मिळू लागला होता... सुनेची कटकट कमी झाली होती... नीलिमा साठी ही गोष्ट आनंददायी होती.

जो प्रवास करायला नीलिमा घाबरत होती त्याच प्रवासाने तिचे पूर्ण आयुष्य बदलून टाकले होते. सध्या वाटणाऱ्या प्रवासाने तिचे पूर्ण आयुष्य बदलून टाकले होते. सध्या वाटणाऱ्या प्रवासाने तिचे पूर्ण आयुष्य बदलून गेले होते. आता नीलिमा घरी पैसे द्यायला लागली... ती आपल्या मिळकती मधले काही पैसे नातीच्या नावावर ठेवायला लागली... ही गोष्ट नीलिमा साठी खूप खास होती. स्वत:च्या खर्चासाठी तिला कोणाकडे पैसे मागायला लागत नव्हते. तीचे पैसे ती तिला हवे तसे वापरु शकत होती.

नीलिमा स्वाभिमानी तर झालीच पण त्याचबरोबर आता ती आर्थिक स्वावलंबी झाली होती. आणि जेवण बनवून लोकांना खायला देण्यात वेगळंच आनंद तिला मिळत होता... आता पुढे जाऊन मेघा आणि नीलिमा एक छोटेसे हॉटेल सुद्धा काढण्याच्या विचारात होत्या. पुढे जाऊन गरजूंना मदत देखील करायचा दोघींचा मानस होता... सगळे उत्तम होत होते... पण ह्या सगळ्या यशाचे पूर्ण श्रेय होते ते गिरीश, गीता आणि एकटीने केलेल्या प्रवासाला...

प्रयत्न केला तर काहीच अवघड नसतं.

***

मर्मबंधातील ठेव ही !

रमेश पिंजरकर

यापूर्वी घडलं तसं आजही घडतं. साथ देताना घामाझोकळ झालेला तबलची, तबल्यावर थाप मारता मारता, अचानकच थबकतो... संगिताच्या तालावर थयथयणाऱ्या कलावंतीनीचा - बिजलीचा पदन्यास थांबतो. ठेक्यावर ठाई ठाई बंदगी देणारे दीलवर ओठातच अडकतात ते शायरसाबच! अचानकच घोगरा सूर निघाल्यानं - नेहमीच्या कलावंतीनीकडे ते रोखून पाहू लागल्यानं! सारेच शायरसाबकडे आश्चर्यानं बघतात, मात्र अशा कलंदराला विचारण्याची कुणाची हिम्मत होत नाही.



कार्य छोटे असले तरी चालेल पण प्रयत्न नेहमी मोठे असावेत.

हिरव्या रंग महालातली नेहमीचीच रात्र, दीलखेच सुरावटींनी धूंद-फूंद झालेली, मद्यात न्हालेली! तबला पेटी सारंगी यांच्या तालासूरावर कलावंतीन-बिजलीचा नावाप्रमाणंच नाचून, थयथयाट-छमछमाट आणि याला भेदत, स्पष्ट होत जाणारी, शायरसाबंच्या गझलेची लकेर!

''जिस दर्दसे हम घुटे जा रहे है,
वह दर्द क्या? उसकी दवाँ क्या?
बस, हमदर्द मिला दे साकी,
हमदर्द मिला दे, दो घूट पिला दे!''

ताल पकडण्यासाठी बिजलीची कसरत... वादकांची ताल मिळवता मिळवता तारांबळ... चाहत्यांचा - आसिक - रसिकांचा वाहवा वाहवाचा अव्याहत गजर. शायरसाबचं मद्याच्या कैफात-ताकदीचं गाणं, गाण्यासाठी मद्य... मद्याच्या कैफात गाणं... गाण्याची लकेर... पुन्हा मद्य....

यापूर्वी घडलं तसं आजही घडतं. साथ देताना घामाझोकळ झालेला तबलची, तबल्यावर थाप मारता मारता, अचानकच थबकतो... संगिताच्या तालावर थयथयणाऱ्या कलावंतीनीचा - बिजलीचा पदन्यास थांबतो. ठेक्यावर ठाई ठाई बंदगी देणारे दीलवर ओठातच अडकतात ते शायरसाबच! अचानकच घोगरा सूर निघाल्यानं - नेहमीच्या कलावंतीनीकडे ते रोखून पाहू लागल्यानं! सारेच शायरसाबकडे आश्चर्यानं बघतात, मात्र अशा कलंदराला विचारण्याची कुणाची हिम्मत होत नाही. थोड्यावेळानं, मनहर नावाचा मैफिलीत नेहमी दाद देणारा बंदा, हिम्मत बांधून विचारतोच-

''आज कही ज्यादा तो नही पी ली शायरसाबने?''

''पी भी ली तो तुझे क्या?''

आपल्याच तंद्रीत बरळल्याप्रमाणं उत्तरतात आणि बिजलीकडे पूर्ववत रोखून बघत, मद्याच्या कैफात झुलतच घोगऱ्या आवाजातच खुणावत म्हणतात-

''साकी जरा करीब तो आ!''

''आज शायरसाबने कैसे याद फर्माया? क्या आज फीर वही दौरा पडा है?''

ती भीतभीतचं घुंगरं बांधलेली पावलं लयबद्ध टाकत, नेहमीप्रमाणं ठाकतच, त्यांच्यासमोर तक्तपोसावर येऊन बसते. मद्याचा जाम भरुन, तोंडाशी नेते. ते तिच्या चेहऱ्याकडे निरखून बघत म्हणतात.

''जरा करीब तो आ, और करीब!''

तिनं पुढं केलेला जाम डाव्या हातात पकडून तिला कधी नव्हे ते आज नखशिखांत न्याहाळतात. आणि तिची हनुवटी उजव्या हातानं वर उचलत, डोळ्यात रोखून बघत, बरळल्यासारखं विचारतात.

''तू कही वह तो नही?''

''कौन?''

''वही मेरी मामूकी लडकी कुसूम?''

''नही तो, मै तो आपकी बिजली हूँ शायरसाब, बिजली!''

असं पूर्वीही झालेलं. बिजलीमध्ये आपल्या कुसूमला बघतो. पूर्वीही असाच प्रश्न केलेला. बिजलीनंही असंच उत्तर दिलेलं. सरावानं बिजलीला स्मरण झालेलं. कुसूमची आठवण झाली म्हणजे ते असेच करतात. अधिक पितात. मग कुसूमच्या आठवणीत त्याची रात्र सरते. हातातला ग्लास शायरसाब एका दमात पिऊन संपवतात, आणि मद्यानं भिजलेले हात कुडत्याच्या खिश्यात घालून, घडी-पूडी झालेली मळलेली लग्न-पत्रिका व फोटो काढून तिला दाखवत म्हणतात.

''कुसूम, मेरी कुसूम! उसके ब्याहकी पत्रिका है और यह रही उसकी तस्वीर! कुसूम और तूम कितने हमशकल हो? एकको छुपावो, दुसरे को दिखावो!''

अधिक प्यायला बिजली मना करत असताना, स्वत:च नवा जाम भरतात. आपल्या समोर स्टूलावर ठेऊन, त्यात कुसूम दिसते की काय, त्याकडे एकटक बघत राहतात, किती तरी वेळ! अन् मग हळूहळू आठवत राहतात, तो गतकाळ...

आज नावालौकिकाला आलेला शायरसाब, गतकाळातला मधू-मधूकर. प्रथमच आपल्या मामाच्या गावाला आलेला... संध्याकाळ... आकाशातून दुधाळ चांदणं पडलेलं... झुळूझुळू वाहणारा वारा... घरासमोरे प्रशस्त अंगण... त्यापुढे पिंपळपार... पिंपळाची सळसळणारी, चमचमणारी पानं... पिंपळा खाली पारावर मधू, त्याची मामे-बहिण-कुसूम, तिचा थोरला भाऊ- कवितेच्या भेंड्या खेळत बसलेले. आणि कुसूमचे आई-वडिल म्हणजे त्याचे मामा मामी त्यापलिकडे बसून, कौतुकानं बघताना. मधू छान छान कविता करतो, गाणंही छान म्हणतो हे कुसूमला आधीच कळलेलं. भेंड्या-खेळून झाल्यावर कुसूम त्याला गाणं म्हणण्याचा आग्रह करते. म्हणते-

''ए भाऊ, माहितीय तू छान छान कविता करतोस, गाण गातोस ते! एखादं तुझ्या आवडीचं गाणं म्हणना!''

कौतुकानं बघणारे मामा मामी सुद्धा, त्याला बसल्या जागेवरुन आग्रह करतात. मग काहीसा लाजत-संकोचतच गाणं म्हणायला सुरुवात करतो-

''मर्मबंधातली ठेव ही!
प्रेममय ठेवी जपोनी, सुखाने दुखवी जीव.
मर्मबंधातली ठेव ही!''

मधू... नुकतीच ओठांवर काळी लव आलेला, परंतु एखाद्या पोक्त गवैय्याला शोभेलशा ऐटीत बसण्याची ढब, आलाप घेताना सहजच कानावर जाणारा हात. अन् आनंदाची अनुभूती देत सभेवर येताना, सूराला श्वास पुरवण्याची त्याची धडपड... मामा मामींना मोठं कौतूक वाटतं की, ''पट्टीच्या गायकानं गायची ही चीज त्यानं कशी काय निवडली? कोवळ्या वयात, कसलेल्या गवैय्याप्रमाणं, गाण्यातल्या भावना, त्याच्या चेहऱ्यावर दिसतात कशा?'' कुसूमला गाण्यातलं फारसं कळत नसलं तरी मात्र, जीव ओतून गाताना, त्याच्या

गळ्याच्या ताठ फुगलेल्या शीरा, गाण्यातल्या भावनावेगानं होणारा चेहऱ्यावरला बदल, आवाजातलं कंपन मात्र ती टिपत असते.

गाण्यातल्या शब्दाचा नेमका अर्थ तिला फारसा जरी कळत नसला तरी आज प्रथमच चेहऱ्यावरल्या भावना वाचता आल्या असतात. काहीतरी अननुभूत असं आपल्या अवाक्या-बाहेरचं, आकलना पलिकडलं ऐकलं असल्यामुळं तिला मनोमन आनंद झालेला असतो. गाणं संपलं तरी, गाण्यातल्या भावनेप्रमाणं त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव तिच्या मनात पक्कं घर करुन जातात. टाळ्या वाजवतच, जवळ येऊन मामा मामी त्याच्या पाठीवर मोठ्या मायेनं थोपटतात, शाबासकी देऊन म्हणतात-

''मधू, तू तूझ्या बाबांपेक्षा सवाई निघालास. मला तूझ्या ह्या गाण्याच्या निवडीचं, त्यातला भावार्थ, आवाजातल्या कंपनातून व्यक्त करण्याच्या तुझ्या कसबाचं मोठं कौतुक वाटतं बुवा! तुझं गाण्यातलं कसब, तयारी तुला अकाली प्रौढ करुन जाते. कुणीरे तयारी करुन घेतली ही? आणि कुणी शिकवली ही चीज?

''बाबांनी मला तयार केलं. बाबा गेल्यावर उस्तादांची शागिर्दी केली. त्यांनीच शिकवली ही चीज मला, त्यांना माझा मोठा लळा-प्रेम!''

वडिलांच्या आठवणी उचंबळून आल्यानं म्हणा किंवा उस्तादांच्या प्रेमामुळे भारावून म्हणा, तो सद्‌गदीत होतो. पण किंचित काळच! पूर्ववत होऊन, विचार करायला लागतो. 'तबला-पेटी-नसतानाही आपलं गाणं आज इतकं कसं वटलं? असं पूर्वी कधी तरी झाल्याचं स्मरत नाही. कुसूमकडे बघून नेमकी हीच चीज का आपणाला स्फुरावी? गाण्यातल्या भावना आवाजाच्या कंपनातून इतक्या नेमकेपणानं आजच कशा प्रगट झाल्यात? कोडंच म्हणायचं? बरोब्बर, कुसूमलाच याचं श्रेय आहे. आपल्या मनोदेवते पुढे रसिकांपुढे गाण्यात काही औरच मजा असते, याची आज प्रचिती आली. आपण इतकं जीव ओतून गावं, आणि प्रशंसोद्गाराचा चकार शब्दही कुसूमच्या तोंडून निघू नये की, टाळ्याही वाजवू नयेत हे कसं? आपलं गाणं आणि आपल्या चेहऱ्यावरले भाव डोळ्यानं पिण्यात कुसूम इतकी गढून गेली होती, शिल्पवत झाली होती की, प्रशंसोद्गार किंवा टाळ्या वाजवण्याचं भानही हरवून बसली, हे काय दर्शवते? ही तर आपल्या गाण्याची पावतीच! वाटतं, अशा या मनोदेवतेपुढं आपण असंच अखंड गात रहावं आणि तिनंही ऐकत रहावं, अगदी कल्पांतापर्यंत!

मामाच्या गावाहुन परत आल्यानंतरचा असाच एक दिवस... दिवस मावळ्यापूर्वीच काळी छाया घेवून आलेला... तो उस्तादाकडून रियाज करुन परत आलेला. आणि घरी आपल्या रियाजाच्या बैठकीवर बघतो तो लग्नाची पत्रिका, कुसूमच्या लग्नाची! कुसूम, त्याचा खरा रसिक, मनोदेवता, जिच्यापुढे तो कल्पांतापर्यंत गात राहिला असता, तिचं लग्न? आणि त्याचं सारं अवसानच गळून पडतं. जीवनात एकाएकी रीतेपण जाणवू लागतं. पोकळी जाणवू लागते. जीवन निरर्थक वाटू लागतं. 'कुसूमचं लग्न ठरवण्यापूर्वी मामामामींनी, माझ्या आईला एकदाही विचारु नये? आपल्यात काय कमी होती की, आपण त्याच्या पासंगात बसतं नव्हतो? आपल्या गाण्याच्या व्यासंगाचं त्या सर्वांनाच कोण कौतूक, मगं त्यांनी आपणाला का डावलावं? कीं, आपल्या गाण्याचा व्यासंग त्याच्या मुलीचा संसार करु शकत नाही असं त्यांना वाटलं? खरं काय? ते काहीही असो, आपण अमोरासमोर एकदा तरी व्यक्त व्हायला हवं होतं, हेच खरं म्हणजे काय तो सोक्षमोक्ष लागला असता. पण आता हे समजून घेण्याचा उपयोग तरी काय?' हातातल्या पत्रिकेकडे, तिच्या फोटोकडे बघून अश्रू ढाळत राहतो, कितीतरी वेळ! असहाय्यपणे माजघरात बघतो. त्याची विधवा आई सुद्धा चूलीपाशी बसून मुळूमुळू रडत असते. तो पत्रिका फोटोची अलगदपणे घडी करुन खिश्यात ठेवतो. खिसे चापपून ती ठेवल्याची खात्री करुन घेतो, जणू हा अमुल्य ठेवा त्याच्या पासून कोणी चोरणार असतो.

तेव्हापासून मधू बदलतो, इतका की कुणी म्हणेल जादूच झाली! कालौघात त्याच्या कुटूंबातलं एकमात्र मायेचं माणूस, त्याची आईही जाते आणि मधू पोरका होतो. आतून पोखरला जातो. दाढी वाढलेली, डोक्याच्या केसांच्या जटा झालेल्या. शरिरावयाची त्याला फारशी शुद्ध राहिली नसते. त्याची निजी कामही लहरीनं होऊ लागतात. जमेल तशी, जमेल तेव्हा काळजी घेणारी बिजली आणि जगण्याची उर्जा देणारं गाणं, यामुळंच तो अशाही अवस्थेत तग धरुन राहिला असतो. चाहत्यांच्या आग्रहानं त्याच्या अंगात शर्ट पायजाम्याऐवजी, लखनवी पांढरा कमीज, चुस्त विजार आणि डोक्यावर पांढरीच फरकॅप येते. कमी वयात प्रौढ दिसू लागतो. रात्रं दिवस मनातल्या मनात, शेरोशायरी गझल, गाण्याच्या नव्यानव्या चाली, सूर, ताल, लय जुळवू लागतो. त्यामुळं रात्रदिवसाचा फरकही तो विसरु लागतो.

तो एकट्यात, मैफिलीत मद्याच्या कैफात राहू लागतो. बराचसा लहरी, काहीसा वेडसर परंतु आता तो चाहत्यांचा, रसिकांचा कलावंतीनीचा 'शायरसाब' झाला असतो, देवता झाला असतो, आपली देवता गमावून! जिच्यापुढं तो कल्पांनापर्यंत गात राहिला असता!

समोर स्टूलावर ठेवलेल्या ग्लासात, मद्याच्या कैफात कुसूमला बघून, ग्लास ओठाला लावतो अन् एका दमात संपवतो. आणि पुन्हा गायला लागतो.

''जिस दर्दसे हम घुटे जा रहे,
वह दर्द क्या? उसकी दवाँ क्या?
बस हमदर्द मिला दे साकी,
हमदर्द मिला दे, दो घूँट पिला दे!''

शायरसाबची तीन मद्यात भिजलेली सुरावट-बिजलीचा छम-छमाटक त्याला साथ देताना वादकांची तारांबळ-रसिकांचा वाहवा वाहवाचा गजर-जणूं काही घडलंच नाही असं!

***

रत्नाकर वाणी



बिबट्या मांसाहारी प्राणी आहे. तो भूक लागल्याशिवाय कधी कुणावर हल्ला करीत नाही. जंगले नष्ट झाल्यामुळे त्याचे खाद्य अर्थात जंगलातील प्राणी कमी झाले. पोट भरण्यासाठी तो मानवी वस्तीकडे वळला. त्याचे खाद्य रहिवासाच्या जागा हिरावून घेतल्या. त्याच्या कृत्याला आपणच जबाबदार, अन् त्याला आपण बदनाम करत आहोत.

रात्र तशी फारशी झाली नव्हती. साडे दहा अकराचा सुमार.

बाहेर निरव शांतता पसरली होती. सृष्टिने काळीभोर अंधाराची चादर ओढली होती. सर्वत्र गडद अंधार पसरला होता. कोणी येउन डोळ्यात बोटे घातली तरी दिसणार नव्हते. बाहेर चिट पाखरु दिसत नव्हते. आकाशात टिटवी टिव ऽ टिटीव ऽऽ टीव ऽ करीत रात्रीची भयाणता वाढवित होती. दूरवर जाईपर्यंत तिचे टिवटिवणे ऐकू येत होते. रातकीडे आडोशाला लपून कीर्र कीर्र करीत होते. विहीरीतील बेडकं डराव डराव करीत त्यांची साथ संगत करीत होती. विहिरीतील झऱ्यातून झिरपणारा पाण्याचा थेंब, उंचावरून खोल विहिरीत पडताच टप्पकन् असा मोठ्ठा आवाज होउन हृदयाचा ठेका चुकवत होता. मळ्यातील केळी झाडाच्या पानांची सळसळ चालू होती. खाली पडलेल्या पाल्या पाचोळ्यातून सरपटणारे साप, उंदीर, घूस सरपटून धावपळ करीत शांतता भंग करीत होती. कुत्र्यांचे भुंकणे अविरत चालूच होते. ५/६ किलोमिटर अंतरावरुन भरधाव वेगाने पळणाऱ्या ट्रकच्या टायरचा चिर्रऽ आवाज व कर्कश हॉर्न स्पष्ट ऐकू येत होता. फर्लांगभराच्या अंतरावर आप्पा शिंदेच्या शेतात बोअरवेल साठी चालू असलेल्या मशिनच्या आवाजाने डोके भणाणून सोडले होते. दूरवर धावणाऱ्या रेल्वेची धड धड ऐकू येत होती. अशा भयाण परिस्थितीत सुद्धा घाबरलेल्या अवस्थेत हरी धीराने पाणी पिण्यासाठी उठला व माठाजवळ जात असताना चुकून त्याचा पाय पाण्याने भरलेल्या गडव्यास लागला. तसे त्यातील पाणी सांडून गडवा घरंगळू लागला. त्या घरंगळण्याच्या आवाजाने हरी अधिकच घाबरला. भीतीने अंगावर शहारे आले. दरदरून घाम सुटला. स्वत:ला कसेबसे सावरीत रांजणातून २ ग्लास पाणी काढून ढसा

ढसा प्यायला व परत खाटेवर जाऊन आडवा झाला. नेहमी रात्रंदिवस रानावनात काम करणाऱ्या हरीला अशी भयाण रात्र नविन नव्हती. पण घडलेली घटना नविन होती.

त्याचा सहकारी व नात्याने मावसभाऊ असलेल्या नारायणाच्या बाबतीत अर्ध्या तासापूर्वी घडलेली घटना त्याच्या नेत्रपटलावर कायमची कोरली गेली होती. कितीही विसरण्याचा प्रयत्न केला तरी विसरता येणे शक्य नव्हते. रोजचीच रात्र पण आज हरीला सरता सरत नव्हती. खूप मोठी युगासारखी वाटत होती. आजूबाजूला कोणतीही वस्ती नव्हती किंवा कितीही हाका मारल्या तरी ओ देऊन त्याच्या मदतीस कोणीही येणार नव्हते याची त्याला पूर्ण जाण होती. रात्र सरुन दिवस उगवण्याची वाट पाहण्याशिवाय त्याच्याकडे गत्यंतर नव्हती. देवाचा धावा करीत पहाटे केव्हा डोळा लागला त्याला समजलेच नाही.

नेहमीप्रमाणे सकाळी मळ्याचे मालक भाऊसाहेब मोटार सायकलवर मळ्यात हजर झाले. हरीला इतकी गाढ झोप लागली की मालक आल्याचे त्याला कळले देखिल नाही. भाऊसाहेबांनी मोटर सायकल झाडाखाली लावली. रात्री उसाला कोठवर पाणी दिले याची पाहणी करू लागले. उसाचे गट पाण्याने भरभरून वाहत होते. पाणी वाया जात असल्याचे पाहून हरी व नारायण दोन्ही सालदारांच्या हलगर्जीपणाचा भयंकर राग आला. वाटले असेच खोलीवर जाऊन त्यांना जाब विचारावा. पण त्या आधी त्यांनी आपला मोर्चा विहीरीकडे वळविला व पंप चालू आहे का बंद पाहिले. अपेक्षेप्रमाणे पंप चालू होता. त्वरेने पंप बंद केला. खोलीवर जाउन ए ऽ हऱ्या, एऽ नाऱ्या अशा मोठ्या आवाजात आरोळ्या देत दरवाजा जोरजोराने खटखटकवला. कोणी तरी दरवाजा ठोकतोय ऐकून अर्धवट झोपेत असलेला हरी घाबरला. दरवाजाचा आवाज आल्याने घाबरतच त्याने दरवाजा उघडला. समोर भाऊ साहेबांना पाहून त्याची पाचावर धारण बसली. त्याला बघताक्षणी शीवी हासडत म्हणाले, ''गाढवा पंप चालू आहे. गट भरभरून पाणी वाहतय. ते कोण कधी बंद करणार? तुझा बाप?'' मालकाचा चढलेला पारा पाहून हरी अधिकच घाबरला. त्याची बोलती बंद झाली होती. काय बोलावे व कसे सांगावे हेच त्याला कळेना. भाऊसाहेब अधिकच गरम झाले.

शेवटी धीराने हरीने तोंड उघडले. त त प प करीत सांगण्याचा प्रयत्न करू लागला. ''मालक नाऽऽऽऱ्या. पुढे शब्द फुटेना. डोळ्या समोर रात्रीचा प्रसंग उभा राहीला. ''मालक नाऽऽऽऱ्या म्हणत सांगण्याचा प्रयत्न करू लागला. त्याला तेथेच थांबवत भाऊसाहेब उद्वीगतेने जोरात ओरडले, अरे पुढे बोल की नुसता नाऽऽऽऱ्या म्हणतोय. नाऱ्या खपला की काय?''

''व्हय'' खाली मान करून हरी म्हणाला.

''काय म्हणाला परत बोल. तुझी रातची उतरलेली दिसत नाही.'' मालक गरजले.

''व्हय'' हरी मान डोलवत म्हणाला.

''गधडया लाज वाटते का रातची उतरली न्हाय म्हणायला.'' भाऊसाहेब चिडले.

''न्हाय. न्हाय तसं नव्ह मालक. नाऱ्या खरंच न्हाय. त्याला रातच्याला जनावरान फाडून खाल्लं.'' हरी धीराने एका दमात बोलला.

विश्वास न बसल्यामुळे भाऊसाहेबांनी परत विचारले, ''काय खरं सांगतोय का? कुठं?''

आता हरीच्या बोलण्यात धीर आला व बोट दाखवित म्हणाला, ''व्हय मालक. त्या तिकडं उसाच्या फडात.'' हे ऐकून भाऊसाहेब जागेवरच उडाले. त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. कधी नव्हे ती अशी विश्वास न बसणारी घटना घडली होती. त्यांनी हरीला आपल्या बरोबर येण्यास सांगितले. तो अतिशय घाबरला होता. धीर होइना त्यांच्या सोबत जाण्याचा. घाबरु नको मी तुझ्या बरोबर आहे. अजून दोन चार जणाना सोबत घेऊ. अशी समजूत काढल्यावर तो तयार झाला. त्यांनी शेजारच्या चार पाच गडयांना त्वरीत बोलावले. गावात निरोप धाडला तसे १५ ते २० युवक हातात काठ्या व कोयता घेऊन हजर झाले. सर्व हरीसह घटना स्थळाकडे निघाले. खोलीपासून साधारण २०० फूटावर उसाच्या फडात काठ्या आपटत व सावधतेने एकत्रित राहून आगेकूच करत राहिले. अचानक एका गड्याला फाटलेल्या शर्टाचा तुकडा दिसला. ''मालक, मालक'' असे हाका मारीत सर्वांना शर्टाचा तुकडा दाखवित सावध केले. ५० फूट पुढे गेल्यावर सर्वजण एकदम थांबले व अवाक् होउन बघतच राहिले.

नारायणचा अर्धवट खाललेला मृतदेह छिन्न विछिन्न अवस्थेत पडला होता. आजूबाजूला रक्त सांडलेले होते. चेहरा ओळखू येत नव्हता. हा हा म्हणता बातमी सर्व गावात पसरली. लगेचच पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक व गावकरी घटनास्थळी हजर झाले. हरी काहीच बोलू शकत नव्हता. भाऊ साहेबांनी व वनाधिकाऱ्यांनी कधी घडले? कसे घडले? याबद्दलची माहिती हरीला विचारली. मनावरचे ओझे हलके झाल्यासारखे झाले.

आता हरी बऱ्यापैकी स्थिरावला होता. सर्वांच्या नजरा हरीवर स्थिरावल्या. श्वास रोखले. हरी हिमतीने आठवेल तसे कथन करू लागला.

''म्या अन् नाऱ्याने दिव लागणीला संगच भाकर खालली. रातच्याला ९ वाजेच्या सुमारास मंग दोघबी फावड घिऊन फडाकड गेलो. पंप चालू करुन फडाच्या वरल्या अंगाला नाऱ्या थांबला अन् म्या खालल्या अंगाला पाणी फिरवायला गेलो. एक दीड घंटयात फड भरला. म्या वर आलो. पंप बंद केला. तंबाकू खायला चंची काढली. दोघांनी तंबाकू खाल्ली. वाईच इश्रांती घेतली अन परत कामाला लागायच म्हणून उठलो. नाऱ्या हिरीकड पंप चालू करायला गेला. म्या परत खाल्ल्या अंगाला जायला निघालो. नाऱ्या पंपापत्तूर पोचल्याचे म्या पायलं. नाऱ्या परत पंप चालू कराया पाठमोरा झाला अन् त्याच वक्ताला घात झाला. काय कळायच्या आत दबा धरून बसलेला, एक भला मोठा बिबटया माझ्या बाजून वाऱ्याच्या येगाने नाऱ्या वर झेपावला अन् त्याची मान जबडयात पकडली. नाऱ्या खाली पडला अन् जिवाच्या

आकांतानिशी वरडाया लागला. वाईच क्षणभर मला काय बी उमगल नाय. म्या हातातल फावड घेउन माराया धावलो तस नाऱ्याला सोडून बिबटया माझ्याकड पाहत गुरगुरला. म्या माग फिरलो. नाऱ्या सुटला अन् जिवाच्या आकांताने पळू लागला. त्याने परत नाऱ्याचा पाठलाग केला त्याला जबडयात पकडल अन् जमिनीवर लोळवल. नाऱ्याने लय सुटायचा प्रयत्न केला बगा. म्या परत एकदा त्याला सोडवण्यासाठी बिबटयाच्या दिशेने दगूड भिरकावला तो त्याच्या कपाळाला लागला. बिबटया चिडून माझ्या दिशेने यायला लागला. म्या हिरीकडे धावलो. नाऱ्याची शुध्द हरपून निपचीत पडला होता. माझ्यात अन् बिबटयात दोन तीन कासरा अंतर व्हत. बिबटया माझा माग सोडून परतला अन नाऱ्याला घसटत नेऊन फडात गेल्याच म्या पायलं. फुडं माझा नाविलाज झाला. म्या कायबी करु शकलो नाय. खोलीत गेलो दरवाजा बंद केला अन् घटाघटा पाणी पिउनसन खाटेवर पडलो. दरवाजा उघडून कोणाला बोलवायची हिंमत नव्हती. कुनीबी नजदीक नव्हतं. माह्या कड मोबाईल बी नव्हता मालकास्नी फोन कराया. दरवाजा उघडला तर बिबटया मला बी खाईन भीती व्हती. रातभर जागा व्हतो. खाटावर रडत व्हतो. कवाबी बिबटया ईइन याच भ्या व्हत. पन सकाळच्याला कवा झोप लागली उमगलच न्हाई.

त्याची कहानी ऐकून सर्वांचे मन हादरले. हरीने एकटयाने न भीता बिबटयाला परतवून लावण्याचे धाडस केले याचे सर्वांनी कौतुक केले. वनाधिकाऱ्यांनी बिबटयाचा माग काढण्याचा प्रयत्न केला. थोडया अंतरावर, ओढयाजवळ बिबटयाच्या पायाचे ठसे आढळले. शिकार करुन बिबटया ओढया पलिकडे गेल्याचे निष्पन्न झाले. प्रशासनिक दृष्ट्या पंचनाम्यासारखे उपचार पूर्ण करुन नारायणचा मृतदेह गावात आणला व त्याच्या कुटुंबियांच्या उपस्थितीत अग्निदाग दिला.

घटनेचे गांर्भिय पाहता सुरक्षिततेच्या दृष्टीने गावकऱ्यांनी वनखात्याकडून बिबटयाला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली. सरपंच, ग्रामसेवक यांनी दखल घेत वन अधिकाऱ्याकडे पाठ पुरावा केला. मागणी पूर्ण झाली. दुर्दैव असे की १५ दिवस पिंजरा लावून देखिल बिबटया जेरबंद झाला नाही. परंतु महिन्याभरानंतर नारायणावरील हल्ल्याची घटना ताजी असतांनाच एके दिवशी दुपारच्या सुमारास एकांताचा फायदा घेत त्याच ठिकाणी हरी विहरीजवळ पंप चालू करण्यास गेला असता पाठमोऱ्या हरीवर त्याच बिबटयाने मागून हल्ला चढविला. परंतु हरीला वेळीच चाहूल लागल्याने जरासे बाजूला होऊन वाकला. बिबटयाचा अंदाज चुकला व झेप घेतलेला बिबटया विहरीत जाऊन पडला. हरीने आरडा ओरडा करून सर्वांना सावध केले. वनअधिकाऱ्यांना बिबटया विहरीत पडल्याची वर्दी दिली. पिंजरा लावला अन् बिबटयाला पाण्यातून काढून पिंजऱ्यात जेरबंद केले. हरी परत एकदा सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

सरपंचांच्या घरी वनअधिकाऱ्यांशी या घटनेची चर्चा चालू असतांना त्यांचा ६वीत शिकणारा विन्या बैठकित आला सरपंचाच्या समोर कागद धरीत म्हणला, ''बा म्या यावर एक कविता केलीय बघा. शाळेत मास्तरांना लई आवडली. वाचू म्हणत.'' आज्ञेची वाट न पाहता वाचावयास सुरुवात केली.

पल्याडल्या वावरात वाघरू दिसलं गड्या
धोंडया सांगे, कोंडयाला आता खर नाय गड्या ।।धृ।।

परवाच्याला म्हणे दगडयाची दोन मेंढरं नेली
सदा औताडाची म्हस पण नेली
वाघरू लय चपळ हाय
पंचक्रोशीत त्याचा बोलबाला हाय
वस्तीवरल्या मान्सांच्या त्याने वळखल्या नाड्या
शिकारीच्या जागा पण त्याने हेरल्या गड्या ।।१।।

जंगल वाल्यास्नी कळवाया हवं
मेंढरास्नी संरक्षण द्यायाला हवं
गाववाल्यास्नी सांगू पाहारा ठिवा
भारनियमन गेलं खड्ड्यात
रातभर दिवा बत्ती चालू ठिवा
भिऊ नको म्या बी तुझ्यासंग हाय गड्या ।।२।।

यात वाघराची काय बी चूक न्हाय
मानूसच लई वंगाळ हाय
जंगलं समदी तोडून टाकली
वाघराला ऱ्हायाला जागा नाय ऱ्हायली
मंग तो बी काय करीन, तुच सांग गड्या ।।३।।

आताच म्या एक बातमी ऐकली
वाघरू बिघरू काय पण नाय
मेंढरं न म्हस चोरली हाय
खरं सांगू गड्या माह्मबी यक बकरू न्हाय
चोरं पल्याडल्या गावातलाच हाय
घावला त करीन त्याला दे धरणी मला ठाय ।।४।।

यावर विन्याचे कौतुक करीत व शाबासकीची थाप देत वनाधिकारी म्हणाले, सरपंच हे सत्य आहे बरं का! अनेकवेळा केवळ बिबटया आला म्हणून अफवा पसरविल्या जातात. बिबटया मांसाहारी प्राणी आहे. तो भूक लागल्याशिवाय कधी कुणावरही हल्ला चढवत नाही. झाडे तोडून वनक्षेत्र कमी केले त्याचा निवारा काढून घेतला. जंगल नष्ट झाल्यामुळे त्याचे खाद्य अर्थात जंगलातील प्राणी कमी झाले. मग तो तर तरी काय करणार. पोट भरण्यासाठी तो मानवी वस्तीकडे वळला. त्याचे खाद्य रहिवासाच्या जागा हिरावून घेतल्यात ना! त्याच्या कृत्याला आपणच जबाबदार, अन् त्याला आपण बदनाम करत आहोत.

***

पूर्वा

भूषण सुधाकर जोशी



मी तिला सगळं सांगितलं. माझ्या मनाची घालमेल, डोक्याचं झालेलं खोकं, हृदयाचे वाढलेले ठोके, रोज रात्री पडणारी तिची स्वप्नं, ऑफीस, घर, गोडाऊन, साईट इ. प्रत्येक ठिकाणी येणारा तिचाच विचार सगळं थोडा धीर आला आणि आय लव्ह यू म्हटलं! ती गोड हसली आणि ''तो तूच आहेस'' म्हणाली.

(पहिली आजी) : ''काय झालं?''

''बाळ रडत होतं'' ''वुडवर्ड्स ग्राईपवॉटर दे त्याला. तवू लहान असताना मी तुला तेच द्यायचे''

(दुसरी आजी) : ''काय झालं?''

''बाळ रडत होतं'' ''वुडवर्ड्स ग्राईपवॉटर दे त्याला. तू लहान असताना मी तुला तेच द्यायचे''

टीव्हीवर लागलेली ही ग्राईपवॉटरची जाहिरात पाहून माझं मनोरंजन झालं. मालिका रूजू झाली. ५ मिनिटं होत नाहीतर तोच दुसरी जाहिरात लागली. यावेळेस जाहिरात थोडी मोठी होती ''घ्या...घ्या ना'' ''हो हो'' ''चांगले झालेत ना पोहे?'' ''एकदम टेस्टी केले आहेत. सुपर! सॉरी... पण मला काहीतरी पांढरं दिसतंय या प्लेटच्या साईडला!''

''अगं बाई! कामवालीनं भांड्याची पावडर तशीच ठेवली वाटतं! नीट घासले नाहीत तिनं भांडे. द्या इकडे ती प्लेट; दुसरी देते. तोपर्यंत चहा घ्या.''

''डोन्ट वरी आई... आय मीन् काकू... ही व्हाईटवॉश वॉशिंग पावडर वापरून पहा. भांड्यांना अजिबात चिकटत नाही. एकदा वापरून पहा, कायम वापरत रहाल''

''आई, ते म्हणताहेत तर वापरून बघ ना. मला पसंत आहे''

''मलाही पसंत आहे आई... आय मीन् काकू''

''क्क्क्क्क्काय पसंत आहे दोघांना?''

''व्हाईटवॉश वॉशिंग पावडर!!''

ही जाहिरात पाहून मला हसू आलं. बघण्याच्या कार्यक्रमात वॉशिंग पावडरची जाहिरात? कमाल झाली. मला आठवलं मला लायब्ररीमध्ये जायचं आहे आणि मी टीव्ही बदं केला. मी लायब्ररीमध्ये पुस्तक वाचत असताना समोरील तरूणीनं (बहुतेक चुकूनंच!) माझ्या हातावर पेपरवेट ठेवलं. मी ओरडलो त्यामुळे लायब्ररीमध्ये उपस्थित असलेल्या लोकांनी मलाच ''श्श्श्श्श्श्श'' म्हटलं. त्याचबरोबर

त्या तरुणीनं आर्ततेनं, नम्र स्वरात ''आय ॲम सो सॉरी'' म्हटलं. काही दिवसांनी एका मॉलच्या एस्केलेटर वरून खाली येताना माझा तोल गेला आणि मी पडलो. ती तरुणी तिथंसुध्दा होती. गालातल्या गालात मला हसली. मी डोळे वटारल्यावर पुन्हा ''सॉरी, व्हेरी सॉरी'' म्हणाली. आणखी काही दिवसांनी मी त्या तरुणीला चक्क माझ्या ऑफिसमध्ये येताना पाहिलं. मागील राग आठवून तिच्याकडे पाहत मी दात-ओठ चावले. ती बॉसच्या कॅबिनमध्ये गेली. काही वेळानंतर बॉस तिला घेऊन बाहेर आले. बॉसनं ''लेडिज् अँड जेंटलमेन, अटेंशन प्लीज्'' म्हणून सगळ्यांचं लक्ष वेधलं. ''ही पूर्वा. माझी मुलगी. येत्या काही दिवसांत ही आपल्याला जॉईन करणार आहे. माझा विश्वास आहे - तुम्ही सगळे तिला सपोर्ट कराल. प्लीज् वेलकम हर!'' असं म्हणताच टाळ्यांचा गडगडाट... सॉरी कडकडाट झाला.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये मी उशीरा पोहोचलो. मी समोर दिसताच पूर्वानं स्मितहास्य देऊन ''हॅलो ऽऽ गुड मॉर्निंग'' म्हटलं. मला मात्र मान खाली घालून ''सॉरी'' म्हणावं लागलं. ''काय? व्हाय'' या तिच्या प्रश्नाला उत्तर म्हणून मी घड्याळ दाखवलं. ती हसली. ''तुम्ही मुद्दाम उशीरा नाही आलात ना? होतं असं कधीतरी. त्यामुळे नो सॉरी, नो प्रॉब्लेम'' अशा शब्दांत तिनं जणू माझं सांत्वन केलं. त्यानंतर प्रत्येक दिवशी ती मला दिसल्यावर स्मितहास्य देऊन ''हाय'', ''हॅलो'', ''गुड मॉर्निंग'', ''कसे आहात?'', ''काय म्हणताय?'' म्हणू लागली. ती ऑफिसमध्ये सगळ्यांबरोबर मिळून-मिसळून वागत असल्यामुळे सगळ्यांना (विशेषत: मला!) आवडू लागली. बॉसच्या गैरहजेरीत ती ऑफिस चांगल्या तऱ्हेने सांभाळू लागली.

एके दिवशी मी तिच्या कॅबिनकडे जात असताना ती पटकन बाहेर आली आणि तिच्या धक्क्याने माझ्या हातातील फाईल्स् खाली पडल्या. त्या उचलताना आमचा कपाळमोक्ष झाला! लहान मुलं करतात तसं मी तिच्या कपाळाला माझं कपाळ पुन्हा एकदा आपटलं आणि ''आता नाही येणार टेंगुळ'' म्हटलं. ती लाजली, हसली आणि कॅबिनमध्ये गेली.

आमच्या ऑफिसची एकदा ट्रीप निघाली. मी पुढील सीटवर आरामात बसलो. पूर्वा आली आणि सगळ्यांनी तिच्या स्वागतार्थ टाळ्या वाजवल्या. ती हसली. बस सुरु झाली. ड्रायव्हरनं बस वेगात चालवल्यावर पूर्वा माझ्या अंगावर पडली. मी मात्र त्याक्षणी तिच्या प्रेमात पडलो. मला त्या दिवसापासून स्वप्नात पूर्वा दिसू लागली. आरशात स्वत:ला पाहताना ती मला आरशात दिसण्याचा, हसण्याचा भास झाला. दारावर कुणीही बेल वाजवली तरी 'पूर्वा'नंच बेल वाजवली असं मला अनेकवेळी वाटलं.

''प्रेम म्हणजे काय... हे समजलं तुला भेटल्यावर
रोज दिसतेस तू मला स्वप्नात, आरशात, दारात
कारण प्रेम जडलं तुझ्यावर, पूर्वा प्रेम जडलं तुझ्यावर!''

चार दिवस पूर्वा ऑफिसला आली नाही तेव्हा मला बेचैन वाटू लागलं. कामात लक्ष लागत नव्हतं. ''काय झालं असेल?'', ''तिला बरं नाही की काय?'', ''फोन करून विचारावं का... पण फोन कुठे करणार? आपल्याकडे तिचा फोन नंबरच नाही'', ''तिच्या वडलांना अर्थात बॉसला विचारावं का?'', ''त्यांना असं विचारल्यावर काय वाटले ?'' अनेक प्रश्न मनात आले आणि ''वाटेल ते वाटेल, आपण जाऊन विचारावं'' म्हणून मी मनाशी ठरवलं. दोन-तीन वेळा बॉसच्या कॅबिनमध्ये मी डोकावून पाहिलं, पण ते प्रत्येकवेळी फोनवर होते. थोडं जास्त वेळ थांबून मी पुन्हा आत डोकावलं तेव्हा ते रागिणी मॅडमना डिक्टेशन देत होते. रागिणी मॅडम बाहेर येईपर्यंत थांबलो. मग चान्स मिळाला. मी आत गेलो. कामाचं बोलून झाल्यावर ''पूर्वा मॅडम आल्या नाहीत ऑफिसमध्ये गेले काही दिवस?'' म्हणून बॉसकडे चौकशी केली. ''हो हो....राजस्थानला गेली आहे मैत्रिणीच्या लग्नाला. येईल उद्या'' म्हणून माहिती मिळाली आणि मला आनंद झाला.

''बेकरार करके हमें यू ना जाईये, आपको हमारी कसम लौट आईये ऽऽ'' बीस साल बाद चित्रपटातील हे गाणं मी ऑफिसच्या दाराकडे पाहून (अर्थातंच पूर्वाच्या प्रतिक्षेत) गुणगुणत होतो... आणि काय आश्चर्य - पूर्वा तत्क्षणी ऑफिसमध्ये आली.

मोहक स्मितहास्य, उत्साही आणि प्रसन्न व्यक्तिमत्व घेऊन येणारी पूर्वा मला पाहताच ''गुड मॉर्निंग सर'' म्हणाली आणि मला जणू एक नवीन उर्जा मिळाली. आयुष्याचं सार्थक झालं असं वाटू लागलं. काही वेळानंतर पूर्वाच्या हातावरील मेहंदी मला दिसली. मेंहदी तिच्या हातावर उठून दिसत होती. वाडकर मॅडमनं तिला सहजंच तिला मेहंदीविषयी विचारलं.

''लग्न ठरलं आहे!'' पूर्वानं खुलासा केल्यावर मला धक्काच बसला.

''वा! अभिनंदन'' म्हणून हसतंच वाडकर मॅडम तिला म्हणाल्या. ''थँक यू, पण माझं नव्हे... माझी बहिण अपूर्वाचं ठरलं आहे. मैत्रिणीच्या लग्नाला गेले होते अपूर्वाबरोबर... लग्नात तिला तिचा जोडीदार भेटला आणि ठरलं!'' असं म्हणून पूर्वा गोड लाजली आणि माझा जीव भांड्यात पडला! पूर्वा सगळ्यांबरोबर मिळून-मिसळून होती. मी कंप्यूटरवर असताना तिनं मला एके दिवशी पाहिलं आणि ''तुमची मिशी पाहून मला अनिल कपूर ची आठवण येते'' म्हणून मला कॉप्लिमेंट दिली. मी तिच्या प्रेमात पडलो, पण तिचं माझ्यावर प्रेम आहे का? हे जाणणं महत्वाचं होतं. तिच्या मनात काय आहे हे कळणं आवश्यक होतं. ऑफिसमधील गोष्टींबाबत मी पूर्वाला अनेकदा मार्गदर्शन दिलं. अवांतर गप्पांतून मी पूर्वाच्या आवडी-निवडी विचारल्या. अनुभवी आणि जुना स्टाफ मेंबर असल्यामुळे पूर्वा मला 'सर' म्हणत असे.

एके दिवशी पँट्रीमध्ये मी तिला ''तुम्ही कॉफी घेत आहात तर मला सुध्दा कॉफी घ्यायला आवडेल... आणि हो, मला सर नका म्हणू, नावानं हाक मारली तरी चालेल'' म्हणून विनंती केली. ती हसली आणि ''ओके, काका'' म्हणाली. माझ्या काळजाचा ठोका चुकला. खूप दु:ख झालं. ''देवा ऽऽ हे काय झालं?'' म्हणून मी वर पाहून हात जोडले आणि देवानं मला तारलं. चहा घेऊन येणाऱ्या

जोशीकाकांना पूर्वानं ''काका, चहा नको, दोन कॉफी सांगा'' म्हणून सांगितलं होतं हे त्या नी कॉफी आणल्यावर माझ्या लक्षात आलं. 'ओके' माझ्यासाठी आणि 'काका' त्यांच्यासाठी होतं!

आमच्या ऑफिसचा दिवाळी अंक प्रकाशित झाला. दिवाळी अंकाचं संपादन आमच्या ऑफिसचे सी.ई.ओ. ''एस.एम.'' यांनी केलं होतं. मान्यवरांचे लेख, कथा, कविता, चारोळ्या, मुलाखत सदर, प्रवासवर्णनं अशा गोष्टींचा अंकात समावेश करुन त्यांनी अंक सजवला होता. दिवाळी अंकाचं मुखपृठ आकर्षक होतं... मुखपृष्ठावर पूर्वाचा फोटो होता! हातात हिरव्या बांगड्या, नव्या कोऱ्या निळ्या साडीनं नटलेली, प्रसन्न चेहऱ्यानं हातामध्ये पणती घेऊन दिवाळीचं स्वागत करणारी पूर्वा खरंच मनमोहिनी वाटत होती.

ऑफिस स्टाफनं तिचं, अंकाचं खूप कौतुक केलं, अनेक वाचकांचे ''दिवाळी अंक सुरेख, दर्जेदार आहे'', ''आकर्षक दिवाळी अंक'', ''मुखपृष्ठ तारका अप्रतिम!'' म्हणून फोन आले. पूर्वाचं अभिनंदन करुन मी तिला 'सौंदर्यवती' म्हणून संबोधलं आणि ती गोड लाजली.

एके दिवशी मी पूर्वाच्या टेबलावर गुपचूप एक चिट्ठी ठेवली. चिट्ठीमध्ये ''आज बागेत भेटणार का?'' म्हणून लिहिलं होतं. पूर्वा टेबलावर येण्यापूर्वी खिडकीतून वाऱ्यानं डोकावलं आणि चिट्ठी वाऱ्यानं उडून बाजूला बसलेल्या टायपिस्ट मुलीच्या हातात विसावली. मी डोक्याला हात लावला. टायपिस्ट मुलीनं चिट्ठी वाचून डोळे मोठ्ठे केले आणि तिचं माझ्याकडे लक्ष जाण्यापूर्वी मी ताबडतोब धूम ठोकली!

''हॅलो भूषण, अर्जंट ये माझ्या कॅबिनमध्ये'' बॉसनं हुकूम धाडला. मी आत गेलो. पूर्वा पाठमोरी उभी होती. बॉसनं माझ्याकडे रागानं पाहिलं. ''मला सगळं कळलंय? इतक्या वर्षांची ही परतफेड केलीस? पूर्वाबरोबर लग्न करणार... माझा जावई होणार... या कंपनीचा मालक होणार... तुझी ही हिंमत...? बघतोच तुला'' म्हणून बॉसनं हातातील फाईल माझ्या अंगावर फेकली आणि हातातील पिस्तुलातून बुलेट्स चालवल्या. मी रक्तबंबाळ... नव्हे नव्हे... घामाघूम होऊन उठलो. ते स्वप्न होतं!''

''बापरे, पूर्वाच्या वडलांना... अर्थात बॉसला हे कळलं तर? नोकरीवरून काढेल - शिवाय जीवे मारुन टाकेल'' माझी भीती शब्दांत व्यक्त झाली. भीतीपोटी मी त्यादिवशी ऑफिसला दांडी मारली.''

''हॅलो भूषण, कुठे आहात?'' दुपारी लंचटाईमच्या सुमारास पूर्वाचा मला त्याचदिवशी फोन आला. ''तब्येत बरी आहे ना? आज ऑफिसमध्ये दिसला नाहीत म्हणून फोन केला. आर यू ओके?'' पूर्वानं सहज चौकशी केली. मला खूप बरं वाटलं. मी तिला ''बरा आहे, बरा आहे. मरगळ जाणवत होती म्हणून आज येऊ शकलो नाही. उद्या येतो. भेटू'' म्हणताच पूर्वा ''ओके, टेक केअर'' म्हणाली आणि तिचा मंजुळ, गोड आवाज आठवत मला गाढ झोप लागली.

पूर्वावर माझं निवांत प्रेम - सॉरी - नितांत प्रेम होतं. तिचा गोड आवाज, हसरा चेहरा, बोका चेहरा - सॉरी सॉरी - बोलका चेहरा यामुळे ऑफिसमधील लोक तिच्याबरोबर प्रेमानं वागू लागले. दिवस कसे गेले कळलंच नाही. एवढंच काय, महिने आणि वर्ष कसं गेलं हेही कळलं नाही. थर्टी फर्स्टला ऑफिसमध्ये धमाल पार्टी झाली. खाण्याच्या वेगवेगळ्या डिशेस, गाण्याचा कार्यक्रम, नाना प्रकारचे मनोरंजक खेळ, विनोद, किस्से, गप्पागोटी यामुळे मजा आली. एक गंमतसुध्दा त्यादरम्यान घडली. माझा असिस्टंट अनुराग यानं स्टाफमधील अनुराधाला प्रपोझ केलं आणि तिनं चटकन 'होकार' दिला. मलाही उत्साह आला आणि मी पूर्वाकडे पाहिलं, तोंडातून काहीतरी म्हणण्याचा प्रयत्न केला पण दुसऱ्याच क्षणी मला तिचे वडील (आमचे बॉस) आणि त्यांच्या हातातील पिस्तुल, बुलेट्स यांची आठवण झाली आणि माझी दातखिळ बसली.

एके दिवशी मला बॉसनं काही कामासाठी आमच्या तुभ्र्याच्या गोडाऊनला जाण्यास सांगितलं. ''पूर्वा सुध्दा तुझ्यासोबत येईल'' म्हणून सांगितलं. मला आनंद झाला. प्रवासात पूर्वासोबत बऱ्याच गप्पा झाल्या. 'तिचंही माझ्यावर प्रेम आहे का?' हे जाणण्याचा माझा प्रयत्न होता. ''पुढे काय करायचं ठरवलं आहे... आय मीन् वडीलांचा बिझनेस सांभाळणं की दुसरं काही?'', ''ऑफिसमध्ये कसं वाटतंय?'', ''पुढील काही प्लॅन्स्?'', ''कुणी बॉयफ्रेंड आहे का?'', ''लग्नाबाबत काही विचार?'' अशा काही प्रश्नांतून मी तिच्याकडून उत्तरं काढली. ''बॉयफ्रेंड नाही, पण एकजण पसंत पडला आहे. त्यानं प्रोपोझ केलं तर नक्की लग्न करेन!'' असं ती म्हणाली. तो 'एकजण' कोण? विचारल्यावर ती लाजली आणि आमचं तुभ्र्याचं गोडाऊन आलं. तेथील स्टाफबरोबर पूर्वाची तोंडओळख मी करुन दिली आणि काम उरकून आम्ही निघालो. परतीच्या प्रवासात मी पुन्हा पूर्वाला ''तो 'एकजण' कोण?'' म्हणून विचारलं. ती ''तो...'' म्हणाली तेवढ्यात तिच्या वडीलांचा फोन आला. फोन संपला तेव्हा आमचं ऑफिस आलं. 'तो' कोण? असेल या विचारात रात्रभर मला झोप नव्हती. एक मन 'तो' मीच आहे असं म्हणालं, तर दुसऱ्या मनानं 'तो' मी नव्हेच म्हणून ठामपणे सांगितलं.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाऊन पूर्वाला सरळ त्याच्याविषयी विचारावं आणि 'त्या'चा सोक्षमोक्ष लावावा म्हणून मी ठरवलं. ऑफिसला गेलो, पण पूर्वा त्यादिवशी आली नाही. ती साईटला गेलेली आहे म्हणून कळलं. बॉसनं काहीवेळानंतर मला सुध्दा साईटला पाठवलं.

''आज विचारतोच'' - मी मनाला म्हटलं मला साईटवर पाहिल्यावर पूर्वाला आनंद झाला. तिनं मला बसण्याचा आग्रह केला. साईटवरील कामाबाबत पुढे काही सांगण्यापूर्वी मी डोळे बंद केले आणि पूर्वाचा हात धरला. तिला मी सगळं सांगितलं - माझ्या मनाची घालमेल, डोक्याचं झालेलं खोकं(!), हृदयाचे वाढलेले ठोके, रोज रात्री पडणारं तिचं स्वप्नं, ऑफिस... घर... गोडाऊन... साईट प्रत्येक ठिकाणी येणारा तिचाच विचार - सगळं... थोडा धीर आला आणि ''आय लव्ह यू'' म्हटलं! ती गोड लाजली आणि ''तो तूच आहेस'' म्हणाली.

***

मंदार आर्टस्

सर्वांग सुंदर गणेश मुर्ती व आर्टिकल्सचे उत्पादक

सुनिल कुंभार : 9423224147 विनिल कुंभार : 9422567430

सिद्धिविनायक आर्टस्



श्रीगणेश मुर्ती व आर्टिकल्स

मंदार सुनिल कुंभार

96 73 11 39 73, 78 75 116113



केदार आर्टस्

श्रीगणेश मुर्ती व आर्टिकल्स

केदार सुनिल कुंभार

7875116113, 9673 11 39 73

दत्तवाडी, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२

प्रेरणास्थान



राम रखमाजी शिर्के

मो. : 9822549376



कै. रखमाजी शिर्के



भूषण राम शिर्के

(D.C.E.)



राम वीट कारखाना

आमचेकडे चार व सहा इंची साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

❊ निवास ❊

मेदनकरवाडी, पो. चाकण, ता. खेड,

जि. पुणे-४१०५०१ मो.: ९७६३६९१९०७



अनिल मुरलीधर कुंभार

Mo. 9822596694



सुनिल मुरलीधर कुंभार

Mo. 9822919739



अभिजीत अनिल कुंभार

B.B.A.–MBA II

श्री साई कोल डेपो

राख व दगडी कोळसा ठोक व किरकोळ भावात मिळेल.

अभिजित विट कारखाना

ॐ साई मॉटर्स

स्वयंवर मंगल कार्यालयासमोर, चाकण, ता. खेड, जि. पुणे.

निवास : धावडे वस्ती, गणेशनगर, भोसरी, पुणे 9270303222

आमचेकडे जुने ट्रक, एल.पी. व टेम्पो गाड्यांचे व्यवहार खात्रीपूर्वक केले जातील

प्रेरणास्थान



बी. एम. धुमाळ



श्री. गणेश धुमाळ

जय गणेश मेडिकल

अँड जनरल स्टोअर्स केमिस्ट अँड ड्रगिस्ट

साई मेडिकल

गंगाई चेंबर्स, पहिला मजला, मेन रोड, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

प्रोप्रा. गणेश बबनराव धुमाळ

कुंटे कॉम्प्लेक्स, मारुती मंदिराजवळ, मेनरोड,

आकुर्डी, पुणे-३५. मो. 9011561919

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

लिबर्टी अथविअर आर्ट



खादी व ग्रामोद्योग आयोग(भारत सरकार) प्रमाणित
आदर्श ग्रामिण विकास महिला मंडळ, चिखली संचलित

सौ.वंदना हेमंत जोर्वेकर शासनाच्या नियमावलीनुसार शुभम हेमंत जोर्वेकर



पर्यावरणपूरक (इको फ्रेंडली)
शाडू व लाल मातीच्या आकर्षक गणेश मुर्ती
उत्पादक व होलसेल विक्रेते



8668506667

वैशिष्ट्ये

शाडू व लालमातीच्या इकोफ्रेंडली, आकर्षक व मनमोहक मुर्ती
प्रत्येक मॉडेल मध्ये विविध रंग संगती देशात व परदेशात वाहतूकीसाठी मजबूत मुर्ती
सात इंच ते आठरा इंच उंचीच्या मूर्ती

समाजबांधवांना कच्च्या मुर्ती विशेष सवलतीच्या दरात मिळतील.

कारखाना - सर्व्हे नं.५४/३, संगमनेर औद्यागिक वसाहत, संगमनेर, जि.अ.नगर
९२८४३४९६०९ पुणे ऑफिस ९८९००१३९०२



डॉ. सुधाकर तहाडे, डॉ. रेणुका तहाडे (एम.डी.)
चि. अक्षीत व चि. विराज

डॉ.बन्नाळीकर बाल रुग्णालय समोर, डॉक्टर लेन, नांदेड

साईदृष्टी नेत्रालय



कॉम्प्युटरद्वारे डोळे तपासणी
बिनाटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया(फेको) व लेझर सेंटर

डॉ. सुधाकर संभाजीराव तहाडे (चेनापूरकर)

M.B.B.S., D.O.M.S., D.N.B., M.C.P.S.

सर जे जे रुग्णालय, मुंबई, ऑक्युलोप्लास्टी सर्जन,
विशेष नेत्ररोग तज्ञ, मो. ९८५०९८३२९०. फोन (०२४६२) २४४४१४



उपलब्ध सुविधा

✲ दुर्बिणीद्वारे नेत्र तपासणी ✲कॉन्टॅक्ट लेन्स क्लिनीक ✲कॉम्प्युटरद्वारे ✲ डोळ्यांची तपासणी ✲ कृत्रिम भिंगारोपन ✲ बिनटाकयाची मोतीबिंदू शस्त्रक्रिया ✲ काचबिंदू तपासणी व उपचार व शस्त्रक्रिया ✲ तिरळेपणा तपासणी उपचार व शस्त्रक्रिया लासरु/नसारु तपासणी उपचार शस्त्रक्रिया ✲ डोळ्याचे अपघपात तपासाणी, उपचार व शस्त्रक्रिया ✲ नवजात बालकांची दृष्टिपटल (आरओपी) तपासणी ✲दृष्टीपटल तपासणी (मधुमेह, रक्तदा इत्यादी आजारत रेटीना तपासणी)

दवाखान्याची वेळ : सोम ते शनि स. १० ते दु. ४, सायं. ६ ते ८.३०
● रविवारी - सकाळी १० ते ३ पर्यंत ●

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

अक्षय डेंटल क्लीनिक



डॉ. प्रमोद आर. भोगावकर
M.D. (Bom.)
Gynaecologist, Obstetrician,
Lapersocopist & Sonologist
Mob.: 9970134557
9326615556



सौ. उमा भोगावकर
MAN



चि. डॉ. देवव्रत भोगावकर
MBBS M.D.
M.S.(General Surgery)



डॉ.गौरी देवव्रत भोगावकर
MBBS M.D.
Consulting Anaesthesiologist



कु.डॉ. मैथिली भोगावकर
B.D.S.
Mob.: 8007073062

अक्षय नर्सिंग होम

Hospital Registration No. : K.B.M.C./H.R./01/8/2007

अनुसया अपार्टमेंट प्लॉट नं ६, गांधी चौक, कुळगांव बदलापुर .पुर्व ४२१५०३

अमृत कलश, गांधीचौक, कुळगांव
बदलापुर (पूर्व) जि.ठाणे.
अमित कॉम्पलेक्स, यादवनगर,
शिरगांव, बदलापूर (पूर्व)
जि.ठाणे

Our Inspiration



Vishwanath Prajapati



Chandrakant Prajapati

Dhanapriya Auto Udyog

An ISO 9001 : 2000 company

Aluminium & Zinc Pressure Die Castings
& CNC Precision Job Works

Works : Gat No.798, Plot No.1, Pawar vasti,
Kudalwadi, Chikhali, Pune-412 114.
Mob : 9823511436, 9823761476
Email : prajapati.chandrakant29@gmail.com

।। साई कृपा ।। ।। श्री सद्गुरु कृपा ।।



सुनिल माधवराव
क्षिरसागर
मो.: ९८९००८२६८५
९८२२५८२६८५

साईकृपा विट सप्लायर्स

आमचेकडे बांधकामासाठी ६ इंची व ४ इंची
उत्तम विट योग्य दरात मिळतील.

गौरव ग्रेप्स

सद्गुरु कृपा निवास, शास्त्रीनगर, उंबरखेड रोड,
पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक



चि. गौरव सुनिल
क्षिरसागर

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

☎ (08338) 284412

09980835141
09901933726
09880602676

पांडुरंग कुंभार क्लिनिक

- लखवा तज्ञ
- सिध्द आणि आयुर्वेद

वेळ : सकाळी 8 ते सायंकाळी 5 (बुधवारी बंद)

पांडुरंग मंदिराजवळ, नागरमुनोळी, ता. चिक्कोडी, जि. बेळगांव.



Pradip S. Kolhe
DCE, B.Tech(Civil), M.B.A.(Contmgn)
M. 9890436432

प्रेरणा स्थान



डॉ.श्रीराम कोल्हे
सचिव श्री.संत गोरोबाकाका
समाजोन्नती बहुद्देशीय समिती



सौ.लता श्रीराम कोल्हे
अध्यक्ष बारा बलुतेदार
महासंघ अमरावती

Lata Shree

BUILDES AND DEVELOPERS

Civil Engg. and Consulting
Town Planner and N.A. Work Interior Designer

Home : 9/E, Ajinkya Colony. V.M.V. Road, Amt., Email : kolhepradip@gmail.com
Office : Matoshree Arcade, Bunglow City News Office, Jaystambha Amravati



बापूराव महादू गोरे
उपाध्यक्ष नाशिक जिल्हा विकास समिती
मा.सरपंच मळगाव(ती)
९९२३६७७७५५/९४२३२२४५९८



प्रकाश महादू गोरे
९९२३७६८५५५



शरद महादू गोरे
९९२३५७९४४४

सागर वीट सप्लायर्स

आमचेकडे उत्तम प्रतिच्या सर्व आकाराचे वीटा होलसेल भावात मिळतील

मु.पो.मळगाव,(ती) पोस्ट व ता. सटाणा, मातोश्री निवास जि.नाशिक 423301



डॉ. दिलीप शं.वाघोलीकर
एम. एस. (सर्जरी)

चिंतामणी हॉस्पिटल, सासवड

(100 Beded Multi Speciality Hospital)

आणि पुरंदर हॉस्पिटल

मु. पो. सासवड, ता. पुरंदर, जि.पुणे मो.: 9422351134

फोन : (निवास) - (02115) 222558

सुमंत सोनोग्राफी क्लिनिक

दामोदर सोसायटी, बिबवेवाडी, पुणे
वेळ : सायं. ६.०० ते ८.३०



डॉ. सुमंत दि. वाघोलीकर

- M.B.B.S., DMRE
- Fellowship in Obstetrics Ultra-sound Mediscan Chennai
- M.D. Radiology (USA IM)

चिंतामणी हॉस्पिटल, सासवड - वेळ : सकाळी १०.३० ते २.३०

पुरंदर हॉस्पिटल सासवड- वेळ : सायं. ४.३० ते ५.३०



मा.श्री. पांडुरंग गुणवंतराव कुंभार
मा. नगराध्यक्ष तथा नगरसेवक
न.प. कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9422655476



सौ. छाया पांडुरंग कुंभार
मा. नगरसेविका
न.प. कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9075200000



मा.श्री. हरिश्चंद्र गुणवंतराव कुंभार
पंचायत समिती सदस्य
कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9028056003



सौ. अनुराधा हरिश्चंद्र कुंभार
सरपंच, ग्रामपंचायत, डिसकळ,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद



ॲड.राहुल पांडुरंग कुंभार
B.S.L.,L.L.B.
Mob.: 8446555999
पुणे न्यायलयात कार्यरत

सुजाता मजुर सह. संस्था, सारोळा, ता. वाशी

शरद पवार विद्या मंदिर, कळंब

यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्या मंदिर, कळंब

निवास : चांदवाडी रोड, बाबा नगर, मु.पो.ता. कळंब, जि. उस्मानाबाद

प्रेरणास्थान



कै.मोरेश्वर चिंतामन आचोळकर





सुनिल मोरेश्वर आचोळकर
B.A., LLB
नगरसेवक
सदस्य,स्थायी समिती
सदस्य, प्रभाग समिती-G



सौ.नीता सुनिल आचोळकर



मिखील सुनिल आचोळकर
B.E.(IT)

मुख्य कार्यालय : विरार, विरार(पूर्व), ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५
दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/१०२/१०३/१०५/१०६ **फॅक्स :** ०२५०-२५२५१०७
निवास : मु.पो.कामण, हनुमान रोड, ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ २०८
वसई निवास : ७ साई सानिध्य, मधुबन बंगलो स्कीम, साई मंदिराजवळ,
भाबोळा, वसई (प), जि.पालघर-४०१२०२ फोन : **९३२२०६७०७७ / ९८९०२३८५०५**

आमचे प्रेरणा स्थान



कै. मारुतीराव तातोबा कुंभार (गुरूजी)

डॉ.शशिकांत मा. कुंभार
(एम.डी.मेडीसिन)

डॉ. सुर्यकांत मा. कुंभार
(बी.एच.एम.एस)



श्रेयस हॉस्पिटल
व अतिदक्षता विभाग (I.C.U.)

श्रेयस हॉस्पिटल, चांदणी चौक, मायणी फोन : (०२१६१)२७०२०१/२७०८७२

* क्रिटीकल केअर सेंटर * डायग्नॉस्टीक सेंटर * मल्टी स्पेशॉलिटी सेंटर

: उपलब्ध सोयी :

हृदय विकार चिकीत्सा
कॉम्प्युटराईज्ड इलेक्ट्रोकार्डीयोग्राम (E.C.G.)
सुसज्ज व पेशंट फ्रेन्डली आंतररूग्ण विभाग
अत्याधुनिक मल्टिपॅरा मॉनीटर्स सेंट्रल मॉनीटरिंग सिस्टीम
व्हेंटिलेटर्स - कृत्रिम श्वासोश्वास, डिफीब्रीलेटर, एक्सटर्नल पेसमेकर
फुफ्फूस विकार चिकीत्सा - पल्मोनरी फंक्शन टेस्ट (P.F.T.)
हृदय विकार, मधुमेह, लकवा, मुत्रविकार, पोटाचे विकार, दमा, क्षयरोग, चिकीत्सा व उपचार
सुसज्ज लॉबोरेटरी ॲटो ॲनालाझर ॲण्ड कॉम्प्यु. सेल काऊंट
होमियोपथी कन्सल्टींग व ॲक्युपंक्चर उपचार
सुसज्ज ऑपरेशन थिएटर व सर्जिकल विभाग
२ डी - इको ॲण्ड कलर डॉप्लर

२४ तास तातडीची सेवा उपलब्ध


रिसेप्शन व अंतरंग विभाग


कारडीयाक मॉनिटर


व्हेंटिलेटर


अतिदक्षता विभाग


सुसज्ज लॅबोरेटरी


डिफिब्रिलेटर व एक्सटर्नल पेसमेकर


मेडिकल स्टोअर्स

मे.शुभम मेडिकल्स अॅण्ड जनरल स्टोअर्स

देशी व विदेशी औषधे मिळण्याचे एकमेव ठिकाण.

: प्रोप्रा :
सौ. ऊर्मिला कुंभार

श्रेयस हॉस्पिटल, चांदणी चौक, मायणी,
ता. खटाव, जि. सातारा,फोन : (०२१६१) २७०६४७








सुधाकर पुं. सोनवणे
9423933450


चिंतामण पुं. सोनवणे
9850464275

प्रोप्रा. सोमनाथ पुंजाराम सोनवणे
अध्यक्ष : नाशिक जिल्हा विकास समिती
अध्यक्ष : अभोणा शहर राष्ट्रवादी काँग्रेस
सचिव : कुंभार समाज कळवण तालुका
संचालक : अभोणा वाचनालय
मो.: 7741894986
9422763816

सप्तश्रृंगी वीट आणि बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स
सप्तश्रृंगी दुध डेअरी

मु.पो.अभोणा, ता. कळवण, जि.नाशिक

आमचे प्रेरणास्थान



कै. सुर्यकांत नारायण राजे

आमचेकडे उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या वीटा होलसेल भावात मिळतील.

पत्ता : मु.पो. हरपळवाडी (पाल),
इमरसन कंपनी शेजारी,
निसराळे-तारळे रोड,
ता. कराड, जि. सातारा

नर्मदा वीट उत्पादक







सचिन सुर्यकांत राजे
मो.: 9822636008

संदिप सुर्यकांत राजे
मो.: 9922639339

नर्मदा गणेश आर्टस्

आमचेकडे होलसेल भावामध्ये कच्च्या व पक्क्या सुबक गणेश मुर्ती मिळतील.
(सार्वजनिक मंडळांसाठी खास सवलत)

पत्ता : बी.एस.एन.एल. ऑफिसच्या पुढे,एन.एच.४, मु.पो.नागठाणे, ता.जि.सातारा
निवास : नर्मदा निवास, मु.पो.नागठाणे, सासपडे रोड, ता.जि.सातारा ४१५ ५१९

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


Sou. Shivkumari H. Prajapati


Hariram R. Prajapati
C.E.O.


Vikas H. Prajapati
B.E. Mech., MBA E&FB

S. K. INDUSTRIES

(An ISO 9001: 2008 Company)

Since 1986

SKI

Manufacturers of
Industrial Fastness for Electronics and Auto Industries

Office : Plot No. RM 43, 1st Floor, M.I.D.C. Residance Zone, Dombivli (E) 421203.
Tel.: (0251) 2456368 Fax : 2449041 **Email :** skindus@email.com
Works : W 233/B, W233/233/1 M.I.D.C. Phase II, Dombivli(E) 421 203 Tel.: (251) 2870595 Cell : 9820291248

गजानन हार्डवेअर स्टोअर्स



शिवाजी निवृत्ती कुंभार

मा.चेअरमन, गजानन ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्यादित, पाटण
मो. 9881036296


स्वप्नील शिवाजी कुंभार
9763015296


चि.संकेत शिवाजी कुंभार
बॅचलर इन फाईन आर्टस

* अधिकृत विक्रते *
एशियन कलर वर्ल्ड, नेरोलॅक, बर्जर, प्रिया पेन्टस्
व सर्व हार्डवेअर ठोक व किरकोळ विक्रेते
जुना एस.टी. स्टँड, पाटण, जि. सातारा. फोन : 02372-283096

|| श्री स्वामी समर्थ बाल रुग्णालय ||

आमचे प्रेरणास्थान






डॉ. मयुर जोर्वेकर

एम.डी.(बालरोग) USAIM डी.सी.एच. PGDHHM, PGDMLS (PUNE), FCPS एफ.सी.पी.एस.(मुंबई) बालरोग व नवजात शिशु तज्ञ
मानद तज्ञ, कोपरगांव चाईल्ड केअर इन्स्टिट्युट

डॉ. सौ. गौरी जोर्वेकर

बी.एच.एम.एस.(पुणे), सी.सी.एच.,सी.जी.ओ.
होमिओपॅथी कन्सल्टंट ॲण्ड
फॅमिली फिजीशीयन


श्री. शंकरराव जोर्वेकर


सौ. नलिनी शं. जोर्वेकर


कै. योगीराज गायकवाड


मंदाकीनी यो. गायकवाड

HDFC बँकेसमोर, कासलीवाल कंपाऊड,
खंदक नाल्याजवळ, मेन रोड, कोपरगांव
फोन :(02423) 226232 मोबा : 9604696809

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

Leading in Mechanical Engg. works.....with non-stop fast service.....since 2000 sucessfully

॥ श्री सिध्दनाथाय नमः ॥



Vilas Dengale
M.B.A.
Managing Director

Supporting Smart People

SIDDHIVINAYAK ENTERPRISES

All kind of industrial Hardware, Electronics,
Electricals & General Supplier
(As per IS, ISO, DIN, ASTM, BS, IBR Standard)

- Manufacturer : Engg. Project / Components (With Materials / As Per Drg., **Tailer Made Items) MSME Registered**
- Stockist & Suppliers : Nut / Bolts, Tool, Pipe- Fitting , Flanges, Gaskets, Pressure Gauges, Safety Products & General Items.
- Supported Items For : Level, Flow, Temperature, Pressure, Process, Management, Automation Instruments.
- Third Party Inspection : EIL, RITES, LLOYD'S, BVQI, Intertek, Toyo, PDIL etc.
- Reputed Clients : Cummins Inc (Jamshedpur, Kothrud, Phaltan, Pirangut) EMERSUN, Endress + Hausar, Vega India, Yokogawa India (MNC's), HEMRL Defence Dept. Govt of India, More than 60 companies interact.
- Business Partners : In State + Inter State + Global Level

Cell : +91 9822194124 (Vilas) ✻ 9922194111 (Lata) ✻ 9822194123 (Harshal) ✻ 7588232788 (Manasi) ✻ 020-25478453 (Landline)
Sister Concern : Moving Forward..... SKYLARK Tradelink, Pune
Email: vilas_dengale@rediffmail.com / vilasdengale@gmail.com
visit us at www.siddhivinayakindia.in
Pune - 411052 INDIA Follow us on



प्रोप्रा.संजय तुकाराम गोरे
9822601958



सौ.संगीता संजय गोरे



चि.ओंकार संजय गोरे
B.Com
8554058303

जय तुळजा भवानी वीट कारखाना

आमच्याकडे सर्व प्रकारच्या सर्व साईजच्या वीटा होलसेल भावात मिळतील

पत्ता : निळकंठ नगर भाग २, श्रीपाद समर्थ बंगला,हरीपूर रोड, मु.पो.हरीपूर, ता.जि.सांगली



नामदेव रामदास मोरे
९८२२२०१९८३
गव्हर्मेंट कॉंट्रॅक्टर
PWD Pune



सौ. छाया नामदेव मोरे



मोरेश्वर कन्स्ट्रक्शन



देवेन नामदेव मोरे
M.E.(Civil)
Jr. Engg.(PWD)Pune



कु. श्वेता नामदेव मोरे
B.E., E&TC

रोड आणि बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर ✻ हॉट मिक्स प्लांट

रोड रोलर, जे.सी.बी. आणि सेन्सर पेव्हर भाड्याने मिळेल.

ऑफीस : ओम अनंत, विशालनगर, जगताप डेअरी, औंध वाकड रोड, पुणे-४११ ०२७.

E-mail : moreshwarcont@gmail.com

#masalā

VEG | NON-VEG

Shop No 1, Laigude Properties, Near Lokmat Press,
Wadgaon Khurd, Sinhgad Road, Pune 411041

TUSHAR PARINCHEKAR
+91 9890 927 430

Associated With | RUBIK HOPITALITY PVT.LTD. | Parinchekar DEVELOPERS





आमचे प्रेरणास्थान



कै. वासुदेवसेठ कोंडीबा
कुंभार (खेडकर)



सिध्दीविनायक ब्रिक्स

उत्तम प्रतीचे विट उत्पादक



प्रोप्रा.
महेंद्र वासुदेव कुंभार
मोबा. : 7875447531



सौ. कावेरी महेंद्र कुंभार
अध्यक्ष, महिला आघाडी,
खेड तालुका

मु. पो. राजगुरुनगर, कुंभारआळी, ता. खेड,
जि. पुणे 410505 मो. 9850548090

आमचे प्रेरणास्थान



श्री. नामदेव भिकाजी रोकडे

श्री गणेश विट उत्पादक

RR रोकडे विट उत्पादक व सप्लायर्स

मु.पो. मुखेड, ता. येवला, जि. नाशिक



सौ. कलावती नामदेव रोकडे



राजेंद्र नामदेव रोकडे
मो.: 9860237917
अध्यक्ष, येवला तालुका कुंभार समाज संघटना
अध्यक्ष, येवला तालुका ओ.बी.सी सेवा संघ
संचालक, महात्मा फुले पतसंस्था

उत्कृष्ट प्रतीच्या
विटांचे उत्पादक



विजय नामदेव रोकडे
मो.: 9822427352
M.Sc.(Organic Chemistry)
सिनियर सायंटीस्ट इनोव्हासिंथ
टेक्नो लि., खोपोली



ईश्वर राजेंद्र रोकडे
B.Sc.
Mob. : 8007720380



चि. राहूल राजेंद्र रोकडे
B.Com
Mob. : 9545917007

मंजुळा

संगीता देवकर

मंजूची मातृत्वाची आस बघता त्यापुढे नीती-अनीती काहीच मायने नाही ठरत. तो एक क्षण आला आणि मंजू आणि सुदेश दोघेही वाहवत गेले पण त्या क्षणाने मंजूला मातृत्व बहाल केले.



एक आटपाट नगर होत शिवापूर नावाचं. निसर्गाच्या कुशीत वसलेले, हिरवाईने नटलेले समृद्ध गाव. या गावात लग्न करुन आलेली होती मंजुळा! सावळी, नाके डोळी रेखीव, वय अवघे एकोणीस एकदम हसतमुख. आठवीपर्यंत शिकलेली, राम्या सोबत लग्न झालं होतं तिच. राम्या लोकांच्या शेतात ऊस तोड, कापणी अशी रोजंदारी वर काम करत होता. मंजू, सगळे तिला मंजूच बोलायचे. मंजू चार घरी कपडे भांडीचे काम करुन संसाराला हातभार लावत होती. घरात सासू आणि ही दोघे असे राहत होती. सगळं नीट नेटके सुरु होते पण एकच खंत होती, मंजूच्या लग्नाला आता तीन वर्ष होत आली तरी तिला दिवस जात नव्हते. या वरुन सासू तिला सारखं बोलायची. ''तुला दिस नाय जात तर राम्याच दुसरं लगीन करते'' अस बोलत राहायची.

नेहमीप्रमाणे कुंदाताई कडे मंजू कामाला आली. आज ही सकाळी सकाळी सासू तिला मुल होत नाही म्हणून बडबडत होती. त्यामुळे

मंजू जरा गपगपच होती. ''काय गं मंजू आज खूपच शांत दिसतेस बोलणं नाही बडबड नाही काय झाले?'' कुंदाने विचारले.

''ताई माझ्या लग्नाला तीन वर्ष होतील पर अजून मला दिवस नाही गेले म्हणून सासू सारख माज्या नवऱ्याचे दुसरं लग्न करते अस बोलत असते.''

मंजू मग तू कुठल्या डॉक्टरकडे का नाही गेलीस आज पर्यंत? कुंदा.

मला वाटलं होईल वर्ष दोन वर्षांनी पण नाहीच अजून काही... मंजू

ताई मी तुमच्या हॉस्पिटलात येऊ काय? तुम्ही माझी तपासणी करा.. मंजू म्हणाली.

हो तू ये माझ्याकडे मी करते चेक तुला... कुंदा गावातल्या सरकारी दवाखान्यात डॉक्टर म्हणून काम करत होती. बदलीवर इथे आली होती. उद्याच ये सकाळी अकरा वाजता, नाहीतर अस कर बाकीची काम लवकर आटपून ये इथे, माझं काम झालं की माझ्या सोबतच चल. कुंदा हो ताई तसच करते. सासूला काही नाही सांगत पण नवऱ्याला सांगून येते. मंजू बोलली.

ठरल्याप्रमाणे मंजू काम आवरुन कुंदाकडे आली तिच्या घरचे काम उरकून दोघी हॉस्पिटलमध्ये आल्या. कुंदाने मंजूचे चेकिंग केले. मासिक पाळी सुद्धा तिची व्यविस्थत होती. सोनोग्राफी करुन सगळी तपासणी केली. बावीस वर्षांची मंजुळा अगदी धडधाकट होती. तिच्यात कोणता ही प्रॉब्लेम नव्हता. मग तिला का दिवस जात नव्हते? याचा अर्थ तिच्या नवऱ्यात काही दोष नक्की असणार. असा विचार डॉ. कुंदा करत होती.

ताई काही अडचण आहे का? मला का नाही दिवस जात? मंजू ने विचारले.

मंजू हे बघ तुझी सगळी तपासणी मी केली पण तुझ्यात काहीच दोष नाही..

मग ताई दिवस का जात नाहीत मला. यंदा लग्नाला तीन वर्ष पूर्ण होतील.

मंजू मला वाटत तुझ्या नवऱ्यातच काही दोष असणार म्हणून तुला दिवस जात नाहीत.

पण ताई माझा नवरा हॉस्पिटलात चेकिंगला नाही जायचा, तो बापय माणूस त्याला हे सहन पण नाही व्हायचा.

हो मंजू त्यात इथे गावात अस पुरुष कोणी स्वतःकडे दोष आहे हे मान्य पण नाही करणार. आणि ही गोष्ट त्याला सांगणं म्हणजे आगीत तेल ओतल्या सारख असणार.

ताई मग यावर उपाय काय? मंजूने काळजीयुक्त स्वरात विचारले.

मंजू तुझा नवरा काही स्वतःची तपासणी नाही करुन घेणार आणि असेल काही दोष तर ट्रीटमेंट ही नाही करुन घेणार कारण त्याचा पुरुषी अहंकार त्याला तस करुन नाही देणार. आजही जग इतकं सुधारलेले आहे पण मुल होत नाही हा सर्वस्वी बाईचाच दोष अस मानलं जातं. जी बाई मूल जन्माला घालू शकत नाही ती बायको म्हणून ही नालायक ठरते.

ताई मग मी काय करायचे आता. मंजू

काही नाही मंजू तू फक्त वाट बघायची आणि प्रार्थना करायची जर त्या देवालाच तुझी दया आली तर तुला मुल होईल ते ही तुझ्या नवऱ्यात काही दोष नसेल तर.. कुंदा म्हणाली.

मंजू मग घरी आली. खरच राम्यामध्ये काही दोष असेल का? पण त्याला कस सांगू की तू तुझी तपासणी करुन घे म्हणून. सासूला हे समजलं तर आकांडतांडव करेल ती आणि मला घराबाहेर हाकलून देईल. ताई बोलल्या तसे मुल झालं नाही तर सगळा दोष बाईचाच असतो का? तिला आठवले तिच्या माहेरी राहणारी पार्वती तिला पण मुलबाळ झाले नाही म्हणून तिला हाकलून दिले आणि तिच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले पण तरी त्याला अजून मुल नाही झाले मग यात त्या पार्वतीचा दोष नव्हताच तसे नसते तर तिच्या सवतीला मुल झालीच असती की म्हणजे त्याच्यातच दोष होता पण हे लोकांना कोण सांगणार? जिथं तिथं सगळ्या गोष्टीला बाईलाच जबाबदार धरले जाते. मंजू विचार करत राहिली.

संध्याकाळी राम्या घरी आला. मंजू मंजू आवाज देतच घरात आला. ''काय वो कशाला, आवाज देता?''

मंजू अगं ते गावातल गेस्ट हाऊस हाय नव्ह, तर तिथे एक सायेब आलेत आज. गावात धरणाचं काम सुरु हाय त्यासाठी आलेत ते.

मग त्याच काय? मंजू ने विचारले.

त्यास नी स्वयंपाक कराया, झाडलोट कराया बाई पायजे हाय तर तू जा तिथं कामाला चार पैक जरा जास्त मिळतील. राम्या बर बर सकाळी जाती म्हणत मंजू राम्यासाठी चहा ठेवायला गेली.

रात्रभर ती डॉक्टर कुंदाच बोलणं आठवत राहिली. राम्यात दोष असलं तर मला कस दिवस जातील? माझ्या निशबात आई होणं हाये की नाही देवा अस मनात बोलत ती झोपी गेली. सकाळी लवकर उठून घरच काम आवरुन ती गावातल्या गेस्ट हाऊसकडे निघाली. या गेस्ट हाऊस वर सरकारी कामासाठी कोण ना कोण सारख येत असतं. एक दोन दिवस राहून जात असत. गेस्ट हाऊस एक मोठा बंगला होता. बंगल्याला टेरेस ही होता. बंगल्याबाहेर मोठं आंगण त्यात भरपूर झाडी वेली लावल्या होत्या. बंगल्याला एक लोखंडी मोठे गेट ही होते. गेट उघडून मंजू आत गेली. मेन दरवाजा बंद होता. तिने बेल वाजवली. ''दार उघडे आहे आत या''. असा आतून आवाज आला मग मंजू दार ढकलून आत आली समोरच हॉल होता. एक गोरा तरुण मुलगा फक्त शॉटर्स घालून व्यायाम करत होता. त्याची बलदंड छाती, व्यायामाने पिळदार झालेले बायसेप्स आणि घामाच्या दविबंदूने चमचमणारे त्याचे रुप मंजू त्याला बघतच राहिली. तिला बघून सुदेश

उठून उभा राहिला जवळचा टॉवेल घेऊन गळ्यात टाकला, तुम्ही कोण?

मी मंजू ते तुम्हाला कामासाठी बाई पाहिजे होती म्हणून मी आले..

हा, तुम्हांला दोन वेळचा स्वयंपाक आणि कपडे भांडी करावे लागेल.

हो चालेल करेन मी. मंजू बोलली.

मी सुदेश, मी इंजिनियर आहे आणि इथे धरणाच्या कामासाठी आलो आहे. काम संपले की मी ही परत जाणार. इथे आहे तोपर्यंत तुम्ही या कामाला.

हो येईन. आज पासूनच करु का काम? मंजू ने विचारले.

हो चालेल. किचनमध्ये बघा काय काय सामान आहे? काय अजून हवे असेल तर घेऊन येतो मी. आता मला दूध द्या गरम करुन, फ्रीज मध्ये आहे दूध. सुदेश म्हणाला. ठीक आहे साहेब पण तुम्ही मला अहो जावो नका बोलू. माझं नाव मंजू आहे.

बर मंजू, मला दूध देऊन घर झाडून घे.

साहेब मी सगळं काम करते तुम्ही फक्त बघा. हसत बोलत मंजू किचनकडे गेली.

सुदेश पुन्हा व्यायाम करु लागला. किचन मधून हॉल दिसत होता. मंजू दूध तापवत, चोरुन सुदेशकडे बघत होती. कुठे आपला नवरा किरकोळ राम्या आणि हे साहेब कसले भारी दिसतात अशी तिच्या मनात तुलना चालू होती. दूध गरम करुन एका ग्लास मध्ये घेऊन मंजू बाहेर आली. सुदेशचा व्यायाम संपला होता. सोफ्यावर बसत त्याने ग्लास घेतला. एक घोट घेतला, मंजू इतकी साखर नाही टाकायची दुधात, उद्यापासून लक्षात ठेव किंवा साखर नाही टाकली तरी चालेल.

बर साहेब पण बिना साखरेच दूध कस पिणार तुम्ही? मंजूने भाबडेपणाने विचारले.

आपलं शरीर चांगले ठेवायचे असेल तर साखर कमी खायची आणि रोज व्यायाम ही करायचा असतो. सुदेश म्हणाला.

तरीच साहेब असे हिरो सारखे दिसतात. मंजू मनातच बोलली. आणि स्वयंपाक करायला निघून गेली. तिने आधी सर्व घर स्वच्छ झाडून घेतले मग फरशी पुसून घेतली. मग किचनमध्ये येऊन स्वतःचे हात स्वच्छ करुन मग स्वयंपाकाला लागली. सुदेश हॉल मध्ये पेपर वाचत बसला होता. पण मंजुकडे ही लक्ष देऊन होता. सगळी काम ती पटपट आणि स्वच्छ करत होती. साहेब कोणती भाजी करु? मंजू किचनच्या दारातून बोलली.

हे बघ मंजू तुला जे आवडेल ते बनवत जा. माझी काही ही अडचण नाही.

बरं म्हणत मंजू कामाला लागली. स्वयंपाक झाला तसा तिने सुदेशला आवाज दिला. त्याला ताट वाढून दिले. मंजू तू ही इथे जेवलीस तरी चालेल मला. सुदेश म्हणाला.

नको साहेब अजून एक दोन काम आहेत माझी ती करुन मग मी घरी जाते.

कोण कोण असते घरी तुझ्या? माझा नवरा आणि सासु.. मंजू तुझं लग्न झाले आहे? तुझ्या कडे बघून तर वाटत नाही लहान दिसतेस तू मंजू.

हो साहेब एकोणीस वर्षाची होते तेव्हाच लगीन झाले. आता तीन वर्षे होतील लग्नाला.

मंजू तू एक किल्ली तुझ्याकडे ठेव आणि संध्याकाळी येऊन स्वयंपाक करुन जा. मला यायला उशीर होतो.

ठीक आहे साहेब. मंजू स्वयंपाक खूप छान झाला आहे. तुज्या हाताला चव आहे. मंजू हसली. साहेब इथे विहीरीच पाणी आणि ताजा भाजीपाला म्हणून स्वयंपाक चांगला होतो.

तू छान बोलतेस मंजू किती शिक्षण झाले तुझे? सुदेशने विचारले.

फकस्त आठवी शिकले मग पुढे नाही शिकू दिले घरच्यानी आणि लगीच लग्नपण लावून दिले. मंजू बोलली.

सुदेशचे जेवण झाले मंजूने त्याचे ताट उचलून सिंकमध्ये ठेवले. सुदेश आवरुन बाहेर आला, मंजू तू कपडे आणि भांडी करुन दाराला कुलूप लावून जा.

हो साहेब तुम्ही नका काळजी करु मी व्यविस्थत घर बंद करुन जाते. सुदेशने टी शर्ट आणि जीन्स घातली होती. तो आता सॉक्स घालत सोफ्यावर बसला होता. एकदम रुबाबदार दिसत होता. त्याच्या टी शर्ट मधून त्याचे पिळदार दंड मंजूच लक्ष विचलित करत होते. गावात अस कोणी इतकं छान, रुबाबदार राहत नव्हते त्यामुळेच सुदेशकडे मंजू भारावल्या सारखी बघत उभी होती. तिला तशी बघून सुदेशने विचारले, काही काम आहे का मंजू?

नाही नाही तुम्हाला काही हवंय का म्हणून थांबली आहे.

मला काही नको, तू आतून दरवाजा लावून घे आणि काम झाले की जा. सुदेश बाहेर पडला.

मंजू मग बराच वेळ तशीच भारावलेल्या अवस्थेत बसून राहिली. राहिलेल काम आवरुन ती डॉक्टर कुंदाकडे आली.

आता रोजच मंजू लवकर उठून आवरुन सुदेशकडे जात होती. तो रोज सकाळी व्यायाम करत असे. मंजू त्याच्यासाठी दूध गरम करायला ठेवून सुदेशकडे चोरुन चोरुन बघत असायची. सुदेश होताच तसा कोणा वर ही त्याच्या व्यक्तीमत्वाची लगेच छाप पडत असे तस काहीसं मंजूच झालं होतं. मंजू अगदी स्वतःच घर समजून सगळं काम नीटनेटकेपणाने करत होती. अधूनमधून सुदेश तिला आपल्या सोबत नाष्टा करायला बसवत असे. सुरुवातीला मंजूला अवघडल्यासारखे वाटायचे पण नंतर नंतर ती ही मोकळेपणाने त्याच्या सोबत नाश्ता तर कधी जेवण करु लागली. सुदेश त्याच्या कामात पूर्णपणे मग्न असायचा.

धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करायचे होते. काम संपायला किमान तीन चार महिने लागणार होते.

मंजू सोबत तो मनमोकळेपणाने वागत होता पण त्याच्या वागण्या बोलण्यात ही एक मर्यादा होती. मंजूला समजले होते की सुदेश एक सालस आणि माणुसकी जपणारा माणूस होता. त्याच्या वागण्यात खोटेपणा किंवा इतर पुरुषांसारखा लालचीपणा नव्हता. कुठेतरी मंजूला सुदेश बद्दल आकषर्ण वाटू लागले होते पण ती ही तिच्या मर्यादा जाणून होती.

असेच एक महिना निघून गेला. मंजू सुदेशकडे अगदी घरच्या सारखे काम करत होती. सकाळी ती नेहमी प्रमाणे आली. पण आज रोजच्या सारखा सुदेश व्यायाम करताना तिला नाही दिसला म्हणून ती त्याला आवाज देत बेडरुमकडे आली तर सुदेश अजून बेडवरच पडून होता. ''साहेब काय झालं तुम्हाला? बरं वाटत नाही का? म्हणत मंजू त्याच्याजवळ आली. ''काही नाही मंजू जरा डोकं दुखत आहे.'' सुदेश म्हणाला. थांबा मी बाम लावून डोकं चेपून देते म्हणत मंजू बेडवर त्याच्या बाजूला बसली. आणि त्याच डोकं चेपून देऊ लागली, तर त्याच डोकं तिला गरम लागले. ''साहेब तुम्हाला तर ताप आहे, तुम्ही काही औषध घेतलं का?''

नाही आता अचानक डोकं दुखायला लागले.

थांबा मी आलेच म्हणत मंजू किचनकडे गेली आणि मिठाचे पाणी घेऊन आली. त्याच्या जवळ बसत तिने गार मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या त्याच्या डोक्यावर ठेवल्या. जवळजवळ दहा पंधरा मिनिटे ती पट्ट्या ठेवत होती. मग ती त्याच्या कपाळाला बाम लावून डोकं चेपू लागली. त्याच्या राकट स्पर्शाने तिच्या अंगावर शहारा फुलत होता. त्याचा हा स्पर्श मनात साठवून घ्यावा अस तिला वाटत होते. ती अगदी प्रेमाने सुदेशच डोकं चेपत राहिली. तो डोळे बंद करुन झोपला होता. त्याला झोप लागून गेली तसे मंजू तिथून उठली आणि काम करु लागली. त्याला काहीतरी नाश्ता बनवून खायला घालून मग जावे अस तिने ठरवले. थोड्या वेळाने सुदेश उठला त्याला आता थोडं बर वाटत होते. मंजूने त्याच्यासाठी गोड शिरा बनवला होता तो बळे बळे त्याला खायला दिला. मग त्याच्याकडे असणारी तापावरची गोळी त्याने घेतली. ''साहेब आज कामावर जाऊ नका. ताप आहे तुम्हाला..'' मंजू म्हणाली.

हो आज सुट्टी घेईन तू स्वयंपाक काही जास्त बनवू नको मला खायला नाही जाणार.. सुदेश म्हणाला.

डाळ भाताची खिचडी बनवते तेवढ खा आणि आराम करा. मी संध्याकाळी येईन. मंजू मग काम आवरुन निघून गेली. किती साधी आणि सरळ मनाची आहे ही मंजू.. असं सुदेशच्या मनात येऊन गेले. संध्याकाळी मंजू परत कामावर आली. ''साहेब ताप कमी झाला का? हो मंजू आता एकदम फ्रेश वाटत आहे. मी आलं टाकून मस्त चहा बनवून आणते म्हणत मंजू किचनकडे गेली. ती चहा घेऊन आली सुदेशने तिला ही आपल्या सोबत चहा घ्यायला लावला. ''मंजू, आता ही जेवणात फक्त डाळ भात बनव मला जास्त भूक नाही.'' सुदेश म्हणाला.

मंजू मग रात्रीचा स्वयंपाक बनवून निघून गेली.

सकाळी पुन्हा कामावर आली. आज सुदेशला पूर्ण बरे वाटत होते. तो त्याच आवरत होता आणि मंजू तीच काम करत होती. कपडे धुवून ती सुकायला टेरेसवर टाकत असे तसे ती टेरेसवर गेली कपडे टाकून खाली येत होती. टेरेसकडे जायला जिना हॉल मधूनच होता. जिन्यावरुन येताना ओल्या पायामुळे एक पायरी चुकली आणि मंजूचा पाय घसरला सरळ दोन चार पायऱ्या ती खाली घसरत पडली. आई गं !!! म्हणत तिथंच पाय धरुन बसली. तिच्या आवाजाने बेडरुम मध्ये आवरत असलेला सुदेश बाहेर आला त्याने पाहिले मंजू पायरी वर बसून होती आणि बादली खाली आली होती.

''मंजू अगं कशी काय पडली तू, जरा सांभाळून काम करत जा.'' सुदेश बोलला. मंजू उठून उभी राहिली पण पायात जोरात कळ आली, तिचा पाय मुरगळला होता.

''थांब, म्हणत सुदेश मंजूजवळ आला आणि तिच्या हाताला धरुन हळूहळू तिला खाली घेऊन आला सोफ्यावर तिला बसवले. पाय खूप दुखत होता. मंजू बस इथे. सुदेश पायाला लावायला एक क्रिम घेऊन आला. मंजू पाय इकडे कर, साहेब राहू दे मी लावते द्या इकड मंजू म्हणाली. असू दे मी लावतो सुदेश म्हणाला. मंजूच्या घोट्या जवळ लचक भरली होती. सुदेशने हातावर क्रिम घेतली तसे मंजूने आपली साडी जरा वर घेतली. सुदेश हळुवारपणे तिच्या नाजूक पायाला क्रिम लावत होता. त्याच्या हाताचा थंड स्पर्श तिला तिची वेदना विसरायला भाग पाडत होता. त्याचे तिच्या चेहऱ्यावर येणारे उष्ण श्वास तिचा संयम ढळू लागला होता. सुदेश हळुवार दाब देत तिचा पाय चेपत होता. त्याचा स्पर्श तिला मोहरुन टाकत होता. तिने त्याच्या नजरेत बघितले तसे त्याने ही पाहिले. तिच्या नजरेत एक आव्हान होते. तिची नजर मादक झाली होती. तो ही काही सेकंद तिच्या नजरेत हरवून गेला. अधीरतेने तिने त्याच्या ओठांवर आपले ओठ टेकवले. सुदेशने ही मग तिचे ओठ आपल्या ताब्यात घेतले आणि तिला किस करु लागला. मंजू आता बेभान झाली होती. सुदेशला ही स्वतःवर कंट्रोल ठेवण अशक्य झाले होते. त्याने मंजूला आपल्या हातावर उचलून घेतले तिने आपसूक त्याच्या गळ्यात हात टाकले. सुदेश बेडरुमध्ये आला आणि मंजुला त्याने अलगद बेडवर ठेवले. त्याने हलकेच तिच्या कपाळावर किस केले. मग तिच्या मानेवर त्याने आपले ओठ ठेवले. तिचा अणुरेणू फुलून आला होता. सुदेश ने तिचा पदर बाजूला केला. तिच्या चेहऱ्यावर गळ्यावर तो चुंबत राहिला. असा हळुवार प्रणय मंजू पहिल्यादाच अनुभवत होती. प्रेम अस नाजूक आणि सुंदर असत याची तिला अनुभूती होत होती. सुदेशचा प्रणय तिला हवाहवासा वाटत होता. कुठली ही जोर जबरदस्ती नव्हती फक्त

हळुवारपणा मंजू अनुभवत होती. ही प्रेमाची भाषा तिच्यासाठी नवीन होती आणि त्यात ती आनंदाने स्वेच्छेने विहरत होती. दोघे एकमेकांत समरस होऊन गेले होते. थोड्या वेळाने सुदेश तिच्यापासून बाजूला झाला. मंजू हे जे आपल्यात घडले ते अनवधानाने झाले खर तर माझंच चुकले मी स्वतःला आवरायला हवे होते.

''साहेब अस नका बोलू यात माझी पण तेवढीच चूक आहे पण जे झालं ते खरच खूप सुंदर होत एक गोड स्वप्न होत असच मला वाटलं. तुम्ही स्वतःला दोषी मानू नका. मी ही गोष्ट कोणाला ही बोलणार नाही माझ्यावर विश्वास ठेवा. हे क्षण मी आयुष्यभर जपून ठेवेन.

''मंजू तू खरच खूप साधी आणि स्वच्छ मनाची आहेस, मला माफ कर. भविष्यात तुला कसली ही मदत लागली तर मला हक्काने सांग मी तुझ्या एका हाकेवर येईन.'' मंजूने प्रेमाने सुदेशला घट्ट मिठी मारली. त्याने तिच्या डोक्यावरुन हात फिरवला. त्या स्पर्शात आधार, विश्वास होता.

मंजू घरी आली ती खूप आनंदात होती. ते क्षण एका स्वप्ना सारखे ती कायम जपून ठेवणार होती. मंजू आणि तीच काम अस रुटीन चालू होते. सुदेशकडे ही जात होती. महिना झाला आणि मंजूची पाळी चुकली. कामाच्या नादात तिला समजलेच नाही दुसऱ्या महिन्यात तिच्या लक्षात आले. ती खूप खुश झाली. आपल्याला नक्की दिवस गेले असणार या भावनेने सुखावली. तिला सुदेश सोबतचा तो प्रणय आठवला याचा अर्थ हे मूल त्याच होत? ज्या अर्थी इतके दिवस तिला दिवस नाही गेले आणि आताच पाळी चुकली म्हणजे नक्की हे मुल सुदेशचंच आहे. पण असो आपण आई होणार यापुढे तिला बाकी गोष्टी गौण वाटू लागल्या. तीन महिने उलटून गेले तसे तिने सासूला आणि नवऱ्याला सांगितले की ती आई होणार आहे. ते दोघे ही खुश झाले. आता मंजुच पोट जरा जरा दिसू लागले होते. कुंदाकडे ती कामाला येतच होती. कुंदाच्या चाणाक्ष नजरेने तीच वाढलेले पोट ओळखले. ''मंजू तुला दिवस गेले का गं? पोट दिसू लागले आहे तुझं.'' मंजू क्षणभर दचकली मग कुंदा जवळ येऊन म्हणाली, हो ताई. ''पण हे कसे झाले? तू नवऱ्याला कुठे दाखवले होते का डॉक्टर कडे?''

नाही ताई पण तुम्हाला एक सांगू का?

बोल काय सांगायचे आहे?

ताई आधी मला वचन द्या की मी जे सांगणार ते तुम्ही बाहेर कोणाजवळ नाही बोलणार. ताई माझा विश्वास आहे तुमच्यावर म्हणून हे सांगायचे धाडस करते. मंजू हात जोडून म्हणाली.

''बोल मी कोणाला काही नाही सांगणार.'' कुंदा म्हणाली.

मग सुदेशकडे कामाला लागल्यापासूनच्या सगळ्या घटना मंजूने कुंदाला सांगितल्या. ''ताई आमच्यात जे झालं ते त्या क्षणाला भाळून झालं. यात चूक बरोबर, पाप पुण्य हे काही मला नाही माहीत पण मी आई होणार, माझं बाळ असणार हे जास्त महत्वाचे आहे. माझी सासू नवऱ्याचं दुसरं लग्न करायला निघाली होती ताई, या बाळा मुळ माझा संसार वाचला. मला लोक वांझ नाही बोलणार. हे एक स्वप्न होत अस मी मनाला समजावलं आहे. मला फक्त आई व्हायचे आहे. तुम्ही पण एक आई आणि बाई पण आहात तुम्ही मला समजून घ्याल.

मंजू तुझी मातृत्वाची आस बघता त्या पुढे नीती अनीती काहीच मायने नाही ठरत. तो एक क्षण आला आणि तुम्ही दोघ वाहवत गेला पण त्या क्षणाने तुला मातृत्व बहाल केले. त्यांनतर कधी त्या साहेबांनी तुझ्याशी तसे वर्तन केले का मंजू? कुंदाने विचारले.

नाही ताई उलट त्यांनी माझी माफी मागितली पण मी ही तेवढीच जबाबदार आहे या साऱ्याला. साहेबांनी पुन्हा कधी माझ्याकडे त्या नजरेने बघितले पण नाही. मंजू ही गोष्ट फक्त आपल्या दोघीत राहील. हा माझा शब्द आहे तुला. ताई खूप आभारी आहे तुमची, मला समजून घेतले. मंजूचे डोळे भरुन आले होते. मंजू आता काळजी घे आणि बाळाला जन्म दे. माझ्याकडे ये मी ट्रीटमेंट सुरु करते. हो ताई आनंदाने बोलत मंजू काम करुन निघून गेली. खरंच कधी कधी अज्ञानात सुख असते हे मंजूकडे बघून कुंदाला समजले होते.

***

चोवीसावे पुण्यस्मरण



जन्म ०२/०६/१९३२ मृत्यू २०/१०/१९९८
कै. भगवानराव ज्ञानोबा डेंगळे (मामा)

अपार कष्टांतूनी ओढली, सुखी-संसाराची गाडी। नाही पहिला स्वार्थ, ना बांधली माडी।।
दिले संस्कार कुटुंबाला, पाहिली स्वप्ने त्यांनी। साकारली प्रत्येकाची स्वप्ने, स्व: नशिबांनी।।
सदैव आशिर्वाद असतो, हीच श्रध्दांजली तुमच्या चरणी।
विनम्र अभिवादन

श्रीमती नर्मदा भगवान डेंगळे श्रीमती अनुसया बाळकृष्ण डेंगळे
श्री. विजय, श्री. विलास, श्री. विकास, श्री. विनायक, श्री. अरुण सौ. कमल, सौ. लता, सौ. प्रतिभा, सौ. मिनाक्षी, सौ. स्मिता, सौ. स्नेहल, सौ. शितल प्रितम, हर्षल, मानसी, प्रसाद, दर्शन, अनुज, अर्णव.
समस्त डेंगळे परिवार पुणे, बारामती, दौंड.

द्वारा - सिध्दिविनायक एंटरप्रायजेस ''सिध्दिविनायक'', स.नं. २०, प्लॉट अ १२, शिवशाही कॉलनी, कर्वे नगर, पुणे - ४११ ०५२ मो. ९८२२१९४१२४/९९२२१९४१११. टेलिफॅक्स : (०२०) २५४७८४५३.

मंगल

सुभाष चिं. कुलकर्णी

समुद्राजवळच्या खडकावर मंगल एकटीच बसली होती. तिला कशाचेच भान नव्हते. लाटांकडे निरखून पाहत मधूनच निर्माण होणारे भवरे तिचे लक्ष वेधून घेत होते. पाहता पाहता ती भूतकाळात गेली. आयुष्याचा सारिपाट डोळ्यांपुढे येऊ लागला. तिला पूर्वीचे दिवस आठवू लागले.



तिन्ही सांजेची वेळ झाली. आकाशात ढग जमा होऊ लागले. वाऱ्याच्या वेगानं समुद्राच्या लाटा उंच झेपावत होत्या. सूर्य अस्ताला जाऊ लागला. जवळच असलेल्या खडकावर मंगल एकटीच बसली होती. तिला कशाचेही भान नव्हते. ती आपल्या विचारात दंगून गेली. लाटांच्याकडे निरखून पहात तर मधूनच निर्माण होणारे भवरे तिचे लक्ष वेधूनच घेत होते. पाहता पाहता ती भूतकाळात गेली. तिला पूर्वीचे दिवस आठवू लागले. आयुष्याचा सरिपाट डोळ्यापुढे येऊ लागला.

मध्यम वर्गातील कुटूंबात जन्मलेली मंगल शालेय जीवनात हुषार म्हणून गणली गेली. प्रत्येक वर्षी पहिला नंबर तिचा असे. ग्रामीण शाळा मुलामुलीची होती. सर्व मैत्रिणी तिच्या सख्या... पण मुलांशी मात्र बोलत नव्हती. घरात एकुलती एक लेक... लाडात वाढलेली. सर्व मुले तिला ''पुस्तकातील किडा'' म्हणत होते.

त्याच वर्गातील 'तेजस' नावाचा गरिबीतून वर आलेला मुलगा कोणाशीही बोलत नव्हता. वडील शेतकरी तर आई घरकाम पहात होती. सर्वजण त्याला ''एकलकोंडा'' म्हणत होते.

कु. मंगल व चिं. तेजस चांगल्या मार्काने मॅट्रिक पास झाले. शाळेचा रिझल्ट बरा लागला.

''मला इंजीनिअर व्हायचंय'' मंगलने इच्छा व्यक्त केली. घरचा होकार मिळताच खास मैत्रिण 'मंदा' बरोबर प्रवेश घेण्यासाठी कॉलेजमध्ये आली, पहाते तर तेजसही तेथे दिसला. कधीही न बोलणारे येथेही (कॉलेजमध्ये) एकाच वर्गात आश्चर्यच म्हणायचं!

मंगल आता धीट झाली. मंदा तिच्याबरोबर सतत असे. मुले तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होती. पण ती त्यांच्याकडे पहात नव्हती.

''अमीर'' हा एका श्रीमंत बापाचा मुलगा तिला पाहताच मागे लागला. तिच्याशी सलगी करण्यासाठी धडपडत होता. पण मंगल त्याला दाद देत नव्हती. कॉलेज सुटताच अमीरनं मंगलचा हात धरण्याचा प्रयत्न केला. क्षणाचाही विलंब न लावता मागे असलेल्या तेजसने त्याच्या हाताला जोरात हिसका दिला. त्या सरशी अमीर त्याच्याकडे रागानं पाहू लागला.

''कोण रे तू?'' अमीर ने विचारले.

''मी तेजस पांडूरंग वालावलकर.''

''तू कोण?'' तेजस

''अरे या कॉलेजमध्ये तू नवीन दिसतोस... प्राचार्या पासून शिपायापर्यंत मला सगळे ओळखतात. मी एका श्रीमंत नावाजलेल्या पुढाऱ्याचा मुलगा आहे... माझं नाव अमीर आहे. कळलं!''

''अरे असशील पुढाऱ्याचा मुलगा मी कुणालाही भीत नाही.'' तेजस

''मग काय करशील बोल?'' अमीरनं रागाने विचारले.

''यापुढे हिच्याकडे (मंगलकडे) पाहण्याचा जरी प्रयत्न केलास तर तुझे अमंगल होईल.'' तेजसने तितक्याच जोरात उत्तर दिले. तेवढ्यात प्राध्यापक येताना दिसले.

''तूला नंतर बघून घेतो.'' असे म्हणत अमीर तेथून निघून गेला.

तेजस आपल्या पाठीशी धावून आला याचा अनुभव मंगलने घेतला. ती अधिक सतर्क झाली. न बोलणाऱ्या तेजसबद्दल तिला आपुलकी वाटू लागली.

दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये येताच-

''थँक्स तेजस'' मंगल

''कशाबद्दल'' तेजस

''कालच्या घटनेबाबत'' मंगल

''ते माझे कर्तव्य होते'' तेजस

एवढे बोलून तो तेथून सटकला.

आता रोज सुप्रभात... शुभ सकाळ... गुड मॉर्निंगची भाषा सुरु झाली. मंगलने आपल्या आई वडिलांना हा घडलेला प्रसंग सांगितला.

अमिर आज पूर्ण तयारी निशी आला. परवाचा झालेला घोर अपमान त्याला सहन झाला नाही. त्याने मुले पेरुन ठेवली. योग्य त्या सुचना दिल्या... आज बदला घ्यायचाच या इर्शेने तो फिरत होता, परंतू त्याच दुर्दैव असं की ते दोघे (मंगल व तेजस) कॉलेजला आले नव्हते त्यांनी आणलेले भाडोत्री गुंड (मित्र) प्राचार्यांनी पकडली. त्याने वडिलांना फोन केला... पण त्याचा काही उपयोग झाला नाही. जास्त लफडं नको म्हणून झंझट अंगाशी येईल म्हणून त्याने कॉलेज सोडून दिले ते कायमचेच.

एकदा मंगल बाजारात आई-वडिलांच्या सोबत गेली. तेथे अचानक तेजस दिसला. तिला आनंद झाला. एकदम ती पुढे झाली आणि त्याला थांबवले. आई बाबांशी ओळख करुन दिली म्हणाली,

''हाच तो तेजस ज्याने मला गुंडाच्या तावडीतून एकदा सोडवले. बाबांनी शेकहॅण्ड करुन त्याच्या पाठीवरुन हात फिरवला. तेजस थोडासा गांगरला. त्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी खाली वाकला यावरुन मुलगा समजूतदार, सुसंस्कृत आहे हे त्यांच्या नजरेने टिपले. आईने घरी येण्याचे आमंत्रण दिले. 'हो जमल्यास येईन' येवढे बोलून सटकला. ते दोघेही चांगल्या मार्काने अंतीम परिक्षेत पास झाले. त्यांची मैत्री अधिक घट्ट होऊ लागली.

मंदाने मात्र मधेच कॉलेज सोडून दिले.

तेजस नोकरीच्या निमित्ताने शहरात कधी गेला हे मंगलला कळले नाही. हा असा न सांगता का गेला याचे आश्चर्य वाटले. कदापी स्वत:च्या पायावर उभारण्यासाठी गेला असेल असा विचार मनात आला. आता आपली भेट होईल का नाही कोणास ठाऊक!

इकडे तेजस मामाकडे राहू लागला. रोज 'मुलाखतींचा सपाटा' सुरु झाला, पण यश गुंगारा देत होते. अखेर पुष्कळ प्रयत्नांती भाग्य उजळले. एका मोठ्या कंपनीत जॉब मिळाला. ट्रेनिंग पिरिअेड संपल्यावर नोकरी सुरु झाली. इंजीनिअरचा खरा अर्थ आता कळू लागला. जस जशी कामात बढती (प्रमोशन) मिळत गेली तसे वेतनही वाढले आणि तितकीच जबाबदारी वाढली. आवश्यक तेवढेच पैसे खर्च करी. बाकीचे गावी पाठवून देई. या कामात तेजस मंगलला हळूहळू विसरु लागला.

किती दिवस मामाकडे रहावयाचे. आपला भार जास्त वाटू नये म्हणून त्यांना विचारुन तेजस छोट्या भाड्याच्या खोलीत राहू लागला. संसाराची जणू रंगीत तालीम सुरु झाली. सकाळी 'कंपनीच्या मेसमध्ये नाष्टा जेवण व घरी आल्यावर ''अपना हाथ जगन्नाथ'' या प्रमाणे घरीच जेवण तयार करु लागला. कामाच्या रगडगात तो मंगलला पार विसरुन गेला.

तेजस आपल्या कामात बराच रुळला. एका मित्राच्या लग्नाला हजर झाला... तेथे पहातो तर मंगलही आपल्या आई-बाबांसह दिसली. त्याने दाढी वाढवली होती. चेहेरा लपविण्याचा प्रयत्न केला. पण चाणाक्ष मंगलने त्याला बरोबर ओळखले. तिच्या नजरेतून तो सुटला नाही.

''अय्या! तुम्ही इथं कसे?'' मंगलने विचारले.

''नवरा मुलगा माझा मित्र आहे... पण तुम्ही इथं कशा.'' तेजसने प्रतिप्रश्न केला. व आईपण बरोबर आल्याचे सांगितले.

''नवरी मुलगी माझी मैत्रिण आहे.'' मंगल

मंगलला खूप आनंद झाला. आईची भेट झाली.

गावी आल्यावर मंगल म्हणाली, ''आई हाच माझ्या जीवनाचा स्वामी होईल कां?''

या प्रश्नावरुन त्यांनी काय ते ओळखले. दोन्ही घरची चर्चा होऊन संमतीने मंगल + तेजसचे लग्न गावीच थाटात पार पडले. देवकार्य उरकल्यावर सर्वजण शहरात आले. संसार मांडण्यात आठ दिवस गेले. गावी जाण्याचा दिवस उजाडला तेवढ्यात तेजस म्हणाला-

''बाबा रागावणार नसला, तर एक गोष्ट विचारु?''

''बोल काय म्हणतोस'' वडील

''अहो बाबा आता पाऊस कमी पडतोय... उत्पन्न कमी येतंय तेव्हा... ही सर्व शेती विकून टाका... त्या पैशात येथे मोठा फ्लॅट घेऊ... तुम्ही दोघेही मजजवळ रहा.''

तेजसने आपल्या मनातील इच्छा प्रगट केली.

''होय तेजस! तु म्हणतोस ते खरं आहे... आजकाल शेती

करणं अवघड झालं आहे... पावसावर सर्व भरवसा.. आलं तर पिक येत.. पण त्यालाही भाव मिळत नाही तेव्हा... त्यांनी सौं.च्याकडे मान वळवली, होकार मिळताच ते तयार झाले.''

एकुलत्या एक मुलासाठी त्यांनी राहत्या घरासह सर्व शेतजमीन विकून टाकली. तेजसने चांगल्या सोसायटीत फ्लॅट घेतला. शिकलेली साधी... सरळ 'सून' मिळाल्याने आई-वडील खूष होते. इतकी वर्षे ग्रामीण भागात राहिल्याने शहरातील फ्लॅट संस्कृतीत रहाणे त्यांना थोड जड गेलं. हळू हळू ते रुळू लागले.

दोन तीन वर्षे आनंदात गेली. एक दिवस वडीलांना बरे वाटत नव्हते म्हणून तेजसने त्यांना फॅमिली डॉक्टरांच्याकडे नेले. डॉक्टरांना दाखवण्यापूर्वीच त्यांचा तोल गेला. मोठ्या रुग्णालयात दाखल केले. सर्व चाचण्या केल्या असता ''ट्युमर'' असल्याचे निदान झाले. ऑपरेशन शिवाय दुसरा पर्याय नव्हता. ऑपरेशन सक्सेसफुल झाले. सुनेच्या चकरा वाढल्या आईची ओढाताण होऊ लागली. त्यानंतर औषधोपचार सुरु झाले चांगला परिणाम दिसून आला. चेहऱ्यावर हास्य खिळू लागले. उद्या आपल्याला घरी जाण्यास मिळणार या आनंदात त्यांनी अल्पशा आहार केला आणि ते झोपी गेले. परंतू नियतीच्या मनात वेगळेच होते. मध्यरात्री त्यांना उलटी झाली. अस्वस्थ वाटू लागले... छाती दुखू लागली. नाडीचे ठोके वाढले. तेजसने डॉक्टरांना बोलावले... नर्स... डॉक्टरांची धावपळ सुरु झाली. ऑक्सिजन लावून सलाईन सुरु केले... अत्यावश्यक इंजेक्शन देण्यात आली. शर्थीचे प्रयत्न केले... अत्यावश्यक इंजेक्शन देण्यात आली. वडिलांचे सर्व अंग लुळे पडले अन् त्यांना देवाज्ञा झाली. सर्व कुटूंब दु:खात बुडाले. यातून सावरण्यास बरेच दिवस लागले.

''मी पण नोकरी करु का?'' मंगलने तेजसला विचारले.

''नको... नको... तू फक्त आईला सांभाळ.'' तेजसने स्पष्ट केले. घरात दोन मिनिटे शांतता पसरली. तेवढ्यात-

''मला नातू हवाय'' आई म्हणाली.

दोघेही स्तब्ध झाले... काय बोलावे कुणा कळेना.

एके दिवशी सौ. मंगलला उलट्या होऊ लागल्या. तेजसने लगेच डॉक्टरांच्याकडे नेले... तपासणी केली... गोड बातमी कळली... दोघेही आनंदाने घरी परतले.

''काय रे... काय झालंय हिला... काय म्हणाले डॉक्टर?''

- तेजसच्या आईने कळकळीने विचारले.

दोघेही काहीच बोलले नाही.... शांतता...

''अरे असे गप्प का? काय झालंय ते तरी सांगा!''

- आईचा प्रश्न.

तेजसने आता मौन सोडले... सुनबाई गालात हसल्या... एकदम आनंदाने म्हणाला, ''आई तुझे स्वप्न पूर्ण होणार! तू आजी होणार! हे ऐकताच डोळ्यातून खुषीचे अश्रू ओघळले. नवऱ्याची आठवण झाली. पदराने डोळे पुसले. मंगल त्याच्या मिठीत गेली. तेजसच्या आईने आतापासूनच तयारी सुरु केली. मंगलच्या माहेरी ही गोड बातमी कळली... सर्व आनंदून गेले. तेजस आईबरोबर बायकोची काळजी घेऊ लागला. आपण आजी होणार या आनंदात त्या दंग राहिल्या.

सौ. मंगल माहेरी आली. मैत्रिणी भेटू लागल्या. वेळ येताच दवाखान्यात नेले. 'मुलगी' झाली. सर्वांना आनंद झाला. तेजस आईसह गावी आला. आजीने बाळाला मांडीवर घेऊन कौतुक केले. नामकरण संपन्न झाले. 'आनंदी' नाव ठेवले. ती मोठी होऊ लागली. तशा तिच्या खोड्या वाढल्या. त्या खोड्यांनी दोघीही दमून जात होत्या. आता त्यांना वेळ पुरेना. तेजस तिचे लाड करत होता.

आनंदी हुषार होती. प्रत्येक वर्षी शाळेत तिचा पहिला नंबर असे. दहावीत ९७% टक्के मार्क, मग काय सर्वत्र पेढे वाटायचा सपाटा...

''आनंदी तू पुढे कोण होणार?'' आजीने विचारले.

''मी आई-बाबांप्रमाणे इंजीनिअर होणार!''

- आनंदीने चटकन् उत्तर दिले.

तिने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथेही अभ्यासाची चमक दाखवली. त्याच बरोबर खेळ, वक्तृत्त्व, नेतृत्व यातही आपली हुषारी दाखवली. अखेरचे वर्ष (बी.ई. फायनल) सुरु झाले तोच...

''अरे तेजस नात उपवर झाली आहे. तेव्हा... जावई शोधायला सुरुवात कर.'' आजीने विचार मांडला. आपल्या समोरच तिचे लग्न व्हावे ही इच्छा.

''आई तिचे हे शेवटचे वर्ष संपू दे. एकदा का डिग्री हातात पडली की, छानसा चांगला जावई शोधून देतो.'' तेजसने सांगितले.

आनंदीचे लग्न आपल्यासमोर व्हावे अशी मनिषा होती पण झाले उलटे. सगळं व्यवस्थित चालू असतांना एकेदिवशी जिना चढून आल्यावर खूप दम लागला. छातीत दुखू लागले. मंगलने लगेच दवाखान्यात नेले. तेजसला फोन केला तो लगेच आला. डॉक्टरांचे प्रयत्न सुरु झाले. सर्वांची धावपळ सुरु झाली. (डॉ. नर्सेस इत्यादी...) पण त्यात अपयश आले. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. अतोनात दु:ख झाले. मंगलचे आई-वडील म्हातारपणामुळे येऊ शकले नाहीत. आनंदीला आजी हवी होती तर मंगलला सासूचा अजून आधार हवा होता. यातून सावरण्यास त्यांना बराच कालावधी लागला.

फायनलचा निकाल लागला आनंदी बी.ई. मध्ये प्रथम श्रेणीत पास झाली. तिला आजीची आज आठवण झाली.

थोड्याच दिवसात बंगलूर येथे 'स्टडी टूर'चे आयोजन करण्यात आले. घरची परवानगी मिळताच आनंदी सहलीला गेली.

इकडे तेजसच्या कंपनीने एक पाकिट दिले. त्यावर लिहिले होते ''ओपन विथ स्माईल ॲट होम'' त्याची उत्सुकता वाढली. तो घरी आला.

''अहो! आज लवकर कसे?'' सौ. ने विचारले.

''अगं कंपनीने एक पाकिट दिलं आहे.'' ते तिच्याकडे सोपवून फ्रेश होण्याकरीता गेला...

पाकिट पाहून तिला आश्चर्य वाटले. उत्सुकता वाढली. तिच्या

शेजारी बसून त्याने पाकिट उघडले. मजकूर होता.

जपान येथील मुख्य कार्यालयात (हेड ऑफीस) होणाऱ्या वार्षिक सभेसाठी आपली 'निवड' करण्यात आली आहे. सोबत विमानाची तिकीटे जोडली आहेत. हे वाचून दोघेही खूष झाले. सर्व तयारी करुन तेजस जपानला रवाना झाला.

सहल विद्यार्थी बंगलूरमधे रोज एका कंपनीला भेट देऊ लागले. उद्या आपणही अशाच कंपनीत काम करणार म्हणून बारकाईने तेथील कामाचे निरिक्षण करु लागले. शंका-कुशंका विचारल्या जाऊ लागल्या. त्याला तेथील तज्ञांनी समाधान होईपर्यंत उत्तरे दिली. सहलीचा परतीचा प्रवास सुरु झाला. गप्पा-गोष्टी गाणी भेंड्या म्हणत सर्वजण आनंदाने घरी परतले.

''आई! बाबा कुठं आहेत?'' आनंदी

''अगं ते जपानला गेले आहेत.'' आईने उत्तर दिले.

''पण केव्हा येणार?'' आनंदीचा प्रतिप्रश्न.

''उद्यालाच येणार आहे.'' आईचा खुलासा.

''अय्या म्हणजे मला हमखास काहीतरी मिळणार!'' आनंदी.

इकडे वार्षिक सभा संपवून तेजसचा परतीचा प्रवास सुरु झाला. आनंदीसाठी एक जपानी ड्रेस व बायकोसाठी भेटवस्तू घ्यायला विसरला नाही. 'टोकियो' वरुन विमानाने आकाशी झेप घेतली. रात्रभर प्रवास असल्याने सर्व प्रवासी झोपेच्या अधीन झाले. विमानाने उंच भरारी घेतली. मध्यरात्री विमानात बिघाड झाला. ते एका बाजूला सारखे झुकत होते. काय झालं हे वैमानिकास समजेना... त्याने आपत्कालीन वेळ (इर्मजन्सी) जाहिर केली. विमान काळ्यासमुद्रावरुन चालले होते. विमान खाली वर होऊ लागले. सर्वजण जाकिट शोधू लागला. प्रवासी भयभीत झाले. त्या विमानाचा जगाशी संपर्क तुटला. मागील बाजूस विमानाने पेट घेतला. क्षणार्धात ते समुद्रात कोसळले. एकही प्रवास वाचु शकला नाही. जगभर ही बातमी पसरली. मंगल व आनंदीला दु:ख आवरेना. कंपनीने दिलगिरी व्यक्त केली. यातून सावरण्यास त्या दोघींना बराच वेळ लागला.

आता फक्त 'आईसाठीच' जगायचे असे आनंदीने पक्के ठरवले. तेजसच्या कंपनीत तिला सामावून घेतले. (नोकरी मिळाली) अनुभव येऊ लागले तशी ती उत्साही दिसू लागली. आईस मानसिक समाधान लाभले. ''जावई शोधायला सुरुवात कर'' हे सासूबाईंचे शब्द आठवू लागले. थोड्या दिवसानंतर आईने लग्नाचा विचार मांडला. तेव्हा आनंदी म्हणाली, ''आई मी लग्नच करणार नाही. आता फक्त तुझ्यासाठी जगणार, तुला सुखी आनंदात ठेवणे हेच माझे कर्तव्य.''

''अगं हो! बरोबर आहे... पण मी आज आहे. उद्या नाही. तुला संपूर्ण आयुष्य जगायचं आहे. समाजाच्या दृष्टीकोणातून बघ. आपल्या आजीची... वडिलांची इच्छा पूर्ण कर...'' - मंगलने कळकळीने सांगितले.

''बरं! म्हणून ती गप्प बसली. मागील गोष्टी विसरुन आनंदाने जगणे सुरु झाले. एके दिवशी आनंदी ऑफीसमधून लवकर बाहेर पडली. झटपट रस्ता ओलांडताना एक कार वेगाने आली तिला धडक बसणार... तेवढ्यात क्षणाचाही विलंब न लावता जवळ असलेल्या तरुणाने मागे खेचले. आनंदीला मुर्च्छा आली, किरकोळ मार लागला. कोणाचीही वाट न पाहता त्याने जवळच्या दवाखान्यात नेले. शुद्धीवर आल्यावर त्या तरुणाने घरी फोन केला. मंगल लगेच दवाखान्यात आली. तिला पाहताच आनंदीला रडू कोसळले. तिने घडलेला सर्व प्रसंग सांगितला. आणि म्हणाली-

आज ह्यांनीच (त्या तरुणाकडे पाहून) मला वाचवले. मंगलने त्या तरुणाचे मनापासून आभार मानले व नांव विचारले. त्याने राकेश पवनलाल शर्मा असे सांगितले. पुढे तो म्हणाला की, मी शेजारच्या इमारतीत काम करतो. आनंदी दोन दिवसात बरी झाली. त्या तरुणाला घरी येण्याचे आमंत्रण दिले. सुट्टीचे दिवशी श्री राकेश त्यांचे घरी आला. गप्पा गोष्टी सुरु झाल्यावर त्याने आपली कहाणी सांगितली. मी मुळचा झारखंडचा माझे आई-वडील-भाऊ-बहिण आठ वर्षांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे पुरात वाहून गेले. वडीलांची शेती होती. घरासह शेती वाहून गेली. मी त्यावेळी येथे होतो म्हणून वाचलो. मी पोरका झालो. मी स्वत:ला सावरले. भाड्याच्या खोलीत आयुष्य जगायला सुरुवात केली. मला कोणीही नाही. हे ऐकल्यावर दोघीही हळहळल्या. राकेशबद्दल सहानभूती निर्माण झाली... आपुलकीचे वारे वाहू लागले.

आता कंपनीत जाता येता गुड मॉर्निंग... गुड इव्हिनिंग.. सुप्रभात... शुभ संध्याकाळ... सुरु झाले. गाठीभेटी होऊ लागल्या. त्याचे प्रेमात रुपांतर झाले.

''आई! हाच तुझा जावई! आनंदीने एका झटक्यात सांगून टाकले. मंगलला आनंद झाला... ती मोठ्या काळजीतून मूक्त झाली.

मंगल रोज संध्याकाळी व्यायाम म्हणून समुद्राच्या बाजूने फिरण्यास जात होती. तेवढेच पाय मोकळे. ते दोघे कामावरुन परत यायच्या आत ही हजर असे. असा नित्यक्रम तिचा चालु होता.

एके दिवशी दोघेही कामावरुन घरी आले तर दाराला कुलुप. इकडे तिकडे बरीच चौकशी केली पण उत्तर मिळेना. आई सापडेना.. शोधाशोध सुरु झाली. समुद्राच्या बाजूने ते जात असता एका खडकावर एक व्यक्ती पाठमोरी बसलेली दिसली. त्यावेळेस रात्रीचे अकरा वाजले होते. दोघेही जवळ गेले, पहातो तर ती आईच होती.

''अगं आई! इथं का बसलीस? आम्ही तुला केव्हाचे शोधतोय... हूं नाही की चूं नाही. जेव्हा आनंदीने तिच्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा मंगल भानावर आली. सांगू लागली... गतकाळातील आठवणींने मला घेरले होते. त्यामुळे वेळेचे भानच उरले नाही. आम्ही दोघेही याच खडकावर बसून स्वप्न रंगवत होतो... त्यात मी दंग झाले होते.

''आई आता घरी चला.'' राकेशने हात धरुन उठवले.

सर्वजण आनंदाने घरी परतले.

***

भूतदया

बाळकृष्ण बाचल

वीजेच्या तारेचा धक्का बसून मेलेल्या वानराला पाटलांनी गावाबाहेर मूठमाती दिली. खणलेल्या खड्ड्यात वानराचे कलेवर ठेवून त्यावर सर्वांनी माती ढकलली मातीच्या ढिगाऱ्यावर पाटलांनी उदबत्त्या लावल्या अशा तऱ्हेने पाटलांनी भूतदया दाखविली.



महामार्गापासून लांब नाही, आणि जवळही नाही, असं एक गाव होतं, 'पाडगाव' त्याचं नाव! शहराचं सारं लागलं असलं तरी, गावाचं गावपण अजून पर्यंत तरी जपणारं गाव होतं ते! आधुनिकतेचा वारा गावातून वाहत असला तरी, संस्कृतीचा दिवा टिकवून ठेवलेल्या गावांपैकी ते एक गाव होतं. कथा कीर्तना बरोबर जत्रा. यात्रेत लोककलेला ही उत्स्फूर्त दाद देणाऱ्या, माणसातला माणूस शोधणाऱ्या, सुख-दुःखात एका हाकेत जमा होणाऱ्या गावाची ही खासियत पंचक्रोशीत सर्वांनाच ज्ञात होती.

विश्वास हा खोडरबर सारखा असतो तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो.

भरत बुवा पाटील! गावातील एक भारदस्त व्यक्तिमत्व! अजूनही त्यांच्या शब्दाला मान होता. गावात यांचा आदरयुक्त दरारा होता! कोजागिरी पौर्णिमा झाली आणि गावच्या मध्यभागी असलेल्या विठ्ठल मंदिरात काकडा सुरु झाला. पहाटे पहाटे काकडा सुरु झाला. अन् त्यातील भजनांचे, टाळ आणि मृदुंगाचे स्वर, केवळ गावातच नव्हे, तर आजूबाजूच्या वाड्यावस्त्यापर्यंत कानांवर पडू लागले. भरत बुवा पाटील आणि त्यांच्यासारखी धार्मिक वृद्धी जोपासणारी, वारकरी संप्रदायातील पाच-पन्नास स्त्री-पुरुष आणि काही तरुण मंडळी नित्यनियमाने मंदिरात जाऊ लागली होती. काकडा संपला की, रोजच्या कामाला जात होती. भरत बुवा घरी जाण्यापूर्वी, आपल्या मोटरसायकल वर एक रपेट आपल्या मळ्यात मारायचे. असा त्यांचा रोजचा शिरस्ता होता. मागे एखादा जोडीदार बरोबर असायचा. आणि मग शहरालगतच्या रस्त्याला निघून पुन्हा आपल्या घराकडे स्वारी परतायची. मग वाटेत भेटेल त्याच्याशी थोडं थांबून बोलणारच! कोणा कोणाचं बोलणं ऐकणं, तर कुणाला योग्य तो सल्ला देऊन पुढे जावं! ठरलेल्या ठिकाणी चहा प्यावा, आणि सोबत्याला घराकडे सोडून घरी यावं असा त्यांचा नित्यक्रम असायचा. एका शनिवारी मात्र त्यात खंड पडला.

शनिवारची सकाळ होती! पहाटे सुरु झालेला काकडा संपला. सगळे मंदिराच्या बाहेर पडले. पाटलांनी आपली मोटरसायकल काढली आणि त्यांनी आवाज दिला, ''अहो, संपतराव मोरे, येताय ना?'' कुणाशी तरी गप्पा मारणारे संपतराव तिथूनच म्हणाले, ''आलो, आलो!'' पाटलांनी गाडीला किक मारली आणि ही जोडी निघाली. नेहमीप्रमाणे मळ्याकडे फेरफटका मारुन, महामार्गाच्या जवळच्या रस्त्याला गाडी आली.

समोरुन लोकांचा गलबला ऐकू येऊ लागला. मोर्चाने रस्ता अडवल्यासारखा घोळका जमला होता. पाटलांनी अलीकडंच गाडी थांबवली. ते म्हणाले, ''संपतराव, चला काय गडबड चाललीये? बघू या तरी खरं!'' गाडी बाजूला लावेपर्यंत संपतराव पुढे गेले होते. त्यामागोमाग पाटीलही आलं. पाटलांचा आवाज ऐकून, बरेच जण मागं सरकले. रस्त्याच्या मधोमध एक काळ्या तोंडाचे वानर निपचित पडलेले होते, आणि दहा-पंधरा वानरे रस्त्यात इकडून तिकडे उड्या मारत होती. ती कोणालाही पुढे जाऊ देत नव्हती. काहीजण त्यांना सतावत होते. तर शाळेत निघालेली पोरं दगड भिरकावत होती. त्यामुळे ती वानरांची टोळी, अधिकच चवताळून, अंगावर धावत होती.

पाटलांनी चहावाल्याला हाक मारली. ''कधीपासून ही गर्दी झाली आहे? काही भानगड?''

''अहो पाटील, मी सकाळी आलो, तेव्हा काहीच गर्दी नव्हती. मी दुकान उघडलं, चहा करु लागलो. तेवढ्यात काही पडलं की काय, म्हणून पाहिलं, तर विजेच्या तारेला धडकून हे वानर खाली पडलं. मग काय? थोड्यावेळात बघा ही वानरांची टोळी, कुठून कशी आली कुणास ठाऊक? अडवून बसली रस्ता.'' धापा टाकत एका दमात चहावाल्यानं सांगून टाकलं.

पाटलांच्या लक्षात सगळ्या गोष्टी आल्या. मग त्यांनी गर्दीतल्या ओळखीच्या दोघाचौघांना काही सूचना केल्या. एक जण पोलीस चौकीत गेला. दोघेजण आणखी कुठेतरी गेले. कॉलेजची चार पाच पोरं हातात गाड्यांच्या किल्ल्या फिरवीत मजा बघत होती. पाटलांनी त्या पोरांना जवळ बोलावलं. कानात काहीतरी सांगितलं. पोरांनी माना डोलावल्या.

ती पोरं गाड्यांजवळ जाऊन उभी राहिली. थोड्या वेळापूर्वी पाटलांनी ज्यांना ज्यांना काही काम सांगितली होती ती सगळी पोरं आली. कुणाच्या हातात पांढरे कापड, कोणाच्या हातात हार-फुले, कुणाच्या हातात तीन-चार बांबूचे तुकडे होते. ही सगळी मंडळी येताच, मधाशी सांगितलेल्या पोरांना पाटलांनी आवाज दिला, ''पोरांनो, गाड्या घेऊन या बरं!'' पाटलांचा आवाज येताच, सर्वांनी गाड्या सुरु केल्या. आणि रस्त्याच्या मधोमध पडलेल्या वानराच्या भोवती गोलाकार गाड्या फिरवू लागले. त्याबरोबर वानरांची टोळी आणि आजूबाजूची माणसं सगळी बाजूला झाली. तेवढ्यात दोन पोलिसही आले. त्यांनीही गर्दी हटवण्यास मदत केली.

पाटील म्हणाले, ''पोरांनो, गाड्या फिरवणं थांबवू नका!'' मग संपतरावांच्या व आणखी काही जणांच्या मदतीने पाटलांनी, त्या वानराला बांबूच्या काठीने बाजूला घेतले. पांढऱ्या कापडाची खोळ तयार केली व तिच्यात वानराला ठेवले. बांबूला खोळ अडकवली. दोघांनी मागेपुढे बांबू पकडला. पाटलांनी त्याला हार घातला. ते साऱ्यांना म्हणाले, ''चला, चला गावाच्या बाहेर जाऊ या!'' त्या वानराच्या अंत्ययात्रेत पोरासोरांसह पाच पन्नास माणसंही सामील झाली. सगळे गावाबाहेर आले. त्यांच्या पाठोपाठ जमलेली वानरंही उड्या मारत, सगळ्यांच्या पुढे पळाली आणि झाडावर जाऊन बसली.

एका झाडाखाली ती अंत्ययात्रा थांबली. पाटलांनी सांगितलेल्या माणसांनी, अगोदरच एक खड्डा खणून ठेवला होता. त्याच्यात वानरांचं कलेवर ठेवलं. अंगावरचा हार सारखा केला आणि त्यावर पाटलांसह सर्वांनीच माती ढकलली. त्या मातीच्या ढिगाऱ्यावर पाटलांनी उदबत्त्या लावल्या. हात जोडले. आणि सगळीजण आपापल्या वाटेने निघून गेली. आतापर्यंत लपून बसलेल्या वानरांनी पटापट उड्या मारल्या. मातीच्या ढिगाऱ्या भोवती दोन-तीन फेऱ्या मारल्या आणि उड्या मारुन सर्व वानरे पळून गेली.

दरवर्षी कोजागिरी संपली, की काकडा सुरु होतो आणि भरत बुवा पाटलांना या गोष्टीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. नेहमीप्रमाणे संपतरावांना घेऊन पाटील फेरफटका मारुन जेव्हा त्या जागेवर येतात, तेव्हा त्यांना तो सारा प्रसंग डोळ्यांपुढे उभा राहतो. आता तिथ एक भलमोठं झाड उगवलं आहे. जेव्हा जेव्हा तिथे जातात तेव्हा त्या झाडाला एक फेरी मारतात. थोडावेळ थांबतात, आणि पुन्हा आपल्या मोटरसायकलवरुन घराकडे निघतात.

***

काव्य संग्रह

महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

रचना व शुभेच्छुक – प्रकाश बाजीराव रसाळ सर

सर्व महिला माता, भगिनींना सहृदय समर्पित.

महिषासूर मर्दिनी महाकाली, तूच महालक्ष्मी सरस्वती ।
हिंदवी स्वराजाची जननी, तूच गुरुमाऊली ।।१।।
लालन–पालनकर्ती, माया ममतेची यशोदा ।
दिवाकराची सहचारिणी, उदारतेचा महामेरु ।।२।।
नारी गौळण नंदा घरची, मधुसुदनाची प्यारी सखी ।
च्यामुंडा भद्रकाली त्रिशुल भाला करी, कर्दनकाळी दुष्टांची ।।३।।
हाती तुझिया सामर्थ्य वसे, तूच रणांगणी विरांगणा ।
रमणीय नाजूक जाई–जुई, असे ही गुलाबाची काटकी ।।४।।
दिव्य–भव्य औदार्य तुझे, तूच कारुण्याची भावुकता ।
कर्तव्याची निरंतर दासी, अन्नपूर्णेची आराधना ।।५।।
शुक्रतारा तेजस्विनी रुपवती, स्वर्गातील देवांगणा ।
भवितव्याचा लगाम तुझिया हाती, तूच असे महत्वकांक्षी ।।६।।
काळ–वेळ तुझ्या चरणी, निरंतर घाली लोटांगण ।
मनाची नसते कदापी हार, तूच भवसागराचा दीपस्तंभ ।।७।।
नास्तिक ही तूच, आस्तिकही तू, वरदायिनी महेश्वरी ।
विश्वाचे जनक करती, वंदन तव पदकमली ।।८।।
भाळावर कुंकुंम मळवट, मध्ये शोभे चंद्रकोर मस्तकी ।
कमल निवासिनी बृहस्पती सहचारिणी, दु:ख हरणी, सुखकरणी ।।९।।
विनम्रभावे हात जोडीतो, तुझिया जगत्कार्या ।
माता, भगिनी, भार्या, देवी, सखी, लक्ष्मी ही सारी तुझीच रुपे ।।१०।।

***

स्त्रीये

अनसूया कुंभार, डोंबिवली

स्त्रीये बढाया तू मारिशी कर्तृत्वाचा खऱ्या
तसे पाहणे न घडे जनातून बरे!
चूल खंडातून तुला न ओढणे जमे तरी
न माना डोलती त्रिखंडातील तव कीर्तीपुढे!
रावराबून दिलास खांद्याास खांदा
कष्टास ना जुमानीत ते स्वत:च्यापुढे!
पाळण्याची दोर सोपवून हाती तुझ्या
मोकळे सदा बाप पाहण्या नवी क्षितिजे!
भुईतून आकाशाप्रत नेण्यास रोपटी
कणाकणांनी तू जळत सदा झिजे!
परि महान होताच तेच वृक्ष पुढतीं
सावलीस महाग होशी त्यांच्यापुढे!
बाल्यातही तुला पित्याचा पहारा
पुढे पतिदेवाच्या मर्जीबाहेर नसे!
शब्द जर न्यायास्तव काढीलास जर
घर फिरेल उलटे तुझ्याभोवते
चार भिंतीत आयुष्य कोंडून राही
तुला मोडती परंपरांची सोशिक ती व्रते!
इच्छाकांक्षांना देऊन फाटा घरकल्याणास्तव
धगधग आतून वाढवून का भोगणे असे!
टाक आता टाक, कात परमार्थ साधुने
तुलाही हातपाय, न सोडिशी स्वार्थ साधणे!
नवी क्षितिजे असती ना त्यांच्याचसाठी
आव्हाने नवी तुझी झटकू दे ती रुढीभुते
खायास देणाऱ्या अन्नदात्यांस सांग
मीही एक स्वयंसिद्ध अन्नपूर्णा असे!

***

आणि आता तू आई होणार

सौ. अरुणा कुंभार, पिंपरी, पुणे

आणि आता तू आई होणार
तुझ्या मध्येही हळुवार बदल घडून येणार
याची तुला सुखद जाणीव होणार
एक नवीन पिढी उदयास येणार
आणि आता तू आई होणार...

राजकुमार असो वा राजकुमारी
तुला नाही फरक पडणार
उत्तम संगोपनाचा तू प्रयत्न करणार
आणि आता तू आई होणार...

बाळाच्या आगमनासाठी तूच आतुर असणार
इवल्याशा कपड्यांची अन् खेळण्याची यादी
तुझ्या मनी तयार असणार
या सुखद स्वप्नामध्ये रोज आता तू रमणार
म्हणूनच म्हणते,
आता तू आई होणार...

ताप येऊन भरली तुला हुडहुडी जरी
स्वेटर तू पहिले बाळालाच घालणार
ऊन पावसापासूनही त्याचे तू रक्षण करणार
आणि आता तू आई होणार...

सुदृढ गोंडस बालक होण्यासाठी तू प्रयत्नशील राहणार
स्वत:च्या आवडीनिवडी तू नेहमीच बाजूला ठेवणार
मातेच्या या त्यागाला सर्वजण सलाम करतात
आणि आता तू आई होणार...

परमेश्वर येत नाही भूतलावरी
तो तुझ्या रुपानेच बाळाला भेटणार
माय–माऊली, माता–जननी आणि
तूच बाळाची परम–देवता होणार
आणि आता तू आई होणार...

चिऊ, काऊ आता रोज तुझ्या अंगणात येणार
चांदोबा, चांदणे तू धरतीवर उतरवणार
बाळाचे मुख पाहून तू खुदकन हसणार
आणि आता तू आई होणार...

विज्ञानाचे तू कितीही गायले गोडवे जरी
बाळ रडू लागले की त्याची तू दृष्टच काढणार
वाईट नजरेपासून वाचण्यासाठी काळी तीटही लावणार
आणि आता तू आई होणार...

बाळाला जन्म देताना तुला तुझी आई आठवणार
अन् त्या वेळेसच आईचे महत्व तुला कळणार
आणि आता तू आई होणार...

हाच आहे स्त्री शक्तीचा सन्मान खरा...
सांगते मी आज लक्ष देऊन ऐका खरा...

मातृत्वाच्या अनुभूतीनंतर मुलींनो मनी विचार धरा
आईप्रमाणे सासूवरही तुम्ही तितकेच प्रेम करा...
मुलगी बनून तिला सुद्धा लागु दे तुमचा लळा...

कारण, तुमच्या नवऱ्याला जन्म देताना...
तिनेही सोसल्या आहेत कळा...
तिनेही सोसल्या आहेत तितक्याच कळा...

***

असीम

सौ. निशीगंधा मंगेश साळवी, ठाणे

तुझ्या आगमनाने घर हे जाहले धन्य,
तुझ्या सहवासाने जणू दरवळे आनंद,
तुझ्या कृतीने वास्तू आणि झाडे वेली,
देती आशीश, होऊनी विनम्र खाली ।।१।।

परी न कथा वेगळी ही सहकुटुंबियांची
गगन भरारी मारती साथ तुझ्या आधाराची,
पंखात बळ देशी तू आपल्या लेकरांना,
इप्सित साध्य करण्या होई कठोर मना ।।२।।

संस्कार रुजविण्या माते तू श्रम घेशी,
लेकरू रुपी हिऱ्याला कसे पैलूं पाडशी,
जरी थोडा काळ तू ना राहिलीस घरापाशी,
घार उडते आकाशी, चित्त तिचे बाळापाशी ।।३।।

करुनी प्रगती इतरां सवे ध्येय काबीज करीशी तू,
गगनाला गवसणी घालून क्षितीज गाठीशी तू,
तुझ्या ध्येयासाठी क्षितीज पडले ठेंगणे,
न सीमा, न पार, असीम जाहले क्षितीज हे उणे ।।४।।

***

अस्तित्व

श्रीमती. सोनाली देविदास रसाळ, ता. कर्जत, जि. अहमदनगर

अस्तित्वाचा लढा तूझा तूच लढणार आहे
दोष कुठवर आता तुला पुरणार आहे ।।धृ.।।

गेले ते दिवस दुसऱ्याच्या ओंजळीने पिण्याचे पाणी
तूच तुझ्या आयुष्याचा शिल्पकार ठरणार आहे ।।१।।

कोणी नाही कोणाचे लढा तुझ्या अस्तित्वाचा
तुझ्यासाठीच ठरणार आहे जिंकशील जेव्हा स्वत:ला
विजयाचा सूर्यही तूझाच असणार आहे ।।२।।

पावलांना कंटकांची परवाच ठेवू नको
येवो कितीही संकटे मागे तू पाहू नको
तूझ्याशीच आहे लढा तुझा अन् अस्तित्वाला
उभारी तूझ्याच मिळणार आहे ।।३।।

चारित्र्य, नम्रता अन् शील यांची धार असू दे,
मग कोणतीही रित कितीही वाकडी असू दे,
नजरेच्या तलवारीने सर्वांची धाव राखणार आहे ।।४।।

वादळातील वाट तू, सौख्याचा घाट तू,
दयेच शिंपन तू, मांगल्याच तोरण तू,
सामर्थ्याचा पर्वत तू, तूच दुर्गा, शक्ती तू,
तुझ्याहून सामर्थ्यवान आणखी कोण ठरणार आहे ।।५।।

***

माफ कर सावित्री

शारदा लक्ष्मण घोडके, श्रीगोंदा, अहमदनगर

माफ कर सावित्री मला थोडं बोलायचं
बाईपणाच्या ओझ्याखालचं जगणं थोडं मांडायचं ।।१।।

किती गं प्रेम तुझं साता जन्मापारचं
कळेल का सत्यवानाला समर्पण प्रेमाआडचं ।।२।।

अग्नीपरिक्षा नाकारणारा राम इथे अजून जन्मायचा
दुभंगल्या मातीचं दु:ख जाणणारा अजुन इथे यायचा ।।३।।

द्रोपदीचं वस्त्रहरण रोखणारा कृष्ण आणखी इथे जन्मायचाय
नकाब नाकारणारा पैंगबर अजुन इथे पैदा व्हायचाय ।।४।।

ज्ञानमार्गावर यशोधरेला सोबत घेऊन
चालणारा बुद्ध ही इथे आणखी व्हायचाय
मातीचा धर्मच प्रीती अंकुरतात हिरवीगार नाती ।।५।।

आभाळाला कधी तिचं थोरपण समजेल काय?
समाजमनावर अजुन ही ठसा जुना तोच आहे ।।६।।

कधी सीता कधी कुंती राधा द्रौपदी तुच आहे
वासनेत होरपळणारी निर्भयाही तुच आहेस ।।७।।

जगणं जरी वेगवेगळं प्रीतमायेनं सांभाळलेलं

हसून जगण्यासाठी डोळ्यात पाणी अडवलेलं ।।८।।
आयुष्याचं दान कधी तुझ्यासाठी कुणी मागेल काय?
सात फेरे वटवृक्षाला तुझ्यासाठी कुणी घालेल काय? ।।९।।

***

प्रत्येक स्त्रीच्या

सौ. शारदा रामदास गोरे

प्रत्येक स्त्रीच्या चेहऱ्याआड बाईपण असते लपलेले
पदरात बांधलेले असतात कित्येक सल खुपलेले ।।१।।
कित्येक नजरा हसताना सांगतात गुढ कहानी
पंख छाटल्या पक्ष्याची गातात हळवी गाणी ।।२।।
पैंजणे रुणझुणतात हळुवार दंगा करत नाही
दिवसभर नाचणाऱ्या पायांना कुणी थांब म्हणत नाही ।।३।।
क्वचितच होतात मोकळे घट्ट बांधलेले केस
आकांक्षानाही अशीच अडवते बाईपणाची रुढ वेस ।।४।।
हातातली काकणं किणकिणतात कुरकुरत नाहीत कधी ही
अविरत राबतात कष्टतात हात मायेचा शीणत नाही ।।५।।
प्रत्येक उंबऱ्याआड आहेत घुसमटलेले बंदिस्त श्वास
दाबलेली गोठलेली चौकटीत निस्तेज दुबळी आस ।।६।।
आदिशक्तीच्या या लेकींना यावा थोडी शहाणीव
रसरसुन जगण्याची व्हावी थोडी जाणीव ।।७।।

***

समाजाच्या काय तू कामी पडला...?

प्रा. नंदू वानखडे, मुंगळा, जि. वाशिम.

'मान्य आहे शून्यातूनी, तू लयी वरती चढला...
पण सांग तू गड्या, समाजाच्या काय कामी पडला...?'
'धनामधली कोणासाठी, मोडली नाही काडी...
दरवर्षाला स्वत:साठी, घेत गेला गाडी...
दिला नाही कांदा जरी, घरी तुझ्या सडला...
सांग तू जरा समाजाच्या, काय तू कामी पडला?'
तुझा नित्त्य चढत आहे, मजल्यावरती मजला...
लहानपणीचा तुझाय यार, ऊघड्यावरती निजला...!
तुझ्यामधला मित्र गड्या, सांग कुठे दडला...?
सांग तू जरा समाजाच्या, काय कामी पडला...?
गरिबीनं गांजलेली, माणसं आता बघत...
तरीही तू आपल्याच आहे,मस्तीमध्ये जगत...
तुझ्यावाचून नाही जरी, संसार त्यांचा अडला...
पण सांग तू जरा समाजाच्या, काय कामी पडला...?
जन्मल्या त्या समाजाचा, जरी ऋणी राह्य तू..
मागे राह्यल्या समाजाला, मागे वळून पाह्य तू..
कोणी नाही पुसत ऊघ्या, तू कितीही मोठा घडला...
सांग तू जरा समाजाच्या, काय कामी पडला...?

***

सिंधुताई तू अनाथांची माई

विलास बापूराव कुंभार, फुरसुंगी, पुणे

चिंधूची झालीस तू सिंधुताई
अनाथांची बनलीस गं माई
वंदनीय अवघ्या जगाशी होई,
नतमस्तक मी गं तुझे पायी... ।।धृ.।।
खडतर जीणे आले तुझ्या नशीबी,
गुरे राखणे, शेण काढणे बालपणी,
विवाहही होता झाला अल्पवयी,
छळ मानसिक होता मन बंड घेई ।।१।।
जाच सासरचा मोडण्या तयेवेळी,
बंड पुकारुन त्वेषे तू उभी राही.
अजून न पाठ सोडी दुर्भाग्यही,
जरी जिंकली तू बंडाची लढाई ।।२।।
पोटुशी असता घेता चारित्र्यावर संशय,
जबर मारहाण होता तुज दाविला गोठा,
गोठ्यातच प्रसव तू, जन्मा कन्या येई,
गावांसह, माहेरही नच तुज ठाव देई ।।३।।
स्टेशन, शहरी मिळेना कोठेच निवारा,
म्हणूनच आसरा तू स्मशानाशी घेई.
पैसा, पिठ मिळता आनंदून तू जाई,
चितेवरच भाकरी तू भाजून खाई ।।४।।
निराधार दिपकाचा सांभाळ करुनी,
सेवासदनात पाठवणी त्याची केली.
कैवारी अनेक निराधार बालकांची,
घाली तया दगडूशेठ गणपतीचे पायी ।।५।।
शासनी मांडता आदिवासी प्रश्नांशी,
बुद्धीचातुर्ये ठाम एकेक मुद्द्यांशी.
तू जिंकली सत्याची ती लढाई,
चिंधूताईची झालीस तू सिंधुताई ।।६।।
माई तुझा हा समाज सेवेचा वसा,
शिक्षण व जगण्याची प्रेरणा अनाथांशी.
झाले डॉक्टर, वकील, अभियंते काही,
नमन माझे तव पुण्य कार्यास सिंधुताई ।।७।।

***

सावित्री अमुची माऊली

श्रीमती दिपाली गंगाधर पवार, सहशिक्षिका, नाशिक

तू होतीस म्हणून बघ, उभे राहिलो नव्याने,
तू होतीस म्हणून बघ, जगायला शिकलो नव्याने ।।१।।
स्वत:मधल्या स्त्रीत्वाचा, जागर तू केलास,
बुरसटलेल्या चालीरीतींना, उजागर तु केलेस ।।२।।

चूल न मूल बंधनाला, कापिले तू शिक्षणाने,
झेलले शेणा मातीचे गोळे, उत्तर दिले अभिमानाने ।।३।।
आदर्श तु नवा, आमच्या समोर ठेवला,
अंधारलेल्या समाजाला, आशेचा नवकिरण दिला ।।४।।
अनाथांची माय झाली, ज्ञानाची कवाडे उघडली,
अंधकाराच्या पिंजऱ्यातून, वाट मोकळी तू केलीस ।।५।।
ऋण तुझे फेडणे, संघर्ष तुझा विसरणे,
अशक्य आहे सारे, तुझ्याच कर्तृत्वाने,
फुटले उत्साहाचे धुमारे ।।६।।
दिले शिक्षणाचे दान, वसा चालवू तसा,
सावित्रीच्या लेकी म्हणून, बाळगू अभिमान स्वत:चा ।।७।।
काळजी नको माऊली आता, वाट आम्ही सोडणार नाही,
ज्ञानाची ज्योत अशी, सहज मालवणार नाही ।।८।।
मान संस्कृतीचा बाळगू, आजन्म वसा पाळू,
पवित्र ज्ञानाच्या प्रकाशाने, जग सारे उजळू ।।९।।
तरी मनी एक आस, प्रत्येक लेकीत असो तुझा वास,
सावित्री परी ती असावी, रुपात तिच्या तू पुन्हा जन्मावी,
तू पुन्हा जन्मावी ।।१०।।
तूच क्रांती... तूच ज्योती । तूच सावित्री... तूच सावित्री ।।

***

प्रिय सखी

दिपाली पवार-उकिरडे

कधी हसलीस तू, कधी रुसलीस तू,
प्रत्येक क्षण सखे, माझ्यासवे जगलीस तू ।।१।।
सुखात आवरलेस, दु:खात सावरलेस,
तुझ्या असण्याने सखे, बघ,
माझे जीवन आनंदाने भरले ।।२।।
मैत्रीचा अर्थ नवा, मला शिकवलास तू,
प्रत्येक क्षण सखे, माझ्यासवे जगलीस तू ।।३।।
संकटात ही तुझ्याबरोबर, खळखळून हसले,
दु:ख सुद्धा तुझ्यासवे, जवापडे वाटले ।।४।।
माझी सारी स्वप्ने, तुझ्यासोबत रंगविली,
तुझ्या, माझ्या लग्नाने, जर ताटातूटच केली ।।५।।
तुझ्या घरट्याचा भार, तुला वाहायचा चिमणे,
माझ्या पिल्लांमध्ये, मी सुद्धा रमले ।।६।।
कधीतरी क्षणभर, आठवण माझी काढत जा,
भावना उरातल्या, मनोमनी जपत जा ।।७।।
सख्यांशिवाय जगणे, जरा अवघडच आहे,
तुझ्यासारखी सखी, मन शोधतच राहे ।।८।।
तू जरी नसलीस, तरी सख्या मात्र खूप आहे,
त्यांच्या असण्याने बघ, जगण्याला उभारी येते,
पण आठवण तरीही तुझी, डोळ्यात माझ्या तरते ।।९।।

***

कुंदकळ्या

(सौ. संध्या खेडेकर)

(शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना झालेला आनंद या कवितेत व्यक्त होतो)

उघडले तें प्रवेशद्वार जणू आनंदाचे भांडार
फुल पाखरे ती प्रवेशली होऊनी मोदावर स्वार
ओसंडूनी वाहे उत्साह त्या चिमुकल्या जीवांचा
जशी मुक्त झाली पाखरे त्याग करुनी बंधनांचा ।।१।।
मित्र मैत्रिणींची गळाभेट होता हर्ष मनी मावेना
विरह संपुनी जाता नयनी आनंद मनी माईना
वर्ग खुणावती त्यांना होऊनी आपुले प्रेमळ दूसरे घर
मनी आठवे गुरुजन व सहकाऱ्यांचे प्रेम आणि आदर ।।२।।
झाली पहिली घंटा किलबिलाट तो थांबला
प्रार्थनेचा सूर तो आसमंती दाटला
करुनी ज्ञानार्जन गुरुजनांसवे मिळे समाधान
कोरोना पश्चात उघडली शाळा हे वाटे अपृपासमान ।।३।।
क्रीडांगणे भरली चैतन्य लहरी सळसळल्या
आनंद लहरी नादब्रम्हात दुमदुमल्या
एकचि मागणे मागते आता देवराया
आमच्या कुंद कळ्या भर भरून बहराव्या ।।४।।

***

आरती गोरोबाची

(रचना : दत्तात्रय धों. साळवी गुरुजी, कुंभारवाडी, रत्नागिरी)

आरती गुरुराया, स्वामी गोरोबा काका
ज्ञानमूर्ती ब्रह्मज्ञानी, चरणी ठेवितो माथा ।।धृ।।
चिखली बाळ तुडविले, नाम नाही सोडीले
भक्तीसाठी देव धावला, बाळ जीवंत केले
आरती .... ।।१।।
वैराग्याची खूण दाविली, नाही स्पर्शिली स्त्रीते
दिले वचन खरे करुनी, दिला आदर्श घालूनी
आरती .... ।।२।।
नामदेव रंगे कीर्तनी, टाळी वाजेना काकांची
प्रकटुनी विठ्ठलाने, हात दिले गोरोबांसी
आरती .... ।।३।।
भेटी आले ज्ञानदेव, ब्रह्मानंदी मीलन
अभंग लिहिले ज्ञानपर, ज्ञानी कौतुक केले
आरती .... ।।४।।
ऐसी थोर भक्ती केली, धन्य झाले संसारी
कथा त्यांची ऐकूनीया, पायी मस्तक ठेविले
आरती .... ।।५।।

***

स्त्री शक्ती

– अपूर्वा संजय कुंभार, कळंबोली



स्त्री म्हणजे शक्ती. स्त्री म्हणजे घराला येणारं घरपण. तिच्या अस्तित्वाची गिनती अगणित आहे. अगदी त्या आभाळाएवढी प्रचंड.

स्त्री समजली तर अगदी सोपी आणि नाही समजली तर तेवढीच कठीण. जितकी ती सौम्य तितकीच ती रौद्र आहे असे ते शिव ही शक्ती विना शव आहेत तसेच प्रत्येक पुरुष हा स्त्री विना अपूर्णच आहे. आपला समाज हा तसा पूर्वीपासूनच पुरुषप्रधान पण आपल्याकडे अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे स्त्रीचे अस्तित्व लख्ख–लख्ख जाणवते. आपल्या जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले अशा अनेक स्त्रिया होऊन गेल्या ज्यांनी इतिहास रचला आणि जगाला दाखवून दिले की एक स्त्री ही काय काय करु शकते किती भक्कम राहू शकते.

हळूहळू समाज हा बदलतोय खरा पण स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार हा तिढा मात्र अजून काही सुटला नाहीये. एकीकडे पुरुष स्त्री वर अन्याय करतोय, अत्याचार करतोय तर दुसरीकडे देवीची पूजा ही, पण तो हे कसे विसरला की जी पार्वतीमाता ममतेचे रुप आहे तितकीच ती महाकालीच्या रुपात रौद्र ही आहे. देवांचे देव महादेव यांनी ही कधी स्त्री आणि पुरुष हा भेद मानला नाही त्यांचे अर्ध अंग म्हणजेच पार्वती माता याचा उल्लेख सर्वत्र आहे पण काही काही ठिकाणी हे कसं लोकं सरास विसरतात. शिवाजी महाराजांच्या ओव्या गाताता लोकं पण त्यांनी दिलेली शिकवण मात्र विसरून जातात. त्यांनी नेहमी स्त्रियांचा सन्मान केलाय मग ती दुश्मनाच्या छावणीतली का असेना खूप ठिकाणी पाहिलं की स्त्रियांसोबत बोलताना लोक स्वत:चे भान हरपून बोलतात. स्वत:चे तारतम्य सोडतात. तेव्हा महाराजांनी जी शिकवण दिली ती कुठे जाते? ती फक्त डीपी आणि स्टेटस पुरती मर्यादित न ठेवता कायमस्वरूपी लक्षात ठेवली तर येणारी पिढी ही आपण दिलेल्या संस्कारांची शिदोरी घेऊनच पुढे जाणार आहे हे विसरून चालणार नाही.

आयुष्याच्या प्रत्येक नात्याचा साच्यात स्त्री ही तिची भूमिका चपखेल पार पाडते मग ते मूल जन्माला घालण्यापासून ते त्याच्या संगोपनाची भूमिकाही ती खूप छान सांभाळते. माझ्य मते स्त्रीमध्ये आई पण हे तिच्या लहानपणा पासूनच जन्माला आलेलं असतं कारण जेव्हा ती कोणाची तरी बहीण असते, प्रेयसी असते, बायको असते, आई असते, सासू असते अशा नात्यांच्या टप्प्यांतून जाताना ती अनेक नाती जन्माला घालते आणि त्याचं संगोपन ही उत्तम करते. कुटुंबवत्सल असणारी ती कधीकधी तिचे ही काहीतरी अस्तित्व आहे हेच ती विसरुन जाते पण तिच्यातील तो भक्कमपणा ती कधीच विसरत नाही आणि तो कधी तिने विसरू ही नये. खरंच ते म्हणतात ना प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री चा हात असतो, तिच त्याच्या जीवनाचा शिल्पकार असते ते तंतोतंत खरं आहे.

आजच्या युगातील स्त्री बद्दल बोलायचं झालं तर ती तिच्या क्षेत्रात नाव कमावून तिच्या घरच्यांचे नाव तर रोशन करतेच पण त्याच्याबरोबर तिच्या गावाचे, शहराचे आणि देशाचे ही नाव मोठं करते. मुल सांभाळण्यापासून ते तिच्या कुटुंबाचे संगोपन करण्यात ती हातभार लावते अशा या नारी शक्तीचा सन्मान जागतिक महिलादिना पुरता मर्यादित न ठेवता तो दररोज व्हावा त्यातच खरा तिचा सन्मान आहे, तिची पूजा आहे. आजच्या युगातल्या प्रत्येक स्त्रीसाठी माझ्या शेवटच्या दोन ओळी...

''स्त्री हीच भावना आहे,
स्त्री हीच शक्ती आहे.
तू आहेस म्हणून जग आहे...
तू आहेस म्हणून वात्सल्य आहे.
पण तुझ्यातली तू कधी हरवून देऊ नकोस.
स्वत:साठीही जगायचे हे ही कधी विसरु नकोस.
हे कधी विसरु नकोस.''

***

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



राजेश शिंदे
9850973056



महेंद्र शिंदे
9922434389

स्नेहल केटरर्स



आमच्याकडे कार्यासाठी लागणारी सर्व
भांडी, बुफे सेट, टेबल, खुर्ची, सतरंजी भाड्याने मिळतील.
सर्व प्रकारच्या केटरिंगच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातील.

हनुमान हौसिंग सोसायटी, रूपीनगर, पुणे 411062





डॉ.युवराज कुंभार
M.B.B.S., M.D.(Anaesthesia)
9850422933



डॉ.वर्षा युवराज कुंभार
B.A.M.S.
9226115696

समर्थ हॉस्पिटल

सर्जिकल, मॅटर्निटी व जनरल हॉस्पिटल

कामशेत, पवनानगर रोड, ता.मावळ, जि.पुणे







मा. श्री. सतिश दरेकर

प्रदेश अध्यक्ष-कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश
मा.सभापति, विधिसमिती पिंचरी चिंचवड महानगरपालिका
मा. सभासद, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ
9922501601 / 9422511601



Anita Borde
Partner
9881743763 / 9623158939



Sonali S. Borde
B.E. (Electrical)



Sagar Borde
Central Govt. Employee



Chi.hrishikesh Borde
Director of Photography

Qual - Comm Enterprises

Design & Mfg. Sheet Metal Dies,Jigs, Fixture
Gauges, Panel Checker & VMC Job Work

Works : Gat No. 169, Shop No. 6,
Talwade Road, Near Saraswati
Vishwavidyalaya, Talwade, Pune - 14.
E-mail : qualcomm_enterprises@yahoo.com
Website : www.qualcommenterprises.co.in


सुनिल शिवाजी शिंदे
९९७०१४८९४७


सौ.सीमा शिवाजी शिंदे
९६५७९७२६६३


विनायक सुनिल शिंदे
९८९०९६२०५५


सौ.श्रृती विनायक शिंदे

विनायक आर्टस्

आमच्याकडे सार्वजनिक श्रींची मुर्ती मिळेल व
तसेच रिपेंटींग करून मिळेल नवरात्रीच्या देवींची
मुर्ती मिळेल दिवाळीची खेळणी, किल्ले
लक्ष्मी व गौरीचे मुखवटे होलसेल भावात मिळतील

हनुमान हौसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे, पुणे ४१२११४


मंगेश विष्णू जाधव
9921231618


उत्तम विष्णू जाधव
9049283598


श्रीकांत उत्तम जाधव


वैष्णवी उत्तम जाधव

वीट कारखानदार

आमचेकडे सर्व प्रकारच्या विटा
होलसेल व रिटेल भावात मिळतील.

मु.पो चाटोरी, ता.निफाड, जि.नाशिक ४२२ २१०


Suresh P. Jondhale


Sau.Aarti S. Jondhale


Chi.Rushikesh S. Jondhale
B.E. (IT)


Miss Sonal S.Jondhale
BCA, MBA

Asmita
FOODS & SPICES

Mfg. All types of flours
& spices sugar grinding

Plot No. B-215, MIDC, Malegoan, Tal. Sinar, Dist. Nashik
Email : asmitanr@gmail.com Mob.: 9404215237

सोनल कन्स्ट्रक्शन
बिल्डर व डेव्हलपर


लक्ष्मीकांत द.शिंदे

SONAL CONSTRUCTION
BUILDER & DEVELOPER


सौ.प्रमिला शिंदे


मानसी लक्ष्मिकांत शिंदे
B.E. (E&TC)


चि.यश लक्ष्मीकांत शिंदे
D.C.E, B..E.(Civil)

प्लॉट नं.५, हरीप्रसाद, एन.एम.सी. हॉस्पिटल शेजारी, अचानक चौक,
शिवाजी चौक, जुने सिडको, निशिक. ४२२००९ मो.९८२२४२९०१०

।। श्री गोरोबाकाका प्रसन्न ।।


श्री.बी.एस. कोते
9822747777

श्री माऊली मोटर्स

आमचे येथे स्पे. महिंद्रा पिक अप,
इंडिका, सुमो, ४०७, ७०९, एल.पी.एस.ई.
जे.सी.बी. गाड्यांची खरेदी विक्री
कमिशनवर केली जाईल


श्री.रुपेश कोते
9561811777

मा. अध्यक्ष, श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्ट, आळे


श्री.प्रतिक शिंदे
9850506422

माऊली कोल डेपो

आमचे येथे दगडी कोळसा, राख, भिलाई राख,
बेल्लारी राख, गोवा राख, कोल्हापूर राख ठोक
व किरकोळ भावात मिळेल.


श्री.स्वप्निल शिंदे
9860244243
9890709205

मु.पो. आळेफाटा, ओतुर रोड, ता. जुन्नर, जि. पुणे

प्रेरणास्थान


कै.छगनराव पंढरीनाथ कुंभार


सौ. शांताबाई छगनराव कुंभार


प्रोप्रायटर
श्री. संजय छगनराव कुंभार


श्री. सागर संजय कुंभार
B.Arch.
9960575555

भाग्यलक्ष्मी विट सप्लायर्स

आमचेकडे उत्तम प्रतीच्या विटा
होलसेल भावात मिळतील.

निवास : भाग्यलक्ष्मी, नितीराज पेट्रोल पंपाशेजारी,
मु.पो. उंब्रज, ता. कराड, जि. सातारा. मोबा.: ९४२३२६०५१५

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!





मा. आर. बी. के. प्रजापती

निवृत्त इन्कमटॅक्स कमिशनर
राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय
प्रजापती कुंभकार महासंघ
शिक्षीत बनो – संघटीत हो – संघर्ष करो !

ऑफिस : फ्लॅट नं.१२, ४था माला, द मालाड योजना को.ऑप.हौ.सोसायटी,
न्यू येरा सिनेमाके सामने, एस.व्ही.रोड, मालाड (प), मुंबई ४०००६४
टेलीफॅक्स : (०२२) २८८१३३२० मो. ९९३०४७७७३०
• E-mail : abpkmahasangh2009@gmail.com • website : www.abpkmahasangh.net



साई मंगल गारमेंन्टस

रेडीमेड कापड व
लग्न बस्त्याचे भव्य दालन

प्रेरणा स्थान


स्व. श्रीरामशेठ सौदागर


स्व.प्रकाश श्रीराम सौदागर

।। श्री सुपोजी कृपा ।।


श्री. अमोल श्रीराम सौदागर

प्रोप्रा.:अमोल श्रीराम सौदागर
मोबा. ८८८८५१४९४९

जय श्रीराम कॉम्प्लेक्स, बस स्टँडसमोर, मेनरोड, जळगांव जामोद, जि.बुलढाणा पिन-४४३४०२


श्री.नामदेवराव वि. कुंभार
संचालक मावळ तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती
(वरिष्ठ सल्लागार महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था/
मा.ग्रा.पं.सदस्य वडेश्वर, माऊ/संचालक टाकवे बु.वि.का.सो.)
9881592880, 9890877980


श्री.मच्छिंद्र ना.कुंभार
(मृदुंगाचार्य)
9767150494


कु. वेदांत मच्छिंद्र कुंभार


कु. सिद्धांत समिर कुंभार




श्री.समिर ना.कुंभार
(युवा अध्यक्ष अखिल महा.
कुंभार समाज विकास संस्था मावळ/
दिंडी सोहळा मावळ सदस्य)
7038103338

गवत व पेंढ्यांचे व्यापारी
चैतन्य कानिफनाथ ट्रान्सपोर्ट व ट्रॅक्टर सर्विस

पत्ता - मु.माऊ, पो.टाकवे बु. ता.मावळ जि.पुणे ४१२१०६



डॉ. संजय बाबुराव कुंभार

M.B.B.S., MSCSEPI
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,
उंब्रज, ता.कराड, जि. सातारा
अध्यक्ष, सातारा जिल्हा कुंभार समाज
महासंघ

Email : drsanjaykumbhar@yahoo.in
Mob. 8275481481
7387370348


सौरभ संजय राजे(कुंभार)
Flying Officer
Indian Air Force


सौ.आकांक्षा सौरभ राजे
M.Sc.(Stat.) B.Ed.

डॉ. सौ. सुजाता संजय कुंभार

M.B.B.S., MD.(Pathalogy)
असोसिएट प्रोफेसर, कृष्णा वैद्यकीय
महाविद्यालय, ता.कराड, जि. सातारा



Email : drsujatakumbhar@yahoo.in
Mob. 9272325081

निवास : 'कृष्णाई निवास', गांधीनगर, मु.पो.काले, ता.कराड, जि.सातारा



शामराव जगन्नाथ राजे

मो. 9890104105, 9422293900

- प्रदेशअध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था, महाराष्ट्र राज्य.
- प्रदेशउपाध्यक्ष बाराबलुतेदार महासंघ, महाराष्ट्र राज्य.
- मा.विश्वस्त संत गोरोबाकाका मंदिर व धर्मशाळा, आळंदी
- अध्यक्ष निरा विकास आघाडी, निरा-शिवतक्रार

मु.पो. निरा, ता.पुरंदर, जि.पुणे - ४१२ १०२



प्रोप्रा.: ज्ञानेश्वर (माऊली) सावळेराम जाधव
उपाध्यक्ष, पुणे जिल्हा (वाहतूक संरक्षण विभाग)
अखिल भारतीय ग्राहक संरक्षण समिती
पत्रकार, दै. गावकरी महाराष्ट्र
राज्य मराठी पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य)
मोबा. : ९६५७५१६६९९



कु. ईश्वरी ज्ञा. जाधव



प्रोप्रा.: रमेश सावळेराम जाधव
मोबा. : ९८९०७७६१८९



सचिन र. जाधव
ॲनिमेशन डिग्री
मोबा.: ९७६६१४६१६१

सुखकर्ता गणेश मुर्ती

सदा सर्वदा सुख देणाऱ्या आकर्षक व सर्वांग सुंदर गणेश मुर्ती तसेच नवरात्रोत्सवासाठी आकर्षक दुर्गा मातेच्या मुर्ती मिळतील.

कुंभार आळी, मु.पो.ता. जुन्नर, जि. पुणे



इंद्रायणी विट कारखाना

घराला घरपण देणाऱ्या उत्तम प्रतीच्या मातीच्या भाजीव विटा योग्य दरात मिळतील.





मदनआर्ट NSK-1

ऑल इंडिया वॉल पेंटींग कॉन्ट्रॅक्टर

Enhancing your business

डिजीटल Flex बॅनर

- होर्डिंग, वॉल पेंटींग विनायल, इको सॉल्वंट वन-वे प्रिंट, फोम शिट
- कॅनव्हास प्रिंट ॲक्रेलिक लेटर, अल्को पॅनल L.E.D., बोर्ड, रेल्वे ॲड
- मोबाईल व्हॅन, गेन्ट्रींग एस.टी. ॲड, (kiosks)

शॉप नं.१२,गोरेराम कॉम्प्लेक्स,गोरेराम लेन रविवार कारंजा,नाशिक-४२२ ००१(महा.)
☎ : 0253-2599794 / 9960978699 / 7020231030
Madan.arts77@gmail.com



श्री.मदनलाल रा.प्रजापती
Owner Of Madan Arts / M. Advertising



कु. भाग्यश्री म.प्रजापती
B. Sc. Interior Designer



कु.मनिष म.प्रजापती
Graphic Designer

मयुरेश पेंटस्



श्री.रत्नकांत दगडू कंभार
९८२२९७८४५७



श्री.किशोर रत्नकांत कुंभार
९८८१०३१६२१



श्री.सुनिलकुमार रत्नकांत कुंभार
९०२८९०००५०

अधिकृत विक्रेते : NEROLAC, ESDEE, CAMEL

आमचेकडे प्लास्टर व शाडू मातीच्या गणेशमुर्ती बनवण्यासाठी व रंगविण्यासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य व रंग योग्य दरात मिळेल.

★ रबर ★ प्लास्टर ★ शाडू ★ केसर ★ सर्व प्रकारचे रंग
★ स्प्रे गन ★ ब्रश इत्यादी साहित्य मिळेल

इमारत रंगविण्यासाठी आवश्यक सर्व रंग व साहित्य योग्य दरात मिळेल

★ पुट्टी ★ प्रायमर ★ इमल्शन

पत्ता : सुरभी चौक, मु.पो. उंब्रज,ता.कराड, जि.सातारा पिन ४१५११०९

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



श्री क्लिनिक

आरोंदा, ता.सावंतवाडी,
जि.सिंधुदूर्ग ४१६ ५१३.
फोन : ०३६३-२६२२११
मोबा : ९४२२४३४१९१

तपासणी वेळ :
मंगळवार ते गुरु
शनि. ते रवि.
सोमवार बंद

डॉ.सुखदेव मा.कुंभार
M.D.(Hom.)
होमिओपॅथिक कन्सल्टंट



श्री होमिओपॅथीक क्लिनिक

ग्रिन हिल, शांतादुर्गा मंदिर रोड,
दामीयान दि गोवा समोर,
पर्वरी, गोवा.
9404777881, 7262827010

तपासणी वेळ :
सकाळी १० ते २
संध्या : ४.३० ते ८.००
सोमवार बंद

डॉ.शुभंम सुखदेव कुंभार
M.D.(Hom.)
होमिओपॅथिक कन्सल्टंट



॥ श्री धोंडीराज महाराज प्रसन्न ॥

प्रोप्रा. श्री यशवंत कुंभार
8308800826, 9561103176, 9028994497

श्री राम कृषी सेवा केंद्र

द्राक्षबाग, डाळींब, ऊस, केळी व भाजीपाला इ.सर्व पिकांसाठी सल्ला मिळेल.



स्टेट बँकेसमोर, गुंडादाजी कॉम्प्लेक्स, पलूस, जि.सांगली (महाराष्ट्र)



वसंतशेठ ठमाजी रसाळ

अध्यक्ष : जुन्नर तालुका वीट कारखानदार
मा.अध्यक्ष : जुन्नर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ
मो. : 9766626570
9960286456





सचिन रंगनाथ रसाळ

संचालक, सिध्देश्वर ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था
मो. : 9766335673

वसंत रसाळ आणि कंपनी

आमचेकडे उत्तम प्रकारची वीट
होलसेल भावात मिळेल.

पत्ता : मु.पो.नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे-४१०५०४



कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


श्री.किसनशेठ बा.काळे
(उपाध्यक्ष महा.राज्य कुंभार विकास सं.)
अध्यक्ष संत गोरोबा काका पायी दिंडी सो.मावळ ता.


सौ.उर्मिला कि. काळे


कु.ओमकार कि.काळे


कु.करण पा.काळे


श्री.रामचंद्र र.सोमवंशी

ओमकार विट कारखाना आणि ट्रान्सपोर्ट,
ओमकार ऑटोमोबाईलस्, ओमकार डेव्हलपर्स, करण ऑईल डेपो

पत्ता: श्री दत्त कॉलनी मु.पो.कामशेत, ता.मावळ, जि.पुणे | ऑफिस: साई एंटरप्राईजेस,जुना मुंबई पुणे महामार्ग, सहारा कॉलनी समोर, कामशेत
साईट :स.न.२६४कुसगांव खु ।। ता.मावळ जि.पुणे. मो.9823587625, 9763173271


Sharanu B. Kumbhar
Managing Director
+91 9970055139


Shakuntala Kumbhar
Mob.: 9011658969


Ashwini Kumbhar
B.Com, MBA


Aakash Kumbhar
B.E.(Mech.), MBA
9970023335

Aakash Press Parts Pvt. Ltd.
APPL Sector No.10, Plot No. 4/15, Vishweshwar Chowk, PCNTDA, Bhosari, Pune - 411 026.
Email : aakashent@rediffmail.com / aakash@aakashpressparts.com Website : www.aakashpresspart.com

।। श्री संत गोरोबा काका प्रसन्न ।।

स्वस्तिक ब्रिक्स



प्रोप्रा. सुनिल नारायण जाधव
बी.कॉम., एल.एल.बी.
उपाध्यक्ष : पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळ
मा. अध्यक्ष, जुन्नर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ, जुन्नर
उपसरपंच, ग्रामपंचायत, सोमतवाडी
जुन्नर तालुका अध्यक्ष–राष्ट्रवादी कॉंग्रेस (ओबीसी सेल)
उपाध्यक्ष–तंटामुक्ती समिती, सोमतवाडी
मोबाईल : 9850777178/ 9970988777



'गणराया' सोमतवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे



प्रोप्रा. :
अनिल नारायण जाधव
डी.सी.ई.
कुंभार आळी, जुन्नर
Mob.: 9373702573



सुरज कन्स्ट्रक्शन
स्वस्तिक अर्थ मुव्हर्स
लँड डेव्हलपर्स व बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

Our Inspriation


Chandrakant More


Ratnamala More

Il Shree Il
C.M. चंद्रकांत मोटर्स
सर्व प्रकारच्या चार चाकी व कमर्शियल गाड्यांची खरेदी विक्री
(ट्रक, डंपर, हायवा, २५१५, ३११८, जे.सी.बी व इतर)

TRUCK BAZI
BUY SELL RENT FASTER
App For Used Truck & Construction Equipments
GET IT ON Google Play


कुणाल मोरे
D.A.E.


सौ. सपना मोरे
B.Com

मो.: ९५४५८८६६६६
Email : kunalmore100@gmail.com

शॉप नं. १, जगताप डेअरी, विशालनगर,
पिंपळे निलख, औंध वाकड रोड, पुणे - २७.

"Ice-Bergs"
Softy, Shaks, Scoops & Cold Coffee Chat & Fast Foods
Shivaji Nagar, Gokhale Road, Eden Hall, Shop No. 4, Pune-411016. Contact No.: 9665020179



Prathmesh Caterers



Veg & Non Veg

We accept Outdoor Catering Orders for all occasions.

Baburao (Babi) S.Shetkar **Mob.; 9823615500**

Near Fly Over Bridge, Khareband Road, Margao - Goa

ADVOCATE ADVOCATE



ॲडव्होकेट संदिप बाळासाहेब वाघमारे

मोबा.: 9767892400

ऑफीस १ : ऑफीस नं. ११, श्री चेंबर्स, जिल्हा न्यायालयासमोर, शिवाजीनगर, पुणे-४११००५.

ऑफीस २ : सर्व्हे नं. ७७/१/३९, दुसरा मजला पाडाळे कॉम्प्लेक्स, डी-मार्ट समोर, काळेवाडी, पुणे-४११०१७.

Email : sandeepw7@gmail.com

Website : www.adlitem.in



मा.श्री. नारायणराव कुंभार (बावडेकर) साहेब मा.रजिस्ट्रार, मुंबई हायकोर्ट यांना कुंभार समाजभूषण पुरस्कार देताना महाराष्ट्र भूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदर



समाजभूषण

नारायणराव ना. कुंभार (बावडेकर)

मा. प्रबंधक, हायकोर्ट मुंबई

TWIN TOWER, ११वा मजला, फ्लॅट नं.११०६, मायकार शोरुम मागे वाकड, पुणे ४११०५७



प्रकाश हरीभाऊ भालेराव



नंदकुमार हरीभाऊ भालेराव







कु.आर्या प्र.भालेराव



कु.काव्या प्र.भालेराव

गजानन रोडवेज व आर.टी.ओ. सल्लागार

सर्व प्रकारच्या १४ टायर १२ टायर गाड्या माल वहातुकीसाठी मिळतील

मु. पो. कुंभारवाडा, ता. अकोले, जि. अहमदनगर



प्रशांत प्रकाश भालेराव
मो.: 9765670670



गणेश प्रकाश भालेराव
मो.: 9960887546
B.E., Senier Engg.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

डेअरी ईक्विपमेंटस् व अन्नप्रक्रिया, लघु उद्योगासाठीचे फूड प्रोसेसिंग मशिनरीचे उत्पादक

Our New Product For Builders and Contractors "New Mini Lifter"





दिलीप शामराव घोडनदीकर
अध्यक्ष, लायन्स क्लब, पुणे आकांक्षा
प्रोप्रा : दिलीप शामराव घोडनदीकर
मोबा. : 09371012308

प्रोप्रा : दिगंबर दिलीप घोडनदीकर
मोबा. : 9850150415

प्रोप्रा : प्रविण दिलीप घोडनदीकर
मोबा. : 9028530827

स्टॅन्डर्ड इंडस्ट्रिज
एस-८७, एम.आय.डी.सी., भोसरी, पुणे - ४११ ०२६.
फोन : 020-46767656

स्टॅन प्लॅंट इंडस्ट्रिज
सर्वे नं. ४३/९-१६, मानाजी नगर, नऱ्हेगांव, पुणे ४११ ०४१.
फोन : 020-24699229
● Email : response@stanplant.com
● dilip.ghodnadikar@gmail.com ● www.stanplant.com



प्रोप्रा.निलेश मुरलीधर जाधव
9730499808
7385719059



चि.सार्थक निलेश जाधव



चि.कृष्णा निलेश जाधव

सार्थक ट्रेडर्स
डिस्ट्रीब्युटर कंपनी

कृष्णा ट्रेडर्स

डिस्ट्रिब्युटर्स : अमुल आईस्क्रीम, कॅडबरी इंडीया लि, रेकिट बेन्स्काजर(डेटॉल) बालाजी कार्पोरेशन लि, केवीन केअर प्रा.लि.

डिस्ट्रिब्युटर्स : सोसायटी चहा, कॅपिटल फुडस् प्रा.लि.(Chings), वैभव मार्केटिंग कॉरपोरेशन(Ozone. 555), बीजूर सोपर फुडस् प्रा.लि. खंडेलवाल फुड प्रॉडक्टस्, केशरत्न फुड प्रोडक्टस्

यशश्री रेसिडेन्सी, कोल्हे मळा, मु.पो. नारायण गाव ता.जुन्नर, जि.पुणे 410504

श्री गणेश क्रेन सर्व्हीस





नंदकुमार शिंदे
९८२२४९१०५७



गणेश शिंदे
८८५५०५५५०६

एस.ब्लॉक, एम.आय.डी.सी. लुब्रीकेअर कंपनी जवळ, भोसरी, पुणे २६
Email : shreeganeshcraneservices@gmail.com

आमचे प्रेरणास्थान



श्री. शंकरराव नथूजी सोनवणे
सौ. भागीरथीबाई शंकरराव सोनवणे



आंबादास शंकर सोनवणे
9767992111

श्री सप्तशृंगी वीट सप्लायर्स व बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स

सप्तशृंगी कोल-ॲश व बगॅस (भुस्सा) सप्लायर्स

उत्तम प्रकारची वीट व बांधकाम साहित्य होलसेल भावात मिळेल.

शुभम आर्टस्



नंदकुमार शंकर सोनवणे
अध्यक्ष : महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था, येवला तालुका
9823397933, 8605664111



कैलास शंकर सोनवणे
8605685111

सर्वांग सुंदर गणेश, नवरात्र देवी व महालक्ष्मीच्या मुर्ती होलसेल व रिटेल भावात मिळतील.
मु.पो. नागडे, ता. येवला, जि. नाशिक ४२३४०१. मोबा.: 8624992111 / 7646021111 / 9226795569

तिची कहाणी

- अनसूया कुंभार, डोंबिवली



मी नातीला घेऊन बागेत गेले. तिथे गेल्यानंतर ती इतर मुलांबरोबर खेळण्यात दंग झाली. मी एका बाकावर बसून इकडचे तिकडचे निरीक्षण करु लागले. लक्ष जात होते एकदा नातीकडे, एकदा देवळातून वाजणाऱ्या घंटेकडे तर एकदा रस्त्याकडे! समोरच्या फूटपाथवरुन एक ७/८ महिन्याचे कळकटलेले बाळ खालीवर करत होते. त्याची आई फूटपाथवर पथारी टाकून २०-२५ मास्क विकायला बसलेली दिसली. ते बाळ फूटपाथवरुन खाली रस्त्यावर उतरायचे. त्याला ती कित्येकदा खेचून वर घ्यायची. काहीवेळा बागेतल्या घसरगुंडीकडे पाहायची. बाळ पुन्हा चटकन रस्त्यावर गेले नि माझ्या काळजाचा ठोकाच चुकला!

रस्त्यावर बरीचशी वाहने ये-जा करीत होती. अंधार पडायची वेळ! न जाणो बाळ वाहनाखाली चिरडले गेले तर...? मी पटकन उठले नि त्या बाईकडे धावले. ''ओ बाई! बाळाचा हात नीट पकडून ठेवा ना! कळत नाही का रस्त्यावरुन वेगानं मोटारी जातायत त्या!''

बाई केविलवाणे तोंड करत मला म्हणाली, ''काय करु ताई? लईच चळवळी हाय ती! कुठं म्हणून लक्ष देऊ मी? हा धंदा करु का या आरतीला बघू का त्या घसरगुंडीवर खेळणाऱ्या भारतीला बघू? दोन पैसे तर कमवायला हवं ना ताई?''

''आँ? अन् तुझा नवरा काय करतोय गं बाई?'' असे मी विचारताच डोळ्यात आलेली आसवं पुसून स्तब्ध होताच ती सांगू लागली-

''मी दहावीत होते तेव्हाची गोष्ट! आई सात-आठ घरची धुणीभांडी करायची. बाप बिगारीकाम करायला निघून जायचा. घरची कामं भावंडं यांची कामं माझ्यावर पडायची. पाच भावंडं नि आईवडील, सात जणांच्या भाकऱ्या थापणं, धुणं भांडी करता करता जीव मेटाकुटीस यायचा. ना कधी गोड धोड; ना कधी लाड, ना कधी कौतुक! उबग यायचा साऱ्यांचा! शाळेत कधी तरी हजेरी लागायची. पास नापास होता-होता पोचले एकदाची दहावीत! वय वाढू लागलं होतं. वडील दारु पिऊन घरी येत असत. हात रिकामे! आई संतापायची. मग भांडणाला घरात ऊत यायचा. त्यावेळी वडलांना धरुन धरुन घरी पोहोचवायला एक संतोष बिहारी नावाचा तरणा मुलगा सतत यायचा.

माझ्या मनात चलबिचल सुरु झाली. त्याची डोळ्यांची खुणवाखुणवी मला आवडायला लागली. तोही बिगारी काम बांधकामावर इमानाने नोकरी करायचा. दोन वर्ष आमचा सिलसिला चालू राहिला. संतोषला आई-वडील नव्हते. काकी-काकाकडे राहून रोजी-रोटी कमवायचा. त्याला आधाराचं माणूस हवं होतं आणि मीही घरच्या परिस्थितीला कंटाळले होते. वाटलं याच्याशी लग्न केलं तर याचही भलं नि आपलंही भलं! त्याचं वीस व माझं अठरा साल पूर्ण होताच आम्ही एका देवळात जाऊन भटजीसमोर गुपचूप लग्न केलं!

माझ्या घरच्यांना युपीकडचा संतोष मुळीच आवडणारा नव्हता. आम्ही लग्न करुन संतोषच्या घरी काका-काकींकडे राहायला घरात जातो न जातो तोच काकाने संतोषच्या थोबाडात मारत म्हटले, ''ये दरिद्री मराठी लड़की उठाके लाया हैं मेरे घरमें! मैं तुझे अच्छे घरानेकी लड़की नहीं ढूँढ़ सकता था क्या? चले जाव इधरसे! मेरे घर में कभ्भी पाँव मत रखना समझे?''

आम्ही दोघंही अवाक्! संतोष म्हणाला होता खरं! माझे काका खूप शांत आहेत. पण आता दोन्ही घरातून विरोधच उफाळला होता. कुठे जायचे, कसे राहायचे हा मोठा प्रश्न! आम्ही अक्षरश: रस्त्यावर आलो. झोपडपट्टीच्या बाजूलाच जरा दूरवर असलेल्या मोठ्या वडाच्या झाडाखाली आम्ही रडत-रडत रात्र घालविली. दोन तीन दिवसांनी संतोषच्या दोन मित्रांच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी पदरमोड करुन जुने पत्रे मागविले. काही बांबूंच्या आधाराने पत्र्याची शेड उभारुन दिली. जीवनक्रम सुरु होण्यासाठी निवारा मिळाला हे काय कमी होते! आम्ही खूश झालो.

रोजंदारी, बिगारी कामं करता करता चार वर्ष कशी संपली कळलेच नाही. तोपर्यंत झोपडीत दोन मुलींचा चिवचिवाट सुरु झाला होता. भारती तीन वर्षांची तर आरती सात महिन्यांची झाली होती. कशी तरी हातातोंडाची गाठ पडत होती. पण दैवाला तेही सुख पाहावलं नाही. एके दिवशी बांधकामाच्या इमारतीवरुन संतोष खाली पडला. डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा देह निष्प्राण झाला. आता या मुलींना घेऊन मी कुठे जायचे? कसे राहायचे? हे मोठे प्रश्न माझ्यासमोर उभे राहिले. परजातीत लग्न केल्यामुळे आई वडिलांनी व संतोषच्या काका-काकींने आमच्याशी आधीच संबंध तोडले होते. तेवढ्यात झोपडपट्टीच्या गल्लीतल्या दोन वृद्धांनी मला आसरा दिला. गल्लीतल्या पडक्या भिंतीवर आधीच्याच शेडचे पत्रे ठोकून राहण्यासाठी जागा साफसूफ करुन दिली. आता तिथे राहते आहे. मास्क विकण्याच्या निमित्ताने या दोन पोरींना घेऊन भीक मागते आहे. पाच-दहा रुपये जमले तर वडापाव खाऊन जगते आहे झालं!''

तिच्या डोळ्यांना पुन्हा आसवांची धार लागली. ती डोळे निपटीत म्हणाली, ''मी जिवाचं रान करीन. त्या मोठ्या झाल्यावर धुणीभांडी करुन यांना वाढवीन पण हटणार नाही!'' या चिमण्या जिवांना माझ्याशिवाय कोण आहे दुसरं? चला ताई, रात्र पडली. आता घरी जायला हवं!'' मी तिच्या हातात पाचशेची नोट सरकवली म्हटलं, ''मधून मधून या बागेच्या गेटशीच भेटत रहा बरं!''

मी बोलण्यात बराच वेळ गुंतल्यामुळं नातीनंही बागेत भरपूर खेळून घेतलं होतं. मी तिला घेऊन घरी आले. पण रात्रभर 'ती'ची कहाणी माझ्या डोळ्यासमोरुन हलेना! मी पैशानेच थोडीफार मदत करु शकत होते तिला पण तिच्या पुनर्वसनाचा, आयुष्याचा प्रश्न मी काही सोडवू शकत नव्हते. काय करावं बरं? पंधरा दिवस मी विचार करत होते. एखादा मुलगा व्यसनी निघाला किंवा त्याची कितीही पडती बाजू असली

तरी आई-बाप मदत करीत त्याला सावरीत असतात.

वंशाचा दिवा ना तो!

पण ह्या दोन मुलींच्या आईला ना आईबापांनी थारा दिला, ना तिच्या सासुसासऱ्यांनी! नाती कशासाठी असतात? दया, माया, करुणा ह्या नुसत्या बोलण्याच्या गोष्टी आहेत का? माझं विचारचक्र धावू लागलं. शहरातल्या दोन स्त्रीमुक्ती संघटना माझ्या डोळ्यासमोर आल्या. त्यातील एक संस्था नावालाच उभी होती. हळदीकुंकू समारंभ, सहली व भाषणबाजीच्या पलीकडे जाऊन ती काही करत नव्हती. पण दुसरी 'आदर्श स्त्रीमुक्ती' संस्था खरंच चांगलं काम करताना दिसत होती. मी एकदा, त्या संस्थेच्या कदम मॅडमना जाऊन भेटले.

मॅडमनी 'ती'ची सारी कथा माझ्या तोंडून ऐकून घेतली. त्या म्हणाल्या, ''सुमनताई तुम्ही म्हणता ते खरे आहे! त्या तिघींचे जीवन कोमेजून जाणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे. अशा कित्येक नडलेल्या, फसलेल्या, रस्त्यावर आलेल्या स्त्रियांचे प्रश्न आम्ही सोडवले आहेत. आपले जीवन फुलवता फुलवता दुसऱ्यांचेही जीवन फुलवण्यासाठी प्रयत्न करणे ही सुद्धा एक देवपूजाच आहे बरं! आपण प्रयत्न करीत राहू. यश मिळत राहिलच!'' माझ्या मनातील अवघड प्रश्नांना उत्तरे मिळत गेली. मी खूश झाले. महिन्या-महिन्यांनी ती भेटली की उदरनिर्वाहासाठी पैसे देत राहिले.

आदर्श स्त्रीमुक्ती संघटनेच्या सदस्या कामाला लागल्या होत्या. त्या तिघींना सदस्यांनी सिमेंट, वाळू, विटांची एक पक्की खोली बांधून सहारा दिला. एवढ्यावरच कदम मॅडम थांबल्या नाहीत. त्यांनी तिला एका अंगणवाडीच्या आशाताईच्या हाताखाली दाईचे काम शोधून दिले. तिच्या दोन्ही मुलींची अंगणवाडीतील सुविधांमुळे चांगली सोय झाली. थोडी धुणीभांडी करुन ती चार पैसे कमवू लागली. पण कदम मॅडमनी पुढच्या भविष्याचा तिच्या मुलींचा विचार करुन तिला तीन महिने शिवण क्लास मध्ये शिकण्याची संधी दिली. संधीचे सोने करीत तिने शिवणामध्ये प्राविण्य मिळवले. आरती अंगणवाडीत तर भारती झेडपीच्या शाळेत शिकायला जाऊ लागली.

मी मधून मधून संघटनेत, अंगणवाडीत जाऊन तिची चौकशी करायची. तिचे जीवनमान सुधारण्यास संघटनेने खूप मोलाचे कार्य केले होते. ''तिला आधार मिळाला नसता तर गरिबीत पिचत पिचत तिघींना प्राण गमवावे लागले असते ना हो कदम मॅडम?'' माझे डोळे भरुन आले. माझ्या पर्समधले पेन्शनीचे आलेले पाच हजार मी कदम मॅडमच्या हातावर टेकवीत म्हटले, ''मॅडम ही माझी छोटीशी मदत घ्या नि तिला शिलाई मशीन घेऊन द्या बरं!'' मॅडमनीं माझे खूप आभार मानले. त्या म्हणाल्या, ''तुमच्या सारखी देवमाणसं समाजात आहेत म्हणून आमच्या सारख्या संघटना उभ्या आहेत!'' त्या तिघींचे सुरळीत झालेले जीवन पाहून मी धन्य झाले!

***

वडिलांचे ऐकाल तर कायम खूश राहाल...।

- उत्रेश्वर पेटकर

* वडिलांची जागा कोणालाही घेता येत नाही. म्हणूनच वडिलांच्या रागाला सहन करायला शिका, तरच तुम्ही लायक व्हाल.
* कोण्या बाहेरच्यांचे ऐकून घेण्यापेक्षा वडील जे सांगतील ते शांतपणे ऐका.
* वडिलांच्या समोर आवाज वाढवून बोलू नका.
* वडिलांचा आदर करा... त्यामुळे तुमची मुलं तुमचा आदर करतील.
* वडिलांचा सन्मान करा, यातच तुमचे भले होणार.
* वडिलांचे म्हणणे ऐका, तुम्ही नक्कीच खुश रहाल.
* वडिलांच्या समोर तुमची नजर झुकवून बोला.
* वडील म्हणजे एक पुस्तक आहेत ज्यामध्ये अनुभव लिहिले जातात.
* वडिलांचे अश्रू तुमच्या समोर वाहू देऊ नका.
* वडील म्हणजे आपल्या जीवनात एक असं व्यक्तिमत्त्व आहे की ते कोणत्याही मापात मोजता येणार नाही... आईची जागा कोणीही घेऊ शकत नाही... पण बाप तो बापच असतो...
* आईच्या पायाखाली स्वर्ग आहे... पण बाप त्या स्वर्गाचा दरवाजा असतो.
* विचार करा हे दरवाजेच उघडले नाहीत तर स्वर्गात प्रवेश कसा मिळवाल.
* बाप मग तो शिक्षित असो वा अडाणी, ज्याला उन्हातान्हात सुद्धा मुलांच्या जीवनाचे कल्याण करण्याची काळजी असते... तुम्ही स्थिरस्थावर झाल्याशिवाय बापाला चैन पडत नाही.
* बाप असो वा वडील... तो रागीट असो वा व्यसनी पण आपल्या मुलांना प्रेम करण्यात तो कधीच कमी पडत नाही.
* रागावलेला बाप शांत झाला की, त्याचा जीव मुलाला पाहण्यासाठी कासावीस होतो... हे बाप झाल्याशिवाय कळतच नाही.
* लक्षात ठेवा सूर्य आगीचा गोळा आहे, धगधगता अग्नी आहे. पण मावळला की सर्वत्र अंधार आहे.
* म्हणूनच म्हणतो, बाप बाप असतो... आई सारखंच बापाची जागा सुद्धा कोणालाही घेता येत नाही... मन दडपून मुलांना सुखात ठेवण्यासाठी वरुन आनंदित आणि हृदय पिळवटून रडणारा बाप कोणालाही कळणार नाही.
* ज्याने बापाचे काळीज दुखावले तो आयुष्यात कधीच हसत नाही.
* आणि ज्याने बापाला आयुष्यभर आदराने वागवले तो आयुष्याला दोष देत कधी रडणार नाही.
* आपले वडिलांना मान सन्मान देऊन बघा... आयुष्यात कधी काहीच कमी पडणार नाही!

परत फिरा रे...!!

– विलास बापूराव कुंभार, फुरसुंगी, पुणे

अखेर नवऱ्यासह सासरच्या सगळ्यांचा पूर्ण संबंध तोडून मी माझ्या पंधरा वर्षांच्या मुलीसह, मोठे धाडस करुन वेगळे राहाण्यास मुंबईला आहे. पण क्षणाक्षणाला मनात विचार येत होते की ह्या मुंबईच्या मोहमाई माया बाजारात माझं अस्तित्व टिकवता येईल का?

लग्न ठरले त्यावेळी किती हुरळून गेले होते मी. किती गुलाबी स्वप्न उराशी बाळगली होती. लग्नानंतरची काही वर्षे चांगली गेली. एक कन्यारत्न ही झाले. अश्विन महिन्यात जन्मली म्हणून अश्विनी हे नाव ठेवलं. नंतर मात्र संसाराला नजर लागल्यासारखी झाली. दिराचं लग्न झाले नी घरातला सगळा नूरचं बदलला. जाऊबाईंनी घराचा कब्जा घेतला. मामाची मुलगी शिकलेली त्यात मी जेमतेम चौथी झालेली म्हणून तर तिचा जास्तच रुबाब. हळूहळू मला कमीपणाची वागणूक मिळू लागली. सासूबाईंचंही वागणं बदललं. मला मोलकरणीचं जीणं आलं. मग माझ्या नवऱ्याचे कान भरणे सुरु झाले. त्यांच्याही वागण्यात फरक झाला. नको त्या कागाळ्या त्यांच्या कानावर जाऊ लागल्या. घरात वाद होऊ लागले, भांडणे होऊ लागली. माझा, माझ्या माहेरचा उद्धार होऊ लागला. नवरा अजय, तो ही त्यांच्याच तालावर नाचू लागला. मला मारु लागला. दारुच्या आहारी गेला. जीवनाचे सारे गणितच बदलून गेले. स्वप्न सारी धुळीस मिळाली. मी एकाकी पडले. माझी बाजू घेणारेच कोणी राहिले नाही. शेजारच्या माने काकांचा आधार असायचा. पण पंधरा दिवसांपूर्वीच ते दक्षिण यात्रेला गेले होते. अजयंना परोपरीने सांगण्याचा समजवण्याचा प्रयत्न केला. त्याचा उपयोग झाला नाही. या सगळ्याचा अश्विनीच्या मनावर विपरीत परिणाम होऊ लागला. अभ्यासातही दुर्लक्ष होऊ लागले. ह्या अति मानसिक छळामुळे मी खचून गेले होते. नी अखेर यातून मुक्त होण्यासाठी नवरा, सासर सोडून अश्विनीसह वेगळं राहून अश्विनीच्या भवितव्यासाठी वेगळं राहून एकाकी लढा देण्याचा निर्णय घेतला.

मी सासर जरी सोडले असले तरी कुठे तरी अजय विषयी एक अंतरीक असूया वाटत होती. कुठे तरी मनात एक अपराधीपणा जाणवत होता. खरे तर मी खूप कठोरतेने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. मी बॅगा घेऊन घरातून बाहेर पडताना अजय माझी गयावया करताना, विनवणी करताना पाहून मन थोडं द्रवत होतं. क्षणभर वाटून गेले की आपण हा निर्णय घेतोय तो चुकीचा तर नाही ना?

आम्ही नवीन जागेत राहायला आलो. अश्विनीचं हायस्कूलचे ॲडमिशन झाले. आवश्यक त्या गोष्टींची खरेदी झाली. हळूहळू शेजाऱ्यांच्या ओळखी होऊ लागल्या. त्यातूनच एक घरगुती काम मिळाले. कंपनीच्या वस्तूंचे घरी पॅकिंग करुन द्यायचे. दिवसाला जवळ जवळ दिडशे दोनशे रुपये मिळू लागले. हळूहळू कामाचा वेग वाढू लागला. त्यात फावल्या वेळात अश्विनीही मदत करायची. माझ्या कामाची सचोटी व जिद्द बघून मला कंपनीत कामाला घेतले. महिन्याला पंधरा हजार रुपये पगार ठरला. मला तर परमानंद झाला. आता कुठे गाडी रुळावर येऊ लागली.

अश्विनीला बरोबर घेऊन जीवन जगताना आम्हाला खूप वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. अश्विनी अंगापिंडानी धष्टपुष्ट, दिसायलाही रुपवान होती. मी नवऱ्याला सोडून वेगळी राहातेय म्हटल्यावर लोकांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन एक अबला, एक दुर्बल स्त्री असा होता. त्या कित्येक भुताळ नजरांना सामोरे जावे लागत होते. मदत ह्या नावाखाली कित्येक जण लोचट लगट करु पाहायचे. काहीतरी निमित्त करुन घुटमळत राहायचे. पलिकडच्या गल्लीतील पवार बाईचा मुलगा प्रविण यानेही आमच्याशी सलगी वाढवली होती. ह्या ना त्या निमित्ताने तो यायचा. गॅस सिलेंडर मिळवून दे, दुकानच्या सामानाच्या जड पिशव्या घेऊ लागायचा. सुरुवातीला तो खुप सरळ साधा निरागस वाटला. पण हळूहळू त्याच्याही वागण्यातला फरक जाणवू लागला. तो वेगळ्याच भावनेने माझ्याकडे आकर्षित होऊ लागला. माझ्या हातातील पिशवी घेताना मला जाणवले अशा प्रकारे स्पर्श करायचा. कधी कधी संधी साधून मला घसटून जायचा. मलाच कसं तरी अपराध्यासारखे वाटायचे आणि चटकन डोळ्यासमोर अजयची मूर्ती दिसायची. त्याच्या सान्निध्यात कधी अशी कोणाची हिंमत झाली नाही. पर पुरुषांच्या स्पर्शाने मनात काहूर माजायचं. प्रवीणच नव्हे तर जिथे जिथे मी वावरत होते तिथे मला एक निराधार अबला म्हणून माझ्याकडे पाहायचे. त्यांच्यातील विषारी वासनायुक्त नजरा मला कमजोर करायचा प्रयत्न करत होत्या. अश्विनी बाबतीत मी अगदी डोळ्यात तेल घालून लक्ष देत होते. तिच्या बरोबर बोलताना किंवा वागताना कोणी दिसले तरी मनात भितीची एक लाट निर्माण व्हायची. कळपातून वेगळी पडलेली बकरी लांडग्यांच्या कळपात सापडल्यासारखे वाटायचे. खूप खूप असुरक्षित वाटायचं.

इकडे अजयच्याही खबरा उडत उडत कानावर पडायच्या. अलीकडे सासरच्या शेजारच्या माने काकांचेही वरचेवर येणे जाणे वाढले. ते अजय बद्दल, सासुरवाडीकडचं अगदी मोजकच बोलायचे. कधी कधी म्हणायचे तू केलेस ते योग्यच केलेस. तुझा सासरी निभाव नसता लागला. तू निघून गेल्यानंतर अजय एकदम सैरभैर झाला. वेड्या सारखे वागू लागला. पश्चातापानी होरपळून गेला. अशा या त्याच्या वागण्याने भावाने व त्याच्या बायकोने त्याला अतोनात त्रास दिला. आई बाबांबरोबर त्याची रोजच भांडणं व्हायची. त्यांना म्हणायचा तुमच्यामुळेच मी माझ्या सुमनला आणि अश्विनीला पारखा झालो. त्यांनी सुमनला नीट वागणूक दिली नाही. त्यांनी तिचा छळ केला. मलाही खोटेनाटे सांगून तिला त्रास द्यायला लावलात. ह्या ह्या वहिनींनी सगळ्या संसाराचा विध्वंस केला.

एकदा भांडणं पार पराकोटीला गेली. अजयला भावाने, त्याच्या बायकोने आणि तुझ्या सासऱ्याने बेदम मारला आणि घराबाहेर हाकलून दिले. मी अजयला वेळोवेळी बजावण्याचा प्रयत्न केला. तो ठार बेफाम

झाला होता. एवढे होऊनही तो माझ्याकडे यायचा मन हलकं करायचा.

त्यानंतर सगळ्यांचा रोष पत्करुन अजयला आमच्याकडे ठेवून घेतला. ऐकता ऐकता उमाचे डोळे भरुन आले. मानेकाका बोलत होते. इकडे काळीज चिरुन निघत होते, धडधड वाढत होती. श्वासोच्छवास वेगाने वाढत होता. ''पोरी अजयला आम्ही आसरा दिला. हळूहळू जगण्यातला अर्थ त्याला पटवून देऊ लागलो. संसार काय असतो हे पटवून दिलं. प्रथम त्याला निराशेच्या गर्तेतून बाहेर काढले. तो आता पुर्ण पश्चात्तापाने होरपळून निघाला आहे. तो तुला भेटण्यासाठी तरसतोय, बेचैन झालाय. पण त्याला आम्ही थोपवून धरलाय. त्याला आम्ही आश्वासन दिलेय जोपर्यंत तू एक चांगला माणूस बनत नाहीस, जोपर्यंत तू कर्तृत्ववान बनत नाहीस, जोपर्यंत तू व्यसनापासून दूर होत नाहीस तोपर्यंत तुझी सुमन तुला परत मिळणार नाही. आणि ते तुला सिद्ध करुन दाखवावे लागेल. तेव्हाच सुमन व अश्विनी तुझ्या जीवनात परत येतील. आणि त्यांना परत मिळवून देणे ही आमची जबाबदारी. आणि खरंच पोरी अजयच्यात बदल घडला.

सुमन पोरी, ह्याच करता आजपर्यंत मी तुझ्या संपर्कात आहे. खोटीनाटी कारणे सांगून तुझ्याकडे येत होतो, तुझ्यावर बारीक लक्ष ठेवून आहे. आणि आज खास तुला सल्ला विचारायला आलो आहे.

अजयला सुधारण्याचे व्रत आम्ही घेतले होते. त्याचा संसार पुन्हा एकदा नव्याने उभारताना आम्हाला पाहायचा आहे. सुमन तुला माहीत आहे. आम्हाला ना मूल ना बाळ. त्यामुळे अजयच्या लहानपणापासूनच आम्ही त्याला आमच्या मुलाच्या ठिकाणी बघत आलोय. आम्ही दक्षिण यात्रेला गेलो आणि मागे हे तुमचं असं घडलं. खूप अस्वस्थ झालो होतो मी. हे असं घडलंय यावर माझा विश्वासच बसेना. अजयची आणि घरच्यांचे कडाक्याचं भांडण झाले नी अजयला घराबाहेर काढलं त्याचवेळी आम्ही तुमचा संसार पुन्हा जुळवायचा असा चंग बांधला.

सुमन, अजयला त्याची चूक पूर्णपणे कळून आलीय. तो आता व्यवस्थित आणि वेळेवर कामाला जातो. आणि तू नक्की परत येणार या विश्वासाने त्याने तुम्हांसाठी एक स्वतंत्र असं घर घेऊन ठेवलंय आणि केवळ आणि केवळ तुम्ही परत याल या आशेने वाटेकडे डोळे लावून बसलाय. पोरी, निर्णय तुलाच घ्यायचाय.

मला सांग सुमन, तू आणि अश्विनी येथे राहाताय, किती सुरक्षित आहात तुम्ही? घायाळ हरणीच्या शिकारीला टपून बसावेत, असे किती लांडगे तुमच्यावर टपून आहेत? कुणा कुणाच्या वासनेने बरबटलेल्या नजरेला तुम्ही चुकवणार आहात? सांग सुमन सांग तू जिथे काम करतेयस, ज्याने तुला काम दिले, त्याची तरी नियत साफ आहे का? केवळ एक नाइलाज, एक गरज म्हणून तू हे सगळं सहन करतेयस, पचवतेस. का तर केवळ तुझ्या अट्टाहासापायी नी अश्विनीच्या भवितव्यासाठी. हो ना? काका मोठा अवंढा घेऊन थांबले. मी मात्र गर्भगळित होऊन गेले होते. काय बोलावं काही काही सुचत नव्हते. अंगातला त्राणच गेल्यासारखे झाले होते.

काकांनी पुन्हा सुरुवात केली. मी भानावर नाही लक्षात आल्यावर त्यांनी मला खांद्याला धरुन हलवलं. मी एकदम तंद्रीतून जागे झाले. नी पुन्हा त्यांनी बोलायला सुरुवात केली.

मग पोरी आता मला सांग, तू हा घेतलेला निर्णय कितपत योग्य होता? चला त्या क्षणापर्यंत तो ठीक आहे असे मानू या. पण ह्याहीपेक्षा तू ह्यातून आपल्या नवऱ्याला कसा बाहेर काढता येईल, याचा अधिक विचार तू करायला हवा होतास. घराबाहेर पडणारच होतीस, तर अशा ह्या एकाकी, असुरक्षित जीवन जगण्यापेक्षा माहेरात राहूनही ते तुला साध्य करता आले असते. पोरी सारासार विवेक बुद्धीने विचार कर. पुढच्या सुखी संसाराची मी हमी देतो. अजयवर लहान मुलासारखे प्रेम केलंय. त्यांच्यातला अविचाराचा सैतान मी काढून टाकलाय. तसंच पोरी, हे तुझं वाकडं पडलेलं पाऊल मला पुन्हा योग्य मार्गावर आणायचेय. किती केला तरी नवरा एक आधार असतो. एक कवच असते. कपाळावरचं कुंकू समोरच्याला दहा वेळा विचार करायला लावतं. पण केव्हा? ते ज्या वेळी बळकट असते त्यावेळी. मी उद्या येईन. काय तो निर्णय विचारांती मला दे. मी भांबावून गेले होते. विचारशक्ती गोठून गेली होती. येतो मी पोरी. म्हणत काका पाठमोरे झाले, माझ्या उत्तराची वाट न बघता झपाझप पावले टाकत दृष्टीआड झाले.

मी मात्र काकांच्या विचारांनी अजयच्या बाबतीत पूर्ण वितळून गेले. नी काका माझा होकार घ्यायला कधी येतायत त्या गोड सोनेरी उद्याच्या वाटेकडे मी डोळे लावून बसलेय.

***

श्री. रमणलाल एस. प्रजापती

D.C.E.

निवृत्त शाखा अभियंता



पत्नी : सौ. कल्पनाबाई

चि. कल्पेश- बी.ई. (सिवील)

७, ओमशांती नगर, कोरीट नाका, ता. जि. नंदुरबार.

मो. 9923752214 / 9975926208

लढा मा. द्रौपदी मुर्मू यांचा - जीत संविधानाची

प्रा. अंजली राठोड श्रीवास्तव

स्त्रियांचं एका चौकटीत बंदिस्त राहणं आता काळाला पण अमान्य आहे. म्हणूनच की काय आज भारत देशाला अभिमान वाटावा अशी एक गोष्ट घडली ती म्हणजे आज भारताच्या अतिउच्च राजकीय सिंहासनावर राष्ट्रपतीपदावर एक आदिवासी महिला विराजमान झाली. एक आदिवासी महिला राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचते ही गोष्ट इतिहासानं नोंद घेण्यासारखी ठरली आहे. बाईच्या नव्हे आदिवासी बाईच्या या खडतर प्रवासाला फक्त एक कडक सलाम.



आज संपूर्ण समाज डोळे विस्फारून या आदरणीय आदिवासी महिलेकडं, तिच्या जिद्दी कडं, तिच्या बुद्धी कडं पाहतोय. ही घटना साधी कुठली? ही भारत देशाची दुसरी महिला आहे जी राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचली आहे. आम्ही भारतीय आहोत. सार्थ अभिमान वाटतोय या गोष्टीचा.

पहिली महिला राष्ट्रपती होण्याचा बहुमान मा. प्रतिभाताई पाटील यांना मिळाला होता. अर्थातच एवढा मोठा प्रचंड ताकदीचा राजकीय प्रवास या महिला करत आहेत आणि देश चालवत आहेत. ही अगदी अभिनंदनीय गोष्ट आहे. आणि याचं श्रेय संविधानाला जातं हे ही कौतुकास्पद आहे. गौरवास्पद आहे.

परंपरेच्या खोल पाण्यात आज महिला गटांगळ्या खाताना दिसत जरी नसल्या तरी त्यांना आजही पुरुषांच्या बरोबरीचं स्थान सहजासहजी कुठंच मिळत नाही. पण आज जेव्हा बाया कागदावर व्यक्त होऊ लागल्या, मौन सोडून बोलू लागल्या, मोठमोठी आव्हानं पेलू लागल्या ही सर्जनशीलतेची पावलं त्या उंबरठ्या बाहेर चालू लागल्या. या मागची मोठी ताकद म्हणजे महिलांच्या बाजूने असणारे कायदे त्यांना होणाऱ्या हक्क अधिकाराच्या जाणिवा.

मला निघायचंय चालायचंय..
मोकळंही व्हायचंय,
डांबून ठेवलेल्या या क्रूरपरंपरेच्या पिंजऱ्यातून...
संविधानानं उघड्या ठेवलेल्या
दारापर्यंत मला पोहोचायचंय...!

अन् असंच काहीसं मा. द्रौपदी मुर्मू यांनी ठरवलं आणि कृतीत उतरवलं. स्त्री घर आणि नाती हा अनुबंध फार जुना आहे. घनिष्ठ आहे. यातून न सुटता ती ध्येयपूर्तीसाठी धावत राहते. ही गोष्ट विलोभनीय आहे. सशक्तीकरणाला आणखी बळकटी देणारी आहे.

याचंच एक ज्वलंत उदाहरण म्हणजे मा. द्रौपदी यांचं आहे. आदिवासी महिला तीही अगदी कमी वयातील (वय ६५वर्षे) भारताच्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचते. मुळात ही गोष्टच अगदी मन भारावून टाकणारी आहे. आदिवासी भागात कुठल्याच गोष्टी सहज मिळणाऱ्या नाहीत. त्यात भर वैचारिक मागासले पणाची. शिक्षण, आरोग्य राहणीमान, सामाजिक, आर्थिक स्थैर्य या सगळ्याच गोष्टींसाठी त्यांचा लढा अविरत चालू असतो. त्यात जाणिवांची कमतरता तर आहेच आहे. यातूनही शिक्षण घेणं, राजकारणात पाऊल टाकणं रोजच्या संघर्षमय जीवनाला तोंड देणं, एका बाईला कसं शक्य झालं असेल हे? अशा रोजच्या संघर्षमय लढ्यातून पुढं जाणं हे आपल्या शहरी बायांना पण एक तारेवरची कसरत वाटते, एक आव्हान वाटतं. इथं आदिवासी भागात तर अगदीच विरुद्ध चित्र आहे. आपले हक्क, अधिकार, मूलभूत गरजा, जाणीवा यांचा दूरवर कुठंही संबंध नसणाऱ्या अशा आदिवासी पाड्यातून मा. द्रोपदी मुर्मू यांचा जीवनपट खरच आपल्याला कळायला हवा. शहरी भागातील मुलींनी एक प्रेरणा म्हणून त्यांच्या जीवनाचा अभ्यास यशाच्या संदर्भासाठी पाहायला हवा.

मा. द्रौपदी मुर्मू यांचा जन्म २० जून १९५८ रोजी मयूरभंज उपरबेडा – ओरिसा मध्ये आदिवासी कुटुंबात झाला. (अनुसूचित जनजाती (ST) हिंदू धर्म) व्यक्ती कोणत्या कुळात, कोणत्या जातीत, कोणत्या धर्मात जन्माला येते यावरून तिचं श्रेष्ठत्व ठरत नसतं तर तिच्या कर्तृत्वावरून तिचं श्रेष्ठत्व ठरत असतं हे पुन्हा एकदा आपल्यासमोर सिद्ध झालय.

त्यांचे वडील बिरांची नारायण टुडू हे एक सामान्य शेतकरी होते. गरिबी आणि अभावग्रस्त जीवनाचं कारण सांगून मा. द्रौपदी यांनी शिक्षणातून माघार घेतली नाही. शिक्षणाशिवाय पर्याय नाही हेच एकमेव कारण ठरलं त्यांच्या या अभूतपूर्व यशाचं.

मा. द्रौपदी मुर्मू यांचे बालपणीचे शिक्षक (वय ८२) विश्वेश्वर महतो सांगतात की, द्रौपदी या लहाणपणापासूनच एक हुशार आणि चुनूक, चपळ मुलगी होती. फावल्या वेळेत त्या महान नेत्यांची चरित्रे वाचत. रामादेवी महिला कॉलेज भुवनेश्वर येथे त्यांनी आपले बी.ए. पर्यंत चे शिक्षण पूर्ण केले. आयुष्याची सुरुवात त्यांनी क्लार्क च्या नोकरी पासून केली.

विद्युत विभागात ज्युनिअर असिस्टंट म्हणून त्या कार्यरत होत्या पुढे त्यांनी शिक्षक म्हणून ही काम केले. राजनीतीचा त्यांचा प्रवासही अगदी खरच पाहण्यासारखा आहे. १९९७ मध्ये त्यांनी राजकीय क्षेत्रात पाऊल टाकले. आणि मग पुन्हा त्यांनी मागं वळून पाहिलं नाही. नगरसेवक ते आमदार (२००० ते २००९) हा प्रवास ही एकदम धडाकेबाज ठरला.

ट्रान्सपोर्ट व वाणिज्य मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. पशुपालन व मत्स्यपालन म्हणूनही त्यांनी पदभार स्वीकारला. राज्यमंत्री पदावर असताना हे असे विविध विभाग त्यांनी सांभाळले. अनेक सखोल ज्ञान, अभ्यास, अनुभव पदरात पाडत त्या पुढील प्रवासासाठी सज्ज राहत असत.

भाजपाची राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या पासून झारखंडच्या ९ व्या राज्यपाल (कालावधी– २०१५–२०२१) होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा अभ्यास पूर्ण निश्चित होता. यात शंकेला जागा नाही.

पहिली महिला राज्यपाल म्हणूनही त्या झारखंड राज्या समोर आल्या. आणि आज एनडीए सरकार द्वारा २५ जुलै २०२२ यावर्षी पंधराव्या राष्ट्रपती पदासाठी उमेदवार म्हणून त्यांना घोषित केले.

या निवडणुकीत त्यांना ६४.०३% मते मिळाली. आदिवासी, ग्रामीण भागातून राजकीय घोडदौड करत त्या आज अतिउच्च पदावर पोहचल्या. याचं श्रेय त्या राजकारणात असणाऱ्या त्यांच्या वडील व आजोबांना देतात. ते त्यावेळचे सरपंच म्हणून होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी ही त्यांची प्रेरणास्थानं आहेत. शिक्षण, समाजसेवा, राजकारण, देशविकास या गोष्टीला एक आदिवासी महिला अत्यंत महत्त्वपूर्ण मानते आणि पुढे चालते. या गोष्टी खरच कौतुकास पात्र आहेत. मिळेल त्या संधीचा स्विकार करत एक अभ्यासू व्यक्तित्व आपल्या समोर आलं.

कॉलेजला जाणारी गावातील ही पहिली मुलगी, झारखंडची पहिली महिला राज्यपाल, आदिवासी भागातील स्वतंत्र भारतदेशाची व सर्वात कमी वयाची (पहिली महिला) राष्ट्रपतीपदी यांची नियुक्ती होणं हे सगळे रेकॉर्ड आज त्यांच्या नावावर जात आहेत. ही गोष्ट इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदण्यासारखी का ठरु नये?

द्रौपदी यांचा श्यामचरण मुर्मू यांच्याशी विवाह झाला. हुंडा पद्धत आदिवासी भागात आहे पण हा हुंडा मुलांकडून मुलींना द्यायचा ही अशी पद्धत आहे. हुंड्यात शाम मुर्मू यांना गाय, बैल आणि काही कपडे दिले गेले. लग्नानंतर खऱ्या अर्थानं राजकारणात त्यांनी पाऊल टाकलं. जिल्हा परिषद निवडणुकीत त्या उपाध्यक्षपदी निवडून आल्या.

हा सगळा प्रवास करणं, सगळं सांभाळणं, पुढं चालत राहणं कसं जमलं त्यांना? खरंतर या मागची जिद्द, तळमळ, विकास स्वप्न आणि अपार कष्ट या गोष्टी आपण नाकारू नाही शकत खरंच! आणि या सर्व गोष्टी, ही पदे अशीच सहजासहजी मिळालेली तर मुळीच नाहीत. या सगळ्या गोष्टींचा विचार करता असा यशस्वी प्रवास करणं, यशा नंतरही आणि अपयशा नंतरही न थांबणं या गोष्टी त्यांना पुढे नेत गेल्या. ध्येयांनं झपाटलेलं वेडं पण आज सिंहासनारूढ झालंय. ही गोष्ट युवक युवतींना मार्गदर्शक रेषा म्हणून ठाऊक असायलाच हवी. बाईमाणूस म्हणून समस्यांना तोंड देत पुढे चालत राहणं आणि त्याहीपेक्षा आदिवासी भागातील बाईमाणूस म्हणून हे खरंच कठीण वाटतं. समस्येचं कातळ फोडून मार्ग काढणं हे सामान्य माणसांच्या पचनी पडणारं नाही. म्हणूनच मा. द्रौपदी मुर्मू एक असामान्य व्यक्तिमत्व आहे. हे नक्कीच!

या त्यांच्या प्रवासात, या सगळ्या गोष्टीत घरच्यांची साथ तर होतीच पण दोन मोठी जाणती मुलं आयुष्यातून कायमची निघून जाणं आणि त्या पाठोपाठ साथीदाराची ही साथ सुटणं तसेच आईचं, भावाचं कायमचं जाणं या गोष्टी जीवघेण्या असतात. एका जागी ठप्प बसवणाऱ्या असतात. निरंतर चालणाऱ्या प्रवासात अशा गोष्टी मन विचलीत करणाऱ्या ठरतात. मनाला थकवणाऱ्या असतात. पण द्रौपदी मुर्मू यांनी आलेल्या या दुखऱ्या डोंगराला कसं बाजूला सारलं असेल? हे त्यांचं त्यांनाच ठाऊक. उरात भळभळणाऱ्या जखमा घेऊन बाई चालत राहते. ती थांबत नसते. कधीच कुठच!

खरं तर वैयक्तिक संकटं पाठ सोडायला तयार नव्हती. २००९ मध्ये त्या डिप्रेशन मध्ये गेल्या. पहिल्या मुलाचं निधन.. तो मानसिक धक्का त्यांना सावरु शकला नाही. यातून कशातरी त्या बाहेर पडल्या. पण अशातच अपघातात दुसरा मुलगा ही गमावला. अध्यात्म, योग या सारख्या गोष्टीत त्या मन गुंतवू लागल्या. सामान्य वातावरणात पुन्हा परतणं तसं कठीणच होतं. आता सध्या एक मुलगी, जावई आणि नातू सोबतीला आहेत.

आदिवासी भागातील लोकांना त्यांचे न्याय, हक्क, अधिकार देण्यासाठी त्यांचा लढा तर अविरत होताच. आता तर तो आणखी पुढे सरकत चालला आहे. या गोष्टीची ठळक नोंद तर आपण घ्यायलाच हवी. अशा मोठया पदभार सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना, व्यक्तींना कोणाचा दबाव, कोणाची भीती बाळगण्याचं तसं फारसं कारण नसतच. खरंतर संविधानाला समोर ठेवून स्मरुन, निप:क्षपाती पणे हे कार्य करता येतं या गोष्टी समाजमान्य आहेत.

एक स्त्रीवादी लेखिका म्हणून मला वाटतं की राजकारण काहीही असो कोणी काहीही बोलो पण आज देशाच्या सर्वोच्च पदावर, राष्ट्रपती पदावर एक आदिवासी (संथाल) भागातील महिला विराजमान होते हे चित्र खूप आशादायी आहे. हे चित्र खूप अनोखं आहे. महिला वर्गासाठी सशक्त लोकशाहीचं हे एक भक्कम असं उदाहरण आहे. हे चित्र दुसऱ्यांदा आपल्या वाट्याला येतेय ही संवेदनाच खूप गौरवास्पद आहे.

हा सोनेरी काळ गाठण्यासाठी मागचा सारा अंधार विसरणं कसं शक्य आहे? सतत कोसळणाऱ्या दु:खात ही जगायचं कारण शोधणाऱ्या मा. द्रौपदी मुर्मू महिला वर्गासाठी आदर्श ठरल्या आहेत. कारण पावलागणिस येणाऱ्या अडचणीवर मात करत त्या इथपर्यंत पोहोचल्या. साधी गोष्ट नाही ही!

आयुष्यातून आपल्या माणसांचं एकेक करून निघून जाणं या गोष्टी काळीज चिरफाड करणाऱ्या आहेत. मा.राष्ट्रपती द्रौपदी यांचा जीवनपट उलगडून दाखवताना मन खरंच अंतर्बाह्य अस्वस्थ होऊन जातं. कम्मालीच्या या सहनशीलतेला शब्दांत बांधताच येईना आज.

एकटेपणात घराची शाळा करणं, समाजातील मुलांना शिकवणं, आपल्या ज्ञानाची शिदोरी गावातील मुलांना वाटणं, त्या मुलांत आपली मुलं शोधणं या गोष्टी एक बाईच करू जाणे. इतकं सारं भोगूनही, सोसूनही बाईची पावलं पुढं पडत आहेत. या गोष्टीमुळे भुवया उंचावल्याशिवाय

राहत नाहीत.

आदिवासी जीवन जगूनही स्त्रियांचा कायदा, मूलभूत ज्ञान तंत्रज्ञान, राजकारण, समाजकारण वाचन, शिक्षण या गोष्टी मिळवण्यासाठी मा. द्रौपदी या सजग राहिल्या. कसली चिकाटी ही! आयुष्यातली रक्ताची एकेक नाती निघून गेली. चेह–यावरचं हसू कायमचं मावळलं तरीही मा. द्रौपदी या खंबीर राहिल्या. यालाच तर महिला सबलीकरण म्हणतात.

एकाकीपणात स्वतःची वाट शोधणाऱ्या मा. मुर्मू यांनी अनेक आघाड्यांवर लढणाऱ्या बायांना नकळतपणे एक संदेश दिलाय की कुणाचंच दुःख हे सारखं नसतं ते व्यक्तीनिहाय बदलत जातं. हे नक्कीच! पण दुःखाला कवटाळत न बसता दुःखाचा पडलेला तो पिळ अलगद सोडवता आला पाहिजे, वास्तवाला भिडत गेलं पाहिजे. कारण अनुभवाचा आविष्कार हा यशाचा परीघ विस्तारत नेतो.

अनादी काळापासूनच महिलांना समाजात मान–सन्मान होता. याचे पुरावे वाचनात येतात. भारतात अगदी आर्य काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान होतेच तसेच ऋग्वेदातही महिलांना राजकारणात स्थान असल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणूनच महिला आजही कुटुंबीय व्यवस्था अगदी आपल्या खांद्यावर पेलत समाजकारण, राजकारणात ही त्या मोठ्या प्रमाणात सक्रिय होऊ लागल्यात.

महिलांचं मन, काळीज हे संवेदनशील असल्याने अस्सल देशभक्ती, राष्ट्रभक्ती आज महिलांच्या काळजात ठासून भरलेली दिसतेच. फक्त तिला हवी तेवढी हवी तेव्हा ती संधी मिळत नाही हे दुर्दैव नवे नाही. संविधानाचे अधिष्ठान आज महिलांनी त्यांच्या सामाजिक आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, राजनीतीतून स्वीकारले आहे. अभिमान वाटतो जेव्हा महिला परंपरेच्या आकृतीबंधातून संविधानाच्या आधारे भक्कम पंख लावून बाहेर पडू लागल्यात. स्वतःची एक नवी ओळख जगाला देऊ लागल्यात. स्त्री कितीही कर्तृत्ववान बुद्धिमान असली तरी समाज तिला दुय्यम स्थानावरच ठेवतो. किंवा मुद्दामहून सोयीने तिला दुर्लक्षित करतो. त्याही पुढे जाऊन म्हणावसं वाटतं की आज राजकारणात पडणाऱ्या महिला केवळ सह्याजीरावाची भूमिका बजावतात. (पण चित्र थोडंसं बदलत चाललंय) बदलायलाच हवं. आज एक आदिवासी महिला भारतदेशाच्या राष्ट्रपतीपदाची शपथ घेते. ही गोष्ट नसे थोडकी!

संविधानानं महिलांना त्यांचे हक्क अधिकार, स्वातंत्र्य दिले म्हणून आज अतीउच्च पदाचा बहुमान मिळाला. हे नाकारता येणार नाही. काहीही म्हणा पण, आज जीत संविधानाची झाली यावर दुमत नसावं! तुम्हाला काय वाटतं?

मुस्कुराकर दर्द भूलकर
रिश्ते में बंद थी दुनिया सारी
हरपथ को रोशन करनेवाली
वो शक्ति है एक नारी!

– साहित्यिका प्रा.अंजली राठोड श्रीवास्तव, करमाळा
संपर्क : ७७०९४६४६५३
(लेखिका वक्ता, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)

***



अर्वाचीन भारतातील शैक्षणिक संस्थांचा विकास

शंतनु श्रीपाद पेंढारकर

प्राचीन शैक्षणिक संस्था विद्यापीठे जशा नालंदा, तक्षशिला व इतर अनेक ज्या भारतात शेकडो वर्षे कार्यरत होत्या पुढे मध्ययुगीन इस्लामी आक्रमकाची आक्रमणे झाली व त्यात दुर्दैवाने त्या नष्ट झाल्या. नंतर पाच सहा शतके राजकीय स्थैर्याअभावी सर्वच क्षेत्रात अधोगती झाली व संस्थागत विकास पुर्ण थांबला! इस्लामी व इतर सत्तांच्या व मध्ययुगीन काळात मुळ ग्रामकेंद्रीत समाज रचना मात्र कायम होती. यामध्ये अर्थकारणाचे विकेंद्रीकरण व ग्रामकेंद्रीत अर्थ व्यवस्था असल्याने बरेचसे व्यवहार हे कृषी उत्पन्न, वस्तू व सेवा यांच्यात विनिमय पध्दतीने होत असत व ते स्थानिक ज्ञाती व्यवस्थेशी निगडित होते, (ज्ञाती हा ज्ञानवाचक शब्द आहे हिंदी मधे ज्ञ चा ज होतो त्यामुळे ते लोक ज्ञाती ला जाती म्हणु लागले त्यामुळे जाती हा मुळात ज्ञानवाचक शब्द आहे हे विसरून चालणार नाही) त्यामुळे तत्कालीन शिक्षणाचा अर्थ व्यवस्था, उत्पादन व समाजाच्या क्रयशक्तीशी संबंध नव्हता!

अर्वाचीन काळात म्हणजे इंग्रजी सत्ता स्थिरावल्यानंतर मात्र त्यात अमुलाग्र बदल झाले, कारण अर्थकारणात मोठ्या प्रमाणात बदल होत गेले. पगारी नोकर हा एक मोठा वर्ग निर्माण झाला, त्यात लष्करी व मुलकी हे प्रमुख वर्ग झाले, मुलकी नोकर वर्गात स्थानिक लोकांना जुजबी शिक्षण द्यावे व पगारी नोकर भरती करण्यात यावी यासाठी मुख्यत्वे शैक्षणिक वा विद्यापीठ संस्थागत विकास सुरू झाला. मिशनरी लोकांनी ख्रिस्तीकरणाला अनुकुल अशा संस्था व त्यांच्या चर्चेस् नी कॉन्व्हेन्ट शाळा काढुन एक वेगळाच उद्योग व सांस्कृतिक उठाठेवी आरंभल्या पण तो या प्रस्तुत लेखनाचा विषय नाही.. असो.

पण इंग्रजी अंमलात सुरुवातीला बंगाल पुढे पंजाब, म्हैसूर, मद्रास, मुंबई (प्रेसिडेन्सी) प्रांतात मोठ्या संख्येने संस्था उभारल्या जाऊ लागल्या. १८व्या शतकात तसेच एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला १८०५ पासुन ते १८२६ पर्यंत शिक्षण संस्था व शाळा यांची काय स्थिती व संख्या होती त्यात कशी वाढ झाली विद्यार्थी–विद्यार्थिनी किती कोणत्या वर्ग, जाती, धर्माचे होते व शिक्षक कसे, शाळा व त्यांचे आर्थिक उत्पन्न वगैरे बाबत तक्ते व विपुल प्रमाणात माहिती उपलब्ध आहे, यावर १८२० ते १८४० या काळाचे जे समग्रपणे सर्वेक्षण त्याकाळी झाले होते त्यावर आधारित लिखाण धर्मपाल या विद्वान तज्ञा व्यक्ती ने करुन एक समग्र ग्रंथ लिहिला आहे तो खरोखरच अतिशय अभ्यासनीय आहे त्याचे हिंदी भाषांतर रमणीय वृक्ष– १८वी शताब्दी मे भारतीय शिक्षा या नावाने प्रसिद्ध आहे.

नमुना म्हणून यातील एकच उदाहरण द्यायचे झाले तर एके ठिकाणी ते म्हणतात, १८३० ते १८४० या दरम्यान नुसत्या बंगाल व बिहार मधे एक लाख गावांमध्ये शाळा होत्या म्हणजे जवळपास प्रत्येक गावात एक शाळा होती असे विल्यम एडम याने नोंदवलेल्या निरीक्षणावरुन दिसते. यावरुन अनेक इंग्रज अधिकारीही अचंबित झाले. दक्षिण भारतात तामिळनाडूत तंजावर ते सध्या चा आंध्र यांचे तर खुप समग्र विवरण यात आहे. ज्यात विद्यार्थी शिक्षक म्हणून ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शुद्र, (म्हणजे तत्कालीन अस्पृश्यांचा पण समावेश असल्याचे दिसून येते) मुले , मुली इतर धार्मिय वगैरे याबाबत वस्तुनिष्ठ माहिती दिलेली आहे. मुंबई प्रांतातही याच दरम्यान शाळा व महाविद्यालये काही पारशी, मराठी, गुजराती समाजधुरीणांच्या प्रयत्नाने सुरू झाल्या होत्या असं दिसुन येते.

पुढे शिक्षित वर्ग जो यातुन घडला त्यातुनच अनेक समाजपुरुष, विद्वान, सुधारक आपोआप घडले, लौकिक ज्ञानाच्या अनेक शाखा आकार घेऊ लागल्या. जे दृष्टेपुरुष व समाजमान्य नेते होते त्यांनी ही प्रक्रिया परत सुरू केली व स्थानिक समाजधुरीणांनी संस्थागत विकासाचे प्रयत्न सुरू केले जसं कि टिळक आगरकरांनी १८८५ मधे डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली, या आधी व देशात सर्वत्र ही प्रक्रिया सुरू झाली होती, महर्षी दयानंद सरस्वती यांची ग्लो वैदीक, पं. मदनमोहन मालवीय यांनी बनारस हिंदू विद्यापीठ, मुन्शींची भारतीय विद्याभवन, गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूरांचे शांती निकेतन, महर्षी कर्वे यांची हिंगणे स्त्री शिक्षण संस्था अशा संस्था उभारल्या गेल्या.. देशाची उभारणी ही अशीच संस्थात्मक उभारणीतूनच होते हे या सर्वांच्या योगदानातुन दिसते. अर्थात् इंग्रजांचे संस्थात्मक उभारणीचे योगदान हे पण मोठे आहे हे मान्य करावे लागेल की ज्या संस्था आजही कार्यरत आहेत.

१९व्या शतकातील महाराष्ट्रातील काही ठळक उदाहरणे द्यायची तर १८६० मधे पुणे येथे पुना नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यात आली (पुना नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी चे पुढे नामकरण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी असं झालं ही संस्था आजही कार्यरत आहे) ही संस्था कै. वामन प्रभाकर भावे, हुतात्मा क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, कै.लक्ष्मण नरहर इंदापुरकर यांच्या पुढाकाराने तर डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या बाबतीत आपण पाहिले तर असं दिसतं कि त्यातील संस्थापकांपैकी टिळक, आगरकर, केळकर ही नावे आपल्या नेहमीच्या परिचयाची आहेत.. पण प्राचार्य आपटे यांच्याबद्दल थोडे पाहु... प्राचार्य वामन शिवराम आपटे एम. ए. (संस्कृत) यांचा १८९० साली प्रसिद्ध झालेला १२०० पानांचा इंग्रजी–संस्कृत शब्दार्थ कोश आजही जगभर प्रमाण मानला जातो.

उदाहरणादाखल वर दिलेल्या यातील संस्था व त्यांचे सर्व मुख्य संस्थापक, शिक्षकांची जर नाव आपण पाहिली तर असं दिसून येतं की एका विशिष्ट वर्गातीलच हे लोक आहेत की ज्या वर्गावर असा नेहमी आरोप केला जातो, की त्यांनी बहुजन वा सामान्य वर्गाला शिक्षणापासून

वंचित ठेवलं आणि त्यांनी शिक्षणाची द्वारं कुठल्यातरी एका कारणाने केवळ आपल्यासाठीच खुली ठेवली होती, तर हे पाहून हे वाटते, की ही जी महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्था याआधी निघाल्या व पुढे काढल्या गेल्या त्यामध्ये सुद्धा मुख्यत्वे याच वर्गातला शिक्षकवर्ग व संस्थाचालक वर्ग होता तर या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये काय फक्त त्याच वर्गालाच प्रवेश होता का? इतर सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना पण प्रवेश होता ना? तर होय.. मग हे म्हणणं म्हणूनच मुळात चुकीच आहे की एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या विशिष्ट वर्गाने शिक्षणापासून वंचित ठेवलं! कारण त्याआधी सुद्धा इतर वर्गातले लोक थोडं फार जुजबी शिकतच होते व व्यावहारिक दृष्ट्या ते शहाणे होते! जरी त्याचा लौकिक शिक्षणाशी त्यांच्या चरितार्थाचा काही संबंधच नव्हता तरीही..! कारण पैसा व सुखासीन सुखवस्तू (luxury) आयुष्य ह्या संकल्पना तेव्हा नव्हत्या, आता या दोनशे वर्षात आपल्याकडे त्या आल्या व आता आयुष्यात ते सर्व मिळवण्यासाठी आता ज्या शिक्षणाची वा व्यावसायिक कौशल्याची गरज आहे ते मिळवायला आता पैसे पडतात.

पुर्वी ज्ञानाधिष्ठित जग होते कामाला व कामाच्या ज्ञानाला महत्त्व होते तेव्हा पैसे (bank balance), पगार, अतिसुखासीनपणा याला सामान्य माणसाच्या दृष्टीने फारसे महत्त्व नव्हते. विद्या, ज्ञान, कर्तव्य, कर्म याला महत्त्व होते व याचे शिक्षण मोफत व गुरु शिष्य परंपरेने मिळत होते. त्यासाठी गुरूसेवा व गुरुकुल पद्धतीने घ्यावे लागायचे. जे मिळायचे ते परत वाटायचं, याच पद्धतीने हजारो वर्षे चालत होतो आपण. जर हस्तकौशल्य वा कला वा उत्पादन कौशल्य जसे सुतारकाम, शिल्पकला, बांधकाम, हातमाग, विणकाम, लोहारकाम, सोनार काम, कुंभारकाम, पौरोहित्य आदी वा वैद्यकीय, वेदशास्त्रीय, वगैरे अनुभवसिद्ध ज्ञान असेल ते घरातुनच वा गुरुशिष्य परंपरागत मिळत होते त्यासाठी पैसे लागतच नव्हते फार..! असं हजारो वर्षे चालत होत हे फार महत्त्वाचे..!

मला वाटतं हा मुलभूत फरक कोणी समजूनच घेत नाही.. असो. कुरुंदकरांच्या मते हे तेव्हाचे ब्राह्मण ब्राह्मणेतरवाद व इतर काही वाद हे अज्ञानावर आधारित वाद होते व आजही आहेत. लोकहितवादींच्या शतपत्रांनी अनेक वाद निर्माण केले व पुढे ते त्यांचे शिष्यांनी व ते दोन्ही बाजूंनी काहींनी वाढवले. पुढे तत्कालीन काही तथाकथित परंपरावादी व शंकराचार्य यांनी समग्र दृष्टेपणा न ठेवल्यामुळे जे घडले व बिघडले हे वाद मिटविण्यासाठी प्रयत्न करण्यापेक्षा ते निष्कारण वाढवत ठेवले. किंबहुना दोन्ही बाजूंनी विशेषतः राजारामशास्त्री भागवत यांच्या सारख्यांनी पुढाकार घेऊन जर राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक यांच्यासारख्यांमधील वाद वाढवले नसते तर कदाचित सामाजिक महाराष्ट्राचं चित्र वेगळं झालं असतं.

अर्थातच इतिहासाला जर तर मान्य नसते त्यामुळे आता राजकारणाला परिघा बाहेर ठेवून सुज्ञपणे व सार्वजनिक हिताचा शहाणपणा ठेवून या विषयावर व्यक्त होणे गरजेचे आहे.

***



RAJESH PRAJAPATI
(Managing Director)
Mob: 9822768944



KVOA

PRAJAPATI FOUNDRY PVT.LTD.

Manufactuers of Ferrous, C.I., Casting etc. Daily Heat

*** PRESS TOOLS * DIE CASTING * MACHIN TOOL CASTING**
*** AUTOMOBILES * PARTS CASTING**

F-II Block, Plot No. 14, Telco Material Gate Road, MIDC,
Pimpri, Pune - 411 018. Ph: 020-30694041 / 42 / 43 / 44 / 45.

E-mail : rajeshprajapati@rediffmail.com ᴅ prajapatifdrypl@redffmail.com

आमचे प्रेरणास्थान



कै. गोरोबा कुमठेकर

महेश कलेक्शन अँड
मेन्स वेअर

इक्सूलूझीव सुटींग, शर्टींग, सुट्स, जीन्स व बॅगी स्पेशॅलिस्ट, परफेक्ट फिटींग व क्लीक डिलीवरी

स.न. ३४, नं. ५०४/३, भारती विद्यापीठ एरिया, पी.आय.सी.टी., धनकवडी, पुणे ४११ ०४३.
फोन (०२०) ५६७०८५१२

प्रतिष्ठाणचा (पैठणचा) राजा शालिवाहन

जाणून घेऊया राजा शालिवाहन यांच्या बद्दल सविस्तर





अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने गेली पाच वर्षांपासून औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे शककर्ता राजा शालिवाहन यांची जयंती साजरी करण्यात येते.

सध्या कोरोना महामारीचा काळ असल्यामुळे मागील वर्षांपूसन तेथे सार्वजनिक जयंती साजरी करण्यात येत नाही. परंतु आजही कुंभार समाजात खुप मोठ्या प्रमाणात राजा शककर्ता शालिवाहन यांच्या जयंतीनिमित्त जनजागृती झाली असून बऱ्याच ठिकाणी ही जयंती साजरी करण्यात येत आहे.

कुंभार राजा शालिवाहन पैठणच्या सातवाहन घराण्यातील एका राजाचे नाव, अलीकडे उपलब्ध झालेल्या नाण्यांवरुन सातवाहन हे व्यक्तिनाम असावे. पुढे त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या वंशाला ते मिळाले.

शालिवाहनासंबंधी काही प्रचलित आख्यायिका आहेत. त्यापैकी एका ब्राह्मणांचे दोन मुलगे व मुलगी असे तिघे जण आईवडिलांच्या मृत्यूनंतर पैठण नगरात गेले आणि तेथे एका कुंभाराच्या घरी राहू लागले. ब्राम्हणाची मुलगी तिचे नागनाथ नावाच्या कुंभाराच्या मुलाच्या प्रेमात पडली आणि त्याच्यापासून तिला एक मुलगा झाला. कुंभाराच्या घरी जन्मल्यामुळे तो मातीची खेळणी करण्यात तरबेज झाला. मातीच्या हातगाड्या तयार करुन तो आपल्या सवंगड्यांना देत असे. त्यावरुन या मुलाचे नाव शालिवाहन पडले. यावेळी उज्जयिनीला विक्रमादित्य राजा राज्य करीत होता. त्याला वेताळाकडून समजले की, आपला नाश करणारा एक मुलगा पैठणला वाढत आहे. त्याने पैठणवर स्वारी करुन सोमकांत राजाचा पराभव केला व त्यास कैद केले. शालिवाहनाला ही गोष्ट कळली, तेव्हा तो मातीचे घोडे, हत्ती, शिपाई यांच्याशी खेळत होता. त्याला एक कल्पना सुचली आणि त्याने शेषराजाचे स्मरण केले व मातीच्या खेळण्यांत प्राण फुंकले. तेव्हा त्यांतून असंख्य सैन व घोडेस्वार बाहेर पडले. त्यांच्या मदतीने शालिवाहनाने विक्रमादित्याचा पराभव केला आणि सोमकांताची कैदेतून मुक्तता केली. ही एक आख्यायिका आहे. ती प्रतिकात्मक आहे. चिखल्याच्या मूर्ती जिवंत केल्या असे न मानता चिखलासारखे थंड पडलेल्या, संवेदनाहीन झालेल्या, मी आणि माझे इतकंच पाहण्यात देशहित विसरलेल्या समाजात सातकर्णीने चैतन्याचे, आत्मनिष्ठतेचे, राष्ट्रीय अस्मितेचे प्राण फुंकले आणि हा सगळा समाज मग देशभक्तीने प्रेरित होऊन शत्रूशी निकराने लढला आणि विजय मिळविला.

***

खान्देशातील इतिहास पुरुष - शककर्ता अहिर कुंभार सम्राट शालिवाहन

- इतिहासकार : बापू हटकर, बदलापूर

इ.स. पूर्वीच्या काळात महाराष्ट्रावर शकांचं राज्य होत. शक हे परकीय होते. इ.स. ००५० च्या काळाच्या दरम्यान नहपान शहरात हा शक राजा महाराष्ट्राच्या सम्राट पदावर होता आणि महाराष्ट्र परकीय सत्तेच्या गुलामीत खितपत पडला होता.

अशावेळी पुण्यभूमी खान्देशमध्ये गोदावरीच्या तीरावर एका सामान्य अहिर–कुंभाराच्या पोटी शालिवाहनाचा जन्म झाला.

त्यांची भाषा अहिराणी होती म्हणजे ते कुंभार कुटुंब अहिर होत. शालिवाहन हा लहानपणापासूनच तेजस्वी आणि बुद्धिमान होता. त्याचे आईवडील कुंभार असल्यामुळे ते त्याला साहजिकच मातीची खेळणी बनवून देत असत. या बाबत एक आख्यायिका आहे. शालिवाहनला इतर खेळण्यापेक्षा सैनिक खेळणी खूप आवडायची. तो आई वडिलांना सांगून हट्ट करुन शिपाई, सरदार, राजा, प्रधान, सेनापती, हत्ती, घोडे, लाव लष्कर, तलवार, भाला, बरची, धनुष्य बाण असली खेळणी बनवून घ्यायचा. एके दिवशी त्याने या मातीच्या खेळण्यावर अमृतमय पाणी शिंपडले आणि ते सर्व सैन्य जिवंत झालं. हे सैन्य घेऊन शालिवाहन शकांशी लढला आणि साम्राज्य उभं केलं अशी अख्यायिका आहे. याचा अर्थ असा होतो परकीय आक्रमक शकांनी आपली भूमी व्यापल्या, त्यावेळी सर्व समाज मृतवत झाला. त्यांच्यातील देशभक्ती स्वाभिमान, अस्मिता, पराक्रम सर्व संपलं. ते सर्व मृत मातीच्या खेळण्यासारखे झाले होते. गुलाम बनले, त्यांच्यावर स्वातंत्र्य, स्वाभिमान, देशभक्तीचे विचार रुपी पाणी शिंपडले आणि त्यांच्यात स्वातंत्र्याची उर्मी तयार झाली. त्यातून ते सर्व स्वातंत्र्य युद्धासाठी सज्ज झाले. शालिवाहन राजानी शक सम्राट नहपान शहरत याच्याशी एकूण २० युद्ध केली. शेवटचं युद्ध नाशिक येथे झालं. त्यात त्याने शहरत वंशाचा पूर्ण नायनाट केला. नहपान याला सत्ताभ्रष्ट केले. आणि स्वत: सम्राट पदावर विराजमान झाला. या विजयाची आठवण म्हणून त्याने त्याच्या अहिराणी मातृभाषेत एक शिलालेख तयार केला.

क्षहरात वस निर्वस करस. हा लेख जगातील पहिला अहिराणी लेख आहे. शालिवाहन याने त्यांचे शिलालेख हिंदी, मराठी, गुजराथी, तेलगू, संस्कृत भाषेत का नाही लिहिले? कारण त्याची मातृभाषा अहिराणी होती. होय सम्राट शालिवाहन हा खान्देश अहिराणी भाषिक अहिर होता. त्याची मातृभाषा अहिराणी होती म्हणून त्याने सर्व शिलालेख अहिराणी

भाषेत लिहिले आहेत. वरील शिलालेख नाशिक येथील पांडव लेण्यात आहे. तर इतर अहिराणी शीलालेख जुन्नर तालुक्यातील नाणे घाटात आहेत. शालिवाहन राजाने शकावर मिळवलेला हा विजयी दिवस होता, चैत्र शुद्ध प्रतिपदा शालिवाहन शक ०००१ (म्हणजेच गुढीपाडवा) इ.स. ००७८. एवढा जुना आहे हा अहिराणी शिलालेख म्हणजे उत्तर कर्नाटकातील श्रवण बेळगोड येथील पहिला मराठी लेख चामुंडराय करविले.

गंगाराज सुत्ताले करविले. या मराठी शिलालेख पेक्षा हा अहिराणी शिलालेख एक हजार वर्षे जुना आहे. म्हणजे अहिराणी भाषा ही मराठी भाषेपेक्षा एक हजार वर्षे जुनी आहे. मी या घटनांची सारखी पुनरावृत्ती करतो. ती प्रसंगानुरुप करावीच लागत आहे, पण अहिरांना आपली भाषा संस्कृती यांचं भान यावं, त्यांच्या कुंभकर्णी झोपेतून त्यांना जाग यावी ते शुद्धीत यावेत म्हणून हे आवश्यक आहे.

शालिवाहन राजाचा हा विजयी दिवस आपण वर्षे प्रतिपदा म्हणजे गुढी पाडवा, हिंदू नववर्ष सण म्हणून साजरा करतो. या शालिवाहन राजानें काही काळ नाशिक येथे राज्य कारभार केल्यावर त्यांनी त्याची राजधानी खान्देश नाशिक येथून मराठवाड्यातील पैठण येथे नेली. त्याकाळी या राजधानीच्या शहराला प्रतिष्ठान हे नाव होते. त्याचा अपभ्रंश पुढे पैठण असा झाला. हे घराणं पुढे सातवाहन या नावाने ओळखलं गेलं. आंध्र, महाराष्ट्र, खान्देश आणि गुजरात तसेच दक्षिणे पर्यंत त्यांचं राज्य पसरले होते. या सातवाहन घराण्याबद्दल असं म्हटलं जातं की, त्यांचे घोडे तीन समुद्राचं पाणी पीत होते म्हणजे अरबी समुद्र, बंगाचा उपसागर आणि हिंदमहासागर एवढ्या तीन समुद्राच्या आतील प्रदेशावर त्यांचं राज्य होत. शालिवाहन राजा गौतमीपुत्र शालिवाहन या नावानेही ओळखला जातो. त्याच्या नावाआधी आईच नाव घेतात. हिंदू धर्मात ही परंपरा महाभारतापासून सुरु आहे. भीष्माला गंगापुत्रभीष्म या नावाने ओळखतात. युधिष्ठिर, भीम, अर्जुन यांना कौंतेय तर नकुल सहदेव यांना माद्रेय म्हणतात. कर्णाला राधेय म्हणत. तसच शालिवाहन यालाही आईच्या नावावरुन गौतमीपुत्र शालिवाहन म्हणतात. असा हा महान सम्राट खान्देशी अहिर कुंभार होता, या गोष्टीचा आपण स्वाभिमान बाळगला पाहिजे.

***

पैठण दर्शन ... शालिवाहनाची कथा !

- मिलिंद काटे



सुबक अशा मातीच्या भांड्याच्या निर्मितीसाठी पैठणचा कुंभारवाडा प्रख्यात होता. त्याकाळी सर्वत्र मातीची भांडी, गाडगे, मडकी प्रचलित होती. धातुची भांडी श्रीमंत वर्ग वापरत असे. सर्व सामान्यांच्या घरात गाडगे मडक्यांची उतरंडी असत. त्याहून त्या घराची आर्थिक स्थिती समजे. साहजिकच या मोठ्या व्यापारामुळे कुंभार–वाड्यात सुबत्ता होती. मागणी खूप असल्यामुळे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होत होते. व्यवसायाला बरकत होती. पैठणचा कुंभार समाज हा नागवंशीय मानला जातो. नागघाटावरील नागदेवता हे दैवत समजले जाते. अतिशय प्राचीन काळापासून ही परंपरा असावी. याच परंपरेत चालत आलेल्या मौखिक इतिहासाप्रमाणे साधारणत: उत्तरेतील नंद राजवटीच्या पडत्या काळातील ही गोष्ट, अडीचहजार वर्षापुर्वीची!

पैठणवर त्यावेळी दिपकर्णी किंवा सोमकांत या राजाचं राज्य होतं. तेंव्हा एक ब्राम्हण कुटुंब आपले दोन मुले व एक सुंदर मुलीसह गरीबीला कंटाळून पैठणला राजधानीत धनप्राप्तीच्या आशेने आले. लवकरच आईवडीलांच्या मृत्युमुळे मुले पोरकी झाली. पुढे ही सुंदर ब्राम्हण कन्या कुंभारच्या घरी राहू लागली. त्यामुळे रागावून तिचे दोन्ही भाऊ लोकनिंदेस्तव तिला सोडून निघून गेले. पुढे यथावकाश तिने एक सुंदर मुलाला जन्म दिला. तोच शालिवाहन होय. हा लहानगा शालिवाहन कुंभारवाड्यात आपल्या मित्रमंडळीसह मातीचे हत्ती, घोडे, बैल, मातीचे सैनिक तयार करी. हळुहळु तारुण्याच्या उंबरठ्यावर आलेल्या हा तेजस्वी शालिवाहन आपआपसातील वाद, भांडणे, सामोपचाराने मिटवी. तो योग्य न्याय निवाडाही करी. नगरजनही त्याचा निर्णय मान्य करत.

साम्राज्य विस्तारासाठी सोमकांत व उज्जैनचा विक्रमादित्य यांच्यात नेहमी लढाया होत. गोदावरीच्या काठी झालेल्या भीषण युद्धात पराक्रमी विक्रमादित्यानं सोमकांताचा पराभव केला. पैठणची धुळधाण उडवली. आणि मग या तेजस्वी कर्तबगार शालिवाहनाने आपल्या सवंगड्यासह नगरजनांना विक्रमादित्याच्या विरोधात युद्धासाठी प्रवृत्त केले. सोमकांताच्या विस्कळीत झालेल्या सैन्याला पुन्हा एकदा एकत्र करुन मृतप्राय झालेल्या आपल्या समाजबांधवांना नागदेवतांच्या आशीर्वादाने मोठ्या कौशल्याने युद्ध प्रवृत्त केले. पुन्हा एकवार जोरदार युद्ध झाले. शालिवाहनाच्या अफाट पराक्रमाने विक्रमादित्याला चांगला धडा शिकवला आणि या विजयी वीरांने पारतंत्र्यातून पैठणला मुक्त केले. पैठणच्या नगरजनांनी त्याला मोठ्या आनंदाने गादीवर बसवले. त्यानंतर शालिवाहनानं शक, यवन, खारवेल, पुष्यमित्र श्रृंग, यवनराज, मिन्यांडर यांच्याशी सामना देऊन त्यांना नमविले आणि स्वत:ला, अप्रतिहच, चकस, दखीना, पथ, पथीनो म्हणवून घेतले आणि दक्षिणापथ निर्धास्त केला. सिंहासनस्थ होऊन शालिवाहन शक सुरु केला.

राजसुय, अश्वमेध आदी यज्ञ केले. सुवर्णकार, कास्यकार, वाणीज, सार्थवाह, हालीक (शेतकरी) या सर्वांनी शालिवाहनाच्या आश्रयानं संस्कृतीची, शौर्याची व संपन्नतेची गुढी सह्यगिरीच्या उत्तुंग शिखरावर चढविली.

समाजभूषण : सुरेश कोते

- डॉ. उमाकांत कृष्णाजी वाबळे (एम.एस.), पुणे



राष्ट्रपती यांचे समवेत सुरेशराव कोते व मान्यवर



प्रबोधनाच्या शतकोत्सवामध्ये विशेष समाजसेवा पुरस्कार उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते प्रदान

मी डॉ. उमाकांत कृष्णाजी वाबळे (सेवा हॉस्पिटल, पुणे) पुण्यातील रेड स्वस्तिक संघटनेचा उपाध्यक्ष आहे. सुरेश मारुतीराव कोते हे माझे स्नेही आणि रेड स्वस्तिक संघटनेचे अध्यक्ष आहेत. सुरेशजी कोते यांच्याशी संघटनेच्या माध्यमातून माझा निकटचा संबंध आला, त्यांच्या अफाट कर्तृत्वाचे, मनाच्या मोठेपणाचे आणि नम्र स्वभावाचे मला आलेले अनुभव मी या लेखाच्या माध्यमातून '५ मार्च' या त्यांच्या वाढदिवसानिमित्त आपणांसमोर मांडत आहे.

महाराष्ट्राचे वैभव असणाऱ्या सह्याद्री पर्वत रांगांमधील सर्वांत उंच पर्वत कळसूबाई शिखराच्या व अत्यंत दुर्गम अशा हरिश्चंद्र गडाच्या कुशीत वसलेले मुळा नदीच्या काठाकाठाने विकसित झालेले आदिवासी भागातील एक प्रमुख व्यापारी गाव म्हणून ओळखले जाणारे, त्याकाळी हजार एक उंबरठ्याचं त्यांचं जन्म गाव म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील श्री कौतुळेश्वर या ग्रामदेवतेचा वरदहस्त लाभलेले व श्री संत कोंडाजी बाबा या संताची भूमी लाभलेले छानसं नीटनेटकं टुमदार 'कोतुळ' हे गाव.

सर्वत्र ज्यांचे भक्त विखुरलेले आहेत अशा प.पू. संत कोंडाजीबाबांची कोतुळ ही जन्मभूमी व कर्मभूमी. पेशवाईत प्रसिद्ध असलेल्या साडेतीन शहाण्यांपैकी एक शहाणे पूजनीय विठ्ठल सुंदर परशरामी यांची ही जन्मभूमी. संपूर्ण सागरच गिळंकृत करणाऱ्या महान अगस्ती मुनींची संजीवन समाधीही अकोले या तालुक्याच्या गावी आहे.

सुरेशजींचे बालपण व शालेय शिक्षण कोतुळला झाले. कोतेसाहेबांचे वडील कै. मारुतीराव महादेव कोते हे अध्यात्म, व्यापार, राजकारण, समाजकारण, कला अशा सर्व क्षेत्रात आपला त्यांनी ठसा उमटविला. ते स्वत: उत्तम कीर्तनकार होते, कोतुळ गावचे ते सरपंच होते. गावामध्ये पूर्वी नाटक बसविणे व स्वत: त्या नाटकात कलाकार म्हणून काम करीत. उंचपुरी देहयष्टी व अत्यंत देखणे व्यक्तिमत्त्व त्यांना लाभले होते. व्यापारामध्ये त्यांनी किराणा, स्टेशनरी व कटलरी मालाचा व्यवसाय केला. सुरेशजींना त्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने आदर्श व गुरुस्थान हे त्यांचे आई-वडीलच होते. अध्यात्म क्षेत्रात असल्यामुळे त्यांच्यामुळे सुरेशजींना खूप चांगले विचार व संस्कार आई-वडिलांमुळे मिळाले. कोतुळ येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर पुढील शिक्षणासाठी संगमनेर कॉलेजला गेले. तेथे प्रथम वर्ष डिग्री घेतल्यानंतर मोठे बंधू पांडुरंग कोते यांच्या प्रेरणेमुळे पुणे येथे महाराष्ट्रातील नामवंत कॉलेज बी.एम.सी.सी. येथे प्रवेश घेऊन आपले पदवी शिक्षण पूर्ण केले. हे करीत असताना त्यांनी पुढील शिक्षण हे अकौंटसची कामे करुन घेतले. त्या कामासाठी त्यांनी स्टाफ ठेवला होता. हे काम करीत असताना त्यांनी वेगवेगळ्या व्यावसायिक मित्रांना घेऊन भागीदारी व्यवसाय सुरु केले व नंतर जागा घेणे देणे व बांधकाम क्षेत्रात आपले काम सुरु ठेवले.

आपणास व्यवसायातून झालेली आर्थिक प्राप्ती ही केवळ आपली स्वत:ची नसून आपण समाजाचेसुद्धा देणे लागतो अशा प्रकारची भावना असल्यामुळे त्यांनी शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक क्षेत्र यासाठी आर्थिक योगदान केले.

अकोले येथे अभिनव शिक्षण संस्था बंद करण्याचा विचार झाला असताना ती बंद होऊ नये व विद्यार्थ्यांच्या इंग्रजी शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून सुरेशरावांची आई श्रीमती पार्वतीबाई कोते यांनी आपले स्वकष्टार्जित १३५ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम अभिनव शिक्षण संस्थेसाठी दान करुन संस्थेला पूर्ण जीवनदान दिले. आज या संस्थेत पहिली ते एम.बी.ए. पर्यंत ३५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कै. मारुतीराव कोते या नावाने शाळा सुरु झाली असून आई-वडिलांचे पुतळे संस्थेत उभे केले आहेत.

मु.पो. मोग्रस येथील देवीच्या मंदिरासाठी मौजे मोग्रस परिसरातील सर्व मालकी हक्काची जमीन मारुतीराव कोते यांनी स्वहस्ते देणगी दिली. मु. वाघापूर (कोतुळ) येथे अंबिकामाता मंदिराची उभारणी केली व मंदिरासाठी ४२ एकर जमीन देवस्थानच्या नावाने खरेदी करुन दिली.

सुरेशजींना कायमच साध्या व्यक्तींच्या मतापासून ते थोरामोठ्यांची भाषणे मन लावून ऐकण्याची सवय आहे. अनेक समाजधुरिणांची कामे त्यांनी जवळून पाहिली, ते उत्तम श्रोता व उत्तम निरीक्षक आहेत. त्यांनी स्वत: मधला सामाजिक कार्यकर्ता सदैव जागता ठेवण्याचा प्रयत्न केला. एखादं काम करण्याची आस एकदा का मनात निर्माण झालीकी सतत त्या कामाचा ध्यास घेणे हे सुरेशजींचे वैशिष्ट्य. विश्वास हाच यशाचा



सुरेशराव कोते यांना वाढदिवसाच्या कुंभश्रीतर्फे शुभेच्छा देताना डावीकडून सकाळचे माजी संपादक अरुणराव खोरे, रामचंद्र कुंभार, संजय राजे, सुरेशराव कोते, पत्रकार भाऊसाहेब नलावडे व सौ. विमल नलावडे



अ.भा.प्र.कुं. महासंघातर्फे सुरेशराव कोते यांचा सन्मान करताना महासंघ के प्रदेश संघटक जनार्दन प्रजापति व कुंभश्री संपादक संजय राजे

पाया असतो. विश्वास गुणवत्तेच्या आधारावर मिळविता येतो हे सूत्रच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

लिज्जत समूहा –मध्ये कौटुंबिक वातावरण ठेवूनही प्रचंड शिस्त ठेवली आहे.

सर्व कामगारांना, कार्यालयीन कर्मचाऱ्यांना एकत्र घेऊन काम करीत त्यांच्या उत्कर्षाकडेही मा. कोतेसाहेबांनी जातीने लक्ष दिले. ते कोणत्याही प्रसंगी भावनेच्या आहारी जात नाहीत. ते अभ्यासू व विचारी वृत्तीचे आहेत. त्यांच्या स्वभावात एक गोडवा आहे. शांत स्वभावाचे आहेत. पण प्रसंगी आपले अत्यंत परखड व स्पष्ट मतहीते नोंदवितात. परिस्थिती पाहून निर्णय घेण्याची क्षमता, असंख्य व्यक्तींच्या सहवासात असूनही जपलेली चारित्र्यसंपन्नता, सुसंस्कृत मनाचा हा समाजवेडा माणूस स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने जनतेच्या हृदयसिंहासनावर आरुढ झाला आहे. कोतुळ गावचे ग्रामदैवत कोतुळेश्वर मंदिर या देवस्थानचे अध्यक्षपद भूषविताना मंदिराची व परिसराची उभारणी गावाबरोबरच स्वत:च्या आर्थिक योगदानातून केली. कोतुळ गावचे संत श्री कोंडाजीबाबा यांचे प्रशस्त मंदिर उभे केले व कोतुळ परिसरातील मुलींच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून श्री संत कोडाजीबाबा महाविद्यालय सुरु करण्यात मोलाचे योगदान व सहकार्य केले.

श्री संत कोंडाजीबाबा मंदिराची प्राणप्रतिष्ठा मोठ्या दिमाखात केली. दहा दिवस सप्ताहाचे नियोजन केले व या काळात लक्ष भोजन घातले. सुरेशजींचे सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक काम पाहून कोतुळच्या ग्रामस्थांनी त्यांची हत्तीवरुन मिरवणूक काढली व हत्तीवरुन सर्व गावभर साखर वाटली. पुणे येथे कुष्टरोग्यांच्या मदतीसाठी धावून गेले. त्यांना समाजामध्ये सन्मान मिळावा आणि त्यांना चरितार्थासाठी काम मिळावे म्हणून फार



कृषिभुषण सौ. व श्री. बुधाजीराव मुळीक यांचा सपत्नीक सन्मान करताना सुरेशराव कोते व इतर मान्यवर

मोठे योगदान दिले. त्यासाठी त्यांनी व मित्रांनी एकत्र येऊन लेप्रसी रिहॅबिलिटेशन ट्रस्ट निर्माण केली व त्यामार्फत साक्षात भगवंताची सेवा म्हणून त्यांची सेवा केली. या कामाबद्दल सुरेशरावांचा भारत सरकारतर्फे महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोंविंद यांच्या हस्ते दिल्ली येथे सन्मान करण्यात आला.

ते श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड संस्थेमध्ये १९८२ साली दाखल झाले. अत्यंत कष्ट करणे व प्रामाणिकपणा यामुळे भगिनींचा व वरिष्ठांचा विश्वास संपादन केला व सर्व व्यवस्थापन करण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली. या संस्थेच्या देशभर शाखा असून ५०००० पेक्षा जास्त महिलांनी स्वयंरोजगार निर्माण केला आहे. ही जगातील महिलांची सर्वात मोठी संस्था असून या संस्थेमध्ये काम करण्याचे भाग्य सुरेशला मिळाले. गेली १५ वर्षांपासून ते या संस्थेमध्ये विनावेतन आजही काम करीत आहेत. सुरेश कोते रेड स्वस्तिक संघटनेचे अध्यक्ष आहेत. रेड स्वस्तिक संघटनेमार्फत विविध आरोग्यविषयक शिबिरे व कार्यक्रम आयोजित केले जातात. विशेषत: संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यामध्ये वारकऱ्यांना आरोग्यविषयक सेवा पुरविली जाते. सुसज्ज ॲम्ब्यूलन्स सोबत डॉक्टरांची विशेष टीम या संघटनेमार्फत वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यासाठी तयार असते. तसेच वारकऱ्यांना संघटनेमार्फत मोफत औषध वाटप केले जाते. सुरेशजींच्या मार्गदर्शनाखाली या आणि अशा अनेक सामाजिक संस्था उल्लेखनीय योगदान देत आहेत. उद्योग व्यवसायामध्ये योग्य नियोजन, प्रामाणिकपणा व सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याच्या शैलीमुळे त्यांना जे.आर.डी. टाटा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच महाराष्ट्र सरकारतर्फे सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते 'राष्ट्रभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पुण्यातील श्री लक्ष्मी सहकारी बँकेचे १५ वर्षे संचालक व ५ वर्षे चेअरमन हे पद भूषविले व बँकेला उत्कृष्ट कामाचा पुरस्कार मिळवून दिला.

अत्यंत शांत व नम्र आणि जमिनीवर पाय ठेवून चालणे हा त्यांचा मूळ स्वभाव आहे. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सहकार या क्षेत्रात काम करीत आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रात समाजसेवा करणाऱ्या २० संस्थांवर ते काम करीत आहेत. त्यांना ५ मार्च ह्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त लाखलाख शुभेच्छा!

***

यशवंत व्यक्तिमत्त्व नंदू जाधव



उद्योग-व्यवसाय म्हटलं, की डोळ्यांसमोर दिसते, ते आर्थिक भांडवल, खर्च आणि याच खर्चामुळे अनेक बेरोजगार तरुण आज उद्योग-व्यवसायाकडे वळत नाहीत. परंतु आर्थिक भांडवल जरी नसले, तरी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर एक चांगला यशस्वी उद्योजक होता येतं, याचं एक आदर्शवत ज्वलंत आणि जिवंत उदाहरण म्हणजे युवा उद्योग व्यावसायिक नंदू जाधव.

इगतपुरी : इगतपुरी या आदिवासीबहुल तालुक्याच्या पूर्व भागातील तीर्थक्षेत्र असलेल्या सर्वतीर्थ टाकेद येथील गरीब कुटुंबात आजचे युवा उद्योजक आणि तरुणांसाठी आदर्श ठरत असलेले उद्योग व्यावसायिक नंदू जाधव यांचा जन्म १६ जून १९८४ मध्ये कुंभार समाजातील जाधव कुटुंबात झाला. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. जाधव यांचे त्या काळात गावात साधे घर देखील व्यवस्थित नव्हते. कोणतेही वाहन अथवा साधी सायकल त्यांच्याकडे नव्हती. अठराविश्व दारिद्र्य असलेल्या घरच्या बेताच्या परिस्थितीत जाधव २००० मध्ये दहावीला असताना वडील शंकर कोंडाजी जाधव यांचे अल्प आजाराने निधन झाले. पितृछत्र हरपलेल्या कुटुंबात एक भाऊ, एक बहीण, आई होते. परिवार सांभाळण्याची सर्व जबाबदारी त्यांच्या आई बबाबाई यांच्यावर आली. अशा परिस्थितीत चुली, मडके, गाडगे बनविणे हा आपल्या पारंपारिक व्यवसाय जोपासात मोलमजुरी करत आईने सर्व मुलांना मोठे केले. उदरनिर्वाहासाठी संघर्ष करायचा की शिक्षणासाठी, हा यक्षप्रश्न जाधव यांच्यासमोर उभा होता. पाव विकणे, बिगारी म्हणून काम करणे, मोलमजुरी करणे असे प्रयत्न करत २००२ मध्ये ते कसेबसे बारावी विज्ञानपर्यंतचे शिक्षण घेऊन घराबाहेर पडले. शिक्षणाची इच्छा-आकांक्षा असतानाही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ जाधव यांच्यावर आली. दहावी-बारावी आणि त्यानंतरचा शैक्षणिक काळ हा जाधव यांच्या आयुष्यातील अत्यंत संघर्षाचा, हलाखीचा होता, असे ते नेहमी सांगतात. बारावी विज्ञान शाखेत २००२ मध्ये 'अ' तुकडीत गुणवंत विद्यार्थी असताना देखील आईला संसाराचा रहाटगाडा ओढण्यासाठी पारंपारिक व्यवसायात मदत केली. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर गोंदे, सिन्नर, सातपूर औद्योगिक वसाहतीत अनेक कंपन्यांमध्ये जवळपास दहा वर्षे कामगार म्हणून सोळा-सोळा तास काम केले. काम करत असताना आपण परिस्थितीमुळे जास्त शिकलो नाही, उच्चशिक्षण घेऊ शकलोनाही. त्यामुळे आपण उद्योग-व्यवसायात तरी आपले वेगळे नाव तयार केले पाहिजे, असा विचार नेहमी मनात घर करुन असायचा. बारावी विज्ञान पास झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी दुसऱ्यांच्या वीटभट्टीवर काम करणे पसंत केले. त्यातूनच त्यांना स्वत:चा व्यवसाय करण्याची चालना मिळाली. शिक्षक पटेल आणि आवारी सर यांनी त्या काळात मला पुढील शिक्षणासाठी आग्रह धरला. माझा पुढील सर्व शालेय खर्च आम्ही करतो, परंतु आई काबाडकष्ट करत असताना हे बघवत नव्हते. त्यामुळे मी क्षणाला राम राम करत जाधव आईसोबत पारंपारिक व्यवसायात गुंतले.

...अन् व्यवसायाला मिळाली चालना : शिक्षण अर्धवट राहिल्याने मनात असलेली खंत उसंत बसून देत नव्हती. त्यामुळे उद्योग-व्यवसाय क्षेत्रात तरी आपली वेगळी ओळख करुन आपली घरची प्रतिकूल परिस्थिती बदलू, अशी मनाशी खूणगाठ बांधून आपलं स्वत:च वेगळं अस्तित्व निर्माण केलं पाहिजे, अशी संकल्पना जाधव यांना स्वस्थ बसू देत नव्हती. व्यवसाय म्हटलं, की आर्थिक बजेट भांडवल मुख्य स्वरुपात आलं. व्यवसायासाठी पुरेसे भांडवल नसल्याने जाधव यांनी मित्र, पोस्ट ऑफिस, पतसंस्था यामध्ये असलेली अल्पबचत घेऊन जवळपास ४० हजार रुपये जमा केले. २००८ मध्ये जाधव यांच्या स्वप्नात आणि संकल्पनेत असलेल्या शिवसाई वीटभट्टी व्यवसायाला खऱ्या अर्थाने दमदार सुरुवात झाली. खऱ्या उज्वल आयुष्याची सुरुवात येथूनच सुरु झाली. २००८ मध्ये नाशिकमधील सिडको येथील भागवत कुटुंबात मुलगी बघण्यासाठी जाधव यांनी कुटुंबासमवेत भेट दिली. आजपर्यंतचा आपला जीवनप्रवास भागवत कुटुंबीयांना सांगितला. त्यांच्या या प्रामाणिकपणाला भागवत कुटुंबीयांनी हिरवा कंदील दर्शविला. काही दिवसांतच नंदू जाधव यांचा भागवत कुटुंबातील चंद्रकला यांच्याशी विवाह झाला.

एका यशस्वी पुरुषाच्या मागे नेहमी स्त्रीची खंबीर साथ आणि भक्कम आधार हात असतो, हा विचार सत्यात उतरला. सौ. चंद्रकला यांनी घेतलेल्या निर्णयामुळे जाधव यांच्या कुटुंबात प्रत्यक्षात खऱ्या लक्ष्मीचे आगमन झाले. दरम्यान जाधव यांनी वीटभट्टी व्यवसायाकडे पूर्णपणे लक्ष दिले. कुटुंबाचे काही वर्षे कोलमडलेले आर्थिक बजेट जाधव यांनी भरुन काढले. २०१४ मध्ये उद्योजक जाधव यांनी आपल्या मातोश्री बबाबाई शंकर जाधव यांना ग्रामपंचायत टाकेद बुद्रुक सार्वत्रिक प्रभागातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून देखील आणले. गावातील विविध विकासकामे करण्यासाठीही प्रयत्न केला.

शंभर बेरोजगारांची पेटविली चूल : आज एकेकाळी सायकल नसलेल्या व्यक्तीच्या दारात दोन कार, दोन ट्रक, एक ट्रॅक्टर, एक जेसीबी, तीन बाइक, एक बुलेट, टेम्पो अशा स्वत:च्या वाहनांची गर्दी पाहायला मिळते. यासोबतच स्वत:चे राहते घर, जमिनी, सोबतच वडिलांच्या नावाने भव्य व्यापारी संकुल, गावात गाळे आणि दोन वीटभट्टी केंद्र, असा उत्पन्न सौअर्सदेखील त्यांनी तयार केला आहे. शिवसाई बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वीटभट्टी, कॉम्प्लेक्स असलेल्या उद्योजक नंदू जाधव यांचे हक्काचे एक छोटेसे संपर्क कार्यालयही आहे. आज कुटुंबासोबत आनंदी जीवन जगत असताना मुलांचे शिक्षण, कुटुंबातील सर्वांचे हट्ट ते पुरवतात. या सोबतच त्यांनी आपल्या यशस्वी उद्योग व्यवसायात जवळपास १०० एक कामगारांना हक्काचा रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

***

हिमालयाच्या शिखरावर छत्रपती शिवराज विराजमान

जम्मू-काश्मिरात मराठा रेजिमेंटने उभारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती पुण्याच्या अजिंक्य लोहगावकर (कुंभार) यांची







जम्मू-काश्मीर : मच्छल गावात हुतात्म्यांच्या स्मरणार्थ मराठा बटालियनने तयार केलेले 'मराठा स्मृतिस्थळ'!

पुणे : देशाच्या उत्तरी भागात जम्मू-काश्मीर येथे तैनात असलेल्या मराठा रेजिमेंटने चक्क मच्छलच्या खोऱ्यात नियंत्रण रेषाजवळ छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती उभारली आहे. ही प्रतिकृती १४ हजार ८०० फूट उंचावर उभारण्यात आली असून जगात प्रथमच महाराजांची प्रतिकृती इतक्या उंचावर बसविण्यात आली आहे. समाज माध्यमांवर या मूर्तीचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.

हातात तलवार घेऊन घोड्यावर विराजमान असलेल्या शिवाजी महाराजांची ही प्रतिकृती थेट सैन्यदलातील मावळ्यांसोबत नंगा पर्वताकडे पाहत शत्रूवर नजर ठेवत असल्याचे या मुर्तीकडे पाहून वाटते.

मच्छल या गावात सैन्यदलाच्या वतीने महाराजांच्या दोन प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. या दोन्ही प्रतिकृती पुण्यातील २५ वर्षीय तरुण मूर्तिकार अजिंक्य लोहगावकर यांनी साकारल्या आहेत. मच्छल बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रणय पवार यांच्या कल्पनेतून ही प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

याबाबत कर्नल पवार म्हणाले, ''मराठा समाजाला एकत्र करत स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आदर्श आहेत. शिवाजी महाराजांनी शत्रूला आपल्या युद्धनीती आणि धाडसी कर्तृत्वाने पळवून लावले. त्यांच्या मावळ्यांची फौजेप्रमाणे आज लष्कराचे सैन्य देखील सीमेवर शत्रूशी लढत आहे. शिवाजी महाराज हे प्रेरणेचे केंद्र आहेत. गेल्या १४ वर्षांपासून मराठा रेजिमेंट काश्मीर खोऱ्यात सीमेवर तैनात आहे. शत्रूशी लढणाऱ्या या जवानांना महाराजांचा आदर्श आणि नैतिक मूल्ये दररोज मिळत राहावे या अनुषंगाने मच्छल येथे शिवाजी महाराजांची प्रतिकृती उभारण्याची कल्पना सुचली.

यासाठी पुण्यातून मुर्ती मागविण्यात आल्या. गेल्या वर्षी दिवाळी दरम्यान ही मुर्ती उभारण्यात आली. जवान उठल्यावर त्यांना महाराजांचे दर्शन घडावे अशाच ठिकाणी या दोन्ही प्रतिकृती उभारल्या आहेत.''

***



गेल्या अनेक वर्षांपासून मी मूर्ती साकारण्याचे काम करत आहे. या कलेचा वारसा वडिलांकडूनच मिळाला. देशसेवेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांसाठी हे कार्य करताना अत्यंत अभिमान वाटला. प्रत्येक मूर्ती साकारण्यासाठी दीड महिन्यांचा कालावधी लागला. यासाठी विशिष्ट प्रकारच्या फायबरचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ऊन, पाऊस किंवा बर्फवृष्टी झाल्यावरही मूर्तीवर काही परिणाम होत नाही. **– मुर्तिकार अजिंक्य विजय लोहगावकर (कुंभार)**
(Mo. 7972410831)

अशी आहे महाराजांची मूर्ती...

* सुमारे पाच फूट उंच
* पुण्यातील 'एसएसपीएमएस'च्या आवारातील मूर्तीची हुबेहूब प्रतिकृती
* मूर्तीचे वजन २५ किलोग्रॅम
* प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुद्धा टिकून राहील
* कोणत्याही ठिकाणी मूर्तीला हलविणे सहज शक्य

मराठा स्मृतिस्थळाबाबत...

* रायगड किल्ल्याच्या प्रतीकात्मक स्वरूपात मराठा स्मृतिस्थळ
* येथील महाराजांची मूर्ती सुमारे १२ फूट उंच
* हुतात्म्यांच्या सन्मानार्थ स्मृतिस्थळ येथे विशेष भिंत
* ३२ हुतात्मा जवानांची नावे भिंतीवर
* नौदलाची प्रतिमा दर्शविण्यासाठी कृत्रिम बेट

हाडांचे स्पेशालिस्ट अन हाडाचे डॉक्टर : उत्तम कुंभार

– जालिंदर हुलवान, मिरज





मिरज या वैद्यकीय पंढरीमध्ये पिढ्यानपिढ्या आरोग्य सेवा देणारी काही कुटुंबे आहेत. मात्र एका शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला येऊन डॉक्टर बनलेले डॉ. उत्तम कुंभार हे मिरज या आरोग्यपंढरीचे पायीक झाले आहेत. गेल्या १६ वर्षांमध्ये त्यांनी चार लाखहून अधिक रुग्णांवर उपचार करुन त्यांनी आरोग्यसेवा दिली आहे.

माणसांच्या हाडांविषयी कोणतीही समस्या असली तर रुग्णांना आपलेसे वाटावे असे नाव गेल्या १६ वर्षांमध्ये डॉ. उत्तम कुंभार यांनी मिळविले आहे. ते मिरज या आरोग्यपंढरीतील हेल्थ आयकॉन आहेत. त्यांच्या या आरोग्यसेवेच्या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी डॉ. अश्विनी कुंभार यांची मोलाची साथ मिळत आहे.

डॉ. उत्तम कुंभार हे मिरज तालुक्यातील एरंडोली या गावचे. ते लहानपणापासूनच शाळेमध्ये तरबेज होते. त्यांना डॉक्टर बनायचे होते. त्यामुळे त्यांनी मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस चे शिक्षण घेतले. सोलापूरातील वाडीया हॉस्पीटल येथे त्यांनी ऑर्थोपिडीकचा डिप्लोमा पुर्ण केला. त्यानंतर त्यांनी मुंबई येथे यु.एम.ए.आय.एम. येथून एम.एस. ऑर्थोपेडीकचे उच्च शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मिरजेतील बस स्थानक चौकामध्ये कुंभार ॲक्सिडेंट अँड ऑर्थोपेडिक हॉस्पिटल या नावाने हॉस्पिटल सुरु केले.

या हॉस्पिटलमध्ये त्यांनी गेल्या सोळा वर्षांमध्ये ४ लाख रुग्णांवर उपचार करुन त्यांना आरोग्यसेवा दिली आहे. या रुग्णालयात आंतर रुग्ण विभागामध्ये त्यांनी सुमारे ५५ हजार इतक्या रुग्णांवर उपचार करुन त्यांना सेवा दिली आहे. या रुग्णालयाच्या माध्यमातून त्यांनी मिरज तालुक्यातील एरंडोली, कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील औरवाड आणि कर्नाटकातील कुडची या तीन गावांमधील लोकांसाठी मोफत एक्सरे, मोफत तपासणीची सोय केली आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे.

रुग्णालयात सध्या जनरल वॉर्ड, सेंट्रल ऑक्सीजन सिस्टिम, वेटींग हॉल, रिकव्हरी रुम, लॅमिनार एअर फ्लो ऑपरेशन थिएटर, सी आर्म इमेज इंटेन्सीफायर सिस्टम, ऑर्थोस्कोप युनीट, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, फिजीओथेरपी युनीट, रुग्णांसाठी डिलक्स व स्पेशल रुमची सोय आहे. अल्ट्रामॉडर्न इन्स्फ्रास्ट्रक्चर, पुर्णपणे हायजेनिक व व्हेंटीलेटेड इमारत, फायर सिक्यूरिटी, सिक्यूरिटी गार्ड, अत्याधूनिक असे ट्रॉमा केअर युनिट, स्वतंत्र सेप्टीक ऑपरेशन थिएटर, ऑर्थो स्कोपीक सर्जरी, इलिझारो सर्जरी, अत्याधुनिक डेफोर्मीटी करेक्शन सेंटर, तज्ज्ञ फिजिओथेरपिस्टच्या माध्यमातून चालविले जाणारे अत्याधुनिक फिजिओथेरपी युनिट, प्लास्टीक सर्जरी, न्यूरो सर्जरी, फॅसीओ मॅक्झीलर सर्जरी, जनरल सर्जरी, २४ तास अत्यावश्यक सेवा, अनुभवी नर्सींग स्टाफ, ऑर्थो पेडीक आयसीयू अशा सर्व सेवा रुग्णांसाठी या रुग्णालयात उपलब्ध आहेत.

आरोग्य योजनेतून मोफत शस्त्रक्रिया

कुंभार ॲक्सिडेंट अँड ऑर्थोपिडिक हॉस्पिटलमध्ये पिवळ्या, केसरी रेशनकार्ड धारकांसाठी शासनाच्या योजनेअंतर्गत पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करणे सुरु झाले आहे. या हॉस्पिटलमध्ये गेल्या सोळा वर्षांपासून हाडाच्या संदर्भातील सर्व प्रकारच्या उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातात.

शासनाच्या योजनेतूनही रुग्णांना सेवा देण्याचा डॉक्टरांचा मानस होता. त्यानुसार शासनाकडून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करण्यास हॉस्पिटलला मान्यता मिळाली आहे. या योजनेतून रुग्णांवर पूर्णपणे मोफत उपचार केले जातात. त्यामुळे आता ही सोय हॉस्पिटलमध्ये सुरु झाली आहे. ज्या रुग्णांकडे पिवळे किंवा केसरी रेशनकार्ड आहे. त्या रुग्णांवर पुर्णपणे मोफत उपचार केले जात आहेत.

***







डॉ. उत्तम कुंभार
MBBS, MS (ORTHO)
D. ORTHO

डॉ. अश्विनी उत्तम कुंभार

कुंभार ॲक्सिडेंट ॲन्ड
ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, मिरज

पिवळ्या व केशरी रेशनकार्ड धारकांसाठी
पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया
* महाराष्ट्र शासनाची *
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
अंतर्गत
अस्थिरोगावरील शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.

शिवाजी रोज, सिटी बस स्टँड समोर, मिरज.
फोन. (0233) 2220581, मो. 8530525764



Ganesh Kumbhar

Mob .: 9762322347
9823745257

TERRA
INFORMATIC SERVICES

GIS Work, Auto-CAD Design &
All type of Surveying Work

Office : Flat No.2, Omkaram Building, Yashodhan Society, Chintamani Nagar Bhag 2, Bibwewadi, Pune.

Flat No. 05, Shrenik Residency, Ganraj Colony, Warje, Pune 58
Email : tera_pune@rediffmail.com

निवृत्ती एकनाथ भागवत



निवृत्ती एकनाथ भागवत
9371232627



शरद निवृत्ती भागवत
7620232627

विट कारखानदार व द्राक्ष बागायतदार

मु.पो. शिंगवे, ता. निफाड, जि. नाशिक





दिनकर विष्णू कुंभार





मनोज दि. कुंभार





सौ.ज्योती म. कुंभार

वरदराज आर्ट

आमचेकडे सर्व प्रकारच्या सर्वांग सुंदर गणेश मुर्ती, दुर्गा मुर्ती होलसेल व रिटेल दरात मिळतील. तसेच रबर मोल्ड मिळतील

कारखाना : पी.डी. पाटील नगर, गोवारे रोड, कराड
निवास : १४१, सोमवार पेठ, कुंभार गल्ली, कराड, जि. सातारा

Mob.: 9823153131, 9823623131
9545863131, 7057400031



VSK



श्री. किसन शिवाजी कुंभार
मो. 09881872823



श्री. विजय शिवाजी कुंभार
मो. 9881289332
7588945032

चि. मंगेश कि. कुंभार
B.Com.

ज्योतिर्लिंग वीट कारखाना

आमचेकडे उत्तम प्रतीच्या सर्व साईजच्या विटा होलसेल दरात उपलब्ध

ज्योतिर्लिंग पेट्रोलपंप

मु. पो. गुळूंचे, ता. पुरंदर, जि. पुणे

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था (रजि.)






ज्ञानेश्वर भागवत
उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था

सौ.मंगला ज्ञा.भागवत
संचालिका तुळजा भवानी ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था घोटी

राहुल ज्ञा.भागवत
बी.फार्म.
संपर्क 9822256949

अतुल ज्ञा.भागवत
B.D.S.
9028852324

ज्ञानमंगल दातांचा दवाखाना

न्यु. नंदिनी मेडीकल

संपर्क 9226704724 /9028811102
वासुदेव चौक, घोटी, ता.इगतपुरी, जि.नाशिक





Arun S. Nigavekar
Ex. Deputy Meyor
Kolhapur

Sanjay Nigavekar
Chairman, Kumawat
Co-op. Society

Amit A.
Nigavekar

M.: 9890028199 / 8390909083

Paint Marchant & Ganpati Colours

ARUN & CO.
Ph.: 0231- 2640116
Ford Corner, Laxmipuri

ARUN BROTHERS
Ph.: 0231- 2642619

AMIT ENTERPRISES
Ph.: 0231- 2642230

INDOCEM®

C & F Agent : Indocem India Pvt. Ltd.



shivam agencies
Italian Touch Finesh Kitchen

9158589900
Shop : 1430, C, Sambhaji Bridge, Laxmipuri, Kolhapur
Email : arunbross@gmail.com

RELIABLE LIFTS India Pvt. Ltd.

Avdhut Complex, Office No.201, IInd Floor,
Near Shree Vitthal Heritage, Dattanagar,
Ambegaon BK, Pune 411046
E-mail : reliablelifts2012@gmail.com
Web.: www.reliablelifts.in



Chandrakant Kumbhar
Director
9960200174

Specialist in
Manufactures, Installation, Modernasation, AMC of all types of lifts (Elevator's)



ज्योतिषतज्ञ
सौ. लता चंद्रकांत कुंभार
मो. 9527601537

जन्मपत्रिका, वास्तुशास्त्र
फेंगशुई इत्यादी बाबत
तज्ञ मार्गदर्शन मिळेल.

श्री विठ्ठल हेरीटेज, दत्तनगर,
आंबेगांव बु. पुणे ४११०४६

बारामतीमधील संगणक क्षेत्रातील अग्रगण्य नाव.....
(बेस्ट तालुका ए.टी.सी. ॲवॉर्ड विजेते)



राजेंद्र कुंभार

डाटाबेस कॉम्प्युटर्स

कोर्सेस

- MS-CIT
- DTP
- TALLY
- C, C++
- VB
- ORACLE
- DCO, DCFA
- OTHER DIPLOMA & CERTIFICATE COURSES

विविध शासकिय Online फॉर्म भरण्याची सुविधा...

MKCL चे विद्यार्थी फॅसिलिटी सेंटर

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. मान्यता प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

डाटाबेस कॉम्प्युटर्स

WE MAKE PERFECT

बुरुड गल्ली,लोंढे हॉस्पीटल समोर,बारामती,जि.पुणे.
फोन : २२६५१०/मो.९४२३२०३७७७

अनमोल वीट सप्लायर्स

आमच्याकडे सर्व साईजच्या वीटा
होलसेल भावात मिळतील

पिंपळस (रामाचे) बसस्टँड समोर,
ता.निफाड, जि.नाशिक



कृष्णा त्र्यंबक सोनवणे
अ.म.कु.स.विकास संस्था
नाशिक जिल्हा अध्यक्ष
बाराबलूतेदार महासंघ
नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख
7057993909



सौ. पुनम कृष्णा सोनवणे



सौ.सोनाली कृष्णा सोनवणे



चि.अनमोल कृष्णा सोनवणे



कु.देवश्री कृष्णा सोनवणे

निवास : अनमोल निवास, मु.पो.पिंपळस (रामाचे)
ग्रामपंचायत शेजारी, ता.निफाड, जि.नाशिक



SAI
ELECTRO INDUSTRIES

Electrical Contractors & Consultants
Home Wiring & Industrial Wiring
Sales & Service
Online, Offline Inverters & UPS Systems
Servo Stabilizers & Batteries
Havells Official Distributor
Led Lighting, Home Appliances and Reo etc.

OUR INSPIRATION



Late D.T. Jorwekar



Late Vatsala Jorwekar



Sudhakar Jorwekar



Balasaheb Jorwekar
9422384801



Nikhil Jorwekar
BE Computers

B-No.16, Satara Sah.Grih Nirman Society,
Near Saibaba Mandir, Godoli, Satara. Ph. (02162) 234562



Harishchandra
R. Salvi
D.OPT.









Sushant's

SPECTACLES OPTICS & CONTACT LENS

4, Mahavir Niwas,
Sector No.21,
Opp.Centurion Mall,
Nerul-Seawood,
Navi Mumbai - 400 706.
Ph.: (022) 27702884

SPECTACLES
SUSHANT OPTICIANS
& Contact Lens Centre

5, Shivkrupa, Near Bombivli
Nagari Sahakari Bank,
Kulgaon, Badlapur(E)
(0251), 2694458, 2695566

Akash
Tours & Travels



आत्माराम गंगाराम नेसनतकर

आमच्याकडे शालेय सहली,
कॉलेज टुर्स, धार्मिक दर्शन व
लग्न प्रसंगा करीता
लक्झरी बसेस वाजवी
दरात भाड्याने मिळतील



ऑफिस : रामलता बिझनेस सेंटर, अकोला
मो. 9096608814 / 9422861728

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


जगन्नाथ सुर्यवंशी


सौ.वंदना ज. सुर्यवंशी


निलेश ज.सुर्यवंशी
B.E.(Mech.)


सौ.कविता नि.सुर्यवंशी
M.Sc., MBA


डॉ.राकेश ज.सुर्यवंशी
MBBS, PGCR


डॉ.गायत्री रा.सुर्यवंशी
B.H.M.S.


प्रमोद ज्ञा.थोरात
B.E.(E&TC)


सौ.वर्षा प्र.थोरात
M.Sc., B.Ed.

जगन्नाथ भिका सुर्यवंशी
निवृत्त म.रा.वि.वि.कंपनी
निवास : श्री 'गजानन कृपा' श्री.इच्छापूर्ती गणेश मंदिरा जवळ शास्त्रीनगर, चाळीसगाव, जि.जळगाव
94210 39375

प्रथमेश एक्झोटिका
फेज I फ्लॅट ४०१, एस.बी.पाटील कॉलेज रोड, रावेत, पुणे मो.नं. **9930800884**

अथर्व क्लिनिक
पारसिक नगर, कळवा (प) ठाणे
मो.बा. **9867200456**

कु.शरयु, चि.कनाद, कु.ओवी, चि.अथर्व, कु.अर्णवी, कु.रेणुश्री.

आमचे प्रेरणा स्थान


कै.विठ्ठल जोंधळे


लक्ष्मीबाई विठ्ठल जोंधळे


शांताबाई विठ्ठल जोंधळे


शदर विठ्ठल जोंधळे


सौ.अपर्णा शरद जोंधळे


कु.वैष्णवी श.जोंधळे
F.Y.B.Sc.


चि.पियुश
Ninth Std.

त्रिमुर्ती ब्रिक्स अँड बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स
प्रोप्रा. शरद विठ्ठल जोंधळे मोबा. 9326198222 / 9226198222
"विठ्ठल कृपा", शिक्षक कॉलनी, कॉलेज रोड, मु.पो.सायखेडा, ता.निफाड, जि.नाशिक ४२२ २१०



मेघराज सर्वेअर

सर्व प्रकारचे लँड सर्व्हे केले जातील
अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक मशिनद्वारे जमीन मोजणी,
प्लॉटिंग (लेआऊट डिझायनिंग) रोड सर्व्हे, कम्प्युटराईज्ड पोट हिस्से,
कन्टुर सर्व्हे, (**L-SEC, Cross-SEC**)
कॅन्टीटी, इरिगेशन सर्व्हे, बिल्डींग ब्लॉक, सेंटर लाईन मार्किंग इ.


संदीप कुंभार
9850444232

शॉप नं.१०, अरुण प्लाझा बिल्डींग, डांगे चौक, थेरगांव, पुणे ४११०३३
meghrajsurveyor23@gmail.com


खंडेराव माधव सुर्यवंशी
9890201152


राजाराम खं.सुर्यवंशी
9890431152/9011524466


नंदकुमार खं.सुर्यवंशी
9823341152


कु.यशोदा रा.सुर्यवंशी
M.Pharm.


चि.श्रीधर रा.सुर्यवंशी


चि.कार्तिक नं.सुर्यवंशी

उनंदा ब्रिक्स, वसुधा बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स

विटा, रेती, खडी, मुरुम, माती इ. सप्लायर्स
मु.पो.वरखेडा, ता.दिंडोरी, जि.नाशिक

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



M/s. KARVEER CONSTRUCTIONS

ARCHITECTURAL PLANNING / R.C.C. CONSULTANT
PROJECT MANAGEMENT &CONSULTING / CONTRACOTRS

Office : 1369 / 70, A, Rankala Darshan Aprt., Kolhapur - 416 012.
Email : ernitinkumbhar@rediffmail.com

Umesh P. Kumbhar
D.C.E.
Treasurer, Association of
Architect & Engineers, Kolhapur.
M.: 9890159098



जया एजन्सी

प्रोपा.जयश्री बा.सावर्डेकर
9975513728

गणपतीसाठी लागणारे कलर,
प्लॉस्टर पावडर, मोल्डींग रबर आणि
सर्व प्रकारचे मटेरिअल होलसेल व
रिटेल दरात मिळतील



करण आर्टस्

प्रोपा.बाजीराव स.सावर्डेकर
9960081937



आमचेकडे प्लॅस्टर व शाडू सुबक आकर्षक
गणेशमुर्ती होलसेल व रिटेल दरात मिळतील

प्लॉट नं.१५४, संत गोरा कुंभार वसाहत, बापट कॅम्प, शेवटचा बस स्टॉप, कोल्हापूर



डॉ एम.ए. मुरुडकर

एम.ऐ(अर्थशास्त्र)
एल.एल.एम.(पुणे विद्यापिठ)
पी.एच.डी(जयपूर)
डी.बी.एम.,डी.आयटी,
जी.डी.सी.अँड ए

सहकार अधिकारी श्रेणी १
सहकार विभाग, कोल्हापूर



सहकारी बँका व पतसंस्थासाठी उपयुक्त मार्गदर्शक ग्रंथ
पुस्तकांसाठी संपर्क 9123042159

ॲड.आकाश म. मुरुडकर

सर्व प्रकारचा कायदे विषयक सल्ला मिळेल



बी.एस.एल, एल.एल.बी.,
एम.ऐ(इंग्रजी)
96999602064

गट नं. "समर्थ" करवीर निवासीनी रेसीडन्सी प्लॉट क्र.५(अ), आर.के.नगर कोल्हापूर ४१६०१३

श्री स्वामी

मार्केटींग ॲण्ड हार्डवेअर



प्रदिप तुकाराम मांगुळकर
85518 04044

सौ.नंदीनी प्रदीप मांगुळकर
उपसरपंच नया आंदूरा

शेगांव रोड, निंबा फाटा, बस स्टँडख लोहारा, ता.बाळापूर, जि.अकोला ४४४३११ Email : pradipmangulkar@rediffmail.com

ॐ श्री समर्थ क्लनिक



डॉ.प्रशांत तुकाराम मांगुळकर
BHMS(CCH) 98236 99156
जनरल फिजिशीयन, सर्जन व बालरोग तज्ञ

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

www.modernmotorsauto.com Call Us: 9970614119/9049485999

MODERN MOTORS & AUTO ENGG. CO.

SINCE 1993

प्रोप्रा. राजेश कुंभार चे अभिमत, श्री गजानन ग्रामीण, बिगर शेती, सह पतसंस्था, पाटण


श्री. राजेश कुंभार


सौ. उर्मिला रा. कुंभार


चि. ओंकार रा. कुंभार
BE Automobile Engg.


चि. आदित्य रा. कुंभार
B-Tech Automobile Engg.

आमचेकडे सर्व प्रकारच्या कमर्शियल वाहनांच्या कंटेनर पॅक
बॉडी, इन्सुलेटेड बॉडी मल्टिपर्पज बॉडी व आकर्षक पालखीचे रथ
मजबुत व योग्य दरात तयार करुन मिळतील.



Modern Motors
modern_motors.auto
कराड- चिपळूण रोड नाडे (पूर्व), ता. पाटण, जि. सातारा
Email- modernmotorsauto@gmail.com


Kale B.J.
9422223755

YASHRAJ
APARTMENT
A Project By
Kale B.J.
at Shrigonda
SHOPS & OFFICES
1 & 3 BHK HOMES
- CONTEMPORARY DESIGN -



KALE B.J. BUILDERS & DEVELOPERS
Shrigonda Office : Pallav Puja Appartment, Bagade Corner, Mandgavon Road, Shrigonda, Dist. Ahmednagar - 413701
Pune Office : Tribandh 3, SBI Nirzar Co-Op Hsg. Soc. Opp.Gandhi Lawns, Gulwani Maharaj Road, Erandwane, Pune : 411038

डॉ.जी.एस.कुंभार मेमोरियल संचलित


डॉ.केदार कुंभार
(MBBS DMRE)
Consultant Radiologist

मोहर
डायग्नोस्टीक सेंटर व
मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

फोन : 0231-2356243, 9673258194

आयुर्वेदिक पंचकर्म - दर बुधवारी
सोनोग्राफी, गरोदर माता तपासणी, सुलभ प्रसुती,
सिझेरियन प्रसुती, बालरोग चिकित्सा, गर्भाशय,
अपेंडीक्स, हर्णिया शस्त्रक्रिया, जनरल मेडिसीन,
गर्भपात व कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया
बाह्यरुग्ण विभाग १०.०० ते २.००
सोनोग्राफी : स.८.०० ते.स.१०.००
संध्या. ६.०० ते रात्री १०.००
इस्पुर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर

अल्ट्राव्हिजन
डायग्नोस्टिक सेंटर
सोनोग्राफी
डिजीटल एक्सरे
कलर डॉपलर
3D / 4D
2D इको
ईसीजी
OPG
Sayaji Trade Centre, Gargoti
Timing : 10 am to 6 pm
+91 9890498184,
+91 866898961


Manoj Prajapati (C.M.D.)
9371587053

समृध्द जीवन जगण्यासाठी ...
An ISO 9001 - 2008

SHIVAM PRAJAPATI®
BUILDERS & DEVELOPERS
Address : Office No. 10, Prajapati Cascade,
Sector -1, New Panvel, Dist. Raigad - 410206
Tel. :022 2746 2053 / Mob. : 7303 386 820.
Email : info@shivamprajapatibuilders
shivamprajapati1983@gmail.com
www.shivamprajapatibuilders.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



श्री.सुर्यकांत धर्माजी कुंभार
सेवानिवृत्त नायब तहसिलदार
उपाध्यक्ष पुणे जिल्हा
अखिल महाराष्ट्र कुंभार समाज
विकास संस्था
9623626840



सौ.दमयंती सुर्यकांत कुंभार
सेवानिवृत्त सब पोस्ट मास्तर



श्री.स्वप्नील सुर्यकांत कुंभार
B.E.(E&TC)
नोकरी Vodaphone Co.
पद Dy.Manager



सौ.श्रद्धा स्वप्नील कुंभार
M.Sc.(Bio) Tech.
नोकरी LIC Co. Shivajinagar
पद : स्पेशलिस्ट डेटा इंजीनिअर

जावई



श्री.अनिल रेवणसिद्ध कुंभार
शिक्षण **B.E.(IT)**
नोकरी Veritas Tech. Co,
पद Principal Software Engineer

मुलगी



सौ.मनिषा अनिल कुंभार
शिक्षण **B.Sc.**
पद सहाय्यक लेखाधिकारी
जिल्हाधिकारी
कार्यालय पुणे १

सासवड, ता.पुरंदर(पुणे) जि.पुणे ४१२ ३०१

प्रेरणास्थान



कै.सौ.सुनिता भगवान सुर्यवंशी

निवृत्त पोलिस अधिकारी



भगवान सुपडू सुर्यवंशी
9867710780



विजय भ.सुर्यवंशी
D.Pharm



सौ.कल्पना वि. सुर्यवंशी
B.A.



प्रशांत भ.सुर्यवंशी
B.E.(Mech.)



सौ.निता प्र. सुर्यवंशी
B.Sc.(Comp), D.Pharm



निलेश र. सोनवणे
(जावई)



सौ.जयश्री निलेश कुंभार
(मुलगी)

वेल केअर केमिस्ट

प्रशांत निवास, भवानी चौक, सुर्यनगर, विटावा
कळवा, जुना बेलापुर रोड, ठाणे

प्रोप्रा. विजय भगवान सुर्यवंशी

निवास : ओझोन व्हॅली, बिल्डिंग नं.४, फ्लॅट नं.६०३, ६वा मजला,
पारसिक नगर, रिलायन्स मार्केट जवळ, खारेगांव, कळवा(प),
जि.ठाणे ४०० ६०५ मोबा. ९९६७८३५४००













Deep Fantasy Artifacts



Shilpkar Ravindra Kumbhar
Proprietor

B190, 191 MIDC, Wai, Dist. Satara, 412803
Mob.:9923352653 **Email :** deepfantasyartifacts.in

सुंदर हॉस्पिटल व प्रसुतीगृह

धानोरा, ता.आष्टी, जि.बीड



डॉ.गोरे डी.के B.H.M.S.
Mob.:9420024104
वेळ स.८ ते २ सायं.४ ते ८



सौ.सौ.गोरे एस.डी. B.A.M.S.
Mob.:9096605095
वेळ स.९.३० ते २ सायं.४ ते ८



कु.वेष्णवी दत्तात्रय गोरे(बी.डी.एस.)
चि.ऋषिकेश दत्तात्रय गोरे(बी.ए.एम.एस.)

उपलब्ध सुविधा

प्रसुति सुविधा
एक्स-रे

रक्त लघवी तपासणी
२४ तास अत्यावश्यक सेवा

जुन्या आजारावर आयुर्वेदीक व
होमोओपॅथी उपचार

अनघा

मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स

प्रयास अकॅडमी

IIT-JEE,MHT-CET & NEET ACADEMY

डॉक्टर व इंजिनिअर होण्याचे पहिले पाऊल



प्रा.शिरीष कुंभार

(Physics)(आय.आय.टी.रुरकी)(संस्थापक)

कोटा शिक्षण पद्धती मध्ये निपुण

9058916663

प्रयास से सफलता तक

धनंजय हाऊसिंग सोसायटी, सिद्धिल हॉस्पिटलच्या दक्षिणेस, आस्था हॉस्पिटलजवळ, सांगली

Contact : 70 5805 1845, 70 5804 1845, 75 8862 6981



प्रा.डॉ. नागोराव आवडे

(एम.कॉम.एम.फील.,पीएच.डी.)

सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग,

ग्रामिण महाविद्यालय, वसंतनगर, मुखेड जि. नांदेड

तथा पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक व

अभ्यासमंडळ सदस्य, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र शाखा

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

भ्रमणध्वनी : 9405382461 Email : nhawade@gmail.com



सौ. मीना नागोराव आवडे



डॉ. अवंतिका नागोराव आवडे

B.A.M.S.



इंजि. अनिरूध्द नागोराव आवडे

M.Tech (VLSI Design)

Sr. Design Engineer

Synopsys INC NOIDA (U.P.)

Mob.: 9405382461 Email : nhawade@gmail.com

Chi. Suraj Rajendra Jadhav (BE-Mech.) Director

Kumari Snehal Rajendra Jadhav

BA(Economics), MBA(International Business)

Director



OXIAIR GASES (I)PVT.LTD.

BHAMBOLI (CHAKAN MIDC)

MOB.: 9011908055/9922990102

(REFILLING O2, CO2, AR, ACM AND ALL TYPES OF MIXTURE GASES AVAILABLE)

Res.Add. : Rohan Gurima Society Building, Shivaji Housing Society, Behind Senapati Bapat Road, Pune.



YOGESH JADHAV

Tax & Legal Consultant

+91 97303 08504

Income Tax I Goods & Service Tax

Business Services I Legal Services

Office01, Aai Building, Opp.Bhide Hospital, Senadatta Peth, Pune-411030

www.yogeshjadhav.org

yogeshca.jadhav@gmail.com

मी डॉक्टर होणार!

डॉ. सुखदेव कुंभार (एम.डी. होमिओपॅथी)

– विष्णू परब



प्रतिकूल परिस्थिती माणसाला घडवते असं म्हणतात. परिस्थितीशी लढत अनेक माणसं मोठी होताना आपण पाहात आलोत. अशीच महाराष्ट्राच्या कोल्हापूर जिल्ह्यातील एका छोट्या खेड्यात जन्म घेतलेली एक व्यक्ति आज कॅन्सर, टी.बी., मधुमेह, सोरायसीसपासून ते आताच्या कोरोना महामारी असे अनेक असाध्य आजार असलेल्या रुग्णांवर औषधोपचार करीत त्यांचे कष्टमय जीवन सुसह्य करीत आहे. दहावीत असताना सहज म्हणून सरांनी वर्गात उभे करुन त्याला विचारलं, ''तू पुढे कोण होणार?'' मागचा पुढचा विचार न करता तो त्यांना लगेच सांगून टाकतो. ''सर, मी डॉक्टर होणार.'' आणि पुढे तो परिस्थितीची सगळी आवाहने झेलत एक अभ्यासू व यशस्वी डॉक्टर होतो.

प्रथम काही काळ आजरा व नंतर आरोंद्यासारख्या महाराष्ट्राच्या वेशीवरील दुर्गम भागात रुग्णसेवा करण्यासाठी येतो व तिथेच स्थायिक होतो. शहरात जाऊन दवाखाना टाकला असता तर पैसा व लौकिक पायाशी लोळलं असतं. पण याच्या मनात ग्रामीण माणसांच्या आरोग्याची काळजी होती.

'सुखदेव' हे आईवडिलांनी ठेवलेलं नावं तो सार्थ करतो. रुग्णांना उत्तम आरोग्याचं सुख वाटत 'आरोग्य सुखाचा देव' म्हणून सिंधुदुर्ग–गोवा पंचक्रोशीत स्वत:चं स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण करतो. त्याची ही संघर्ष कहाणी त्यांच्याच शब्दात मांडत आहेत आमचे 'साहित्य मैफल'चे सहसंपादक **– विष्णू परब.**

प्रश्न : डॉक्टर, तुमची थोडी वैयक्तिक माहिती वाचकांना कळू दे. म्हणजे तुमचा जन्म, तुमचे शालेय शिक्षण, तुमचे गाव वगैरे?

उत्तर : माझा जन्म ६ ऑगस्ट १९६६ रोजी कोतोली, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथे झाला. बालपणातला सगळा काळ इथेच गेला. दारिद्र्य तर पाचवीलाच पुजले होते. घरी कमावते हात नव्हते तेव्हा घरची परिस्थिती यथातथाच. गावात फक्त प्राथमिक शिक्षणाची सुविधा होती. गावच्या देवळातच शाळा भरत असे. माझे पहिली ते सहावीपर्यंतचे शिक्षण 'विद्यामंदिर, कोतोली' येथे झाले. मी ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले तेथे शाळेची इमारत अशी नव्हती. आमच्या गावचे 'श्रीइंजाई मंदिर' हीच आमची शाळा.

आता थोडक्यात माझ्या या कोतोली गावाविषयी सांगायचे झाले तर, शाहुवाडी हा तालुका दुर्गम व डोंगराळ म्हणून गणला जातो. त्यावेळी कुठलीही वाहतुकीची साधने नव्हती. कालापरत्वे आता खूपच सुधारणा झाल्या आहेत. माझे हे गाव डोंगरदरीच्या कुशीत व वारणा नदीच्या काठावर वसलेलं. आम्ही वारणा नदीला 'वारणामाई' असे म्हणायचो. ही वारणा नदी म्हणजे कोल्हापूर व सांगली जिल्ह्याची हद्दच होती. तिच्या काठावर वसलेले २ ते ३ हजार लोकवस्तीचे कोतोली हे गाव. गावामध्ये उच्चशिक्षित अशी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच लोकं होती.

माझे सहावी इयत्तेपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी मला कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली येथील 'श्री यशवंत माध्यमिक विद्यालय' या ठिकाणी जावे लागले. कोकरुड हे अंतर माझ्या गावापासून पाच कि.मी. लांब होते. वाहतुकीची गैरसोय व जी सोय होती ती खिशाला न परवडणारी होती. तेव्हा दररोज अनवाणी पायपीट करावी लागे. पण आई–वडिलांची मी शिकावं अशी तीव्र इच्छा व माझी स्वत:ची शिकण्याची दुर्दम्य आस यामुळे हे अंतर कधी जाणवलं नाही. कोकरुड येथील श्री यशवंत माध्यमिक विद्यालयात, माझे सातवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. इयत्ता दहावीत असताना माझे सर जी.एस. पोतदार यांनी मला वर्गात उभे करुन विचारले, ''कुंभार तू पुढे कोण होणार?'' मी मागचापुढचा विचार न करता त्यांना लगेच सांगून टाकले, ''मी डॉक्टर होणार!'' त्यावेळी डॉक्टर होण्यासाठी पात्रता काय असते, मेडीकलमध्ये ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी असं काही असतं हेही माहित नव्हतं. वर्गातील एक हुशार विद्यार्थी बोलला म्हणून मीही सांगून टाकलं. कालांतराने मी डॉक्टर झालो.

प्रश्न : तुम्ही या वैद्यकिय व्यवसायात आलात, त्याला काही कौटुंबिक पार्श्वभूमी?

उत्तर : तसं म्हणाल तर माझे वडील मारुती कुंडलीक कुंभार हे अल्पशिक्षित तर आई सौ. लक्ष्मीबाई ही अशिक्षित. माझ्या वडिलांची तीव्र इच्छा होती की, आपला मुलगा डॉक्टर व्हावा. पण माझ्या काकांकडून आमच्या घराला वैद्यकीय वारसा होता. माझे चुलत बंधु बाबासाहेब ईश्वर कुंभार हे लेप्रसी टेक्निशियन (पी.एच.सी.) होते व दुसरे चुलत बंधु डॉ. अर्जुन ईश्वर कुंभार हे बी.ए.एम.एस. झाले होते.

वडिलांचे स्वप्नं साकार करण्यासाठी मी ठामपणे निर्णय घेतला, की मी वैद्यकीय शिक्षण घेणार.

प्रश्न : पुढील वैद्यकिय शिक्षण तुम्ही कुठून पूर्ण केले? काही अडचणी...

उत्तर : माझे दोन चुलतबंधु, यांच्या मार्गदर्शनाखाली बेळगांव येथील 'ए. एम. शेख होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज' येथे वैद्यकिय शिक्षणासाठी प्रवेश घेतला व माझी जणू अग्निपरीक्षाच सुरु झाली.

इथे सर्व काही मला नवीन होते. भाषा वेगळी, हायस्कूलमधून डायरेक्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश. कॉलेजमधील हायफाय इंग्लीश मला समजायचे नाही. माझी भंबेरी उडायची. सर्व काही डोक्यावरुन जात होते. मनात चलबिचल सुरु होती. हे आपल्याला जमेल की नाही? अशावेळी वडिलांचा चेहरा समोर यायचा. त्यांची परिस्थिती नसतानाही त्यांनी आपल्याला या

कॉलेजमध्ये घातले आहे याचे स्मरण व्हायचे. मनाची शक्ती एकत्र करुन त्यावेळी निश्चय केला व वयाच्या विसाव्या वर्षी होमिओपॅथीमधील एल.सी.सी.एच. ही पदवी प्राप्त केली. जून १९८६ साली बेळगांव सोडलं. त्यानंतर एक वर्ष कोल्हापूर येथील मेरी वालनेस हॉस्पिटल येथे इन्टर्नशीप पूर्ण केली.

प्रश्न : आपल्याला पुढे नोकरी करावीशी नाही वाटली का?

उत्तर : नोकरी करावी असं सुरुवातीला वाटायचं पण शिक्षण घेतल्यानंतर तो विचार मनातून काढून टाकला. व्यवसायच करायचा तोही ग्रामीण भागात आणि तोही जनसेवेच मनातील उद्दिष्ट ढळू न देता.

प्रश्न : आपण वैद्यकिय सेवेला कुठुन सुरुवात केली?

उत्तर : सन १९८७ साली होण्याळी, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथे दवाखाना सुरु केला. होण्याळी हे गाव अतिशय दुर्गम असल्यामुळे मला अनेक अडचणींना सामना करावा लागत होता. अशा ठिकाणी जवळजवळ ३ वर्षे ॲलोपॅथी पद्धतीने रुग्णसेवा सुरु केली. पण मन रमेना. पूर्वीपासून माझे चुलत बंधु डॉ. अर्जुन जे कणकवली तालुक्यात वैद्यकीय व्यवसाय करत होते. त्यांनी मला सावंतवाडी तालुक्यातील 'आरोंदा' हे गाव सुचवले. मीही ठरवले आपण एक पाऊल पुढे जाऊया व त्याप्रमाणे मी फेब्रुवारी १९९० साली आरोंद्यात पोहोचलो.

'श्री क्लिनिक व नर्सिंग होम' या नावाने आरोंद्यात क्लिनिक सुरु केले. पूर्णपणे अपरिचित असलेल्या गावामध्ये सुरुवातीला ॲलोपॅथी पद्धतीने सेवा चालू केली. अर्थात नव्याने व अपरिचित ठिकाणी तुम्ही कुठलाही व्यवसाय सुरु केलात की अडचणी या येणारच. मलाही सुरुवातीला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. पण प्रयत्न सोडायचा नाही हे मनाशी पक्कं ठरवल्यामुळे फारसं काही वाटलं नाही. प्रमुख अडचण होती ती भाषेची, इथल्या हवामानाची. इथले हवामान दमट असल्यामुळे थोडा त्रास झाला. पण हळूहळू सवय झाली. आरोंदा येथील लोकांचे सहकार्य खूप चांगले मिळाले. इथे येऊन स्थिरस्थावर व्हायला ३-४ वर्षांचा कालावधी गेला. १९९५ साली मी इथे ६ बेडचे छोटेखानी हॉस्पिटल सुरु केले. ३ बेड महिलांसाठी व ३ बेड पुरुषांसाठी. बाळंतपणही व्हायचीत. परंतु प्रशिक्षित परिचारीका व कर्मचाऱ्यांची वानवा यामुळे रुग्णांची गैरसोय होऊ लागली. म्हणून मग नाईलाजास्तव ते बंद केलं. वाईट वाटलं पण माझ्याही मर्यादा होत्या.

प्रश्न : ॲलोपॅथीमध्ये खुप पैसा असताना व तुम्ही सुरुवातीला तशी प्रॅक्टीस करत असतानाही होमिओपॅथीकडे कसे काय वळलात?

उत्तर : कारण, तशीच घटना घडली. माझे वडील किडनीच्या विकाराने आजारी पडले. हात-पाय सुजायला लागले. किडनीतज्ञ डॉक्टरांचा सल्ला व उपचार सुरु केले. परंतु काही फरक पडत नव्हता म्हणून मी आमच्या बेळगाव येथील ए.एम. शेख होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचे प्रोफेसर डॉ. मल्लीकार्जुन राव यांच्याकडे त्यांना घेऊन गेलो व त्यांची होमिओपॅथीक उपचार पद्धती सुरु केली. त्यांच्या या होमिओपॅथीक उपचाराने माझे वडील पूर्णपणे बरे झाले. हा माझ्या आयुष्यातील होमिओपॅथीकडे वळण्याचा पहिला टर्निंग पॉईंट होता.

दुसरा टर्निंग पॉईंट होता तो म्हणजे, मला स्वत:ला उजव्या हातामध्ये नर्व्ह पेन (शिरा दुखणे) होत होत्या. त्यासाठी चार ते पाच न्यूरोफिजिशियनना भेटलो. पुणे येथे जाऊन एमआरआय, सीटी स्कॅन केले. हुबळी येथे नर्व्ह फन्क्शनिंग टेस्ट केली. परंतु कोणत्याच उपचाराने फरक पडत नव्हता. मी रात्र रात्र उठून बसायचो. झोपलो की वेदना सुरु व्हायच्यात. अशातच ५ ते ६ वर्षांचा कालावधी लोटला. काही मार्ग सुचेना. अशात माझे मित्र डॉ. बी.एम. पाटील यांच्या सहाय्याने होमिओपॅथीक उपचार सुरु केले व अवघ्या १५ ते २० दिवसांच्या कालावधीत माझ्या हातातील वेदना पूर्ण बऱ्या झाल्या. तसेच लम्बर स्पॉन्डीलायसीसमुळे सायटिका हा त्रासही सुरु झाला. तो देखील होमिओपॅथीच्या औषधांनी बरा झाला. या दोन घटनांनी माझ्या मनात होमिओपॅथी उपचार पद्धतीबद्दल दृढ विश्वास निर्माण केला. त्याचवेळी निश्चित केले, की आपण शुद्ध होमिओपॅथीक उपचार पद्धत सुरु करु व येथील लोकांनाही याच औषधोपचाराने पूर्ण बरे करु. तसा संकल्पच सोडला.

प्रश्न : परंतु याकरीता आपण अजून शिक्षण घेणे आवश्यक होतं ते कसं केलंत?

उत्तर : तुमचं म्हणणं बरोबर आहे. शास्त्रशुद्ध शिक्षणाची आवश्यकता आहेच म्हणून त्यासाठी वयाच्या ४३ व्या वर्षी खारघर, नवी मुंबई येथील डॉ.जी.डी. पोळ फौन्डेशन, येरळा मेडिकल ट्रस्ट होमिओपॅथी मेडिकल कॉलेजमध्ये एम.डी. (मास्टर्स डीग्रीसाठी) प्रवेश घेतला. होमिओपॅथीमधील एम.डी. पदवी घेण्यासाठी प्रवेश परीक्षा दिली व त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात चौदाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो. २०११ साली होमिओपॅथीमधील एम.डी. ही पदवी प्राप्त केली. मला याचा खूप आनंद झाला. स्वत:वरचा विश्वास अधिक मजबूत झाला. आता आपण अधिक जोमाने व यशस्वीपणे उपचार करु शकतो याची खात्री झाली.

प्रश्न : २०११ सालापासून तुम्ही पुर्णपणे होमिओपॅथी उपचार पद्धती सुरु केलीत. काय अनुभव आहे?

उत्तर : २०११ साली पदवी हातात आल्यानंतर मागे वळून पाहिले नाही. सर्व रुग्णांवर शुद्ध होमिओपॅथीक उपचार करायला सुरुवात केली. पूर्ण ज्ञान, अनुभव व आत्मविश्वास यांच्या जोरावर जसजसे उपचार करत गेलो तसतसे पेशंटचे असाध्य आजार सहज बरे होत गेले. अशाने होमिओपॅथीवरील माझा व रुग्णांचाही विश्वास वाढत गेला.

प्रश्न : रुग्ण होमिओपॅथीला कसा प्रतिसाद देऊ लागले?

उत्तर : ॲलोपॅथीने वा अन्य उपचार पद्धतीने कित्येक वर्षं बरे न झालेले आजार जसजसे बरे होऊ लागले तसतशी त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. दूरवर तोंडोतोंडी याचा प्रसार झाला आणि मग होमिओपॅथीक उपचारासाठी दूरदूरहून रुग्ण आरोंदा या गावी यायला लागले. त्यामध्ये प्रामुख्याने गोवा येथील रुग्णसंख्या वाढायला लागली. गोवा विधान सभेतील काही मंत्रीही आरोंद्याला उपचाराला यायला लागले. या रुग्णांमध्ये सर्व प्रकारचे रुग्ण होते, तर प्रामुख्याने त्वचा आजाराने त्रस्त रुग्ण भरपूर वाढले. त्यामध्ये आजपर्यंत सोरायसीस या असाध्य आजाराने जवळजवळ ५०० ते ६०० रुग्ण आपण या होमिओपॅथीक उपचाराने बरे केले आहेत.

त्याचबरोबर किडनी फेल्यूअर, संधिवात, डायबेटीज असे कितीतरी विविध प्रकारचे आजार असलेले रुग्ण होमिओपॅथीक उपचाराने बरे झाले आहेत. होत आहेत.

प्रश्न : होमिओपॅथी कोरोनासारख्या जलद संसर्ग होणाऱ्या आजारावर किती प्रभावशाली आहे?

उत्तर : आज कोरोना या महामारीने जगात थैमान घातले आहे. तसे भारतातही आहे. रुग्णांच्या मृत्युचे प्रमाण कमी होत नाही अशावेळी होमिओपॅथीक उपचार या आजारावर प्रभावीपणे काम करतात असे निदर्शनास आले. त्यादृष्टीने आम्ही आजवर जवळजवळ २००–२५० कोरोना रुग्णांवर उपचार केले व ते सर्व बरे झाले. त्यामध्ये काही सौम्य स्वरुपाचे, काही न्यूमोनियाचे तर काही अति गंभीर होते. कोविड न्यूमोनियाचे माझ्याकडे सात रुग्ण होते. त्यातले पाच रुग्ण ६० ते ६५ या वयोगटातील होते. तर दोन रुग्ण २० व ४० वयाचे होते. त्यांची सगळी माहिती घेऊन उपचार सुरु केले. शुद्ध होमिओपॅथीक उपचाराने फक्त आठ दिवसांत घरी राहूनच ते सगळे बरे झालेत. आजपर्यंत उपचार केलेल्या २५०हून अधिक रुग्णांपैकी एकही रुग्ण दगावलेला नाही. अशाप्रकारे होमिओपॅथीक उपचाराचा कोरोना या महामारीवर खूप प्रभावी उपचार दिसून आला. अर्थात याला रुग्णाच्या भक्कम मनोधैर्याची व विश्वासाची साथ देखील तितकीच आवश्यक असते.

प्रश्न : आरोंद्यात जर रुग्ण अधिक प्रमाणात येत होते तर तुम्हाला गोव्यात क्लिनिक का सुरु करावेसे वाटले?

उत्तर : गोव्यातून रुग्णांचा ओघ वाढू लागला. त्यांना आरोंद्यात येण्यासाठी होणारा खर्च, वेळेचा अपव्यय व त्रास कमी कसा करता येईल याचा विचार करता गोव्यातील पर्वरी येथे आठवड्यातून एकदा तरी आपण जायला हवे असे वाटले. मग निर्णय घेतला व २०१२ साली मी पर्वरा येथे दुसरे होमिओपॅथीक क्लिनिक सुरु केले. गोवा, पर्वरी येथे दर शुक्रवारी क्लिनिक चालू असते.

प्रश्न : आरोंदा येथील लोकांचा कसा प्रतिसाद मिळाला?

उत्तर : आरोंदा हे गावही छोटेखानीच आहे. सहा ते सात हजार लोकवस्तीचे हे गाव. गोवा महाराष्ट्राच्या वेशीवर व तेरेखोल नदीच्या तीरावर वसलेले हे गाव. आरोंद्यामध्ये स्थायिक होण्याचा माझा निर्णय चुकला नाही. आरोंदेकरांनी मला खूप सहकार्य केलं, समजूनही घेतलं. आपलसं केलं. आज आरोंदा येथे स्थायिक होऊन ३० वर्षांचा कालावधी लोटला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून मी आलेला. माझ्या व कोकणातील बोलीभाषेत खूप फरक. पण लोकांच्या सहकार्यामुळे मी मालवणी भाषा आत्मसात केली आणि बघत बघता मी कधी मालवणी झालो ते कळलेच नाही. गोव्याच्या लोकांमुळे कोकणी भाषा कधी शिकलो हे देखील मला समजले नाही. कालाय तस्मै नम:

प्रश्न : तुम्ही स्वत: जाता का हल्ली फ्रॅन्चाइस पद्धतीने उपचार करता?

उत्तर : नाही, मी कुणाला फ्रॅन्चाइसी दिलेली नाही. माझा आरोग्य क्षेत्रात तरी या पद्धतीवर विश्वास नाही. किंबहुना हे चक्रच आहे. कारण रुग्ण तुमच्यावर विश्वास ठेवून जगत असतो. तुमच्या नावावर त्याला दुसऱ्याने तपासलेलं कसं चालेल? अशाने रुग्णाचे मानसिक बळ आपण नकळतपणे कमी करत असतो. मी व माझी पत्नी सौ. हेमलता असे दोघेही गोवा, पर्वरी येथे दर शुक्रवारी जात असतो. बाकीचे पाच दिवस आरोंदा इथे. सर्व रुग्ण अपॉईंटमेंट घेऊनच येतात.

प्रश्न : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण येतात का केवळ सिंधुदुर्ग व गोव्यातूनच?

उत्तर : माझी होमिओपॅथीक उपचार करण्याची सुरुवात जरी आरोंदा येथून झाली असली तरी आज तोंडातोंडी खूप प्रचार झाल्यामुळे माझे रुग्ण खूप दूरदूरहून म्हणजे मुंबई, पुणे, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, बेळगांव येथून होमिओपॅथीक उपचारासाठी येत असतात. यातील काही रुग्ण माझ्याशी फोनवर संवाद साधतात. काहीजण लेखी स्वरुपात आपल्या भावना व्यक्त करतात व त्या वाचून मनाला एक आंतरीक समाधान मिळते. आपण शुद्ध होमिओपॅथीक उपचार करण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचा आनंद मिळतो.

प्रश्न : होमिओपॅथीचं आपल्या देशात एकंदर भवितव्य काय?

उत्तर : 'आपत्ती ही अनेकदा इष्टापती ठरते.' आणि ही इष्टापती म्हणजे 'कोरोना.' एरवी दुर्लक्षित असलेली व मर्यादित प्रमाणात उपयोगात आणली जाणारी होमिओपॅथी कोरोनाच्या संसर्गात रुग्णांना वरदान ठरली आहे. आज सर्व जगाला होमिओपॅथीतील 'अर्सेनिक अल्बम ३०' हे औषध प्राथमिक स्तरावर कोरोना प्रतिबंधक म्हणून लोकांना देण्यात आलेलं आहे व त्याचा सकारात्मक प्रभावही दिसून आला आहे. होमिओपॅथीमध्ये अशी अनेक औषधं आहेत ज्यांचा योग्य मेळ घालून मोठ्या प्रमाणावर कोरोना रुग्ण मुक्त झालेले आहेत. मी जवळजवळ २५०हून अधिक कोरोनारुग्ण बरे केले आहेत. येणाऱ्या पुढील काळात होमिओपॅथीचा प्रभाव निश्चित दिसून येईल. त्यासाठी सर्व होमिओपॅथी डॉक्टरांनी ॲलोपॅथीच्या मागे न लागता होमिओपॅथीचा योग्य अभ्यास करुन व पूर्ण ज्ञान घेऊन जर रुग्णांवर उपचार केले तर या शास्त्राचा प्रभाव सर्व जगाला दिसून येईल. अर्थात, सर्वच पॅथींना स्वत:च्या काही मर्यादा आहे. तशा होमिओपॅथीला देखील आहेत. पण होमिओपॅथीचे भवितव्य खरंच उज्ज्वल आहे. पुढील काळात एक प्रभावी व हमखास औषधोपचार पद्धती म्हणून होमिओपॅथीकडेच पाहिले जाणार आहे हे मात्र निश्चित आहे.

प्रश्न : या क्षेत्रात आपले अन्य योगदान काय?

उत्तर : आज हे क्लिनीक सांभाळत असताना–

१) दुबई येथे २०१७ साली पहिल्या जागतिक आयुष कॉन्फरन्स मध्ये ब्रेन ट्युमर व होमिओपॅथी यावर शोधनिबंध सादर केला. २) जानेवारी २०२० साली 'किरण सेवा संस्था' रेषा मध्यप्रदेशकडून 'डायमंड होमिओ ॲवॉर्ड'ने सन्मानीत. ३) ४२ कोरोनाच्या बरे झालेल्या रुग्णांचा अहवाल सी.सी.आर.एच. या संस्थेला सादर. ४) वेंगुर्ला येथील डॉ. दत्ता पाटील होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज येथे गेली १० वर्षं असिस्टंट प्रोफेसर. ५) 'कुंभश्री' या मासिक व 'अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था' या दोन्ही संस्थांच्यावतीने स्वतंत्रपणे 'कोरोना योद्धा' म्हणूनही सन्मानीत करण्यात आले.

प्रश्न : आपण आपल्या यशाचे श्रेय कोणाला देता?

उत्तर : यश-अपयश व त्यांचे श्रेय हा नंतरचा भाग आहे. आम्ही सगळे होमिओपॅथ प्रथमत: ऋणी आहोत ते डॉ. सॅम्युअल हेन्नमन यांचे. ते होमिओपॅथीचे जनक. त्यांनी होमिओपॅथी उपचार पद्धतीचा शोध लावून या जगाला जगण्याची नवी दिशा दिली आहे. त्यांच्या मूळ तत्त्वांवर आमची वाटचाल सुरु आहे. तसं म्हणाल तर, माझ्या आईवडिलांनी मला होमिओपॅथीक डॉक्टर केले. त्यांचे ऋण मी कधीही फेडू शकणार नाही. जे दोन चुलत बंधु बाबासाहेब कुंभार व डॉ. अर्जुन कुंभार यांचे मार्गदर्शन कधीही विसरणार नाही. आज होमिओपॅथीक क्लिनीक आरोंदा व गोवा येथे चालवत असताना, मला माझ्या पत्नीची साथ अवर्णनीय अशीच आहे. माझा संसार सांभाळत माझा दवाखाना, येणारे रुग्ण यांची देखील उठबस ती न कंटाळता करते. रुग्णांचे केस पेपर काढणं, औषधं तयार करणं, ती कशी घ्यायची, काय पथ्य पाळायची हे पेशंटना समजावून सांगणं ही सर्व कामे ती न थकता करत असते. माझे यशाचे श्रेय या सगळ्यांना नक्की आहे.

प्रश्न : थोडंस कौटुंबिक...?

उत्तर : अशोक व गणेश हे माझे दोन बंधु. ते आपापल्या व्यवसायात आनंदात आहेत. माझी पत्नी सौ. हेमलता तसेच माझा मोठा मुलगा स्वप्निल व सुनबाई सौ. नेहा व धाकटा मुलगा डॉ. शुभम यांची भक्कम साथ आहे. डॉ. शुभम हा एम.डी. होमिओपॅथ आहे, माझे मेहुणे डॉ. मानसिंग राजे हे देखील एम.डी., होमिओपॅथ आहेत. आमची भाची कु. सलोनी प्रशांत राजे, सातारा ही बी.एच.एम.एस.च्या शेवटच्या वर्षांत शिकत आहे. माझा चुलत बंधू डॉ. भरत हाही बी.एच.एम.एस. झाला आहे.

प्रश्न : आतापर्यंत कुठल्याप्रकारचे आजार असलेले रुग्ण आपण बरे केलेत? थोडसं संख्यात्मक...

उत्तर : आजपर्यंतच्या प्रवासात होमिओपॅथीक उपचाराने-

१) सोरायसिस - ५०० ते ६००, २) किडनी फेल्युअर - २५ ते ३०, ३) कॅन्सर - २० ते २५, ४) कोरोना - १५० ते २५०, ५) संधीवात - १०० ते १५०, ६) गँगरीन - ८० ते ९०. असे असाध्य आजार होमिओपॅथी उपचाराने बरे केले आहेत. असे रुग्ण बरे झाले, की खूप आत्मिक समाधान मिळते.

प्रश्न : आपल्या निर्णयाबद्दल आपण समाधानी आहात का? क्षेत्रात येणाऱ्या नवोदितांना काय सांगाल?

उत्तर : यशाचा हा चढता आलेख पाहिला की, मी घेतलेला हा निर्णय किती सार्थ होता याचा मला अभिमान वाटतो. मला कसलीही खंत नाही उलट आनंद व समाधान आहे. या क्षेत्रात प्रवेश करु इच्छिणाऱ्या नवोदितांना मी सांगू इच्छितो की, कोणत्याही कामात स्वत:ला झोकून देऊन काम केले की त्याची फलप्राप्ती निश्चित होते यावर माझा दृढविश्वास आहे. यासाठी प्रथमत: स्वत:वर विश्वास ठेवा. सकारात्मक विचार करा. जिद्द बाळगा. यश दूर नाही.

प्रश्न : वाचकांच्या माहितीसाठी काही उदाहरणं, प्रसंग सांगता येतील का?

उत्तर : हो, अशी उदाहरणं व प्रसंग खूप आहेत. वानगीदाखल काही सांगतो. माझ्या कोरोना उपचाराच्या पहिल्या यशाची माहिती आधी सांगतो.

१) लॉकडाऊन सुरु झाला. कोरोनाचा कहर वाढत होता. खात्रीशीर योग्य औषधं नव्हती. कुठल्याच पॅथीत नव्हती. अशावेळी मुंबईतून माझ्या एका मित्राचा फोन आला. डॉक्टर, माझी वहिनी कोरोनात गेली. धाकटा भाऊ व पुतण्या पॉझिटिव्ह झाला आहे. काहीतरी करा. माझ्यासाठी कोरोना रुग्णाचा तो पहिलाच अनुभव होता. मी आव्हान स्विकारलं. माझ्यावर त्यांचा दांडगा विश्वास असल्याने त्यांनी मला उपचारासाठी पूर्ण मोकळीक दिली. दोघांना क्वारंटाईन सेंटरला हलवलं तत्पूर्वी औषधं सुरु केली. सकाळ संध्याकाळ दोघांशी सतत चर्चा करुन गरजेप्रमाणे औषधांमध्ये बदल करत रहायचो. पाचव्या दिवशी क्वारंटाईन सेंटरच्या डॉक्टरांना विनंती करुन पुन्हा टेस्ट करायला लावली. दुसऱ्या दिवशी रिपोर्ट निगेटिव्ह आला. मला जग जिंकल्याचा आनंद झाला. माझ्या इतक्या वर्षांच्या अभ्यासाची व अनुभवाची ती सत्त्वपरीक्षा होती. मग सुर सापडला. आज कितीतरी कोरोना रुग्ण बरे केलेत. आता सराव झाला.

२) एक १० वर्षांची मुलगी मुंबईहून उपचारासाठी आरोंदा या गावी माझ्याकडे येत होती. तिला शाळेमध्ये किंवा कधीही अचानक फिट यायची व बेशुद्ध होऊन एक तासाने शुद्धीवर यायची. मुंबई येथील सर्व नामांकित न्यूरोफिजिशियन, न्यूरोसर्जनना दाखवून झाले. काही गुण येईना. ऑपरेशन हाच शेवटचा पर्याय सांगितला गेला. त्या मुलीच्या मेंदूमध्ये ठराविक भागाला रक्त पुरवठा करणारी रक्तवाहिनी ब्लॉक होऊन रक्तपुरवठा होत नव्हता. त्या मुलीचा सर्व अभ्यास करुन तिच्यावर होमिओपॅथी औषधोपचार सुरु केले. आश्चर्यकारक फरक दिसू लागला. ती अवघ्या सहा महिन्यांत बरी झाली. नंतर मेंदुचा एम.आर.आय. ९८ काढला त्यावेळी रक्तपुरवठा परत सुरळीत झाल्याचे निदर्शनास आले.

३) गोवा, बिचोली येथून एक स्त्री मूल होत नाही (वंध्यत्व) यासाठी आली होती. तिचा रिपोर्ट बघितल्यावर असे लक्षात आले की तिच्या गर्भाशयाच्या दोन्ही ट्युब (फॉलोपियन ट्यूब) ब्लॉक झाल्या होत्या. स्त्रीरोग तज्ञ डॉक्टरांनी ऑपरेशन करा

वे लागेल व ऑपरेशननंतरही मुल होण्याची खात्री नाही असे सांगितले होते. होमिओपॅथीमधील काही औषधांचा अभ्यास करुन औषध दिलं. आश्चर्य म्हणजे तिचं वंध्यत्व संपलं. उपचार सुरु झाल्यापासून तिसऱ्या महिन्यातच ती गरोदर राहिली.

४) गोव्याहून फोन आला. एक २० वर्षांचा रुग्ण कोरोनाबाधित. गंभीर अवस्था. त्याची ऑक्सिजनची पातळी ७०-८० होती. आय सी यू मध्ये जागा नव्हती म्हणून जनरल वॉर्डमध्ये ठेवले. त्याची सगळी माहिती घेऊन त्याला होमिओपॅथीमधील एक औषध दर ३ तासाला ४ डोस दिले. सायंकाळी ६ वाजता त्याची ऑक्सिजनची पातळी ९५-९७ झाली व रुग्ण घरी कधी जायचे विचारु लागला. असे चकीत करणारे अनुभव येतात.

असे खूप अनुभव आहेत. पण इथे थांबतो. मित्रांनो, रोज पौष्टिक आहार घ्या, प्राणायाम करा, वाफ घ्या, योगा करा. मास्क लावा, हात स्वच्छ धुवा. अंतर पाळा आणि कोरोना टाळा.

डॉ. सुखदेव कुंभार, भ्रमणध्वनी : 94224 34191/99237 52607

***

थकलेले शरीर अन् दृष्टी यावर डॉ. सुधाकर संभाजीराव तहाडे यांचे भरीव कार्य





ज्याप्रमाणे देशाचे सैनिक हे आपल्या देशाचे रक्षण करतात त्याचप्रमाणे डॉक्टर हे आपल्या आरोग्याचे रक्षण करतात. म्हणून आपल्या समाजात डॉक्टरांना आदराने पाहिले जाते आणि त्यांना विशेष स्थान देखील आहे. डॉक्टरांना सर्वांत जास्त उच्च दर्जा दिला जातो, असे म्हटले जाते की देव आणि डॉक्टर हे दोघे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु आजच्या व्यावसायिक युगात डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात व्यावहारिक नाते निर्माण होऊ लागले आहेत.

डॉ. सुधाकर संभाजीराव तहाडे हे नेत्रतज्ञ असून वैद्यकीय अधिकारी पदावर उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि. नांदेड येथे मागील सात वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांचे नि:स्वार्थ कार्य पाहता वरील प्रस्तावनेतील डॉक्टर प्रतीकृती समोर उभी राहते. डोळ्याचे रुग्ण म्हटले की, बहुसंख्य रुग्ण हे वयोवृद्ध असतात. अधिक शरीर थकलेले त्यात दृष्टी पण क्षीण झालेली, बहुसंख्य वृद्ध हे दुर्लक्षित असतात. अशा रुग्णांची आस्थेवाईकपणे तपासणी करणे, त्यांना गरजेनुसार उपचार देणे, नेत्रशस्त्रक्रिया करणे अशी कामे डॉ. तहाडे करीत असतात. नेत्रशस्त्रक्रियेमध्ये नांदेड जिल्ह्यात मुखेड उपजिल्हा रुग्णालयाचे काम अग्रस्थांनी असल्याचे पूर्णपणे डॉक्टरांना जाते. मुखेड सारख्या डोंगराळ, दुष्काळ भागात वर्षाकाठी येथे ५०० ते ६०० नेत्रशस्त्रक्रिया होतात. ही एक प्रकारे या भागातील लोकांसाठी पर्वणीच आहे. गरीबीमुळे दुर्लक्षितपणामुळे नांदेड सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी पोहोचू न शकणाऱ्या रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय नेत्रविभाग हा मागील सात वर्षापासून अतिशय उपयुक्त ठरत आहे. या डॉ. तहाडे यांच्या कार्याचे तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक भोसीकर सर यांनी वेळोवेळी कौतुक केले आहे व उत्तरोत्तर कार्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. मा. जिल्हाधिकारी साहेबांनी नेत्रशस्त्रक्रियेतील उल्लेखनीय कामाबद्दल त्यांचे सन्मानपत्र देऊन अभिनंदन केले आहे. मागील दीड वर्षापासून कोरोना नावाची महामारी आपल्या देशात चालू आहे. नेत्रशस्त्रक्रियेचे काम या कोरोना काळात प्रभावित झाले आहे. तरीही २०२०-२१ या काळात १८१ नेत्रशस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालयात पार पाडल्या आहेत तर पुढील लॉकडाऊन नंतरही नेत्रशस्त्रक्रिया सुरु ठेवण्याचा त्यांचा मानस त्यांनी आमच्या प्रतिनिधीजवळ बोलून दाखवला.

शासकीय यंत्रणेमध्ये चांगले काम करणे तसे जिकरीचे असते. कधी एखादी वस्तु उपलब्ध असते तर इतर काही वस्तुंचा तुटवडा असतो. विविध प्रवृत्तींचे कर्मचारी अशा प्रतिकुल परिस्थितीतही सहकारी कर्मचारी/अधिकारी/नर्स यांना सोबत घेऊन उपलब्ध असलेल्या साहित्याचे शस्त्रक्रिया कराव्या लागतात. हा संकल्प डॉ. तहाडे व त्यांचे सहकारी सहजरित्या पार पाडताना उपजिल्हा रुग्णालयात दिसतात. त्या विषयी त्यांना विचारले असता ते याचे श्रेय मा. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकनठ भोसीकर सर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संतोष शिरसीकर सर, जिल्हा अंधत्व नियंत्रण कार्यक्रम अधिकारी डॉ. तडवी मॅडम, जिल्ह्यातील नेत्रचिकित्सा अधिकारी, सहकारी परिचारिका यांना देतात. अंधत्व नियंत्रण अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले उपजिल्हा रुग्णालय, मुखेड येथील कार्य कौतुकास्पद आहे.

***

नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान : सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ.आर. ए. भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस 'दृष्टिदान दिन' म्हणून साजरा केला जातो. मृत्यूनंतर नेत्रदान करावे, याच्या प्रसारासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावत आहेत. आज २१ व्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेले आहे, की एका व्यक्तीचे डोळे आणि पर्यायाने त्याची दृष्टी घेऊन ते दुसऱ्याला म्हणजे ज्या व्यक्तीला दृष्टी नाही, अशा व्यक्तीला सहज देता येतात. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मानण्यात आले आहे, शिवाय नेत्रदान हे मृत्यूनंतर करायचे असल्याने कसलीच भिती नाही. नेत्रदानासाठी व्यक्तीच्या मृत्यूनंतर दोन तासांच्या आत डोळे काढले पाहिजेत.



आमचे प्रेरणास्थान



अशोक धोंडीराम कुंभार
Mo. : 9890368125

Corp. Office
Plot No. 49, Near Aditya Nagari,
Bombay Restaurant Chowk,
Satara 415 003
shreekumbharenterprises@gmail.com
www.shreekumbharenterprise.com

SKE
Shree Kumbhar Enterprises



श्री कुंभार एंटरप्रायजेस

इले. व मेक. वजन काटे, मापे, मिल्क ॲनालायझर, फॅट मशिन
इ. चे अधिकृत विक्रेते



MILK ANALYSER

शासनमान्य
वजन काटावाले

विक्री पश्चात
सेवेची हमी









१५५, कुंभारवाडा, केसरकर पेठ, नगरपालिकेजवळ, सातारा.

संचालक



सचिन अ. कुंभार
Mo. + 91 9890169492
9970049494
Shop. 02162-233492

महिलांसाठी वरदान : श्रीवंदन हॉस्पिटल



डॉ. उज्वला राजे डॉ. राहुल राजे



स्त्रियांच्या विविध शस्त्रक्रिया, वंध्यत्व निवारण, तसेच बिनटाक्याच्या शस्त्रक्रियांसाठी आता पुणे मुंबईला जाण्याची गरज नाही. कारण सातारा, कराड, कडेगाव परिसरातील महिलांसाठी डॉ. राहुल राजे यांचे कराड येथील 'श्रीवंदन हॉस्पिटल' महिलांसाठी वरदान ठरत आहे. उच्च विभूषित व तज्ञ डॉक्टर, माफक दर, सुसज्ज ऑपरेशन थेटर व आपलेपणानं काळजी घेणारा अनुभवी स्टाफ, अत्याधुनिक यंत्रणा यामुळे अल्पावधीतच श्रीवंदन हॉस्पिटल महिलांच्या सर्व समस्यांसाठी वरदान ठरत आहे.

काले गावातील कै. बाबुराव कृष्णाजी कुंभार (आप्पा) यांचे नातू डॉ. राहुल राजे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदव्युत्तर शिक्षण धारण केले आहे. त्यांनी एमबीबीएस, डीजीओ, डीएनबी व लॅप्रोस्कोपी व इनफर्टिलिटी यांत सुपर स्पेशलायझेशन केले आहे.

दीड वर्षापूर्वी त्यांनी कराड येथे ओंकार अपार्टमेंट, गौरव सर्जिकल समोर, मंगळवार पेठ, कराड येथे (Mo. 8329343161, 7038363601) सर्व सुविधांनी सुसज्ज असे 'श्रीवंदन हॉस्पिटल' सुरू केले. महिलांच्या सर्व प्रकारच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, वंध्यत्व तपासणी, उपचार, नॉर्मल डिलिव्हरी, सीझर, कुटूंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया तसेच सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत.

ग्रामपंचायत काले यांच्या प्रेरणेतून व दयानंद पाटील भाऊ यांच्या मार्गदर्शनातून काले गावातील माता भगिनींसाठी श्रीवंदन हॉस्पिटल मार्फत व्यंकनाथ महिला आरोग्य योजना २६ जानेवारी रोजी सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत काले गावातील महिलांना सर्व उपचारावर ५० टक्के सवलत मिळणार आहे.

आमचा वैद्यकीय अनुभव –

१) राष्ट्रीय स्कॉलरशीप व मेरिट लिस्ट मानकरी (१०, १२वी)
२) एम.बी.बी.एस. साठी मेरिटवर निवड.
३) FMT विषयाचे विद्यापीठाचे सुवर्ण पदक.
४) D.G.O. कृष्णा वैद्यकीय महाविद्यालय येथून पूर्ण.
५) D.N.B. मिशन हॉस्पिटल मिरज येथून यशस्वीरित्या पूर्ण.
६) फेलोशिप इन लॅपरोस्कोपी : डॉ. नितीन घोरपडे व डॉ. कुल्लोळी यांच्या मार्गदर्शनाखाली. ७) फेलोशिप इन इनफर्टिलिटी : डॉ. नाडकर्णी गुजरात या ठिकाणी पूर्ण. ८) एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांचा शिक्षक व Examiner





✻ दुर्बिणीतून गर्भ पिशवी काढणे (TLH) ✻ गर्भाशयाच्या गाठी काढणे. (Fibroid) ✻ स्त्री बिजांडाच्या गाठी काढणे. (Ovarian cyst.) ✻ गर्भनलिका तपासणे व ब्लॉक काढणे. (Tubal Block) ✻ गर्भ नलिकेतील प्रेग्नंसी (Ectopic) ✻ स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया उलटविणे (Tuboplasty) ✻ वंध्यत्वाची तपासणी व उपचार ✻ संप्रेरकांची तपासणी (Hormonal Study) ✻ शुक्राणुंची तपासणी (Semen Analysis) ✻ सोनोग्राफी व Follicular study ✻ I.U.I. ✻ टेस्ट ट्युब बेबी (IVF) ✻ हिस्टेरोस्कोपी शस्त्रक्रिया ✻ गर्भाशयाचा अंतर्भाग तपासणे (Hysteroscopy) ✻ गर्भाशयातील पॉलिप काढणे (Polyp) ✻ गर्भाशयातील पडदा काढणे (Uterine Septum) ✻ छोटे गर्भाशय मोठे करणे (Metroplasty) ✻ मॅटर्निटी ✻ गरोदर माता तपासणी ✻ नॉर्मल डिलीव्हरी व सीझरची सोय ✻ प्रसुतिपूर्व, प्रसुति पश्चात सेवा उपलब्ध ✻ स्त्रियांचे आरोग्य ✻ पाळीच्या समस्या ✻ कॅन्सर निदान व उपचार ✻ सोनोग्राफी ✻ 3D व 4D ची सोय ✻ स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया ✻ ५०% सवलतीत व (Day-care) उपचार ✻ सुसज्ज ऑपरेशन थिएटर ✻ एकाच छताखाली–वंध्यत्व, लॅपरोस्कोपी, मॅटर्निटी व सोनोग्राफी सुविधा उपलब्ध ✻ अनुभवी स्टाफ ✻ माफक दरात उपचार ✻ २४ तास सेवा ✻ जननी सुरक्षा योजना–नॉर्मल प्रसुती, सीझर ३०% सवलत.

आभार डॉ. निलेश शिर्के यांचे

श्रीमती सुमन कामत

परमेश्वर कोणत्या रुपात भेटेल सांगता येत नाही. अर्थात आपल्या आयुष्यात आलेल्या माणसात तो भेटतो तेंव्हा मनात अनेक भाव दाटून येतात. सुंदर शब्दांत साकारलेला आंतरिक भाव, आपल्याही मनाला घटका लावून जाईल.

आज या घटनेला नऊ महिने झाले. मी त्याआधी आठ दिवस कोल्हापूरला गेले होते. साधारण १ डिसेंबरला मी कोल्हापुरहुन चिंचवडला परत आले. कोल्हापूरात आठ दिवस मला कसलाही त्रास झाला नाही. चार डिसेंबरला आमच्या एका नात्यातील लग्नाचे देवकार्य वडगांवशेरी या ठिकाणी होते. तेथेही माझा मुलगा, नात, सून आम्ही गेलो. तेव्हाही मी चांगली होते. त्यानंतर २–३ दिवस काहीही त्रास झाला नाही. त्यानंतर १ दिवस माझा डावा पाय व त्यावरील कमरेपर्यंतची सर्व बाजू अचानक इतकी दुखू लागली की मला चालताच येईना. मुलगा कंपनीत गेल्यावर सुनेला घेऊन फॅमिली डॉक्टरकडे गेले. डॉक्टर म्हणाले, पाय अवघडला असेल. त्यांनी तपासून गोळ्या लिहून दिल्या. २ दिवस गोळ्या घेतल्या पण काहीच फरक पडला नाही. धाकट्या सुनेचे सोळा सोमवारचे उद्यापन करायचे होते. त्यासाठी हॉल बघायला जायचे म्हणून मला तयार रहा असा मुलाने कंपनीतून फोन केला. म्हणून मी परत सुनेबरोबर डॉक्टरांकडे गेले त्यांनी सांगितले ऑर्थोपेडीकना दाखवा. मग मात्र सुनेनी मुलाला सर्व सांगितले. तो कंपनीतून आला व मला दवाखान्यात घेऊन गेला. तेथील डॉक्टरांनी एक्सरे काढला व आठ दिवस फिजीओथेरपी करायला सांगितले. मला तर नंतर उभे राहता येईना. चार पावले चालली तरी पाय दुखायला लागला. त्याचवेळी माझी दोन्ही मुले व सुना यांनी मला प्रत्येक वेळी वेळ मिळेल तसा मला दवाखान्यात नेऊन परत घेऊन यायचे. आठ दिवस झाले तरी बरे वाटेना. डॉक्टरांनी एमआरआय काढायला सांगितले. एमआरआय पाहून डॉक्टरांनी मणक्याचे ऑपरेशन करायला सांगितले. मी मनातून घाबरले. कारण घरात सुमारे मोठे माणुस कुणीच नव्हते. पण सर्व मुलांच्या वर सोपवून शांत बसले. ऑपरेशनचा दिवस ठरला.

दरम्यान माझ्या नातीला चिंचवड येथील भागवत चिकित्सालयचे डॉ. निलेश शिर्के यांचे आयुर्वेदिक औषध चालू होते. तिला औषध आणण्यासाठी सून दवाखान्यात गेली असता बोलण्याच्या ओघात माझ्या आजारपणाबद्दल व ऑपरेशनबद्दल कल्पना दिली. डॉक्टरांनी सर्व चौकशी करुन मी त्यांना एकदा तपासुन पाहतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी डॉ. स्वत: आमच्या घरी आले. त्यांनी मला तपासले. एम.आर.आय. पाहिला व सांगितले. १५ दिवस माझी आयुर्वेदीक ट्रिटमेंट घेऊन पहा. बरे नाही वाटले तर ऑपरेशन करा. खरे तर डॉक्टर माझ्या मुलापेक्षा लहान आहेत. पण त्यांनी माझ्या पाठीवरुन हात फिरवला. त्यावेळी मला खूप रडू आले. ते म्हणाले काकू मी तुम्हाला निश्चित बरे करुन चालायला लावेन. त्यांनी दिलेल्या आधारामुळे मला खूप बरे वाटले. त्यांनी लगेचच औषध सुरु केले. दुसऱ्या दिवशी मणक्याजवळ जळू लावल्या. तेलाचे मॉलीश केले व तुपाचा शेक कसा द्यायचा हे सुनबाईंना सांगितले. थोडे बरे वाटू लागल्यावर साधारण आठ दिवसांनी मी त्यांच्या दवाखान्यात गेले. त्यावेळी त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे पंचकर्म व बस्ती इ. सुरु केले. दवाखान्यात साधारण दोन–अडीच तास थांबावे लागायचे. पण माझी मुले व सुना त्यांना जमेल त्याप्रमाणे व्यवस्थित सांगितल्याप्रमाणे मला घेऊन जायचे व माझ्या बरोबर तिथेच थांबायचे. जानेवारीमध्ये माझ्या धाकट्या सुनेचे सोळा सोमवारचे उद्यापन होते पण त्यावेळी मी हॉलमध्ये एका बाजुला बसले होते. त्यांना वाईट वाटेल म्हणून मी कार्यक्रमाला गेले. नातेवाईकांना मला पाहून मी बरी होईल की नाही असे वाटले. पण डॉ. निलेश शिर्के यांच्या उपचाराने मी मार्चमध्ये व्यवस्थित झाले. मला थोडे थोडे चालायला येऊ लागले. त्यानंतर परत जूनमध्ये पंचकर्म व बस्ती इ. केले. जुलै मध्ये मी पूर्ण बरी झाले. आता मी घरातील सर्व कामे करते. आठ दिवस गणपतीसाठी मी कोल्हापूरला एकटी जाऊन आले. माझ्या या आकस्मित आजारातून मला पूर्णपणे बरे केल्याबद्दल मी डॉ. निलेश शिर्के यांचे या लेखाद्वारे आभार मानते. आपण पेपरमध्ये वाचतो मुले आई बाबांना विचारत नाहीत. पण मी या बाबत पूर्ण सुखी आहे. कारण डॉक्टरांची ट्रिटमेंट व मुलांनी, सुनांनी केलेल्या सेवेमुळे मी परत फिरायला, उठायला लागले. सर्वांविषयी कृतज्ञता व शुभाशिर्वाद!

***

आमचे प्रेरणास्थान



अप्पासाहेब गंगाराम निंबा कुंभार



श्री. प्रा. रमेश गंगाराम कुंभार
(चव्हाण सर) एम.ए.बी.एड.
उच्च माध्यमिक शिक्षक
मो. 9823363521



श्री. सुभाष गंगाराम कुंभार
तालुकाध्यक्ष कुंभार समाज महासंघ शिरपूर धुळे
मा. संस्थापक अध्यक्ष : संतश्री गोरोबाकाका कुंभार समाज विकास संस्था शिरपुर तालुका शिरपुर धुळे
मो. 9822788149



श्री. प्रकाश गंगाराम कुंभार
मे. बालाजी एंटरप्रायजेस (कोल डेपो)
बॉम्बे आग्रा हायवे, उड्डाण पुलाजवळ,
आमोदा, ता. शिरपूर, जि. धुळे
मो. 9922828071



श्री. अशोक गंगाराम कुंभार
विट सप्लायर्स
खडी, रेती, मुरुम सप्लायर्स,
शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे
मो. 9850129970

आरोग्य सेवेचा वसा जपणाऱ्या आरोग्यदायिनी डॉ. सुजाता कुंभार

सतीश चव्हाण





वैद्यकीय सेवेत अलिकडच्या काळात विश्वासार्हतेला मोठे महत्त्व आले आहे. वैद्यकीय सेवा करताना सामाजिक भान जपणे आणि त्यातून सर्वसामान्यांच्या दु:खावर फुंकर घालणारे अपवादात्मक लोक या क्षेत्रात आहेत. वैद्यकीय सेवा ही ईश्वर सेवा आहे, या वाक्याला साजेसे कार्य डॉ. सुजाता कुंभार यांच्या जगण्या-वागण्यातून स्पष्टपणे जाणवते. ही जाणिव अनेक रुग्णांच्या आयुष्याला पुन्हा नव्याने जगण्याचे बळ देत आहे.

त्यांचे पती डॉ. संजय कुंभार हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करीत आहेत. डॉ. सुजाता कुंभार व डॉ. संजय कुंभार या दाम्पत्याने घेतलेला आरोग्य व समाज सेवेचा वसा अखंड ठेवला आहे. काले (ता. कराड) येथील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या कुंभार कुटुंबातील डॉ. सुजाता संजय कुंभार (एम.बी.बी.एस., एम.डी. पॅथॉलॉजी) या कृष्णा वैद्यकीय महाविद्यालयात जवळपास ११ वर्षांपासून सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. सुजाता कुंभार वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे कार्य करतात. डॉ. सुजाता कुंभार यांनी इस्लामपूर येथील राजारामबापू पाटील रक्तपेढीच्या प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. रक्त पेढीच्या स्थापनेपासून जवळपास ९ वर्षे त्या राजारामबापू पाटील रक्तपेढीच्या प्रमुख होत्या. यानंतर गेल्या दहा वर्षांपासून त्या कृष्णा वैद्यकीय महाविद्यालयात पॅथॅलॉजी विभागात कार्यरत आहेत. तर कृष्णा रुग्णालयाच्या रक्तपेढीची जबाबदारी त्या सांभाळत आहेत.

ज्ञानार्जनाचे कार्य करतानाच काले गावातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना अल्प दरात आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी जवळपास २९ वर्षांपासून त्या काले येथे अविरत रुग्ण सेवा करीत आहेत. कोरोना काळात ग्रामीण भागातील अनेक दवाखाने बंद असतानाही डॉ. सुजाता कुंभार यांनी अविरत रुग्ण सेवा करीत आरोग्य सेवेचे व्रत जोपासले. यामुळे काले गावातील रुग्णांसाठी त्या खऱ्या अर्थाने देवदूत ठरल्या आहेत.

डॉ. सुजाता कुंभार यांचे पती डॉ. संजय कुंभार हेही डॉक्टर आहेत. जवळपास २० वर्षांपासून ते आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध प्राथमिक आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालयातून रुग्णसेवा करीत आहेत. अत्यंत प्रेमळ स्वभाव व हसरा चेहरा यामुळे डॉ. संजय कुंभार हे कार्यरत असलेल्या गावातील नागरिक व रुग्णांना ते आपले डॉक्टर वाटतात. डॉ. संजय कुंभार सध्या सदाशिवगड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी चरण, उंब्रज सारख्या मोठ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा करताना कामाचा वेगळा ठसा उमटवला आहे.

डॉ. संजय कुंभार व डॉ. सुजाता कुंभार या उभयंताना सौरभ हा एकुलता एक मुलगा आहे. सौरभनेही देशसेवेसाठी वाहून घेतले आहे. सौरभ सध्या एअर फोर्स मध्ये फ्लाईट लेफ्टनंट म्हणून कार्यरत आहे. सौरभला लहानपणापासुनच सैन्यात जाऊन देशसेवा करण्याची इच्छा होती. त्यामुळे आई वडील दोघेही डॉक्टर असतानाही सौरभला सातारा येथील सैनिक स्कूलमध्ये दाखल केले. आणि सौरभने आपले सैन्यात जाण्याचे स्वप्न पूर्ण केले. डॉ. सुजाता कुंभार व डॉ. संजय कुंभार यांनी सौरभच्या स्वप्नांना बळ दिले.

काले येथील कुंभार कुटुंब हे मोठे व सधन कुटुंब म्हणून ओळखले जाते. डॉ. संजय कुंभार यांच्यासह एकणू सहा भावंडे सर्वचजण वेगवेगळ्या नोकरी व्यवसायात स्थिरावले आहेत. काले परिसरातील सामाजिक कार्यात कुंभार परिवाराचा नेहमीच सहभाग असतो. लायन्स क्लबच्या माध्यमातून दर महिन्याला मोतिबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात येते. तर दर महिन्याला पाच मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात येतात.

डॉ. सुजाता कुंभार यांच्या पुढाकारातून स्थापन करण्यात आलेल्या कृष्णाई एन्टरप्रायजेसच्या माध्यमातून महिला सक्षमी-करणासाठीचा उपक्रम राबण्यात येणार आहे. गावातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी कृष्णाई जल पाणी एटीएमची सुविधा उभारण्यात आली आहे. कालेच्या कुंभार कुटुंबीयांच्या सेवेचा वसा व वारसा पुढे नेण्याचे काम डॉ. सुजाता कुंभार यांच्या माध्यमातून सुरु आहे.

***

अजात शत्रू विठ्ठलराव राऊत उर्फ आण्णा

संजय राजे



जामखेड जि. अहमदनगर येथील आपले नेते ह.भ.प. विठ्ठलराव एकनाथ राऊत उर्फ आण्णा. कुंभार समाज महासंघाचे संस्थापक व माजी अध्यक्ष होते. सुमारे दहा वर्षे त्यांनी प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा समर्थपणे वाहिली. चांदयापासून बांध्यापर्यंत तळागाळात कुंभार समाजाचे समर्थ संघटन उभे केले.

सन १९९७ रोजी मुंबई येथे झालेल्या सुमारे लाख लोकांच्या मडकीफोड मोर्चाचे नेतृत्व त्यांनी केले. सरकार दरबारी कुंभार समाजाच्या अनेक मागण्या, मोर्चाला सामोरे आलेल्या तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे आणि मा. प्रकाशजी जावडेकर यांनी युती सरकारतर्फे मंजूर केल्या.

या निमित्ताने संत परीक्षक श्री गोरोबाकाका यांचे जन्मस्थान श्री क्षेत्र तेर या ठिकाणी मा. गोपीनाथजी मुंडे यांचा भव्य नागरी सत्कार हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमात आंण्णांनी उपस्थित हजारो लोकांना आवाहन केले की, कुंभार समाजातील बंधू भगिनींनी किमान वर्षातून एकदातरी गोरोबाकाका यांच्या जन्मस्थानाला दर्शनासाठी सहकुटुंब यावे, या आवाहनाला उपस्थित जनसमुदायाने टाळ्यांचा प्रचंड प्रतिसाद दिला. पुढे कुंभार समाजाच्या लाखो लोकांनी श्री क्षेत्र तेर या गोरोबाकाकांच्या पवित्र जन्मस्थानी दर वर्षी दर्शनासाठी यायला सुरुवात केली, या गोष्टीचे श्रेय आंण्णांनाच आहे. आंण्णांच्या वरील कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय प्रजापती महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली होती ही अभिमानास्पद बाब आहे.

अहमदनगर येथील संत गोरोबाकाका पतसंस्था खूप तोट्यात होती. तिची वाटचाल दिवाळखोरीच्या दिशेने चालू होती. या पतसंस्थेस आंण्णांनी जामखेड येथे स्थलांतरीत केले. पतसंस्थेचा कारभार वाढवला, सध्या ही पतसंस्था 'अ' दर्जा राखून सभासदांना दरवर्षी लाभांश देते आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

आंण्णा जामखेड ग्रामपंचायतीचे उपसरपंच होते, लोक त्यांना 'डेप्युटी' म्हणायला लागले. त्यांचा कार्यकाळ संपल्यावर सुध्दा शेवटपर्यंत सर्व जण 'डेप्युटी आंण्णा' असेच म्हणायचे.

आंण्णा मोठे उद्योजक होते. विट कारखाना, किराणामाल घाऊक व ठोक व्यापारी आणि गोरोबा मल्टिप्लेक्स थिएटर या विविध उद्योगामुळे जामखेड तालुका विभागातील मोठे व्यापारी म्हणून ते सुप्रसिद्ध होते.

आण्णा दरवर्षी जामखेड ते श्री क्षेत्र तेर गोरोबाकाका पायी दिंडी सोहळा गोरोबाकाका पुण्यतिथीच्या आधी काढत असत. शेकडो वारकरी या दिंडी सोहळ्यात सहभागी होत असत. यावर्षी आपल्या सर्वांचा लाडका विठ्ठल गोरोबाकाकांच्या भेटीला अकाली निघून गेला याचे दु:ख सर्वांनाच आहे. पण असे भाग्य सर्वांनाच मिळत नाही या मागचा आध्यत्मिक मतीतार्थ फार मोठा आहे. नेमक्या या पायी दिंडीच्या काळातच आंण्णांना देवाज्ञा होणे म्हणजे आपला विठ्ठल कायमचा गोरोबा काका यांच्या भेटीला निघून गेला...

महाराष्ट्रात गावागावात आंण्णांच्यावर प्रेम करणारे, त्यांना मानणारे, ओळखणारे लाखो समाज बंधू भगिनी आहेत त्या सर्वांच्या भावना अनावर झाल्या,वाढदिवसादिवशीच आंण्णांचे निधन झाल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला.

दिनांक १ मे २०२१ रोजी मला शेकडो फोन आले. आंण्णांची बातमी खरी आहे समजताच त्यांच्या भावना अनावर होत होत्या. कुंभश्री मासिकाच्या रोपट्यास खत पाणी घालून वाढवणारे, संकट प्रसंगी कुंभश्रीच्या मागे ठामपणे उभे राहणारे आंण्णा आम्हाला दैवत होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आंण्णा कुंभश्री मासिकाचे प्रमुख आधारस्तंभ होते.

आमदार निवासमध्ये स्वत: खाली सतरंजीवर झोपून कार्यकर्त्यांना गादीवर झोपवणारे आंण्णा, कार्यकर्त्यांना मोठे करणारे आंण्णा, कार्यकर्त्यांचे मतभेद सामंजस्याने मिटवणारे आंण्णा, मतभेद झाले तरी सहनशीलता दाखवणारे आंण्णा.

महासंघाचे प्रदेशाध्यक्ष पद सोडल्यानंतर काही काळाने पैठण येथील बैठकीत झालेला अपमान भगवान शिवशंकराने जसा विषाचा प्याला पचविला तसा हा अपमान समाज हितासाठी पचवणारे आंण्णा. सरते शेवटी जामखेड येथे पैठण बैठकीत अपमान केलेल्या सर्वांनी आंण्णांची माफी मागितल्यानंतर मोठ्या मनाने सर्वांना माफ करणारे आंण्णा अशी अनेक रुपे फक्त आणि फक्त देवाचीच असू शकतात. कुंभार समाजाचा परमेश्वर विठ्ठल अकाली अनंतात विलीन झाला आणि कुंभार समाज पोरका झाला.

कै. आंण्णांच्या मागे पत्नी विजया, मुले विनायक व महेश, सुना अनुक्रमे सौ. रत्नमाला, सौ. वर्षा, मुलगी कु. भाग्यश्री उर्फ राधा (इंडिरियर डिझायनर), बहिणी सौ. सुमन मारुती कुंभार, (भूम, उस्मानाबाद), सौ. मीरा नवनाथ दाते (अहमदनगर).

विठ्ठलराव उर्फ आंण्णांच्या महान पुण्य आत्म्यास समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांचे तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. वैकुंठवासी ह.भ.प. विठ्ठलराव एकनाथ राऊत यांच्या आत्म्यास ईश्वर चरणी चिर शांती आणि सदगती लाभो हीच गोरोबाकाकांच्या चरणी सर्वांच्या वतीने विनम्र प्रार्थना.

***

-** वाचकांचे अभिप्राय -**

संजय राजे साहेब... नमस्कार प्रथम आपले अभिनंदन !!!

दिवसेंदिवस आपले हे 'कुंभश्री मासिक' खुपच चांगल्या अद्ययावत प्रकारे प्रकाशित होत आहे. आपण व वहिनी दोघांची खुपच मोठी मेहनत यामागचे कारण आहे. सर्व समाज बंधू भगिनी व तरुण पिढीला 'कुंभश्री' हे एक मार्गदर्शक असे मासिक आहे.

समाजातील सर्व घडामोडी व विशेष कार्यक्रमांची आपण खास दखल घेऊन ते सर्वांपर्यंत पोहचवण्याचे उल्लेखनीय मोठे काम करत आहात. त्याबद्दल तुम्हास माझा सलाम. आपण आमचे आजोबा संत कुंभार गुरुजी व आई-वडिलांच्या विशेष कार्यांची दखल घेतली व ती माहिती छापून सर्वांपर्यंत पाठवली. त्याबद्दल नक्कीच मी व आम्ही बोरसे परिवार आपले मन:पुर्वक आभारी आहोत. असेच प्रेम व लोभ असावा. आजच्या या बाहेरील वातावरणात आपण काळजी घ्यावी. धन्यवाद.

– चंद्रकांत बोरसे, नाशिक

***

राजे साहेब... नमस्कार फेब्रुवारीचा अंक सुध्दा नेहमीच्या अंका-सारखाच सुंदर होता. आपण अद्ययावत प्रकारे अंकाचे प्रकाशित करत आहात खुप सुंदर.

लेखिका : अनसूया कुंभार, डोंबिवली.

***

आपण पाठवलेला डिजीटल कुंभश्री अंक मला खुपच भावला. अतिशय मार्मिक अशा शब्दांमध्ये तुम्ही केलेली लेखन शैली फार आवडली. आपल्या समाजातील उत्कृष्ठ काम केलेल्या सद्गुणी व्यक्तीचा आपण केलेला गौरव देखील मनाला फार भावला. आपल्या समाज बांधवांनी आपापल्या कार्यामध्ये घेतलेली उत्तुंग भरारी जाहिरातीतून प्रकट झाली. विविध सन्मानयीय व्यक्तीची व त्यांच्या कार्यांची ओळख झाली. समाजातील वधू व वर यांची माहिती मिळाल्यामुळे अनेक समाज बांधवांची लग्ने जुळवण्याचे जे कार्य आपण करता तसेच समाज बांधवांच्या अडचणी आपण सोडवता आपल्या कार्यास मानाचा मुजरा.

हेमंत शरद बोथेकर (प्राथ. शिक्षक, श्रीगोंदा, जि. अहमदनगर)

***

आदर्श शिक्षक प्रकाश कुंभार सर बारामती यांच्या कुंभश्रीविषयी प्रतिक्रिया

नुकताच, सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय पत्रिका कुंभश्रीचा एप्रिल २०२१ चा १३६ पानी डिजिटल अंक वाचनात आला. शककर्ता राजा शालिवाहनाचे मुखपृष्ठ असलेला अंक उत्सुकता वाढवत गेला की, या अंकात राजेसाहेबांनी नवीन काय दिलेलं असणार आहे. राज्यातल्या आणि देशातल्या आपल्या कुंभार बांधवांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची क्षणचित्रे अगदी सुरुवातीला पाहताना खूप अभिमानही वाटला. नैसर्गिक आपत्ती आलेली असतानाही झुंजार वृत्तीचा कुंभार बांधव गप्प बसूच शकणार नाही हेही कुंभश्रीच्या माध्यमातून समजलं.

सातारा, बारामती या ठिकाणी विकास संस्थेच्या माध्यमातून चालू झालेली कुंभारी वस्तूंची अद्ययावत शोरुम्स, पुणे येथून विठ्ठल-रुक्मिणी व गोरोबाकाकांच्या मूर्ती जम्मू काश्मीरला पाठवताना त्याच ठिकाणी कुंभश्रीतर्फे आपण केलेला मा. मोहनरावजी जगदाळे साहेबांच्या जन्मदिना -निमित्तचा सत्कार तसेच उद्योजक तुळशीरामजी शिर्के यांचे आपण केलेले कौतुक. अकोला येथील महापालिकेच्या स्थायी समितीवर सभापती पदी निवड झाल्याबद्दल करण्यात आलेला मा. संजयराव बडोने साहेबांचा सत्कार. वाई येथील दिप फॅन्टसी आर्टीक्राफ्ट कंपनीस मोठी ऑर्डर मिळाल्याबद्दल कुंभश्रीने संचालक श्री. व सौ. रवींद्र कुंभार यांचे केलेले अभिनंदन. त्यांना प्रचंड व्यावसायिक बळ देणारं आहे. पलूसचे माजी सरपंच बाळासाहेब कुंभार यांना खासदारांच्या हस्ते मिळालेला मोठा पुरस्कार हे बाळासाहेबांचं मोठं कौतुक आहे. कोल्हापूरच्या डॉ. सागर कुंभार साहेबांचे आपण उभयंता तिथे जाऊन केलेले अभिनंदन डॉक्टरांच्या दृष्टीने किती मोलाचे आहे. गोव्यातील कुंभार बांधवांच्या कार्याचा आपण घेतलेला आढावा अन गुजरातच्या दिनेशभाई प्रजापती यांची खासदार पदी निवड झाली म्हणून आपण त्यांचे केलेलं अभिनंदन. जम्मू काश्मीरला पाठविलेल्या मूर्तीच्या प्रतिष्ठापना समारोहाची सविस्तर माहिती घेऊन. ती आमच्यापर्यंत कुंभश्रीच्या माध्यमातून पोहोचविली. किती लाख मोलाचे कार्य आपण व कुंभश्री करत आहात. साहेब या सगळ्या कार्यासाठी आम्ही आपले खूप आभारी आहोत.

राजेसाहेब, आपण आपल्या संपादकीयमध्ये 'उसळली लाट कोरोनाची पुन्हा! लसीकरणे वेगाने करा!' या शिर्षकाखाली समाज बांधवांना लसी-करणासाठी केलेलं आवाहन, आपल्यातील सामाजिक जबाबदारीची तळमळ किती प्रचंड आहे, हे दाखवून देते. मिलिंद काटे यांची शालिवाहनाची कथा माहिती पूर्ण आहे. अर्चना रायरीकर मॅडमची 'मला व्यायामाची काय गरज?' खूप छान माहिती आहे. सविता कुंभार यांची यशोगाथा नक्कीच कुटुंबांसाठी खूप प्रेरणादायी आहे. डॉक्टर शंतनु अभ्यंकर यांचा लेख वर्तमान काळासाठी किती मार्गदर्शक आहे ना. आणि दिपाली ताईची कोरोना वरील कविता 'खरंच जगणं शिकवून गेली.' 'ऑडिओ पुस्तक वाचनाचा अनुभव' आणि 'नाही म्हणायला शिका' हे लेख आपल्यासाठी खूपच छान माहिती देणारे आहे. सिंधुताईचा सांगितलेला जीवनप्रवास म्हणजे भरकटलेल्या लोकांसाठी प्रकाशवाटच आहे.

अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघाचे मेहसाना येथे झालेल्या महाअधिवेशनाची माहिती आम्हाला आपण कुंभश्रीच्या माध्यमातून घरबसल्या दिलीत. राणी रामपालचे यश आणि मिळालेला सर्वोच्च राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार समाजाला अभिमान वाटावा असाच आहे. झाशी, राजस्थान, भोपाळ, गोवा, दिल्ली, जम्मू काश्मीर

या देशातील विविध ठिकाणच्या सामाजिक बातम्या आम्हाला घरबसल्या कुंभश्रीतून समजत आहेत.

आज राज्यातील आपल्या समाजाच्या विविध संघटना शासनाकडे अनेक सामाजिक–व्यावसायिक अडचणी मांडत आहेत. व्यवसाय करण्यासाठी असलेल्या कठोर नियमात शिथिलता आणण्यासाठी आपले नेते आपली बाजू शासनाकडे मांडत आहेत. राज्यात देशात होत असलेल्या अनेक बैठका, मेळावे, आंदोलने, निदर्शने या सर्वांची माहिती आपल्याला आज कुंभश्रीतून प्रत्येक महिन्याला घरबसल्या मिळते आहे. काही अन्यायकारक, अनिष्ट गोष्टी घडताना दिसताच कुंभश्री आक्रमकही बनतो आहे.

आज कुंभश्रीच्या माध्यमातून राजेसाहेब आणि त्यांचे सहकारी आपल्याला वेळोवेळी किती तळमळीने आवाहन करत आहेत की, वर्तमान आणि भविष्यकाळ प्रचंड कठीण आहे. आपण आपल्या पाल्यांचे विवाह समारंभ साधेपणाने करा, आपल्या आरोग्याची काळजी घ्या, पर्यावरणाचे रक्षण करा, शिक्षणाला खूप महत्त्व द्या, नातेसंबंध आणि मित्रत्व जपा.

कुंभश्री आज हजारो विवाहोत्सुक मुला–मुलींची माहिती आपल्यापर्यंत पोहचवीत आहे. आपला व्यवसाय छोटा असो वा मोठा जाहिरातींच्या माध्यमातून देशातील प्रत्येक राज्यात जिल्ह्यात त्याची माहिती पोहोचवितो आहे. देशातले–राज्यातले लाखो समाज बांधव आज कुंभश्रीच्या माध्यमातून एकमेकांना घट्ट जोडले गेले आहेत. आपण मिळवलेलं यश लोकांपर्यंत पोहोचवत कुंभश्री आपलं कौतुक करत आहे. आपल्यावर जर आपत्ती आली, आपण प्रचंड अडचणीत असाल तर कुंभश्रीने केलेल्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळून, आपल्याला सहीसलामत कुंभश्री अडचणीतून बाहेर काढत आहे. हे कितीतरी उदाहरणातून आपण अनुभवलेलं आहे. आपले वाढदिवस, उत्सव आपल्याच परिवारातील एक घटक म्हणून कुंभश्री साजरा करतो. अन आपल्यातून कोणी अचानक निघून गेला तर शोकाकुलही होतो. अशी ही सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कुंभश्रीला आमचा मानाचा मुजरा आहे.

आज देश प्रचंड अडचणीतून जात आहे. या काळात आपल्या समाजाचा प्रत्येक घटक आपल्या पायावर भक्कमपणे उभा असला पाहिजे. मला माहित आहे, कुंभश्रीने आज आपला ऑफलाईन अंक छापणं बंद केलं आहे. कारण मिळणाऱ्या तुटपुंज्या मिळकतीतून अंक चालविणं एवढं सोपं नाही, पण राजेसाहेब, या पत्राच्या माध्यमातून मला माझ्या समाज बांधवांना आणि मित्रांनाही सांगायचं आहे की, मित्रांनो, कुंभश्री आपल्या समाजाचा प्रचंड मोठा वटवृक्ष आहे. त्याचा आपल्याला खूप मोठा आधार आहे आणि अभिमानही आहे. आणि हा आधारवड आणखी भक्कम होण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची कुंभश्रीला आता गरज आहे असं मला वाटतं म्हणून आपण आपल्या व्यवसायांच्या जाहिराती कुंभश्रीने आपल्याकडे येऊन मागण्यापेक्षा आपण स्वत:हून कुंभश्रीपर्यंत पोहोचवाव्यात. देशातल्या आणि राज्यातल्या प्रत्येक कुंभार बांधवांनी कुंभश्रीची नाममात्र वर्गणी जी काही असेल ती, भरुन सभासद व्हावं आणि मोठ्या परिवाराचा आपण सदस्य व्हावं. कुंभश्री वधु–वरचेही आपण सभासद होऊन, आपल्या मुला–मुलींचं भविष्य उज्वल करुयात. एक समाज बांधव म्हणून हीच मनापासून इच्छा व्यक्त करीत आहे. धन्यवाद!

प्रकाश कुंभार (ता. बारामती, जि. पुणे)

***

वरील प्रतिक्रियेस संपादक संजय राजे यांचे उत्तर

''मोडला सारा संसार तरी मोडणार नाही कणा,
तुम्ही सर्वांनी फक्त पाठीवर हात ठेवून लढा म्हणा.''

या उक्तीप्रमाणे माझ्या मनातील दाटलेल्या भावना जणू तुम्ही व्यक्त केल्या. माझ्या मनावरचा ताण त्यामुळे खूप कमी झाला. गेल्या २६ वर्षाच्या काळात कुंभश्री ची खूप मोठ्या संघर्षातून वाटचाल करताना सुद्धा कधी खचलो नाही. खचणार नाही. मागील एप्रिल २०२० पासून जाहिरातदार व वर्गणीदार यांचा निधी जवळपास बंद आहे. आम्ही त्यांच्या पर्यंत पोहचू शकत नाही, चेक किंवा बँकेत रक्कम पाठवण्याचे आवाहन करुन देखील जाहिरातदारांचा प्रतिसाद मिळत नाही याची मोठी खंत वाटते.

डिजिटल अंक काढायला सुद्धा खर्च येतो. ऑफिस स्टाफ सांभाळावा लागतो. तरी सुद्धा सामाजिक जान आणि भान ठेऊन कुंभश्री डिजिटल अंक सर्वांना पाठवत आहेत. दुसऱ्या लाटेतील कोरोना या नैसर्गिक संकटाने मात्र हतबल केले. या हतबालतेवर मात करण्याची शक्ती तुमच्या प्रतिक्रिया वाचून मिळाली.

लॉकडाऊन काळाच्या एक वर्षात अनेक व्याधी मात्र मागे लागल्या त्यावर सुद्धा मात नक्की करेन अशी मला खात्री आहे. कुंभश्री संपादक या नात्याने मी समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्या वतीने तुमचे मन:पूर्वक आभार मानतो. खुप खुप धन्यवाद!

***

'कुंभश्री' २७ मे २०२१ वाचला आणि खूप समाधान वाटले. आपल्या नेतृत्वाखाली 'कुंभश्री' सौंदर्य आणि गुणवत्ता या दृष्टीने अंक परिपूर्ण झालेला आहे. आपले परिश्रम आणि जनसंपर्क कौतुकास्पद आहे. आम्ही 'कुंभश्री' संपादक स्व. बाबुराव साळवी उर्फ अण्णा यांच्यापासून या मासिक चळवळीशी संबधित आहोत, त्यांच्या सहवासात बरीच चर्चा झालेली होती, अनेक वेळा भेटी झाल्या, त्यांची तपसाधना आपण विकास वाटेवर आणली आहे, त्यांच्या काळातील बरेच अंक माझ्याकडे आहेत, त्यामुळेच ते अंक आणि आपले अंक संशोधक वृत्तीला प्रेरणादायी ठरले. त्यामुळेच मी दिल्लीच्या अनुदान आयोगामार्फत 'भारतीय कुंभार समाजातील संत' हा अभ्यास पूर्ण करु शकलो, आपले ऋण फार महत्त्वाचे आहेत. ह्या अभ्यासाचे पुस्तक पुणे येथील स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेले आहे. संशोधन आणि समाजसेवा

यांची गुणवत्ता असणारा 'कुंभश्री' म्हणजे समाजाचे भूषण आणि ऐतिहासिक दुर्मिळ दस्तऐवज आहे. याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो आणि आपल्या वाटचालीस नमन आहे.

या अंकात आपण श्रीरामपूर मधील सर्व बातम्या आवर्जून छापल्यात त्याबद्दल खूप खूप आभारी आहे. आपल्या सहकार्यातून आम्हांला प्रेरणादायी आहात. आपले कार्य समाजसेवेचा आदर्श आहे. १९९४ पासून सुरु झालेल्या 'कुंभश्री'ने २७ वर्षांची केलेली वाटचाल वाखणणीय आहे. कुंभार समाजासाठी ज्यांनी आयुष्य समर्पित केले होते असे देवतुल्य व्यक्तिमत्त्व स्व. विठ्ठलराव एकनाथराव राऊत जामखेड यांच्यावरील लेख छापलात. अनेक ठिकाणी झालेल्या संत गोरा कुंभार पुण्यतिथी बातम्या छापल्यात. मा. सुरेश कोते साहेब यांची सुकन्या प्रा.सौ. भक्ती सचिन हिवरकर यांना पीएच.डी. प्राप्त बातमीही प्रेरणादायी आहे. अनेकांच्या प्रतिक्रिया आहेत. जाहिरातदारांचा आपणांस खूप पाठिंबा आहे. अंक सुंदर, वाचनीय आणि दर्जेदार आहे. आपले मनापासून अभिनंदन व आभार आहेत.

– डॉ. बाबुराव उपाध्ये, श्रीरामपूर

***

वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठावर गोरोबाकाकाचा सुंदर देखणं रुप, पांडुरंगाचे मुखी नाम, टाळ हाती. चिखल तुडवित नामस्मरण, पत्नी मदत करते आहे. वस्त्र परिधान असे गोरोबाकाकांचे साजीरे रुपाचे दर्शन झाले. आदरणीय संजय जी राजेसर व चित्रकार यांचे खुप धन्यवाद!

– सी. एम. कुंभार, वारजे, पुणे.

***

अभिनंदन! मे महिन्याचा अंक वाचला. आपले प्रयत्न अखिल कुंभार बांधवांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. याकामी आपल्याला निश्चित यश मिळो अशी भगवंताकडे प्रार्थना करतो.

– मदन पाषाणकर, पाषाण, पुणे

***

कोविड १९ कोरोना महामारीचा कठीण कालावधी असतानाही मे २०२१ चा कुंभश्री (पीडीएफ) कुंभार समाज बांधव वाचकांसाठी उपलब्ध करुन दिलात, याबद्दल आपले मन:पुर्वक हार्दिक आभार! अंकाच्या मुखपृष्ठावरील संत गोरोबाकाकांचे छायाचित्र छान आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागात घरोघरी साजऱ्या केलेल्या संत गोरोबा काकांच्या पुण्यतिथी उत्सवाची निवडक छायाचित्रे. कुंभार समाज महासंघाचे संस्थापक व माजी अध्यक्ष (कै.) अण्णा तथा विठ्ठलराव राऊत यांना श्रद्धांजलीपर संपादकीय पानावरील गोरोबा काकांच्या भेटीला विठ्ठल गेला... (कै.) अण्णांच्या जीवन चरित्रावर टाकलेला प्रकाश हृदयस्पर्शी. (कै.) आण्णांच्या पवित्र स्मृतिस भावपूर्ण आदरांजली...समाज बांधवांसंदर्भातील राष्ट्रीय समाचार, महाराष्ट्र आपला मधील संत गोरोबाकाका व शककर्ता राजा शालिवाहन यांचे लेख. तसेच, ओघवती भाषण शैली लाभलेले आणि उत्कृष्ठ निवेदक म्हणून ख्याती असलेले प्रकाश कुंभार (सर) यांची कुंभश्रीविषयी प्रतिक्रिया वाचनीय आहे. याशिवाय अनेकजण प्रथम पाहतात ते शुभमंगल सदर, या सदरासाठी व एकूणच अंकासाठी मिळत असलेला वाचकांचा भरभरुन प्रतिसाद ही समाजाप्रति असलेल्या आपल्या योगदानाची पावती म्हणावी लागेल. कुंभश्री अंकामुळे राज्यातील आपल्या कुंभार समाज बांधवांच्या एकूणच कार्याचा, कलागुणांचा लेखाजोखा लक्षात येतो. राजकीय, सामाजिक, सरकारी उच्च पदस्थ, उद्योजक, नामवंत कलाकार, हुशार विद्यार्थी आणि कुंभार व्यवसायाशी निगडीत बहूमोल माहिती समजते. कुंभश्रीच्या माध्यमातून होत असलेली समाज प्रबोधनाची ही ज्योत सतत तेवत राहो, अशा मन:पूर्वक शुभेच्छा!

– जयराम सुपेकर (सुपे, बारामती)

***

साईराम! मे महिन्याचा अतिशय वाचनीय अन् ज्ञानवर्धक अंक! उत्कृष्ट मांडणी व समाजासाठी तळमळीने कार्य करणाऱ्यांची योग्य दखल तसेच शैक्षणिक, आरोग्य, कलाकौशल्य, व्यावसायिक आणि कौटुंबिक माहिती देणारे एकमेव प्रकाशन!

संत शिरोमणी गोरोबाकाकांना सादर दंडवत प्रणाम. आपल्या हातून असेच उद्बोधक सेवाकार्य घडो. काकांना नमन!

– कमलाकांत कुंभार फुलगावकर, पुणे

***

कुंभश्री मासिकातील सुविचार प्रेरणादायी असतात. आपल्या कुंभार समाजातील खुप लोकं लोकप्रिय कामे करतात याची माहिती मासिकातून कळते. संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी होताना पाहून आपली कुंभार समाज परंपरागत चालत आहे, याचा आढावा येतो. तसेच वधू–वरांची माहिती मासिकातून मिळते. खरचं कुंभश्री संपादक संजय राजे यांना मनापासून धन्यवाद.

– रामचंद्र कुंभार, सातारा

***

कुंभश्री दीपावली विशेषांक सवडीने वाचून काढला. नेहमीप्रमाणेच अंक आकर्षक, वाचनीय, स्मरणीय झाला आहे. कथा, कविता, वधुवरांची माहिती, व्यक्तिदर्शने, विविध लेख यांनी मनोरंजन व ज्ञानरंजन खूप आवडले. माझ्या कथा, कवितेला अंकात स्थान दिले. या सर्वांबद्दलचे आपले आभार व अभिनंदन!!!

– अनसूया कुंभार, डोंबिवली

या महिन्याचा कुंभश्री अंक वाचला. अंकाचे मुखपृष्ठ प्रसंगानुरुप छान, अंतरंग उत्तम, कथांची निवड चांगली. कडेलोट, वास्तव, आई आणि अजून काही कथा लेखन उत्कृष्ठ. लेखकांचे अभिनंदन. आपलेही अभिनंदन. अंक वाचनीय, साहित्याचा दर्जा चोखंदळ, उत्तम. अंक जपून ठेवावा असा.

– उत्तमराव काळे सर, चाळीसगाव.

***

कुंभश्री डिजीटल दिवाळी अंकाला मिळालेला सर्वोत्कृष्ठ पुरस्कार

सन २०२० चा कुंभश्री दिवाळी अंकाला अखिल भारतीय मराठी प्रकाशन संघातर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ठ दिवाळी अंक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

मनोहर मंगल कार्यालयामध्ये झालेल्या दिमाखदार कार्यक्रमात कुंभश्री दिवाळी अंकाचा पुरस्कार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्राध्यापक मिलींद जोशी यांच्या शुभहस्ते कुंभश्री संचालिका सौ. बीना संजय राजे यांनी स्विकारला. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर, आ.भा. मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीवजी बर्वे, उपाध्यक्ष दत्तात्रय पाष्टे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सिनेअभिनेते दिलीप प्रभावळकरांना बॅच लावण्याचा आणि सन्मान पूर्वक व्यासपिठावर आणण्याचा मान कुंभश्रीचा संपादक म्हणून मला देण्यात आला हे मी माझे भाग्य समजतो. हा पुरस्कार स्विकारत असताना कुंभश्री मासिकाचा गेल्या सत्तावीस वर्षाचा खडतर प्रवास डोळ्यासमोरुन जात होता. या काळात संचालिका म्हणून सौ. बीना राजे यांनी घेतलेले कष्ट, यातना यांचे चीज झाल्याची भावना माझ्या मनात दाटून आली. पडदयावरचा कलाकार जरी संपादक म्हणून मी होतो पण खरी जबाबदारी माझी पत्नी सौ. बीना यांनीच पार पाडली होती, त्यामुळे त्यांचे मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन!!

कुंभश्रीला मिळालेला हा पुरस्कार सर्व लेखक, जाहिरातदार आणि समाजबांधवांचा आहे असे प्रतिपादन सौ. बीना राजे यांनी यावेळी केले. या पुरस्कारामुळे साहित्य क्षेत्रात कुंभार समाजाच्या कुंभश्री दिवाळी अंकाने बाजी मारल्याचा अभिमान असल्याच्या शेकडो प्रतिक्रिया समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे पाठवल्या. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फोनद्वारे, व्हॉट्सअप द्वारे आमचे अभिनंदन करुन भावना व्यक्त केल्याबद्दल सर्वांचे आम्ही मन:पुर्वक आभार व्यक्त करतो, असेच सहकार्य, प्रेम आम्हांला सतत लाभो अशी सद्गुरु चरणी प्रार्थना करतो.

ही दीपावली आणि नववर्ष सर्व लेखक, कवी, जाहिरातदार व सर्व समाज बांधवांना सुखाची, समृद्धीची, भरभराटीची व आरोग्यमय जावो अशा मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा!!!

***

पुरस्कार वितरण सोहळ्याची काही क्षणचित्रे



सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचे स्वागत करताना अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीवजी बर्वे समवेत संजय राजे



सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचे आगमन झाल्यानंतर त्यांना बॅच लावताना कुंभश्री संपादक संजय राजे



दिप प्रज्वलन करताना सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर समवेत डावीकडे अखिल भारतीय प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीवजी बर्वे व उजवीकडे कुंभश्री संपादक संजय राजे



कुंभश्री डिजीटल दिवाळी अंकाचा पुरस्कार स्विकारताना संचालिका सौ. बीना संजय राजे हस्ते प्रा. मिलींद जोशी (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद) समवेत सुप्रसिध्द सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर व मान्यवर

* कुंभश्री डिजीटल अंकास पुरस्कार मिळाल्याबद्दल वाचकांच्या प्रतिक्रिया *-

मा. संजयजी सप्रेम नमस्कार,

सर्व प्रथम 'कुंभश्री' डिजिटल दिवाळी अंकाला उत्तम दिवाळी अंक म्हणून प्रथम पुरस्कार मिळाला त्याबद्दल आपले व सौ. बीनाताईचे अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा!

'कुंभश्री' ही राष्ट्रीयपत्रिका आहे. 'कुंभश्री'चे दरवर्षीचे दिवाळी अंक उत्तमच असतात. त्याचे फळ आज आपणास मिळाले आहे. यामध्ये आम्हा सर्वांचा वाटा आहे असे आपण म्हणता तो आपल्या मनाचा मोठेपणा आहे. सिंहाचा वाटा हा संपादकाचा असतो. इतरांना श्रेय देणे ही आपली संस्कृती आहे व ती संस्कृती आपण जपत आहात.

कुंभश्री मध्ये कथा, लेख, कविता या शिवाय इतर ही आवश्यक व उपयुक्त वार्ता असतात. माहिती असते, मार्गदर्शन असते व एखाद्याचे कौतुक ही असते. असा सर्व अर्थाने 'कुंभश्री'चा अंक परिपूर्ण असतो.

'कुंभश्री'च्या अंकाच्या मुखपृष्ठामध्ये शालीनता पाहावयास मिळते. 'कुंभश्री' हे एक लेखक, नव लेखक, कवी यांच्यासाठी साहित्यिक व्यासपीठ आहे. साहित्यिक त्यांचे विचार या माध्यमातून वाचकापर्यंत पोहचवतात.

– चंद्रकांत शंकर नवले, ज्येष्ठ लेखक पुणे

***

Heartiest Congratulations !!! कुंभार समाजाचे राष्ट्रीय मुखपत्र कुंभश्रीला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे समस्त कुंभार समाजाचा गौरव असून कुंभश्रीचे पारंपारिकतेतून आधुनिकतेकडे चालू असलेली ही वाटचाल समृद्ध होताना सर्वोत्तम डिजिटल दिवाळी अंक म्हणून मिळालेला हा पुरस्कार कुंभश्रीसाठी पुढील वाटचाल करताना नक्कीच प्रेरणादायी ठरेल. आदरणीय संजय राजेसाहेब व कुंभश्री परिवाराचे मन:पुर्वक अभिनंदन!!

– विनायक विठ्ठलराव राऊत, जामखेड

***

अशीच कुंभश्री अंकांची काळानुरुप प्रगती होत राहो. ही श्री स्वामीसमर्थ चरणी प्रार्थना. यात श्री. व सौ. राजे कुटुंबाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. परमेश्वराने दोघांनाही समाजाची सेवा करण्याची संधी दिली आहे. मला सुरुवातीपासूनची धडपड माहिती आहे. हे श्रेय सर्व समाज बांधवांचे आहे. हे मी नाकारत नाही. परंतु ज्यांचे यात दिवसरात्र याच समाजाच्यासाठी अती कष्ट घेतले व घेत आहे ते माझ्यासारखे कधीही विसरणार नाहीत. उभयंताचे परत अभिनंदन. समाज हा झाडाच्या फांद्या आहेत म्हणून खोडाला विसरुन चालणार नाही. परमेश्वर दोघांनाही उदंड आयुष्य देवो.

– मारुती राऊत काळभोर नगर, आकुर्डी, पुणे

***

मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन!! कुंभश्री मित्र परिवाराच्या कार्याचा उचित सन्मान झाला. **– लक्ष्मण कोते**

***

साहित्य क्षेत्रातील या गौरवशाली कार्यातुन पुरस्कार प्राप्तीबद्दल आपले अभिनंदन. कुंभश्री समुहाशी मी देखील कथेच्या माध्यमातून जोडले गेलो असल्यामुळे मला निश्चितच अभिमान वाटतो हा साहित्य कुंभ सदैव भरलेला राहो याच शुभेच्छा! नावाप्रमाणे आपण राजे आहात.

– आण्णा धगाटे ज्येष्ठ विनोदी लेखक

***

अभिनंदन राजेसाहेब अशीच दिवसेंदिवस कुंभश्रीची प्रगती होत राहो. अशी गोरोबाकाका चरणी प्रार्थना.

– उद्योजक धनलालशेठ शिरसाठ, आव्हाना, जळगांव

***

सौ. व मा. श्री. संजय राजे आणि कुंभश्रीचे संचालकांचे खुपखुप अभिनंदन! तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!!

– संतोष पाषाणकर, पुणे

***

That's proud moment for all of us. Many more congratulations. **– बंडा कुंभार, शासकीय कृषी अधिकारी, कोल्हापूर**

***

कुंभश्री दिवाळी अंकाला मिळालेला पुरस्कार खूपच स्तुत्य आहे. मन:पुर्वक अभिनंदन! एक सकारात्मक विचार घेऊन सुरु झालेला कुंभश्री. संस्थापक कै. आण्णांचा हा कुंभश्रीचा प्रवास संपादक संजय राजे यांनी सक्षमपणे पेलला.. या बद्दल खूप खूप अभिनंदन!!!

– मनिषाताई कुंभार, उपजिल्हाधिकारी

***

राजे साहेब नमस्कार, कुंभश्री अंकास मिळालेला प्रथम पुरस्कार हा आपल्या संपादकीय कार्यकौशल्याची एक पावतीच आहे. समाजासाठी अभिमानाची बाब आहे. आपले व सौ. ताईंचे अभिनंदन!!

– कुंभश्री प्रतिनिधी, उत्तमराव काळे सर, चाळीसगाव

***

निश्चितच हा पुरस्कार आपल्या समाजाला अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे. कारण हा पुरस्कार साधा नाही तर डिजिटल दिवाळी अंकासाठी आहे म्हणूनच त्याचे मोल अनमोल आहे आणि ही क्रांती प्रथमच आपल्या समाजात राजे तुम्ही केलीत. Hats of you.

– प्रतिभाताई ओव्हाळे अध्यक्ष : शिल्पकार बी.आर. खेडकर प्रतिष्ठान, पुणे

***

अभिनंदनसाहेब हा पुरस्कार आपल्या उत्तम कार्याची पावती आहे. मन:पुर्वक अभिनंदन!!

– चंद्रशेखर कापडे, जळगाव जिल्हा अध्यक्ष

***

कुंभश्रीला मिळालेला पुरस्कार कुंभार समाज बांधवासाठी

अभिमानास्पद बाब आहे. मा. संजयजी राजे व सौ. बीना राजे यांचे कोलमकर परिवाराकडून हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा!

– मा. विश्वनाथरावजी कोलमकर (कोअर कमिटी अध्यक्ष अ. म.कुं. स. वि. संस्था महाराष्ट्र राज्य)

***

मा.श्री. संजयजी राजेसाहेब कुंभश्रीला मिळालेला हा पुरस्कार समस्त कुंभार समाजासाठी असून अशीच उत्तरोत्तर कुंभश्रीची खूप प्रगती होवो आपले सर्व मंडळींचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा!

– के.एन. मोरे अ महा. कुं. स. वि. सं., विदर्भ विभाग अध्यक्ष

***

हार्दिक अभिनंदन आणि भविष्यात अजून असे पुरस्कार प्राप्त होत राहोत हीच मनोकामना.

– लेखक रत्नाकर वाणी, खराडी, पुणे

***

कुंभश्रीच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे. अभिनंदन!!

– आदर्श शिक्षक ज्ञानेश्वर कुंभार सर, लोणी काळभोर.

***

सार्थ अभिमान, सार्थ निवड, हार्दिक अभिनंदन!!

– शरद चित्ते सर, मालेगाव

***

अभिनंदन! राजे साहेब व सौ. बीना ताईसाहेबांचे. एक आदर्श संपादक **– उद्योजक दिलीप रसाळ, नाशिक**

***

खूप आनंद झाला आपल्या परिश्रमाचे हे फळ आहे. मन:पुर्वक अभिनंदन!!! –

जेष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ. नागोराव कुंभार, लातूर

***

अभिनंदन श्री. संजय व सौ. बीना राजे आणि समस्त कुंभश्री परिवाराचे. आपले परिश्रम सार्थकी लागले.

– आदर्श शिक्षक सुरेश नांदूरकर, अमरावती

***

साईराम, साईचे आशिर्वाद... उदात्त हेतुने आणि सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून आपण करत असलेल्या निस्वार्थी कार्यास एका प्रतिष्ठीत व नामांकित संस्थेकडून मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल माझ्या व सर्व कुटुंबीयांकडून हार्दिक अभिनंदन!!

परिस्थिती व काळानुरुप केलेले अत्यावश्यक बदल हे यशस्वी होण्याचा मार्ग असतो हे कुंभश्रीच्या डिजिटल दिवाळी अंकावरुन सिद्ध होते. आपल्याकडून असेच कार्य घडत राहो ही आपणा उभयतांना व सर्व सदस्यांना शुभेच्छा! साईराम.

– कमलाकांत कुंभार, पुणे

***

अशीच यशाची शिखरे गाठत रहा. मन:पुर्वक अभिनंदन!!!

– प्रकाश राजकर सर, लोणावळा

***

Congratulations. Go ahed golden days are ahed.

– ॲड. बी.के. राजे (हायकोर्ट), मुंबई

***

This is reward for wholehearted dedication of you & beena vahini.

– उद्योजक जीवन सोमवंशी, पिंपरी

***

मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

– लेखक अशोक कुंभार, शाहूवाडी तालुका अध्यक्ष

***

सन्माननीय राजे साहेब व सौ. बीनाताई आपल्या कुंभश्री डिजिटल दिवाळी अंकास सर्वप्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल दोघांचे व संपूर्ण राजे परिवाराचे खूपखूप अभिनंदन!!

– प्राध्यापक प्रभाकर बाभूळगावकर

***

खूप अभिनंदन साहेब your hard work is recognised.

– डॉ. गोकुळ जोर्वेकर, सात्रळ

***

बीनाताई व संजय राजे यांच्या प्रामाणिक कष्टाचे यश आहे.

– ह.भ.प. अशोक गोरे, थेरगाव, पुणे

***

खूप खूप अभिनंदन मॅडम आणि सर. आपल्या उत्कृष्ट कामाचीच ही पावती आहे. मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन सर.

– हेमंत बोथेगावकर, शिरुर

***

साहेब आपले आणि ताईंचे अथक परिश्रम व ऑफिस स्टाफचे ही नियोजन बद्ध कामाची पद्धत यांना शतश: नमन.

– बापू सोनवणे, पुणे

***

अभिनंदन साहेब आपली अनेक वर्षांची तपस्या फळाला आली.

– धनराज शिरुळे, नांदेड

***

सौ. बीनाताई संजय राजे, संजय राजे साहेब आणि त्यांच्या ऑफिस स्टाफचे आपल्या कुंभश्री डिजिटल दिवाळी अंकाला मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल खूप खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा!

– लेखक प्रा. जयंत रनाळकर, औरंगाबाद

***

श्री. संजयजी राजे साहेब कुंभश्रीला मिळालेला हा पुरस्कार समस्त कुंभार समाजासाठी असून अशीच उत्तरोत्तर कुंभश्रीची खूप प्रगती होवो. आपले सर्व मंडळीचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा!! –

शुभेच्छुक कृष्णा सोनवणे,
नाशिक जिल्हा अध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था व सर्व पदाधिकारी

***

आपण आपल्या तब्येतीची काळजी घ्या. लाखापेक्षा लाखाचा पोशिंदा जसा महत्त्वाचा असतो तसे तुम्ही आम्हाला महत्त्वाचे आहात. त्यामुळे तुम्ही स्वत:च्या तब्येतीची, कुटुंबाच्या तब्येतीची काळजी घ्या. कारण तुम्ही जो ज्ञान यज्ञ मांडलेला आहे. कुंभश्री पूर्ण देशभर पोहोचणारे एकमेव कुंभार समाजाचे मासिक.

तुमची व तुमच्या कुटुंबाच्या तब्येतीची काळजी घ्या. तुम्ही समाजाचे फार मोठे वैचारिक आधारस्तंभ आहात. मार्गदर्शक व प्रेरणास्रोत आहात. आमच्या झालेल्या गैरसोयी पेक्षाही तुमचे महत्त्व आम्हाला (सर्व कुंभार समाज हितचिंतक बांधवांना) निश्चित अधिक आहे.

कुंभश्री डिजीटल अंकास पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन.

– आपला स्नेहांकित प्रल्हाद तावरे, अंबाजोगाई

***

समस्त समाज बांधवाचे/गोरोबा काकांचे आशिर्वाद आपल्या सोबत आहेत. आपणास समाजाची व समाजास आपली गरज आहे. आपल्या हातून आणखी खूप मोठं समाजकार्य होणार आहे. तुमच्या संपूर्ण परिवारास दीर्घायुष्यासाठी काकांच्या चरणी प्रार्थना. तसेच कुंभश्री डिजीटल अंकास पुरस्कार मिळाल्याबद्दल शुभेच्छा!

– सदानंद कुंभार, उमरगा

***

अकोला - कुंभश्री संपादक संजय राजे यांचे स्वागत करताना डावीकडून अकोला जिल्हा कुंभार समाज विकास संस्थेचे अध्यक्ष संतोषराव सरोदे, उद्योजक प्रदीप मांगुळकर आणि उद्योजक आत्माराम नेसनतकर



नांदेड जिल्हा ओबीसी भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल विश्वनाथरावजी कोळमकर साहेब यांचा सत्कार करताना विकास संस्थेचे अकोला जिल्हाध्यक्ष संतोषजी सरोदे समवेत डावीकडून बळवंतराव कुंभार, दत्ताजी कुंभार, रंगनाथ सूर्यवंशी, देवराव कपडे, किसनशेठ काळे, नथुशेठ कुंभार,संतोष पाषाणकर, अशोक कुंभार, नागनाथजी कुंभार, शामसेट राजे व मान्यवर

आम्हांला यांचा अभिमान आहे !!!



सातारा - श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या आजीव सेवक पदी निवड झाल्याबद्दल कराड येथील आदर्श शिक्षक अरुण जगन्नाथ कुंभार, प्राचार्य श्री समर्थ विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस्, चाफळ यांचे अभिनंदन करताना उजवीकडून उपजिल्हाधिकारी मनीषाताई कुंभार, कुंभश्री संपादक संजय राजे, अरुण सर, सौ. वंदना अरुण कुंभार व सौ. सुरेखा कुंभार.



पुणे - मोशी येथे आमचे भाचे स्वप्नील कुंभार यांच्या जोगेश्वरी मिसळ शाखेच्या उदघाटन प्रसंगी त्यांना शुभेच्छा देताना डावीकडून अक्षय कुंभार, बाळकृष्ण कुंभार, सौ रोहिणी कुंभार, कुंभश्री संचालिका सौ बिना राजे, चि वीर राजे, कुंभश्री संपादक संजय राजे, स्वप्नील कुंभार, पार्टनर अमित मोरे, नथुराम कुंभार, इंजि. सुनील कुंभार व सौ बेबीताई कुंभार.



पुणे - रोटरी क्लब कमिटीचा सर्वोत्कृष्ठ कार्य पुरस्कार सलग दुसऱ्या वेळी स्वीकारताना दत्ताशेठ पाषाणकर व सौ अंजलीताई पाषाणकर



ठाणे - पारसिक नगर येथे डॉ राकेश जगन्नाथ सूर्यवंशी यांच्या क्लीनिक मध्ये त्यांना शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत डावीकडून चि. अथर्व राकेश सूर्यवंशी, जगन्नाथराव सूर्यवंशी व भगवानराव सूर्यवंशी



पुणे - चाळीसगाव येथील आदर्श शिक्षक व कुंभार समाजाचे जेष्ठ नेते उत्तमराव काळे सर यांचा सदिच्छा भेट प्रसंगी स्वागत व सत्कार करताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत डावीकडून विवेक खोपे, राजे, काळे सर, सौ लता उत्तमराव काळे व सौ स्नेहल विवेक खोपे



पुणे - श्रीगोंदा,जिल्हा नगर येथील सुप्रसिद्ध बांधकाम उद्योजक बी जे काळे साहेब यांचा मुलगा इंजि.प्रतिक भास्कर काळे, भागीदार इंजि.रोहित भाऊसाहेब दांगडे व इंजि.प्रसाद श्रीपाद कुलकर्णी यांच्या त्रिबंध कन्स्ट्रक्शन व्यवसायाच्या उदघाटन प्रसंगी शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत उजवीकडे बी जी काळे साहेब.





सातारा - डॉ. एम. ए. मुरुडकर (सहकार अधिकारी श्रेणी१,कोल्हापूर) यांनी सहकार कायदे विषयक चार पुस्तके लिहून प्रकाशित केल्याबद्दल तत्कालीन सहकार मंत्री ना. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सहकार आयुक्त अनिल कवडे (IAS), अरुण काकडे (विभागीय सह. निबंधक, कोल्हापूर), मनोहर माळी (जिल्हा उपनिबंधक, सातारा), सोपान शिंदे (जिल्हा उपनिबंधक, रत्नागिरी) आणि प्रकाशकाका पाटील (अध्यक्ष, सातारा जिल्हा पतसंस्था फेडरेशन) हे मान्यवर उपस्थित होते.



तरसोद गावामध्ये संत शिरोमणी, गोरोबाकाका कुंभार, यांच्या मंदिराचे कामाचे भूमिपूजन समाजभूषण धनलाल काका शिरसाट, यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पद्माकर शिरसाट, मल्हार कुंभार, योगेश हिवरकर, विशाल कुंभार, समाधान कुंभार आणि तरसोद गावातील समाज बांधव उपस्थित होते

कुंभार समाज सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय मेळावा संपन्न

मातीकला महामंडळाला सक्षम करण्यासाठी प्रयत्न करू - ना. बाळासाहेब थोरात



मेळाव्याचे उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन आणि प्रतिमापूजन करताना ना. ज्योतिताई ठाकरे, डावीकडून सतीशदादा दरेकर, उमाजी सुर्यवंशी, जोरले, सुरेखाताई जाधव, रमाकांत क्षीरसागर, रसिकाताई खेडकर, अरुणाताई, कांचन राजकर, अमित कुंभार, ज्ञानेश्वर सोमवंशी, वसंतराव घोडनदीकर व मान्यवर



महसुल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करताना प्रदेश अध्यक्ष सतीशदादा दरेकर समवेत डावीकडून अमित कुंभार, मांजरमकर, रमाकांत, माऊली दाभाडे, शरदभाऊ आहेर, ना. थोरात, सतीशदादा, ना. ज्योतिताई ठाकरे, सुरेखा जाधव, सुनंदाताई जोर्वेकर, रसिकाताई खेडकर व मान्यवर



कार्यक्रमात लिज्जत पापड संस्थेचे सर्वेसर्वा सुरेशराव कोते यांना सामाजिक पुरस्काराने सन्मानित करताना महसुल मंत्री ना. बाळासाहेब थोरात समवेत मान्यवर



लोणावळा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुरेखाताई जाधव यांना राजकीय पुरस्काराने सन्मानित करताना महसुल मंत्री ना. बाळासाहेब थोरात



उद्योजक नितीन भागवत यांना यशस्वी उद्योजक पुरस्काराने सन्मानित करताना महसुल मंत्री ना. बाळासाहेब थोरात समवेत मान्यवर



दै. लोकमंथनचे संपादक अशोकराव सोनवणे यांचा सत्कार हस्ते ना. बाळासाहेब थोरात समवेत रमाकांत, माऊली दाभाडे, शरदभाऊ आहेर, पांडुरंगतात्या व मान्यवर



महिला आर्थिक विकास मंडळाच्या प्रदेश अध्यक्षा ज्योतिताई ठाकरे यांचा सत्कार हस्ते सुरेखाताई जाधव, माधुरीताई दरेकर, अरुणाताई कुंभार व महिला भगिनी

दि. १६/१२/२०२१ रोजी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय मेळाव्याचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिप प्रज्वलन लोणावळा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुरेखाताई जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. संत परीक्षक गोरोबाकाका, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले व मेळाव्याचे उद्घाटन संपन्न झाले.

व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात, माजी आमदार विलास लांडे, जिल्हा बँकेचे संचालक माऊली दाभाडे, सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतिश दादा दरेकर, कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, लोणावळा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुरेखाताई जाधव, राष्ट्रीय युवक काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष व नाशिक शहर अध्यक्ष विद्यमान शरदभाऊ आहेर, उद्योजक नितीन भागवत, महिला आर्थिक विकास मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई ठाकरे, राजकीय आघाडी प्रदेशाध्यक्ष पांडुरंग तात्या कुंभार,



सांगली येथे भव्य कुंभार समाज सांस्कृतिक भवनाची निर्मिती केल्याबद्दल सोमनाथ कुंभार यांचा सत्कार



बालमित्र आप्पा जोर्वेकर यांना जवळ घेऊन बालपणीच्या आठवणी सांगताना ना. थोरात



दै. लोकमंथनचे संपादक अशोकराव सोनवणे लिखित ओबीसी फॅक्टर या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न

रविंद्र दरेकर (अधिकारी ओबीसी महामंडळ), महिला प्रदेशाध्यक्ष रसिकताई खेडकर, प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव घोडनदीकर, उमाजी सुर्यवंशी, नाशिक महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. दिलीपराव मेनकर, प्रदेश युवक अध्यक्ष संजयराव जोरले, शरदराव वाडेकर, बहिणाबाई चौधरी जळगाव, विद्यापिठाचे प्र. कुलगुरु डॉ. प्रमोद माहुलीकर, उत्तमराव काळे सर (चाळीसगाव), युवा अध्यक्ष अमित कुंभार,लिज्जत पापडचे सर्वेसर्वा सुरेशराव कोते इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महासंघाचे माजी प्रदेशाध्यक्ष कै. विठ्ठलराव राऊत, कै. पुष्पाताई रुईकर, कै. विष्णू पाषाणकर, कै. गणेश श्रीमंदीकलकर व मागील दोन कोरोना लाटेमध्ये दिवंगत, झालेल्या सर्व ज्ञात अज्ञात समाज बंधू भगिनींना दोन मिनीट स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बारा बलुतेदार हा गावातील एक महत्त्वाचा घटक, पण काळाच्या ओघात खूप बदल होत गेला आणि बलुतेदारीचे महत्त्व कमी झाले. कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या मातीकला महामंडळाला जास्त ताकत देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कुंभार समाजाच्या राज्यस्तरीय मेळाव्यात दिले.

महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाजाचा राज्यस्तरीय मेळावा गुरुवार व शुक्रवारी लोणावळा शहरात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी राज्यभरातून कुंभार समाजाचे प्रतिनिधी उपस्थित राहिलेले होते. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बाळासाहेब थोरात बोलत होते. तत्पूर्वी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतिशदादा दरेकरांनी आपल्या भाषणात शासनाने कुंभार समाजासाठी आवश्यक असणाऱ्या मातीची रॉयल्टी ५०० ब्रास वरुन वाढवून १००० ब्रासपर्यंत माफ करावी, समाजातील भूमीहीन व्यावसायिकांना शासकीय गायरानाच्या जमिनी भाडेपट्ट्याने मिळाव्यात तसेच मातीकला महामंडळासाठी करण्यात येणारी १० कोटींची तरतूद वाढवून ५० कोटी करावी. आदी मागण्या बाळासाहेब थोरात यांच्याकडे केल्या.

यावेळी बोलताना थोरात यांनी कुंभार समाजाने आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे, तरुण पिढीला मातीत गुंतवून ठेवण्यापेक्षा इतर ते क्षेत्रातही कसे पुढे जातील याचाही विचार करावा, असा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या दरम्यान बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते लोणावळा शहराच्या नगराध्यक्षा सुरेखा जाधव यांना राजकीय पुरस्कार, सुरेश कोते यांना सामाजिक पुरस्कार, डॉ.पी.व्ही. कुंभार यांना शैक्षणिक पुरस्कार, उद्योजक नितीन भागवत यांना उद्योग पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास संपूर्ण महाराष्ट्र राज्यामधून संस्थेचे खालील पदाधिकारी उपस्थित होते.

सौ. अरुणाताई कुंभार (पुणे जिल्हा महिला अध्यक्ष), सौ. माधुरीताई दरेकर, सौ. विद्या जगदाळे, सौ. संगिता घोडनदीकर, सौ. साधना सोमवंशी, सौ. अलकाताई खानाजोडे (शेगाव नगर सेविका), सौ. अंजली मांडवकर, सौ. कांचन राजकर, सोमनाथशेठ सोनवणे (नाशिक अध्यक्ष), भालचंद्र सोनावळे (प्रदेश उपाध्यक्ष, पालघर), सुरेशराव बहाळकर (धुळे अध्यक्ष), डॉ. नंदकुमार माळशिरसकर (पुणे), विठ्ठलराव चव्हाण (पुणे), मिलींद इवलेकर (रत्नागिरी), रमेश साळवी (मुंबई), मोहनराव कुंभार (अध्यक्ष नवी मुंबई), अर्जुन दळे (बीड जिल्हाध्यक्ष), ज्ञानेश्वर सोमवंशी (पुणे जिल्हा अध्यक्ष), हेमंत खटावकर (पुणे जिल्हा कार्याध्यक्ष), अमित कुंभार (पुणे जिल्हा युवक अध्यक्ष), गंगाधर चिकणे (प्रदेश उपाध्यक्ष नागपूर), यशवंत शेंदूलकर (सिंधुदूर्ग), प्रदेश सरचिटणीस अजयराव विरकर (पुणे), उत्तमराव मांजरमकर (नांदेड), इंजि. बबनराव जगदाळे (नंदूरबार), रविंद्र रसाळ (ठाणे), चंदन प्रजापती (नागपूर), मदन प्रजापती (नाशिक), अनंत कुंभार (कोषाध्यक्ष पुणे), जगदीश मोरे (सोशल मिडीया अध्यक्ष), संदीप पाटील (युवा कार्याध्यक्ष), संतोष रसाळकर (विभागीय अध्यक्ष), विजय विश्वासराव (कार्यालयीन सचिव), प्रकाश कुंभार फुलगांवकर (धनकवडी), बाळासाहेब शिवलीकर, संजयराव उकिर्डे (आदर्श शिक्षक), प्रकाशराव भालेराव, लक्ष्मण कुंभार (नेरे), सुनिल कुंभार (भोर), विलास गुडेकर (कोकण विभाग कार्याध्यक्ष, हृदयेश चव्हाण (नंदूरबार अध्यक्ष), अशोक सोनवणे (सटाणा अध्यक्ष), आनंदा साळवी (मंत्रालय), सौ. प्रिया झोरे, नंदकुमार वाघ, सौ. सुनंदाताई जोर्वेकर (संगमनेर तालुका पंचायत समिती सभापती), सौ. वैशालीताई गुडेकर, सौ. सुवर्णा जाधव (नाशिक), शामशेठ जोंधळे, वसंतशेठ भागवत, बाळासाहेब सोनवणे, शरद भागवत सर्व सायखेडा नाशिक, रामदास भालेराव, वसंतराव गाडेकर, आप्पासाहेब जोर्वेकर, प्रा. तुळशीराम मोरे, पुंडलिक सोनवणे, प्रा. शांतीलाल काळे, सुभाष जाधव, अरविंद क्षिरसागर, सुरेखा सोनवणे, बापू गोरे, शामराव चव्हाण, मीरा क्षीरसागर, रामभाऊ भागवत सर्व नाशिक. प्रसिद्धी माध्यमाचे प्रतिनिधी गोकुळ सोनवणे (लोकमत नाशिक), कुंभश्री मासिकाचे संपादक संजय राजे, कुंभश्री कार्यकारी संपादक विलास जाधव, कुंभश्री प्रतिनिधी आनंदराव कुंभार, शशिकांत कुंभार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन आदर्श शिक्षक मच्छींद्र जगदाळे आणि उत्तमराव मांजरमकर यांनी छान केले.

***

S. S. MAHASHIKARE

Engineers & Quantity Surveyors



We accept Estimation, Billing & Tendering Work

Address : B-2/703, Mantra Majestica Sasaneagar, Hadapsar, Pune 411 028.
E-mail : shriram_mahashikare@yahoo.co.in
shriram_mahashikare@rediffmail.com
Ph. : 020 - 30474658
Mobile : 9421056402, 7276865164.



गणेश आर्टस्

आमचेकडे सर्वांग सुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील

श्रीराम मंगल कार्यालय

मु.पो. काशीळ, पुणे-बेंगलोर हायवे, ता. जि. सातारा.



जयवंत रामचंद्र कुंभार
संचालक
मो. ९८२२०५६३२४
अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना सातारा



वसंत रामचंद्र कुंभार
मा. पंचायत समिती सदस्य सातारा
मो. ९८५०४१८२२५

Our Inspriation



Rajiv Hiwarkar
Mob.: 9881604647



Sou. Sunita Hiwarkar
Mob.: 9623579804



Pratik Hiwarkar
Partner
Mob.: 8888888260

Twin Tower
1 & 2 BHK Flats
Available



Twin Tower, S. No. 120(P),118(P), Bhumkar Chowk,Behind My Car,
Wakad, Pune - 411 057.(Maharashtra)Tel. : +91 20 32677751 Email: royalunicorn1@gmail.com

प्रेरणास्थान



कै. केदु शिवराम जोंधळे



श्रीमती सिंधुताई केदु जोंधळे



नंदकुमार केदू जोंधळे
माजी सरपंच शिरुर
अ.म.कुं.स. विकास संस्था
चांदवड तालुका उपाध्यक्ष
Mob. 9850482275 / 7588557011

जोंधळे वीट सप्लायर्स

आमच्याकडे 9 X 4 व 6 X 4 बांधकामासाठी लागणारी फुलसाईज विट मिळेल.



संजय केदू जोंधळे
Mob. 9096936741



प्रकाश केदू जोंधळे
Mob. 7588557010

मु. शिरुर (तांगडी फाटा),
पो. आडगाव टप्पा,
ता. चांदवड, जि. नाशिक
४२३ १०१.

नांदेड जिल्हा अध्यक्षांचा आदर्श जिल्हा अध्यक्ष म्हणून कुंभश्री तर्फे विशेष सन्मान



आदर्श जिल्हाध्यक्ष विजयराव देवडे यांचा सत्कार हस्ते संजय राजे



जेष्ठ नेते विश्वनाथ कोळमकर यांचा सत्कार हस्ते संजय राजे



सुरेशराव कुंभार यांचा सत्कार हस्ते शिवाजी पांगरेकर





राष्ट्रीय इंडिया का चॅम्पीयनशिप सुवर्ण पदक विजेते शिवम बारुळकर व शहाजी कापिसकर या खेळाडूंचा सत्कार हस्ते संजय राजे

नांदेड : आदर्श जिल्हा अध्यक्ष म्हणून स्वाभिमानी कुंभार समाज, नांदेडचे जिल्हा अध्यक्ष विजयराव देवडे यांचा कुंभश्रीतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे सचिव शिवाजीराव पांगरेकर, युवा अध्यक्ष बालाजी घुमलवाड व उपस्थित इतर सर्व पदाधिकारी यांचे शाल, श्रीफळ व हार घालून कुंभश्रीतर्फे कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना कुंभश्री संपादक संजय राजे म्हणाले की, संस्था गुणी विद्यार्थी, खेळाडू यांना प्रेरणा देण्यासाठी गुणगौरव कार्यक्रम घेते. गोरोबाकाका पुण्यतिथी, जयंती, धरणे, आंदोलन इ. कार्यक्रम हिरीरीने भाग घेते. संपूर्ण नांदेड जिल्ह्याची जनगणना पूर्ण करून एक मोठी पुस्तिका प्रकाशित केली असून यामध्ये सुमारे दीड लाख समाज बंधू, भगिनी, मुले–मुली यांची नोंद घेण्याचे महान कार्य नांदेड जिल्ह्याने केले ही मोठी अभिनंदनीय बाब आहे. या पुस्तिकेचा खर्च जाहिराती मिळवून केलाय. समाजबांधवांनी उस्फुर्त प्रतिसाद दिल्याने खूप जाहिराती पदाधिकाऱ्यांनी मिळवल्या. त्यामुळे मोठी रक्कम शिल्लक राहिली या पैशातून गोरोबाकाका मंदिर व वसतिगृहासाठी प्लॉट घेतला आहे. स्थानिक आमदार खासदार यांच्याकडून सुमारे तीस लाख रुपयांचा निधी विजयराव देवडे यांच्या नेतृत्वाखाली मिळवला असून काम प्रगती पथावर आहे. वसतिगृह व मंदिर उभारणीसाठी सुमारे दीड कोटी रुपयांची गरज आहे ते उभारण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व समाज बांधवानी यथा शक्ती आर्थिक मदत करावी असे आवाहन संजय राजे यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला गोरोबा काकांच्या मूर्तीचे पूजन करून झाली. अध्यक्षस्थानी संजय राजे यांची निवड करण्यात आली. तद्नंतर राष्ट्रीय इंडिया का चॅम्पियनशिप २०२२ दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवलेल्या आणि भारतीय संघात निवड होऊन जर्मनीत होणाऱ्या



सत्कारीत सर्व पदाधिकाऱ्यांसमवेत संजय राजे, विश्वनाथ कोळमकर व विजयराव देवडे

आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या चि. शहाजी भागवतराव कापसिकर व चि. शिवम संतोषराव बारुळकर यांचा संस्थेच्या वतीने संजय राजे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार, प्रशस्तीपत्रक व जनगणनेचे पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले. संस्था अध्यक्ष विजयराव देवडे यांनी प्रास्ताविक केले व संस्थेच्या कार्याची माहिती दिली. संस्थेचे मार्गदर्शक जेष्ठ नेते विश्वनाथ कोळमकर यांनी कुंभश्री संपादक संजय राजे यांच्या कार्याची माहिती देऊन कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव शिवाजीराव पांगरेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन बालाजी घुमलवाड यांनी केले. यावेळी स्वाभिमानी संघटनेचे वतीने मार्गदर्शक जेष्ठ नेते विश्वनाथ कोळमकर, संजय राजे व सुरेशराव कुंभार रोपळेकर यांचा सन्मान करण्यात आला. नांदेड जिल्हा अध्यक्ष व त्यांना समर्थ साथ देणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बंधू भगिनी यांचे मनःपूर्वक अभिनंदन व भावी योजनांसाठी हृदयपूर्वक शुभेच्छा! या कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित होते. प्रा. बालाजीराव आवडे, रमेशराव देगावकर, लक्ष्मणराव शिरोळे सर, विजय कुमार वादे सर, संतोषराव बारुळकर सर, माधवराव कानगुले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सांगली येथे भव्य कुंभार सांस्कृतिक भवनचे लोकार्पण संपन्न

कुंभार समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील : आ. सुमनताई पाटील



सांस्कृतिक भवनाचे विलोभनीय बाह्य स्वरुप



सांस्कृतिक भवनाचे आकर्षक अंतस्वरुप



उद्घाटन प्रसंगी उपस्थित यावेळी उपस्थित दत्तात्रय कुंभार, सोमनाथ कुंभार, राजेंद्र (आण्णा) कुंभार, किरणकुमार कुंभार, डॉ. उत्तम कुंभार, लक्ष्मण कुंभार, भरत कुंभार व मान्यवर

सांगली : अल्पसंख्याक असलेल्या समाजाने एकत्र येऊन अशी भव्यदिव्य इमारत उभारुन आदर्श निर्माण केला आहे. ही नूतन वास्तू म्हणजे समाज एकसंघ असल्याचे प्रतीक आहे, कुंभार समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासकीय दरबारी मी सतत प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन आमदार सुमनताई पाटील यांनी केले.

अंकली (ता. मिरज) येथे श्री लिंगायत कुंभार समाज सेवाभावी संस्थेच्यावतीने उभारलेल्या सांस्कृतिक भवनाच्या लोकार्पण प्रसंगी आमदार पाटील बोलत होत्या. कुंभार समाजातील मान्यवरांच्याहस्ते भवनाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित वधू-वर पालक परिचय मेळाव्यात समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. दत्तात्रय कुंभार यांनी स्वागत केले. सोमनाथ कुंभार यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी नगरसेवक राजेंद्र कुंभार, दीपक शिंदे, बसवराज कुंभार, कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतीश दरेकर, डॉ. उत्तम कुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष किरणकुमार कुंभार, लक्ष्मण कुंभार, भरत कुंभार, नितीन कुंभार, किशोर कुंभार, संतोष कुंभार यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक भवनाच्या निर्मितीसाठी संस्थापक अध्यक्ष राजेंद्र (आण्णा) कुंभार, विद्यमान अध्यक्ष किरणकुमार कुंभार, कार्याध्यक्ष सोमनाथ कुंभार, उपाध्यक्ष लक्ष्मण कुंभार, सचिव दत्तात्रय कुंभार, खजिनदार भरत कुंभार, उमेश कुंभार, डॉ. उत्तम कुंभार, विठ्ठल हिंगमिरे, बाळू कुंभार, विरुपाक्ष कुंभार, अनिल कुंभार व संस्थेच्या सर्व सभासदांनी अथक परिश्रम घेतले सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!

***

चि. इंजि. कल्पेश रमणलाल प्रजापती
UPSC मेन परिक्षेत उत्तीर्ण



नंदुरबार : सेवानिवृत्त डेप्युटी इंजि. रमनलाल सुकलाल प्रजापती ह्यांचे चिरंजीव इंजि. कल्पेश ह्याने होळी सणाच्या संध्येला घोषित झालेल्या यूपीएससी च्या मुख्य परिक्षेच्या उत्तीर्ण होऊन मोठे यश संपादन केले आहे. बांधकाम इंजि. म्हणून शिक्षण घेऊन इंजि. कल्पेशने प्लान एस्टीमेटची कामे करीत व नियोजन पूर्वक अभ्यास करीत अत्यंत मेहनतीने यश प्राप्त केले आहे. ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार ह्या सातपुड्याच्या पायथ्याशी व सुर्यकन्या तापीच्या काठावरील खापर ह्या सुशिक्षीत गावातून इंजि. कल्पेश सह पंधरा-सोळा कुंभार युवक-युवती इंजि. देश विदेशात नाव कमवीत आहेत.

इंजि. कल्पेशच्या यशामुळे संपूर्ण तापीकाठ पट्ट्यात होळी सणासह आनंदी व्यक्त करण्यात येत आहे. इंजि. कल्पेश ह्यास आगामी सप्टेंबर २०२२ मध्ये होणाऱ्या तोंडी मुलाखती परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळो म्हणून संत शिरोमणी श्री गोरोबाकाका चरणी प्रार्थना व कुंभश्री मित्र परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

***

अभिनेते सयाची शिंदेंचे कोल्हापूरच्या मातीशी नाते

खुपिरेतील आनंदा कुंभार या बांधवाला दिले 'वृक्षप्रसाद' संकल्पनेच्या मातीच्या कलशाचे काम

– प्रा. एस.पी. चौगले

महाराष्ट्राच्या मातीशी नाते जपणारे सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी त्यांच्या संकल्पनेतून साकारणाऱ्या 'वृक्षप्रसाद' या वृक्षारोपण चळवळीसाठी आवश्यक मातीचे कलश तयार करण्याचे काम खुपिरे (ता. करवीर) येथील आनंदा पांडुरंग कुंभार यांना देऊन त्यांचे मातीशी घट्ट नाते असल्याची प्रचिती दिली. अभिनेते शिंदे यांनी स्वत: कुंभाराच्या चाकावर कलश तयार करुन आपण एक मातीशी नाते जपणारा कलाकार असल्याचेही दाखवून दिले. या अभिनेत्याच्या साध्या वागण्यामुळे कुंभार कुटुंबीय भारावून गेले. महाराष्ट्रात वृक्षारोपण करण्यासाठी देवराईची संकल्पना राबवणारे सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी 'वृक्षप्रसाद' ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

दिवाळी पाडव्यापासून या संकल्पनेचा प्रारंभ होणार आहे. अंबाबाई देवीसह राज्यातील इतर देवस्थानांमध्ये अभिषेकासाठी येणाऱ्या भाविकांना वृक्षा असलेला मंगल कलश देण्यात येणार आहे. या वृक्षाचे रोपण करुन देव देवतांच्या आठवणी जाग्या करण्यासह पर्यावरण संतुलनाचा आणि रक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. कोल्हापुरातून या पायलट प्रकल्पाची सुरुवात होत आहे. त्यानंतर सिद्धिविनायक मुंबई, दगडूशेठ पुणे, तुळजाभवानी तुळजापूर, गजानन महाराज शेगाव, शिर्डी साईबाबा अशा ७७ मंदिरामधून ही संकल्पना राबविणार आहे. या वृक्षप्रसादाच्या संकल्पनेसाठी मातीच्या कलशाची गरज होती. अभिनेते सयाजी शिंदे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात माहिती घेण्यास सुरुवात केली आणि अरविंद शिर्के (वाठार), सुहास घायंगणकर, शैलेश बांदेकर (कोल्हापूर) यांनी ते खुपिरे (ता. करवीर) येथील कुंभार



खुपिरे : येथील आनंद कुंभार यांच्या घरी भेटीप्रसंगी अभिनेते सायजी शिंदे, सोबत देवस्थान समितीचे सचिव शिवराज नायकवडे, सुहास बायंगणकर, अरविंद शिर्के, शैलेश बांदेकर, सोबत सयाजी शिंदे चाकावर मंगल कलश करताना.

बांधवांकडे मिळत असल्याचे सांगितले. अभिनेते शिंदे यांनी सपत्नीक खुपिरे येथील आनंदा कुंभार या बांधवाच्या घरी दोन दिवस भेट देऊन अपेक्षित आकाराचे कलश तयार करुन घेण्याची संकल्पना मांडली. आनंदा कुंभार यांनी त्वरित या संकल्पनेला प्रतिसाद दिला. प्रतिमहिना ३००० कलश तयार करुन देण्यात येणार आहेत. आपल्याच मातीतील कुंभार समाजाला हातभार लावावा आणि पर्यावरण पूरक मातीच्या मडक्याचा वापर करावा या दुहेरी उद्देशाने सयाजी शिंदे यांनी या कुंभार बांधवांना हे काम दिले. तसेच स्वत: कुंभाराच्या चाकावर कलश तयार करुन पाहिला. यावेळी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नायकवडे, सुहास वायंगणकर, शैलेश बांदेकर, अरविंद शिर्के उपस्थित होते.

***

अभिनय कुंभार यांना नागभूमीभूषण पुरस्कार



श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते नागभूमीभूषण पुरस्कार स्विकारताना अभिनय कुंभार व मान्यवर

पुणे : शहरातील प्राप्तीकर आयुक्त अभिनय कुंभार यांना सांगली जिल्ह्यातील बत्तीसशिराळा येथील वसंतराव नाईक प्रतिष्ठानतर्फे 'नागभूमी भूषण' पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. सांगली जिल्ह्यातून व पंचक्रोशीतून बाहेर जाऊन वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वेगवेगळ्या क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या तरुण नेतृत्त्वांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. कुंभार हे बत्तीसशिराळा या गावातून शिक्षण घेऊन गेली २२ वर्षे भारतीय महसूल सेवेत (आयआरएस) आहेत. राज्यातील विविध ट्रस्ट, स्वयंसेवी संस्था, निमशासकीय संस्था यांच्यावर प्राप्तिकराच्या अनुषंगाने देखरेख ठेवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. तसेच शैक्षणिक आणि सामाजिक स्वरूपाच्या कामांमध्ये योगदान देण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो.



श्री. शशांक जयवंत कुंभार
(बी. फार्म)
मो. : **9011010741**

शशांक मेडिकल

वैभव टॉकिज समोर, भोसले कॉम्प्लेक्स, हडपसर, पुणे ४११ ०२८
फोन : ०२० - २६८२१००४



सौ. सुरेखा जयवंत कुंभार
मो. : **8380070379**

कुंभार समाज मुंबईचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ व वधुवर मेळावा संपन्न.



सुजित कुंभार यांचा सत्कार संपन्न

'कुंभार समाज मुंबई' ही ५८ वर्षे जुनी कुंभार समाजाची मुंबईतील अग्रणी संस्था आहे. करोना कालावधीच्या खंडानंतर यंदा रविवार, दि. १६ आक्टोंबर २०२२ रोजी झालेला संस्थेचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ व वधुवर विवाह मेळावा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष विष्णू मळेवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाच्या वातावरणात भरगच्च उपस्थितीत पार पडला. सचिव प्रकाश गुणदेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

समाजातील तीन वैद्यकीय डॉक्टर्सचा झालेला सत्कार हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणता येईल. डॉ. श्वेता अशोक चिंदरकर MD (General Medicine), डॉ. स्वप्निल नागेश झोरे MBBS, डॉ. शार्दूल विजय कमळे MBBS यांचा वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी मिळवलेल्या पदवी/पदव्युत्तर पदवीबद्दल सत्कार करण्यात आला. अशाच प्रकारे परदेशात जाऊन उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेबद्दल तीन विद्यार्थीनींचा नामोल्लेख करुन विशेष गौरव करण्यात आला. कु.सिध्दी नरेश पावसकर हिने अमेरिकेतील कॅलीफोर्निआत फिजीकल थिरपीत डाक्टरेट करताना आठशेपैकी आठशे गुण मिळवून नानअमेरिकन विद्यार्थ्यांत सार्वकालिक उच्चांक प्रस्थापित केला आहे. तिचे वडील, स्टेट बँक आफ इंडिया मुंबई मेन ब्रँचचे मनेजर नरेश पावसकर यांनी सिध्दीने यासाठी केलेली नियोजन बध्द तयारी कथन केली. कु.वृषाली संजय गिरकर हिनेदेखील अमेरिकेत जाऊन कॉम्प्युटर सायन्समध्ये मास्टर्स केले त्याबद्दल तिचाही नामोल्लेख करुन गौरव करण्यात आला. अशाच प्रकारे यूँकेमध्ये मनेजमेंटमध्ये मास्टर्सबद्दल कु.सृष्टी तुळशीदास साळवी हिचा नामोल्लेख करुन गौरव करण्यात आला.

शुभम अनंत साळवी MSc, वेदिका चंद्रकांत वाडकर MSc Pharma Medicine, आकाश अंकुश अतिमकर बारावी ९८.१७%, प्रेरणा सचिन खेडकर दहावी ९५.२०%, अनन्या नितीन साळवी दहावी ९३%, निशिकांत अनिल साळवी दहावी ९०.८०%, राजेश साळवी दहावी ९०% हे विशेष उल्लेखनीय सत्कारमुर्ती होते.

निवृत्त शासकीय अधिकारी तसेच कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशच्या शासकीय योजना व स्पर्धापरीक्षा आघाडीचे राज्यस्तरीय प्रमुख शरद वाडेकर यांनी सांगितले की एप्रिल/मे २०२४ मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका तर त्यानंतर पाच महिन्यात महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका अपेक्षित आहेत. आपल्या देशात आणि राज्यात युवकांची संख्या जगात सर्वाधिक आहे. साधारणपणे जगातील दर पाच युवकांमधील एक युवक भारतात आहे. युवकांमधील बेरोजगारी हा आजच्या घडीचा ज्वलंत प्रश्न आहे. त्यामुळे येत्या सव्वा ते दीड वर्षात केंद्र सरकार आणि राज्य सरकारमार्फत शासकीय निमशासकीय कार्यालयांतील रिक्त पदे भरण्यासाठी मेगाभरती मोहीमा राबविल्या जातील असे स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे आपल्या युवावर्गाने दोनचार पदांसाठी तरी अर्ज करावेत. परीक्षेचा अभ्यासक्रम जाणून घेऊन त्या अनुषंगाने मार्गदर्शनपर पुस्तके आणि पूर्वीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका अभ्यासुन आत्मनिर्भर पध्दतीने अभ्यास करावा. संस्थेने यासाठी काही उपक्रम राबवायचे ठरविल्यास आपले पूर्ण सहकार्य मिळेल असेही त्यांनी सांगितले.

ओबीसी महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, ठाणे जिल्हा रविंद्र दरेकर यांनी सांगितले की निवडणूकपूर्व कालावधीत युवा वर्गाला स्वयंरोजगारासाठी सहाय्य करण्याचे केंद्र व राज्य सरकारचे जास्तीत जास्त प्रयत्न राहणार आहेत. ओबीसी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या अनेक योजनांसाठी अर्थसहाय्य केले जाते. महामंडळाच्या www.msobcfdc.org या वेबसाईटवर त्यांची माहिती असुन ऑनलाईन अर्ज करणेची सुविधा आहे. याशिवाय अलीकडे महामंडळाने शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणली असुन देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी दहा लाख रुपयेपर्यंतच्या कर्जावर तर परदेशी उच्च शिक्षणासाठी वीस लाख रुपयेपर्यंतच्या कर्जावर व्याज परतावा या योजनेअंतर्गत दिला जातो असे सांगितले. सिडकोचे सहाय्यक संचालक सुजित कुंभार यांनी सांगितले की, मुंबईत स्वतःचे घर असणे फार खर्चिक झाले आहे. मात्र सिडकोमार्फत किफायतशीर भावात एक लाख घरे नवी मुंबई, नवी पनवेल, उरण, नैना भागात बांधण्याचे नियोजन असुन लॉटरी प्रणालीद्वारे ती दिली जातील. हा भाग नियोजनबध्द पध्दतीने सिडको विकसित करीत आहे. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक अंतर्गत शिवडी न्हावाशेवा लिंकरोडचे काम चालू असुन ते पूर्ण झाल्यावर पनवेलमधुन मुंबईत खुप कमी वेळात येता येईल. त्यामुळे सिडकोच्या घरांच्या जाहिरातीसाठी अर्ज करणेचा समाजबांधवांनी विचार करावा.

संस्थेचे माजी अध्यक्ष स.भा.चिंदरकर यांनी संस्थेने आजवर केलेल्या कार्याची माहिती दिली. विद्यमान अध्यक्ष विष्णू मळेवाडकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र वाटेगावकर, रमेश साळवी, दिनेश चिंदरकर आणि प्रकाश कुंभार यांनी केले. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी संगीत विशारद प्रदिप हरमळकर यांचे गायन तसेच गिर्ये कुंभारवाडी, ता.देवगड, जिल्हा सिंधुदूर्गच्या हौशी कलाकारांनी सादर केलेले पारंपारिक सांस्कृतिक लोकनृत्य ही कार्यक्रमाची खास आकर्षणे होती. वधुवर मेळाव्याला देखील भरघोस प्रतिसाद लाभला असुन उपवर वधुवरांचे अर्ज संस्थेच्या ३, सहकार दर्शन, नानाभाई परळकर मार्ग, परळगाव, परळ, मुंबई ४०००१२ येथील कार्यालयात सायं. ४ ते ७ वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध असुन याबाबत रमेश साळवी (9869918604, 8369760032), अनिल चिपळूणकर (7738097237, 9869137995), विजय गिरकर (9869347283) यांचेशी संपर्क साधणेबाबत कळविणेत आले आहे.

***

कृष्णराव राजे कॉलेज ऑफ सायन्स, चिकुर्डेचे उद्घाटन संपन्न

कै. कृष्णराव यांनी दिली होती २५ लाखांची देणगी

चिकुर्डे : अहिल्याबाई होळकर बहूउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, चिकुर्डेच्या ''कृष्णराव राजे कॉलेज ऑफ सायन्स''चे उद्घाटन मा. आमदार मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते नुकतेच झाले. आनंद गुरुकुल सैनिकी शाळा मा. मालगुंडे सरांनी २०१४ मध्ये स्थापना केली सदर शाळेकरीता आवश्यक ती जागा कै. कृष्णराव राजे यांनी देणगी स्वरूपात कुठलाही मोबदला न घेता दिली.



नवीन नाव दिलेली संस्थेची इमारत



उद्घाटन प्रसंगी मान्यवर

मालगुंडे सर व त्यांचे सहकारी यांच्या अथक प्रयत्नामुळे या शाळेतील मुले राज्य पातळीवर कौतुकास्पद कामगिरी करीत आहे. सदर शाळेमुळे स्थानिक तसेच आजूबाजूच्या गावातील मुलांची सोय झाली. मालगुंडे सर यांनी आजुबाजूच्या गावाचा आढावा घेत तेथील मुलांची गरज ओळखून कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करण्याचे ठरविले.

सदर महाविद्यालयाकरीता मा. देशमुख साहेबांनी अगदी अल्प किमतीत जागा दिली परंतु पुढील वाटचाल हा मोठा प्रश्न होता परंतु कै. कृष्णराव राजे यांनी २५ लाख रुपयांची देणगी दिली. या दोघांच्या मदतीतून व सरांच्या प्रामाणिक प्रयत्नातून अल्पवधीत कृष्णराव राजे कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना झाली. या निमित्ताने झालेल्या दिमाखदार समारंभात आमदार नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, ग्रामीण भागातील शैक्षणिक उणीव आता भरुन निघेल यात शंका नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण आनंदाने घेतील व आपल्या गावाचे नाव महाराष्ट्रात पुढे आणतील, अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांनी आपल्या भाषणामध्ये कृष्णराव राजे यांचे व त्यांच्या परिवाराचे आनंद गुरुकुल व महाविद्यालय उभारण्यासाठी भरीव योगदान दिल्याबद्दल राजे परिवाराचे आभार मानले.

यावेळी राजारामबापू पाटील दूध संघाचे अध्यक्ष मा. नेताजीराव पाटील व संचालक दिलीपराव खांबे, वारणा कारखाना संचालक मा. श्रीनिवास डोईजड व माजी संचालक रावसाहेब भोसले, राजारामबापू पाटील बँकेचे संचालक मा. संजय पाटील, पंचायत समिती सदस्य सुप्रिया भोसले, कृष्णराज राजे यांचे चिरंजीव मा. ॲड. अभय राजे, शार्दूल राजे, सुकन्या सौ. शरयू मंगळकर, उपसरपंच उत्तम पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश कांबळे व मीनाताई मलगुंडे, संस्थापक पोपट मलगुंडे, ऐतवडे खुर्द उपसरपंच संभाजी पाटील, अशोक सरनाईक, सुरेंद्र पाटील, माजी सरपंच चाँदसो तांबोळी, मुख्याध्यापक विठ्ठल मलगुंडे, सौ. मालन गावडे, रघुनाथ गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. मानवी



कै. कृष्णराव राजेंच्या प्रतिमेचे पूजन व्यासपिठावरील मान्यवरांच्या हस्ते संपन्न



ॲड. अभय राजे यांच्या हस्ते गुणीजनांचा सत्कार

जीवनात शिव, शिक्षण आणि शास्त्र यांचे महत्त्व वादातील आहे, हे राजे यांचे मत आज साकार होत आहे, याचा आनंद सर्वांनाच सर्वाधिक होईल असे प्रतिपादन यावेळी ॲड. अभय राजे यांनी यावेळी केले. कै. कृष्णराव राजे यांचे चिकुर्डे हे जन्मस्थळ असून त्यांचे बालपण येथे व्यतीत झाले होते. या गावाविषयी त्यांना निरतिशय प्रेम वाटत असे. त्यांनी आनंद गुरुकुलची स्थापना आपल्या ह्यातीतच येथे केली होती, याचे स्मरण यावेळी उपस्थितांना झाले. मा. आमदार मानसिंगराव नाईक यांनी राजे परिवाराचे, आनंद गुरुकुल या संस्थेचे मनापासून अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

***

कृष्णकांत राजे यांचे शैक्षणिक जीवन

– प्रा.जवाहर मुथा, अहमदनगर



भिजलेल्या डोळ्यांना हसवणारी, तर कधी हसून रडवणारी... पावसात मातीचा सुगंध, आणि उन्हात सावलीची साथ देणारी... आज पुन्हा एकदा... घरातून निघालो तेव्हा माघे वळून बघितलं... हसरा चेहरा तो त्यांचा, मला परत बोलावू लागला... कृष्णकांत राजे.

माझे परममित्र. त्यांच्या अनंत आठवणी एखाद्या भ्रमराप्रमाणे मनात गुंजारव करतात. नाटकाच्या सरावासाठी मेहनत करून महाविद्यालयासाठी मिळविलेले पारितोषिक. तास बुडवून कट्ट्यावर रंगविलेल्या गप्पा. शिक्षकांच्या कान उघडणीचा पुढील आयुष्यात झालेला उपयोग. मित्रांबरोबर केलेली धमाल–मस्ती. महाविद्यालयात जनरल सेक्रेटरी म्हणून लढवलेली निवडणूक व निवडून आल्यावर केलेले सांस्कृतिक कार्य. हे सर्व कृष्णकांत राजेंना नेहमी आठवत असे आणि आमच्या गप्पांना वेळेचा सुमार नसे. 'तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, त्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने महाविद्यालय काम करीत असते. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्याने त्यांची प्रगती होत असते. शिक्षणाला बाजारूपण नको, तर प्रतिष्ठा हवी', असे त्यांना नेहमी वाटत असे. त्यांच्या बरोबर ४०/४५ वर्षांच्या सहवासात महाविद्यालयीन जीवनातील गप्पा निघाल्या की खूप गंमत यावयाची. कृष्णकांत राजे हे मूळचे सांगली जिल्ह्यातील चिकुर्डे या गावाचे. आपल्या गावाचा रास्त अभिमान व प्रेम त्यांना नेहमीच असे. त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण इस्लामपूर विद्यालयात केले. त्या विद्यालयातली एक आठवण त्यांनी एकदा मला सांगितली होती. ते जेव्हा पाचवी मध्ये शिकत होते तेव्हा दरवर्षीप्रमाणे हिवाळ्यामध्ये विविध खेळांचे मेळावे शाळेमध्ये भरवले जायचे. त्यामध्ये १००० मीटर धावण्याची शर्यत ही आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये त्यांनी भाग घेतला होता. सर्वात पुढे असूनही ते शर्यत हरले होते. कारण तो राउंड पाचशे मीटरचा होता. पण त्यातून त्यांना आष्युभरासाठी एक शिकवण मिळाली की कोणतीही गोष्ट हाताळताना त्याची सखोल माहिती घेणे महत्त्वाचे आहे. ही शिकवण त्यांना पुढे अतिशय उपयोगी पडली. नंतर स्वकर्तृत्वाने त्यांनी इंजीनियरिंग पर्यंतचे शिक्षण सांगलीच्या वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधून पूर्ण केले. हे शिक्षण पूर्ण करीत असताना विद्यार्थी चळवळींमध्ये ते सामील झाले. त्यांनी विद्यार्थ्यांचे व युवकांचे नेतृत्व केले. वाद विवाद स्पर्धा व नाट्याभिनय यामध्ये त्यांना विशेष रस होता. या दोन्ही क्षेत्रात ते महाविद्यालयीन जीवनात तळपले. महाराष्ट्रातील अनेक वादविवाद स्पर्धेत, नाट्यस्पर्धेत त्यांनी सहभाग घेतला व अनेक पुरस्कार व पारितोषिकेही मिळविली. त्याच बरोबर साहित्यक्षेत्रातील व वैचारिक क्षेत्रातील अनेक विचारवंतांशी त्यांचा जवळचा संबंध आला. आपल्या महाविद्यालयात बाबासाहेब पुरंदरे, प्राचार्य शिवाजीराव भोसले, शांता शेळके, द. मा. मिरासदार, कृ.ब. निकुंब, वि.स. खांडेकर यांना त्यांनी आमंत्रित केले होते. जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा विशेष स्नेह जुळून आला व त्यांनी साहित्य क्षेत्रातही रुची घेतली. त्याकाळात मराठी चित्रपट सृष्टिचा विशेष बोलबाला होता. थोरातांची कमळा, तांबडी माती, साधी माणसं, मराठा तितुका मेळवावा, छत्रपती शिवाजी', मोहित्यांची मंजुळा, स्वराज्याचा शिलेदार, महाराणी येसुबाई या भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांचे एक विशेष गारूड त्यांच्यावर व त्यांच्यासारख्या युवकांवर होते.

दादा कोंडके, चंद्रकांत, सूर्यकांत, सुलोचना, उषाकिरण, जयश्री गडकर या सर्व कलाकारांशी कृष्णकांतांचा परिचय या ना त्या प्रकारे येत राहिला. पद्मिनी कोल्हापूरेंचा तर सत्कार त्यांच्या हस्ते झाला होता. कोल्हापूर हे सांगली जवळच असल्याने अनेकदा कृष्णकांत भालजी पेंढारकरांच्या स्टुडिओत जावयाचे व त्यांच्याशी बोलत असत. त्याग, निष्ठा, औदार्य, संयमी वृत्ती, खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली तरुण पिढी तयार व्हावी यासाठी भालजीनी चित्रपटांची निर्मिती केली, असे ते म्हणत असत.

महाविद्यालयीन विद्यार्थीदशा संपत असतानाच व एमएसईबीच्या सेवा प्रारंभी कृष्णकांतानी या ओळखींचा निश्चितच चांगला उपयोग करून घेतला. मराठी चित्रपट महामंडळाचे ते सदस्य होऊन कार्य करू लागले होते. 'शिवकाळ' आणि त्या काळातील व्यक्तिरेखा व प्रसंग ही भालजींच्या चित्रपटांची प्रमुख वैशिष्ट्ये होती, असे ते एकदा मला म्हणाले होते व ते खरेही होते. एकदा कृष्णकांत जयप्रभा स्टुडिओमध्ये गेले होते. भालजी निवांतपणे बसलेले होते. कृष्णाकांतानी आत जाऊन त्यांना प्रणाम केला. गप्पांच्या ओघात कृष्णकांतनी सहज विचारले, तुम्ही स्टुडियोचे नाव जयप्रभा का ठेवले. भालजी हसले म्हणाले, अरे, या स्टुडिओचे सुरवातीचे नाव प्रभाकर होते. प्रभाकर हा माझा मुलगा. त्यामुळे त्याचे नावाचा, प्रभाकर स्टुडीओ असे ठेवले होते. पण नंतर विजय झाला व विजयमधला 'जय' व प्रभाकर मधला 'प्रभा' घेऊन 'जयप्रभा स्टुडिओ' झाले. भालजींचे त्यावेळेचे खळखळून हसणे, अजून मला आठवते, असे म्हणून कृष्णकांत ही मनापासून हसले होत. एक आठवण त्यांनी प्रसिद्ध साहित्य द. मा. मिरासदार यांच्याविषयी सांगितली होती. मिरासदार हे विनोदी कथा लेखक म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यांना स्नेहस

संमेलनात आमंत्रित करण्यासाठी कृष्णकांत राजे आणि त्यांचे दोन–तीन मित्र पुणे येथे मिरासदारांच्या घरी गेले होते. मिरासदारांनी त्यांची चांगले स्वागत केले. नर्मविनोदी गप्पा झाल्या. दीडदोन तास कसे गेले, कळले नाही. त्यांनी त्यांचे आमंत्रण स्वीकारले. जाताना त्यांनी प्रत्येकाला लाडू दिले. तो पाहुणचार घेत पुन्हा पंधरावीस मिनिटे गप्पा मारल्या. त्यांचा ही भेट व नर्मविनोदी गप्पा विसरता न होण्याजोगे होत्या, असे कृष्णकांत मला म्हणाले होते. कृष्णकांतांच्या अशा अजून कितीतरी महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणी आहेत. आठवल्या की अजून लिहिन. आठवणी या सायंकाळच्या गारव्या सारख्या असतात. कधी लेखातले शब्द, तर कधी शब्दातील मौन ही होतात.

शिरोमणी ब्रिक्स



संस्थापक चेअरमन : संतशिरोमणी पाणी वापर सह.संस्था मर्यादित. पिंपळगांवलेप, ता. येवला, जि. नाशिक.

चेअरमन : पिंपळगांवलेप वि.वि.का. सह सेवा संस्था, पिंपळगांवलेप, ता. येवला, जि. नाशिक.

मा. अध्यक्ष : येवला तालुका कुंभार समाज संघटना

मा. अध्यक्ष : महात्मा गाँधी तंटामुक्ती समिती-पिंपळगांवलेप, ता. येवला, जि. नाशिक.

माणिकराव रसाळ
सरपंच, ग्रामपंचायत
पिंपळगाव लेप
Mo. : 9423544211

शिरोमणी ब्रिक्स

प्रोप्रा. संजय रसाळ - मो. 9730992045

आमचेकडे सर्व प्रकारच्या विटा होलसेल भावात मिळतील.

स्वामी समर्थ मेडीकल स्टोअर्स

प्रोप्रा.सुनिल बबनराव रसाळ मो. 9922361515

जळगांव नेउर, ता. येवला,जि. नाशिक

स्वामी समर्थ अग्रो सेंटर

प्रोप्रा. जयेश रसाळ-मो. 9423042457.

जळगांव नेउर, ता. येवला, जि. नाशिक

महादेव ऑर्थोपेडिक व पेडीयाट्रीक हॉस्पिटल



डॉ. वैभव महादेव राजे
MBBS D. Ortho



डॉ. सौ. वृषाली वैभव राजे
MBBS D.C.H.

पेठ रोड, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली ४१५४०९
फोन : (०२३४२) २२४०२३
मो. : 9822399584 **नि. :** (02342) 225343.

आमचे प्रेरणास्थान



कै. वसंत कुंभार पुरेकर



श्रीमती गोदावरी व. कुंभार पुरेकर



विजय वसंतराव पुरेकर
विद्यमान संचालक कोल्हापुर शहर कुंभार माल उत्पादक सोसा.
9823742929, 8623061621

Hotel BalkrishnA Deluxe

एसी/नॉन एसी रुम्स, डॉरमेंटरी हॉल



अजय वसंतराव पुरेकर
9823820808/8668252335



पार्थ अजय कुंभार पुरेकर

१४३० ब, सी वॉर्ड, संभाजी पुलाजवळ, लोकमत ऑफिस जवळ, लक्ष्मीपुरी, कोल्हापुर ४१६ ००२ फोन 0231-2640243

।।श्री।।

सिद्धी आर्टस्



रोहन (भैय्या) कुंभार
मो. ९०११३२१०००/९१५६३२१०००



- गणपती मुर्ती
- आर्टीकल्स
- लक्ष्मी मुर्ती
- गौरी मुखवटे

दत्तवाडी, उरुळी कांचन, पुणे ४१२ २०२

स्वप्न मोफतच असतात, फक्त त्यांचा पाठलाग करताना आयुष्यात बरीच किंमत मोजावी लागते.

कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशची मीटिंग

– जगदीश मोरे (सोशल मिडिया)



बैठकीस मार्गदर्शन करताना प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर

कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशची मीटिंग लोणावळा येथे चिंतन शिबीर आयोजित करावयाचे असल्यामुळे पुढील नियोजन करण्यासाठी मिटींग पुणे येथील ब्लु स्टार हॉटेल येथे दि. १०/१०/२१ रोजी संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतीशदादा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या सभेस महाराष्ट्रातून अनेक पदाधिकारी उपस्थित होते, प्रथम संतश्रेष्ठ संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कोरोना काळात समाजातील संस्थेचे अनेक मान्यवर, पदाधिकारी व समाजबांधव यांचे निधन झाल्याने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणेत आली. सूत्रसंचालन मच्छिन्द्र जगदाळे सर प्रवक्ता महाराष्ट्र प्रदेश यांनी सर्व पदाधिकारी यांची ओळख करुन दिली व मिटींगचा हेतू सांगितला.

प्रास्ताविक ज्ञानेश्वर सोमवंशी अध्यक्ष पुणे जिल्हा यांनी केले. प्रास्ताविकात चिंतन शिबीर २ व ३ डिसेंबर २०२१ रोजी नारायणी धाम लोणावळा येथे आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, तसेच कोरोना काळामध्ये पदाधिकारी नियुक्ती करण्यात आल्या. तसेच महाड व कोल्हापूर येथे चक्रीवादळ व पूरपरिस्थिती निर्माण झाली त्याठिकाणी मदत देण्यात आली. अनंतराव कुंभार कोषाध्यक्ष यांनी संस्थेची आर्थिक परिस्थिती सांगितली, सतीशदादा दरेकर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. यावेळी कुंभार समाजाचे भुषण लिज्जत पापड समुहाचे अध्यक्ष सुरेश कोते साहेब यांची नामांकित संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचा सत्कार महाराष्ट्र प्रदेश यांचे वतीने करण्यात आला.

चिंतन शिबीर यशस्वी होण्यासाठी व्यवस्थापन व आर्थिक नियोजन व समिती स्थापन करण्यात आली. प्रदेश कार्याध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर, प्रदेश उपाध्यक्ष उमाजी सुर्यवंशी, सरचिटणीस कल्याण कुंभार, कोअर कमिटी अध्यक्ष संजयजी रुईकर, दिनकरराव छत्तीसकर, वसंतराव घोडनदीकर, अजयजी विरकर, शरदजी वाडेकर, युवा प्रदेशाध्यक्ष संजयजी जोरले, उत्तमराव मांजरामकर, पांडुरंगतात्या कुंभार, संदिप पाटील, संतोष रसाळकर, मोहन कुंभार, गुरुलिंग कुंभार, हनुमंत कुंभार, गजानन चौलकर, सोमनाथ सोनवणे अभोणा, अशोक सोनवणे सटाणा, अशोक जाधव सिन्नर, वसंतराव गाडेकर नाशिक, राम पान्हेरकर ठाणे, जगदीश मोरे, महिला अध्यक्षा पुणे सौ. अरुणाताई कुंभार, सौ. अपर्णाताई शिंदे, सौ.



सुरेशराव कोते यांचा सत्कार करताना मान्यवर



सतिशदादा दरेकरांचा सत्कार करताना कल्याणराव दळे व मान्यवर



बैठकीस उपस्थित पदाधिकारी व मान्यवर

जयश्रीताई वीरकर, सौ. कांचनताई रासकर, आदींसह २४ आघाडी, अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस, संपर्क प्रमुख उपस्थित होते. (सर्वांची नावे लिहू शकत नाही) महाराष्ट्र प्रदेश, सोशल मीडिया बाबत आचार संहिता, यांत्रिक चाके, मूर्ती व रॉयल्टी बाबत, माती कला बोर्ड बाबत, महाड, कोल्हापूर, पूरग्रस्तांना मदत इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

कल्याणराव दळे अध्यक्ष बारा बलुतेदार संघटना यांनी शुभेच्छा दिल्या. ज्ञानेश्वर कारभारी म्हस्के कार्याध्यक्ष अर्थ व नियोजन आघाडी कमिटीचे यांना प्रभारी अध्यक्ष अर्थ व नियोजन आघाडी कमिटीचे पद देण्यात आले व सत्कार करण्यात आला. सर्व आघाडी प्रमुखाने आपआपली मते मांडली. चिंतन शिबीर यशस्वी होण्यासाठी व्यवस्थापन व आर्थिक नियोजन व समिती स्थापन करण्यात आली. गहिनीनाथ दिगंबर राजे हे अगोदर अध्यक्ष सोशल मीडिया लातूरचे होते त्यांना अध्यक्ष सोशल मीडिया पुणे जिल्हा हे पद व पत्र सतीशदादा दरेकर व सर्व पदाधिकारी यांचे हस्ते देण्यात आले. सूत्रसंचालन मच्छिन्द्र जगदाळे सर प्रवक्ता महाराष्ट्र प्रदेश यांनी केले.

***

श्री क्षेत्र तेर येथे संवाद यात्रेत जनगणना फॉर्मचे सर्व जिल्हाध्यक्ष यांना वाटप
महासंघ पुनर्बांधणी बाबत चर्चा



उस्मानाबाद : तेर येथे संत गोरोबकाकांच्या पवित्र भूमीत कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आयोजित केलेल्या संवाद यात्रा व मराठवाडा विभाग जनगणना अभियान शुभारंभ हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी संपूर्ण महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी संत गोरोबकाकांचा जयघोष केला. पांडुरंग तात्या कुंभार यांनी सर्व कार्यकर्त्यांसाठी भोजन व राहण्याची उत्तम व्यवस्था केली होती. यावेळी मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, लातूर आणि अमरावती जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत जनगणना अर्ज भरून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. त्यापूर्वी संत गोरोबांच्या राहत्या घरी तीन संघटनांची एकत्रित बैठक झाली. सर्वांनी साधक बाधक चर्चा केली. सतिषदादा दरेकर यांनी अतिशय मुद्देसूद विचार मांडले. महासंघाचे कामकाज पुन्हा जोमाने सुरु व्हावे यासाठी आम्ही सगळे एकत्र मिळून कार्यरत राहू परंतु त्या आधी महासंघावर आलेलं कोर्ट केसचे संकट दूर करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव घोडनदीकर, उमाजी सूर्यवंशी, कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, युवक अध्यक्ष संजय जोरले, मरकड सर, ज्ञानेश्वर म्हस्के, राधेश्याम गायकवाड, सोमनाथ सोनवणे, वसंतराव कुंभार, प्रदेश कोषाध्यक्ष अनंत कुंभार, सचिव अजय वीरकर, बाळासाहेब कुंभार, संजीव भालेराव, सुधीर चांदेकर, राजेश कुंभार, रामदास कुंभार, जगदीश कुंभार, रमेश देवतरसे, सीताराम अंबवणेकर, अरुण कुंभार, बाळासाहेब कुंभार, दत्तात्रय कुंभार, शिवाजी कुंभार, हरिदास कुंभार जेजुरी, दिलीप खांडेकर अमरावती अध्यक्ष, भद्रीनाथ भांसाडे जालना अध्यक्ष, दिगंबर पेरे अध्यक्ष मराठवाडा, महिला पदाधिकारी अरुणाताई कुंभार, माधुरी दरेकर, अपर्णा शिंदे, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेस पक्ष ओबीसी विभाग राज्यस्तरीय अधिवेशनात श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्ड तात्काळ कार्यान्वित करण्यात यावे हा ठराव मंजूर



ठराव मांडताना पांडुरंग तात्या कुंभार

पनवेल : दिनांक १२ जून रोजी पनवेल येथे काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाने राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनात श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्ड तात्काळ कार्यान्वित करण्यात यावे असा ठराव पांडूरंग तात्या कुंभार प्रदेश उपाध्यक्ष काँग्रेस पक्ष ओबीसी विभाग यांनी अधिवेशनात ठेवला व तो ठराव सर्वानुमते हात वर करून मंजूर करण्यात आला आहे. त्या प्रसंगी -ICC चे सचिव माजी मंत्री तारिक अन्वर साहेब, ओबीसी विभाग प्रभारी के राजू साहेब, ओबीसी ऑल इंडिया अध्यक्ष केप्टन अजयसिंह यादव साहेब, प्रदेश अध्यक्ष नाना भाऊ पटोले, मा.ना. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य मा.ना. विजय वडेट्टीवार साहेब, ओबीसी मंत्री महाराष्ट्र राज्य. मा.ना. सुनील केदार साहेब, मंत्री युवक कल्याण व क्रीडा. मा. भानुदास माळी साहेब, ओबीसी प्रदेश अध्यक्ष इ. मान्यवर उपस्थित होते.

तसेच उस्मानाबाद, नांदेड, सातारा, बीड, पनवेल, लातूर, सोलापूर, व इतर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातील कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पांडूरंग तात्या कुंभार अध्यक्ष राजकीय आघाडी कुंभार समाज सामाजिक संस्था यांचे मनःपुर्वक अभिनंदन व आभार!

***

छोटे लोक नसते तर मोठ्या लोकांचे अस्तित्व शून्य असते.

अमरावती येथे गुणगौरव संपंन्न



समाजरत्न पुरस्कार सतिशदादा दरेकर यांना प्रदान हस्ते रवीराणा समवेत डावीकडून वसंत घोडनदीकर, सुधाकर शेंडोकार, क्षीरसागर, आ. रवी राणा, सतीशदादा, सोमनाथ सोनवणे, अजय वीरकर व मान्यवर



आमदार रवी राणा यांचा सत्कार करताना नरेश जुगेले, अजय वीरकर, समवेत डावीकडून शेंडोकार, ॲड. तांबट, क्षीरसागर, पंजाबराव काकडे व मान्यवर



विद्यार्थीनीचा सत्कार करताना डावीकडून बबनराव जगदाळे, ॲड. तांबट, प्रकाश कुंभार (फुलगांवकर), संतोष सरोदे, प्रकाश भालेराव व मान्यवर



प्रमुख पाहुण्यासमवेत विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी

अमरावती : कुंभार समाजातील अनेकजण प्रशासकीय यंत्रणेत उच्च पदे भूषवित आहे. आयएएस, आयपीएस, सचिव अश्या समाजातील उच्च पदस्थांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन कुंभार समाज सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर यांनी केले. बडनेरा रोडवरील शशिनगर स्थित श्री संत गोरोबा काका सांस्कृतिक भवन येथे रविवारी (११ सप्टेंबर) पार पडलेल्या गुणगौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन दरेकर बोलत होते. विदर्भ कुंभार समाज समितीच्या अमरावतीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कुंभार समाजाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. समाजातील तरुण शैक्षणिक, क्रीडा, संगीत, शास्त्र, विज्ञान आदी विषयांमध्ये पारंगत झाली आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग समाजातील पुढील पिढीला व्हावा. नवोदितांना प्रेरणा मिळावी म्हणून या गुणगौरव समारंभाचे विशेष महत्व असल्याचे दरेकर पुढे बोलताना म्हणाले. समाजातील तरुण उद्योग, स्वयंरोजगार करण्यास पुढे आल्यास त्यांना सामाजिक संस्था मार्गदर्शन तसेच मदत करणार असल्याचे ते म्हणाले. शिवाय गुणगौरव झालेल्या गुणवंत विद्यार्थी, समाजातील गौरव, भूषण असलेल्या व्यक्तिंना त्यांनी भाषणातून शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रमुख पाहुणे आमदार रवी राणा, कुंभार सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, सरचिटणीस बबनराव जगदाळे, प्रदेश उपाध्यक्ष वसंतसेठ घोडनदीकर, कोषाध्यक्ष अनंत कुमार, सरचिटणीस अजय विरकर, सदस्य संजय रुईकर, प्रकाश भालेराव, शत्रृघ्न प्रजापती, श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समितीचे अध्यक्ष पंजाबराव काकडे, सचिव डॉ. श्रीराम कोल्हे, कार्याध्यक्ष सुरेश नांदूरकर, विदर्भ कुंभार समितीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. संजय साळवीकर, माजी अध्यक्ष देवीदास धामणकर, प्रभा भागवत, महिला अध्यक्ष संगिता सावळीकर, भगवान जामकर, अरुण पोहनकर यांची विशेष उपस्थिती होती.

समाज भूषण व समाज गौरव पुरस्काराचे वितरण

या कार्यक्रमात दहावी, बारावी, पदवी, पदव्यूत्तर परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष थेरगाव पुणे येथील सतिशदादा दरेकर यांचा समाजरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यवतमाळ येथील उद्योजक राजू उर्फ शत्रृघ्न गंगादीन प्रजापती यांचा समाजभूषण, दर्यापूर वडाळगव्हाण येथील सुभाष नामदेवराव वडूरकर यांचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नागपूर येथील राम



राम पवनारकर यांना समाज गौरव पुरस्कार प्रदान करताना रमाकांत क्षिरसागर



उपस्थितांना समितीचे कार्य विस्तृतपणे सांगताना सचिव डॉ. श्रीराम कोल्हे

वासुदेव पवनारकर, नाशिक येथील नंदूभाऊ जाधव, अकोला जिल्ह्यातील नया अंदूरा येथील प्रदीप तुकाराम मांगुळकर, प्रा. डॉ. मनोहर दादाराव मेहरे, आर्णी येथील डॉ. रोशन माधव मेहरे, चांदूर बाजार हिरुळपूर्णा येथील अतुल रंगराव भातकुलकर, वाशिम जिल्ह्याच्या मंगरुळपौर येथील वनमाला परशराम पेंढारकर, मलकापूर अकोला येथील आदर्श तळोकार यांचा समाज गौरव देत सन्मान करण्यात आला.

सभागृहासाठी २५ लाख : शशिनगर येथील संत गोरोबा काका भवन येथे सभागृहाचे बांधकाम करता यावे म्हणून २५ लाख रुपये तर प्रवेशद्वाराकरिता १० लाख रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा आमदार रवी राणा यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे अध्यक्ष सुधाकर, शेंडोकर, उपाध्यक्ष ॲड. गजानन तांबटकर, कोषाध्यक्ष सतिश गावंडे, सचिव सुरेंद्र सरोदे, सहसचिव मधुकर खांडेकर, सुनील भागवत, नंदकिशोर काकडे, विद्यार्थी सहाय्यता निधी समितीचे अध्यक्ष सुरेश नांदूरकर, रामेश्वर वडूरकर, नंदकिशोर नांदूरकर यांच्यासह सदस्यांनी प्रयत्न केले.

समाजगौरव पुरस्कार प्राप्त राम पवनारकर यांचे मनोगत :

माणूस म्हटलं की माणुसकी आणि माणुसकी म्हटलं तर एकमेकांविषयी आदर, सन्मान राखणे, घरी आलेल्यांचा आदर ठेवून सन्मानाने आवाभगत करणे, त्यांची विचारपूस करणे, गप्पागोष्टी करणे हे माणुसकीच्या रूपामध्ये पाहायला मिळते.

माणूस जेव्हा पत्रावळीवर जेवत होता तेव्हा तो पाहुण्यांना पाहूनच फुलून जायचा घरातील सर्व जण त्यांचं मनापासून स्वागत करत होती.

काळ बदलला आहे आणि माणूस मातीच्या भांड्यात जेवण करायला लागला. सोबतच नात्यांना सुद्धा मातीसारखा जपू लागला. काळ बदलला आणि माणूस पितळेच्या भांड्याचा वापर करू आणि तो दर सहा महिन्यांनी नात्यांना कलई करू लागला. काळ बदलत गेला आणि माणसाला काचेची भांडी वापरायला आवडु लागली. एखादा छोटासा धक्का किंवा ओरखडा नात्यांना सहन होईनासा झाला. काळ बदलत गेला आणि जेवणाची ताट ही प्लास्टिक आणि थर्माकोलची झाली आणि सगळेच नातेसंबंध जणू त्यांच्यासारखी युज अँड थ्रो होऊ लागली. आहे ना खरं?

हे जरी खरं असलं तरी एक गोष्ट मात्र खोटी नाही आणि ती म्हणजे विदर्भ कुंभार समाज सुधार समिती अमरावती या समितीने खरंच माणुसकी काय आहे आणि ती कशी वास्तविकेत आणायची याचा पुरेपूर अभ्यास केलेला आहे. कोळसा खाणीतून हिरे काढण्यासाठी काय काय कष्ट त्रास घ्यावे लागतात ते तेथील खाण मजुरालाच माहीत असते. त्याचप्रमाणे समाजातील सर्व स्तरातील लोकांमधून गुणी लोकांना शोधून काढणे, कर्तबगार लोकांना शोधून काढणे, समाजाच्या विकासासाठी अहोरात्र वाहून घेणाऱ्या लोकांचा शोध घेणे आणि त्यांचा समाजातर्फे समितीकडून जाहिर सत्कार सन्मान करणे आणि त्यांनी केलेल्या कार्याविषयी समाजाला अवगत करणे हे असले अवघड कार्य नेटाने कधीही न थकता समितीच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी केलेले आहे मी त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांच्या चिकाटीसाठी सलाम करतो.

माझ्या समाजकार्याबद्दल आपणा सर्वांना समितीच्या पदाधिकाऱ्यांनी थोडक्यात आणि सविस्तर माहिती दिलेली आहे. नोकरीत असताना समाजाचे कार्य कराण्यासाठी वेळ मिळत नव्हता पण निवृत्त झाल्यानंतर समाजाचे रूण फेडावे या उदात्त हेतूने आपण समाजासाठी ठोस कार्य करावे या दृष्टिकोनातून निवृत्ती नंतर मी आणि माझे आदर्श ज्येष्ठ नागरिक मंडळ तसेच सेंट्रल एक्साईज रिटायर्ड ऑफिसर क्लब नागपूर, ७०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांना सेवा देत आहो. कोणतेही कार्य करताना ते कार्य तन-मन-धनाने श्रद्धेने विशेष म्हणजे कोणताही स्वार्थ न ठेवता झाले पाहिजे आणि ही सेवा परमेश्वराची सेवा समजून करावी तर हमखास प्रत्येक कार्यामध्ये यश येतेच याचा मला दृढ विश्वास आहे. समाजाचे कार्य करताना जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून सहनशीलता आणि नम्रतेशी मित्रता करावी लागते. तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजसेवा घडल्या जाते. प्रत्येकाने समाजसेवा ही मानवसेवा समजावी त्यात सर्व जाती, धर्म समभाव निष्ठित असतात.

विदर्भ कुंभार समाज सुधार समिती अमरावती आणि पदाधिकारी यांचा फार फार आभारी आहे आणि असेच विविध समाज कार्य त्यांच्याकडून वेळोवेळी घडत राहावे ही गुरुदेव चरणी प्रार्थना करतो. आपण मला समाजगौरव पुरस्कार देवून माझा केलेल्या सत्काराबद्दल मी, राम पवनारकर आणि समस्त पवनारकर परिवार समितिचे तसेच कुंभार समाजाचे पुन:श्च आभार व्यक्त करतो.

***

Rajesh H. Sanugar
Mob. 94220 85824



Hirasons

DEALER'S IN
All Types of Exclusive, Brass,
Door Fitting, Hardware & Architecture,
Furniture, Flxtures & Fittings Suppliers

910, Budhwar Peth, Bhori Ali, Pune
Ph. : 24465349, 24475948
e-mail : rajeshsaungar8@gmail.com

MARVEL

Automotive Industries

The Engineering Wonders..!

Mfgrs. of Sheet Metal Prototypes, Press-Tools,
Pressed & Machined Components.



Dattaprasad V. Ghumade
Proprietor

Plot No. 3, Gat No. 90, Hari-Om Industrial Estate,
Jyotiba Nagar, Talwade, Pune 411 062.
Cell. : +91-9850893276
E-mail : marvel.automotive@yahoo.com

॥ श्री संत शिरोमणी गोरोबाकाका ॥





नागनाथराव रेवणप्पा कुंभार
राष्ट्रीय उपाध्यक्ष अ.भा.प्र.कुं. महासंघ
मो.: ९४२२०६९९४६

कुंभार कन्स्ट्रक्शन
कुंभार खडी केंद्र
कुंभार विट उत्पादक कारखाना

प्रोप्रा. : नागनाथराव रेवणप्पा कुंभार
मा. जिल्हा अध्यक्ष : महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ, जि. उस्मानाबाद

मेन रोड उमरगा, पोलीस स्टेशनसमोर, ता. उमरगा,
जि. उस्मानाबाद-४१३ ६०६ फोन : ०२४७५-२५२४४६

ग्रिस्कंध पंचकर्म चिकित्सालय

सर्व प्रकारच्या रोगांवर आयुर्वेदिक उपचार



वैद्य निलेश भागवत शिर्के
बी.ए.एम.एस.
7391955911



वैद्य सौ. गौरी निलेश शिर्के
बी.ए.एम.एस.

चिंचवड : फ्लॅट नं. १, बिल्डिंग नं. बी १०, राजपार्क, पोतदार शाळेजवळ, केशवनगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३.
सकाळी १० ते दुपारी १, सायं. ५ ते ८

पिंपळे सौदागर : ऑफिस नं. ११४, साई व्हिजन कमर्शियल कॉम्प्लेक्स, गोविंद गार्डन जवळ, पिंपळे सौदागर, पुणे

खोपोली : माहेर हॉस्पिटल, मुख्य बाजारपेठ, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड
प्रत्येक महिन्याच्या १ व १५ तारखेस
सकाळी ९ ते सायं. ४

Email : drnileshshirke@gmail.com

धुळे येथे खान्देश कुंभार समाज संस्थेतर्फे विद्यार्थ्यांसह कर्तबगारांचा सन्मान



मान्यवरांसमवेत समाजरत्न, समाजभूषण पुरस्कार प्राप्त समाज बंधू-भगिनी



मान्यवरांसमवेत गुणी विद्यार्थी, विद्यार्थीनी



जगदीश मोरे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान



गंगाधर उर्फ आप्पा जोर्वेकर यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान

धुळे : जिल्हा खान्देश कुंभार समाज विकास व शैक्षणिक संस्थेच्या १९व्या वर्धापन दिनानिमित्त समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्तबगारांसह गुणवंत विद्यार्थांचा गौरव सन्मानपत्र देऊन झाला. स्टेशनरोडवरील हिरे भवनात कार्यक्रम झाला. तसेच कलसरग (मुंबई) निर्मित श्री संत गोरोबा काकांच्या जीवनावरील आधारीत दोन अंकी नाटकाचा प्रयोग झाला. या कार्यक्रमासाठी मुंबईचे शिवाजी कृष्णा मालणवकर यांनी गोरोबाकाकांची भूमिका सादर केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाजाचे सतीष दरेकर होते. दीपप्रज्वलन महापौर प्रदीप कर्पे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश कुंभार समाजाचे रमाकांत क्षीरसागर, उमा सूर्यवंशी ज्ञानेश्वर सोमवंशी, वसंतराव घोडनदीकर, अनंत कुंभार, अजय विरकर, जि. प. अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, पराग अहिरे, संजर जोरले, सोमनाथ सोनवणे, भगवान सूर्यवंशी, डॉ. दिलीप मेनकर, प्रा. प्रमोद माहुलीकर, प्रा. हिरामण करनकर, गुलाबराव सोनवणे, अशोक जाधव, के. के. चव्हाण उपस्थित होते. धुळे, नाशिक, जळगाव जिल्ह्यात समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाज बांधवाचा समाजरत्न, समाजभूषण, उद्योगरत्न, आदर्श शिक्षक, आदर्शमाता पुरस्काराने गौरविण्यात आले. गंगाधर जोर्वेकर, जगदीश मोरे, गोंविद कुंभार, देविदास कुंभार, शरद चित्ते, श्रीमती कमलबाई धाडे, रमेश कुंभार यांचा मान्यवरांच्या हस्ते मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष सुरेश बहाळकर, रमेश बहाळकर, मिलिंद कुंभार, अनिल चित्ते, प्रवीण धाडे, सुनील कुंभार, संजय वाल्हे, अरुण खैरनार, किशोर कुंभार, गोकुळ कुंभार, रतिलाल कुंभार, सुभाष कुंभार, चंदू मोरे, शेखर बागूल, विजय ठाकरे, सुरेश जगदाळे, दिनेश बागूल, दिलीप खैरनार, दिलीप मोरे, नारायण जगदाळे, पंकज जगदाळे, संजय बोरसे, किसनराव चव्हाण, सचिन बच्छाव, सचिन मोरे, सचिन वाघ, विजय कुंभार, पंकज खैरनार, दिनेश वाघ, राहुल बोरसे, आबा वाघ, श्रीराम मोरे, बन्सीलाल मोरे, राजेंद्र चित्ते आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला नाशिक, जळगाव, नंदुरबार, औरंगाबादसह मध्यप्रदेश व गुजरातमधील समाज बांधव उपस्थित होते.

***

नाशिक येथे गुणगौरव समारंभ संपन्न
मातीकला बोर्ड कार्यान्वीत करू .... आमदार फरांदे

-जगदीश मोरे



संत गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपंन्न



नाशिक महानगरपालिका सह आयुक्त डॉ. दिलीप मेनकर यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान



आमदार ॲड. राहुल ढिकले उपस्थितांना मार्गदर्शन करताना



आमदार सौ. देवयानी फरांदे मार्गदर्शन करताना



मार्गदर्शन करताना सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष रमाकांत क्षिरसागर

नाशिक : नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्या वतीने दि. २१ /८/ २०२२ रोजी, शर्मा मंगल कार्यालय येथे विद्यार्थी गुणगौरव, सेवानिवृत्त समाज बांधवांचा सत्कार तसेच समाजभूषण पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. संत शिरोमणी गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

दहावी, बारावी, पदविका, विशेष प्राविण्य विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त समाज बांधवांना सुद्धा शाल, गुलाब पुष्प व सन्मानचिन्ह देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. समाज्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी व समाजकार्य करणारे नाशिकचे म.न.पा.चे उपायुक्त डॉक्टर दिलीप मेनकर साहेब, पुंडलिकराव सोनवणे व रमेशजी राजापुरे (नाशिक), गोकुळ कुंभार (शिरपूर), रमेश बहाळकर (धुळे) यांना नाशिकचे आमदार सौ. देवयानी फरांदे आमदार, ॲड. राहुल ढिकले तसेच मा. शरदजी आहेर, प्रदेश अध्यक्ष सतीशदादा दरेकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मान ट्रॉफी देऊन समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच अण्णा जाधव सरपंच येवला यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतीशदादा दरेकर, प्रमुख पाहुणे लोकप्रिय आमदार सौ. देवयानी फरांदे, आमदार राहुल ढिकले, शरदजी आहेर, म.न.पा. उपायुक्त डॉ. दिलीपजी मेनकर तसेच वसंतराव घोडनदीकर, अनंत कुंभार, प्रकाश भालेराव, सुधीर चांदेकर, रामदास कुंभार तसेच उत्तमराव काळे सर (चाळीसगाव), सुरेशजी बहाळकर (धुळे), अशोकराव सोनवणे (सटाणा), मिलिंद कुंभार, अनिल चित्ते, धाडे, संस्थापक अध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे, आप्पासाहेब जोर्वेकर, बापू गोरे, के.के. चव्हाण व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार सौ. देवयानी फरांदे यांनी कुंभार समाज्याच्या माती कला बोर्डाला कार्यान्वित करून चालना देण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करू व कुंभार समाज्याच्या पारंपारिक व्यवसायासाठी साधनसामुग्री मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. तसेच आमदार ॲड. राहुल



मान्यवर पाहुण्यांसमवेत गुणवंत विद्यार्थी व समाजभुषण पुरस्कारार्थी



कार्यक्रमास उपस्थित समाजबंधू व भगिनी

ढिकले यांनी सुद्धा कुंभार समाज्यासाठी समाज मंदिर व्हावे यासाठी प्रयत्न करणार असे आश्वासन दिले.

आलेल्या सर्व पाहुण्यांचा नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर यांनी केले. स्वागत जिल्हा अध्यक्ष सोमनाथजी सोनवणे यांनी केले. अध्यक्षीय भाषण सतीशदादा दरेकर यांनी केले व सामाजिक संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती सांगितली. सूत्रसंचालन सुभाष कुंभार व सौ. सविता जगदाळे यांनी केले. शहर अध्यक्ष बाळासाहेब जोर्वेकर यांनी सर्वांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर, अध्यक्ष सोमनाथजी सोनवणे, शहराध्यक्ष बाळासाहेब जोर्वेकर, वसंतराव गाडेकर, अरविंद क्षीरसागर, रमेशजी गायकवाड, अशोक जाधव, बापू गोरे, राधेश्याम गायकवाड, के.के. चव्हाण, अशोक सोनवणे, सटाणा, सुभाष कुंभार, गोकुळ सोनवणे, गणेश आहेर, रमेश राजापुरे, पुंडलिक सोनवणे, जगदीश मोरे, भरत शिरसाठ, हरीभाऊ जोर्वेकर, संजय मोरे, श्याम जोंधळे, देवेंद्र गाडेकर तसेच सौ. सुवर्णाताई जाधव, सौ. सविता जगदाळे, श्रीमती शकुंतलाताई जाधव, सौ. सुवर्णाताई चव्हाण यांनी विशेष मेहनत घेतली. (कोणाचे नाव चुकून राहिले असल्यास क्षमस्व) कार्यक्रमानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

जवखेडा येथील कुंभार समाजाचे घर उध्वस्त करणाऱ्या जी आर इन्फ्रा कंपनीवर कारवाई करा
कुंभार समाज विकास संस्था बीड यांची मागणी - रामदास कुंभार (बीड जिल्हा अध्यक्ष)



बीड : जालना जिल्ह्यातील जवखेडा येथील कुंभार समाजाच्या कुटुंबावर कायदेशीर नोटीस न देता अवैधरित्या घर पाडले व दीपावलीच्या पणत्या, बोळके व लक्ष्मीपूजनाचे सर्वसामान वस्तूची नासदुस केली. श्रीमती विमलबाई बाबूलाल संत्रे या जवखेडा खुर्द तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील रहिवासी असून या गावातून राष्ट्रीय महामार्ग ७५३ एम राजुर जवखेडा हसनाबाद या महामार्गामध्ये जात असून अद्याप कसल्याही प्रकारे नोटिस व कोणती ही सुचना न देता, तसेच सरकारी मोबदला किती मिळणार? अशी कोणतीच माहिती न देता दिनांक १४/१०/२०२२ रोजी रात्री ११ वाजता घरात संत्रे कुटूंब झोपले असताना अचानक श्रीमती विमलबाई बाबुलाल संत्रे, तुकाराम संत्रे, समाधान संत्रे व पुष्पा संत्रे यांच्या कुटुंबावर अमानुषपणे हल्ला केला व त्यांना घराच्या बाहेर ढकलत नेले व सर्वांना घराबाहेर काढून मारहाण केली व बंदुकीचा धाक दाखवून पिंडीतांचे घर पाडून घरात असलेले दीपावलीचे लक्ष्मीपूजनाच्यासाठी पंधरा हजार बोळके व पणत्या अशा मालाचे जेसीबीच्या साह्याने नष्ट केले. तसेच व सर्व घरातील माठांचे नुकसान केले. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग जीआर इन्फ्रा या कंपनीच्या काही गुंडांनी कुंभार समाजाचे एक घर उध्वस्त करून निघून गेले व संत्रे कुटुंब हे भयग्रस्त झाले असून संपूर्ण रोडवर आले आहे. आता संत्रे कुटूंबावर उपवास मारीची वेळ आलेली आहे. तरी संबंधित गुत्तेदार व शासनाने सदरील पीडित कुटुंबीयांना झालेल्या नुकसान पोटी २५ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा राज्यभर कुंभार समाज सह बारा बलुतेदार अठरा समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही असे आवाहन कुंभार समाज विकास संस्थेचे बीड जिल्हा अध्यक्ष रामदास कुंभार यांनी केले आहे.

***

बाई आज तू पाहिजे होती...



हा एक प्रेरणादायी लेख आहे. ग्रामीण भागातील एका दांपत्याने (सौ. व श्री. मोहन जगताप-कुंभार) यांनी आपल्या तीन मुलींना वैद्यकीय शिक्षण दिले. त्यातील दोन बी.डी.एस. व तिसरी एम.बी.बी.एस. करीत आहे. मुलींच्या आजीने मुली लहान असतानाच भाकीत केले होते की या मुली डॉक्टर होणार आणि तसेच घडले!

पृथ्वीवरील सर्व प्राणी मात्रांची काळजी घेणारा भगवंतच. परंतु एकाच वेळी इतक्या सर्वांचे पालन पोषण करणे, काळजी घेणे कसे शक्य?

मग स्वत:च्या मदतीला भगवंतांने आई नावाच पात्र निर्माण केले असे म्हणतात. सर्व प्राणिमात्र, पशूपक्षी आणि माणसांच्या आई इतकी लेकरांची काळजी प्रत्यक्ष भगवंताला घेता आली नसती. एवढी आभाळभर माया करणारी एकमेव आईशिवाय भूतलावर अन्य कोणी सापडणार नाही. भगवंत तरी किमान भक्तीचा भूकेला असतो. पण लाभावीना प्रिती करणारे आईशिवाय अन्य कोणी नाही. म्हणूनच आईला देव म्हणत नाहीत तर देवाला माऊली म्हणतात. भक्तांवर प्रसन्न झाल्यास त्याची मनोकामना पूर्ण करण्यासाठी भगवंत वर देतो असे सर्वच साधूसंत म्हणतात. पण लेकरांच्या कल्याणासाठी आईचा प्रत्येक शब्द आशिर्वाद रुपाने भगवंताच्या वरा पेक्षा कमी नसतो. कारण प्रत्येक आईने दिलेला आशिर्वाद भगवंताला खरा करावाच लागतो असे आईचा महिमा सांगताना संत म्हणतात. याची अनुभूती प्रत्येकाला येत असावी. तसाच मी ही एक भाग्यवान.

माझी आई जाऊन सहा महिने झाले. आधारासाठीचे सर्व काही संपले असे वाटून उदासी भरते. परंतु आईचे आशिर्वादाने आज माझी जेष्ठ कन्या कु. मेघा डॉक्टर झाली. मला आजही आठवतय मेघा दिदीच्या नंतर पुन्हा जुळ्या सुखदा व संपदा मुली झाल्या. त्या काळात बाळाला पहायला सर्व नातेवाईक फार आपुलकीने येत असतं. जसे आताही बाळाला पहायला जातात. (काही आपवाद सोडून) पण त्यामध्ये त्याही वेळी आणि आजही भेद पहायला मिळतो. मुलगा झाला म्हणून जन्म देणाऱ्या मातापित्यापासून घरातील आजी, आजोबा आणि विशेषत: बाळाच्या आत्या यांचे चेहरे जेवढे प्रसन्नतेने आवर्जून पेढे वाटतात. तेवढी टवटवी मुलगी झाल्यावर कोणाच्याच चेहऱ्यावर पहायला मिळत नाही. पण... माझ्या मुली ह्या सर्व गोष्टीला अपवाद आहेत. विशेषत: आत्यानीही व आजी म्हणून आमच्या आईने तिघींचाही कधीच रागाराग केला नाही. उलट खेडेगावात फार स्पष्ट बोललं जातं. भेटायला येणाऱ्यातील काही म्हणायचेच देवाने तिन्ही मुलीच दिल्या. त्यापैकी एखादा तरी मुलगा द्यायला पाहिजे होता. त्यावर आईला फार राग यायचा. त्यावर ती फटकन् बोलून टाकायची. तुमच्या पोरांने तुम्हाला काय पाळणा टांगलाय का? माझ्या नाती शिकून फार मोठ्या डॉक्टर होतील. गावाचं, समाजाचं नाव मोठं करतील असे म्हणून मुके घ्यायची. मेघाला लहानपणी गुड्डी म्हणायची, सुखदा संपदाला आम्ही टोपण नावाने श्रृतिका रसिका म्हणतो. आमच्या आईला आम्ही बाई म्हणत असत. तिघीही डॉक्टर होणार. हा बाळाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी दिलेला आमच्या बाईचा आशिर्वाद खरा ठरला. सुखदा (श्रृतिका) बी.डी.एस.च्या शेवटच्या वर्षाला तर संपदा (रसिका) मुंबई येथे एम.बी.बी.एस. करते आणि आज माझी जेष्ठ कन्या मेघा बी.डी.एस.ची डॉक्टर पदवी घेऊन घरी आली आहे. पदवीदान समारंभाला तुला आवर्जून व्यासपिठावर घेऊन जायचे मुलींचे स्वप्न होते. त्यासाठी तू कोणत्या रंगाची नऊवारी घालायची व मलाही आयुष्यात प्रथमच जॅकेट घालून सपत्निक व्यासपिठावर जाण्याचे फार पूर्वी ठरले होते. तू आज आमच्यात नाहीस... पण आज तू दिलेला आशिर्वादाचा शब्दन्शब्द प्रत्यक्षात आम्ही अनुभवतोय. तुझ्या आशिर्वादाने तिघींचे वैद्यकीय शिक्षण करण्यासाठीची अडथळ्यांची शर्यत आम्ही जिंकलोय.

मुलींनी तुझ्या आशिर्वादाच्या बळावर अथक परिश्रमाने मिळवलेले शैक्षणिक यश (पदवी) तुझ्या चरणी अर्पण. फक्त हे सर्व पाहण्यासाठी बाई आजी तू पाहिजे होतीस.

***

प्रा. शुभांगी कुंभार सेट परीक्षा उत्तीर्ण



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील प्राध्यापिका शुभांगी भिमराव कुंभार या सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातर्फे महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक पदासाठी या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये शुभांगी कुंभार या 'शिक्षणशास्त्र' या विषयात उत्तम गुणांनी राज्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, नियामक मंडळ चेअरमन अशोक मुथ्था, शाळा समिती चेअरमन गौरव मिरीकर, प्राचार्य संदीप उबाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

***

सटाणा येथे गुणगौरव समारंभ संपन्न

– जगदीश मोरे



संत गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पुजन करताना सतिश दरेकर, रमाकांत क्षिरसागर, सोमनाथ सोनवणे, डॉ. दिलीप मेनकर, नगराध्यक्ष सुनिल मोरे, आयोजक अशोकराव सोनवणे व मान्यवर



सटाणा नगरपालिकेचे नगराध्यक्ष सुनिल मोरे यांचा सत्कार हस्ते डॉ. दिलीप मेनकर



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आप्पा जोर्वेकर यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान हस्ते सतिश दरेकर



धुळे जिल्हाध्यक्ष सुरेश बहाळकर यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान हस्ते डॉ. दिलीप मेनकर

नाशिक (सटाणा) : श्री संत शिरोमणी गोरोबाकाका बहुउद्देशीय संस्था सटाणा यांच्यावतीने आयोजित दिनांक ४/९/२०२२ रोजी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव, पदविका, समाज रत्न, समाजभूषण, बागलाणची कन्या, आदर्श एकत्र कुटुंब, जीवनगौरव, आदर्श माता अशा विविध पुरस्कारांचा वितरण सोहळा राधाई मंगल कार्यालय सटाणा येथे संपन्न झाला.

सर्वप्रथम संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कोविड काळात निधन झालेले ज्ञात, अज्ञात अशा सर्व समाज बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

व्यासपीठावर कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतीश दादा दरेकर हे अध्यक्षस्थानी होते. तसेच सटाणा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील (दादा) मोरे, डॉ. दिलीपजी मेनकर उपायुक्त नाशिक म.न.पा., संजयजी रुईकर, अजय विरकर, अनंत कुंभार, वसंतराव घोडनदिकर, प्रकाशजी भालेराव, ज्ञानेश्वर (माऊली) सोमवंशी पुणे जिल्हा अध्यक्ष, उत्तमराव काळे सर चाळीसगाव, सुरेशजी बहाळकर धुळे, चंद्रशेखर कापडे जळगाव, भगवान सूर्यवंशी ठाणे, धनलालशेठ शिरसाठ जळगाव, इंजि. बबनराव जगदाळे नवापूर.

तसेच नासिक जिल्हा अध्यक्ष सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब जोर्वेकर, आप्पासाहेब जोर्वेकर, वसंतराव गाडेकर, गोकुळ सोनवणे, तुळशीराम मोरे सर, गुलाबराव सोनवणे, पुंडलिकराव सोनवणे, सोशल मीडियाचे जगदीश मोरे, रमेश राजापुरे उपस्थित होते.

बहुउद्देशीय संस्थेचे शामराव झिंगु चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी व समाजकार्य करणाऱ्या मान्यवरांचा शाल पुष्पगुच्छ व सन्मान ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला

समाजरत्न पुरस्कार : गंगाधर आप्पा जोर्वेकर (नाशिक), **समाजभूषण पुरस्कार :** शामराव झिंगु चव्हाण मेशी, सुरेश जगन्नाथ बहाळकर (धुळे), हृदयेश चव्हाण (नंदुरबार), **आदर्श माता पुरस्कार :** श्रीमती रेशमाबाई बोरसे (मालेगाव),**बागलाणची कन्या :** सौ. सविताताई हिलाल जगदाळे (नाशिक), **आदर्श एकत्र कुटुंब पुरस्कार :** धनलाल



आदर्श एकत्र कुटूंब पुरस्कार जळगांव आव्हाना येथील उद्योजक समाजभूषण धनलालशेठ शिरसाठ व परिवाराला प्रदान



मान्यवरांसमवेत गुणवंत विद्यार्थी आणि पुरस्कार प्राप्त समाज बांधव

शेठ शिरसाठ. (सर्व परिवार) आव्हाने, जळगाव. **जीवन गौरव पुरस्कार :** सुरेश मोरे .मनमाड, जयप्रकाश सोनवणे. नाशिक, सौ. कल्पना सोनवणे. साक्री, साहेबराव वाघ. खिर्माणी, प्रभाकर कलंकार. दाभाडी, सौ. लताबाई बोरसे. विरगाव, **उत्कृष्ट समाजसेवा पुरस्कार :** अशोक पुना पंडित जळगाव, विलास कुंभार.

तसेच दहावी, बारावी, विशेष प्राविण्य, पदविका, विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सटाणा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील (दादा) मोरे यांनी २०१९ मध्ये कुंभार समाज्यासाठी ४००० चौरस मीटरचा भूखंड देण्याचे आश्वासित केले होते. त्यांनी ते पूर्ण केले व त्यासाठी समाज मंदिरासाठी नगरपरिषदेकडून भरघोस निधी उपलब्ध करून, येणाऱ्या काळात बांधकाम कंपाऊंड इत्यादी देण्याचे कबूल केले तसेच नाशिक म.न.पा चे उपायुक्त डॉ. दिलीपजी मेनकर व नांदेडचे संजयजी रुईकर यांनी शासनाच्या विविध योजना व त्यांचे फायदे व विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले.

नासिक जिल्हा अध्यक्ष सोमनाथ सोनवणे यांनीही मार्गदर्शन केले. तसेच धुळे जिल्हा अध्यक्ष सुरेश बहाळकर व बागलाण कन्या सौ. सविताताई जगदाळे यांनी सर्व पुरस्कार्थीच्या वतीने अशोक (नाना) सोनवणे व त्यांच्या टीमचे आभार मानले व शुभेच्छा दिल्या. तसेच अध्यक्षीय भाषणात सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतीश दादा दरेकर यांनी विविध आघाड्यांच्या मार्फत चालणारी कार्यपद्धती समाजाला भेडसावणारे प्रश्न व त्यावरचा तोडगा व कुंभार समाज्याची जनगणना यावर मार्गदर्शन केले.

वरील प्रसंगी कार्यक्रमात सखारामजी मोरे, जळगाव, सुभाष पंडित, संजु नाव्हकर, केशव सपकाळे, कैलास कापडे, मिलिंद कुंभार, अनिल चित्ते, भगवान वाडीले, शशिकांत कुंभार, धर्मेश भाई प्रजापती, छोटूभाई प्रजापती तसेच समाज बांधव माता/भगिनी /विद्यार्थी/पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. विनायक रोकडे व कुमारी सुषमा सोनवणे व ललिता सोनवणे यांनी केले. वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन सहकार्य मोलाची भूमिका अशोक (नाना) सोनवणे, रमाकांत अशोक सोनवणे, पत्रकार गोकुळ सोनवणे, वसंतराव खांजोडे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले व शेवटी मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांनी नंतर स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

***

उमेश कोल्हे हत्या प्रकरणी आमदार रवी राणा यांना निवेदन



अमरावती : स्व. उमेश कोल्हे यांच्या अकाली व अनैसर्गिक मृत्यूस कारणीभूत गुन्हेगार शोधून त्याचेवर कठोर कारवाई करण्यात यावी असे निवेदन आमदार रवी राणा व पोलीस आयुक्त अमरावती शहर यांना कुंभार समाजाकडून निवेदन सादर करण्यात आले.

याप्रसंगी विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे पदाधिकारी सुधाकर शेंडोकार, सतीश गावंडे, मधुकरराव खांडेकर, अरूणराव पोहनकर, सुरेशराव नांदुरकर, प्रदीपराव ओलीवकर, सतीशराव सावरकर, विजय भाऊ गुजरे व महिला भगिनी समाजबांधव उपस्थित होते.

***

राज्यस्तरीय वधू वर मेळावा भोसरी येथे संपन्न



गोरोबाकाकांचे पुजन करताना डावीकडून वसंत घोडनदीकर, सतिशदादा दरेकर, उमाजी सुर्यवंशी, खटावकर, सोमवंशी, माधुरीताई व मान्यवर



दिप प्रज्वलन करताना अरुणाताई कुंभार, कांचन राजकर, माधुरी दरेकर, अपर्णा शिंद, विरकर ताई व मान्यवर



दिप प्रज्वलन : डावीकडून बाळासाो कुंभार, संजय जोरले, रमाकांत क्षिरसागर, सतिशदादा दरेकर, अजय वीरकर, विठ्ठलशेठ चव्हाण व मान्यवर



कार्यक्रमास उपस्थित समाज बंधु-भगिनी

पुणे : कुंभार समाज सामाजिक संस्था आयोजित राज्यस्तरीय वधुवर परिचय मेळावा भोसरी पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. अंकुशराव लांडगे वातानुकूलित नाट्यगृहात आल्हाददायक वातावरणात श्री संत गोरोबाकाका मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या आजी व माजी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

उपस्थित बांधवांचे स्वागत पुणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर सोमवंशी यांनी केले तर प्रास्ताविक वधुवर आघाडीचे अध्यक्ष हेमंत खटावकर यांनी केले. यावेळी अनेक वक्त्यांनी वधुवरांस मार्गदर्शन करताना सांगितले की, आज मुलामुलींच्या अपेक्षा खूपच वाढलेल्या आहेत त्यामुळे योग्य जोडीदार मिळणे कठीण झाले आहे. त्यासाठी इच्छुक वधूवर यांनी अपेक्षा ठेवताना मर्यादा पाळाव्यात व त्यासाठी प्रसंगी एक पाऊल मागे येण्याची तयारी ठेवावी. तसेच घटस्फोटितांचे प्रमाण समाजात वाढत असल्याबद्दल अनेकांनी चिंता व्यक्त केली.

यामध्ये प्रताप गुरव, संस्थेचे उपाध्यक्ष उमाजी सुर्यवंशी, कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, युवक अध्यक्ष संजय जोरले यांचा समावेश होता. प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर यांनी व्हाट्सॲपच्या माध्यमातून समाज बांधवांची फसवणूक केली जात आहे त्याबद्दल जागरूक व सावध राहण्याचे आवाहन केले. यावेळी व्यासपिठावर माजी अध्यक्ष सुरेश हिरे, माजी सरचिटणीस सुधीर चांदेकर, प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव घोडनदीकर, सरचिटणीस अजय वीरकर, महिला आघाडी अध्यक्ष अरुणाताई कुंभार, पुणे जिल्हा सरचिटणीस अरुण कुंभार, वधुवर आघाडीचे पदाधिकारी गंगाधर जोर्वेकर, बाळासाहेब जोर्वेकर, बाळासाहेब सोनवणे, पुंडलिक सोनवणे, प्रकाश सोनावळे, विजय विश्वासराव, अविनाश कोल्हाडे इत्यादि उपस्थित होते.

आज धावपळीच्या जीवनात सर्वानाच कार्यक्रमात सहभागी होता येत नाही म्हणून संस्थेच्या वतीने वधुवरांस व्हिडीओच्या माध्यमातून आपला बायोडाटा पाठवण्याचे आवाहन केले होते त्यास प्रतिसाद मिळाला ते व्हिडीओ स्क्रिनवर दाखविण्यात आले. यानंतर उपस्थित वधुवरांस स्टेजवर बोलावून त्यांची माहिती देण्यात आली. यात जवळपास २५० पेक्षा अधिकजण सहभागी झाले होते. तसेच त्यांच्या पालकांसहित हजारो बांधव सहभागी झाले होते. या कार्यक्रमास माजी आमदार विलास लांडे पाटील व नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष अजितदादा गव्हाणे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. कोणत्याही व्यक्ती किंवा पदाधिकारी यांचा सत्कार केला गेला नाही हे आजच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. तसेच अतिशय नियोजनबद्ध कार्यक्रम झाला याबद्दल अनेकांनी गौरवोद्गार काढले.

तसेच अत्यंत रुचकर व स्वादिष्ट भोजन दिल्याबद्दल अनेकांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे प्रवक्ते मच्छिंद्र जगदाळे यांनी केले. तर आभार प्रा. प्रशांत कुंभार यांनी केले. अशा रितीने या अविस्मरणीय कार्यक्रमाचा गोड समारोप झाला.

***

आमचे प्रेरणास्थान







सौ. कल्पना व श्री.प्रकाश शंकरराव भालेराव

श्री. निलेश प्रकाश भालेराव
Prop. Agasti Auto Link
Prop. Agasti Enterprises
Mob. 9921914777

श्री. निखिल प्रकाश भालेराव
Msc. Drug Chem, DDI Pune
Mob. : 97664 56456
Managing Director - Austres Pharmaceutical
Director - Ancure Animal Health Pvt. Ltd.
Prop. - My Chemist Group (Chain of Medicals)
Prop. - My Clinic (Chain of Clinics)



सौ. रुपाली निलेश भालेराव

कार्य

- **Austres Pharmaceutical Pvt. Ltd.**
  Corporate Office (India) :
  KK Market, 6th Floor, B - Wing,
  Office No. 58,Dhankawdi,
  Pune - 411 043.
  Branch Office (USA) :
  1950 Eldridge Pkwy, #6307,
  Houston, Texas 77077
- **Ancure Animal Health Pvt. Ltd.**
  Corporate Office (India) :
  S. No. 20/1/3, Chidanand Soc.,
  Silver Point Building, K.K. Road,
  Katraj, Pune - 411 046.
- **My Chemist**
  Corporate Office (India) :
  Vitthal Sadan, Abhinav College
  Road, Ner Silver Leaf Outlet, Katraj, Pune - 411 046.
- **My Clinic**
  Corporate Office (India) :
  Vitthal Sadan, Abhinav College
  Road, Ner Silver Leaf Outlet,
  Katraj, Pune - 411 046.
- **Agasti Enterprises**
  Import Export Solutions
- **Agasti Autolink**
  Corporate Office (India) :
  Jayandhi Complex, Office No. 5,
  Second Floor, Bhusar Market,
  Market Yard, Pune

www.austres.co.in | www.mychemist.com | www.myclinic.com

सर्वांगसुंदर गणेशमुर्तींचे उत्पादक



महेश(राजु)कुंभार
९४२२३५१४५८



जयश्री महेश कुंभार
९६३७८५४२४२

चिंतामणी आर्ट

जय आर्टस्

आमच्याकडे सर्वांगसुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील

दत्तवाडी, उरळी कांचन, पुणे ४१२ २०२



सी.पी. प्रजापति

विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.), महाराष्ट्र शासन

- संस्थापक अध्यक्ष - प्रजापति समाज विकास मंडळ (रजि.) नवी मुंबई
- प्रदेश अध्यक्ष - महाराष्ट्र, भागीदारी आंदोलन मंच
- अध्यक्ष - नार्थ इंडियन सोशल फाउंडेशन, नवी मुंबई
- अध्यक्ष - पनवेल, अंतर्राष्ट्रीय मानवाधिकार एसोसिएशन
- महासचिव - रायगड जिला, महाराष्ट्र पोलीस वॉईज असोसिएशन

Ramesh Petroleum

Dealers Bharat Petroleum Corporation Ltd.

शिवसपेठ, प्रेसनगर रोड, नागपूर फोन:0712 2748412 E-mail : nareshgugele@gmail.com

विधेश्वरी माता बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, नागपूर

नागपूर के प्राईम लोकेशनपर सॅक्शन मिहान और कोंगोहबसे लगकर * बुटीबुरी * डोंगरगांव * पिपता * बेसा * बेलतरोही * हुडकेश्वर * रामा * पोही * मौदा * भानसोली में आसान किस्तोपर प्लॉट उपलब्ध...



नरेश प्रेमलालजी जुगेले
जिल्हाध्यक्ष
राष्ट्रीय मानवधिकार फोरम, नागपुर
राष्ट्रीय सदस्य
अ.भा.कुं.प्र. महासंघ, दिल्ली.
मो. 98225 67219
98812 30037



Ramesh Jugele
Mo. : 98227 10072
Jagdish Jugele
Mo. : 98812 30037

Sachin E Bike

Plot No. 479, Great Nag Road, Ashok Sq., Near Bharat Petrol Pump, Siraspeth, Nagpur - 440009.

नवप्रकाश इंडस्ट्रिज, नागपूर व स्व. प्रेमलाल जुगेले इन्टिट्युट ऑफ सायन्स ॲण्ड मॅनेजमेंट, बुटीबोरी, नागपूर.

चौपाल व्यवसाय मार्गदर्शन व व्यवसाय नोंदणी कार्यशाळा संपन्न

कुंभार समाजातील नागरिकांना लाभ



अमरावती : विदर्भ कुंभार सुधार समिती तथा संत गोरोबाकाका समाजोन्नती समिती अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच हस्तकला विकास आयुक्त, कापड उद्योग, मंत्रालय, भारत सरकारच्या सौजन्याने स्थानिक गोरोबा भवन शशीनगर येथे नुकतेच एक दिवसीय व्यवसाय मार्गदर्शन व व्यवसाय नोंदणी कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अवधेशजी ठाकुर, सहाय्यक आयुक्त, कापड उद्योग, मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत हस्तकला सेवा केंद्र, नागपूर, अध्यक्षस्थानी विदर्भ कुंभार सुधार समितीचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडोकार, कार्पेट ट्रेनिंग ऑफिसर प्रीतम पुराशी, हस्तकला सेवा केंद्र नागपुरचे संघपाल आंबेकर, वैष्णवी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूरचे बाळकृष्ण देठे याशिवाय महाराष्ट्र बँक प्रतिनिधी रुपरावजी खोपे तसेच ॲड. गजानन तांबट, बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा संत गोरोबाकाका समाजोन्नतीचे सचिव डॉ. श्रीराम कोल्हे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मार्गदर्शकांनी पारंपारिक माती कला, भरतकाम, विणकाम आणि हस्तकलेच्या आधुनिक कलांशी सुसंगत अद्ययावत प्रशिक्षणामध्ये शासनाची भूमिका, कार्यपद्धती सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती, उत्पादनास बाजारपेठेची उपलब्धी आदींबाबत सविस्तर माहिती देऊन उपस्थितांना असणाऱ्या अडचणी निराकरण केले. याप्रसंगी डॉ. श्रीराम कोल्हे तसेच विदर्भ कुंभार सुधार समितीचे सचिव सुरेन्द्र सरोदे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. डॉ. सुधाकर शेंडोकर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले, संघटन आणि परिश्रमाचे महत्त्व अधिक आहे.

कुंभार समाजाच्या विकासाकरिता अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यामध्ये समाजातील जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घेतला पाहिजे. संचालन प्रा. सुरेश नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला कुंभार समाजातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्विते करिता सतीश गावंडे, गजानन माहुलकर, नितीन घाटोळे, विलास धामणकर, नंदकिशोर काकडे, राजेंद्र मांगूळकर, प्रा.सौ. निर्मला नांदुरकर, सौ. मंदाताई काळे, सौ. सविता कोल्हे, सौ. सविता काकडे, सौ. वैशाली सरोदे, श्रीमती प्रभाताई भागवत यांनी विशेष परिश्रम घेतले.

***

कुंभार समाज सर्वव्यापी जनगणना अभियान पुणे येथे प्रारंभ



पुणे : शहरात कुंभार समाज जनगणना अभियानास आज प्रारंभ झाला. सुरेश मारुती कोते साहेब संचालक लिज्जत पापड यांच्या हस्ते या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पश्चिम हवेलीचे कार्याध्यक्ष प्रकाश कुंभार फुलगावकर यांनी सुरेश कोते साहेब यांच्या कुटुंबियांची माहिती जनगणना फॉर्ममध्ये नोंदवून घेतली. यावेळी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतीशदादा दरेकर, उपाध्यक्ष वसंतराव घोडनदीकर, खजिनदार अनंत कुंभार, समन्वयक सुधीर चांदेकर, पारंपारिक आघाडी अध्यक्ष प्रकाश भालेराव, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील कुंभार, प्रदेश सदस्य सुभाष कर्डेकर, पुणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर सोमवंशी, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत खटावकर, पुणे शहर अध्यक्ष दीपक शिरवळकर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना सुरेश कोते साहेब म्हणाले, हा समाजाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त उपक्रम आहे. यासाठी मोठा खर्च होणार आहे. त्यासाठी समाज बांधवांनी तन, मन, धनाने सहकार्य करावे. यावेळी कोते साहेब यांनी रुपये ५००० देणगी या जनगणना अभियानासाठी दिली. यानंतर सर्व पदाधिकारी यांनी वसंतदादा सुपेकर यांचे घरी भेट दिली व त्यांचीही जनगणना फॉर्ममध्ये माहिती घेण्यात आली. वसंतदादा सुपेकर यांनी या अभियानासाठी रुपये ५००० देणगी दिली आहे. यानंतर राजेंद्र पळसदेवकर यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची माहिती नोंद घेण्यात आली. त्यांनीही या अभियानासाठी रुपये १००० देणगी दिली आहे. यानंतर प्रकाश भालेराव यांच्या घरी जाऊन पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांची जनगणना फॉर्ममध्ये माहिती घेतली. त्यांनी यासाठी रुपये १००० देणगी दिली आहे.अतिशय उत्साही वातावरणात जनगणना अभियानास पुणे जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. प्रकाश भालेराव यांनी सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांना सुग्रास भोजन दिले त्यांचे मनापासून धन्यवाद तसेच यात सहभागी झालेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, देणगीदार समाजबांधव यांचेही खूप खूप धन्यवाद.

***

नाशिक जिल्हा महिला मेळावा संपन्न !



प्रदेशाध्यक्ष सतीशदादा दरेकर उपस्थितांना मार्गदर्शन करताना सोबत मान्यवर



प्रदेशाध्यक्ष रसिकाताई खेडेकर उपस्थितांना मार्गदर्शन करताना सोबत मान्यवर

नाशिक : नाशिक जिल्हा व शहर महिला कुंभार समाज विकास समिती आयोजित मेळावा समर्थ मंगल कार्यालय नाशिक येथे रविवार रोजी महिला स्नेह मेळावा हळदीकुंकू समारंभ तसेच ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार स्वामी समर्थ मंगल कार्यालय नाशिक येथे रविवार ७ फेब्रुवारी २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष सौ. रसिकाताई खेडेकर प्रमुख पाहुणे म्हणून कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कुंभार सतीशदादा दरेकर, उपाध्यक्ष नाना मंदिलकर, कोषाध्यक्ष अनंत कुंभार, उपाध्यक्ष व्यवसाय आघाडी बाळासाहेब कुंभार, नाशिक महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त माननीय दिलीपजी मेनकर, कार्याध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर, धुळे जिल्हा अध्यक्ष सुरेश बहाळकर, नाशिक जिल्हा अध्यक्ष सोमनाथ सोनवणे, उपाध्यक्ष बापू गोरे, अशोक जाधव सरचिटणीस, सुभाषजी कुंभार संघटक प्रवीण जाधव, महिला सरचिटणीस प्रियाताई झोरे, उपाध्यक्ष सौ. अक्षता सोनवणे, सौ. माधुरी दरेकर, महिला अध्यक्ष सौ. सुवर्णा ताई जाधव, भरत क्षिरसाठ, बाळासाहेब जोर्वेकर आदी व्यासपीठावर होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवनिर्वाचित ग्रामसदस्य सौ. माया दिनकर जोंधळे सिन्नर, सौ. मोनाली हरी जोंधळे सायखेडा, सौ. माया सोमनाथ जाधव यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमास उपस्थित महिलावर्ग

सौ. रसिकाताई खेडेकर यांनी महिला सबलीकरण विषयावर मार्गदर्शन केले तसेच सतीशदादा दरेकर यांनी महिलांसाठी विविध योजनांची माहिती देत मार्गदर्शन केले. दिलीपजी मेनकर साहेबांनी महिलांसाठी विविध संधी विषयावर माहिती सक्षमीकरण विषयी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले तर प्रास्ताविक आणि परिचय सौ. सविताताई जगदाळे यांनी करुन दिला. सौ. वर्षाताई देवघडे यांनी पाहुण्यांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सौ. सुवर्णा ताई जाधव कार्याध्यक्ष शकुंतला जाधव, उपाध्यक्ष सौ. प्रमिला ताई शिंदे, सचिव ताई जगदाळे, प्रसिद्धी प्रमुख सौ. रंजना रसाळ, खजिनदार सौ. वर्षा देवघडे, संघटक सौ. उषा चित्ते, सौ. अरुणा रसाळ, सौ. सुवर्णा चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले.

***

सारंग कुंभार यांना डॉक्टरेट प्रदान



कराड : जयवंतराव भोसले कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक, ता. कराड, जि. सातारा येथील प्राध्यापक सारंग कुंभार सर यांना पी.एच.डी. पदवीने डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाकडून सन्मानित करण्यात आले. प्रा. कुंभार सर हे सन २००३ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे सरांचा शिकवण्याचा असणारा अनुभव, शिस्त, चिकाटी या जोरावर त्यांना या वयात सुद्धा यशस्वीरित्या डिग्री पुर्ण केली त्यांनी Integrated Nutrients Management under different planting Geometries in lateretic soil of kokan region या विषयात त्यांनी यशस्वीरित्या प्रबंध सादर केला त्यांना हा प्रबंध सादर करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. महाडकर सहयोगी अधिष्ठाता कृषि महाविद्यालय दापोली यांचे विशेष मोलाचे मार्गदर्शन लाभले.

य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले (बाबा), व्हा. चेअरमन व सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक तसेच ही पदवी प्राप्त करण्यासाठी विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. जाधव सर तसेच या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. समस्त कुंभार समाज आणि कुंभश्री मित्र परिवारातर्फे मन:पुर्वक अभिनंदन!

***

पालघर येथे सामाजिक संस्थेची बैठक संपन्न



दिप प्रज्वलन करताना भालचंद्र सोनावळे, सतिशदादा दरेकर, अनंत कुंभार व मान्यवर



जनगणना फॉर्मचे वाटप करताना मान्यवर

पालघर कोकण विभाग पदाधिकारी आढावा बैठक व जनगणना अभियान मार्गदर्शन शिबीर रविवार ०८ मे २०२२ रोजी, आदिवासी सेवा मंडळ, मुलांचे वसतिगृह, सिद्धेश्वरी रोड, कुंभारआळी, मु.पो.ता. वाडा, जि. पालघर येथे संपन्न झाले.

कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष – सतीशदादा दरेकर, महिला अध्यक्ष – रसिकाताई खेडेकर, उपाध्यक्ष – अक्षदा सोनवळे, कोषाध्यक्ष – अनंत कुंभार, पारंपरिक आघाडी उपाध्यक्ष – बाळासाहेब कुंभार, प्रदेश उपाध्यक्ष भालचंद्र सोनावळे, युवक कार्याध्यक्ष – संदिप पाटील, सरचिटणीस – रवींद्र रसाळ सर, प्रदेश उपाध्यक्ष – दिनकर छत्तीसकर, कोकण विभाग अध्यक्ष – संतोष रसाळकर, ठाणे जिल्हा अध्यक्ष – रामचंद्र पान्हेरकर, पालघर जिल्हा अध्यक्ष – भानुदास गोऱ्हेकर, रायगड जिल्हा अध्यक्ष – अनंत महाडकर, माजी सरचिटणीस सुधीर चांदेकर इत्यादी मंडळी व्यासपीठावर उपस्थित होते.

सर्वप्रथम सभेच्या अध्यक्ष म्हणून सतीशदादा दरेकर यांची निवड करण्यात आली. तद्नंतर कोरोना काळात निधन झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहिली. प्रमुख मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करून संत गोरोबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक भालचंद्र सोनवळे यांनी केले. पालघर जिल्हा अध्यक्षपदी भानुदास गोऱ्हेकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. त्यात प्रा. रवींद्र रसाळ, शरद वाडेकर यांनी जनगणनेची आवश्यकता का आहे याबद्दल प्रबोधन केले. सतीशदादा दरेकर यांनी अध्यक्षीय भाषणात बोलताना अनेकांच्या प्रश्नांवर उत्तर दिले. तसेच पुढील काळात संस्थेसाठी कोणत्याही कामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे त्यांनी उपस्थित पदाधिकारी व समाजबांधवांना आश्वाशीत केले. तसेच जनगणना करण्यासाठी संस्था प्रयत्नशील असून राज्यात राजकीय दबावगट निर्माण करण्यासाठी याचा समाजाला निश्चित फायदा होईल असे ही त्यांनी नमूद केले. सुधीर चांदेकर यांनी जनगणना फॉर्म कसा भरावा याची सविस्तर माहिती दिली. शेवटी आभार प्रदर्शन होऊन उपस्थित ६ जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांकडे जनगणना फॉर्म व इतर साहित्य देण्यात आले.

***

नाशिक कर सल्लागार संघटनेच्या अध्यक्षपदी बकरे तर उपाध्यक्ष पदी सोनवणे यांची निवड



नाशिक कर सल्लागार संघटनेच्या (टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन) अध्यक्ष पदी राजेंद्र बकरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष पदी संजय सोनवणे, सचिवपदी अक्षय सोनजे यांना संधी देण्यात आली.

संघटनेची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.७) नाइस संकुल येथे पार पडली. संजय सोनवणे यांनी मागील वार्षिक सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्याला सर्वांनी अनुमती देऊन कायम केले. मागील वर्षातील कामकाजाचा आढावा सभासदांसमोर सादर करण्यात आला.

यावेळी पुढील वर्षाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. राजेंद्र बकरे यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड घोषित करण्यात आली. मावळते अध्यक्ष निवृत्ती मोरे यांनी बकरे यांच्याकडे पदभार सोपवला. उपाध्यक्षपदी संजय सोनवणे, सचिवपदी अक्षय सोनजे, खजिनदारपदी नितीन फिरोदिया, सहसचिवपदी जावेद अन्सारी, संघटकपदी प्रकाश विसपुते, कमिटी सभासद म्हणून झुंबरलाल उपाध्ये, नितीन डोंगरे, संदीप गाढवे, मनोज धाडीवाल, रवी चोपडा, निखील देशमुख यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी ज्येष्ठ सभासद व सर्व माजी अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. निवृत्ती मोरे, अनिल चव्हाण, रंजन चव्हाण, प्रदीप क्षत्रिय, सुरेश बोथरा, सुनील देशमुख, नितीन डोंगरे, योगेश कातकाडे, कमलेश सानप, सचिन येवलेकर आदींसह सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन जयप्रकाश संजय सोनवणे यांनी केले.

***

कुंभार समाज सिंधुदुर्ग जिल्हा मेळावा उत्साहात संपन्न



मेळाव्यात मागर्दशन करताना गोव्याचे आमदार प्रेमेंद्र शेट



मेळाव्यात मागर्दशन करताना सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर

सिंधुदुर्ग : कुंभार समाजाची लोकसंख्या दाखविण्यासाठी संघटनेने जनगणनेचे काम हाती घेतले असून हे काम कुंभार बांधवांनी एकजुटीने पूर्ण करून समाजाची ताकद दाखवावी. कारण समाजाला ताकद दाखविण्याची आता वेळ आली आहे. असे प्रतिपादन कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सतीशदादा दरेकर यांनी केले. संत गोरा कुंभार समाज उत्कर्ष मंडळ सिंधुदुर्गच्या वतीने कुंभार समाज जिल्हा मेळावा कसाल हायस्कूल येथे आयोजित केला होता. या मेळाव्याच्या उदघाटन प्रसंगी सतीशदादा दरेकर बोलत होते. यावेळी गोव्याचे आमदार मा. प्रेमेंद्र शेठ जिल्हाध्यक्ष, प्रा. गणपत शिरोडकर, शरद वाडेकर, तुळशीदास कुपेरकर, रामदास सांगवेकर, वसंतराव घोडनदीकर उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश, प्रकाश भालेराव, अध्यक्ष पारंपरिक व्यवसाय आघाडी, ज्ञानेश्वर सोमवंशी अध्यक्ष पुणे जिल्हा, अनंतराव कुंभार कोषाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश प्रकाश साळवी, यशवंत शेटुलकर, दीपक बुरवाडकर, सुभाष शेटकर, विलास गुडेकर, सौ. करुणा चिंदरकर, समीर शेटकर, ॲड. जयंत गुडेकर, बंडेरावर कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

शासनाकडून कुंभार बांधवांना माती पुरविण्याची परवानगी देण्यात आली असून एप्रिल ते मे महिन्यात वर्षभरासाठी लागणारी माती उचलावी. तसेच बेरोजगारांचा प्रश्न रोजगार मेळावा घेऊन सोडवला जाणार आहे. संघटना चांगले काम करीत असून कुंभार समाज आता पुढे जात आहे. महिलांना प्रतिनिधीत्व देऊन संघटनेला महिलांचा पाठिंबा मिळवावा. त्यासाठी लवकरच महिला सक्षमीकरणाचे काम संघटनेमार्फत सुरु होणार आहे. समाज भवानासाठी चांगला आराखडा तयार करा, त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य लाभेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आमदार प्रेमेंद्र शेट म्हणाले, गोवा व सिंधुदुर्ग एक असून हे नाते टिकविण्याचे काम संघटना करीत आहे. गोव्यामध्ये कुंभार समाज अल्प असून कुंभार समाज गोव्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. कुंभार बांधवांनी गोरोबा काकांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विलास गुडेकर, प्रकाश भालेराव, शरद वाडेकर यांनी विचार मांडले. आरंभी सतीशदादा दरेकर यांच्या हस्ते संतश्रेष्ठ संतशिरोमणी श्री गोरोबा काका कुंभार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सतीशदादा दरेकर यांच्या हस्ते तालुका अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे शासकीय सेवेत उल्लेखनीय काम करणाऱ्या कुंभार बांधवांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. गणपत शिरोडकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नारायण साळवी यांनी केले. आभार दिलीप सांगवेकर यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने कुंभार समाजबांधव उपस्थित होते.

***

सानिया कुंभार हिची भारतीय संघात निवड



मुंबई : २३ ते २६ जून दरम्यान थायलंड येथे होणाऱ्या रिदमिक जिम्नॅस्टिक्सच्या आशियायी अजिंक्यपद स्पर्धेसाठी ग्रुप विभागात भारताकडून खेळण्यासाठी सॅनियची निवड केली गेली आहे.

भारत सरकारने २ आणि ३ जून रोजी जम्मू येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय निवड स्पर्धेत ती निवडली गेली.

या स्पर्धेत भारतभरातून २०० पेक्षा जास्त मुली सहभागी झाल्या होत्या. त्यामधून सानियाची निवड झाली ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. सानियाने नुकतीच दहावीची बोर्ड परीक्षा दिली असून परीक्षेदरम्यानदेखील ती नियमित प्रॅक्टिसला जात होती. वयाच्या ७ व्या वर्षांपासून ती खेळते आहे.

सानिया पत्रकार कोमल कुंभार यांची कन्या आहे. जेष्ठ समाज सेवक लेखक कै. रामलिंग कुंभार यांची ती नात आहे.

सानिया तुझा आम्हा सर्वांना अभिमान आहे. समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांचे तर्फे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व भावी स्पर्धेमध्ये भारताला सुवर्ण पदक मिळवून देण्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

***

वीटभट्टी व्यावसायिकांचे अवकाळीमुळे नुकसान



खामखेडा : अवकाळी पावसामुळे कच्च्या विटांची झालेली दुरावस्था.



गेल्या वर्षापासून कोरोना महामारीमुळे वीट व्यावसायिक आर्थिक संकटात आहेत. त्यातच आता अवकाळी पावसाने वीट व्यावसायिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. पावसामुळे होणार नुकसान, मजुरांचा पगार व कच्चामाल यांचा ताळमेळ घालून व्यवसाय करणे कठीण बनले आहे. **बापू गोरे,** वीटभट्टी व्यावसायिक, खामखेडा

सटाणा : रात्रीपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. विटा तयार करण्यासाठी लागणारा बायोगॅस, कोळसा, माती व लाकूड पावसात भिजल्याने परत वीटा तयार करण्यासाठी लाखो रुपयांचा भुर्दंड बसणार आहे.

दोन वर्षांपासून कोरोनाच्या संकटामुळे बांधकाम व्यवसाय काहीसा मंदावल्याने वीट व्यावसायिक आधीच संकटात असताना, आता अवकाळी पावसाने त्यात भर घातली आहे. कसमादे भागात सध्या बहुतांश वीटभट्टीच्या ठिकाणी या कच्च्या मातीच्या विटा तयार करण्याचे काम सुरू आहे. कच्ची वीट वाळण्यासाठी थोडा उशीर होत असतो. त्यासाठी ती पसरून किंवा उभी करुन ठेवली जाते. सोमवारी सायंकाळ पासून अचानक सुरू झालेल्या अवकाळी पावसाने नुकत्याच तयार केलेल्या मातीच्या विटा पूर्ण भिजल्याने मोडल्या आहेत. त्यामुळे त्या पुन्हा मातीत मिसळाव्या लागत आहेत. पावसाचा जोर अधिक असल्याने वीटभट्टीचालकांनी कागद टाकले असून, वीज पावसाने व्यावसायिकांचे हे प्रयत्न सपशेल अयशस्वी ठरले. आणखी दोन दिवस पाऊस पडण्याची चिन्हे असल्याने वीटभट्टीमालकांचे अधिक मोठे नुकसान होईल, या भितीपोटी कच्च्या वीटा वाचविण्यासाठी वीटभट्टीमालकांची धावपळ होत आहे. वीटभट्टी व्यावसायिकांना या संकटातून सावरण्यासाठी शासनाने मदत करावी, अशी मागणी बापू गोरे या व्यावसायिकांनी केली आहे.

***

महसूल मंत्री विखे पाटील यांना वीट उद्योजकांचे निवेदन



मुंबई : माननीय महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे–पाटील साहेब यांची भेट घेऊन महाराष्ट्र राज्यातील विट भट्टी धारक कुंभार समाजाचा लोकांना शासनाने दिलेल्या सवलती चा लाभ मिळण्यासाठी सुलभता यावी व विट भट्टी धारकांना हरित लवादातून वगळून माती उत्खननासाठी पर्यावरणाची अट रद्द करावी अशी मागणी करण्यात आली. मा. मंत्री महोदय यांनी सकारात्मक उत्तर दिले व लवकरात लवकर राज्यातील सर्व जिल्हा अधिकारी यांची मिटीग घेऊन समस्या सोडवू असे आश्वासन शिरपूर तालुका शिष्टमंडळाला दिले. या कामी आमचे नेते मा.आ. भाईसाहेब अमरिशभाई पटेल यांनी सकारात्मक पाऊल उचलले व संपूर्ण महाराष्ट्र कुंभार समाजाला मदत केली. निवेदन देताना किशोर कुंभार युवा सरचिटणीस भाजपा शिरपूर तालुका, गोकुळ भाऊ कुंभार तालुका अध्यक्ष, सुभाष दादा कुंभार, हिरालाल कुंभार, संजय कुंभार, संजय कुंभार, आत्माराम कुंभार, लिलाचंद कुंभार, भुषण कुंभार, भुपेश कुंभार, हिरालाल कुंभार, विजय कुंभार व पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. प्रशांत कुंभार यांचा सन्मान



पुणे : महाराष्ट्र शासन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय पुणे आयोजित, शिक्षक गौरव सोहळा या कार्यक्रमामध्ये, विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारक्षम बनवण्यासाठी आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा आणि प्रामाणिकपणे सेवा केल्याबद्दल तसेच कृषी क्षेत्रामध्ये डाळिंब, द्राक्ष आणि इतर फळ पिकांमध्ये शेतकरी परिसंवाद घेऊन शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केल्याबद्दल सन्मानपत्र देऊन डॉ. प्रशांत कुंभार (मोडनिंब) यांना सन्मानित करण्यात आले.

राजश्री टिंबर मर्चन्ट व जितेंद्र ट्रेडर्स

जनरल कॉन्ट्रक्टर अॅन्ड सप्लायर्स

आमचे प्रेरणास्थान



जितेंद्र अशोकराव हर्णसकर
मो. 9850833695



अशोकराव ब. हर्णसकर
मो. 9850402010

सचिन अशोकराव हर्णसकर
नगराध्यक्ष भोर नगरपालिका
मो. 9850243030

सागवानी व इमारतीच्या जंगली, लालटीक, बेलपण, पीळकोटा, मंगलोरी, कौल, वासे, शहाबादी फारशीचे व्यापारी

मु. पो. ता. भोर, जि. पुणे.फोन. ऑफिस : ०२११३ - २२३९७३

आमचे प्रेरणास्थान



कै. शंकरराव हर्णसकर उर्फ भाऊ



कै. नरेंद्र शंकरराव हर्णसकर

श्री वाढेश्वर

विट कारखाना

वडगांव डाळ, शिरवळ-भोर रस्ता, ता. भोर, जि. पुणे.

प्रोप्रा. सौरभ नरेंद्र हर्णसकर (बी.ई.)

मो. 9822087678

४०४, नवी आळी, ता. भोर, जि. पुणे. फोन ०२११३-२२२००५



पंकज आर्टस्

आमच्याकडे प्लॉस्टर व शाडू मातीच्या सुबक व रेखीव गणपती मुर्ती होलसेल भावात मिळतील.



श्री. बाळासाहेब धोंडिबा कुंभार
मो. ९४२३२१२१८४



पंकज बाळासाहेब कुंभार
G.D. Arts



श्री. विठ्ठल धोंडिबा कुंभार
मो. ९६७३१३२३६५

मु. भवरापुर, पो. उरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२.



विट कारखाना

प्रोप्रा. : धनंजय रमेश हर्णसकर

५०३, नागोबा आळी, भोर, पुणे ४११ २०६.

फोन : निवास - (०२११३) २२२७७३

मोबाईल - ९८२२२७२४७३

प्रेरणास्थान : रमेश बाबुराव हर्णसकर



श्री गणेश मेडिकल अँण्ड जनरल स्टोअर्स

प्रोप्रा. : गणेश रमेश हर्णसकर

मोबाईल - ९८२२४२६२७३

सम्राट चौक, भोर, जि. पुणे. फोन : (०२११३) २२२०८४

आमचे प्रेरणास्थान



कै. अनंतराव बाबुराव हर्णसकर

।। श्री वाढेश्वर प्रसन्न ।।



प्रशांत अनंतराव हर्णसकर

सिव्हिल इंजिनियर आणि कॉन्ट्रॅक्टर

सर्व प्रकारचे बंगले बांधकाम, नुतनीकरण आणि देखभालीची कामे खात्रीने योग्य भावात करून मिळतील.

ऑफिस : राऊतबाग, बि.नं. सी-२, फ्लॅट नं. २८, ३ रा मजला, धनकवडी, पुणे ४११ ०४३.
फोन : (०२०) २४३७२१४१ मो. : ९८२२७८८८४२.



किसन उर्फ बाळासाहेब विठ्ठल जामदार
अध्यक्ष
शिरुर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ

मयुरेश विट कारखाना

आमच्याकडे उत्तम प्रतीची विट होलसेल भावात मिळेल

संकल्प, कुंभार आळी, मु. पो. शिरुर (घोडनदी),
ता. शिरुर, जि. पुणे ४१२ २१०

फोन : (02138) 225899 मो. 9226241416, 9822098858.

कोकण खेड ''कुंभाड'' कुंभार महिला मेळावा संपन्न
''सोहळा समाज कार्याचा... संस्थेच्या महोत्सवी वर्षाचा....''

-अनिल नरवणकर



रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त केक कापताना महिला भगिनी



विविध स्पर्धेतील विजेत्या महिला भगिनी



कार्यक्रमाला उपस्थित महिला भगिनी



रंगला संगीत खुर्चीचा खेळ

पिंपरी : ''कुंभाड'' कुंभार समाज संघटना पुरस्कृत संत शिरोमणी गोरोबाकाका समाज सेवा संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कोकण खेडगाव कुंभाड मधील पिंपरी चिंचवड, पुणे स्थित महिला भगिनींच्या मेळाव्याचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. सदर मेळावा दि. १३ मार्च २०२२ रोजी ४ वाजता संत शिरोमणी गोरोबाकाका, विठ्ठल रुक्मिणी मंदिर नेहरुनगर, पिंपरी चिंचवड येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महिला कार्यकर्त्या सौ. आशा बबन परबते यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन करण्यात आले. कोकण खेड कुंभाड कुंभार समाज संघटनेचे अध्यक्ष शांताराम बाबू गुडेकर यांनी जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित सर्व महिला भगिनिंना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे संस्थापक अनिल नरवणकर यांनी प्रास्ताविकात जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळाव्याचे महत्व सांगितले की, भारतीय संस्कृती आदर्श ठरलीय ती आमच्या जीवनातील स्त्रीयांच्या अनन्य साधारण योगदानामुळे. स्त्रिया या... मैत्रिण... अर्धांगिनी... आई... आजी अशा विविधांगी भूमिकांना न्याय देत या जीवनात चैतन्य निर्माण करतात. सृष्टीच्या सर्जन आणि सृजनतेच्या त्या जन्मसिद्ध हकदार आहेत. त्याच आमची शक्ती आहेत.

प्रथमच संपन्न होणाऱ्या मेळाव्यात विविध कार्यक्रम व खेळांच्या स्पर्धा जसे संगीत खुर्ची, तंबोला, उखाणे स्पर्धा अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा खेळांचे सूत्रसंचालन आर्मी स्कूल शिक्षिका सौ. संपदा संपत परबते यांनी आपल्या बहारदार शैलीने खुपच रंगत आणली. खेळाच्या सादरीकरण नियोजनात सौ. शितल दिशांत साळवी व सौ. स्मिता संतोष परबते या जोडीची उत्तम साथ सौ. संपदा मॅडम यांना मिळाली.

महिला मेळाव्यासाठी रविंद्रशेठ साळवी यांच्याकडून हळदी कुंकूचे वाण (पंचधातुचे ताट) महिला भगिनीना भेट देण्यात आले. बबन परबते यांनी कार्यक्रमाला लागणारे श्रीफळ, गुलाब पुष्प भेट दिले. शांताराम गुडेकर यांनी चहापाण्याच्या व्यवस्थेची जबाबदारी पार पाडली. श्रीमती वंदना सुरेश हिवरकर यांनी रुपये ५००० दिले. दिशांत दिपक साळवी यांनी १००० रु. दिले. संतोष भिवा परबते यांनी १००० रु. दिले. मनोज कृष्णा साळवी यांनी १००० रु. दिले. सौ. सोनल संपत परबते यांनी १००० रु. दिले. सौ. अंकिता अनिल नरवणकर यांनी १००० रु. दिले. कु. ओमकार संजय साळवी यांनी मंदिर सभागृहाची मनमोहक, सुंदर सजावट केली. समाज अध्यक्ष शांताराम गुडेकर व संस्था अध्यक्ष प्रभाकर गुडेकर यांनी सर्व देणगीदारांना गुलाब पुष्प देऊन आभार व्यक्त केले.

यावेळी महिला कार्यकारणीसाठी काम करण्यास स्वेच्छेने पुढे येणाऱ्या १४ महिला भगिनी प्रतिनिधीची निवड करण्यात आली.

त्यांची नावे खालील प्रमाणे आहे–

सौ. आशा बबन परबते, सौ. प्रतिक्षा प्रतीक साळवी, सौ. वनिता जयवंत साळवी, सौ. दिव्या दीपक साळवी, सौ. शितल दिशांत साळवी, सौ. निलीमा दिलेश साळवी, सौ. दर्शना नितीन नरवणकर, सौ. स्मिता संतोष परबते, सौ. पूजा सतीश परबते, सौ. अंकिता संदेश परबते, सौ. आशा शिवाजी साळवी, सौ. स्नेहल महेश साळवी, सौ. भाग्यश्री साई हिवरकर, श्रीमती गीता हेमंत पवार.

मेळावा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे तसेच उपस्थित महिलां भगिनी व बांधवांचे शांताराम गुडेकर यांनी मन:पूर्वक आभार मानून महिला मेळावा कार्यक्रम संपन्न झाला.

***

जुन्नर तालुका गुणगौरव समारंभ संपन्न



विशेष सत्कार या प्रसंगी हर्षल सुखदेव शिंदे सावरगाव यांचा इंडियन आर्मीमध्ये लेफ्टनंटपदी निवड झालेबद्दल जुन्नर तालुका शिक्षक संघाचे वतीने विशेष मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार कोते साहेबांचे वतीने करणेत आला. हा सत्कार हर्षल याच्या वतीने त्याचे आई वडील सौ व श्री सुखदेव शिंदे यांनी स्वीकारला

जुन्नर (सावरगाव) : जुन्नर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी देखील गुणगौरव सोहळा झाला. उद्योजक, आदर्श शिक्षक, आदर्श माता आणि आदर्श पत्रकार, समाजभूषण असे पुरस्कार देऊन समाजातील चांगली कामगिरी करणाऱ्या मान्यवरांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मिळाली.

या सोहळ्याचे उद्घाटन लिज्जत पापड उद्योग समूहाचे सर्वेसर्वा उद्योजक सुरेश कोते यांच्या हस्ते झाले. इयत्ता दहावी ते पदवी, पदविकापर्यंत चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि कुंभार समाजातील वेगवेगळ्या स्तरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सर्वोत्कृष्ट कारागीर, सर्वोत्कृष्ट वीटभट्टी कामगार, सर्वोत्कृष्ट मूर्तिकार यांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी शिक्षण उपसंचालक रंगनाथ जाधव, पुणे जिल्हा कुंभार समाज उन्नती मंडळ अध्यक्ष संतोष कुंभार, उपाध्यक्ष बाबाजी कुंभार, पत्रकार विजय अंबडे, आंबेगाव तालुका कुंभार समाज उन्नती मंडळ माजी अध्यक्ष मनोहर सोमवंशी, माजी पंचायत समिती सदस्य संतोष वाघ, संत गोरोबाकाका पतसंस्था अध्यक्ष गोरक्षनाथ उकिरडे, पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळ उपाध्यक्ष सुनील जाधव, सेवानिवृत्त वैद्यमापन अधिकारी सुखदेव शिंदे, डिंगोरेच्या सरपंच सीमा सोनवणे, उद्योजक मीननाथ शिंदे, माजी महिला अध्यक्षा सुमनताई गोरे, विजय शिंदे, श्रीकृष्ण सोनवणे, संदीप शिंदे, भाऊ कुंभार, वसंत रसाळ, नवनाथ शिंदे तसेच जुन्नर तालुका कुंभार समाज उन्नती मंडळ विद्यमान अध्यक्ष उमेश शिंदे आदी मान्यवर तसेच विद्यार्थी वर्ग आणि कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सदानंद उकिरडे सर यांनी केले. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले, तर ललिता भागवत यांनी आभार मानले.

हा कार्यक्रम साई लॉन मंगल कार्यालय सावरगाव येथे संपन्न झाला, या कार्यालयाचे संचालक सुखदेव शिंदे यांनी कार्यालय विनामूल्य दिले तसेच कार्यक्रमाच्या ट्रॉफी देणगी दिल्या त्यांचे विशेष आभार मानून सत्कार करण्यात आला.

***

प्रा. दिलीप सोनवणे यांची पुस्तके संस्कृतीचा आदर्श जोपासणारी : उपायुक्त दिलीपराव मेनकर



नाशिक : पुस्तके ही मानवी संस्कृती घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, अशा वाटेवर प्रा. दिलीप सोनवणे यांनी लिहिलेली 'अभंगवाणी संत तुकारामांची : एक अन्वयार्थ' आणि 'माझी सिंधुमाय' ही दोन्ही पुस्तके मानवी संस्कृतीचा आदर्श जपणारी असल्याचे मत नाशिक येथील म.ना.पा.चे उपायुक्त दिलीप मेनकर यांनी व्यक्त केले.

संगमनेर येथील सेवानिवृत्त प्रा. दिलीप सुखदेव सोनवणे यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन ग्रेप्स गार्डन येथे संपन्न झाले. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपायुक्त दिलीपराव मेनकर बोलत होते. अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ. बाबूराव उपाध्ये होते. स्नेहप्रकाश प्रकाशनचे प्रमुख पत्रकार प्रकाश कुलथे, शिवव्याख्याते एस. झेड. देशमुख, मा. नगरसेवक कैलास वाकचौरे, दिलीपराव सोनवणे, श्रीयुत वाघ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रारंभी एस.झेड. देशमुख यांचे देशभक्ती आणि समर्पित व्यक्तिमत्त्व याविषयी प्रवचन झाले. मान्यवर पाहुण्यांसह श्रीमती सिंधूताई सुखदेव सोनवणे, छायाताई दिलीप सोनवणे, संकेत सोनवणे, प्राजक्त सोनवणे यांनी प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन करण्यात येऊन दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन संपन्न झाले. स्वागत प्रा. दिलीप सोनवणे यांनी करुन पाहुण्यांचा सत्कार केला. अध्यक्षीय सूचना संकेत सोनवणे यांनी करुन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सौ. प्राजक्ताताई सोनवणे यांनी अनुमोदन दिले.

प्रास्ताविक अरविंद सोनवणे यांनी केले. पत्रकार प्रकाश कुलथे यांनी प्रा. सोनवणे यांच्या लेखनाचे कौतुक करुन पुस्तकनिर्मितीचे अनुभव सांगितले. कैलास पवार, एस.झेड. देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संगमनेर येथील सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष सुरेश नागरे, भारत जोर्वेकर, अप्पासाहेब जोर्वेकर, बबनराव गोरे, रमेशशेठ जोर्वेकर, सुभाषशेठ जोर्वेकर, प्रकाश खेमनर, अशोक सोनवणे, मच्छिंद्र जोर्वेकर, राजेंद्र जोर्वेकर, सुधीर जाधव आदींचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन दिलीपराव वाकचौरे यांनी केले. अशोक सोनवणे यांनी आभार मानले.

कुमावत को. ऑप. क्रेडीट सोसायटी कोल्हापूर यांचे मार्फत आढावा बैठक आणि स्नेहमेळावा

– चंद्रकांत कुंभार, गडहिंग्लज



उपस्थितांना मागदर्शन करताना चंद्रकांत कुंभार समवेत संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कुंभार सरवडेकर, संजयकाका निगवेकर, एम.व्ही. कुंभार, विजय बीडकर, संभाजी आरेकर व उपस्थित सभासद

शुक्रवार दि. १०/१२/२०२१ रोजी करवीर तालुक्यातील बीडशेड येथे कुमावत को. ऑप. क्रेडीट सोसायटीच्या सभासदांचा आणि कुंभार समाज बांधवांचा स्नेहमेळावा संध्याकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला होता. कुमावतच्या सभासदांच्या अडचणी जाणून घेऊन उपाययोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या मेळाव्याचे प्रास्ताविक आणि स्वागत मॅनेजर महेश कुंभार यांनी केले.

कुमावत को. ऑप. सोसायटीच्या सभासदांच्या अडीअडचणी संचालकांनी ऐकून घेऊन अध्यक्ष प्रकाश कुंभार सरवडेकर यांनी मौलिक मार्गदर्शन केले. सभासदांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व संचालक कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली. २०१६ ते २०२१ या कालावधीत संचालक मंडळाने केलेल्या कार्याचा लेखाजोखा मांडण्यात आला.

संचालक मंडळाने केलेले कार्य–

१) कुमावतची सभासद संख्या वाढविली आहे. संचालक मंडळाने तळागाळातील समाजबांधवांना सभासदत्व करुन दिले आहे. २) संस्थेचा राखीव निधी वाढलेला आहे. म्हणजेच संस्थेचा कारभार अतिशय पारदर्शी केलेला आहे. ३) गेली दोन वर्षे कोरोना महामारीमुळे सर्वांचे आर्थिक नुकसान झालेले असून सुद्धा संस्थेकडील ठेवी वाढलेल्या आहेत. म्हणजेच संचालक मंडळावर सभासद व ठेवीदारांनी विश्वास व्यक्त केलेला आहे. ४) नफा मिळविणे हे ध्येय न ठेवता सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्याचे उद्दिष्ट्य ठेऊनही सातत्याने दरवर्षी नफा वाढलेला आहे. ५) पहिली दोन वर्षे १२ टक्के व त्यानंतरची सलग तीन वर्षे १३ टक्के डिव्हिडंड वाटप केलेले आहे. ६) ऑडिट वर्ग सातत्याने 'अ' मिळालेला आहे. हे प्रगतीचे लक्षण आहे. ७) महाराष्ट्रातील पहिले कुंभार समाजातील मुलांच्यासाठी शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी वसतिगृह कुमावत सोसायटी आणि कोल्हापूर शहर कुंभार माल उत्पादक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने बांधण्यात आले आहे. ८) सन २०१९ मध्ये आलेल्या महापूरामध्ये पूरबाधित सभासदांना प्रत्येकी १५०० प्रमाणे ३१४ सभासदांना रक्कम मदत म्हणून दिली आहे.

अध्यक्ष आणि संचालक मंडळाने स्वत:ची आत्मप्रौढी न मिरविता कुमावत सोसायटीचे सभासद चंद्रकांत कुंभार यांना संस्थेने केलेल्या कामाचा आढावा घेण्याची संधी दिली. यावरुन संस्थेचा कारभार पारदर्शी असल्याचे दिसून येते.

चंद्रकांत कुंभार यांनी कुंभार समाजाच्या व्यावसायिक अडचणीबाबत मार्गदर्शन केले. कुंभार समाज सशक्त मिशन केंद्र शासन राबवत आहे. त्याबद्दलची माहिती देण्यात आली. संतोष कुंभार जिल्हाध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था यांनी वीट व्यावसायिकांना मार्गदर्शन केले. माती उत्खनन परवाना, कुंभार समाजासाठी वीट व्यवसाय परवाना कसा काढावा याबाबत सविस्तर माहिती दिली.

समाज बांधवांकडून वधुवर मेळाव्याची मागणी करण्यात आली. वधुवर मेळाव्याचे प्रमुख दिनकर कुंभार साहेबांनी सविस्तर माहिती दिली. सध्या ओमायक्रॉनमुळे मेळावा घेण्याचे थांबविलेले असून ही परिस्थिती निवळल्यानंतर जानेवारी महिन्यात मेळावा घेण्याचे सुतोवाच त्यांनी केले. या मेळाव्यासाठी सांगरुळ, बीड, महे, आरे, म्हारुळ, शिरोली, सडोली, हासूर, म्हालसवडे, गर्जन आणि आरळे परिसरातील कुमावतचे सभासद व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अगदी हसत खेळत टाळ्यांच्या गजरात संचालक मंडळाने केलेल्या कामाचे कौतुक उपस्थित सभासदांनी केले.

या स्नेहमेळाव्यासाठी कुमावत को. ऑप. सोसायटीचे अध्यक्ष मा. प्रकाश कुंभार सरवडेकर, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक मा. संजयकाका निगवेकर, संचालक मा. एम.व्ही. कुंभार, मा. संभाजी आरेकर, मा. संतोष कुंभार महेकर, माजी संचालक मा. राजेंद्र कुंभार म्हारुळकर, मा. दिनकर कुंभार, मा. विजय बिडकर, मा. आनंदा वाघापुरे, गडहिंग्लज तालुक्यातून मा. श्रीकांत कुंभार, मा. सूर्याजी कुंभार, मा. दिनकर कुंभार सर, मा. चंद्रकांत कुंभार आणि मा. संतोष कुंभार, जिल्हाध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था मा. महेश कुंभार मॅनेजर कुमावत सोसायटी व कर्मचारी बांधव उपस्थित होते. संचालक मंडळाने उपस्थित सर्व समाज बांधवांना स्वत:च्या पैशातून स्नेहभोजन दिले. उपस्थित सर्व समाज बांधवांचे आभार कुमावतचे अध्यक्ष मा. प्रकाश कुंभार सरवडेकर यांनी मानले.

***

गोरोबाकाकांच्या वाड्याचा वर्धापनदिन सर्व संघटनाच्या वतीने उत्साहात संपन्न
महाराष्ट्रातील सर्व संघटना महासंघाच्या झेंड्याखाली एकत्र येणार





खासदार ओमराजे निंबाळकर यांनी वर्धापनदिन कार्यक्रमास उपस्थिती लावली असता कुंभार समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत मार्गदर्शन करताना महासंघाचे अध्यक्ष अशोकराव सोनवणे समवेत उपस्थित नेते व समाज बंधु-भगिनी

उस्मानाबाद : संत परीक्षक गोरोबाकाका कुंभार यांच्या वाड्याच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी दिनांक १० जून २०२२ रोजी संपुर्ण महाराष्ट्रातून कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. सकाळी गोरोबाकाकांच्या समाधीवर अभिषेक व पूजन करण्यात आले. नंतर गोरोबाकाकांच्या वाड्यात पुजन करण्यात आले. ह.भ.प. दिपक महाराज खरात व ह.भ.प. गुलाब महाराज कुंभार यांचे प्रवचन संपन्न झाले. तद्नंतर महाराष्ट्रातील सर्व संघटना महासंघाच्या झेंड्याखाली एकत्र कार्य करतील असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था संस्थापक मोहनराव जगदाळे, प्रदेश अध्यक्ष शामशेठ राजे, संघटक दत्ता कुंभार डाळजकर आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, तसेच कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशचे प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर, कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, वसंत घोडनदीकर, अनंत कुंभार, सौ. अरुणाताई कुंभार व सर्व पदाधिकारी आणि महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अशोकराव सोनवणे, सचिव विनायक राऊत, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तिनही संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कुंभार समाजाची शिखर संस्था महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे सदस्य होऊन महासंघाच्या झेंड्याखाली एकत्र येऊन शासन दरबारी कार्य करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला.

या वर्धापन दिन सर्व संघटनांनी मिळून साजरा केल्याने कुंभार समाजात आनंदाचे वातावरण होते. एकत्रीकरणासाठी अशोकराव सोनवणे, विनायक राऊत व मनोहर महाराज शिंदे यांनी अथक प्रयत्न केले. या प्रसंगी विचार मंथन बैठकीत खालील मान्यवरांनी आपले विचार मांडले. अशोकराव सोनवणे, महादेवराव खटावकर, विनायक राऊत, सतिशदादा दरेकर, दत्ता कुंभार (डाळजकर), राजेंद्र बोरुडे, देवराव कापडे, मोहनराव जगदाळे, वामन महाराज शिंदे, विश्वनाथ कोळमकर, रंगनाथ सुर्यवंशी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेर नगरीचे माजी सरपंच महादेवराव खटावकर यांनी केले. तर सुत्रसंचालन महादेव कुंभार सर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते ह.भ.प. वामन महाराज शिंदे होते. आभार नागनाथ कुंभार यांनी मानले. कार्यक्रमानंतर गोरोबाकाका वाडा ते गोरोबाकाका समाधी मंदिर टाळ मृदुंगाच्या गजरात दिंडी काढण्यात आली तद्नंतर महाप्रसादाचा लाभ सर्वांनी घेतला.

या कार्यक्रमास खालील मान्यवर उपस्थित होते.

सतिशदादा दरेकर, वसंत घोडनदीकर, अनंतराव कुंभार, अजय विरकर, सुधीर चांदेकर, माधुरीताई दरेकर, अरुणाताई कुंभार, अपर्णा शिंदे, मनोहर सोमवंशी, वसंत सोमवंशी, सौ. व श्री. पांडुरंग तात्या कुंभार (कळंब), पांडुरंग काका कुंभार (उस्मानाबाद), नामदेवराव कुंभार, ईश्वर महाराज कुंभार, सुरेशराव कुंभार, बाळासाहेब कुंभार (सासवडकर), शरद दरेकर, अमोल जगदाळे, पत्रकार महादेव कुंभार (लातूर), आनंदा साळवी, दिलीप राजे, ज्ञानोबा कानुरे, नंदकुमार संगापुरे, व्यंकट गोरगिले, मनिषाताई टेंभरे (अमरावती), संतोष सरोदे, नाना सौदागर (अकोला), संजय गंधरवार (यवतमाळ), कमलताई कुंभार (नारी सन्मान राष्ट्रपती पुरस्कार), नंदकुमार सोनवणे, राजेंद्र रोकडे, बाबासाहेब सोनवणे, माणिक रसाळ, सुभाष जोंधळे (येवला), नामदेव महाराज कुंभार, संतोषशेठ पाषाणकर, नथूशेठ कुंभार (पुणे), धनंजय हणसकर, मयूर कुंभार (भोर), उमाजी सुर्यवंशी, संजय जोर्ले, मनोहर मरकड, ज्ञानेश्वर म्हस्के, रमाकांत क्षीरसागर, सोमनाथ सोनवणे, राधेशाम गायकवाड, राजेंद्र सवांदे (नाशिक), साईनाथ सोनवणे, मनोहर जाधव (मुंबई), शिवाजी महाशिकारे, भिमाशंकर म्हेत्रे (सोलापूर), सुर्यकांत घोडके (पैठण), बबनराव गोरे (धांधरफळ), रामदास कुंभार (बीड), सुनंदा संजय बेल्लाळे (लातूर), केरबा एकांबे, किसन काळे, नामदेव महाराज कुंभार (मावळ).

***

थर्मल पॉवर स्टेशन सोलापुर येथे विकास संस्थेतर्फे फ्लाश ॲशसाठी आंदोलन





आंदोलनामध्ये सहभागी महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे प्रदेश अध्यक्ष शामशेठ राजे, मातीकला सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता कुंभार, राष्ट्रीय उपाध्यक्ष नागनाथ आण्णा कुंभार, विट कारखानदार प्रदेश अध्यक्ष बळवंतराव कुंभार, प्रदेश संपर्क प्रमुख ज्ञानेश्वर भागवत, निलेश कुंभार, महादेव खटावकर, बाळासाो शिरसाट, ऋषी कुंभार, दिपक खैरनार व पदाधिकारी

सोलापूर : दिनांक २१ ऑक्टोंबर रोजी अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ नवी दिल्ली व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था मुंबई यांचे वतीने थर्मल पॉवर स्टेशन सोलापूर येथे कुंभारी विटा, सिमेंट ब्लॉक, टाइल्स इत्यादी छोटे व मध्यम उद्योगांना लागणारी ओली प्लाय राख संपुर्ण देशात केंद्र शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर २००९ व २७ फेब्रुवारी २०१९ नुसार व आताही देतात तशी विना मोबदला मिळावी व आता राष्ट्रीय औष्णिक महामंडळ नवी दिल्ली यांनी सदर राख विकण्यासाठी काढलेले टेंडर रद्द करावे. तसेच राख भरण्यासाठी सर्व थर्मल पॉवर स्टेशन मध्ये रस्ते बनवावेत व वाहतूकदारांना इतर सुविधा पुरविण्यात याव्यात यासाठी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यातील कुंभार व इतर १५० पेक्षा जास्त व्यावसायिक सदरच्या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते. सदर आंदोलनास संबोधित करताना आजही देशातील विविध थर्मल पॉवर प्लांट मध्ये २१% एवढी राख न वापरता पडून आहे व गेल्या वर्षी पर्यंत राख कोठे टाकायची ही मोठी समस्या सर्व थर्मल पॉवर प्लांट मध्ये २१% एवढी राख न वापरता पडून आहे व गेल्या वर्षी पर्यंत राख कोठे टाकायची ही मोठी समस्या सर्व थर्मल पॉवर स्टेशनमध्ये होती. सदरची ही राख वापरात येणे साठी व थर्मल पॉवर स्टेशन मध्ये सतत वाढत असणारे राखेची समस्या कायमची मिटवण्यासाठी गेल्या वर्षी २७ फेब्रुवारीला केंद्र शासनास शासन निर्णय काढून मातीच्या विटा बनविण्यास बंदीही घालावी लागली होती. परंतु कुंभार समाजाच्या तिव्र विरोधामुळे सदरचा शासन निर्णयाची केंद्र सरकारने अमंलबजावणी केली नाही.

राख जास्त प्रमाणात झाली की कुंभार व इतर व्यावसायिक यांना शासन निर्णयाचा बडगा दाखवून राख घेण्यास भाग पाडवयाचे व आता राष्ट्रीय महामार्ग यांची कामे चालू असल्याने राखेला थोडीशी मागणी वाढली तर बोली लावून टेंडर द्वारा राख घेणेस भाग पाडावयाचे हे उर्जा मंत्रालय भारत सरकार यांचे दुहेरी धोरण चुकीचे व अन्याय्य कारक आहे. विट व्यवसायिकांनी फ्लाय राख विटांमध्ये मिसळण्यासाठी मोठी यंत्रणा उभी करुन लाखो रुपये खर्च केले आहेत.

पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांनी शासन निर्णय प्रारित करुन या व्यावसायिकांना राख विना मोबदला देण्याबरोबरच ३०० किलोमीटर परिघ क्षेत्रात थर्मल पॉवर स्टेशनने वाहतूक करुन राख देणेचे आदेश दिले होते. परंतु याची अंमलबजावणी झाली नाही. तेव्हा सदरचे संपूर्ण देशात निघालेले राखेचे टेंडर रद्द करण्यात यावे व छोट्या व मध्यम उद्योगांना ही राख विना मोबदला देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय माती कला विकास सेलचे अध्यक्ष दत्ता कुंभार यांनी केली.

यावेळी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था अध्यक्ष शामशेठ राजे यांनी राखेचे हे अन्यायकारक टेंडर ताबडतोब रद्द करण्यात यावे. अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रातील थर्मल पॉवर स्टेशन वर आंदोलन करण्यात येतील असे आव्हान केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष नागनाथ अण्णा कुंभार, विट विकास आघाडी अध्यक्ष बळवंतराव कुंभार, विकास संस्था राज्य संपर्क प्रमुख ज्ञानेश्वर भागवत, राज्य सोशल मिडीया अध्यक्ष निलेश कुंभार, नाशिक जिल्हा अध्यक्ष कृष्णा सोनवणे, उस्मानाबाद जिल्हा अध्यक्ष महादेव खटावकर बारामती तालुका अध्यक्ष संजय कुंभार, रुषी कुंभार, दिपक खैरनार, बाळासाहेब शिरसाट, विलास भागवत, निलेश जोंधळे, श्रीमंत कुंभार, शिवाजी कुंभार, अशोक वाघमोडे, काशिनाथ म्हेत्रे, युसूफ मुल्ला, वैजनाथ काळे, सय्यद मुल्ला, गजानन राजे व राजे रामराव इत्यादी पदाधिकारी सह १५० समाज बांधव उपस्थित होते.

***

कुंभार कारागिरांना मिळणार आधुनिक मातीच्या वस्तू बनविण्याचे यांत्रिक प्रशिक्षण



दिप प्रज्वलन व पुजन करताना आदर्श शिक्षक प्रकाशजी कुंभार सर



ज्येष्ठ नेते चंद्रकांत कुंभार यांचे हस्ते प्रकाश कुंभार सरांचा सत्कार

सातारा : अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था शाखा सातारा यांच्यावतीने कुंभार समाजातील पारंपारिक माती कामाच्या वस्तू बनवणाऱ्या कारागिरांसाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन राधाकृष्ण हॉल सातारा या ठिकाणी करण्यात आले होते. या कार्यशाळेत २५० कारागिरांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेमध्ये बारामतीचे प्रा. प्रकाश कुंभार यांनी मातीकाम करताना कोणत्या प्रकारच्या मातीपासून कोणत्या विशिष्ट वस्तू बनवल्या पाहिजेत, अशा विशिष्ट मातीची उपलब्धता राज्यात आणि देशात कोणत्या ठिकाणाहून योग्य दरामध्ये कशी केली जाते याची सविस्तर माहिती दिली. आपल्या परिसरातील माती कोणत्या वस्तू बनवण्यासाठी योग्य आहे, त्याचे मातीपरीक्षण वैज्ञानिक दृष्टीकोनातून कसे करायला पाहिजे याविषयी सविस्तर माहिती या कार्यशाळेत देण्यात आली.मानवाच्या उत्तम आरोग्यासाठी मातीच्या भांड्याचा उपयोग अन्न शिजवण्यासाठी, अन्न साठवणूक करण्यासाठी, पाणी साठवणूक करण्यासाठी का केला पाहिजे. मातीतील उत्तम पोषक तत्वे, खाण्या-पिण्याच्या चांगल्या सवयीतून कशी विकसित करावीत, मातीच्या भांड्यांशी उच्च गुणवत्ता लोकांना कशी समजावून सांगावी. याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता आपला व्यवसाय आधुनिक स्वरुपात करण्यासाठी व इतरांना आपण नोकऱ्या निर्माण करुन देण्यासाठी आधुनिक सामूहिक उद्योगाची निर्मिती कशी करायला पाहिजे याचे मार्गदर्शनही राज्यातील यशस्वी उद्योजकांकडून ऑनलाइन पद्धतीच्या मार्गदर्शनाने करण्यात आले.चालू आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यातील शासनाच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या ट्रेनिंग सेंटरला भेटी देऊन त्याठिकाणी प्रशिक्षणे आयोजित करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या मदतीने कृती आराखडा ही तयार करण्यात आला. कार्यक्रमाच्या ठिकाणी वेगवेगळ्या मशिनरी प्रात्यक्षिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. त्यातून लोकांना माती कशी चाळावी, मातीची मळणी यंत्राच्या साह्याने उत्तम प्रकारे कशी करावी व वेगवेगळ्या यंत्रावर दर्जेदार उपकरणे कमीत कमी वेळात कशी बनवावीत याची प्रात्यक्षिके ही करुन दाखवण्यात आली.

कुंभारी कलाकुसरीच्या वस्तूंसाठी आधुनिक प्रकारची शोरुम्स कशी असावीत, वस्तूचे उत्तम मार्केटिंग कसे करावे, मातीच्या विविध वस्तूचे बनवण्यासाठी आधुनिक प्रकारची मशिनरी कोण कोणत्या राज्यात माफक दरात कशी उपलब्ध करायची याचीही माहिती देण्यात आली. त्यासाठी संघटनेच्या माध्यमातून व्यवसायिकांना योग्य मदत कशी केली जाईल याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

सातारा तालुका कुंभार विकास संस्थेचे अध्यक्ष नितीन राजे, उपाध्यक्ष दिनकर कुंभार यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सातारा तालुका कार्यकारणी व सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

***



मातीकला बोर्ड पुनरुज्जीवीत करण्यासाठी उद्योग मंत्र्यांना साकडे

मुंबई : कुंभार समाजाचे नेते संजय गाते यांनी मंत्रालय येथे राज्याचे उद्योग मंत्री मा.ना. उदयजी सामंत साहेब यांची भेट घेऊन मागील मा. फडणवीस सरकारनी स्थापन केलेल्या श्री संत शिरोमणी गोरोबा काका मातिकला बोर्डाचे कामकाज महाविकास आघाडी सरकारच्या उदासीन धोरणामुळे सुरु होऊ शकले नाही.

याबाबत आपण उद्योग विभागातील संबंधित मंत्री, अशासकीय सदस्य व कुंभार समाज संघटनेतील पदाधिकारी यांची बैठक घेऊन मातिकला बोर्डाचे कामकाज त्वरित सुरु करावे व राज्यातील कुंभार समाजाला न्याय द्यावा अशी चर्चा करून निवेदन दिले. यावेळी मा. मंत्री महोदयानी मातिकला बोर्ड बाबत त्वरित मीटिंग लावण्याचे निर्देश तिथे उपस्थित संबंधित अधिकारी यांना दिले.

****

नसीब महासंघाच्या माध्यमातून ऐक्सपर्ट इंजिनिअर शोधकर्ताच्यांकडून हे आँरगेनिक ब्रिक्स (वीट) तयार



आयुर्वेदिक वीटा तयार केलेल्या वीटाचा नमुना भेट देत असताना

नशीब महासंघ भारत सरकार उपक्रम आणि मुंबई कुंभार समाज आयोजित कार्यक्रम आयुर्वेदिक वीट उत्पादक नसीब महासंघाच्या माध्यमातून ऐक्सपर्ट इंजिनिअर शोधकर्ताच्यांकडून हे आँरगेनिक ब्रिक्स (वीट) तयार करण्यात आली आहे.

या ब्रिक्सच्या वापराने वातावरण कंट्रोल रहाते. थंडीत गरम व उन्हाळ्यात मध्ये थंड घर रहाते. लाईट बिल कमी येते व फायरप्रुफ, वॉटरप्रुफ, सांउडप्रुफ, भुकंप रोधक, घरात अल्ट्राकिरण येत नसल्यामुळे घरातील माणसे आजारी जास्त पडत नाहीत. माणसातला DNA कंट्रोल रहातो. इतर किडेमुंगे आसपास जास्त येत नाही. आणि सर्वांत महत्वाचे या बिक्स (वीटा) भाजण्याची गरज नाही किंवा वीटभट्टीची गरज नाही त्यामुळे पर्यावरण विभागाची परवानगीची गरज नाही. या वीटा मुळे कुंभार समाज्यातील समाज बांधवांना नवीन रोजगार निर्मिती होणार आहे असे affordable घरकूल योजना नसीब महासंघाकडून लवकरच राष्ट्रीय स्तरावर सुरू होणार आहे. आपले सदस्य व पदाधिकारी ना गावो गावी, शहरामध्ये या वीट उत्पादन उद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मीती होणार आहे.

आयुर्वेदिक विटा वैशिष्ट्य :

१) या वीटा घरी सुद्धा तयार करता येतील. २) या वीटा घरातील वातावरणात उन्हाळ्यात थंड व हिवाळ्यात गरम ठेवते. ३) लाईट बील कमी येते. ४) फायरप्रुफ, वॉटरप्रुफ, भुंकप रोधक व सांउड प्रुफ असतील. ५) घरात अल्ट्राकिरणे येत नसल्यामुळे घरातील माणसे आजारी पडण्याचे प्रमाण कमी असते. ६) माणसाच DNA कंट्रोल रहातो. ७) किडेमुंगे आसपास जास्त येत नाही.

अतिशय महत्त्वाचे :

८) या वीटा भाजण्याची गरज नाही फक्त उन्हात सुकवल्या तरी चालतात म्हणजे पर्यावरणास हानिकारक कारक नाही व प्रदूषण बिलकुल नाही. ९) पर्यावरण विभागाची वीटभट्टी परवानगी त्यामुळे लागणार नाही.

दिनांक २८/०३/२०२२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवडे कुंभार



आयुर्वेदिक वीटचे पुजन करतांना आनंदा साळवी साहेब

वाडीत आयुर्वेदिक वीटचे वितरण करताना मुंबई कुंभार समाजाचे अध्यक्ष विष्णुजी मळेवाडकर साहेब यांनी मा. राष्ट्रीय अध्यक्ष विलासजी बोराडे साहेब व ओमकार बोराडे साहेब यांना देत असतानाचे क्षणचित्रे या मंगलमय वातावरणात उपस्थित मान्यवर रमेशजी साळवी साहेब मुंबई, अनिलजी चिपळूणकर साहेब मुंबई, नागेशजी झोरे साहेब मुंबई, एकनाथजी झोरे साहेब गावखडी रत्नागिरी, जगदिशजी दिदि साहेब सोलापूर, दिलीपजी राजे साहेब बदलापूर, अशोक राजे साहेब मुंबई, अर्जुन राऊत साहेब मुंबई, रवींद्र रातवडकर साहेब मुंबई, ज्ञानोबा कानुरे साहेब मुंबई, चंद्रकांत मटकर साहेब कोतवडे, प्रतिक झोरे साहेब गावखडी रत्नागिरी

मिशन : हर घर ऐक रोजगार और हर गाँव ऐक नया शहर

विशेष सुचना : आयुर्वेदिक वीटा बनविण्यासाठीची प्रक्रिया Whatsapp किंवा फोन वरुन दिली जाणार नाही. बैठकीचे आयोजन केल्यास सविस्तर माहिती देण्यात येईल.

संपर्क : विष्णु मळेवाडकर साहेब अध्यक्ष मुंबई कुंभार समाज, आनंदा साळवी साहेब मंत्रालय, कोकण विभागीय अध्यक्ष नसीब महासंघ, दिलिप राजे पर्यावरण विभाग मंत्रालय (सेवानिवृत्त)

***

।।श्री गणेशाय नमः।। ।।श्री महालक्ष्मी प्रसन्न।। ।।श्री जोतिबा नमः।।

प्रेरणास्थान

कै. दिनकर केरबा कुंभार



श्री समर्थ मेडीकल्स ॲण्ड प्रोव्हीजन स्टोअर्स

प्रोप्रा. इंद्रजित दिनकर कुंभार

९८२२८१८७४४

एस.टी. स्टँड समोर, मु. पो. वाठार तर्फ वडगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर.

श्री स्वामी समर्थ क्लिनिक

होमिओपॅथिक स्पेशालिस्ट



मु. पो. मोरगिरी, ता. पाटण,
जि. सातारा

निवास : निनाई लक्ष्मी मंदिर रोड,
मु. पो. ता. पाटण, जि. सातारा.
४१५२०६

डॉ. सचिन रामदास कुंभार

बी.एच.एम.एस.

Mo. : 9922813832

अवधुत मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स

सर्व प्रकारची औषधे होलसेल भावात उपलब्ध



श्री. अनिल देवराम पवार
9890326661



सौ. उज्ज्वला अनिल पवार



चि. अवधुत अनिल पवार

दुकान : शॉप नं. ३, श्री. जी. अपार्टमेंट, सह्याद्री हॉस्पिटल जवळ, वडाळा रोड, नाशिक ४२२ ०११

निवास : फ्लॅट नं. ७, त्रिवेणी संगम सोसा., कौट-घाट रोड, भाभा नगर, नाशिक ४२२ ०११

बालाजी

ऑटोमोबाईल्स



प्रोप्रा. ज्ञानेश्वर शांताराम शिंदे
Mob. : 9860159519



मनोज ज्ञानेश्वर शिंदे
सिव्हिल इंजिनियर व गव्हेर्मेंट कॉन्ट्रॅक्टर
Mob. 9822011156
9890453147

टाटा व महेंद्रा गाडीचे ओरिजनल सुट्या भागांचे विक्रेते

आळेफाटा, ओतुर कल्याण रोड, ता. जुन्नर, जि. पुणे.

आमचे प्रेरणास्थान



स्व. सौ. अनुसया



स्व. निवृत्ती शिर्के



प्रोप्रा. सुरेश निवृत्ती शिर्के
सिव्हिल इंजिनिअर

शिर्के कंस्ट्रक्शन

सर्व प्रकारचे बंगले व स्किमची कामे योग्य दरात करुन मिळतील.

मु. पो. नांदलापूर, ता. कराड, जि. सातारा.
फोन : (नि) ०२१६४/२४२०४६ मो. : ०९७६२५२१०८३

श्री साईनाथ बिट सप्लायर्स



साहेबराव पुंजाजी सोनवणे
Mo. : 09960370331



रविंद्र साहेबराव सोनवणे
Mo. : 9767240371



साईनाथ सोनवणे
Mo. : 9970967913

मु. पो. मंजूर, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर



साईराज कलेक्शन & फॅशन पॉईंट

चि. आदिनाथ सोनवणे
B.Com
Mo. : 9970968521

* फॅन्सी साडी * टॉप * जीन्स
* शर्ट * रेडिमेड * डिझायनर कुर्ती
* ड्रेस मटेरियल * होजिअरी

लासलगाव-शिर्डी रोड, कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अ. नगर



दादाभाऊ मारुती उकीरडे
मो. 9011684750

रुपेश दादाभाऊ उकीरडे
मो. 9689915161 / 8605467046

श्री संत गोरोबा वीट सप्लायर्स

आमच्याकडे सर्व प्रकारच्या वीट होलसेल व रिटेल दरात मिळेल.

मु. पो. बेलापुर (बदगी), जाचकवाडी फाटा, ता. अकोले, जि. अहमदनगर.

श्री संत गोरोबा आर्टस्

आमच्याकडे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणपतीच्या, दुर्गा मातेच्या व महालक्ष्मीच्या सुंदर व आकर्षक मुर्ती रिटेल व होलसेल दरात मिळतील

मु. पो. बेलापुर (बदगी), कुंभार आळी, ता. अकोले, जि. अहमदनगर

विकास संस्थेची पुणे जिल्हा पदाधिकारी बैठक संपन्न



नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना उद्योजक बाळासाहेब कुंभार व मान्यवर



प्रदेशाध्यक्ष शामशेठ राजे यांचा सत्कार करताना पोपटशेठ कुंभार समवेत पुरंदर तालुका अध्यक्ष अशोकराव कुंभार

सासवड : दि. २१ मार्च २०२१ हॉटेल पंचरत्न सासवड येथे अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था पुणे जिल्हा पदाधिकारी यांची बैठक संस्थेचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष श्यामशेठ यांच्या अध्यक्षते –खाली संपन्न झाली. यावेळी संस्थेचे वरिष्ठ कार्याध्यक्ष संतोषशेठ पाषणकर, उपाध्यक्ष किसनशेठ काळे, युवक उपाध्यक्ष गोरगिले साहेब, संघटक प्रकाश सर, पुणे जिल्हा अध्यक्ष नथुशेठ कुंभार तसेच भोर, मावळ, बारामती, पुरंदर, शिरुर, पश्चिम हवेली, पुणे शहर, मुळशी, सातारा जिल्हा अध्यक्ष इ. तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

संस्थेमध्ये नविन पदाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली ती खालीलप्रमाणे– १) दिलीप विश्वनाथ कुंभार, रा. हिवरे–पुरंदर तालुका संघटक २) नंदू पांडुरंग कुंभार, रा. एखातपुर–पुरंदर तालुका संपर्क प्रमुख ३) धनंजय देवराम कुंभार, रा. सासवड–पुणे जिल्हा संघटक ४) दिलीप पंढरीनाथ कुंभार रा. हडपसर–पुणे शहर सचिव ५) सूरज सोपान कुंभार, रा. वडकी नाला–युवक अध्यक्ष पुणे शहर. या सर्व नविन पदाधिकारी यांना पुढील कार्यास शुभेच्छा. यावेळी प्रकाश कुंभार सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

१) जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा परिचय होणे.

२) अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या ध्येयधोरणांची माहिती व कार्याचा आढावा घेणे.

३) मातीकला उपकरणांच्या निर्मितीसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

४) शासन पातळीवर आपल्या उद्योगाच्या संदर्भातील उद्योग योजनांची माहित घेणे.

५) गणपती विषयक निर्मिती, खरेदी–विक्री याबाबत विचारविनिमय करणे.

६) उद्योगाबाबत बदललेल्या नियमांची माहिती करुन घेणे.

७) कुंभारी कलेचे लघु उद्योग सुरु करणे.

८) विकास संस्थेच्या माध्यमातून राज्यात सुरु होत असलेल्या कुंभारी वस्तूंची शोरुम्स पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरु करणे.

९) प्रशासकीय कामाचे मार्गदर्शन सदर विषयावर चर्चा करण्यात आली. सभेचे आयोजन अशोक शेठ कुंभार, हरिदास शेठ कुंभार, पोपट शेठ कुंभार यांनी केले होते. संस्थेच्या वतीने त्यांचे आभार करण्यात आले.

***

मॉरिशसमधील विचार महोत्सवाचे डॉ. प्रकाश कुंभार अध्यक्ष



कोल्हापूर : मॉरिशसमधील जागतिक विचार महोत्सवाच्या अध्यक्षपदी येथील प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांची निवड झाली. पोर्ट लुईस येथील महात्मा गांधी विद्यापीठात उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा अनावरणाच्या निमित्ताने २५ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या कालावधीत हा महोत्सव होणार आहे. मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष पृथ्वीराजसिंह रूपन यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण होणार आहे. चौदा देशांतील विचारवंत या महोत्सवात सहभागी होणार आहेत. प्राचार्य डॉ. कुंभार यांनी क्रांतिसिंह नाना पाटील, देशभक्त रत्नाप्पा कुंभार, संत गोरा कुंभार, स्वातंत्र्यसैनिक दलितमित्र शंकरराव जेजुरीकर, मराठी साहित्य अवकाशातील संदर्भ, उपयोजित भाषा विज्ञान आणि प्रसारमाध्यमे, दलितकथा साहित्य, ग्रामीण साहित्यिक म. भा. भोसले, बाबूराव बागुलांची कथा, मंथन, शब्दबोध, कोरोनानंतरचे जग, कोरोनात उगवलेल्या कथा आदी पुस्तके लिहिली आहेत. महाराष्ट्रासह कर्नाटकातील विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांचा समावेश आहे. एकूण ६८ ग्रंथांचे लेखन त्यांनी केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली २८ पीएच.डी., २५ एम.फिल. झाल्या आहेत.

***

विकास संस्थेच्या वतीने वधुवर मेळावा संपन्न









सातारा : दिनांक ०३ एप्रिल २०२२ रोजी सातारा जिल्हा कुंभार समाज विकास संस्था संचालकांनी वधू–वर पालक मेळावा आणि विट व्यावसायिकांचा राज्यव्यापी मेळावा आयोजित केला होता. सदर मेळाव्यास अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनरावजी जगदाळे, संस्थेचे प्रदेशाध्यक्ष श्यामशेठजी राजे साहेब, अखिल भारतीय माती कला बोर्डचे अध्यक्ष दत्ताजी डाळजकर साहेब, संतोषजी पाषाणकर साहेब, व्यंकटरावजी गोरगीले साहेब, किसनरावजी काळे साहेब तसेच महेशजी कुंभार साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यावेळी नवनियुक्त न्यायाधीश विनायकरावजी कुंभार राहणार कुर्ली तालुका विटा जिल्हा सांगली, नुकतेच पीएसआय पदी नियुक्ती झालेले अक्षय शांतीलाल कुंभार रा.कापडगाव, ता.फलटण जिल्हा सातारा आणि नुकतेच आरटीओ पदी नियुक्ती झालेले अवधूत विश्वनाथ कुंभार राहणार काले तालुका कराड जिल्हा सातारा यांचा आयोजकांतर्फे सत्कार करण्यात आला. मोहनराव जगदाळे साहेब तसेच दत्ताजी डाळजकर साहेब यांनी वीट भट्टी व्यवसायिकांना अनमोल मार्गदर्शन केले. त्या यावेळी सर्व व्यावसायिकांनी जगदाळे साहेब यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे तसेच न्यायालयीन खर्चासाठी भरघोस निधी जमवण्याचे आश्वासन दिले.

***

डॉ. ऋतुराज यांना एम.बी.बी.एस. पदवी प्रदान



जळगाव : डॉ. ऋतुराज अनिल शिर्के यांना एम.बी.बी.एस. पदवी पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. समवेत डॉ. ऋतुराज याची आई आदर्श शिक्षिका सौ. करुणा अनिलराव शिर्के, वडील आदर्श शिक्षक उपमुख्याध्यापक अनिल निवृत्ती शिर्के आणि भाऊ अमेय सुरेश शिर्के आणि मान्यवर डॉ. ऋतुराज उच्च शिक्षण घेण्यासाठी परीक्षा देत आहेत. डॉ. ऋतुराज शिर्के व त्यांच्या परिवाराचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व उच्च शिक्षणासाठी खूप खूप शुभेच्छा!!

गोदावरी फाऊंडेशन संचलीत डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज जळगावचा दीक्षांत सभारंभ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हासदादा पाटील, डीन डॉ. एन.एस. आर्वीकर, रजिस्ट्रार प्रमोद भिरूड आदी मान्यवरांची उपस्थिती होते.

***

कु. अंकिता कुंभार हिच्या शैक्षणिक खर्चासाठी कुंभार समाजातील मान्यवरांची आर्थिक मदत



उस्मानाबाद : अखिल भारतीय प्रजापती महासंघ व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था यांच्या वतीने विनंती वजा आवाहन केल्याप्रमाणे संघटनेचे सर्व पदाधिकारी, कुंभार समाजातील नोकरदार, व्यापारी, उद्योग धंदा करणारे व समाजातील प्रतिष्ठीत मंडळी कार्यक्रमास उपस्थित राहिले. आपल्या समाजातील कुमारी कुंभार अंकिता बालाजी रा. नितळी, ता. उस्मानाबाद हिचा एम.बी.बी.एस. साठी एमआईटी कॉलेज लातूर येथे नंबर लागला आहे. तिला आर्थिक मदत करण्यासाठी दि. १०.२.२०२२ ला सायंकाळी ५ वा. 'सहकार सिद्धी' हॉल उस्मानाबाद येथे बैठक पार पडली.

प्रथम अंकिताचा शाल, श्रीफळ, फेटा बांधून सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांचा अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था (रजि.) तर्फे यथोचित सत्कार संपन्न झाल्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व अंकितास सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वाशीत केले. यामध्ये प्रमुख अतिथी अनंत कुंभार साहेब (Dy. CEO) जि.प. उस्मानाबाद व सौ. रोहिणी कुंभार (मॅडम) गटशिक्षणाधिकारी व अध्यक्षस्थानी नागनाथ अण्णा कुंभार, विशेष अतिथी महादेवराव खटावकर, खामकर मामा, बळवंत घोगरे सर होते. अंकिताला मदत करण्यासाठी अखिल भारतीय प्रजापती महासंघ व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था (रजि.) यांच्या तर्फे पुढील शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्विकारली व वैयक्तीक अंकितास अनंत कुंभार साहेब यांनी रु. २५,०००/– ऑनलाइन जमा केले व नागनाथ अण्णा कुंभार यांनी रु. २५,०००/– रोख रक्कम दिली. खामकर मामा यांनी ५,०००/– दिली. उर्वरित रक्कम उपस्थित समाज बांधव जमा करुन अंकितास देण्याचे आश्वाशीत केले. बालाजी कुंभार सर यांनी बातमी कळताच रु. १०,१११/– ऑनलाइन जमा केल्याबद्दल त्यांचा मॅडमचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आजपर्यंत अंकिताकडे ४,१६,८११/– रक्कम रुपये जमा झाली आहे. यापुढील कालावधीमध्ये उस्मानाबाद येथे समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्यासाठी संघटनेकडून प्रयत्न केले जातील असे महादेवराव खटावकर यांनी सांगितले.

समाजातील अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून दरमहा विशिष्ठ रक्कम ग्रुप खाते काढून जमा करण्याचे एकमताने ठरविले. याचा उपयोग फक्त शैक्षणिक खर्चासाठीच करावयाचा आहे असे ठरले. सुत्रसंचलन व कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगीराज कुंभार सर यांनी केले व आभार नामदेवराव कुंभार (सचिव) यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी लिंबराज कुंभार, भगवानराव कुंभार, अमृत कुंभार यांनी परिश्रम घेतले.

कास्ती येथे चाक वाटप संपन्न





उस्मानाबाद : कास्ती, ता. लोहारा येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप, चाक वाटपाचा कार्यक्रम खादी ग्रामोद्योग (KVIC) व अखिल भारतीय प्रजापती महासंघ दिल्ली व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था (रजि.) यांच्या वतीने कुंभार सशक्तीकरण मिशन अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण व इलेक्ट्रिक चाकावर काम करण्याचे प्रशिक्षण दि. २५.९.२०२१ ते ४.१०.२१ या कालावधीत कास्ती, ता. लोहारा येथे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कुंभार कारागिरांना चाक वाटप करण्याचा कार्यक्रम व वचनपुर्ती सोहळा दि. ४/१०/२०२१ सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला होता.

प्रथम संत गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन नागनाथ अण्णा कुंभार (उपाध्यक्ष प्रजापती महासंघ दिल्ली) यांच्या हस्ते करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. इलेक्ट्रीक चाकावर काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना चाक वाटप व प्रशिक्षणाचा समारोप खालील मान्यवरांच्या उपस्थितीत नागनाथ अण्णा कुंभार उपाध्यक्ष (अ.भा. प्रजापती महासंघ दिल्ली), महादेवराव खटावकर (उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था रजि.), नामदेवराव कुंभार जिल्हा सचिव, माऊली महाराज कुंभार तोरंबा, संगमेशवर कुंभार अध्यक्ष लोहारा तालुका बालाजी कुंभार, व्यंकट कुंभार, महादेव कुंभार व इतर मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये व प्रशिक्षणार्थी व कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

कुंभार समाजाच्या प्रश्नासाठी सकारात्मक विचार
दिल्लीत प्रजापती महासंघ, विकास संस्थेची धडक : केंद्रीय मंत्री व खासदारांची भेट



दिल्ली : कुंभार समाजाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची भेट घेऊन समस्यांवर चर्चा केली.

बारामती : देशातील तसेच राज्यात कुंभार काम करणारे सर्व कारागिरांना यांत्रिक चाके, चिखल मळणी यंत्रे व प्रशिक्षण मिळावे, नुकतीच थर्मल पॉवर प्लांटने टेंडर पद्धतीने सुरु केलेली फ्लाय राख विक्री प्रक्रिया थांबवावी व उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशा-नुसार पीओपीच्या मूर्तीवर बंदी प्रक्रियाची अंमलबजावणी, शिल्पक मूर्ती पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी, यासह अन्य मागण्यांसाठी उर्जा मंत्री आर. के. सिंग, सूक्ष्म लघु मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांची भेट घेतली. खासदार महास्वामीजी डॉ. श्री. जयसिद्धेश्वरजी, ओंम निंबाळकर व हेमंत गोडसे यांचीही भेट घेतली. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांविषयी चर्चा केली.

मंत्री राणे यांनी कुंभार समाजाला चाके वाटपासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, याची ग्वाही त्यांनी त्यावेळी शिष्टमंडळाला दिली. गरजू व गरीब लोकांसाठी ही योजना राबवावी, असे आवाहनही केले. भारतीय प्रजापती कुंभार महासंघाचे उपाध्यक्ष नागनाथ कुंभार यांच्या नेतृत्वाखाली १४ दिवसांचे कुंभार समाज विकास अभियान राबविले. (दि. १६) सांगता झाली.

तेरचे सरपंच महादेव खटावकर, विकास संस्था संस्थापक मोहनराव जगदाळे, सचिव मनोहर जाधव, संपर्क प्रमुख ज्ञानेश्वर भागवत, वीट व्यावसायिक सेल अध्यक्ष बळवंतराव कुंभार, दत्ता कुंभार डाळजकर यांनी अभियानात सहभाग घेतला.

कुंभार समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांची कैफियत शिष्टमंडळाने मांडली. ऊर्जा मंत्री आर.के. सिंह यांना महाराष्ट्रात फक्त सोलापूर थर्मल पॉवर प्लांटमध्ये टेंडर प्रक्रिया सुरु झाली आहे. इतर ठिकाणी फ्लाय राख ही मोफत मिळते, हे विविध दस्ताऐवज पुराव्यानिशी दाखवून दिले. ही राख छोटे-मोठे व्यावसायिकांची हक्काची आहे. राख मोफतच मिळावी, अशी मागणी केली.

यावर अभ्यास करुन निर्णय देतो, असे मंत्र्यांनी आश्वस्त केले. केंद्रीय ग्लास व सिरामिक प्रशिक्षण संस्था खुर्जा उत्तर प्रदेश येथे कुंभार समाजासाठी जिगर ज्वाली व डाय कास्टिंग प्रशिक्षण घेण्यासाठी संचालक विपीन कुमार यांची भेट घेण्यात आली. देशातील २७ वे महाराष्ट्रातील ७ कुंभार युवकांना प्रशिक्षण दिले जात आहे. नाशिक प्लाटरी क्लस्टर व संत गोरोबा काका क्लस्टर तेरसाठी लागणारे मशिन उत्पादकांशी चर्चा करीत विविध कारखान्यांना भेटी देऊन माहिती घेतली.

***

कुंभार समाजाचे प्रश्न सोडवा.



ऊर्जामंत्री आर.के. सिंग यांना निवेदन देताना दत्ता कुंभार व इतर

जळोची : देशातील तसेच राज्यात कुंभार काम करणारे सर्व कारागिरांना यांत्रिक चाके, चिखल मळणी यंत्रे व प्रशिक्षण मिळावे, फ्लाय राख विक्री प्रक्रिया थांबविण्यात यावी व उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पीओपी बंदी मूर्ती प्रक्रिया अंमलबजावणी झाली तर शिल्पक मूर्ती पंचनामे करुन नुकसानभरपाई मिळणेसाठी कुंभार समाजाच्या शिष्टमंडळाने ऊर्जामंत्री आर.के. सिंग, सूक्ष्म-लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, आरोग्य राज्यमंत्री भारती पवार आदींची भेट घेतली. तसेच सोलापूरचे खा. महास्वामी डॉ. जयसिद्धेश्वर, उस्मानाबादचे खा. ओम निंबाळकर, नाशिकचे खा. हेमंत गोडसे यांचीही भेट घेतली. तेरचे सरपंच महादेवराव खटावकर, कुंभार विकास संस्था संस्थापक मोहनराव जगदाळे, सचिव मनोहर जाधव, संपर्कप्रमुख ज्ञानेश्वर भागवत, वीट व्यावसायिक सेल अध्यक्ष बळवंतराव कुंभार, माती कला विकास सेलचे दत्ता कुंभार आदी या वेळी उपस्थित होते.

***

विचारशलाका : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषांक



संपादक म्हणून एक स्वतंत्र विचारदृष्टी असलेले डॉ. नागोराव कुंभार हे महाराष्ट्राच्या वैचारिक चळवळीतील एक महत्त्वाचे अभ्यासक आहेत. गेल्या सदतीस वर्षापासून लातूरसारख्या तुलनेने दूरच्या शहरात राहून 'विचारशलाका' हे त्रैमासिक अत्यंत निष्ठेने ते चालवत आहेत.

डॉ. कुंभार यांचे संपादन आणि प्रकाशनातील सातत्य लक्षणीय आणि थक्क करणारे आहे. स्वतः तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असल्यामुळे साहित्य, कला, संस्कृती, तत्त्वज्ञान, राजकारण– समाजकारण, शिक्षण व्यवस्था आणि एकूणच भोवतालाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे लक्षात येते.

मागच्या साडेतीन–चार दशकात 'विचारशलाका'ने प्रसिद्ध केलेले असंख्य विशेषांक आणि इतर नियमित अंक जरी आपण पाहिले तरी विचारशलाकाचे वेगळेपण लक्षात आल्याशिवाय राहत नाही. आज अनेक नियतकालिके आर्थिक समस्यांच्या गर्तेत सापडलेली आहेत. अशावेळी वाचनाचे नवे पर्याय उपलब्ध होत असताना एक मोठी परंपरा असलेले नियतकालिक निष्ठेने आणि जाणीवपूर्वक चालविणे ही सोपी गोष्ट नाही. मात्र प्रतिकूल बाबींवर मात करून विचारशलाकाचा 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषांक' नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

जनार्दन वाघमारे, यशवंत मनोहर, सूर्यनारायण रणसुभे, पंडित विद्यासागर, पन्नालाल सुराणा, अशोक चौसाळकर, प्रकाश पवार, पी. विठ्ठल, एस. डी. निगळ, जे. एफ. पाटील, राजशेखर सोलापुरे, अनंत राऊत, किशोर बेडकीहाळ, गोपाळ गुरू, विवेक घोटाळे, अर्चना मलिक, दिलीप चव्हाण, अनिल जायभाये, शेषराव मोहिते, शमसुद्दीन तांबोळी, सुधीर अनवले, पांडुरंग भोये, अशोक नारनवरे, श्रावण देवरे आदी सुमारे चौतीस अभ्यासकांचे महत्त्वपूर्ण लेख या विशेषांकात आहेत.

याशिवाय एक दोन लेख पुनर्मुद्रिततही करण्यात आले आहेत. 'कोणत्याही देशाच्या जीवनामध्ये पंचाहत्तर वर्षाचा कालखंड हा फार मोठा नसतो. तरी पण हा कालखंड महत्त्वाचा असतो. या कालखंडामध्ये आपण काय कमावले, काय गमावले? याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन व तपासणी केली पाहिजे. अशा प्रकारचे सिंहावलोकन समाज व राष्ट्राच्या प्रगतीसाठी आवश्यक व उपयुक्त असते.' ही या विशेषांकाच्या निर्मितीची संपादकीय भूमिका आहे.

सर्वच अभ्यासकांचे लेख अभ्यासपूर्ण व स्वातंत्र्यपूर्व भारत आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील विविध स्वरूपाच्या स्थित्यंतराचा मागोवा घेणारे आहेत. स्वातंत्र्याच्या चळवळी पासून ते वर्तमानकालीन विविध आंदोलने आणि चळवळींचा इतिहास या विशेषांकात सामावलेला आहे. संविधान, न्यायव्यवस्था, स्त्री– स्वातंत्र्य, धर्म, दहशतवाद, अर्थकारण, राष्ट्रवाद, विज्ञान– तंत्रज्ञान, सामाजिक समता, जागतिक भांडवलशाही, राजकीय पक्षांच्या भूमिका आरक्षण, आर्थिक धोरण, दलित – आदिवासी – भटके विमुक्त आणि मुस्लिमांचे प्रश्न, उच्चशिक्षण, शेती यासह अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची आणि समस्यांची चर्चा या अंकाच्या निमित्ताने करण्यात आली आहे.

केवळ ७५ वर्षातील घडामोडींचा तपशीलवार आढावा घेणारे हे लेख नसून स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वत्रिक बदलांचा विशिष्ट दृष्टिकोनातून केलेला हा अभ्यास आहे. त्यामुळे या विशेषांकाची उपयुक्तता मोठी आहे. 'स्वातंत्र्याची ७५ वर्षे यशापयशाचा आलेख' हा डॉ.जनार्दन वाघमारे यांचा सुमारे चाळीस पृष्ठांचा लेख प्रारंभीच या विशेषांकात दिलेला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील अनेक घडामोडींवर भाष्य करणारा हा महत्त्वाचा लेख आहे. याशिवाय विविध स्वरूपाचे सांस्कृतिक पेचप्रसंग, अर्थसंकल्पीय आढावा, भारतीय राजकारण, भारतीय संविधान आणि चित्रपट, अशा अलक्षित विषयांवरही अनेक लेख या विशेषांकात अंतर्भूत आहेत.

स्वातंत्र्यानंतर जातीविहीन, धर्मनिरपेक्ष, विज्ञाननिष्ठ, समाजवादी आणि बंधू–भगिनीभाव असलेला भारत आकाराला येईल, अशी अपेक्षा होती. तथापि जाती–धर्माचे अहंकार आणि असहिष्णूता इत्यादी बाबींमुळे तसा भारत निर्माण होऊ शकला नाही, अशी खंत काही लेखांमध्ये वाचायला मिळते. आपल्या देशात असे का घडले? याची कारणमीमांसाही अनेकांनी केली आहे.

'स्वतंत्र भारतातील स्त्री संवेदनेचा मुक्त स्वर' हा डॉ.अर्चना मलिक यांचा लेख वैशिष्ट्यपूर्ण आहे. वीस आणि एकविसाव्या शतकातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या संदर्भात या लेखात त्यांनी चर्चा केली आहे. भारतातील स्त्री चळवळीच्या विविध घटकांचा विचार करून त्यांनी स्त्रियांच्या सामाजिक समस्या, हुंडा, घटस्फोट, स्त्री– भ्रूणहत्या, हिंसाचार, वेश्या व्यवसाय, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक समस्या अशा अनेक प्रश्नावर व्यापक चर्चा केलेली आहे.

या विशेषांकातील सर्वच लेख अभ्यासपूर्ण आणि संग्राह्य आहेत. एखाद्या नियतकालिकाने वर्तमान काळात सुमारे पाचशे पृष्ठांचा असा एखादा विशेषांक प्रकाशित करावा, ही एक अपूर्व घटना म्हणायला हवी. डॉ. कुंभार यांनी हा अंक भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्याचे धाडस दाखवले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. वाचक या विशेषांकाचे स्वागत करतील ही अपेक्षा आहे.

विचारशलाका : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषांक
संपादक : डॉ. नागोराव कुंभार पृष्ठे :४९४ किंमत :६००
पी. विठ्ठल (p.vitthal75gmail.com)

***

प्रेरणास्थान



गंगाधर दगडू जोंधळे



कै. लक्ष्मीबाई गंगाधर जोंधळे



सौ. शोभा प्र. जोंधळे



प्रकाश उर्फ सुभाषशेठ
गंगाधर जोंधळे

जोंधळे विट सप्लायर्स

9x4x3 साईज

विट, वाळु, खडी, डाबर योग्य भावात मिळेल.

पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक

Mob. : 9011746159/9075956159

प्रेरणास्थान



तांदळे वीट सप्लायर्स व विट उत्पादक

आमच्याकडे सर्व साईजच्या उत्तम प्रतिच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु. पो. पिंपळगाव लेप, ता. येवला, जि. नाशिक

रमेश नारायण तांदळे
Mob.: 99211 98713







संतोष ना.तांदळे
Mob.: 77440 16765

बाळासाहेब ना. तांदळे
Mob.: 97302 26765

भाऊसाहेब ना. तांदळे
प्राथमिक शिक्षक
Mob.: 96575 34858

अनिल रमेश तांदळे
Mob.: 8975420379

चि. निलेश रमेश तांदळे (B. Com)
Mob.: 95616 00610





अनिल आहेर
मो. 9890519333

श्री धनश्री एंटरप्रायजेस

सिमेंट, स्टील, मार्बल, ग्रानाईट, कोटा, कडप्पा, टाईल्स आणि सर्व प्रकारचे बिल्डींग मटेरिअल सप्लायर्स

अंबुजा सिमेंटचे अधिकृत स्टॉकिस्ट

एचपी पेट्रोल पंप शेजारी, श्री जनार्दन स्वामी आश्रमाच्या मागे,
मुंबई-आग्रा रोड, ओझर (मिग), जि. नाशिक ४२२ २०६.



चिंतामणी रामचंद्र कुंभार
मोबा. 9860391535
7387305101
9766509215

श्री समर्थ अर्थमुव्हर्स





आमच्याकडे विहीर पाईप लाईन, शेततळे,
द्राक्षेबागेची चरी ट्रॅक्टरने शेती मशागतीची
कामे करुन मिळतील.
सर्व साईजच्या भाजीव विटा मिळतील.

औद्योगिक वसाहत, चैतन्य ग्रेप्स नजीक,
पलूस, ता. पलूस, जि. सांगली.

Our Inspriation
Late Onkar S. Mangalkar

Prop. : Avinash O. Mangalkar



ROMSAM ENGINEERS

TEXTILE M/C MANUFACTURING &
CONSULTING ENGINEERS
(WEAVING PREPARATORY)

WORKS :
GALA NO. 11, KAMAT INDUSTRIALCOMPLEX,
NR. HOTEL SAI PALACE, PHILIPS-TELCO ROAD,
BHOSARI PUNE 411026

Ishan Sanskriti, Building No. 3, RH -13, Near Chaitanya Nagari,
Warje, Pune 411 058 ● MOBILE : 09823114804
● E-MAIL - romsam@bsnl.in



ALHAD TANDALE

SUNSHINE PAINTS & ALLIED CHEMICALS COMPANY

OFF. & FACT.:
W/90/A, M.I.D.C. Ambad, Nashik 422010
Allhad S. Tandale B.Sc., B.Sc.(Tech)
Mobile : 9225112961
Office : (0253) 2382991, 2380879 Resi. : (0253) 2581627

Range of Our Product

* Epoxy & Polyurethane Paints * Stoving & NC Paints
* Synthetic & Acrylic Distempers * Plastic Emulsion Paints
* 100% Acrylic & Semi-Acrylic Paints
* All Kinds of Primers, Enamels & Thinners

सोलापुर येथे दोनशे इलेक्ट्रिक चाकांचे व प्रमाणपत्रांचे वाटप संपन्न





सोलापूर : सोलापूर उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील २०० कुंभार समाजातील समाज बांधवांना इलेक्ट्रिक चाक व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम संपन्न.

टाकळी, ता. दक्षिण सोलापूर येथे सोलापूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील २०० कुंभार समाज बांधवांना इलेक्ट्रिक चाक व प्रमाणपत्र वितरण दिनांक २४/०६/२०२२ सकाळी ११ वाजता श्री संत गोरोबाकाका यांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करुन सुरुवात करण्यात आली. अध्यक्षपदी विजय मलिक, वरिष्ठ अधिकारी खादी ग्रामोद्योग आयोग मुंबई व विकास पालीवाल वरिष्ठ अधिकारी यांच्या शुभ हस्ते व दत्ताजी कुंभार (डाळजकर) (अध्यक्ष राष्ट्रीय माती कला सेल), विश्वनाथ कोलमकर (सल्लागार अ.म.कु.सं.वि सं), नागनाथअण्णा कुंभार (उपाध्यक्ष अखिल भारतीय प्रजापती महासंघ दिल्ली), बी.बी. म्हेत्रे (माजी नगरसेवक सोलापूर मनपा), महादेवराव खटावकर (जिल्हाध्यक्ष उस्मानाबाद), टाकळीच्या सरपंच भाग्राबाई कोळी, उपसरपंच सिद्धू घोडके यांच्या उपस्थितीत २०० कारागिरांना चाक व प्रमाणपत्र वाटप व टाकळी परिसरातील ज्येष्ठ व्यक्तींना सेवानिवृत्तीचे प्रशस्तीपत्र देऊन सेवेतून निवृत्त केले तसेच त्यांच्या मुलांनी यापुढे त्यांना काम करु न देण्याचे व फक्त त्यांचा सल्ला घेऊन काम करु असे आश्वासित केले.

आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये एकूण ३१०० कुंभार कारागिरांना इलेक्ट्रिक चाके दत्ताजी डाळजकर, नागनाथअण्णा कुंभार यांनी वाटप केली आहेत याचाच एक भाग टाकळी येथे संपन्न झाला.

टाकळी येथे कुंभार समाज बांधवाना कुंभार काम करण्यासाठी जागा नव्हती ती जागा उपलब्ध करून देण्यासाठी दत्ताजी डाळजकर, नागनाथअण्णा कुंभार यांनी सरपंच व तहसीलदार साहेबाना विनंती केली व त्याप्रमाणे टाकळी येथील सरपंच यांनी १५ गुंठे जागा, १५ कुंभार बांधवाना मोफत दिली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता चनाप्पा कुंभार पुजारी, जयाप्पा कुंभार, सिद्धराम कुंभार, बंडाप्पा कुंभार, बसवराज कुंभार, महाळआप्पा कुंभार यांनी परिश्रम घेतले.

***

कुंभार कलेकडे करिअर म्हणून पहा

मुरलीधर पाटील, फुलेवाडीत मातीकाम प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ



खानापूर : प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन समारंभप्रसंगी मुरलीधर पाटील, प्रमोद कोचेरी, पुंडलिक कुंभार व इतर

खानापूर : दिव्यांग कलाकार पुंडलिक कुंभार यांनी माती कलेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन नव्या स्वरूपात जनतेसमोर आणले आहे. देश विदेशात त्यांच्या वस्तू नेल्या जात आहेत. ही तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. कुंभार समाजातील तरुण-तरुणींनी त्यांचा आदर्श घेऊन या क्षेत्राकडे करिअरची संधी म्हणून पाहावे, असे आवाहन भूविकास बँकेचे अध्यक्ष मुरलीधर पाटील यांनी केले.

फुलेवाडी (डुक्करवाडी) ता. खानापूर येथे कुंभार कलेच्या पंधरा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन पाटील व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद कोचेरी यांच्या हस्ते झाले. कुंभार शाळेचे प्रमुख पुंडलिक कुंभार व कार्यवाह मधू कुंभार यांनी मातीच्या मूर्ती देऊन उपस्थितांचे स्वागत केले.

क्राफ्ट कौन्सिल ऑफ कर्नाटकच्यावतीने हे शिबिर उल्हासकर डे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जूनपर्यंत चालणार आहे. दरम्यान प्रशिक्षणार्थींना मॉडर्न पॉटरी आर्ट, कुंडे, दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तू, भेटवस्तू, शोभेच्या वस्तू, मूर्ती या प्रकारची नवी कला शिकविण्यात येत आहे. शिबिरात पहिल्या दिवशी २० महिलांनी भाग घेतला होता.

***

विजय हा मागून मिळत नसतो तो धैर्याने झगडून घ्यावा लागतो.

खुशी बालासाहेब सेलूकर हिचे डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेनिमित्त सादरीकरण





ग्यानमाता विद्यालयाची इयत्ता सहावीत शिकत असलेली विद्यार्थीनी कु. खुशी बालासाहेब सेलूकर हिने डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेनिमित्त तिसऱ्या स्टेजसाठी असलेल्या कृती संशोधन आराखड्यानिमित्त वसमत येथील पंचायत समितीतील शिक्षण विभागात आपले सादरीकरण केले. दि. ४ एप्रिल २०२२ सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी कु. खुशी सेलूकर हिने वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन प्रात्यक्षिकासह सादरीकरण केले. ट्रिझ आउटसाईड द फॉरेस्ट ही संकल्पना सद्यस्थितीत सामूहिक वृक्षलागवडी संबंधी वापरली जाते. त्यात गावाशेजारी वृक्ष लागवड, खाजगी जागेत वृक्ष लागवड, पडीक जमिनींवर वृक्ष लागवड, तळेकाठावर वृक्ष लागवड, रस्त्याच्याबाजूने वृक्ष लागवड, शासकीय कार्यालयातील रिकाम्या जागेवर वृक्षलागवड इत्यादींचा समावेश होतो. ह्यामुळे वातावरणातील हानिकारक घटकांत बदल दिसून येतात तसेच ह्यामुळे जैवविविधता सुधारते अशा सदरीकरणासह वृक्षारोपण सुद्धा केले. जीवनसाधना फाऊंडेशनच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला.

वृक्ष लागवड व संगोपन, विविध सामाजिक उपक्रमांचे जीवनसाधनाच्या वतीने सातत्याने आयोजन केले जाते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी पांडुरंग लांडगू होते. त्यांनी उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल कु. खुशी सेलूकर या विद्यार्थिनीचे कौतुक केले. अगदी बालवयापासून कु. खुशी सेलूकरची वृक्ष लागवड, संवर्धन व पर्यावरणविषयक अभ्यासाची आवड लक्षणीय असल्याचे जाणवते. वृक्ष लागवड करणे तसेच यासंबंधी व्यापक जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सूत्रसंचालन सुभाष खरबडे यांनी केले. याप्रसंगी गट शिक्षणाधिकारी तानाजी भोसले, सुप्रसिद्ध उद्योजक भागवत कदम, रमेश काळे, राहुल सुर्यतळ, अशोक खटींग, राजकुमार सेलूकर, एस.एम. कदम (सुखानंद), रमेश श्रावणे, सोळंके सर, नारायण तिळकरी, क्यादलवार साहेब, दलीत वाळवंटे यांसह कर्मचारीवृंद उपस्थित होते.

***

शिरूर येथे कुंभार समाजाची कार्यकारणी जाहीर व गुणवंतांचा सत्कार



शिरूर येथील कुंभार आळी या ठिकाणी आज अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेची शिरूर शहर कार्यकारणी जाहीर झाली. नवीन पदाधिकारी यांना संस्थेचे संस्थापक मोहनराव जगदाळे, शामशेठ राजे, अशोक ईश्वरे, संतोषशेठ पाषाणकर, व्यंकट गोरागिळे, नथुशेठ कुंभार, बँक ऑफ इंडिया शिरूरचे मॅनेजर अमोल कुंभार, बाळासाहेब जामदार, शशिकांत शिर्के यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आली.

शिरूर नगरपरिषदेत कुंभार समाजाच्या व्यक्तीला नगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली पाहिजे असे मत यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष मोहनराव जगदाळे व माजी उपसरपंच अशोक ईश्वरे यांनी व्यक्त केले.

शिरूर शहर कार्यकारणी अध्यक्ष – अक्षय शिर्के, उपाध्यक्ष – शंकर जामदार, कार्याध्यक्ष – शरद जामदार, खजिनदार – दिपक शिर्के, सचिव – विशाल गोरे, सह सचिव– चरण जामदार, सोशल मीडिया प्रमुख – विक्रम जामदार, युवक अध्यक्ष – चैतन्य जामदार, युवक उपाध्यक्ष – तेजस जामदार, युवक खजिनदार – शुभम जामदार, युवक सचिव – मंगेश जामदार महिला आघाडी अध्यक्ष – वैशाली जामदार, उपाध्यक्ष – आरती जामदार, खजिनदार – पायल जामदार, सोशल मीडिया – स्नेहल जामदार यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी सौ. सीमाताई रमेश सोनवणे, दिलीप साळुंके, कु. सुरज मच्छिन्नद्रनाथ कुंभार, वैशाली जामदार, पुण्यनगरी पत्रकार संतोष शिंदे, उमेश गोरे यांचा समाजाविषयी कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुका अध्यक्ष योगेश जामदार, विजय शिर्के, दत्तात्रय काळे, संभाजी जामदार, पोपट जामदार, मच्छिंद्र जामदार, विशाल जामदार, चेतन जामदार, विष्णू जामदार, संतोष जामदार, बाबुराव जामदार, संदिप श्रीमंदिलकर, संजय राजापूर, अमोल गोरे, जगन्नाथ जामदार असे अनेक समाजबांधव उपस्थित होते.

या कार्यक्रमात स्वागत दत्तात्रय काळे यांनी सूत्रसंचालन योगेश जामदार यांनी तर आभार विजय शिर्के यांनी मानले.

***

कुंभार समाजाचे पालकमंत्र्यांकडे साकडे
माती परवान्याबाबत शासनाने योग्य निर्णय घेण्याची आग्रही मागणी



कऱ्हाड : विविध मागण्यांबाबत कुंभार समाजातर्फे बाळासाहेब पाटील यांच्यासोबत चर्चा केली. त्यावेळी बाळासाहेब पाटील यांचा सत्कार करताना समाजाचे सदस्य.

कऱ्हाड : नदीकाठचे माती परवाने देताना महसूल विभागाकडून टाळाटाळ होत आहे. त्यामुळे कुंभार समाजाचा व्यवसाय मोडीत निघून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे माती परवान्याबाबत योग्य ते निर्णय घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी जिल्ह्यातील कुंभार समाजाने पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे केली.

समाजाच्या विविध समस्या सोडवण्यासाठी जिल्ह्यातील कुंभार समाजाने पालकमंत्री पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कुंभार समाजाचे प्रदेशाध्यक्ष शामशेठ राजे, वीट आघाडीचे राज्याध्यक्ष बळवंतराव कुंभार, खजिनदार चंद्रकांत कुंभार, खटाव-माणचे अध्यक्ष संदीप कुंभार, कऱ्हाडचे विलास कुंभार, मनोज कुंभार, राहुल कुंभार, गणेश कुंभार, अभिजित कुंभार, सुरेश कुंभार, भरत कुंभार, सुनील कुंभार, अनिल कुंभार, पांडुरंग राजापुरे आदींच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री पाटील यांची भेट घेतली. यावेळी निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, कुंभार समाज पारंपरिक माती काम करतात. त्यात गाडगी, मडकी, माती काम, वीट, कुंभारी कौले बनवण्याच्या व्यवसाय करुन उदरनिर्वह करतात. महाराष्ट्रासह अन्य राज्यांनीही कुंभार कामासाठी लागणाऱ्या ५०० ब्रास मातीला रॉयल्टीतून सूट दिली आहे. माती वाहतुकीचे परवाने दिलेले नाहीत. मागील वर्षी नोव्हेंबर ते डिसेंबर सर्व तहसील कार्यालयात निवेदन दिले आहे. तरीही न्यायालयाच्या आदेशाने माती वाहतूक परवाने रद्द केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रॉयल्टी माफ असून, कुंभार कामासाठी माती आणता येत नाहीत. त्यामुळे कुंभार समाजावर उपासमारीची वेळ आली आहे. ५०० ब्रासला परवानगी असूनही मार्चचे कारण पुढे करुन दंड केला जात आहे. दंड न भरल्यास बोजा चढविला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील महसूल विभागाला दंड आकारू नका, अशा सूचना द्याव्यात, दंडात्मक कारवाईला शिथिलता देण्याची मागणी पालकमंत्र्यांना केली आहे.

***

सुरेश कोते यांना 'पुणेरत्न' पुरस्कार प्रदान



'पुणेरत्न' पुरस्काराने सुरेश कोते यांना गौरविताना डॉ. श्रीपाल सबनीस, रुपाली चाकणकर व मान्यवर.

पुणे : 'सामाजिक विकास व उन्नतीचे कार्य करणारे विविध क्षेत्रातील गुणवंत आपल्या ध्येयवादी कृतिशीलतेने समाजाचे सांस्कृतिक व सामाजिक आरोग्य राखतात' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. जनकल्याण बहूद्देशीय फाउंडेशन पुणेतर्फे 'सोलापूर भूषण' व 'पुणेरत्न' पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, इंडसचे अजित वाळे पाटील, चेतना जाठवडेकर, फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शहाजीराव पाटील, अभय ऐतवडेकर आदी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, 'पुरस्कार दिल्यानेच प्रत्येक जण काम करतो, असे नाही. मात्र, सामाजिक ऋण व्यक्त करणाऱ्यांना सन्मानित करणे आपले कर्तव्य आहे. सुख-दु:खाच्या धाग्याने महावसत्र तयार होत असते. तेच पांघरुन प्रत्येक जण स्वत:साठी आणि काही जण समाजासाठी कार्य करतात, त्यांचे कौतुक होणे गरजेचे आहे.'

फाउंडेशनच्या शोभा पाटील, सुशीला निंबाळकर, भाऊसाहेब निंबाळकर, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, शैलेंद्र पाटील आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले. निनाद काळे यांनी सूत्रसंचालन केले.

***



KVS

रोहिदास अनंता कुंभार
Mo. : 7385571442
9850489924



श्री. राजेंद्र धोंडिबा कुंभार
Mo. : 9850489924

महेश राजेंद्र कुंभार
Mo. :7744051495

काळूबाई वीट सप्लायर्स

उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

मु. पो. सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे.

ठाणे खडवली कुंभारपाडा समाजबांधवांतर्फे दत्ताजी कुंभार बारामती यांचा विशेष सत्कार

– उमेश गुडेकर
अ.म.कुं.समाज विकास संस्था (कोकण विभाग युवक सचिव)



दत्ताजी कुंभार यांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित मोहनराव जगदाळे, उमेश गुडेकर व मान्यवर

अखिल भारतीय कुंभार समाज मातिकला विकास सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ताजी कुंभार साहेब बारामती यांनी ठाणे जिल्ह्यातील खडवली कुंभारवाडा या गावी दि. ६ डिसेंबर २०२० रोजी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी तेथील कुंभार समाज बांधवांनी त्यांचा पुष्पहार देऊन सत्कार केला. दत्ताजी कुंभारसाहेब यांनी केंद्रीय खादी आयोग व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण भारत देशात सतरा हजार कुंभार बांधवांना आधुनिक यांत्रिक चाकांचे वाटप यशस्वीरित्या केले. भारत देशातील कुंभार कारागीरांचे उत्पादन पाचपटीने वाढविण्या–साठी बारामती येथील कुंभार बांधवांनी दत्ताजी कुंभार साहेब यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील कुंभार कारागीरांनी हजेरी लावली होती. दत्ताजी कुंभार साहेब यांनी ठराविक कालमर्यादेत कुंभार समाजाचे उत्पादन पाचपटीने वाढवणार हे बारामती येथील कार्यक्रमात त्यांनी केलेल्या भाषणात सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी काम चालू केले. कुंभार बांधवांना कुंभार काम करतांना जी काही मेहनत करावी लागत होती ती आज आधुनिक यंत्र आल्यामुळे वाचली व कुंभार कारागीरांचे उत्पादान पाचपटीने वाढले आहे. कुंभार व्यवसायात दत्ताजी कुंभार साहेब यांनी आधुनिकता आणल्यामुळे भारत देशातील तरुण पिढी सुद्धा कुंभार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाकडे वळली आहेत. कुंभार समाजातील तरुणांना सुद्धा कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाचे महत्त्व कळले आहे अशाच काही तरुणांनी दत्ताजी कुंभार साहेब यांचा खडवली या छोट्याशा गावी सत्कार केला. दत्ताजी कुंभार साहेब हे संपूर्ण भारत देशात कुंभार समाजाचे नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. तरुणांना राजकारण नको तर त्याच्या हाताला आज काम हवे आहे. राजकारण करुन कुणाचेही पोट भरणार नाही हे तरुण पिढीला माहिती झाले आहे. दत्ताजी कुंभार साहेब यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यातील तरुणांनी पुढील काळात एकत्र येण्याची गरज आहे असे मला वाटते. शेवटी प्रत्येकास आपआपले स्वातंत्र आहे.

***

दिव्यांग महेश देतोय स्वावलंबनाचे धडे

दोन्ही पाय निकामी असतानाही पिठाची चक्कीसह विविध व्यवसाय सांभाळत कुटुंबाला आधार



ढेबेवाडी : पोलिओमुळे दोन्ही पाय निकामी झालेले असतानाही शिबेवाडी (कुंभारगाव, ता. पाटण) येथील महेश शिवाजी कुंभार (वय ३१) जीवनाची लढाई सक्षमपणे लढत आहेत. दुचाकींच्या चाकाचा आऊट काढण्याच्या व्यवसायासह पिठाची चक्की चालवून कुटुंबाला हातभार देत आहेत. एका दिव्यांग युवकाची मोठ्या जिद्दीने सुरु असलेली ही धडपड हातावर हात ठेऊन समस्यांचे गाऱ्हाणे गात बसणाऱ्या समाजातील धडधाकटांना लाजविणारी आहे. कुंभारगावच्या शिबेवाडीतील गरीब कुटुंबात जन्मलेल्या महेश यांना वयाच्या सहाव्या महिन्यात पोलिओमुळे अपंगत्व आले. उपचारासाठी अनेक दवाखान्यांच्या पायऱ्या झिजवूनही काही उपयोग झाला नाही. वाढ खुंटून दोन्ही पाय वाळले. मात्र, या अपंगत्वावर जिद्दीने मात करत महेश यांनी तळमावल्यावरील श्री वाल्मीकी विद्यामंदिरात दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले.

कुंभार कुटुंबीय वारकरी असून, घरात ३८ वर्षांपासून पिठचक्कीचा व्यवसाय आहे. अपंगत्वावर मात करत महेश वयाच्या १६ व्या वर्षीच सफाईदारपणे चक्की चालवायला आणि मातीच्या सुबक चुली बनवायला शिकले. काही वर्षांपासून त्यांनी तळमावले येथे दुचाकी वाहनांच्या रिमचा आऊट काढण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. या विविध व्यवसायातून त्यांनी कुटुंबाला चांगलाच हातभार दिला आहे. महेश यांच्या बंधूचा मुंबईत रिक्षाचा व्यवसाय आहे.

महेश यांनी तबल्यासह विविध वाद्ये वाजविण्याचा छंद जोपासला आहे. सुनील राजे यांनी त्यांना त्याचे प्रशिक्षण दिले आहे. तबला, पखवाज, ढोलकी, ड्रमसेट ट्रिपल आणि कच्ची आदी वाद्ये वाजविण्यासह वडिलांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमात ते पखवाजाची साथ–संगत करतात. सकाळी दहा ते रात्री आठपर्यंत महेश आपल्या कामात व्यस्त असतात, त्यांच्या या धडपडीत कुटुंबाचीही भक्कम साथ पाठीशी आहे.

***

बळवंत कुंभार यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार प्रदान



फलटण : अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या महाराष्ट्र राज्य वीट उत्पादक संघाचे अध्यक्ष मा. बळवंत रावजी कुंभार साहेब (तडवळेकर) यांना महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून 'तडवळे भूषण' तथा यशस्वी उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले मिळालेल्या या बहुमानाबद्दल मा. तडवळेकर साहेबांचे खूप खूप हार्दिक अभिनंदन!

साहेबांनी आपल्या उद्योग क्षेत्रामध्ये शून्यातून विश्व निर्माण केलं, हे आपण बहुसंख्य लोक जाणता. वडिलांचा पारंपारिक असणारा शेती व्यवसाय, तोही तुटपुंजा. आपण ज्या परिस्थितीमध्ये एकत्र कुटुंब चालवलं, तशी मुलांवरती वेळ येऊ नये म्हणून साहेबांच्या वडिलांनी आहे त्या परिस्थितीमध्ये मुलांना उच्च शिक्षण दिलं. तडवळेकर साहेबांचे उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, नोकरीमध्ये न जाता स्वतंत्र व्यवसाय करण्यावरच भर दिला आणि त्यासाठी निवड केली मातीशी निगडित असणाऱ्या व्यवसायाची. अर्थात वीट उत्पादन व्यवसायाची.

काही वर्षांपूर्वी अगदी एका आळ्यापासून सुरू केलेला व्यवसाय, आज ३५ आळ्यापर्यंत येऊन पोहोचला. रोज ७० ते ८० हजार विटांचे उत्पादन साहेबांच्या वीट कारखान्यात होऊ लागलं. उद्योगांमध्ये क्रांती झाली पाहिजे हा विचार मनात ठेवून तडवळेकर साहेबांनी माती मळणी यंत्र विटा थापण्याची यंत्रेही बनवून घेतली आणि वीट उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये एक नवा बदल घडवून आणला. शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला.

महाराष्ट्र राज्य वीट उत्पादक संघाच्या अध्यक्षपदावरती काम करत असताना, राज्याच्या विविध भागात जाऊन वीट उत्पादनाविषयी असणाऱ्या समस्या सोडविण्याचा साहेबांनी आटोकाट प्रयत्न केला आहे. तरुण होतकरू नवउद्योजकांनी उद्योगाच्या क्षेत्रामध्ये येऊन, टिकून राहून यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शनही ते करीत आहेत. अशा निस्सीम सेवेचा वसा घेतलेले आणि समाजाच्या उत्तरदायित्वाची जबाबदारी स्वीकारणारे बळवंतरावजी कुंभार साहेब यांच्या हातून समाजाची अशीच सेवा घडो, उत्तरोत्तर त्यांच्या कार्यामध्ये प्रगती होवो! हीच कामना.

***

सौ. शुभांगी तानाजी कुंभार राज्यस्तरीय जीवन गौरव २०२२ पुरस्काराने सन्मानित



बोधी ट्री एज्युकेशनल फाऊंडेशन व जीवन गौरव वाचनालय औरंगाबाद यांच्यावतीने शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव केला जातो. या वर्षी सहाव्या वर्धापन दिनानिमित्ताने जीवन गौरव पुरस्कार देऊन सौ. कुंभार यांना सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष साहित्यिक श्री बाबा भांड व उद्घाटक मा. खा. प्रा. डॉ. सुनिल गायकवाड तसेच जीवनगौरवचे संपादक रामदास वाघमारे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा सन्मान सोहळा दिनांक २२ मे २०२२ रोजी औरंगाबाद येथे पार पडला. सौ. शुभांगी तानाजी कुंभार या रयत शिक्षण संस्थेच्या जयसिंगराव मल्हारी करपे हायस्कूल, वर्ये येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्था सातारा, मध्य विभाग माध्यमिक विभाग सहसचिव मा. प्रा. श्री. राजेंद्र साळुंखे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. वाघमारे सुनिता सुभाष, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. अमृता तपसे व सर्व सदस्य, ग्रामस्थ, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सौ. कुंभार या वेचले येथील वरिष्ठ मुख्याध्यापक आनंदा कुंभार (गुरुजी) यांच्या स्नुषा आहेत. या कार्यक्रमासाठी त्यांचे वडिल दत्तात्रय राजे यांच्यासह कुटुंबीयांची उपस्थिती होती.

TCAC



Adv. Abhay Raje
B.E. (Prod), MIE, MBA, LL.M.
Director

Tubular Coupling And Auto-Comp Pvt. Ltd.
Manufacturers of API Coupling & Auto Components
G-27, MIDC, Ahmednagar 414 111
Cell : + 91 9923284242 e-mail : abhaykraje@gmail.com
website : www.tcac.co.in

ॲड. अभय राजे
सर्व प्रकारचा कायदेविषयक सल्ला
८३३, बागडपट्टी, नेता सुभाष रोड, अहमदनगर ४१४ ००१
फोन (०२४१) २३४५४०१ मोबा. ९९२३२८४२४२

इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) वसमत शाखेचे उद्घाटन

अध्यक्षपदी डॉ. बाळासाहेब सेलुकर यांची निवड





आयएमए वसमत शाखेच्या माध्यमातून वसमत तालुक्यातील वैद्यकीय व्यावसायिकांना संघटित करुन त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. सर्वांच्या सहकार्याने सदस्य संख्या वाढवून मजबूत संघटन करणार आहे.

– डॉ. बालासाहेब सेलूकर अध्यक्ष, आयएमए वसमत







वसमत : येथे आयएमए वसमत शाखेचा उद्घाटन कार्यक्रम दि. ३० जानेवारी २०२२ रविवार रोजी दुपारी १२ ते २ यावेळात घेण्यात आला. सध्या आधुनिक काळात तसेच कोरोनाच्या संकटात वैद्यकीय व्यावसायिकांसमोर नवनवीन आव्हाने निर्माण होत असल्यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांनी संघटित होणे ही काळाची गरज असल्यामुळे सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ व शिवम हॉस्पिटलचे संचालक डॉ. बाळासाहेब सेलूकर यांच्या अध्यक्षतेखाली नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सदरील कार्यकारिणी तयार करण्यासाठी डॉ. मारोतराव क्यातमवार व डॉ. निलेश डिग्रसे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रथम दीपप्रज्वलन करुन धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. मयूर सातपुते यांनी आयएमएची प्रार्थना घेतली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयएमए महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे, आयएमए महाराष्ट्र माजी अध्यक्ष तसेच आयएमए कळंबचे अध्यक्ष डॉ. रामकृष्ण लोंढे, आयएम ए महाराष्ट्राचे सहसचिव तसेच नांदेडचे माजी आय एमए अध्यक्ष डॉ. सुरेश कदम, आयएमए हिंगोलीचे अध्यक्ष डॉ. सचिन बगाडिया, डॉ. राजेंद्र जवळेकर यांनी आयएमए वसमत शाखेचे उद्घाटन करुन मार्गदर्शन केले. यानंतर नवनियुक्त पदाधिकारी डॉ. बाळासाहेब सेलूकर, उपाध्यक्ष डॉ. बालाजी कऱ्हाळे, सचिव डॉ. मयूर सातपुते, कोषाध्यक्ष डॉ. उमाकांत मारडे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम राज–रसोई सभागृहात घेण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अजय लोकडे यांनी भूषवले. सूत्र संचालन अमोल शर्मा यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. उमाकांत मारडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी डॉ. माणिक मसारे, डॉ. सागर सातपुते, डॉ. गंगाधर काळे, डॉ. नितेश डिग्रसे, डॉ. गजानन शिराळे, डॉ. चेतन सातपुते, डॉ. रामेश्वर मोरे, डॉ. वैशाली डिग्रसे, डॉ. सौ. उर्मिला कऱ्हाळे, डॉ. प्रणोती सातपुते, डॉ. सौरभ मसारे, डॉ. कल्पना केंद्रे, डॉ. सचिन खाकरे, डॉ. अहमद पठाण, डॉ. सारा फरहीन, डॉ. स्नेहल मसारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

***

प्रेरणास्थान



कै.रखमाजी शिर्के



चि. स्वप्निल उ. शिर्के
8446626822



उल्हास र. शिर्के
9921800902

मा. उल्हासराव रखमाजी शिर्के

विट कारखानदार



आमचेकडे दर्जेदार विटा होलसेल भावात मिळतील

मु. मेदनकरवाडी, पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे-४१०५०१. मो. : 9921800902

ॲरीस्टो टेलर्स

सुट व सफारी स्पेशालिस्ट

२४ तासात डिलिव्हरी

सर्व प्रकारचे जेन्टस्चे कपडे त्वरीत शिवून मिळण्याचे एकमेव ठिकाण

सुट, डिझायनर सुट्स, शेरवानी, चुडीदास, सफारी व शर्टस् पॅन्टस्,

ऑफीस युनिफॉर्म व कंपनी युनिफॉर्मस् शिवून मिळतील.

सेवासदन, लक्ष्मीरोड, पुणे ४११ ०३०.

फोन : २४४८०५६०, २४४८३६२०

Aristo TAILORS

THE CUT ABOUT THE BEST

ग्राहकांचा आनंद हाच आमचा विश्वास !

प्रोप्रा.सुधिर शिवाजीराव वचपेकर - मो.९३७१००५०६३

बालाजी कृपा

विटा व रेती सप्लायर्स



ज्ञानेश्वर राऊत
मो. 98231 26819



प्रकाश राऊत
मो. 98225 61179



विजय राऊत
मो. 98503 45529

मु. पो. खडकजांब,
ता. चांदवड, जि. नाशिक

सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास गोरे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!



श्री. बाळाजी भिमाजी गोरे
ज्येष्ठ सत्यशोधक व कुंभश्री प्रतिनिधी
Mo. 9673862392



सौ. अन्नपुर्णा बाळाजी गोरे
दे. राजा, जि. बुलढाणा
Mo. 9673862392



सुरेश बाळाजी गोरे
दे. राजा, जि. बुलढाणा
Mo. 9673145938



रमेश बाळाजी गोरे (पोलीस)
दे. राजा, जि. बुलढाणा Mo. 9923273071

सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास शेवाळे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!



श्री. पांडुरंग नामदेव शेवाळे
औषधी निर्माण अधिकारी चिखली, जि. बुलडाणा
Mo. 8888854655

सौ. प्रमिला पांडुरंग शेवाळे
Mo. 9764328620



चि. प्रदिप पांडुरंग शेवाळे ME
(Comp. Sci & Engg.) प्राध्यापक
D.Y. Patil College of Engineering,
Pimpri) Mo. 9860363240



श्री. संदीप पांडुरंग शेवाळे ME Ph. D
(Chemical Engineering) प्राध्यापक
MIT आळंदी Mo. 9823272765

रक्तदान जनजागृतीसाठी 'तो' करतोय तब्बल ५७०० किमीची पदयात्रा

तिरुवनंतपूरम पासून प्रवास सुरु : २१ हजार किमी चालण्याचा संकल्प



अकोला : केवळ रक्त न मिळाल्याने कोणाचा मृत्यू होता कामा नये, यासाठी रक्तदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने केरळमधील तिरुवनंतपूरम येथून २८ डिसेंबर २०२१ पासून पदयात्रेस सुरुवात केलेला दिल्ली येथील किरण वर्मा (३७) हा अवलीया तब्बल ५७०० किलोमीटरचा पायी प्रवास करत मंगळवारी अकोल्यात पोहोचला. कशाचीही तमा न बाळगता पदभ्रमंतीवर असलेल्या या तरुणाने येत्या दोन वर्षांत २१ हजार किलोमीटर प्रवास करत दिल्लीला पोहोचण्याचा संकल्प केला आहे.

दिल्ली येथील एका मोठ्या शिक्षण समूहातील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून २०१६ पासून रक्तदान चळवळीसाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या किरण वर्मा यांनी 'चेंज विथ वन फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेंतर्गत 'सिंपली ब्लड' व 'चेंज विथ वन मिल' हे दोन उपक्रम सुरु केले आहेत. वर्मा यांनी केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात या राज्यातील तसेच पुदुचेरी व दिव–दमन या केंद्रशासित प्रदेशांमधील ७२ जिल्ह्यांमधून पायी प्रवास केला आहे.

नंदुरबार, धुळे, जळगाव व बुलढाणा असा प्रवास करत ते २६ जुलै रोजी अकोला येथे आले. येथे त्यांनी जिल्हाधिकारी निमा अरोरा यांची भेट घेतली व बुधवारी ते पुढील प्रवासासाठी रवाना झाले. येथून ते अमरावती, नागपूर व इतर जिल्ह्यांमध्ये जाणार आहेत.

रक्तदानासाठी स्वेच्छेने लोक पुढे आले तर देशात रक्ताचा तुटवडा जाणवणार नाही व कोणालाही रक्ताअभावी प्राण गमवावे लागणार नाहीत.

- किरण वर्मा, प्रणेता, 'चेंज विथ वन फाउंडेशन', नवी दिल्ली.

...म्हणून झोकले रक्तदान चळवळीत : वर्मा यांनी २६ डिसेंबर २०१६ रोजी छत्तीसगढमधील रायपूर येथील एका रुग्णासाठी डोनर म्हणून रक्त दिले होते. त्यांनी मोफत दिलेल्या रक्तासाठी एका मध्यस्थाने त्या रुग्णाकडून १५०० रुपये वसूल केले. वैद्यकीय बिल भरण्यासाठी त्या रुग्णाच्या पत्नीला देहविक्रय करावा लागल्याची माहिती किरण वर्मा यांना मिळाली, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. त्याच दिवशी त्यांनी नोकरी सोडली व वर्ष २०२५ पर्यंत देशात रक्ताअभावी कोणाचाही मृत्यू होऊ नये, यासाठी कार्य करण्याचे ध्येय निश्चित केले. पदयात्रा सुरु केल्यापासून त्यांच्या समर्थनार्थ आतापर्यंत विविध ठिकाणी ४२ रक्तदान शिबिरे आयोजित केली.

पायाला दुखापत, तरीही पदयात्रा : पदयात्रा सुरु असताना किरण वर्मा यांच्या उजव्या पायाला दुखापत झाली आहे. या दुखापतीवर किरकोळ उपचार करुन व पायातील जोड्यांमध्ये थोडा बदल करुन ते पायी प्रवास करत आहेत.

***

रक्तदानाच्या जागृतीसाठी २१ हजार किलोमीटर प्रवास पायी यात्रेकरू किरण वर्मा पुण्यात दाखल



किरण वर्मा यांचे पुण्यामध्ये समस्त कुंभार समाज व कुंभश्री मासिकाच्या वतीने स्वागत व सन्मान करुन पुढील पदयात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डावीकडून प्रकाश राजे, संजय राजे, चि. वीर, सत्कारमूर्ती किरण वर्मा आणि विजय गिरीधर

पुणे : रक्तदानाविषयी समाजात जागृती वाढावी म्हणून तिरुअनंतपुरम येथून एक अवलिया तब्बल २१ हजार किलोमीटरच्या पायी यात्रेवर निघाला आहे. २८ डिसेंबर २०२१ रोजी यात्रेची सुरुवात करणारे किरण वर्मा नुकतेच पुण्यात दाखल झाले आहेत.

त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, बंगळूर, बेळगाव, मुंबई, सुरत, गोवा, नंदुरबार आदी शहरांचा प्रवास करत सहा हजार ८०० किलोमीटरचे अंतर शर्मा यांनी पार केले आहे. शर्मा यांना पाठिंबा देण्यासाठी आजवर ४८ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातून जवळपास सात हजार २३९ लोकांनी रक्तदान केले. तसेच शिबिरांव्यतिरिक्त तीन हजारहून अधिक वैयक्तिक रक्तदात्यांनी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार रक्तपेढ्यांमध्ये रक्तदान केले आहे. पुण्याहून आता ते सोलापूर आणि लातूरला जाणार आहे. रक्तदानातील रचनात्मक कार्यासाठी वर्मा यांनी 'सिंपली ब्लड' नावाची संस्था स्थापन केली आहे. डिसेंबर २०२५ नंतर देशातील कोणाचाही रक्ताच्या तुटवड्यामुळे मृत्यू होऊ नये, म्हणून देशात रक्तदानाची संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न असल्याचेही वर्मा यांनी स्पष्ट केले आहे.

संत शिरोमणी गोरोबाकाका समाज सेवा संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण
सुरुवात रक्तदान शिबिरापासून

दिशांत व मनोज साळवी



कोकण खेड कुंभार समाज संघटना पुरस्कृत संत शिरोमणी गोरोबा काका समाजसेवा संस्था, पिंपरी पुणे व यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल रक्तपेढी, पिंपरी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या ७३ व्या प्रजासत्ताक दिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान म्हणजेच जीवनदान. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढून निर्बंध लागल्याने रक्तदानाचे उपक्रमांचे आयोजन खूप कमी प्रमाणात झालेले दिसून येत होते. त्यामुळे शस्त्रक्रियांसह अनेक उपचारांमध्ये विलंब निर्माण होत असल्यामुळे एक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी समजून संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचा मानस केला होता.

दिनांक २६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ९ वाजता संत शिरोमणी गोरोबाकाका विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पिंपरी पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत या शिबिराचा शुभारंभ पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे विद्यमान नगरसेवक राहुल भाऊ भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शविली. रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद लाभला. या शिबिरात ६४ समाजबांधवानी रक्तदान केले.

रक्तदात्यांना संस्थेमार्फत चहा–बिस्कीट, फळ, एन–९५ मास्क व वाय.सी.एम. हॉस्पिटल प्रमाणपत्र तसेच संस्थेकडून सन्मान पत्र देण्यात आले. संत शिरोमणी गोरोबाकाका समाजसेवा संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर लक्ष्मण गुडेकर व कुंभार समाज संघटना कुंभार–पुणे–मुंबईचे अध्यक्ष शांताराम बाबू गुडेकर यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल रक्तपेढी, पिंपरी यांच्या टिमला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. संस्था रौप्य महोत्सवी वर्षात वाटचाल करीत असून पुढील काळात असेच सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतील असे समाज अध्यक्ष शांताराम गुडेकर यांनी सांगितले. यावेळी मा. महापौर हनुमंतराव भोसले, दत्ता बावधनकर कोकण खेड युवाशक्ति, पिं.चिं.चे अध्यक्ष अभिजित कदम व सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच कोकणस्थ कुंभार समाज पिं.चिं. शहराध्यक्ष सत्यवान साळवी भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे मा. संस्थापक अध्यक्ष अनिल नरवणकर यांनी केले.

शांताराम गुडेकर यांनी भोजन व्यवस्थेसाठी ५००० रु., प्रदिप सु. साळवी यांनी एन–९५ मास्कचे वाटप केले. संदेश पाडुरंग परबते यांनी चहा, फळे व बिस्किट डोनेट केले. गणेश बा. साळवी यांनी स्वखर्चाने संस्थेला प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले. शिवाजी साळवी यांनी ५०० रु., अशोक परबते यांनी १००० रु. आर्थिक देणगी दिली. बबन परबते व बाळकृष्ण साळवी (सुरत) यांनी हार, फुले व देवाला पोषाख देणगी दिली. काशिराम साळवी, रविंद्रशेठ साळवी, नारायण साळवी, मनोहर साळवी, सुरेश साळवी, तुकाराम परबते, महिपत साळवी, सचिन चिपळूणकर, संतोष गुडेकर, किशोर साळवी, दिवेश परबते, नरेन्द्र परबते, अनिल साळवी, संतोष नरवणकर, अनिल परबते, पांडुरंग खेडेकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

***

अंध, अपंग, निराधारांना एक लाखाची मदत : आईच्या स्मृतीप्रित्यर्थ स्तुत्य उपक्रम



सिंदखेड राजा : आजच्या धावपळीच्या जीवनात भरपुर लोक पैशासाठी विविध प्रकारचे घोटाळे करतांना दिसतात तर काही मात्र आजही गोरगरीबांसाठी मदतीला पुढे आलेले असतात. आपल्याला समाजाचे काही देणे आहे यापार्श्व भूमीवर देऊळगाव राजा तालुक्यातील सिनगाव जहाँ येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा कुंभार समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष बालाजी भिमाजी गोरे यांनी आपल्या आईच्या स्मृती पित्यर्थ समाजातील २० गरजूंना अंध, अपंग, निराधारांना प्रत्येकी पाच हजार रुपये रोख देत मदतीचा हात पुढे केला आहे.

पेशाने शिक्षक असलेले गोरे यांनी आपल्या जीवनातील बालपणी सिनगाव वरुन देऊळगाव राजाला पायदळी शाळेत जात असल्याचे दिवस डोळ्यासमोर ठेवून पैसा संपत्ती कितीही कमीच आहे. यानुसार गोरे यांनी आपल्या कार्यरत सेवेत एक मुलगा पोलिस हेड कॉन्स्टेबल रमेश गोरे किनगाव राजा येथे कार्यरत आहे. तर दुसरा उत्कृष्ट शेतकरी आहे. आपला परिवार प्रपंच व्यवस्थित चालवत सेवानिवृत्ती नंतर त्यांनी आपले उर्वरित जीवन समाजासाठी अर्पण करण्याचे ठरविले व त्यांनी मागील काही दिवसांपासून समाजसेवेतून समाजातील काही वृद्धांचे डोळ्यांचे ऑपरेशन जालना येथून करुन एक निराधारांना मदतीचा हात पुढे केला तर आता त्यांच्या मातोश्री स्व. रंगुबाई भिमाजी गोरे यांच्या स्मरणार्थ अंध अपंग निराधार अशा वीस गरजूंना प्रत्येकी पाच हजार रुपये रोख देऊन सत्कार करण्याचे काम परिवारातील कोणालाही न सांगता व कोणताही फोटो न काढता बुलढाणा व जालना जिल्ह्यातील समाज बांधवांना मदत केली आहे. या मदतीचे गोरे सरांचे कुंभश्री मित्र परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा!

***

सेंद्रिय शेती पद्धतीने केळी पिकाचे भरघोस उत्पादन



राजेंद्र धनलाल शिरसाठ (कुंभार) सहपरिवारासोबत

आजच्या काळामध्ये रासायनिक खतांच्या अति-वापरामुळे सुपीक जमिनीचा ऱ्हास होत आहे. उत्पादन वाढीच्या स्पर्धे मुळे मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा प्रमाणात वापर होत आहे. पूर्वी काळी जमिनीला माता म्हणून संबोधले जात होते. विविध प्रकारच्या पीक स्पर्धेमुळे जमिनीची उत्पादन क्षमता ही कमी झाली आहे व त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

पण या रासायनिक खतांच्या स्पर्धेच्या तुलनेत सेंद्रिय शेती खूप परवडणारी आहे. सेंद्रिय शेतीमुळे उत्पादनात वाढ आणि उत्पादन टिकवण्याची क्षमता ही रासायनिक खतांच्या तुलनेत जास्त आहे.

असाच एक प्रयोग आव्हाणे, ता. जि. जळगाव येथील शेतकरी राजेंद्र शिरसाठ यांनी सेंद्रिय शेती पद्धतीच्या आधारे केळीचे पीक अतिशय उत्कृष्ट प्रकारे घेऊ शकतो हे दाखवून दिले आहे.

खरं तर शेतकरी बांधवांच्या मनात केळी पिकाविषयी खूप मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे की केळी हे पीक रासायनिक खतांच्या आधारे येऊ शकते, असा समज शेतकरी बांधवांमध्ये आहे.

सेंद्रिय शेतीच्या आधारे आपण केळीचे पीक अतिशय उत्तम प्रकारे घेऊ शकतो हे राजेंद्र शिरसाठ यांनी सिद्ध करुन दाखवले आहे. या सेंद्रिय शेतीविषयी विशेष कृषी पुरस्काराने सन्मानित मल्हारभाऊ कुंभार यांनी वेळोवेळी भेट देऊन शेतीविषयक मोलाचे मार्गदर्शन केले.

*** ९०% सेंद्रिय शेतीवर भर**

राजेंद्र शिरसाठ यांनी कमी रासायनिक खतांमध्ये व सेंद्रिय शेती पद्धतीचा वापर करुन केळीचे पीक चांगल्या प्रकारे येऊ शकते, हे शेतकरी बांधवांना दाखवून दिले आहे.

सेंद्रिय शेती करत असताना प्रामुख्याने शेणखताचा वापर हा मुख्य आहे व त्यासोबत गांडूळखत, निंबोळी खत, एरंडी खत, निंबोळी अर्क, गोमूत्र यांचा योग्य प्रमाणात वापर करुन चांगल्या प्रकारे केळीचे पिक घेतले आहे. शेती करत असताना सेंद्रिय शेतीविषयी आवड निर्माण झाली व उत्कृष्ट दर्जाची केळी व केळी टिकवण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात टिकवू शकतो हे सिद्ध केले आहे. त्याचप्रमाणे केळी पिकासोबत कापूस, सूर्यफूल, बाजरी, दादर (ज्वारी) यांचेही उत्पन्न सेंद्रिय शेतीच्या आधारे चांगल्या प्रकारे पीक घेत आहे. सेंद्रिय शेती करत असताना हिरवळीचे खत, सण, ढेंचा यांचाही खत म्हणून वापर करतात. रासायनिक खतांचा वापर करुन केळीचे पीक घेत असताना केळीचा दर्जा व केळी टिकवण्याची









क्षमता यांच्या अडचणींमुळे सेंद्रिय शेतीच्या आधारे केळीचे पीक नक्कीच फायदेशीर ठरते. सेंद्रिय शेती करत असताना गीर गायी व गावरान गायी व म्हशी यांच्या शेणखताचा उपयोग शेतीमध्ये करतात. येणाऱ्या पुढील काळामध्ये गावरान बियाण्यांचे संगोपन करणे व त्यांचे उत्पादन करणे यांचा ध्यास घेतलेला आहे. प्रामुख्याने लोप होत असलेली गावरान पपईची लागवड येणाऱ्या पुढील काळात करण्याचा निश्चय केला आहे. तसेच लोप पावत चाललेले देशी बियाणे संगोपनासाठी व उत्पादनासाठी बीजमाता राहीबाई पोपरे यांची मदत घेणार आहे.

हे सर्व करत असताना राजेंद्र शिरसाठ यांचा ३२ सदस्यांचा आदर्श परिवार हा पंचक्रोशीत नावलौकिक आहे. राजेंद्र शिरसाठ यांना त्यांचे वडील धनलाल त्र्यंबक शिरसाठ व मोठे बंधू पद्माकर धनलाल शिरसाठ यांच्याकडून सेंद्रिय शेतीबाबत मोलाचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत आहे.

***

राष्ट्रीय डिझायनींग स्पर्धेमध्ये अविष्कार कुंभार प्रथम



अहमदाबाद : Electrical autonomous vehicle Seat designing NIDians द्वारे सर्क्युलर मोबिलिटी सोल्युशनससाठी तयार केलेले कार्गो डिझाईन राष्ट्रीय स्तरावरील SIAM- ADC आयोजित स्पर्धेत अविष्कार कुंभार याने प्रथम पारितोषिक मिळवले.

Automobile designing course च्या अंतिम वर्षातील विद्यार्थी अविष्कार कुंभार याने सोसायटी ऑफ इंडियन नॅशनल प्रॉडक्ट डिझाईन या थीमवर एका वाहनाची डिझाईन तयार केली होती. ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरिंग ऑटोमाईल डिझाईन चॅलेंज आयोजित 'All in One' नावाच्या इलेक्ट्रिकल ऑटोनोमौस वेहिकल कार्गो लेवल मध्ये अविष्कार याने प्रथम पारितोषिक पटकावले. येणाऱ्या पुढच्या काही वर्षात भारतातील स्मार्ट सिटीमध्ये शहराची लोकसंख्या जास्त असेल आणि प्रदूषण देखील वाढेल यावर पर्याय म्हणून एका कार मध्ये बारा व्यक्ती प्रवास करु शकणारी वेगवान आणि प्रदूषणमुक्त कारची निर्मिती केली.

या कारमुळे प्रवाशांच्या गरजा आणि गर्दीचा सामना करणे शक्य होईल. साहित्य नेण्यात अनेक अडचणी येण्याची शक्यता असेल पण या कारमुळे ती अडचण दूर होईल. साहित्य वाहून नेण्यासाठी ऑल–इन–वन इलेक्ट्रिकल रोड मोबिलिटी डिझाईन विकसित केले आहे.

ही कार सामान्य रिक्षा प्रमाणे लोकांची वाहतूक करण्याचे काम करेल आणि मालवाहतूकीस सहज शक्य होईल. कार मध्ये केबिनची सोय करण्यात आली असून सर्वसामान्य नागरिकांना Comfort zone मिळेल अशी या कार ची रचना आहे.

***

अविष्कारने १२ लोक बसू शकतील असे इलेक्ट्रिकल स्वायत्त वाहन तयार केले.

उत्पादन डिझाइन थीमवर डिझाइन केलेले वाहन, हे वाहन सामान्य रिक्षाप्रमाणे लोकांच्या वाहतुकीसाठी काम करेल या स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थी आले होते आणि त्यांनी आपली Design Product **सादर केली होती.** Product Design Theme **वर हे** Vehicle **तयार केले आहे, ते ७ मीटर लांब आहे. मालवाहतुकीसाठी केबिनची सोय करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग व सर्वसामान्य व्यक्ति बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अविष्कार हा इचलकरंजी येथील राजन नायकु कुंभार यांचा मुलगा आहे.**

सर्क्युलर मोबिलिटी सोल्युशनसाठी कार्गो डिझाईन राष्ट्रीय स्तरावर SIAM- ADC स्पर्धेत अविष्कारचा प्रथम क्रमांक स्मार्ट सिरिज मोबिलिटी सोल्युशनसाठी NSID मधील परिवहन आणि Auto mobile design च्या Final year अभ्यास करणारा अविष्कार कुंभारने 'ऑल इन वन' नावाने इलेक्ट्रिकल स्वायत (autonomoun) व्हेइकलची एक कार्गो डिझाईन तयार केली आहे, जी National Level नी आयोजित केलेली Society of Indian Automobile Manufacture Automobile Design चॅलेंज (SIAM - ADC) स्पर्धेत त्यास प्रथम क्रमांक मिळाला आहे असे अविष्कार कुंभारनी सांगितलं.

आताची स्थिती पाहता २०३० साली शहरात लोकसंख्या जास्त असेल त्यामुळे खूप लोकांना गर्दीचा सामना करावा लागेल. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेण्याचा त्रास होणार आहे. या स्थितीसाठी रोड मोबिलिटी एक Vehicle आहे. जे बहुउद्देशीय रितीने काम करेल. या वाहनाची डिझाईन संकल्पना पोलस्टार कडून घेतली आहे.

स्मार्ट सिटी मध्ये एका जागेहून दुसऱ्या जागी जलद आणि प्रदूषण मुक्त हालचाल करता येण्यासाठी हे Vehicle महत्त्वपूर्ण भाग आहे. All In One ऑटोमेशन Vehicle मध्ये एकावेळी १२ व्यक्ती बसू शकतात. कार्गो डिझाइन तयार केलेल्या Vehicle मध्ये आवश्यकतेनुसार प्रवासी व सामान वाहून नेण्यासाठी डिझाइन तयार केले आहे.

समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे अविष्कार व त्याच्या कुटूंबियांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन.

आर. आर. विट उत्पादक
आर. आर. सर्व्हिस स्टेशन

अंबिका चौक देवी मंदीर, कोपरगांव
जि. अ. नगर - ४२३६०१.
मो. ९८२२६२५०६६, ९३२६५४८०००, ९२७२७३८००९



विनायक गायकवाड

अध्यक्ष : कोपरगांव शहर भाजपा
चेअरमन : पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील पतसंस्था
चेअरमन : कोपरगांव तालुका विट उत्पादक सहकारी संस्था
जिल्हा अध्यक्ष : कुंभार समाज (अ. नगर)



चि. शुभम विनायक गायकवाड
१२ वी कॉमर्स



श्री. सुदाम गायकवाड
मो. : ९८२२७३८३१६



भगवती
विट सप्लायर्स
जेऊर पाटोदा



सचिन ईश्वरे
मो. 9822103359



मच्छिंद्र सारंगधर ईश्वरे
मो. 9822438696

महादेव नगर, महादेव मंदीराजवळ, कोपरगांव, जि.अहमदनगर
मो. निवास : 9922720457



जाधव
विट सप्लायर्स



श्री. अण्णासाहेब नामदेव जाधव
मो. ९८२२८०८०६५

श्री. बबनराव नामदेव जाधव
मो. ९५०३४६६०६५

गोरोबानगर, कोपरगांव.

योगेश जाधव : ९७६७०३३६००

श्रीमहालक्ष्मी वीट उत्पादक आणि सप्लायर्स

श्री. ज्ञानेश्वर रायभान वाकचौरे
मु. पो. मुर्शदपूर, चांदगव्हाण रोड, रा. जेऊर पाटोदा,
ता. कोपरगाव, जि. अ. नगर.
मो. 9822883118, 7741003118, 7798259955



श्री. ज्ञानेश्वर वाकचौरे



सौ. मंगल ज्ञानेश्वर वाकचौरे

श्री. दिलीप सुदामराव जोर्वेकर



सप्तश्रृंगी
विट सप्लायर्स

गोरोबानगर, कोपरगांव, जि. अहमदनगर.
मो. : ७३५०४४८३८७, ९८२२८४२२३४, ९९२२३०१६८४.

आमचे प्रेरणास्थान



कै. भाऊसाहेब
निवृत्ती गायकवाड

गायकवाड
विट उत्पादक व सप्लायर्स



श्री. दत्तात्रय भा. गायकवाड
9881007167 / 9850970342



सुनिल भा. गायकवाड
9921962598

चांदेकसारे रोड, जेऊरकुंभारी, ता. कोपरगांव, जि. अ.नगर

आमचे प्रेरणास्थान



कै. पोपटराव निवृत्ती
गायकवाड

गायकवाड
विट उत्पादक व सप्लायर्स



श्री. दिगंबर पो. गायकवाड
9822244192/ 9822819420



योगेश पो.गायकवाड
9881487220

मु.पो. जेऊर कुंभारी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर

कुलगुरु डॉ. शिर्के यांना मानद कर्नलपद बहाल

छात्रसेनेतर्फे मानवंदना, राज्यातील फक्त दोघांना मिळाला बहुमान



कोल्हापूर : कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांना एनसीसीच्या मानद कर्नल पदाचा बॅच प्रदान करताना ब्रिगेडियर समीर साळुंखे व कर्नल डी. एस. सायना.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांना आज राष्ट्रीय छात्रसेनेचे (एन.सी.सी.) मानद कर्नलपद एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मानद कर्नलपदाचे बॅच अणि एन.सी.सी. बॅटन कुलगुरु डॉ. शिर्के यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली. त्यानंतर एन.सी.सी. अधिकारी व छात्र यांनी मानवंदना दिली.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) राष्ट्रीय मुख्यालयामार्फत मानद कर्नलपद बहाल करण्यात येणारे कुलगुरु शिर्के हे महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील एकमेव कुलगुरु आहेत, असे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी सांगितले. प्रा. कुलगुरु डॉ.पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, लेफ्टनंट कर्नल एस.बी. सरनाईक, कर्नल डी.एस. सायना, कर्नल एस. गणपती, कर्नल मंजुनाथ हेगडे, कर्नल विजयन थोरात आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर कुलगुरु डॉ. शिर्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्य पुतळ्यास अभिवादन केले.

ब्रिगेडियर साळुंखे म्हणाले, ''एन.सी.सी. मुख्यालयाला मानद कर्नल पदासाठी गतवर्षी सोळा कुलगुरुंच्या नावांची शिफारस केली होती. सहा नावांना मंजुरी मिळाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन कुलगुरुंचा समावेश आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के आणि दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांचा समावेश आहे.''

मानद कर्नल तथा कुलगुरु डॉ. शिर्के यांनी एन.सी.सी. प्रशिक्षित व देशप्रेमाने भारीत नागरिक निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. त्यामुळे विद्यापीठाने नेहमी एन.सी.सी.ला प्रोत्साहन दिल्याचे सांगितले. कॅप्टन डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत, प्रास्ताविक व सूत्र संचालन केले. कॅप्टन सुनीता भोसले यांनी आभार मानले.

क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, मेजर डॉ.ए.एन. बसुगडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस.एस. महाजन, डॉ. आर. जी. कुलकर्णी, आयक्यूएसी संचालक डॉ. एम.एस. देशमुख, आजीवन अध्ययन केंद्र संचालक, डॉ. ए.एम. गुरव, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

***

नाशिक जिल्हा कुंभार समाज विट भट्टी व्यवसायिक संघटना यांच्या प्रयत्नाला यश . !!



नाशिक येथे अधिकाऱ्यांशी चर्चा करताना मोहनराव जगदाळे, रमाकांत क्षिरसागर व कार्यकर्ते

नाशिक जिल्ह्यातील वीट भट्टीसाठी राख बंद करण्यात आली होती, नाशिक जिल्ह्यातील सर्व संघटना एकत्र आल्यामुळे माननीय कलेक्टर साहेबांना राखे संदर्भात निवेदन देण्यात आले. त्यानंतर कलेक्टर साहेबांनी तातडीची मीटिंग लावण्यात आली. त्याप्रमाणे २३/३/२०२० रोजी ३ वाजता मिटिंग घेण्यात आली. मिटिंग नाशिक उपविभाग अधिकारी मा. निलेश श्रोगी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या मिटिंगसाठी विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंता शिंदे साहेब व राऊत साहेब होते. ज्येष्ठ कुंभार समाजाचे मार्गदर्शक रमाकांतजी क्षीरसागर, मोहनराव जगदाळे, रंगनाथ सूर्यवंशी, संजय भालेराव, गणेश आहेर, नाशिक जिल्हा विकास समितीचे अध्यक्ष सोमनाथ पुंजाराम सोनवणे व अखिल भारतीय विकास समितीचे अध्यक्ष कृष्णा सोनवणे, नवयुवक कुंभार समाज संघटनेचे अध्यक्ष निलेश राऊत सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मिटिंग पार पडली व त्या मिटिंगमध्ये नाशिक कुंभार समाज वीट भट्टी व्यावसायिक यांना दोन दिवस शनिवार व रविवार राख देण्याचे मान्य केले. पुढील दीड महिन्यासाठी कुंभार समाजासाठी राखेचा प्रश्न आहे तो १० एप्रिलपर्यंत मार्गे लावणार असे सर्व अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

***

'कोटा'तील 'आयआयटीयन्स' सांगलीत
३५ लाखांचे पॅकेज डावलून विट्याच्या प्रा. शिरीष कुंभार यांचा जिद्दीचा 'प्रयास'



सांगली येथे प्रयास आय.आय.टी. व नीट अकॅडमी मध्ये आयआयटियन्स विध्यार्थी घडवण्यासाठी ३५ लाखाचे पॅकेज डावलून कोटा येथून आलेले आयआयटियन्स प्रा. शिरीष कुंभार व सौ. आरजू यांचा कुंभश्रीतर्फे सपत्नीक सत्कार करून शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे, आदर्श शिक्षक अनिल शिर्के व महादेवराव कुंभार.

सांगली : उत्तराखंडमधील आयआयटी रुरकीमधील पदवीनंतर कार्पोरेट उद्योग क्षेत्रातील अनेक संधींना नाकारत थेट सांगलीत क्लास घेण्यासाठी आलेल्या शिरीष कुंभार यांचा प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असाच आहे. काही काळ खासगी क्लास सेंटर्सचे हब असलेल्या राजस्थान कोटामधील प्रसिद्ध अशा क्लासेसमध्ये ते शिकवत होते. मात्र तिथं सांगलीतून आलेल्या मुलांनी त्यांना 'गावाकडं या' अशी घातलेली साद ऐकून तिथले ३५ लाखांचे पॅकेज नाकारून ते सांगलीत आले. वयाच्या तिशीत त्यांनी सांगलीतून आयआयटीयन्स घडवण्याचा संकल्प एका आटणी कामगाराच्या मुलाने केला आहे.

खरं तर देशभरातील 'आयआयटीयन्स' चर्चेत येतात ते त्यांना मिळणाऱ्या गलेलठ्ठ पॅकेजमुळे. रुरकी आयआयटीमधून ते २०१५ मध्ये पदवी घेऊन बाहेर पडले. त्यानंतर शिरीष यांनाही अनेक कार्पोरेट संधी चालून आल्या. मात्र शिक्षकच व्हायचं या इराद्याने त्यांनी राजस्थानमधील क्लासेसची पंढरी कोटाकडे धाव घेतली. या प्रवासाबद्दल ते म्हणाले, ''महाविद्यालयातील 'एनएसएस'त सक्रियतेमुळे शिक्षक व्हायचं स्वप्न पाहिले. पदवीनंतर कोटा गाठले. तिथल्या टॉप दोन क्लासेसमध्ये सलग सहा वर्षे अध्यापन केले. तिथे दरवर्षी ३५ लाखांपर्यंतची पॅकेज मिळाली. तिथे देशभरातून दरवर्षी दोन लाखांवर विद्यार्थी जेईई व नीट परीक्षांच्या तयारीसाठी यायचे त्यातून तिथले अर्थकारण लक्षात यावे. तिथल्या क्लासेसच्या गर्दीत सांगली जिल्ह्यातून आलेल्या काही विद्यार्थ्यांनी-पालकांनी तुम्ही सांगलीत का येत नाही अशी विनंती केली. आणि मग वर्षभरापूर्वी मी सांगलीत यायचा निर्णय केला. खरे तर माझे वडील विटा सोडून आटणी व्यवसायासाठी लहानपणापासून राजस्थानला स्थायिक झालेले. मात्र अलीकडे ते गावी परतले. सध्या वडील जयवंत आणि आई सिंधुताई विट्यामध्येच स्थायिक आहेत. त्यामुळे मी सांगलीत येतोय याचा त्यांना कोण आनंद झाला.''

ते म्हणाले,''सांगलीत आल्यानंतर युनीक अकॅडमीच्या प्रा. नारायण उंटवाले यांनी त्यांना सहकार्याचा हात दिला. त्यांच्यासोबत त्यांनी 'प्रयास अकॅडमी' सुरू केली. महापूर, कोरोना अश्या संकटाच्या मालिकेत वर्षभरापूर्वी सुरू केलेला 'प्रयास' आता आकाराला येत आहे. मला समाजाच्या सर्व स्तरातील मुले क्लासला यावीत असे अपेक्षित आहे. त्यासाठी गतवर्षी कोरोनामध्ये आई किंवा पालक गमावलेल्या मुलांना मोफत शिकवण्याचा निर्णय केला. यावर्षीही अशा कुटुंबातील मुलांसाठी ही योजना कायम असेल.

'बार्टी'च्या मदतीने अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठीही मोफत सुविधा दिल्या. सर्व स्तरातील विद्यार्थी येत आहेत. माझ्या या धडपडीत प्रा. उंटवाले यांच्या प्रेरणेबरोबर एनआयटीमधील मुरारी लववंशी, आयआयटी कानपूरचे डॉ. अख्तर अली यांच्यासह सातहून अधिक शिक्षक यांचाही सहभाग आहे. प्रा. उंटवाले सरांना अध्यापन क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून मार्गदर्शनाचा अनुभव आहे.

***

खान्देश सुपुत्र इंजि. जितेंद्र हरिभाऊ प्रजापती MPSC उत्तीर्ण बांधकाम खात्यात सहाय्यक अभियंता वर्ग १/२ म्हणून रुजू.



नंदुरबार : सेवानिवृत्त डेप्युटी इंजि. रमनलाल सुकलाल प्रजापती ह्यांचे पुतणे व सौ. कुसुमबेन व हरीभाऊ सुकलाल प्रजापती ह्यांचे सुपुत्र इंजि. जितेंद्र ह्याने होळी सणाच्या संध्येला घोषीत झालेल्या एमपीएस सी- २०१९ च्या परीक्षेत सहाय्यक अभियंता वर्ग १/२ मध्ये एकूण ११४५ जागांच्या भरतीमध्ये ५२१ क्रमांकावर उत्तीर्ण होऊन मोठे यश संपादन केले आहे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

बांधकाम इंजि. म्हणून शिक्षण घेऊन इंजि. जितेंद्र ह्याने नियोजन पूर्वक अभ्यास करीत अत्यंत मेहनतीने स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केले आहे. ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार ह्या सातपुड्याच्या पायथ्याशी व सुर्यकन्या तापीच्या काठावरील खापर ह्या सुशिक्षित गावातून इंजि. चि. कल्पेश, इंजि. चि. जितेंद्रसह पंधरा-सोळा कुंभार युवक-युवती इंजि. देश विदेशात नाव कमवीत आहेत. स्पर्धा परीक्षांना सामोरे जात आहेत.

एकाच घरातील दोघे चुलत भाऊ इंजि. चि. कल्पेश (युपीएससी मुख्य परीक्षा उत्तीर्ण) व इंजि. जितेंद्रच्या यशामुळे संपूर्ण तापीकाठ पट्ट्यात होळी सणासह आनंद व्यक्त करण्यात येत आहे. इंजि. चि. जितेंद्र ह्यास सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये आगामी काळात डिटेल पोस्टिंग दिली जाईल. दोघा भावांची किर्ती उज्वल होवो म्हणून संत शिरोमणी श्री गोरोबाकाका चरणी प्रार्थना.

समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्यातर्फे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.

डोणोली गावचे सुपुत्र 'अनिकेत वैशाली सहदेव कुंभार' याची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदी निवड



फोटो ओळ : डोणोली येथे लेफ्टनंट पदी निवड झालेल्या अनिकेत कुंभार यांचा नागरिक सत्कार सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अशोकराव पोवार, शिवाजीराव जमदाडे, सुभेदार राजेश पाटील यांनी केला.

देशसेवेचा वारसा असणारे कुंभार कुटुंब

अनिकेत कुंभार याच्या कुटुंबामध्ये सख्खे आजोबा लक्ष्मण कुंभार (वय ६१) यांनी २० वर्षे, चुलत आजोबा आनंदा कुंभार (वय ६०) यांनी १८ वर्षे, वडील सहदेव कुंभार (वय ४५) यांनी २० वर्षे सैन्य दलात देशसेवा करुन निवृत्त झाले आहेत. अनिकेतच्या निवडीने तिसरी पिढी देशसेवेचा वारसा जपत आहे.

प्रतिक्रिया : सैन्य दलात जायचेच हेच ध्येय ठेवून प्रामाणिक प्रयत्न केल्याने माझी निवड झाली. कुटुंबातील सर्वांचेच प्रोत्साहन मिळाल्याने आई, वडील कुटुंबाचे व माझे स्वप्न पूर्ण झाले. – अनिकेत कुंभार

डोणोली गावचे सुपुत्र अनिकेत वैशाली सहदेव कुंभार यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदी निवड झाल्याने गावाला पहिला सैन्य दलात अधिकारी होण्याचा बहुमान मिळाला असे प्रतिपादन सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अशोकराव पोवार यांनी केले.

डोणोली (ता. शाहुवाडी) येथील अनिकेत कुंभार याची राष्ट्रीय रक्षा अॅकडमी (एन.डी.ए.) पुणे येथे भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदी निवड झाले बद्दल ग्रामस्थांनी घेतलेल्या सत्कार कार्यक्रमात पोवार म्हणाले अनिकेत हा सर्वसामान्य कुटुंबातील असून त्याने सैन्य दलात अधिकारी व्हायचे हे ध्येय ठेवून जिद्द चिकाटीच्या जोरावर प्रामाणिकपणे त्याने आई, वडील व कुटुंबापासून दूर राहून देशाच्या विविध राज्यातील सैनिकी शाळेत अभ्यास करुन सैन्य दलात अधिकारी झाला.

सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अशोकराव पोवार, डी.वाय.एस.पी. शिवाजी जमदाडे व निवृत्त सुभेदार राजेश पाटील, शिवाजी पाटील, विलास पाटील, तुकाराम पाटील, मुख्याध्यापक रवींद्र कुंभार यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. प्रशिक्षण पूर्ण करुन तो गावी आला त्यावेळी गावातून अनिकेत याची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. त्याच्या यशाचा अभिमान ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

यावेळी योद्धा कमांडो रेस्क्यू फोर्सचे हवालदार संजय जांबिलकर, अनिल पाटील, विश्वास पाटील, सुरेश राठोड उपस्थित होते.

मिलिंद कुंभार यांस भारतीय कला सन्मान पारितोषिक



पारोळा : लोकमान्य टिळक शिक्षण संस्था संचालित पारोळा तालुक्यातील एकमेव सी.बी. एस.इ. बोहरा सेंट्रल स्कूल चे विद्यार्थी नेहमी क्रीडा, कला व शिक्षण क्षेत्रात यश संपादन करत असतात. यंदाही सेंटर एज्युकेशन डेव्हलपमेंट अँड रिसर्च पुणे द्वारा आयोजित चित्रकला व रंगभरण स्पर्धेत बोहरा शाळेतील वर्ग १० वी मध्ये शिकणारा ग्रामीण भागातील विद्यार्थी मिलिंद मोहन कुंभार चोरवड–पारोळा याने उत्स्फुर्त सहभाग घेऊन १५ वर्षे वयोगटातील संघातुन, स्टार ट्रॉफी, प्रमाणपत्र व मानाचा समजला जाणारा भारतीय कला सन्मान अवार्ड पटकावला. त्याच्या या यशामुळे शाळेचे व पारोळा शहराचे नावलौकिक केले. यामुळे संस्थेचे चेअरमन सुरेन्द्र बोहरा, शाळेचे प्राचार्य सोभा सोनी व वीरेंद्र सखा व सर्व शिक्षक वर्गाने, मिलिंद व त्याच्या पालकांचे अभिनंदन केले.

***

मानकरी कुंभारांकडून विधीसाठी घागरी



सोलापूर : ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांच्या यात्रेतील धार्मिक विधीसाठी मानकरी कुंभार यांच्याकडून सोमवारी मातीच्या घागरी मानकरी हिरेहब्बू यांच्याकडे सुपुर्द करण्यात आल्या.

सोमवारी सकाळी मानकरी मल्लिकार्जुन म्हेत्रे–कुंभार यांच्या उत्तर कसब्यातील निवासस्थानी श्री गणपती व श्री सिद्धेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर दिवे बसविण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर पूर्वापार परंपरेप्रमाणे धार्मिक विधीसाठी मातीच्या घागरी मानकरी हिरेहब्बू यांच्याकडे मानकरी योगिराज कुंभार यांनी सुपुर्द केल्या.

***

दिनेश खैरनार यांची इसरो मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार हस्ते संजय राजे



धुळे : साक्री येथील दिनेश लक्ष्मण खैरनार यांची इसरोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल कुंभश्री संपादक संजय राजे यांनी पुणे येथे नुकतेच अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी दिनेश याच्या बहिणीचे सासू सासरे सौ. शकुंतला व धोंडू सोनवणे, बहीण सौ. माधवी व जिजाजी प्रीतम सोनवणे, सौ. श्वेता नितीन सोनवणे, ॲड. सौ. नीलिमा विकास कुंभार, विकास कुंभार व सोनवणे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

चि. दिनेश याने सिंहगड कॉलेज पुणे येथून बी.ई. मेकॅनिकल पदवी ८०% गुण मिळवून प्राप्त केली. तद्नंतर त्याने एन.एल.सी. इंडिया या भारत सरकारच्या कंपनीमध्ये नोकरी मिळवली. पुढे दिनेश यांनी इसरो या भारतीय अंतराळ संशोधन केंद्रातील परीक्षेत भारतातून नववा क्रमांक मिळवून उज्वल यश संपादन केले ही अत्यंत अभिमानास्पद आहे. दिनेश यांचे वडील लाईनमन म्हणून एम.एस.सी.बी. मधून निवृत्त झाले आहेत. आई सौ. आशा या गृहिणी आहेत. उभयंतांनी दोन मुलांना इंजिनिअर केले, तीन मुलींना चांगले शिक्षण देऊन त्यांची लग्ने लावून दिली. ही मोठी अभिमानास्पद कामगिरी त्यांनी केली आहे.

आई वडिलांच्या कष्टाचे चीज चि. दिनेश यांनी केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्यातर्फे चि. दिनेश व त्याच्या परिवाराचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन व भावी कार्यास शुभेच्छा!!

***

इंजि. एस. के. सुरवसे साहेब यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नतीने महाराष्ट्र शासनाकडून नियुक्ती



मुंबई : मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाचे काम वेगाने प्रगतीपथावर नेणारे अधीक्षक अभियंता इंजि. एस. के. सुरवसे साहेब यांची महाराष्ट्र सरकारने त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना मुख्य अभियंता तथा प्रकल्प संचालक म्हणून पदोन्नती देत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (MMRDA) बांद्रा रेकलेमेशन (प.) मुंबई येथे नियुक्ती दिली आहे. या आधी अधिक्षक अभियंता म्हणून आणि आता महाराष्ट्र राज्याच्या महत्वकांक्षी समृद्धी महामार्ग प्रकल्पाचे मुख्य अभियंता म्हणून सर्वोच्च पद भूषविणारे ते कुंभार समाजातील पहिलेच अधिकारी आहेत.

नवनियुक्त मुख्य अभियंता माननीय इंजि. एस.के. सुरवसे साहेबांचे अखिल कुंभार समाजातर्फे व कुंभश्री मित्र परिवार यांचे वतीने मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन आणि भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

***

सार्वजनिक बांधकाम अधीक्षक अभियंतापदी शामराव कुंभार



कोल्हापूर : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोल्हापूर मंडळ अधीक्षक अभियंतापदी शामराव पांडुरंग कुंभार यांची नियुक्ती झाली आहे. दोन दिवसांत ते कार्यभार स्वीकारणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संभाजी माने यांची पदोन्नतीने पुणे येथे मुख्य अभियंतापदी बदली झाली आहे. माने यांनी पदभार सोडल्यानंतर हे पद रिक्त होते. माने यांच्या जागी कुंभार यांची निवड झाली आहे. कुंभार हे मूळचे म्हारुळ (ता.करवीर) येथील आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण श्रीराम हायस्कूल कुडित्रे येथे झाले आहे. अभियांत्रिकी शिक्षण कराड, सातारा आणि सांगली येथे झाले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून त्यांची २००५ मध्ये सहायक कार्यकारी अभियंता म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागात निवड झाली.

कार्यकारी अभियंता म्हणून त्यांनी एमएसआरडीसी कार्यालय मुंबईत काम केले तर गडचिरोलीसारख्या आदिवासी व नक्षलग्रस्त भागात सहा वर्षे काम केले आहे. २०१८ पासून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. तेथून पदोन्नतीचे कोल्हापूर येथे त्यांची अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली.

***

अजय वीरकर यांना पितृ शोक



पुणे : अजय वीरकर प्रदेशाध्यक्ष नमो नमो मोर्चा भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र आणि कार्यालयीन सरचिटणीस कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश यांचे वडील जगन्नाथ वीरकर यांचे वृद्धापकाळाने दिनांक ११/१०/२२ रोजी दु:खद निधन झाले आहे.

त्यांचे मागे पत्नी कौशल्या, पाच मुले अशोक, अरुण, अरविंद, अनिल, अजय, पाच सुना, तीन मुली सौ. आशा, सौ. अनिता, सौ. अश्विनी, वीस नातवंडे, सोळा परंतुडे असा मोठा परिवार आहे.

***

पंधरा वर्षांच्या अभिषेक गाडेकरने लिहले Problems of Bharat हे इंग्रजी भाषेतील पुस्तक





गंगापूर : गंगापूर तालुक्यातील रघुनाथ नगर येथील अभिषेक अप्पासाहेब गाडेकर दहावीत शिकणाऱ्या १५ वर्षीय मुलाची जिज्ञासू वृत्ती दिसून आली आहे. त्याने Problems of Bharat हे १०९ पेजेस असलेले इंग्रजी भाषेतील ईबुक पुस्तक अवघ्या २३ दिवसात लिहिले आहे.

कोरोनाच्या महामारीत त्याने देशातील समस्या (जातीवाद, प्रांतवाद, नक्षलवाद, बेरोजगारी या विषयाला अनुसरुन त्याने हे पुस्तक लिहिले आहे). २८ तारखेला हे पुस्तक ॲमेझॉनवर प्रकाशित होणार आहे. डिजिटल युगात तरुण पिढी वाचन आणि लेखन यापासून दुरावत असताना अभिषेक याने आपली आवड आणि छंद जोपासत सामाजिक विषयावर पुस्तक लिहिले आहे. अभिषेकच्या नेत्रदीपक कामगिरीने सर्वच क्षेत्रातून कौतुक होत आहे. कोरोनाच्या महामारीच्या संकटाने दीड वर्षापासून लॉकडाऊनमुळे शाळा बंद असल्याने मुलांचे ऑन लाइन शिक्षण सुरु होते. ऑन लाइन अभ्यासात मुलांना नेटवर्क मुळे अनेक अडचणी येत आहे त्यातच लिहिणे वाचनाकडे मुलाचे दुर्लक्ष झाल्याचे समोर आले आहे.

राजे शिवाजी विद्यालय बजाजनगर येथे शिक्षण घेणारा ग्रामीण भागातील अभिषेक अप्पासाहेब गाडेकर याने स्वातंत्र्यवीर सावरकर व प्रणेश पटेल मध्यप्रदेश यांच्या प्रेरणेतून हे इंग्रजीतील ईबुक पुस्तक लिहिण्याची नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

आता अभिषेकने 'संन्यासी द हार्ड वारीयर' या पुस्तकाचे लिखाण सुरु केले असल्याचे सांगितले.

चि. अभिषेक हा अहमदनगर जिल्हा कुंभार समाजाचे अध्यक्ष राजेंद्र बोरुडे यांचा जवळचा नातेवाईक आहे. अभिषेकचे कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व भावी कार्यास शुभेच्छा!

***

आप्पासाहेब काळे प्रवेशद्वार लोकार्पण सोहळा

– जगदीश मोरे (सोशल मिडिया)

येसगाव, ता. मालेगाव : दि. ७ जून २०२१ रोजी, येसगाव येथे बांधलेल्या स्मशानभूमी प्रवेशद्वाराचे उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा ह.भ.प. माऊली नामदेव महाराज बोगिर यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मा. आमदार सुहासजी कांदे, माजी जि.प. अध्यक्ष मधुकर हिरे, माजी सभापती सौ. प्रतिभा पाटील, सानेगुरुजी एज्यु. सोसायटीचे चेअरमन सुभाष पाटील यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.



२० फूट उंच आणि २० फूट रुंद असे आर.सी.सी. बांधकाम असलेले भव्यदिव्य ''प्रवेशद्वार'' येसगाव येथील कुंभार बंधू स्व. बाबूराव भगवानराव काळे, बापूराव भगवानराव काळे, रमेश भगवानराव काळे आणि कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशचे उत्तर महाराष्ट्र विभागाचे संपर्क प्रमुख प्राचार्य मा. उत्तमराव काळे (चाळीसगाव), नारायण काळे यांनी त्यांच्या आईवडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्वखर्चाने बांधून दिले. ग्रामपालिकेच्या सहमतीने प्रवेशद्वारास ''आप्पासाहेब भगवानराव काळे स्मृती वैकुंठधाम प्रवेशद्वार'' असे नामकरण करण्यात आले. याप्रसंगी येसगाव येथील आजी–माजी, सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामस्थ, परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

काळे परिवाराने त्यांच्या आईच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून हा लोकार्पण सोहळा आयोजित केला होता. उपस्थितांना चहा, नाष्टा, जेवण काळे परिवाराच्या वतीने देऊन या सोहळ्याची सांगता झाली.

ता. मालेगाव, येसगाव येथील मोठ्या गावात कुंभार समाजाच्या दृष्टीने ही भुषणावह बाब आहे अशी संधी मिळणे ही कुंभार समाजाच्या दृष्टीने मोलाची गोष्ट आहे. सामाजिक बांधिलकी ठेऊन उत्तमराव काळे व परिवाराने हे जे काही प्रवेशद्वाराच्या रुपाने योगदान दिले त्याबद्दल कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश, नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती, कुंभार समाज उत्कर्ष मंडळ (कुसूम) तर्फे अभिनंदन व शुभेच्छा!

***

लघुग्रहांच्या शोध मोहिमेमध्ये खगोलशास्त्रज्ञ विशाल कुंभार टीमचे यश
'नासा'च्या प्राथमिक यादीत नव्या सहा लघुग्रहांचा समावेश

– श्याम लोखंडे (खांब)



लघुग्रह शोध मोहीम ३ ते २८ मे २०२१ दरम्यान राबविली गेली. यासाठी लागणारी निरीक्षणे अमेरिकेच्या हवाई बेटावरील पॅन स्टार्स टेलिस्कोपमधून घेतली गेली होती. या शोधमोहिमेमध्ये कुंभार यांना सोवन आचार्य, सिटीझन सायन्स ग्रुप व इतर ४ निरीक्षकांचे सहकार्य मिळाले आहे.

खांब : आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्था 'नासा'ने सुरु केलेल्या आंतरराष्ट्रीय लघुग्रह शोध मोहिमेअंतर्गत खगोलशास्त्र विशाल कुंभार व त्यांच्या टीमने ६ लघुग्रहांचा प्राथमिक शोध लावला असल्याची माहिती ग्लोबल मिशन ॲस्ट्रोनोमी अँड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व खगोलशास्त्रज्ञ विशाल कुंभार यांनी दिली.

नासाने सुरु केलेल्या लघुग्रह शोध मोहिमेमध्ये मंगळ व गुरु ग्रहांच्या मध्ये असलेल्या लघुग्रहांच्या पट्यातील लघुग्रह शोधण्याचे विशेष कार्य होते. खगोलशास्त्रज्ञ विशाल कुंभार व त्यांच्या टीमने केलेल्या निरीक्षणांमध्ये ६ लघुग्रह सापडले. त्यातील ३ लघुग्रह विशाल कुंभार यांनी शोधले आहेत. या ६ लघुग्रहांची प्राथमिक शोध यादीमध्ये नोंद झालेली आहे. त्यानंतर लघुग्रहांचे व त्याच्या हालचालींचे निरीक्षण करुन त्याची सत्यता पडताळून त्याचे नामकरण केले जाईल. या प्रक्रियेसाठी ५ ते ७ वर्षांचा कालावधी लागतो, असे विशाल कुंभार यांनी सांगितले.

मंगळ व गुरु ग्रहांच्यामधील लघुग्रहांच्या पट्यातील लघुग्रह हे सूर्याभोवती परिभ्रमण करत असतात, प्रत्येक लघुग्रहाची परिभ्रमणाची वेळ व गती सारखी नसते, त्यामुळे ते एकमेकांवरती आदळून त्यांचा मार्ग बदलू शकतात, असे लघुग्रह पृथ्वीच्या दिशेने येण्याची व पृथ्वीवरती आदळण्याची शक्यता असते. म्हणून लघुग्रहांचे सतत निरीक्षण करणे व त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेच लघुग्रहांच्या अभ्यासातून ग्रहांची व सूर्यमालेची निर्मिती कशी झाली? पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या निर्मितीमध्ये त्यांचे काही योगदान आहे का? अश्या बऱ्याच रहस्यांचा उलगडा लघुग्रहांच्या निरीक्षण व संशोधनातून करता येतो असे कुंभार यांनी सांगितले.

अशी लघुग्रह शोध मोहीम शालेय विद्यार्थ्यांमध्ये राबवून त्यांच्यातील अवकाश संशोधन वृत्तीला चालना देण्याचा प्रयत्न खगोलशास्त्रज्ञ विशाल कुंभार व त्यांची टीम करत आहे. विद्यार्थ्यांनी या मोहिमेमध्ये सहभाग घेऊन लघुग्रहांचे निरीक्षण व संशोधन करावे असे आवाहन देखील शेवटी विशाल कुंभार यांनी केले आहे.

***

'तनिष्क शेंडोकार' यांचे हार्दिक अभिनंदन !!!



'तनिष्क सचिन शेंडोकार' डॉ. सचिन मारोतराव शेंडोकार पुणे यांचा मुलगा डॉ. सचिन शेंडोकार हे पीएचडी करण्याकरीता सध्या अमेरिकेत आहेत. यापुर्वी देखील त्यांनी नॅनो टेक्नोलॉजीमध्ये अमेरिकेतून पीएचडी केलेली आहे. सोबतच समाज सेवेच्या माध्यमातून कुंभार समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व योग्य मार्गदर्शन करणे हे ही कार्य ते मोठ्या पोटतिडकीने करीत असतात. श्री संत गोरोबाकाका समाजोन्नती समितीच्या 'दिशा आयुष्याच्या' या ग्रुप मधील आपल्या विद्यार्थ्यांकरीता आपण त्यांचा काही दिवसांपूर्वी वेबिनार आयोजित केला होता व त्याला विद्यार्थ्यांकडून भरभरुन प्रतिसाद मिळाला होता हे आपणा सर्वांना माहित आहेच, अशा कर्तृत्ववान माणसाचा 'तनिष्क' हा मुलगा.

म्हणतात ना! ''खाण तशी माती'' तनिष्क देखील वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकत परदेशी शिक्षणाकरता जात आहे. तनिष्कला अमेरिकेतील नॉर्थ कोरोलीना स्टेटमधील रॅलीघ विद्यापीठात मेकॅनिकल इंजिनिअरिंगला प्रवेश मिळाला ह्या प्रवेशाकरीता १२ वीत असताना तिकडच्या विद्यापीठातील प्रवेश परीक्षा (entrance) दिल्या व त्यामध्ये नेत्रदीपक यश संपादन केल्यामुळे त्याला शिष्यवृत्तीसह प्रवेश मिळाला. अमेरिकेत शिक्षणाकरता तेथील SAT, IELTS, TOEFL अशा सर्व परिक्षेत यशस्वी झाल्यामुळे तनिष्कला अमेरिकेतील अनेक विद्यापीठात प्रवेश मंजूर झाला. पैकी त्याने या विद्यापीठात रिसर्च व इंटर्नशिप उपलब्ध असल्यामुळे येथे प्रवेश घेतला. सोबतच डॉ. सचिन शेंडोकार यांचे देखील त्याच स्टेटमध्ये वास्तव्य आहे.

विशेष म्हणजे परदेशात शिक्षणाकरता प्रवेश परीक्षेपासून ते प्रवेशा–पर्यंतचा प्रवास हा तनिष्कचा एकट्याचा आहे. तरीदेखील याचे श्रेय त्याचे वडील व आजोबा मारोतराव खंडूजी शेंडोकार यांना नक्कीच आहे. कुंभार समाजातील समवयीन विद्यार्थ्यांबाबत बोलताना तो म्हणतो की इतर विद्यार्थ्यांनी देखील त्यांचे शैक्षणिक भविष्य उज्वल करतांना परदेशात शिक्षणाकरीता प्रयत्न करायला हवा. परिश्रम व अडथळ्यांना न घाबरता प्रयत्न केले तर सर्व सोपे आहे.

तनिष्कचे या यशाबद्दल समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवाराचे वतीने मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

विश्वजित वीट सप्लायर्स



आमचेकडे सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

वाळू, मुरुम, खडी होलसेल भावात मिळेल



दिपक विष्णूपंत राऊत
9921218249

संजय विष्णूपंत राऊत
9922278249

उंबरखेड रोड, सिताराम नगर, पिंपळबांव बसवंत,
ता. निफाड, जि. नाशिक



राजस्थान स्वीट मार्ट

हमारे यहाँ सभी प्रकारकी बढीयां मिठाईयाँ और नमकीन मिलेगा।

मु. पो. सायखेडा, एस.टी. स्टँड के सामने,
ता. निफाड, जि. नाशिक

प्रोप्रा. भवरलाल
गोकुलराम प्रजापती
Mo. 9423184307
9503571807

मरुधर स्वीट कॉर्नर

सायखेडा, चौफुली, चाटोरी,
ता. निफाड, जि. नाशिक

मुल पता : डोली, राजगुरा, जि. बाडमेर, राजस्थान.



Karad :
Patil Heritage, Below Union Bank,
Near Datta Mandir, Datta Chowk,
(2 min from ST Stand)
3 pm to 7.30 pm (Sunday Off.)
Ph. (02164) 228209

Dr. Mansing Raje
M.D. (Hom.)
Homoeopathic Consultant
Mob : 9423828984

Kole :
(12 km. from Karad)
9 am to 2 pm
Ph. (02164) 250209

अंबिका प्लायवुड अॅन्ड हार्डवेअर



प्लायवुड, फ्लशडोअर,
सनमाईका फिटींग
मटेरिअल योग्य दरात मिळले.

वाघचौरे ब्रदर्स
निमगांव, शिर्डी

प्रोप्रा. श्री. सचिन राजेंद्र वाघचौरे
मो. 9823971293, 8007023200

नगर-मनमाड रोड, मु. निमगाव, पो. लक्ष्मीवाडी शिर्डी, ता. राहता,
जि. अहमदनगर.



आहेर ब्रिक्स

बिल्डिंग मटेरियल अॅण्ड सप्लायर्स



श्री. राजेंद्र रंगनाथ आहेर
अध्यक्ष निफाड तालुका कुंभार समाज सामाजिक संस्था
अध्यक्ष कुंभार समाजोन्नती मंडळ
ओझर शहर बारा बलुतेदार महासंघ
M. : 9422249690/9405888687/7588212624

चि. ज्ञानेश्वर राजेंद्र आहेर
डिप्लोमा इन अॅग्रीकल्चर



बाणगंगा, मारुती मंदिराजवळ, विटभट्टी, ओझर (मिग),
ता. निफाड, जि. नाशिक 422 206. **Mob.: 9423972947**

सौ. सुनंदा रा. आहेर

आदर्श बेकरी



सर्व प्रकारचे बेकरी आयटमस् व खाद्य पदार्थांचे चिक्कीचे

एस.टी.स्टँड जवळ, मु.पो.ता. पाटण,
जि. सातारा.

सुभाष लक्ष्मण कुंभार
कुंभश्री प्रतिनिधी
मो. 9869152644

सचिन आर्ट

आमच्याकडे श्रीगणेश, देवीच्या मुर्ती



होलसेल व रिटेल भावात मिळतील



प्रो. संजय सोनावणे
9960297140 /9028726730

सचिन सोनवणे

बस स्टॅण्ड समोर, कुंभार वाडा, सटाणा



विजय कुंभार : 9767793566
(ललगुणकर)

कृष्णा

अॅल्युमिनीय अॅन्ड ग्लास

• अॅल्युमिनीयम स्लायडिंग, विंडो, डोअर, पार्टिशनस् •
• एस.एस. मॉस्क्यूटो नेटींग अॅन्ड अॅल्युमिनीयम पॅनल शिट •

नवरत्न मंगल कार्यालय जवळ, महादेवनगर, मांजरी रोड, हडपसर, पुणे

स्फोटक शोध यंत्र निर्मितीत देवराष्ट्रेचा दिपक कुंभार यांचा डंका

देवराष्ट्रेचा दीपक व टीमचे संशोधन, दहशतवादी कृत्यांना बसणार पायबंद





रायडर एक्स हे स्फोटक शोध उपकरण तयार करीत असताना खूप अडचणी आल्या. आपण देशासाठी हे उपकरण तयार करीत आहोत. उपकरण तयार करायचेच असा निर्धार होता. दोन वर्षांनंतर तो सत्यात उतरला.

– दीपक कुंभार

देवराष्ट्रे : देवराष्ट्रेला ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वारसा आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार व हिमालयाच्या मदतीला धावून जाणारे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांची ही जन्मभूमी. याच गावात देशातील पहिले मानवनिर्मित सागरेश्वर अभयारण्य आहे. याच गावातील तरुण संशोधक दीपक कुंभार यांनी देशातील पहिले स्फोटक शोध यंत्र तयार केले आहे. गाव आम महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

दीपक कुंभार बंगळुरु येथील राष्ट्रीय विज्ञान संस्थेत कार्यरत आहे. देशातील पहिले स्फोटक शोध यंत्र त्यांनी दोन सहकाऱ्यांच्या मदतीने तयार केले. उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन व बंगळूर येथील राष्ट्रीय विज्ञान संस्था (आयआयएससी) यांनी संयुक्तरीत्या रायडर एक्स शोध यंत्र उपकरण विकसित केले आहे. रायडर एक्स तयार करण्यासाठी दीपक व टीमला दोन वर्षे लागली.

कैकदा वाटले, की हे उपकरण आपल्याकडून होणार नाही परंतु जिद्द, परिश्रमाची तयारी असली की, कोणतेही संकट रोखू शकत नाही. शोध स्फोटक यंत्र तयार करायचेच असा ध्यास घेतला होता. रात्रंदिवस टीम काम करीत होती. आणि एक दिवस तो सुवर्णक्षण आला. रायडर एक्स उपकरण तयार झाले.

रायडर एक्स तंत्रज्ञानामुळे दहशतवाद्यांकडून हल्ल्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकांचा शोध घेणे शक्य होणार आहे. वीसहून अधिक स्फोटके क्षणात शोधण्याची किमया रायडर एक्स उपकरण करते. दीपक व टीमचे या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. हे शोधयंत्र विकसित करण्यासाठी 'एचईएमआरएल'चे संचालक के.पी.एस. मूर्ती यांचे योगदान आहे. हे उपकरण राष्ट्रीय संरक्षण विभागाकडे सुपूर्त केले आहे.

दिपक व त्याच्या टीमचे कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवाराकडून हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा!

***

रोहणी आयोगाची त्वरीत अंमलबजावणी करावी हिच आमची मागणी - पांडुरंग कुंभार



उस्मानाबाद : कळंब शहरातील बलाई मंगल कार्यालय येथे बारा बलुतेदार महासंघ व ओबीसी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ओबीसीचे नेते पांडुरंग कुंभार होते. तर प्रमुख पाहुणे बारा बलुतेदार संघाचे राज्याचे उपाध्यक्ष धनंजय शिंगाडे, लिंगायत संघर्ष समितीचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ मुंडे, तेली समाज संघटनेचे राज्य युवक उपाध्यक्ष रवी कोरे आळणीकर, ओबीसी समाजाचे जिल्हाध्यक्ष तथा नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण माने, बारा बलुतेदाराचे उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संतोष हंबीरे, समता परिषदेचे राज्य सरचिटणीस आबासाहेब खोत, कुंभार समाजाचे महाराष्ट्र राज्य चिटणीस कल्याण कुंभार जिल्हाध्यक्ष सतीश कदम यांच्या उपस्थिती कार्यक्रमस्थानी होती.

या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांनी बारा बलुतेदार व ओबीसी बांधवांनी एकत्रित येण्याची काळाची गरज उपस्थित बांधवासमोर आपल्या भाषणातून मांडली. धनंजय नाना शिंगाडे यांनी आपल्या भाषणात ओबीसी समाजाचे महामंडळ स्थापन करावे व त्याला एक हजार कोटी रुपये देण्यात यावे व त्यातून आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणा कमी करा ही आमची मागणी आहे. आम्ही आमचे सर्व हक्क घेऊन ओबीसीवर अन्याय होत आहे. यानंतर अध्यक्षीय भाषणात पांडुरंग कुंभार यांनी केंद्र सरकारने न्या. जी. रोहणी आयोगाची त्वरीत अंमलबजावणी करावी ही आमची प्रमुख मागणी आहे. जातनिहाय जनगणना झाली पाहिजे. राजकीय आरक्षण दिले पाहिजे. त्यासाठी ओबीसी आयोगाची स्थापना करुन न्यायालयात इंपेरिकल डाटा सादर करावा व ओबीसी राजकीय आरक्षण मिळवावे अशी मागणी केली.

याप्रसंगी संतोष हंबीरे, रवी कोरे आळणीकर, लक्ष्मण माने, डी. एन. कोळी, कल्याण कुंभार आदींची भाषणे झाली. तेली समाजाचे कळंब शहराध्यक्ष अशोक चिंचकर, शहाजी माने, अंकुश गायकवाड, बालाजी पवार, शुभम कदम, रवीराज खंडेराव, हरीदास जाधव, बाळासाहेब कुंभार, नाना पवार, गोकुळ बरकसे, दत्ता शेवडे, बापु सुरवसे, अरुण जाधवर, बाळू पौळ, महेश इटकर, बाबा कुंभार, रमेश कुंभार, अरुण मुंडे, सचिन गायकवाड, बबन हौसलमल, मस्के नाना, मुन्ना मंडाळे, गोकुळ मंडाळे, आदिंची उपस्थिती होती. यांच्यासह सर्व जातीचे जिल्हाध्यक्ष पदाधिकारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

थेंब कितीही छोटा असला तरी त्याच्यात अथांग सागरात तरंग निर्माण करण्याची धमक असते.

कु. रुचिता साळवी हिला बेस्ट रिसर्च ॲवॉर्ड

- शरद वाडेकर



मुंबई : कु. रुचिता शशिकांत साळवी हिला इंडियन जीओटेक्नीकल कॉन्फरन्समध्ये IGS व Springer चे Best Research Paper Award मिळाले.

आय.आय.टी. मुंबईतून Geotechnical Engineering मध्ये पीएचडी (Ph.D.) करीत असलेल्या कु. रुचिता शशिकांत साळवी हिने इंडियन जिओटेक्नीकल सोसायटी (IGS) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NIT) तिरुचिराप्पल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित केलेल्या ऑनलाईन कान्फरन्समध्ये Slope stability & landslides या सध्याच्या दरडी कोसळणे आणि भूस्खलनाच्या अनेक घटनांच्या पार्श्वभूमीवर अतिशय महत्वपूर्ण अशा थीमवर Experimental investigation of pullout resistance of grouted soil nails या विषयावर संशोधनपर लेख (Research paper) सादर केला होता. त्याला IGS & Springer Best Paper Award घोषित झाले आहे. कु. रुचिता हिचे या दैदिप्यमान यशाबद्दल हार्दिक अभिनंदन आणि पुढील उज्वल वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

कु. रुचिता ही मुळची रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा, संगमेश्वरचे असलेले मुंबईस्थित बांधकाम सल्लागार इंजिनीअर शशिकांत साळवी आणि सौ. सायली या दांपत्याची कन्या होय. तिने कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, पुणे येथून M.Tech (Geotechnical Engineering) केले आहे. तत्पूर्वी MGM College of Engineering & Technology मधुन B.E. (Civil) केले आहे. इंजिनीअरींग कॉलेजला असताना सलग तीन वर्षे टॉपर राहिल्याबद्दल तिला सर रतन टाटा स्कॉलरशीप फॉर ॲकॅडमिक एक्सलन्स मिळाली आहे आणि विशेष म्हणजे आपल्याला मिळालेल्या स्कॉलरशिपच्या रक्कमेतून तिने काही हुशार पण गरीब मुलांना आर्थिक मदत केली आहे.

यापूर्वी दिल्ली येथे एप्रिल २०१८ मध्ये झालेल्या ' International Symposium on Transportation Geotechnics मध्ये तिने सादर केलेल्या Use of ground penetrating radar as an effective tool in assessing pavements या विषयावरील संशोधनपर लेखाबद्दल तिचा Young Geotechnical Engineer Award ने सन्मान करण्यात आला आहे. तिचा हा लेख Bridge & Structural Engineers या दर्जेदार नियतकालीकाच्या जून २०१८ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. एम.टेक. साठी तिने Soft soil improvement using band drains around Mumbai coast या परिसरातील ज्वलंत समस्येवर आधारीत प्रकल्पाचा विषय निवडून त्यावर सादरीकरण केले होते.

अत्युच्च शैक्षणिक कारकिर्द करतानाच नृत्य, गायन, हस्तकला हे छंद/व्यासंग तिने जोपासले आहेत. अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय, वाशी, नवी मुंबई येथून कथ्थक नृत्यातील पदवी प्राप्त करण्यासाठी तिची साधना चालू आहे. Times NIE ची निबंधलेखन, वक्तृत्व, चित्रकला मधील पारितोषिके तिने पटकावली आहेत. असे अष्टपैलू चमकदार व्यक्तीमत्त्व असलेल्या रुचिताचा आम्हाला अभिमान वाटतो. रुचिताला भावी यशस्वी वाटचालीसाठी अनेकोत्तम शुभेच्छा!

जिद्द शिक्षणाची : सलाम 'वीरेश कुंभार' यांना



अक्कलकोट : अक्कलकोट शहरातील कुंभार गल्लीत रहाणारा विरेश कुंभार हा सध्या बी.टेक.च्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. उच्च शिक्षण घेत असतानाही जराही न लाजता कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्या-साठी व स्वत:च्या शिक्षणासाठी प्रत्येक सणासुदीस लागणारे साहित्य विक्री करण्यासाठी दोन-तीन दिवस बाजारात बसून तो मडकी विक्री करत असतो. अनावश्यक गोष्टी करुन कुटुंबाला आर्थिक अडचणीत टाकण्यापेक्षा आई-वडिलांना मदत करुन आपले घर पुढे नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरेश कुंभार याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कुंभार काम करणारे विरेशचे वडील भीमाशंकर कुंभार हे कुशल कारागीर आहेत. ते मातीच्या सर्व वस्तू स्वत: बनवितात. सर्व कुंभार कामे विरेशने वडिलांकडून शिकून घेतली आहे. वडिलांनी तयार केलेल्या वस्तूंना विरेश स्वत: आकर्षक रंगसंगती वापरुन रंग देतो. कुंभार कला असलेल्या ज्या-ज्या वस्तू प्रत्येक सणाला लागतात, त्याप्रमाणे अगोदर तयार करुन ठेवल्या जातात. सणाच्या काळात विरेश आई जयश्री यांना सोबत घेत बाजारात दोन वेगवेगळी दुकान थाटतो. या काळात आपले उच्च शिक्षण विसरुन न लाजता कुटुंबाची प्रगती व आपले शिक्षण पूर्ण व्हावे, यासाठी संघर्ष करतो. विरेश प्रत्येक सणावेळी तीन-चार दिवस बाजारात बसून वस्तूंची विक्री करतो.

विरेश हा घटस्थापनावेळी मातीची मडकी विकतो तसेच दसऱ्याच्या वेळी लागणाऱ्या देवीच्या मूर्ती तयार करणे किंवा जुन्या मूर्तींना रंगरंगोटी करणे, कारहूण्णवी व बैलपोळ्यास मातीच्या आकर्षक लहानमोठ्या बैलजोड्या विकणे, दिवाळीसाठी किल्ले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती तसेच मावळे बनविणे, मकरसंक्रांत वेळी सुगडी विक्री करणे, वेळअमावस्येस छोटे आंबील गाडगे बनविणे, गणेशमूर्ती तयार करुन विकणे आदी वस्तू विरेश स्वत: बनवितो आणि नंतर त्याची बाजारात विक्री करतो. यातूनच विरेशचे शिक्षण आणि कुटुंबाचा चरितार्थ चालतो.

***

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा मुजरा
''मच्छिंद्र रघुनाथ कुंभार यांना मिळाला मानाचा ग्लोबल टीचर अवार्ड - २०२०''



आदर्श हायस्कूल भामटे ता. करवीर जि. कोल्हापूर या विद्यालयातील सहाय्यक शिक्षक मच्छिंद्र रघुनाथ कुंभार यांना नुकताच मानाचा ११० देशांचा सहभाग असलेला ग्लोबल टीचर पुरस्कार २०२० ने सन्मानित करण्यात आले.

कुंभार हे गणित विषयाचे अध्यापक आहेत. त्यांनी गणित विषयांमध्ये तयार केलेली १०५ ॲप्स, अनेक व्हिडिओ ई- कन्टेन्ट, गणित विषयासाठी बनविलेल्या ५०० हून अधिक कृतीपत्रिका, वर्गामध्ये राबविलेले विविध नवोपक्रम त्याचबरोबर भूमितीसारखा काठिण्य पातळीचा विषय सुलभ व्हावा यासाठी त्यांनी राबवलेल्या कृतीतून शिक्षण या नवोपक्रमांची दखल विद्या प्राधिकरण पुणे (SCERT) यांनी घेतली आहे. त्याचबरोबर नवोप्रकाविषयीचे त्यांचे पाच लेख आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये झळकले आहेत. इयत्ता नववी व दहावीच्या गणित विषयासाठी इंटरॅक्टिव्ह ॲनिमेटेड फ्लिपबुक ही संकल्पना राबवून एका क्यूआर कोड मध्ये संपूर्ण पाठ्यपुस्तक तयार करुन शिक्षकांचे अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन त्यांनी सुलभ केले.

***

नोकरी सांभाळत 'सीए'ची खुर्ची
अरुणा शिरसे यांचा प्रेरक प्रवास : एकत्र कुटुंबाची मिळाली साथ

पुणे : घर आणि नोकरी सांभाळणे ही गृहिणींसाठी तारेवरची कसरत. कार्यालयातील कामाचा वाढता व्याप, स्वयंपाकापासून कुटुंबातील सदस्यांच्या विविध जबाबदाऱ्या आणि आई म्हणून मुलांसाठी उपलब्ध राहणे, असे बहुआयामी कार्य गृहिणी करत असते. कुटुंबाने साथ दिली आणि दुर्दम्य इच्छाशक्ती बाळगली, तर हीच गृहिणी मोठ्या यशाची शिखरे सहज पादाक्रांत करते. पिंपळे निलख येथील अरुणा क्रिष्णाकांत कुंभार-शिरसे या एकत्र कुटुंबाच्या पाठिंब्याने सनदी लेखापालची (सीए) परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत.



ध्येयावर लक्ष केंद्रित केले आणि कुटुंबाची साथ मिळाल्यास यश निश्चित मिळते. एकत्र कुटुंब अशा वेळी महत्त्वपूर्ण ठरते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे जबाबदारीही वाढली आहे. एक उत्तम सीए म्हणून नेहमी अद्ययावत माहिती ठेवणे आणि प्रत्येक क्षणाला सिद्ध करण्याचे मोठे आव्हान आहे. **- अरुणा कुंभार-शिरसे**

खासगी कंपनीमध्ये २०१६ पासून अरुणा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. पदव्युत्तर शिक्षण घेत असल्यापासून त्यांची सीए बनण्याची इच्छा होती. लग्नानंतर पती अविनाश यांसह सासू-सासरे, दिर-जाऊ सर्वांनी परीक्षेसाठी अभ्यासाचा आग्रह धरला. अरुणा यांनी सहा वेळा या परीक्षेसाठी प्रयत्न केले होते. त्या म्हणतात, ''सकाळी नऊ ते रात्री सात वाजेपर्यंत मी नोकरी करत होते. नोकरी सोडून अभ्यास करण्याचा आग्रहही घरचे लोक करत होते. मूल लहान असून, त्यांच्याही शाळेचे बघणे, डबा करुन देणे, अभ्यास घेणे याची जबाबदारीही होती. त्यामुळे अभ्यासाला पुरेसा वेळ मिळत नव्हता'' लॉकडाऊनमध्ये अभ्यासासाठी तुलनेने बरा वेळ मिळाल्याचे अरुणा सांगतात. कुटुंबीयांनीही मदत केली. जाऊबाईंनी घरातील अतिरिक्त जबाबदारी घेतली.

***

जळगांवची प्रज्ञा बोरसे शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात आठवी... सर्वत्र अभिनंदन!!!

पाचोरा : सौ. वैशाली व संजय रामदास (प्रजापत) बोरसे रा. पाचोरा, जिल्हा जळगाव यांची सुकन्या व प्राध्यापक वसंतराव दौलतराव ठाकरे रा. कासारे, ता. साक्री यांची नात कुमारी प्रज्ञा संजय प्रजापत हिचा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवीमध्ये राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रजासत्ताकदिनी जळगाव येथे पालकमंत्री आमदार गुलाबराव पाटील, जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जळगाव जिल्ह्याचे पोलिस महासंचालक डॉ. प्रवीण मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यशाबद्दल तिचे अभिनंदन होत आहे. कुंभश्री परिवारातर्फे कु. प्रज्ञा बोरसेचे मन:पुर्वक अभिनंदन!!!



शिल्पकलेत सीमाने उमटविला अनोखा ठसा

– रमेश वत्रे, केडगाव

प्रख्यात शिल्पकार बी.आर. ऊर्फ अप्पासाहेब खेडकर यांचा शिल्पकलेचा वारसा त्यांची कन्या सीमा विजय खेडकर-शिर्के या पुढे चालवत आहेत. अप्पासाहेब गेल्यानंतर त्यांनी आतापर्यंत २० अर्ध पुतळे तर पाच पूर्णाकृती पुतळे बनवले आहेत. यात शिवाजी महाराज यांच्या दोन अश्वारूढ पुतळ्यांचा समावेश आहे. शिल्पकलेच्या आव्हानात्मक क्षेत्रात काम करत असलेल्या सीमा यांच्या अनोखा प्रवास...



पुणे : मुरगुड नगरपालिकेसाठी बनविलेल्या शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासह सीमा खेडकर-शिर्के.

दौंडच्या सून असलेल्या सीमा यांनी पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयातून जीडी आर्टचे शिक्षण घेतले. वडिलां-बरोबर काम शिकत असताना २०१५ मध्ये पहिलाच शिवाजी महाराज यांचा पुतळा बनवला.

आंध्र प्रदेशात चित्तूर येथे तो पुतळा विराजमान आहे. ऑगस्ट २०१६ मध्ये खेडकर यांचे निधन झाले. त्यानंतर एकच महिन्यात त्यांना संत बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे काम मिळाले. साडे नऊ फूट उंचीचा तो पुतळा गुलबर्गा (कर्नाटक) येथे स्थित आहे. पुतळा बनविण्याची खेडकर यांची जी पद्धत होती तीच पद्धत सीमा अवलंबन आहेत. वडील बी.आर. खेडकर त्यांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या नावाला साजेसे काम सीमा यांना करून दाखवायचे आहे.

आव्हान स्वीकारण्याची तयारी : वडील असताना ते चेहऱ्याचे काम करायचे आणि सीमा खालील भागाचे काम करत. सीमा यांच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. मनासारखे काम झाले नाही तर सीमा ते काम पुन्हा पुन्हा करतात. कितीही मोठे काम आले तरी त्याचे आव्हान स्वीकारण्याची सीमा यांची तयारी आहे.

मुलींसाठी मोफत कार्यशाळा : खेडकर यांनी शिल्पकलेचे कोणतेही शिक्षण घेतलेले नव्हते. त्यांनी साकारलेल्या ४५० पुतळ्यांपैकी ३५ पूर्णाकृती पुतळे शिवाजी महाराजांचे आहेत. शिवाजी महाराज आणि अप्पासाहेब खेडकर हे समीकरणच झाले होते. हा वारसा सीमा पुढे नेटाने नेत आहेत. आता नुकताच मुरगुड नगरपालिकेसाठी (कोल्हापूर) शिवाजी महाराज यांचा साडेबारा फूट उंचीचा अश्वारूढ पुतळा त्यांनी बनविला आहे. या पुतळ्याचे अनावरण मार्चमध्ये अपेक्षित आहे. हा पुतळा बनवायला सात महिने लागले असून ब्राँझच्या या पुतळ्याचे वजन सुमारे दोन टन आहे. शिल्पकार सुप्रिया शिंदे यांचा अपवाद वगळला तर बहुधा या क्षेत्रात महिला नाहीच्या बरोबर आहेत. मुलींनी या क्षेत्रात करिअर करावे म्हणून सीमा मोफत कार्यशाळा घेतात. सीमा यांनी आतापर्यंत शिवाजीमहाराज, सरदार उधमसिंह, संत बसवेश्वर महाराज, साहेबराव सातकर आदींचे पुतळे बनवले आहेत.

***

आर्किटेक्ट कु. मृदुला मंगळकर नॉर्वेला रवाना





पुणे : नॉर्वे येथील Norwegion University of Science & Technology (NTNU) या युनिर्व्हसिटीतील एक महिन्याच्या कार्यशाळेकरीता कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे (सीओईपी) तर्फे मृदुलाची निवड होऊन ती २६.२.२२ रोजी नॉर्वेला रवाना झाली.

सदर कार्यशाळेत Urban informalities and smart design for uncatered making smart cities through design innovation या विषयायवर संशोधनात्मक देवाण-घेवाण NTNU Norway and COEP यांच्या मध्ये होणार आहे. सीओईपीतर्फे प्रतिनिधी म्हणून कु. मृदुला मंगळकर व पीएचडीचे मार्गदर्शक डॉ. प्रताप रावल आहेत. कु. मृदुला अविनाश मंगळकर ही सीओईपी मध्ये Investing influence of urban density on livability in urben areas या विषयावर पीएचडी करीत आहे. कु. मृदुला हिने या आधी तिने महर्षी कर्वे (BNCA) या संस्थेतून फर्स्ट क्लास मध्ये आर्किटेक्ट (B.Arch) चे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर तिने (Master in planning) सीओईपीमधून विशेष श्रेणी मध्ये पुर्ण केले. मृदुला तृतीय वर्ष आर्किटेक्टला असल्यापासून इंटीरीअर डिझाइनची कामेपण करते. तिने अनेक कामे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत.

मृदुला ही पुणे येथील उद्योजक अविनाश ओंकारराव मंगळकर यांची कन्या असून नगर येथील उद्योजक ॲड. अभय कृष्णराव राजे यांची भाची आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. ओंकारराव मंगळकर व निवृत्त एक्झीक्युटीव व इंजि. कै. कृष्णराव राजे यांची नात आहे.

***

आर्यन घोडनदीकर याची नेमबाजीमध्ये राष्ट्रीय स्तरावर निवड



पिंपरी : आर्यन दिगंबर घोडनदीकर आकुर्डी येथील ॲचिव्हर रायफल ॲन्ड पिस्तुल शुटींग क्लबच्या पिस्तुल नेमबाजी या प्रकारात शिक्षण घेत आहे. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र रायफल असो. अंतर्गत २४ वी कॅप्टन एस. जे. एझेकिल मेमोरिअल महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिप २०२१ राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये उद्योजक दिलीपराव घोडनदीकर यांचा नातु आर्यन दिगंबर घोडनदीकर याने अतुलनीय कामगिरी केली. त्यामुळे राष्ट्रीय पिस्तुल नेमबाजी स्पर्धेकरिता त्याची निवड झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे आर्यन व आई सौ. अर्चना, वडील उद्योजक दिगंबर घोडनदीकर यांचा महापौर सौ. माई ढोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महापालिकेतील अनेक नेते उपस्थित होते. समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे आर्यन याचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

***

प्रबोधनाचे व्रत पाटसकरांनी आयुष्यभर जपले : सोनवणे

बंडगार्डन : सामाजिक बांधिलकी आणि समतेचा पुरस्कार करणारे शाहीर अशी बाळ पाटसकरांची ओळख आहे, असे मत दलित स्वयंसेवक संघाचे माजी संघप्रमुख व अण्णाभाऊ साठे स्मारक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष दादासाहेब सोनवणे यांनी व्यक्त केले.

शाहीर पाटसकरांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय 'शाहीर बाळ पाटसकर स्मृती गौरव पुरस्कार' वितरण प्रसंगी ते बोलत होते. अण्णाभाऊ साठे कला व सांस्कृतिक प्रबोधिनी व शाहीर बाळ पाटसकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शाहिरांचे शिष्य पुणे मनपाचे सेवानिवृत्त सेवक शाहीर सदाशिव भिसे, शाहीर प्रा. बाबासाहेब जाधव व हार्मोनियम वादक, नाट्य–सिने कलाकार सुजित रणदिवे यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार सोनवणे व मुकुंद पाटसकर यांच्या हस्ते देण्यात आला.

ते म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर ही त्यांची स्फूर्तीस्थाने होती. त्यांच्या विचारांची छाप त्यांच्यावर होती. शाहीरांचा सहवास व त्यांच्यासोबत केलेल्या कार्यक्रमांच्या आठवणी व अनुभव सुजित रणदिवे यांनी कथन केले. कार्यक्रमाची सुरुवात शंकर कसबे, विठ्ठल कर्वे यांच्या सनई वादनाने झाली.



शाहीर पाटसकरांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्यस्तरीय 'शाहीर बाळ पाटसकर स्मृती गौरव पुरस्कार' प्रदान करताना मान्यवर.

आयोजक चंद्रकांत कुंभार यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले तर निलेश क्षीरसागर यांनी आभार मानले. या प्रसंगी अलका कुंभार, मुकुंद पाटसकर, मंगल पाटसकर, भरत कुंभार, वंदना हरिभाऊ पाटसकर, साहेबराव खंडाळे, राजेंद्र आण्णा शेंडगे, शशिकांत बिबवे, विनोद शिंदे, नरहरी जाधव, शाहीर अरुण जाधव, कृष्णा जगताप, संजय केंदळे, भाऊसाहेब शितोळे, विठ्ठलराव आवटे, हरिश्चंद्र जगताप, सरोजिनी काटे, सुशील बोबडे आदी उपस्थित होते.

निशांत रसाळ यांना डॉक्टरेट



संगमनेर : घुलेवाडी येथील रहिवासी निशांत किसन रसाळ यांना पी.एच.डी. पदवीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सन्मानित करण्यात आले. निशांत रसाळे हे २००८ सालापासून पुणे येथील औषध निर्मित कंपनीमध्ये ज्येष्ठ संशोधक या पदावरती कार्यरत आहे. नोकरीतील अनुभव, जिद्द व कुटुंबाची साथ या जोरावरती त्यांनी यशस्वीरित्या डॉक्टरेट ही पदवी संपादन केली. त्यांनी या विषयावर यशस्वीरित्या प्रबंध सादर केला. त्यांना हा प्रबंध सादर करण्यासाठी मार्गदर्शक डॉ. संगीता जगताप, प्रोफेसर बी.जी. कॉलेज, सांगवी, पुणे यांचे मार्गदर्शन लाभले. आई सौ. शशिकला व वडील किसन रसाळ यांनी मोलमजुरी करत असुन सुद्धा मुलांच्य उच्च शिक्षणाचे ध्येय समोर ठेवून सर्वोतपरी प्रयत्न करीत राहिले. परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे मुलाला वैद्यकीय शिक्षणाला तो पाठवू शकले नाही. पुढे निशांत यांनी नोकरीमध्ये स्थिरावल्यावर आई–वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास घेतला. पी.एच.डी. पदवी मध्ये निशांत यांनी कर्करोगावरील नवीन औषध निर्मितीसाठी संशोधन करुन चार जागतिक शोध निबंध सादर केले.

बी.जी. कॉलेज, सांगवीचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजितदादा पवार यांनी त्यांच्या या यशाबद्दल विशेष अभिनंदन केले. कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.

***

डॉ. देवव्रत भोगावकर यांची निवड



मुंबई : डॉ. देवव्रत प्रमोद भोगावकर यांची सायन, मुंबई येथील लोकमान्य टिळक म्युनिसीपल मेडीकल कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक (जनरल सर्जरी) पदावर निवड झाली. मुंबई महानगर पालिकेच्या सायन, मुंबई येथील 'लोकमान्य टिळक म्युनिसीपल जनलर हॉस्पिटल आणि मेडीकल कॉलेज' मध्ये 'जनरल सर्जरी' विभागात 'सहाय्यक प्राध्यापक' पदावर डॉ. देवव्रत प्रमोद भोगावकर हे दि. २० एप्रिल २०२१ रोजी रुजू झाले आहेत. डॉ. देवव्रत हे M.S. (General Surgery) असून यापुर्वी सर्जरीतील विशेष प्राविण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र आरोग्य विभाग विद्यापिठाची लेपरोस्कोपी आणि एन्डोस्कोपीमधील फेलोशीप सायन हॉस्पिटल, मुंबई येथे पूर्ण केली आहे. डॉ. देवव्रत हे बदलापूर, मुंबई येथे जनरल सर्जन म्हणून प्रॅक्टीस करतात. सायन हॉस्पिटलमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून नेमणुकीमुळे त्यांच्या गुणवत्तेचा गौरव झाला आहे. त्याबद्दल त्यांचे समस्त कुंभार समाज व कुंभश्री मासिक मित्र परिवार यांचे तर्फे मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन!

सुरेशराव कोते यांची मुलगी आणि सुहास हिवरकर यांची सुन सौ. भक्ती यांना पीएच.डी. पदवी



प्रा. सौ. भक्ती सचिन हिवरकर यांना पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट प्रदान केली. कोते परिवाराची कन्या सौ. सरला व सुरेश मारुती कोते यांची मुलगी प्रोफेसर सौ. भक्ती सचिन हिवरकर यांना सावित्रीबाई फुले, पुणे युनिव्हर्सिटी (पुणे विद्यापीठ) मार्फत डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना ह्यूमन रिसोर्स ह्या विषयावरील संशोधनासाठी विद्या वाचस्पती (डॉक्टरेट) प्रदान केली गेली आहे.

सौ. भक्ती यांनी प्रथम आय.टी. इंजिनिअरींग पदवी प्राप्त केली. तद्नंतर त्यांनी आय.टी. मध्येच एम.बी.ए. पदवी प्राप्त केली. एवढ्यावरच न थांबता एच.आर. या विषयात पुन्हा एम.बी.ए. पदवी मिळवली. आता तर त्यांनी डॉक्टरेट मिळवली असून त्यांचा संशोधनाचा विषय 'पुण्यातील निवडक उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये मनुष्यबळांच्या कामगिरीवरील प्रशिक्षणावरील परिणामांचा अभ्यास.' (Topic - 'A study on impact of training on peformance of human resource in selected manufacturing companies in Pune') हा आहे. डॉ. भक्ती या अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या एमबीए कॉलेज, अकोले येथे कार्यरत आहेत.

डॉ. भक्ती यांचे समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा!

***

पीओपी मूर्तिकारांचे शास्त्रज्ञांना निवेदन



पुणे : दिनांक १६/७/२१ रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी गठीत केलेल्या शास्त्रज्ञांच्या समितीतील पुणे एनसीएल येथील शास्त्रज्ञ डॉक्टर शुभांगी उंबरकर, डॉक्टर मोहन डोंगरे सर या दोन्ही शास्त्रज्ञांची संघटनेच्या विनंतीवरुन भेट झाली. दोन्ही शास्त्रज्ञांनी शासनाकडे दिलेला रिपोर्ट अतिशय पॉझिटिव आहे तसेच संघटनेसाठी जिथे आवश्यकता वाटेल तिथे सहकार्य देखील करायची तयारी दर्शविली. चढता चर्चा अगदी दीड ते दोन तास चालली व सदर चर्चा पुणे एनसीएल येथे त्यांच्या ऑफिसमध्ये झाली. संघटनेच्यावतीने त्यांना निवेदन देखील दिले व त्यांची पोच देखील घेतली. सदर बैठकीसाठी मिलिंद चांदेकर, अभिजीत कुंभार, प्रवीण बावधनकर व लाला साहेब देशमुख उपस्थित होते. ही बैठक घडवून आणण्यासाठी पुणे विद्यापीठातील शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत गाडगीळ सर यांनी मोलाचे सहकार्य केले व बैठकीस पूर्णवेळ उपस्थित होते.

***

शककर्ता राजा शालिवाहन यांच्या विजयाचे प्रतिक 'तिर्थस्तंभ'



राजवाड्याच्या समोरच पालथ्या नगरीच्या परिसरात हा तिर्थस्तंभ पर्यटकांचं विशेष आकर्षण आहे. अशा प्रकारचा तिर्थस्तंभ सांची वगळता इतरत्र कोठेही आढळत नाही. इतिहास संशोधक बाळासाहेब पाटील यांच्या मते सात–वाहनांनी अश्वमेध यज्ञानंतर जो विजयोत्सव साजरा केला त्यावेळी हा किर्तीस्तंभ निर्माण करण्यात आला.

त्याची एकूण चार भागात जडण घडण असून त्यावरील असलेल्या शिल्पाच्या आधारे स्वर्ग, पाताळ, मृत्यु लोकांची कल्पना केल्याचे जाणवते. तिर्थस्तंभाच्या मधल्या भागात 'मैथुन शिल्पे' आहेत. अशा प्रकारचे शिल्प हे वेरुळ येथील लेण्यात आढळते. वेरुळच्या लेण्याच्या खोदकामासाठी (शिल्पकामासाठी) पैठण येथून आठशे कारागीरांचे पथक काकोस नावाच्या मुख्य कारागिराच्या नेतृत्वाखाली गेले होते. असा दाखला इतिहासात मिळतो. या तिर्थस्तंभाजवळ एका मंदिरात चक्रधर स्वामींना अवयव छेदाची शिक्षा यादवांचा प्रधान हेमाद्री यांने दिली होती.



ॲड. बी. के. राजे

हायकोर्ट मुंबई मो. ९८१९२८०७९१
कायदेविषयक सल्लागार कुंभार्थी मार्मिक पुणे

कार्यालय

385, जगन्नाथ शंकरशेठ रोड, चीराबाजार,
मुंबई 400 002. फोन : (022) 22012751



प्रोप्रा. अशोक मुरलीधर कुंभार.मो. 9822640375.
(अध्यक्ष. अ. महा. कुंभार समाज विकास संस्था पुरंदर तालुका)

श्रीनाथ विट सप्लायर्स

बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
मु. पो. काळेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे.

राधिका फ्रुट अॅन्ड फ्रोझन सप्लायर्स



फ्रुट : विकू पल्प, मँगो पल्प, सिताफळ पल्प, ग्रिनपिस, स्विटकॉन, पनिर.

श्री. हरीष कुंभार मो. 9922349291

मु. पो. काळेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे.

विशाल आर्ट



आमच्याकडे सर्व प्रकारच्या गणेशमुर्ती व गौरीच्या मुर्ती, दिवाळी चित्रे, लक्ष्मी इ. वस्तु तयार व रंगवून मिळतील.

गोपी ब. कुंभार (मोगरवाडीकर)
मो. 9423237357, 9922336065

सर्व प्रकारच्या कच्च्या मुर्ती, रंग, रबर व गणपतीची मॉडेल्स मिळतील.

कुंभारवाडा, स. नं. ६, केशवनगर, मुंढवा, पुणे ३६.

गुरुकृपा विट कारखाना



उत्तम प्रतीची वीट होलसेल भावात मिळेल.
ढोर आळी, शिरुर (घोडनदी), ता. शिरुर, जि. पुणे.

श्री. महेंद्र अण्णा काळे
Mo. : 9881274288

श्री. विठ्ठल अण्णा काळे
Mo. : 9011378566

श्री. दत्तात्रय अण्णा काळे
उपाध्यक्ष : अहमदनगर जिल्हा कुंभार समाज संघटना
माजी सदस्य : ग्रामपंचायत येळपणे ता. श्रीगोंदा.
Mo. 9767753743.



गणराज हार्डवेअर

डिलर
उदय एच.डी.पी.ई.पाईप



श्री. हेमराज बोराराम प्रजापति
श्री. गोपाल हेमराज प्रजापति

फिनोलेक्स पाईप, पी. व्ही. सी. पाईप फिटींग, जी. आय. पाईप फिटींग, रस्सी, ताडपत्रीचे व सर्व प्रकारचे मोटर होलसेल आणि रिटेल विक्रेते.

उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट, गाळा नं. ४३, सासवड, पुणे. मो. ९०११४९२९४३.

सुनिल संजय कुंभार
9730318053



सौ. हर्षदा सुनिल कुंभार

त्रिमुर्ती

वीट कारखाना व
वीट सप्लायर्स

सतिश दिलीप कुंभार
8600224085



सौ. पायल सतिश कुंभार

आमच्याकडे सर्व साईजच्या भाजीव उत्तम प्रतीच्या विटा मिळतील

आंधळी फाटा, जुना सातारा रोड, मु.पो. पलूस, जि. सांगली.



बालाजी ब्रिक्स

आमच्याकडे उत्तम प्रतिच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु. पो. शिरोली, खरपुडी रोड,
ता. खेड, जि. पुणे.

निवास : कुंभारवाडा, राजगुरूनगर,
ता. खेड, जि. पुणे.
मो. : ९८२२३४९०८४

संजय नारायण कुंभार
(मा. उपसरपंच, राजगुरुनगर, खेड)

प्रेरणास्थान



जानराव रामचंद्र धामणकर

मे. शेतकी बीज भंडार

संजय जानराव धामणकर
मो. ९७६३९६९७०८

:: अधिकृत विक्रेता ::

अंकुर सिडस्, महीको, संगो, सिडको, अवतार सीडस्, विभा, महाबीज, सरदार, नार्दन मिनरल्स, धानुका पेस्टीसाईडस

एल. जी. २०, रचनाश्री कमर्शियल कॉम्प्लेक्स, तहसिल कार्यालयासमोर, प्रभात टॉकिजच्या बाजुला, अमरावती.

श्रीवंदन हॉस्पिटलच्या सुविधांचा लाभ घ्या



कराड : सोनोग्राफी मशिनच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. संजय पाटील, डॉ. राजे.

कराड : श्रीवंदन हॉस्पिटलमुळे सर्व सामान्य रुग्णांना लेप्रोस्कोपी ऑपरेशन, वंध्यत्व चिकित्सा, प्रसूती विभाग व सोनोग्राफी एकाच छताखाली उपलब्ध झाल्या आहेत. याचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृष्णा हॉस्पिटलचे ज्येष्ठ स्त्री रोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. संजय पाटील यांनी केले. येथील डॉ. राहुल राजे व सौ. उज्ज्वला राजे यांच्या श्रीवंदन हॉस्पिटलच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित गरोदर माता व प्रसूतीपश्चात व्यायाम मेळावा व सोनोग्राफी मशिन उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. राहुल राजे म्हणाले, एक वर्षांपूर्वीपासून श्रीवंदन हॉस्पिटल कराड येथे सुरु केले. स्त्रियांचे दुर्बिणीतून ऑपरेशन व चिकित्सा, आय यु आय टेस्ट, टेस्ट ट्यूब बेबी, नॉर्मल डिलिव्हरी, सिझर, गर्भाशयाचे आजार व निवारण, कुटुंबनियोजन ऑपरेशन, सोनोग्राफी इत्यादी सुविधा या हॉस्पिटलमध्ये आहेत. सर्वच सुविधा उपलब्ध असल्याने रुग्णांना बाहेर तपासणी करण्याची गरज पडत नाही.

वर्धापनदिनानिमित्त आयोजित गरोदर माता व प्रसूतीपश्चात या मेळाव्यास डॉ. सूरज कणसे, डॉ. भूमी होरा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास चंद्रकांत कुंभार, सौ. वंदना कुंभार, सौ. उज्वला राजे, धन्वंतरी पतसंस्थेचे संस्थापक एस.एल. कुंभार, शिवनंदन पवार उपस्थित होते. डॉ. राजे यांना सहकार व पणन मंत्री ना. बाळासाहेब पाटील, कृष्णा सहकारी कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गिरीगोसावी यांनी शुभेच्छा दिल्या.

***

'लिज्जत पापड'चे सुरेश कोते यांचा गौरव
राज्यपालांच्या हस्ते 'कर्तव्यम् प्रेरणा' पुरस्कार प्रदान



मुंबई : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते लिज्जत पापडचे पदाधिकारी सुरेश कोते यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

मुंबई : सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक सुरेश कोते यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'कर्तव्यम् सोशल फाउंडेशन' तर्फे महाराष्ट्र प्रस्तुत 'कर्तव्यम् प्रेरणा' पुरस्कार–२०२२ लिज्जत पापडचे पदाधिकारी सुरेश कोते यांना महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.कोते यांचे शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचे विशेष योगदान आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी ते अनेक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून काम करीत आहेत. 'श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड'च्या माध्यमातून हजारो महिलांना रोजगार देण्यासाठी स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी काम केले आहे. सामाजिक क्षेत्रात निस्वार्थीपणे केलेल्या विशेष कामासाठी त्यांना आजवर अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सदर पुरस्काराचे समारंभपूर्वक वितरण राजभवन, मलबार हिल मुंबई येथे झाले.

***

सावरगाव येथील 'हर्षल शिंदे' याची लेफ्टनंटपदी निवड



जुन्नर : सावरगाव (ता. जुन्नर) येथील हर्षल सुखदेव शिंदे यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंटपदी निवड झाली. तो ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी चेन्नई येथे रविवारी (ता. १२) एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी जाणार आहे. हर्षल याचे प्राथमिक शिक्षण जुन्नर येथील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झाले व माध्यमिक शिक्षण खानापूरमधील शिवनेरी स्कूल खानापूर व वानवडीतील सिटी इंटरनॅशनल स्कूल येथे झाले. उच्च माध्यमिक शिक्षण पुण्यातील नेस वाडिया कॉलेज येथे झाले. त्यानंतर इंजिनिअरिंग मधील बी.टेक. पदवी आळंदीतील एमआयटी कॉलेजमधून घेतली. केंद्रीय लोकसेवा आयोग नवी दिल्ली केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएस्सी) यांच्यामार्फत घेतलेल्या संयुक्त सुरक्षा सेवा परीक्षा (सीडीएस) परीक्षेत हर्षल याचा देशामध्ये ९८ वा क्रमांक आला. एकूण १४१ मुलांची प्रशिक्षणासाठी निवड झाली. हर्षल याचे वडील राज्य सरकारच्या सेवेत वैधमापनशास्त्र अधिकारी होते व आई वाघोली येथील प्राथमिक शाळेत मुख्याध्यापिका आहेत.

सुखदेवराव शिंदे सेवानिवृत्त



सुखदेवराव शिंदे निरीक्षक, वैध मापन शास्त्र या पदावरुन दि. ३०/४/२०२१ रोजी ३० वर्षे शासकीय सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होत आहात. आपण नोव्हेंबर १९९१ ते एप्रिल २०२१ या ३० वर्षांच्या सेवेत जुन्नर, ठाणे, भाईंदर, उल्हासनगर, चेंबूर, सोलापूर, पिंपरी–चिंचवड, पुणे शहर या ठिकाणी ग्राहक प्रदर्शन आयोजित करुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बसस्थानकावरील प्रवासी यांना ग्राहक चळवळ, ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहकांचे हक्क याबाबत व्याख्यानाद्वारे प्रबोधन केले आहे.

आपण निरीक्षक, वैध मापन शास्त्र, भोसरी विभाग येथे सन २०१६ ते २०१९ या कालावधीत कार्यरत असताना सन २०१८–१९ या वर्षात मोशी (भोसरी) या ठिकाणी पुणे विभागातील दुय्यम मानक प्रयोगशाळेचे तसेच निरीक्षक, वैध मापन शास्त्र, पिंपरी–चिंचवड, भोसरी, खेड व वडगांव–मावळ या निरीक्षकीय विभागांच्या तीन मजली इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एक वर्षे इतक्या कमी कालावधीत पूर्ण करुन घेण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

कोविड–१९ च्या मार्च २०२० ते सप्टेंबर २०२० कालावधीत मास्क, सॅनिटायझर, शिधावाटप दुकाने व किराणा दुकाने यांची तपासणी करुन कारवाई केली आहे. आपण या यंत्रणेसाठी पार पाडलेल्या जबाबदाऱ्या व कार्ये निश्चितच उल्लेखनीय आहेत.

आपल्या सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यास आपले स्नेहांकित, कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे शुभेच्छा!

***

निमिष वाडेकर यांच्या इन्स्टाग्रामवरील Hungry Pirate साईटवरील मटण नळीच्या व्हिडीओला लाभले पंधरा दिवसांत दिड कोटीहून अधिक प्रेक्षक

निमिष शरद वाडेकर म्हणजे खवय्येगिरी आणि कलात्मक दृष्टीकोन यांचा सुरेख संगम असलेले व्यक्तीमत्त्व. डिजीटल मार्केटिंगमध्ये डेप्युटी मॅनेजर पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळतानाच आपले छंद ते कटाक्षाने जोपासतात. त्याचाच भाग म्हणून ते खवय्येगिरीचे आपले चांगले अनुभव hungry pirate या इन्स्टाग्राम साईटवरुन शेअर करीत असतात. 'मटण' हा जगभरातल्या खाद्यसंस्कृतीतला मानाचे पान मिळविलेला खाद्यप्रकार. मटणातली नळी हा सर्वसाधारणपणे मटणप्रेमींचा सर्वात आवडता भाग. मटणात नळी मिळाली आणि ती ताटात अवतरली की मटणप्रेमींना अक्षरश: धन्य झाल्यासारखे वाटते. ठक ठक वाजवत नळीतील गर चोखण्यातील अनुभूती काही औरच! मटणाच्या याच नळीवर निमिष वाडेकर यांनी जेमतेम आठ सेकंदाचा व्हिडिओ बनवून hungry pirate या इन्स्टाग्राम साईटवर रविवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ रोजी अपलोड केला. आज रविवार, दि. १४ मार्च २०२१ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत पंधरा दिवसांच्या कालावधीत हा व्हिडीओ दिड कोटींपेक्षा अधिक प्रेक्षकांनी (१६२ लाखहुन अधिक प्ले) पाहिला असून त्याची लोकप्रियता सतत वाढतीच आहे. उत्कृष्ट सादरीकरण आणि मटणाची नळी (की नल्ली?) असा मटणरसिकांच्या आवडीचा जिव्हाळ्याचा विषय अशा सुरेख त्रिवेणी संगमाचे हे फलीत आहे.

व्हिडीओ पाहण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा किंवा hungry pirate या इन्स्टाग्राम साईटला भेट द्या.

https://www.instagram.com/reel/CL07ptaALdw/?igshid=1z1xqqx3y5d0

सुनिलराव आचोळकर एल.एल.बी. उत्तीर्ण



वसई : कुंभार समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते, वसई विरार महानगरपालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष सुनिलराव मोरेश्वर आचोळकर यांनी नुकतीच एल.एल.बी. परिक्षा उत्तीर्ण केली. सामाजिक व राजकीय कार्य करत असताना कायद्याचे ज्ञान अत्यंत गरजेचे आहे हे लक्षात आल्यानंतर त्यांनी एल.एल.बी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतला.

अत्यंत चिकाटीने त्यांनी अभ्यास करुन यश मिळवल्याबद्दल समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे सुनिलराव यांचे मन:पूर्व अभिनंदन व भावी कार्यास हार्दिक शुभेच्छा!

***

८० जी अंतर्गत देणगी मध्ये सूट देणारी कुंभार समाजाची पाहिली संस्था - डॉ. श्रीराम कोल्हे

अमरावती : सर्वांना कळविण्यात आनंद होतो की, विदर्भ कुंभार सुधार समिती व श्री संत गोरोबाकाका समाजोन्नती बहूउद्देशीय समिती अमरावती या दोन्ही संस्थांना आयकर विभागाकडून ८० जी अंतर्गत देणगी दारांना दिलेल्या देणगीला ईन्कम टॅक्स मधून ५०% सुट देण्याची परवानगी मिळाली आहे. अशा प्रकारची सुट प्राप्त झालेली राज्यातील पहिली संस्था होण्याचा मान या संस्थांना मिळाला आहे. सर्व समाजबांधवांना नम्र निवेदन करतो की, या दोन्ही संस्थांना सढळ हाताने देणगी देऊन आयकरात सुट प्राप्त करावी व समाजकार्यात आपले सहकार्य द्यावे. आर्थिक दृष्ट्या संपन्न संस्थांना देणगी देण्याऐवजी समाजाचे संस्थेला प्रथम प्राधान्य द्यावे. आपला डॉ.श्रीराम कोल्हे.

वाचन संस्कृती प्रतिष्ठान, श्रीरामपूरतर्फे राजा शालिवाहन यांना वाचनातून अभिवादन!



शककर्ते राजे शालिवाहन म्हणजे कुंभार समाजाचे प्रेरणास्थान आहे. शालिवाहन सातवाहन राजवंश हा महाराष्ट्र राज्याचा पहिला ज्ञात ऐतिहासिक राजवन्श होय.

या घराण्याने दक्षिण भारतावर इ.स. पहिले शतक ते तिसरे शतक ४६० वर्षे राज्य केले. या राजघराण्यातील कुंभार समाजाचा इतिहास निगडित आहे. अनेक प्रांतातील कुंभार आपला वंशपुरुष शालिवाहन असल्याचे सांगतात. शालिवाहन राजाचा उल्लेख प्रबंधचिंतामणीतील बृहतकल्पसूत्र या ग्रन्थात मिळतो. गो.ना. दातार यांनी 'शालिवाहन शक' कादंबरी लिहिली. शकाच्या उत्पतीची कथा येथे वाचण्यास मिळते. ना.के. बेहरे यांनी शककर्ता शालिवाहन लेखन केले. शालिवाहन राजाची पैठण नगरी असा उल्लेख आढळतो. पराक्रमी विक्रमादित्याचा शालिवाहनने पराभव केला. शालवाहन कुलाची स्मृती व शकांचा पराभव यातून शालिवाहन असे शीर्षक देण्यात आले. यासंदर्भात रामलिंग कुंभार लिखित 'धांडोळा' भारतीय कुंभाराचा पुस्तकात बरीच माहिती मिळेल. माझे 'भारतीय कुंभार समाजातील संत' हे पुस्तक पुणे येथील स्नेहवर्धन प्रकाशन प्रकाशित करीत आहे. अशी माहिती डॉ. बाबुराव उपाध्ये, श्रीरामपूर यांनी दिली. याप्रसंगी गणेशानंद उपाध्ये, नितीन जोर्वेकर, प्रा. विलास तुळे, चेतन तुळे आदी परिवार उपस्थित होते.

***

नगरसेवक राजेंद्र कुंभार यांच्या वाढदिवसानिमित्त कुपवाडमध्ये आरोग्य शिबीर



सांगली : नगरसेवक राजेंद्र कुंभार आणि सीनर्जी मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन लक्ष्मीनगर गणपती मंदिराच्या क्रीडांगणावर करण्यात आले होते. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माधवराव माने यांच्याहस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रक्तदाब, ईसीजी, नेत्र तपासणी यासह आरोग्य विषयक विविध तपासण्या शिबीरामध्ये मोफत स्वरुपात करण्यात आल्या. असंख्य गरजूंची याचा लाभ घेतला. तज्ज्ञांनी आढळणाऱ्या रुग्णांना सल्ला व मार्गदर्शन केले. शिबिरास महापौर दिग्विजय सूर्यवंशी, काँग्रेस शहर जिल्हा अध्यक्ष संजयजी बजाज, माजी आमदार प्रकाश शेंडगे, नगरसेवक विष्णू माने, प्रकाश ढंग, विनायक सिहासने, गणेश माळी, प्रदीप वाले, नगरसेविका कल्पना कोळेकर, सोनाली सागरे, अनिल माने, महेश माने, कृष्णा राठोड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी दिल्या.

***

नॉन क्रिमिलेअरसाठी शेती, नोकरीच्या उत्पन्नातून सूट

नागपूर : नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रासाठी शेतीसोबत आई-वडिलांच्या नोकरीचे उत्पन्नसुद्धा गृहीत धरण्यात येत होते. यामुळे अनेक विद्यार्थी प्रमाणपत्राकरता अपात्र ठरत असून, त्यांचे नुकसान होत होते. ही बाब लक्षात आल्याने नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रासाठी लावण्यात आलेली शेती व आई-वडिलांच्या नोकरीच्या उत्पन्नाची अट शासनाने रद्द केली. यामुळे इतर मागास वर्गासह भटके विमुक्त जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. शिक्षणात आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी विविध प्रमाणपत्रासह नॉन क्रिमिलेअरच प्रमाणपत्रसुद्धा जोडावे लागते. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हे प्रमाणपत्र देण्यात येते. पूर्वी यासाठी ६ लाखांच्या उत्पन्नाची मर्यादा होती ती वाढवून ८ लाख करण्यात आली परंतु या करता शेती तसेच आई-वडिलांच्या नोकरीचे उत्पन्न गृहीत धरल्या जात असे. ज्या विद्यार्थ्यांचे आई, वडील नोकरीवर आहेत, अशांची मोठी अडचण झाली. तसेच मेहनत करुन शेतीतून जास्त उत्पन्न घेणाऱ्यांचीही अडचण झाली. शासनाच्या या अटीमुळे अनेक विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले. त्यामुळे ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत होते.



डॉ. रुपेश मोरे यांना बहिणाबाई चौधरी विद्यापीठातर्फे पीएचडी गाईड म्हणून मान्यता



जळगाव : बोदवड महाविद्यालयाच्या डॉ. रुपेश मोरे, यांना नुकतीच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या वतीने पीएचडीचे मार्गदर्शन करण्यासंदर्भात मान्यता मिळाली आहे. डॉ. रुपेश मोरे हे गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. प्राध्यापक मोरे यांनी गणित विषयात नेट, सेट, गेट यासारख्या परीक्षेत उत्तमप्रकारे यश मिळवले आहे. त्यांनी अमेरिकेत आंतरराष्ट्रीय परिषदेत अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. त्यांचे शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. तसेच ते विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्यरत आहे. महाविद्यालयात ते गणित विभागप्रमुख म्हणून धुरा सांभाळत आहे. याशिवाय त्यांचे विविध महापुरुषांच्या जीवनावरील लेख नामांकित वृत्तपत्रात संपादकीय पानावर प्रकाशित होत असतात. त्यांच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन मिठूलालजी अग्रवाल, सचिव विकास कोटेचा, उपाध्यक्ष अजय जैन, ज्येष्ठ संचालक अँड. प्रकाशचंदजी सुराणा आणि सर्व संचालक तसेच बोदवड महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी, उपप्राचार्य डॉ. व्ही. पी. चौधरी, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच कुंभार समाजातील विविध मान्यवर पदाधिकारी आणि कुंभार समाजातील सर्व बांधव यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

***

अमरावती येथे प्लम्बर व सिक्युरिटी गार्डचे मोफत प्रशिक्षण

शासन मान्यता प्राप्त सर्टिफिकेट कोर्स निशुल्क करण्याची सुवर्ण संधी. **१) असिटंट प्लंबर,** शिक्षण : ९/१० वी पास.

२) सिक्युरिटी गार्ड, शिक्षण : ९/१० पास. जागा प्रत्येकी ३० (२१ BPL करीता राखीव जातीची अट नाही. ९ जागा SC, ST, VJNT, अपंग, परितक्ता महीलांकरीता राखीव या करीता BPLMr अट नाही.

कोर्स कालावधी : २०/८/२२ ते ३०/९/२२. कोर्स संपूर्ण निशुल्क आहे. बाहेर गावच्या विध्यार्थ्यांनी राहण्याची व जेवणाची व्यवस्था स्वतः करावी लागेल. परीक्षेला बसण्या करीता ७५% उपस्थिती आवश्यक, उत्तीर्ण विध्यार्थ्याला शासनाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कोर्स पूर्ण केल्यानंतर रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता संस्थेकडून विशेष प्रयत्न केल्या जाईल. **वय गट** : १८ ते ३०.

अर्जा सोबत लागणारे कागदपत्रे : १) आधार कार्ड, २) शैक्षणिक पुरावा, ३) जातीचे प्रमाणपत्र, ४) विहीत नमुण्यात अर्ज, ५) रेशन कार्ड झेरॉक्स किंवा BPL कार्ड, ६) पासपोर्ट साईज फोटो ६, ७) पॅन कार्ड असल्यास, ८) बॅक पास बुक पहील्या पानाची झेरॉक्स ज्यामध्ये अकौंट नंबर व IFSC Code स्पष्ट असावा.

ट्रेनिंग आयोजन करणारी संस्था : श्री. संत गोरोबाकाका समाजोन्नती बहूउद्देशिय समिती, शशीनगर बडनेरा रोड, अमरावती.

संपर्क क्र. 9370151829 / 9403399040

email : shriramkolhe76gmail.com

विनित : पंजाबराव काकडे (अध्यक्ष), प्रा.सुरेश नांदुरकर (कार्याध्यक्ष), डॉ. श्रीराम कोल्हे (सचिव), सुधाकरराव शेंडोकार अध्यक्ष विदर्भ कुंभार समाज सुधार समिती अमरावती, सतीश गावंडे, सुरेंद्र सरोदे, बाळकृष्ण महानकर, शंकरराव धामणकर, गजानन गुजरे, संतोष सरोदे (उपाध्यक्ष), मोरे (उपाध्यक्ष), अरुण वाघ, डॉ. साळिवकर, निळे सर, डॉ. वाघ, गणेश सोनोने व श्रीमती प्रभाताई भागवत (राज्य महीला अध्यक्ष)

***

सुरेशराव कोते यांना राजे लखुजीराव जाधव पुरस्कार प्रदान



बुलढाणा : राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचे वडील राजे लखुजीराव जाधव, सिंदखेड राजा, यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रति वर्षी दिला जाणारा मानाचा पुरस्कार यंदा लिज्जत पापड संस्थेचे सर्वे सर्वा माननीय सुरेशराव कोते साहेब यांना भैयासाहेब जाधवराव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी आमदार तथा माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, कार्यक्रमाचे संयोजक शिवाजी दत्तात्रय राजे जाधव, प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख, उद्योजक विजयसिंह राजे जाधव, शिवशाहीर यशवंतराव गोसावी, दैनिक पुण्य नगरीचे बुलढाणा आवृत्तीचे प्रमुख अनिल म्हस्के पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

समाज रत्न सुरेशराव कोते साहेब यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन

चिविलकर परिवाराचा लोक उपयोगी उपक्रम

– अनिल नरवणकर



कुंभाड गावातील प्रमुख लोकवस्ती पासून कुंभार समाजातील पाच वाड्या अविकसित भागात राहात आहेत. आबंवली–बिजघर–कुंभाड व्हाया खोपी या रिंग रोड मार्गावरील कुंभाड गावठान ते बोरीचीपट्टी जोड रस्ता बारमाही वाहतुकीसाठी करुन मिळावा हि मागणी मागिल अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे.

शाळा, दवाखाना, हॉस्पिटल या भागापासुन फार लांबच्या अंतरावर असल्यामुळे बऱ्याच वेळा या भागातील गरोदर महिला, जेष्ठ नागरीक, सर्पदंश झालेले रुग्ण अशा आजारी रुग्णांना गेली कित्येक वर्ष झोळी करुन खांद्यावर घेऊन पायी चालत अथवा खुर्चीवर बसवुन दवाखान्यात न्यावे लागते. अशावेळी रुग्नांना शारिरीक त्रास भरपूर होत असतो व रुग्ण दवाखान्यात पोहचे पर्यंत दगावले आहेत. या वाडीवस्तीमध्ये स्टेचार असणे आवश्यक बनले आहे. गणपती उत्सवात कुंभारवाडी भावकीने स्टेचर पुरविण्याचा मानस केला होता.

सदर स्टेचर, दिनांक ४ ऑक्टोंबर २०२२ रोजी कुंभाड ग्रामस्थांना कुंभारवाडीतील देहूरोड, पुणे येथे स्थायिक असलेले चिविलकर परिवारांनी उपलब्ध करुन दिला आहे. गाव कुंभाड मधिल सर्व आजारी रुग्णांनी याचा उपयोग करुन घ्यावा असे आवाहन चिविलकर परिवारातील जेष्ठ बंधू दिपक धोंडु साळवी (चिविलकर) यांनी केले आहे.

यावेळी दिपक साळवी (चिविलकर), जेष्ठ नागरीक नेव्ही रिटायर्ड मनोहर परबते, शिवसेना शाखा प्रमुख दिनेश खेडेकर आणि वाडीतील ग्रामस्थ बांधव मानसिंग साळवी, अरविंद कुंभार, अनंत गुडेकर उपस्थित होते.

***

कुंभार समाजाच्या मागण्यांसाठी मंत्री तानाजी सावंत यांची भेट



तेर : अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोग्यमंत्री तथा उस्मानाबादचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांची भेट घेतली. यावेळी कुंभार समाजाच्या विविध मागण्या व प्रश्न त्यांच्याकडे मांडले. यामध्ये प्रामुख्याने श्री क्षेत्र तेर येथील संत गोरोबाकाका मंदिर परिसरात विविध विकासकामा संदर्भात चर्चा झाली. कुंभार समाजाचा जिव्हाळ्याचा विषय माती उत्खनन, हरित लवाद, पर्यावरण संदर्भात चर्चा करण्यात आली.

यावेळी डॉ. तानाजी सावंत यांनी समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चेसाठी संपर्क साधून भेट घेत प्रश्न मांडणार, असे आश्वस्त केले. याप्रसंगी समाजातील संघटनेचे अध्यक्ष श्यामशेठ राजे, उपाध्यक्ष दत्ताजी कुंभार डाळजकर, किसनराव काळे, पुणे जिल्हाध्यक्ष नागनाथ कुंभार, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष नथुशेठ पिरंगुटकर, महादेव खटावकर, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष मयुर कुंभार, मारुती कुंभार, अशोकराव भिगवनकर, शिवहार कुंभार, काका पोळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

***

अभय राजे यांनी सर केला एवरेस्ट बेस कॅम्प



नेपाळ : अहमदनगर येथील इंजिनियर ॲड. अभय कृष्णराव राजे यांनी ५५४० मीटर उंचीचा एव्हरेस्ट बेस कॅम्प नुकताच सर केला ही अभिमास्पद गोष्ट आहे. अत्यंत प्रतिकूल वातावरण उणे ६ डिग्री तापमान, खाण्यासाठी नूडल्स, पास्ता, मोमोज व फ्राईड राईस असे चायनीज पदार्थ, चांगल्या हॉटेल्सची वनावाच होती. रोज आठ तास ट्रेकिंग मध्ये जेमतेम १० किलोमीटर अंतर कापता येत होतं. टॉयलेटला पाणी गोठत आसल्याने टिशू पेपरचा वापर करावा लागत होता. तीव्र चढ आणि तीव्र उतारामुळे गुढग्यावर प्रचंड ताण येत असल्याने सर्वांना खूपच त्रास झाला. परंतु एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केल्यावर, तेथे आपल्या भारताचा तिरंगा घेऊन राष्ट्रगीत म्हटले, नंतर भारत माता की जय!, जय हिंद!, वंदे मातरम! अशा घोषणा दिल्या आणि सर्व कष्टाचा आणि शारीरिक वेदनांचा विसर पडला असे अभय राजे यांनी सांगितले.

समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्या वतीने अभय राजे यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व पुढील वेळी एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी शुभेच्छा!

लोणावळ्याचा राष्ट्रपतींकडून गौरव : स्वच्छ सर्वेक्षण अभियानात देशात दुसरा क्रमांक



लोणावळाकरांनी स्वच्छतेच्या बाबतीत साथ दिली. अनेक संस्था, संघटनांचा पाठिंबा मिळाला. यामुळेच लोणावळा शहराने स्वच्छतेच्या बाबतीत यश मिळवत मानाचे स्थान मिळवले आहे. आता शहर अधिक स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सर्वांवर आहे. – सुरेखा जाधव, नगराध्यक्षा, लोणावळा.

विज्ञान भवन, नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात लोणावळा शहराने देशात दुसरा क्रमांक पटकावला. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना नगराध्यक्ष सुरेखा जाधव आणि इतर.

लोणावळा : केंद्र सरकारच्यावतीने देशभर राबविण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२०–२१ मध्ये लोणावळा 'स्वच्छ शहर' ठरले असून, एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये राष्ट्रीय पातळीवर दुसरा क्रमांक मिळवला आहे. नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नगराध्यक्षा सुरेखा जाधव यांनी हा पुरस्कार आज स्वीकारला. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्री हरदीप सिंग पुरी, उपनगराध्यक्षा सुवर्णा अकोलकर, आरोग्य व स्वच्छता समितीच्या सभापती रचना सिनकर, नगरसेवक श्रीधर पुजारी, राजू बच्चे, देविदास कडू, नितीन आगरवाल, प्रमोद गायकवाड, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, तत्कालीन मुख्याधिकारी रवी पवार आदी उपस्थित होते.

सलग चौथ्यांदा लोणावळा शहराने स्वच्छ शहरांच्या यादीत मानाचे स्थान मिळवले आहे. नगराध्यक्षा सुरेखा जाधव, तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पवार यांच्या नेतृत्वाखाली लोणावळ्याने २०१९ मध्ये देशात दुसरे तर सन २०१८ मध्ये सातवा क्रमांक पटकावला होता. लोणावळ्याने कचरामुक्त शहर व सर्वाधिक स्वच्छ व हागणदारी मुक्त शहर असे दोन पुरस्कार पटकाविले आहे.

संत शिरोमणी गोरोबा काका महाराज पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र आळंदी ते पंढरपूर



संस्थापक/चालक ह.भ.प. गुलाब महाराज कुंभार माऊकर रविवार दिनांक ०१/०५/२०२२ रोजी सायंकाळी ठिक पाच वाजता वारी नियोजनाची बैठक भरतशेठ कुंभार (कान्हेफाटा) यांचे निवासस्थानी संपन्न झाली. मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते. यामध्ये माननीय सतिश दादा दरेकर (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कुंभार सामाजिक संस्था), किसनराव काळे (उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था), ह.भ.प. नामदेव महाराज कुंभार, ह.भ.प. गुलाब महाराज कुंभार, वसंतराव घोडनदीकर, अनंता कुंभार, अमितशेठ कुंभार, बाळासाहेब शिवलीकर, नामदेवराव दरेकर, ह.भ.प. दिनेश महाराज दरेकर, विणेकरी अर्जुनदादा दरेकर, अशोकराव भिगवणकर, रघुनाथ सोमवंशी, भरतशेठ कुंभार, बबनराव जामदार, लक्ष्मण कुंभार नेरेकर, शिवाजी कुंभार, बाळासाहेब ताथवडेकर, यतिनशेठ मोरे, सुरेश शिवणेकर, किसनराव कुंभार सरपंच, चंद्रकांत माऊकर, दत्ताशेठ कुंभार टाकवेकर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या सर्वांना सतिशदादा दरेकर, गुलाब महाराज कुंभार, अमित कुंभार, किसनराव काळे यांनी मार्गदर्शन केले. सर्वांचे आभार भरतशेठ कुंभार यांनी मानले. उस्फूर्त वातावरणात सभा संपन्न झाली.

***



हॉटेल साईलीला

प्युअर व्हेज फॅमिली रेस्टॉरंट

(आजरा शहरातील एकमेव चवदार)

लंच-डिनर * साऊथ इंडियन * महाराष्ट्रीयन
नाष्टा मिसळ * पंजाबी * चायनिज
* तंदूरी * पावभाजी * सॅन्डविज
* ताक * सोलकडी * आईस्क्रिम
* ज्युसबार

जवळच सुप्रसिध्द रामतीर्थ धबधबा आजरा

प्रोपा. ज्ञानदेव निवृत्ती कुंभार
मयुर पेट्रोलपंप शेजारी,
आजरा-गडहिंग्लज रोड,
आजरा, जि. कोल्हापुर.
Ph.: 02323-246721
Mo.: 9960189721



हॉटेल साईप्रसाद

प्युअर व्हेज फॅमिली रेस्टॉरंट

उत्कृष्ट पंजाबी, चायनिज, तंदूरी, पाव-भाजी, पिझ्झा, साऊथ इंडियन, लंच, डिनर, फ्रेश फ्रुट ज्यूस बार, मिल्क शेक

एक वेळ अवश्य भेट द्या

प्रोप्रा. शिवाजी आप्पाजी कुंभार

नाकोडा ट्रेडर्स शेजारी, भडगांव रोड, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
फो. ०२३२७-२२६९५९, मो. ९८५०१३०४७४.



यशश्री क्लॉथस्

सुटींग, शर्टींग,
साड्या, रेडीमेंडस् होजिअरी

एन. के. शिर्के
मोबा. ९४२११०६५७१

मेन रोड वाठार तर्फे वडगांव,
जि. कोल्हापुर.



प्रो. केशव धोंडीबा कुंभार
मो. 9892616177, 9867833287



केशव रसवंती गृह

हरगंगा महल, प्लॉट नं. ४५,
टिळक रोड, दादर टी. टी.,
मुंबई ४०० ०१४.

श्री. गुरुदेव रसवंती गृह

शांती भवन, प्लॉट नं. ४२७,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

- शाळेतील मुलांसाठी खास सवलत



यश ऑप्टीशियन

बिचकर आय क्लिनिक

डी १०, भट्टड कॉम्प्लेक्स,
दत्त चौक, कराड.

प्रोप्रा. सचिन निवृत्ती कुंभार
Mo. : 8806133876

मंगळवार बंद



मुक्ताई व्हेज डायनिंग





श्री. रमेश कुंभार
7798484876
9423234810

श्री. ऋषिकेश रमेश कुंभार
96049 41015
Hotel Management Digree

प्रसाद रमेश कुंभार
9970500282
9422987114
ITI Hotel Mg. Cert. Course

उरूळी कांचन, राममंदिराशेजारी, कुंभार आळी, पुणे ४१२ २०२



सुभाष कोंडा सप्लायर्स

प्रोप्रा. अर्जुन गोविंदराव सरवडेकर
मो. 9049114000

सुभाष ब्रिक्स

दत्तात्रय अर्जुन सरवडेकर

श्री. प्रकाश अर्जुन कुंभार (सरवडेकर)
मो. 9923167272
विशेष कार्यकारी अधिकारी
मा. सभापती परिवहन
मा. नगरसेवक कोल्हापूर महानगरपालिका

हॉटेल दत्तप्रकाश

चहा, कॉफी व फराळाचे ताजे जिन्नस मिळतील.
संत गोरा कुंभार वसाहत,
बापट कॅंप, जि. कोल्हापुर.

संजय विट कारखाना

6" X 4" विटा होलसेल भावात मिळतील







संजय निवृत्ती कुंभार
9527490031

विवेक संजय कुंभार
9763767673

चि. अभिजीत संजय कुंभार
D.M.E. B.A.
गव्हर्मेंट कॉन्ट्रक्टर

साळी आळी, मु. पो. सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे.

प.पू. सद्‌गुरु कडूबा उफाड कुंभारबाबांचे कार्य अमृतमय - गुरु सुधाकर मेंगदे





वडाळा महादेव : परमपूज्य सद्‌गुरु कडूबा उफाड कुंभारबाबा हे श्रीनवनाथ भक्त परिवारातील सेवाभावी भक्त होते. त्यांनी गोरगरिबांच्या सेवेत खरे भक्ती समाधान शोधले. ते झाडपाल्याचे उत्तम जाणकार आणि वैद्यक होते. लाखो गोरगरीबांना त्यांनी मोफत बरे केले. मानसिक स्वाथ्य ठीक केले, गरिबाजवळ पैसा नसतो, आजचे दवाखाने लोकांना परवडत नाहीत पण सद्‌गुरु कुंभारकाकांनी अनेक रोगी सेवाभावाने बरे केले, त्यांची भक्ती ही सेवेत होती, त्यांच्या आदर्श कार्याचे, विचारांचे आचरण करण्यातच त्यांना खरी मानवंदना असल्याचे मत श्रीनवनाथ भक्त गुरु सुधाकर मेंगदे यांनी व्यक्त केले.

येथील प्रगतीनगरमधील ओम शिव गोरक्षनाथ मंदिर परिसरात दि. १५ ते १८ एप्रिल २०२२ या कालावधीत परमपूज्य सद्‌गुरु कडुबा उफाड कुंभारबाबा यांच्या १६व्या पुण्यतिथीनिमित्त श्रीनवनाथ ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी गुरु सुधाकर मेंगदे हे समारोप पारायण सोहळ्यात बोलत होते. प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी स्वागत, प्रास्ताविक करून 'भारतीय कुंभार समाजातील संत' या पुस्तकामध्ये सद्‌गुरु कडुबा उफाड कुंभारबाबा यांच्या लिहिलेल्या चरित्राविषयी माहिती देऊन काही मान्यवरांना पुस्तके देऊन त्यांचा सन्मान केला. मुख्य संयोजक बाबासाहेब उफाड यांनी प्रवचनकार गुरु सुधाकर मेंगदे यांना सन्मानित करून संतपूजन केले. सर्वांनी जयजयकार केला. याप्रसंगी रामभाऊ खंडागळे, संतोष साळुंखे, ज्ञानेश्वर दुधाळे, संतोष भालेराव, वामनराव वाकचौरे, अशोकराव वाकचौरे, सोमनाथ गोरे, परदेशी महाराज, अप्पासाहेब मोरे, रामभाऊ ससे आदी मान्यवर उपस्थित होते. तीन दिवसाच्या नवनाथ ग्रंथपारायण वाचनात अनेकांनी भाग घेतला. त्यांच्याबद्दल कौतुक, गौरव करण्यात आला. राम उफाड, शाम उफाड, मारुती दारकुंडे, राजू चव्हाण, कारभारी बोराडे, शुभम चव्हाण, संतोष जगताप, ज्ञानेश्वर हांडगे, संदीप गायकवाड, रामेश्वर पवार, तुकाराम शिंगटे, संजय नेहूल, नाना नाईकवाडे, दादाभाऊ कदम, गोरख पटारे, अनिल देवगिरे, गोरख पवार, नानासाहेब दळवी, ज्ञानेश्वर विधाटे, सुनील पवार आदिंनी हा पारायण धर्मसोहळा संपन्न केला. गुरु सुधाकर मेंगदे यांनी नवनाथ ग्रंथ सोप्या भाषेत भक्तपरिवारास समजून सांगून श्री अडबंगनाथ यांची कथा विशद करून नवनाथभक्त परिवारसतील अडबंगनाथाची खरी कथा आणि पवित्र शिळेचे स्थान भक्तांनी समजून घ्यावे असे आवाहन केले. नवनाथ हे भक्ती, शक्ती, पावित्र्य, समाजसेवा आणि शिस्त यांचे आदर्श होते. त्यांच्यापासून भक्तीसंप्रदाय सुरु होतात असे सांगितले. बाबासाहेब उफाड यांनी देगणीदार आणि सहकार्य करणारे हेच अशा उपक्रमाचे आधारवड असल्याचे सांगून आभार मानले.

***

ओंकारची रोपवाटिकेतून 'सुवर्ण' पेरणी, ८०० मीटर शर्यतीत सुवर्णपदकाची कमाई



पुणे : चमकदार कामगिरी करण्याची जिद्द अन् त्यासाठी आवश्यक ते कष्ट करण्याची तयारी असेल तर यश मिळवता येते हे रोपवाटिकेत काम करणाऱ्या ओंकार सदानंद कुंभार याने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले. त्याने गुरुवारी राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत 'सुवर्ण' यश मिळवले.

राज्य स्पर्धेतील २० वर्षांखालील मुलांच्या ८०० मी. धावण्याच्या शर्यतीत १८ वर्षीय ओंकारने सुवर्णपदक पटकावले. त्याने १ मिनीट व ५४.५६ सेकंद वेळ नोंदवली. त्यापाठोपाठ पालघरच्या सुमीत मंडलने रौप्य, तर पुण्याच्या चेतन चव्हाणने ब्राँझपदक मिळवले.

ओंकार हा कोल्हापूरातील शिरदवाडचा (ता. शिरोळ) आहे. तो सध्या इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये 'बीकॉम'च्या पहिल्या वर्षात शिकतो. दोन वर्षांपासून तो ॲथलेटिक्सकडे वळला आहे. त्याला प्रशिक्षक नवनाथ पुजारी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. ॲथलेटिक्स 'ट्रॅक'वर आयुष्यातील पहिलेच पदक अन् तेही सुवर्णपदक मिळाल्याने ओंकार आनंदी होता. ओंकार म्हणाला, 'सुरुवातीला मी छोट्या-छोट्या शर्यतींमध्ये सहभागी होत होतो. मात्र, आमच्या गावातील धावपटू विश्वजित लवटे आणि दीपक कुंभार यांनी मला ॲथलेटिक्सविषयी अधिक माहिती दिली. त्यांनी ट्रॅकवरील शर्यतींबाबत सांगितले. मग, मी त्या दृष्टीने सराव सुरु केला.

आमचे गावात छोटे किराणा दुकान आहे. घरच्यांकडून थोडी मदत होते. मात्र, खुराक (डाएट) आणि शूज यासारख्या आवश्यक गोष्टींसाठी पैसा भरपूर लागतो. त्यामुळे मी गावातील रोपवाटिकेत काम करायला लागलो. रोप तयार करण्याच्या कामातून दिवसाला तीनशे रुपये मिळतात. त्यामुळे मोठी मदत झाली. मला शूज घेता आले. तसेच, खुराकासाठी पैसे उपलब्ध झाले.

आता या मेहनतीचे फळ मला मिळत आहे. रोडवर झालेल्या काही छोट्या शर्यतींमध्ये यापूर्वी मी सहभागी झालो आहे. मात्र, त्यात यशही मिळाले. मात्र, 'ट्रॅक'वरील हे माझे पहिले सुवर्ण हुरुप वाढवणारे आहे.'

***

डॉ. सुरेश बाबुराव काळे यांना लाइफ टाइम अचिवमेंट अवॉर्ड



के. ई. एम. हॉस्पिटल मुंबई येथे हार्ट सर्जरी विभागात गेल्या ३० वर्षापासून सेवेत असलेले डॉ. सुरेश बाबुराव काळे यांना जयपूर (राजस्थान) येथे 'लाइफ टाइम अचीवमेंट अवॉर्ड' हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. सुरेश काळे यांनी मुंबई येथील के. ई. एम. हॉस्पिटल येथे हार्ट सर्जरी विभागात गेल्या ३० वर्षात जवळजवळ ५,००० हार्ट पेशंटचे ऑपरेशन करताना चिफ पर्फुजनिस्ट म्हणून ब्लड कंट्रोल आणि सप्लाय करत प्रत्यक्ष सहभाग दिला आहे. त्यांच्या या वैद्यकिय सेवेची दखल राष्ट्रीय स्तरावर घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

डॉ. सुरेश काळे हे आजही कोणत्याही समाजातील अडले नडले, गोर गरीब पेशंट यांच्याकरिता के. ई. एम. हॉस्पिटल येथे सेवा देत असतात. त्यांना आज मिळालेल्या या राष्ट्रीय पुरस्कारामुळे संपूर्ण कुंभार समाजाला अत्यंत आनंद झाला आहे.

त्याबद्दल त्यांचे व काळे परिवारांचे कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील सामाजिक कार्यास मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा!

***

महेता कॉलेजच्या तन्मय कुंभारची एअर पिस्तुल खेळामध्ये राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



तन्मय कुंभार याचा सत्कार करताना डॉ. सतीश देसाई, शेजारी श्रीनिवास वाळवेकर, प्रा. अनिकेत गायकवाड

पाचगणी : श्रीमती मीनलबेन महेता कॉलेजच्या तन्मय सुविचार कुंभार याची १० मीटर एयर पिस्तुल खेळ प्रकारात उत्तरप्रदेश येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल तन्मय कुंभार याचा प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश देसाई, प्राचार्य श्रीनिवास वाळवेकर, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. अनिकेत गायकवाड यांच्या हस्ते महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. तन्मय कुंभार हा बी.एस्सी. भाग १ मध्ये शिकत आहे. त्याने शिवाजी विद्यापीठ स्तरीय १० मीटर एअर पिस्तुल क्रिडा स्पर्धेत ३७०/४०० असा स्कोअर करीत यश संपादन केले. त्याची दिनांक १२ ते १५ एप्रिल दरम्यान उत्तर प्रदेशातील मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया युनिवर्सिटीमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यास जिमखाना विभाग प्रमुख प्रा. अनिकेत गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

यानिमित्ताने महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश देसाई यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. नरेंद्र फडतरे, प्रा. माणिक वांगीकर आदी उपस्थित होते.

***

मुंबईत संत गोरा कुंभार नाटक उत्साहात संपन्न



शिवाजी नाट्य मंदिर येथे गोरोबाकाका यांची भूमिका साकारणारे अभिनेते शिवाजी मालवणकर यांचा कुंभार समाजाचे वतीने सत्कार प्रसंगी उजवीकडून डॉ. सुरेश काळे, कुंभश्री संपादक संजय राजे, सामाजिक संस्थेचे प्रदेश कार्याध्यक्ष महेश सायकर, जेष्ठ नेते मोहनराव कुंभार, महाराष्ट्र कुंभार समाजाचे गुजरात महासंघाचे नेते गजानन खानजोडे, इंजि. बबनराव जगदाळे, सौ. संगीताबेन जगदाळे व मान्यवर.

सहकलाकार पार्श्व संगीतकार यशवंतराव मानके यांचा सत्कार कुंभश्री संपादक संजय राजे यांच्या हस्ते करण्यात आला.

सूत्रसंचालन संतोष चौलकर यांनी केले. मुंबई व्यतिरिक्त गुजरात राज्यातील सुरत आणि नवसारी येथून मोठ्या संख्येने समाज बंधू भगिनी उपस्थित होते.

श्री होमिओपॅथिक क्लिनिक पर्वरी मध्ये रुग्णांना सर्व दिवस सेवा मिळणार



उद्घाटन करताना वडील मारुती कुंडलिक कुंभार समवेत डावीकडून सौ. लता, डॉ. शुभम व डॉ. सुखदेव कुंभार



डॉ. शुभम व डॉ. सुखदेव कुंभार यांना शुभेच्छा देताना गोवा डी.वाय.एस.पी. जीवबा दळवी



उदघाटन प्रसंगी शुभेच्छा देताना गोवा कुंभार समाज महासंघाचे प्रदेश अध्यक्ष सतिशशेठ कुंकळेकर समवेत डावीकडून सौ. नेहा स्वप्नील कुंभार, डॉ. शुभम, सौ. हेमलता सुखदेव कुंभार, डॉ. सुखदेव, श्रीमती वासंती विष्णू पाषाणकर, सौ. सुनीता व सतिशशेठ कुंकळेकर.

गोवा : श्री होमिओपॅथिक क्लिनिक पर्वरी गोवा या ठिकाणी डॉ. सुखदेव कुंभार यांनी रुग्णसेवा २०१३ साली सुरु केली, त्या वेळेपासून डॉ. कुंभार आठवड्यातून फक्त एक दिवस शुक्रवारी रुग्ण तपासणी करत होते, इतर दिवशी ते आरोंदा तालुका सावंतवाडी या ठिकाणी रुग्ण सेवा करत असत. आता दि. ०२/०६/ २०२२ रोजी डॉ. कुंभार यांनी श्री होमिओपॅथिक क्लिनिकचे उद्घाटन त्यांचे वडिल मारुती कुंडलिक कुंभार यांचे हस्ते करण्यात आले.

उद्घाटनानंतर क्लिनिक आठवड्यातील सर्व दिवस चालू राहील, येथे सर्व प्रकारच्या व्याधीवर होमिओपॅथिक उपचार केले जातील. सदर क्लिनिकमध्ये सुप्रसिद्ध होमिओपॅथी तज्ञ डॉ. सुखदेव कुंभार एम.डी. (होमिओ) आणि त्यांचे चिरंजीव डॉ. शुभम कुंभार एम.डी. (होमिओपॅथी) हे उपचार करतील.

शिष्यवृत्ती परीक्षेत हर्षद कुंभारचे यश



सातारा : २०२०–२१ मध्ये एन एम एम एस मार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत महाराजा सयाजीराव महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, साताराच्या इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या हर्षद मनोहर कुंभारने यश मिळविले तसेच शंकर घुले, ओम पाटील, ओम शिंदे, साहिल तावरे या विद्यार्थ्यांनीही शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. विभागप्रमुख सौ. ए. व्ही. खंडाईत व सर्व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. जी. जाधव, उपप्राचार्य एच.एल. काटकर, पर्यवेक्षक आर. डी. कदम, पर्यवेक्षक एस. व्ही. जाधव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

***

चवदार लंडन मिसळ

मालिकाविश्वातील जाणकार दिग्दर्शक जालिंदर कुंभार हा नवा सिनेमा घेऊन प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. 'लंडन मिसळ' असं या सिनेमाचं नाव आहे. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेल्या नाटकावरुन प्रेरित होऊन



या सिनेमाची निर्मिती करण्यात येणार आहे. लवकरच या सिनेमाचं चित्रीकरण लंडनमध्ये सुरु होणार असून तो चित्रपट वर्षा अखेरीस प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचं कळतंय. सिनेमाबद्दल दिग्दर्शक जालिंदर कुंभार सांगतो, 'यापूर्वी मी चित्रपट आणि मालिका केल्या आहेत. पण आता बऱ्याच काळानंतर मी पुन्हा एकदा मराठी चित्रपटाचं दिग्दर्शन करतोय. या चित्रपटाच्या निमित्तानं प्रथमच सुभाष घई यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे.'

***

दिलीप मेनकरांना बढती



नाशिकरोड : महापालिकेच्या नाशिक रोड विभागीय कार्यालयाचे विभागीय अधिकारी डॉ. दिलीप मेनकर यांची बढतीवर उपायुक्तपदी पदोन्नती झाली आहे. त्या निमित्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी त्यांचा नुकताच सत्कार केला. विभागीय स्वच्छता निरीक्षक अशोक साळवे, राजू निरभवणे, स्वच्छता निरीक्षक ज्ञानेश्वर भोसले, विजय मोरे, सचिन बिडवे, बाळासाहेब आढाव आदी उपस्थित होते.

***

विनम्र आवाहन-निवेदन





जय श्री गोरोबाकाका..!

कोकण प्रांत मुळातच कलावंतांना जन्म देणारा प्रांत आहे. ह्याच कोकण प्रांताने मराठी-हिंदी रंगभूमी-सिनेजगतला नामवंत नाटककार, गायक, संगीतकार अभिनेते-अभिनेत्री मिळवून दिले आहेत. ह्याच कोकणच्या लाल मातीतले अभिनेते कुंभार समाजभूषण आदरणीय शिवाजीराव मालवणकर (कुंभार) ह्यांनी स्वतः प्रमुख भूमिका व दिग्दर्शन केलेले संत शिरोमणी श्री गोरा (श्री गोरोबाकाका) कुंभार हे दोन अंकी नाटक चिपळूणला सादर केले. पहिलाच नाट्यप्रयोग हाऊसफुल्ल झाला. संपूर्ण तिकीट विक्री झाली.

नाटकातील सुंदर अभिनय, संगीत, प्रकाशयोजना व स्पेशल इफेक्ट आदी नाटक बघितल्यावर प्रचिती येते. नाटकातील बरेच प्रसंग पाहिल्यावर आपोआप टाळ्या वाजविण्यासाठी हात वर उठतात व डोळे आपोआप पाणवतात.

होय, ही बाब कुंभार समाजाला भूषणावह असून कुंभार माणसाला आपण सर्वांनी हातभार लावून पुढे आणले पाहिजे. त्यांचा सत्कार केल्यावर महाराष्ट्र भर संत श्री गोरा कुंभारचे नाट्यप्रयोग व्हावेत अशी भावना बोलून दाखविली..! नाट्यप्रयोग बाबत ठिकठिकाणाहून विचारणा होत असल्याने त्यांचे बोलसंपर्क खालील प्रमाणे देत आहोत.

कृपया, सर्वांनी ह्या कुंभार कलाकार, अभिनेता, डायरेक्टर शिवाजीराव मालवणकर ह्यांना जास्तीत जास्त प्रयोग होण्यासाठी शुभेच्छा देऊ या..! जेथे-जेथे या नाट्याचे प्रयोग होतील तेथे-तेथे पंचक्रोशीतील बंधू भगिनी ह्यांनी सहकुटुंब जाऊन अवश्य तिकीट काढून नाटक बघावे..! कुंभार माणसाला पुढे आणू या..!

संत श्री गोरा कुंभार ह्या नाट्याची प्रचार-प्रसाराची पोस्ट सर्व ग्रुपवर पाठवावी ही विनंती..!

शिवाजीराव कुंभार मालवणकर, मुंबई

०९२२६४८९२८३ /०९६५७३३६५१६

निवेदक - सकल कुंभार समाज बंधू-भगिनी

***

वारकरी संप्रदायातील उद्योजक व प्रगतिशील शेतकरी ह.भ.प. नामदेव महाराज कुंभार



मावळ : मावळ म्हटले की इंद्रायणी तांदळाचे आगार, पण माऊ येथील उद्योजक व प्रगतिशील शेतकरी ह.भ.प. नामदेवराव कुंभार व तरुण प्रगतिशील शेतकरी समीर नामदेवराव कुंभार यांनी तीन एकर केळीची बाग केली आहे. केळीचे मोठंमोठे घड पाहून आनंद वाटला. कलिंगड, बटाटा अशी पिके सुद्धा ते घेतात. नदीवरुन स्वत:च्या शेततळ्यात पाणी घेतले आहे आणि ठिंबक सिंचनाद्वारे केळी, कलिंगड शेतीला पाणी पुरवठा करुन उत्तम पीक ते घेतात.

पावसाळ्यामध्ये इंद्रायणी तांदळाचे पीक ते घेतात. घरी गीर गाई म्हशी आहेत. घरातील मुला माणसांना पुरुन उरलेले दूध डेरीला घातले जाते, त्यामुळे सर्वांचे आरोग्य उत्तम आहे.

नामदेवराव यांच्या ९५ वर्षांच्या आई आणि स्वत: नामदेवराव यांनी कोरोनावर यशस्वी मात केली याच रहस्य गीर गाईचे दूध हेच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सतत हसतमुख व प्रसन्न असणाऱ्या नामदेवराव यांना पंचक्रोशीत सर्वजण भाऊ म्हणून ओळखतात.

भाऊ यांच्या शिवाय माऊ ग्रामपंचायतीमध्ये एकही महत्त्वाचा निर्णय होत नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाऊ प्रचंड बहुमताने विजयी झाले आणि सध्या ते विद्यमान संचालक आहेत. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी असणारे मा.भाऊ यांना समस्त कुंभार समाजातर्फे मानाचा मुजरा व मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन!

-संजय राजे, संपादक कुंभश्री मासिक

वारणा कोतोलीच्या सरपंचपदी 'प्रा. अशोक कुंभार' यांची बिनविरोध निवड



शाहूवाडी तालुक्यातील वारणा कोतोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रा. अशोक कुंभार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडल अधिकारी मोहन जाधव यांनी काम पाहिले. माजी सरपंच संपत पाटील यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर प्रा. अशोक कुंभार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची आज निवड करण्यात आली. यावेळी बोलताना माजी उपसभापती दिलीप पाटील म्हणाले की, अशोक कुंभार यांनी गावच्या विकासासाठी प्रयत्नशील राहून विकास साधावा.

नूतन सरपंच अशोक कुंभार म्हणाले, कोतोली गावच्या विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील राहून काम करेन. गावातील सर्वांच्या सहकार्यामुळे मला ही संधी लाभली आहे. तालुक्याचे आमदार विनय कोरे यांच्या विकास निधीतून गावाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी प्रयत्न करु. विकास काम बरोबर सामाजिक कामांना प्राधान्य देणार. तसेच गावातील लग्न होणाऱ्या नवरी मुलीला कन्यादान म्हणून स्वत:च्या खर्चातून एक साडी देऊन आशीर्वाद देणार. यावेळी प्रतिष्ठित नागरिक मारुती कुंभार माजी उपसभापती दिलीप पाटील, उद्योजक आनंद डांगे, माजी सरपंच पांडुरंग आचरेकर, संपत पाटील, माजी सरपंच आशादेवी कुंभार, पांडुरंग पाटील, ग्रामसेवक बी.सी. जाधव, उपसरपंच स्वाती केसरकर, बाळासाहेब कर्णाळे, लक्ष्मण कर्णाळे, बळवंत पाटील, आबा पाटील, सचिन पाटील, गणपती कांबळे, ज्ञानदेव कुंभार, आनंदराव कुंभार, सुरेश कुंभार, सुधीर कुंभार उपस्थित होते. अशोक कुंभार यांची बिनविरोध निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा केला.

***

शहा गावच्या सरपंचपदी 'दुर्गा कुंभार' बिनविरोध निवड



वडापुरी : इंदापूर तालुक्यातील शहा गावच्या सरपंचपदी दुर्गा ज्ञानदेव कुंभार यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

पूनम कढवळे यांनी सरपंच पदाचा तर स्वाती संतोष पांढरे यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने शहा ग्रामपंचायत कार्या –लयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. मंडल अधिकारी सोपान हगारे, तलाठी अरुण वेडे व ग्रामसेवक तुषार लोंढे यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी बोलताना नवनियुक्त सरपंच दुर्गा कुंभार म्हणाले की, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या नेतृत्वाखाली सर्वांना सोबत घेऊन ग्रामपंचायतीचा कारभार करणार आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या व गावातील पायाभूत सुविधा सोडविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. यावेळी पंचायत समितीचे सदस्य सतीश पांढरे, माजी सरपंच विष्णू पाटील, दत्तात्रय बनसोडे, विजय पाटील, दिलीप कडवळे, धनाजी देवकाते, शैलेश भोई, पिलू गंगावणे, नितीन निकम, हनुमंत शेंडगे, राजू तरटे, प्रकाश निकम, अशोक पाटील, लहू निकम, अशोक निकम, अंगदराव कुंभार, शंकर निकम, सदाशिव देवकाते, शरद भुई, संतोष कडवळे, तानाजी इजगुडे, धनाजी इजगुडे, बाळासो पांढरे व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

उपसरपंच पदी निशिगंधा जाधव बिनविरोध निवड



बारामती : माळेगाव खुर्द ता. बारामती ग्रामपंचायत उपसरपंचपदी निशिगंधा आदिनाथ जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी फटाके फोडून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

उपसरपंच संध्या अशोकराव जगताप यांनी ठरलेल्या मुदतीत पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त होते. सरपंच मंगेश काटेदेशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदाची निवड घेण्यात आली.

या पदासाठी निशिगंधा आदिनाथ जाधव यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. मावळत्या उपसरपंच संध्या जगताप यांनी नूतन उपसरपंच निशिगंध जाधव यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

याप्रसंगी ग्रामसेवक संतोष वसेकर, सदस्य सुनिल शिर्के, आदित्य काटे, विशाल देवकाते, महिला सदस्या पल्लवी काटे, मनिषा काटे, राजश्री आडके यांच्यासह कारखान्याचे संचालक संजय काटे देशमुख, माजी संचालक चिंतामणी नवले, सुनिलदादा पवार, आप्पासो काळे, ॲड. राजेंद्र काटे, हेमंत काटे, अशोक जगताप व ग्रामस्थ उपस्थित होते.

त्रैमासिक विचारशलाका विशेषांकाचे शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन



विचारशलाका या त्रैमासिकाचे प्रकाशन करताना ना. सतेज पाटील, माजी कृषीमंत्री शरद पवार, नागोराव कुंभार व इतर मान्यवर

लातूर : येथून गेल्या ३७ वर्षापासून प्रकाशित होणाऱ्या गुणवत्ता व सातत्य टिकवून वैचारिक साहित्याला वाहिलेल्या संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या विचारशलाका या त्रैमासिकाच्या 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषकांचे' विमोचन भारतातील ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्य गृहमंत्री सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, व्यंकप्पा भोसले, आर. के. पवार आणि व्ही.बी. पाटील आदिची उपस्थिती होती. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा निकष स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये आहेत, अशी वैचारिक भूमिका विचारशलाका त्रैमासिकाची आहे. यामुळे या मूल्यांच्या चौकटीत भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी अंकात करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत विशेषकांसाठी महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर, डॉ. सुर्यनारायण रनसुभे, माजी कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, पन्नालाल सुराणा, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. गोपाल गुरु, डॉ. प्रकाश पवार, प्रा.डॉ.जे.फ. पाटील, किशोर बेडकिहाळ, डॉ. शमसुद्दीन तांबोळी आदि ज्येष्ठ मान्यवर, विचारवंत व अभ्यासकांचे मौलिक लेख आहेत. या पाचशे पृष्ठाच्या विशेषकांमध्ये भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या वाटचालीचे सर्व मान्यवरांनी लेखकांनी वस्तुनिष्ठरित्या विश्लेषण केलेले आहे.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी खासदार शरद पवार यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संयोजन व आभार शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

संकेत कुंभारने लावला फुल फेस फोल्डेबल व ॲडजेस्टेबल मोटारसायकल हेल्मेटचा शोध ऑनलाईन 'अन्वेषण' या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत संकेत कुंभार देशात प्रथम



रोहा : रोह्यातील संकेत सदाशिव कुंभार याने फुल फेस फोल्डेबल व ॲडजेस्टेबल मोटारसायकल हेल्मेट बनविले आहे. १५ आणि १६ डिसेंबर रोजी झालेल्या ऑनलाईन 'अन्वेषण' या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत त्याने बेसिक सायन्स विभागातून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. संकेत कुंभार हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठात तृतीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी विभागात शिकत आहे. बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या हेल्मेटच्या समस्या लक्षात घेता त्याच्या असे लक्षात आले की बरेच लोक हेल्मेट वापरणे टाळतात, त्यामुळे त्यांना अपघातांना सामोरे जावे लागते, तसेच पोलिसांच्या कारवाईलाही सामोरे जावे लागते. बाजारात उपलब्ध असणारे पारंपारिक हेल्मेट हे आकाराने मोठे असल्याने ते हाताळणे अनेक लोकांना त्रासदायक वाटते. तसेच पारंपारिक हेल्मेट हे विशिष्ट साईज मध्येच उपलब्ध असते. त्यामुळे हेल्मेट निवडताना अनेक लोकांचा गोंधळ उडतो किंवा हेल्मेट विकत घेतल्यानंतर काही काळानंतर ते सैल पडायला लागते. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून संकेतने फोल्डेबल व ॲडजेस्टेबल हेल्मेट तयार केले आहे. तयार केलेले हेल्मेट हे अर्ध्या आकारात फोल्ड होत असल्यामुळे आपण ते बॅगमध्ये किंवा दुचाकीच्या डिकीमध्ये सहज घेऊन जाऊ शकतो. तसेच हे हेल्मेट दुचाकीवर सुद्धा अडकवण्यासाठी आणि लॉक करण्याची सुविधा करण्यात आली आहे. या हेल्मेटच्या विशिष्ट रचनेमुळे हे हेल्मेट आपल्या डोक्याच्या आकारानुसार आपण ॲडजेस्ट करु शकतो. वापरकर्ते या हेल्मेटला ओपन फेस मोडमध्ये सुद्धा वापरु शकतात.

महत्त्वाचे म्हणजे या हेल्मेटमध्ये दुचाकीस्वाराचा सुरक्षिततेवर आणि आरामदायी वापरावर भर घालण्यात आला आहे. या नवीन अविष्काराने विद्यापीठ पातळीवर प्रथम येत २०२० मध्ये 'अविष्कार' या राज्य स्तरीय संशोधन स्पर्धेत 'बेस्ट इनोवेशन इन महाराष्ट्र' हा पुरस्कार मिळवला होता. २० फेब्रुवारी रोजी मुंबई येथे झालेल्या 'अन्वेषण' संशोधन स्पर्धेत त्याची पश्चिम विभागातून देशपातळीवर निवड झाली होती. या स्पर्धेत भारतातील सर्व विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. १५ आणि १६ डिसेंबर रोजी राजीव गांधी प्रौद्योगिकी विश्वविद्यालय, भोपाळ येथे एआययु तर्फे घेण्यात आलेल्या 'अन्वेषण' या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत त्याने बेसिक सायन्स विभागातून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

***

Mob. : 9224805428
9702448280

श्री

Tel. : 022 : 25550020

संभाजी पा. कुंभार

देवनार मेडिकल आणि जनरल स्टोअर्स
DEONAR MEDICAL & GENERAL STORES
Chemist & Drugisst

"Human Care & Health Care"

Shop No. 1 & 2, Aastha II, Opp. Lakme Co., Govandi Station Road, Govandi, Mumbai - 400 088. Email: mrunalipharmacydeo@gmail.com

Free Home Delivery

संत गोरोबाकाका कृपा



भाऊसाहेब तुळशीराम गारे
9850153600
8379966225



जितेंद्र भा. गारे
9921089769



सौ. शुभांगी जि. गारे



निधी जितेंद्र गारे

विट कारखानदार

आमचेकडे सर्व प्रकारच्या विटा होलसेल व रिटैल भावात मिळतील.

मु. पो. चाटोरी, ता. निफाड, जि. नाशिक ४२२ २१०

Akhilesh K. Prajapati
9881407087





SHRI RAM
INDUSTRIES

JOB WORK : Lathe Work, Center less Grinding & Thread Rolling

Dynamic Co.-op. Society, F9/9, MIDC, Ambad, Nashik - 10.
Tel. : 0253-6603136



अंकिता
वीट सप्लायर्स व उत्पादक





प्रोप्रा. रामकृष्ण तुळशीराम गारे
मो. **8805778851**

कु. अंकिता गणेश गारे

गणेश रामकृष्ण गारे
मो. 8806288768
9764312822

आमचेकडे सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु. पो. चाटोरी, ता. निफाड, जि. नाशिक

POLIO CLINIC & REHAB CENTRE



Sanjay Y. Raje
D.P.O.E. (Mumbai)
Prosthetist & Orthotist
9822969535

- Prostheses (Artificial Limb)
- Orthoses (Polio-Paraplegic Calipers)

RAJE SURGICALS



Anjali S. Raje
B.Sc.DMLT
9922580296

- Orthopaedic Appliances
- Surgical & Scientific Instruments
- Hosptial Equipments & Instruments
- Hospital Furniture

'Manas', Bhosale Nagar, New Radhika Road, Near Hotel Rajtara, Satara. Ph.: (02162) 236629
● **Email Id : rajesurgicals@gmail.com** ● **sanjayragepcrc@gmail.com**

पुखराज प्रजापति

Mo. : 9766729370



हनुमान स्वीट मार्ट

रेल्वे फुट-ब्रिज जवळ, मार्गो, गोवा.
फोन नं. : ०८३२ - २७३६५५८



Prop. Rajendra Kumbhar
Mob. : 9860004394

R.K. BATTERIES
EXIDE Authorised Dealer

Tubular Batteries for UPS & Inverters

* Batteries Sales & Service * Battery Charging * Repairing

Nira-Baramati Road, Nira, Tal. Purandar, Dist. Pune

Insist on Veg.



शांती मेडीकल
मु.पो. वाघोली, पोस्ट ऑफिसजवळ,
ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७

प्रोप्रायटर



शरदराव सोपानराव वाघोलीकर

श्री मेडीकल
विक्रम डेअरीजवळ, मु.पो. वाघोली, ता. हवेली,
जि. पुणे - ४१२२०७

अमित शरदराव वाघोलीकर
मो. 8007214242

स्व. पतीच्या पुस्तकाचे पत्नीच्या हस्ते प्रकाशन हे स्मृतीनमन होय.

- प्रकाश कुलथे



श्रीरामपूर : भारतीय संस्कृती ही कुटुंबवत्सल आहे. पतीपत्नी म्हणजे दोन देहाचा एक श्वास आहे. शिर्डी येथील कुंभार समाजातील स्व. बाबुराव भीमाशंकर वाघचौरे यांनी लिहिलेल्या 'अधुरी सोबत' या पुस्तकाचे प्रकाशन श्रीमती बबुताई बाबुराव वाघचौरे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. स्व. पतीच्या पुस्तकाचे पत्नीच्या हस्ते प्रकाशन होणे म्हणजे पतीच्या भावस्मृतीला नमन असल्याचे मत महाराष्ट्र संपादक परिषदेचे कार्याध्यक्ष पत्रकार प्रकाश कुलथे यांनी व्यक्त केले. येथील स्नेहप्रकाश प्रकाशन तर्फे शिर्डी येथील बाबुराव भीमाशंकर वाघचौरे यांची 'अधुरी सोबत' ही कादंबरी मार्च २०२१ प्रकाशित झाली. वयाच्या ९३ व्या वर्षी लिहिलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन मात्र होऊ शकले नव्हते. ते पत्नी बबुताई वाघचौरे यांचे हस्ते व प्रमुख पाहुणे पत्रकार प्रकाश कुलथे, अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये तसेच वाघचौरे परिवारांच्या हस्ते गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रकाशन झाले, त्यावेळी प्रकाश कुलथे बोलत होते. गोविंदा वाघचौरे यांनी स्वागत प्रास्ताविक करुन आपल्या आजोबांच्या आठवणी सांगितल्या.

प्रकाश कुलथे यांनी पुस्तकाचे आशयसूत्र उलगडून सांगितले. यावेळी स्व. बाबुराव वाघचौरे यांची मुले रवींद्र वाघचौरे, सतीश वाघचौरे, मुकुंद वाघचौरे, रत्नाकर वाघचौरे, राजेंद्र वाघचौरे, सुना नलिनी रवींद्र वाघचौरे, रोहिणी सतीश वाघचौरे, वैशाली मुकुंद वाघचौरे, अश्विनी रत्नाकर वाघचौरे, कल्याणी राजेंद्र वाघचौरे तसेच नातवंडे प्रशांत, किरण सचिन, शेखर, गोविंद आणि नातसुना मनीषा, माधुरी, मेघा, कोमल, शीतल आदी उपस्थितीत झालेला हा पुस्तक प्रकाशन सोहळा आनंद आणि आठवणींचा गुलमोहर असल्याचे मत अध्यक्ष भाषणात डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी सांगून स्व. बाबुराव वाघचौरे हे गुणगान लेखक म्हणून नावारुपाला आले असते, पुस्तक लिहिल्यानंतर लगेच त्यांनी जगाचा निरोप घेतला हीच खरी अधुरी सोबत ठरली असे डॉ. उपाध्ये यांनी सांगून आठवणी सांगितल्या. यावेळी पत्रकार प्रकाश कुलथे यांनी अतिशय सुंदर पुस्तक काढले आणि डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी पुस्तकाला अर्थपूर्ण केले व समर्पक प्रस्तावना लिहिली असे आभार मानत कुलथे, उपाध्ये यांचा सत्कार केला. सतीश वाघचौरे यांनी आभार मानले.

***

अमित पाषाणकर यांची संघटक पदी निवड



पुणे : दि. १७ जुलै २०२१ रोजी कै. विष्णूशेठ पाषाणकर यांचे चिरंजीव अमित विष्णूशेठ पाषाणकर रा. बाणेर यांची कुंभार समाज सामाजिक संस्था पुणे जिल्हा 'संघटक' पदी नियुक्ती करण्यात आली. मा. ज्ञानेश्वर सोमवंशी अध्यक्ष कुंभार समाज सामाजिक संस्था पुणे जिल्हा व अरुण कुंभार सरचिटणीस यांच्या हस्ते पत्र देण्यात आले. अमितशेठ यांचा सत्कार करताना व पुढील कार्यास शुभेच्छा देताना सतीश दादा दरेकर अध्यक्ष कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश, वसंतराव घोडनदीकर,अजयजी वीरकर, बाळासाहेब ताथवडेकर, सुभाष बापू कर्डेकर, सौ. अरुणाताई कुंभार अध्यक्षा महिला आघाडी पुणे जिल्हा, मा. रामदास चव्हाण, मा. सुनील शेठ कुंभार अध्यक्ष भोर तालुका, मा. राजू लवळेकर, मा. गोकुळ सोमवंशी भोसरी अध्यक्ष, मा. रामदास कुंभार अध्यक्ष प. हवेली, अमितशेठ यांनी संघटक पदी नियुक्ती झाल्याबद्दल, मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सर्व पदाधिकारी यांचे मनापासून आभार मानले.

***

सांगलीचे सहाय्यक पोलिस फौजदार आनंदराव कुंभार यांना राष्ट्रपतीपदक



सांगली : पोलिसांच्या जिल्हा विशेष शाखेतील सहाय्यक पोलिस फौजदार आनंदराव गोपीनाथ कुंभार (रा. सिद्धेवाडी, ता. तासगाव) यांना त्यांच्या विशेष कामगिरीबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. केंद्र सरकारच्यावतीने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पोलिस पदकांची घोषणा करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील ५१ पोलिसांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. येथील कुंभार यांची ३२ वर्षे सेवा झाली आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

***

रामचंद्र कुंभार यांची निवड



पाटेठाण : राष्ट्रीय उद्यमिता एवं औद्योगिक विकास कार्पोरेशन (नीडको) एम.ई.एस. मायक्रो स्मॉल सूक्ष्म व. लघु मंत्रालय भारत सरकार यांच्या पश्चिम महाराष्ट्र क्लस्टर हेड म्हणून सावित्रीबाई फुले प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष एस.के. सिंग यांच्या हस्ते पत्र देण्यात आले. एम.एस.एम.ई. हे भारत सरकारतर्फे देशात बेरोजगार लघु माध्यम उद्योग उद्यम बाजारपेठ बचतगटांना व लघुउद्योगांना राष्ट्रीयीकृत बँकेच्यावतीने उद्योग सक्षम करते.

श्रीरामपूर भूषण पुरस्कार डॉ. बाबुराव उपाध्ये यांना प्रदान

सन्मान प्रेरणादायी : प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे



बेलापूर : श्रीरामपूर नगरपरिषदेतर्फे साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांना 'श्रीरामपूर भूषण पुरस्कार' देण्यात आला हा आम्हा सर्व साहित्यिकांना प्रेरणादायी असल्याचे मत बेलापूर येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रा. प्राचार्या डॉ. गुंफाताई कोकाटे यांनी व्यक्त केले.

बेलापूर येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमाच्या निमित्ताने सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार साहित्य अकादमी मुंबई अंतर्गत 'ग्रामोलोक' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी डॉ. बाबुराव उपाध्ये यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.

त्याप्रसंगी प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गणपतलाल मुथ्था उपस्थित होते. संस्थेचे सचिव ॲड. शरद सोमाणी, संचालक बापूसाहेब पुजारी, उद्घाटक साहित्य अकादमी सदस्या सुमतीताई लांडे, कविसंमेलनाचे प्रमुख पाहुणे सांगलीचे उपजिल्हाधिकारी गणेश मरकड, सौ. माधुरी मरकड, यशवंत पुलाटे, संगीता फासाटे हे उपस्थित होते. या निमंत्रित कवींबरोबरच प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे, डॉ. बाबुराव उपाध्ये, सूत्रसंचालक डॉ. अशोकराव माने यांनीही कविता सादर केल्या. प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे यांनी आपल्या स्वागत, परिचयातून डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या साहित्यसेवेचा विस्तृत परिचय देऊन श्रीरामपूर नगरपरिषदेने डॉ. उपाध्ये यांना दिलेल्या पुरस्काराबद्दल कौतुक केले.

साहित्यिकांनी साहित्यिकांची दखल घेतली पाहिजे. डॉ. उपाध्ये यांचे नगर जिल्ह्याच्या साहित्यसेवेत मोठे योगदान आहे, म्हणून आम्हाला त्यांचा सन्मान सर्वांच्या उपस्थितीत करताना आनंद वाटतो अशा भावना व्यक्त केल्या. उपस्थित मान्यवरांनी डॉ. उपाध्ये यांचे अभिनंदन व कौतुक केले. मान्यवरांची भाषणे झाली. डॉ. उपाध्ये आपल्या मनोगतात म्हणाले, महाविद्यालयाने आपला केलेला हा सन्मान माझ्या साहित्यवाटेवर नेहमी प्रेरक ठरणारा आहे, प्राचार्या डॉ. गुंफाताई कोकाटे यांची गुणग्राहकता आणि साहित्यजिव्हाळा सदैव स्फुर्तीप्रद असल्याचा आनंद व्यक्त केला. डॉ. उपाध्ये यांना ग्रंथालयास पुस्तके भेट दिली. ॲड. शरद सोमाणी यांनी मनोगत व्यक्त करुन डॉ. उपाध्ये यांचे कौतुक केले. प्रा. डॉ. अशोकराव माने यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. निजाम शेख यांनी समीक्षात्मक आभार मानले.

***

पती निधनानंतर सौभाग्यलेणी हिरावून घेण्याची अनिष्ठा प्रथा? बंद करा!!! – सौ. रसिका खेडकर

मी एका अत्यंत महत्त्वाच्या आणि महिलांच्या स्वतंत्र्यावर गदा आणणाऱ्या अनिष्ट प्रथेवर आपले लक्ष वेधू इच्छित आहे. ही प्रथा म्हणजे, पतीच्या निधनानंतर अंत्यविधीच्या वेळी, मृताच्या पत्नीच्या सौभाग्याचे लेणे असलेले तिच्या कपाळावरील कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढणे ही होय. महाराष्ट्रात ही प्रथा आजही अस्तित्त्वात आहे. पतीला अग्नी दिला जात असताना, स्त्रीची सौभाग्याची ही आभूषणे काढून घेतली जात असताना, त्या स्त्रीच्या मनाला किती वेदना होत असतील याचा आपण विचार करावा असा प्रसंग कोणत्याही महिलेवर येणे ही तिच्यासाठी अत्यंत वेदनादायी घटना आहे. त्यात जर ती महिला तरुण असेल तर तिच्यावर दु:खाचा डोंगरच कोसळतो. या रुढी तिचा व तिच्या आई वडिलांचा जीवच काढत असतील. पतीच्या निधनानंतर विधवा महिला, विद्रूप दिसावी तिच्याकडे कोणी वाईट नजरेने पाहू नये, असा कदाचित त्याकाळी या प्रथेमागे हेतू असावा. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. महिला मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित झाल्या आहेत. अंधश्रद्धा कमी होऊन समाज विज्ञानवादी होत आहे, त्यामुळे अशा अनिष्ट प्रथा बदलल्या पाहिजेत. असे काही करण्याने, समाज अशा महिलांकडे वाईट नजरेने पहात नाही असे म्हणता येणार नाही. विधवा महिलांना त्यांच्या उर्वरित आयुष्यात अशा गोष्टींमुळे खूप त्रास सहन करावा लागतो. अशा महिलांना साध्या हळदी कुंकवाच्या, देवधर्माच्या वा कोणत्याही शुभ कार्यात बोलावले जात नाही. उलट त्यांना अशा कार्यक्रमात डावललेच जाते.

महिला विधवा झाली असे म्हणून तिला समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाद केले जाते, हे अन्यायकारक आहे. अशा प्रथा थोड्याफार फरकाने इतर राज्यातही असतील. मात्र, अशी ही अनिष्ट प्रथा, पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी नाही. त्यामुळे ही प्रथा बंद करण्यासाठी पुरोगामी विचाराच्या सर्व महिला पुरुषांनी चळवळ उभी करुन, या प्रथेविरुद्ध समाज प्रबोधन करण्याची व शासनास ही प्रथा बंद करण्यासाठी कायदा करण्यास लावण्याची गरज आहे. अशा प्रथांमुळे महाराष्ट्राच्या एकूण जनतेपैकी अर्धी जनता बाधित होत आहे हे विचारात घेतले पाहिजे. त्यामुळे या संदर्भात महाराष्ट्रातील सर्व महिला, पुरुष, प्राध्यापक, शिक्षक, वकील, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, सामाजिक संस्था, संघटना तसेच ज्यांना ज्यांना ही प्रथा अनिष्ट व अन्यायकारक वाटते, अशा सर्वांनी या कामात पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यामुळे जास्तीत जास्त समविचारी महिला व पुरुषांनी ही प्रथा बंद व्हावी याबाबत गांभीर्याने विचार करावा असे वाटते.

तरी या विषयाबाबत आपणांस काय वाटते याबाबत आपल्या लेखी प्रतिक्रिया माझ्या खालील व्हॉट्सॲप वर कळवाव्यात ही विनंती. प्रतिक्रिया कळविताना आपण आपले पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल व व्हॉट्सॲप क्रमांक आदी माहिती पाठवावी, जेणे करुन आपणांस या विषयावर ऑनलाईन किंवा ऑफलाईन चर्चा सत्र आयोजित करण्यास मदत होईल. सर्वांनी हा मेसेज महाराष्ट्रातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत पाठवावा ही विनंती. हे लिहिताना कोणी दुखावले जावे हा माझा हेतू नाही, तर महिला विरोधी ही एक अनिष्ट प्रथा बंद व्हावी हा यामागचा हेतू आहे हे कृपया सर्वांनी लक्षात घ्यावे ही विनंती.

– सौ. रसिका राकेश खेडेकर (महिला प्रदेशाध्यक्ष)
कुं.स.सामा.संस्था महाराष्ट्र प्रदेश. मो.:८१४९६४६५४६

वधु-वर व पालकांना खुशखबर ! - आता कुंभश्री वेबसाईट मोबाईल द्वारे वापरु शकणार.

सन १९९४ पासून कुंभश्री समाज प्रबोधनाचे कार्य अथकपणे करत आहे. कुंभश्री वधु-वर मंडळाद्वारे ६००० पेक्षा जास्त विवाह जमविण्याचे महान कार्य पार पडले आहे. वधु-वर मंडळामध्ये वेळोवेळी काळानुसार बदल करुन समाजाभिमुख रुप देण्यात आले.

कॉम्प्युटर युगामध्ये आपण **कुंभश्रीची वेबसाईट kumbhashree.com** ही समाजार्पण केली. वेबसाईट मुळे वधु-वर संशोधनाची प्रक्रिया गतीमान झाली. वधु-वर व पालकांना कुंभश्री कार्यालयात येण्याजाण्याचा प्रवास खर्च, श्रम आणि बहुमुल्य वेळ याची बचत झाली. पुढे आणखी दोन वेळा वेबसाईटचे काळानुसार अत्याधुनिकरण करण्यात आले.

सध्या मोबाईल युग सुरु आहे. प्रत्येकाच्या हाती मोबाईल आहे. आजच्या गरजेनुसार मोबाईल वरुन वेबसाईट चांगल्या रितीने वापरता यावी म्हणून एप्रिल २०२० मध्ये penta web dynamics कंपनीचे संचालक पंकज करांडे, सौ. सुरभी प्रकाश राजे, इंजी. प्रकाश संजय राजे व संपादक संजय राजे यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत कुंभश्री वेबसाईट मोबाईल फ्रेंडली कशी करावी याची रुपरेषा ठरवण्यात आली. लॉकडाऊनच्या काळात अनेक वेळा अनेक बदल करुन चांगल्याप्रकारे वेबसाईटचे अत्याधुनिकीकरण करण्यात आले. आता आपण सर्वजण मोबाईल वरुन वधु-वरांचा फार्म भरु शकता तसेच अकाऊंट ॲक्टिव्हेट झाल्यानंतर वधु-वरांचे बायोडेटा मोबाईल वरच पहाता येतील याचा लाभ सर्वांनी घ्यावा अशी नम्र विनंती.

http://kumbhashree.com

संजय राजे - संपादक कुंभश्री.

अमित कुंभार यांची उपसरपंच पदी निवड



पवन नगर : रविवार दि. ४ जुलै २०२१ रोजी मा. अमित चंद्रकांत कुंभार युवा अध्यक्ष पुणे जिल्हा कुंभार समाज, यांची उपसरपंच पदी काले पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे यांची उपसरपंच पदी अतिशय चुरशीच्या निवडीमध्ये समाज्यामधील जोडलेल नातं व सर्व सामाजिक, राजकीय, शासकीय, स्तरावरील संबंध या सर्व बाबींचा मेळ लावून यशाच्या शिखरापर्यंत जाणं शक्य झालं. (जो आपला तो आपलाच, जो नाही तोही आपलाच) अशा पद्धतीने आमचे युवा अध्यक्ष मा. अमित चंद्रकांत कुंभार यांनी सर्वांची मने जिंकून उपसरपंच पदाची धुरा सांभाळण्याचा मान त्यांना मिळाला. निवड झाल्याबद्दल व नुकताच वाढदिवस झाल्याबद्दल अमित दादा व सौ. माधुरी ताई यांचा सपत्नीक सत्कार करताना तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते. तालुका अध्यक्ष चंद्रकांत नामदेव कुंभार, माऊली दशरथ वाघ (उपाध्यक्ष पुणे जिल्हा कुंभार समाज), सुरेश गणपत कुंभार (सचिव पुणे जिल्हा कुंभार समाज), महिला अध्यक्ष शुभांगी दरेकर, सरचिटणीस समीर दामोधर गायकवाड, कार्याध्यक्ष शिवाजी सगाजी कुंभार, कोषाध्यक्ष संतोष काळे, मा. प्रथम अध्यक्ष बबन दादा जामदार. महाराष्ट्र शासन डोंगरी विभाग विकास समितीच्या पुणे जिल्हास्तरीय सदस्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल शुभांगी दरेकर यांचाही सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. मावळ तालुका कुंभार समाज सामाजिक संस्था वतीने पुढील राजकीय कार्यास मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या.

योगेशजी टिळेकर यांच्या अध्यक्षतेखाली व संजय गाते यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्च्याची बैठक संपन्न





पुणे : भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्च्याची प्रदेश पदाधिकारी यांची बैठक ओबीसी मोर्च्याचे प्रदेश अध्यक्ष मा. योगेशजी टिळेकर यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल सदानंद रीजेंसी, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झाली. बैठकीमध्ये झालेल्या सर्व आंदोलनाचा व संघटनात्मक कार्याचा विस्तृत आढावा घेवून आगामी संघटनात्मक व आंदोलनात्मक कार्यक्रमांचे नियोजन उपस्थित पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन करण्यात आले.

यावेळी बैठकीला ओबीसी मोर्चा प्रदेश सरचिटणीस संजयजी गाते, बापूजी घडामोडे, शंकरराव वाघ, प्रदेश महिला संपर्क प्रमुख श्रीमती वनिताताई लोंढे, युवक संपर्क प्रमुख निरंजनजी डहाळे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी ओबीसी मोर्च्याचे प्रदेश अध्यक्ष म्हणून १ वर्षाच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल मा. योगेशजी टिळेकर यांचा सर्व पदाधिकारी यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. बैठकीला मोठ्या संख्येत अपेक्षित प्रदेश उपाध्यक्ष, चिटणीस, विभागीय संपर्क प्रमुख सह पदाधिकारी उपस्थित होते.

***

उपनिबंधक डॉ. अशोक कुंभार यांचा सेवानिवृत्ती निमित्त भव्य सत्कार हस्ते मा.ना. सुभाष देशमुख



डॉ अशोकराव यांचा सपत्नीक सत्कार करताना डावीकडून महेशजी कुगांवकर पुणे डिजीटल मेडीया, डॉ. संजय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, बाळासाहेब निंबाळकर उद्योगपती (ठाणे), मा. दिपक (आबा) साळुंखे पाटील मा. आमदार विधानपरिषद (सांगोळा), सौ. अरुणा अशोक कुंभार, डॉ. अशोक कुंभार, मा. सुभाष (बापू) देशमुख (मा. मंत्री, सहकार प्रणन व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य), मा. गोविंदराव केंद्रेकर (मा. आमदार, बीड), डॉ. सिंकदर बागवान, मा. सहा. आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, दिनेशजी ओऊळकर, मा. एस.बी. पाटील, मा. उत्तमराव शिंदे सरकार (उद्योगपती, पुणे) व कुंभश्री संपादक संजय राजे.



डॉ. अशोकराव यांचा सपत्नीक सत्कार करताना डावीकडून सौ. उमा व सुनील कुंभार, डॉ. अशोकराव व सौ. अरुणा, सौ. वैशाली व विनील कुंभार आणि कुंभश्री संपादक संजय राजे

पुणे : दिनांक २४ जुलै रोजी सेंटर ऑफ पोलीस रिसर्चच्या वातानुकूलीत प्रशस्त हॉल मध्ये उपनिबंधक डॉ. अशोकराव कुंभार यांच्या निवृत्ती समारंभ दिमाखात पार पडला.

या सुंदर कार्यक्रमास अध्यक्षपदी मा.ना. सुभाष (बापू) देशमुख (माजी मंत्री सहकार पणन व वस्त्रोद्योग) होते. प्रमुख पाहूणे म्हणून माजी आमदार दिपक (आबा) साळूंखे पाटील (सांगोला), माजी आमदार गोविंदराव केंद्रेकर (बीड), माजी पोलिस आयुक्त चंद्रकांत कुंभार (आय.पी.एस.), पिंपरी चिंचवडचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे (आय.पी.एस.), उद्योजक बाळासो निंबाळकर (ठाणे), उद्योजक उत्तमराव शिंदे, माजी अप्पर आयुक्त एस.बी. पाटील, माजी सहआयुक्त पशुसंवर्धन सिकंदर बागवान, कुंभरी संपादक संजय राजे, आणि सत्कार मुर्ती डॉ. अशोकराव कुंभार व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अरुणा कुंभार इत्यादी मान्यवर व्यासपिठावर विराजमान होते. दिप प्रज्वलनानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.

व्यासपिठावरील सर्व उपस्थित मान्यवरांचे अशोकराव कुंभार यांच्या मित्रमंडळींच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तद्नंतर डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अशोकराव यांच्या मित्रमंडळीतर्फे त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त हा कार्यक्रम आयोजित केला आहे असे ते म्हणाले. पुढे त्यांनी डॉ. अशोक कुंभार यांच्या जीवनाविषयी संक्षीप्त माहिती सांगितली व त्यांचे नेतृत्व गुण यांचे विषयी सविस्तर माहिती सांगितली. त्यावेळी उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

नंतर डॉ. अशोकराव कुंभार यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक भव्य सत्कार मा. नामदार सुभाष (बापू) देशमुख यांच्या शुभहस्ते व सर्व मान्यवरांचे उपस्थितीमध्ये करण्यात आला. तद्नंतर उपस्थित मान्यवरांनी डॉ. अशोकराव यांच्या कर्तृवाविषयी अनेक गोष्टी सांगीतल्या व त्यांच्या भावी आयुष्यासाठी मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या.

डॉ. अशोक कुंभार यांनी आपल्या मनोगतामध्ये सर्व मित्रांचे वरीष्ठांचे, सहकाऱ्यांचे आणि सहकार मंत्र्यांचे आभार मानले. ते म्हणाले की, माझ्या वडीलांच्या पश्चात माझ्या काकांनी माझे शिक्षण केले म्हणून मी क्लास वन अधिकारी झालो. माझी पत्नी सौ. श्रद्धा हिने माझ्या करीअरसाठी तिच्या शिक्षकेच्या नोकरीचा राजीनामा दिला ही गोष्ट माझ्यासाठी खुप महत्वाची होती. या दोघांचेही खुपखुप धन्यवाद. आणि तुम्ही सर्व माझ्या प्रेमापोटी येथे आलात त्याबद्दल खुप खुप आभार असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणामध्ये माजी नामदार सुभाष (बापू) देशमुख यांनी डॉ. अशोकराव यांच्या कामाचे खुप कौतूक केले, निवडक कार्यक्षम अधिकाऱ्यांमध्ये डॉ. अशोकराव हे आघाडीचे अधिकारी होते असे ते

म्हणाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भाऊसाहेब कोकाटे यांनी उत्कृष्टरित्या केले. आभार प्रदर्शनानंतर उत्कृष्ट स्नेह भोजनाचे आयोजन केले होते.

डॉ. अशोकराव यांचा व्यक्तीपरीचय : डॉ. अशोकराव कुंभार यांचा जन्म दि. ७/१/१९६४ रोजी गौडवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे एकत्र कुटुंबात झाला. आई पार्वतीबाई गृहिणी आणि वडिल नामदेव दादू कुंभार प्राथमिक शिक्षक होते. वडीलांनी त्यांच्या चार भावांना पण चांगले शिक्षण दिले होते. अशोकराव यांच्या वयाच्या चौथ्यावर्षी त्यांचे पितृछत्र हरपले आणि त्यांच्या कुटूंबावर आभाळ कोसळले. एकत्र कुटूंब असल्याने चुलते महादेव, डॉ. प्रल्हाद, मुरलीधर आणि गोरखनाथ यांनी अशोकराव यांच्या पालनपोषणाची आणि शिक्षणाची जबाबदारी घेतली. अशोकराव यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेतून झाले. माध्यमिक शिक्षण विद्यामंदिर हायस्कूल सांगोला येथे झाले. उच्च माध्यमिक शिक्षण पंढरपूर कॉलेज, पंढरपूर येथून झाल्यानंतर त्यांना मराठवाडा कृषी विद्यापिठाच्या कॉलेज ऑफ व्हेटर्नरी अँड ॲनिमल सायन्स, परभणी येथून BVSC & AH ही पदवी प्राप्त केली. पुढे G.D.C. & A हा डिप्लोमा पूर्ण केला.

सन १९८७ साली पशुधन विकास अधिकारी म्हणून पंचायत समिती पंढरपूर येथे नोकरीला सुरुवात केली. पुढे चोकाक, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे पशुवैद्यकीय दवाखान्यात बदली झाली. सन १९९४ साली डॉ. अशोकराव एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. तद्नंतर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था या पदावर खंडाळा (सातारा), मोहोळ सांगोला, जत (सांगली), मोहोळ पंढरपूर या ठिकाणी त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला.

सन २००७ साली डॉ. अशोकराव यांना पदोन्नती मिळाली ते प्रादेशिक उपसंचालक वस्त्रोद्योग या विभागात रुजू झाले. सन २००९ साली वसई येथे उपनिबंधक सहकारी संस्था या पदावर बदली झाली, पुढे कांदीवली (मुंबई) येथे सन २०१२ ते २०१५ पर्यंत ते कार्यरत होते. या काळात कुंभार समाजाची चारकोप येथील कुंभार कला सोसायटीच्या संस्थेच्या कारभाराबाबत त्यांनी महत्वपूर्ण मदत केली. पुढे उपनिबंधक ठाणे शहर, डीडी आर, पुणे ग्रामिण आणि शेवटी उपनिबंधक सहकारी संस्था मुलूंड मुंबई येथून दि. ३१/१/२२ रोजी सेवानिवृत्त झाले. एकूण त्यांचा सेवाकाळ ३४ वर्षे ३ महीने होता. या काळामध्ये त्यांनी खुप कार्यक्षम अधिकारी म्हणून कार्य केले. डॉ. अशोकराव यांनी त्यांच्या कार्यकाळात कृषी शेतकरी कर्ज माफीचे कामकाज यशस्वीरीत्या वीना तक्रार पार पाडले. अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले. कोरोना काळात मार्केट कमिटी तर्फे जीवनावश्यक वस्तू पुरवठा कार्यक्षमपणे केला. त्यांची पत्नी सौ. अरुणा एम.ए.डी.एड. प्राथमिक शिक्षिका म्हणून सांगली येथे कार्यरत होत्या, परंतु नंतर त्यांनी डॉ. अशोकराव यांच्या करीअरसाठी राजीनामा दिला. मुलगा अक्षय बी.ई. कॉम्प्युटर सायन्स झाला असून एम.पी.एस.सी. परीक्षा देत आहे. मुलगी कु. सिमरन बी.एम.एस., एम.बी.ए. शिकली आहे. डॉ. अशोकराव यांना निवृत्ती नंतरचे आयुष्य आरोग्याचे, भरभराटीचे आणि आनंदाचे जावो अशी सद्गुरु चरणी प्रार्थना.

***

धुळे येथे कुंभार बांधवासाठी खादी ग्रामोद्योग व विकास संस्थेतर्फे मार्गदर्शन शिबीर संपन्न



संत गोरोबाकाका पुजन रंगनाथ सुर्यवंशी, पद्माकर शिरसाठ, राजेंद्र सवांदे मान्यवरांचे हस्ते संपंन्न

धुळे : अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था धुळे व खादी ग्रामउद्योग महामंडळ धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. २४/०८/२०२२ रोजी धुळे येथील जेष्ठ नागरिक भवन येथे संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार यांचा प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली, कुंभार समाजातील वीट व्यावसायिक, मुर्ती काम करणारे व इतर व्यवसाय करणारे कुंभार समाज बांधव व नवयुवक यांच्यासाठी मार्गदर्शन व नाव नोंदणी शिबिर आयोजीत करण्यात आले. सदर मार्गदर्शन कार्यशाळेसाठी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था महाराष्ट्र



राज्यातुन वरिष्ठ पदाधिकारी व खादी ग्रामोद्योगचे अधिकारी उपस्थित होते.

कोमल सिंग पाटील (खादी ग्रामोद्योग अधिकारी), रंगनाथजी सुर्यवंशी (प्रदेश कार्याध्यक्ष), राजेंद्र सावंदे (प्रदेश प्रवक्ता), ज्ञानेश्वर भागवत (प्रदेश संपर्क प्रमुख), योगेश हिवरकर (नाशिक विभागीय अध्यक्ष), दीपक खैरनार (उत्तर महाराष्ट्र युवक संपर्क प्रमुख), रमेश सोनवणे साहेब (सुभेदार माजी सैनिक नाशिक), कृष्णाची सोनवणे (नाशिक जिल्हा अध्यक्ष), किरण भाऊ शिकारे (नाशिक जिल्हा युवा अध्यक्ष), पद्माकर भाऊ शिरसाट (जळगाव जिल्हा अध्यक्ष), विशाल भाऊ कुंभार (प्रवक्ता

जळगाव जिल्हा) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेसाठी धुळे जिल्ह्यातील कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था धुळे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

यावेळी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचा वतीने खालील पदाधिकारी यांची धुळे तालुका व जिल्हा कार्यकारणीत नियुक्ती करण्यात आली आहे.

१) सखारामजी मंगला जाधव (रा. दाऊळ) (धुळे जिल्हाउपाध्यक्ष) २) विजय तुकाराम ठाणकर (रा. धुळे) (प्रवक्ता धुळे जिल्हा)३)ईश्वरजी मोरे (रा. निजामपूर) (धुळे जिल्हाखजिनदार) ४)रवींद्र गोविंदा मोरे (रा. अवधान) (धुळे जिल्हाविट व्यवसाय आघाडी अध्यक्ष) ५) राहुल अशोक चित्ते (रा. कुसुंबा) (धुळे जिल्हायुवक उपाध्यक्ष) ६) दिनेश कुंभार (रा. पिंपळनेर) (साक्री तालुका युवा अध्यक्ष) ७) भरत साहेबराव सोनवणे (रा. बोरकुंड) (धुळे तालुका अध्यक्ष)

***

डॉ. शार्दूल कमळे एम. बी. बी. एस. उत्तीर्ण



डॉ. शार्दूल विजय कमळे एम.बी.बी.एस. झाल्याबद्दल अभिनंदन करताना डावीकडून कुंभश्री संचालिका सौ. बीना संजय राजे, सौ. वनिता व नथुराम कमळे, संजय राजे, डॉ. शार्दूल, डॉ. विजय कमळे व डॉ. सौ. वृषाली कमळे.

पनवेल : डॉ. शार्दूल विजय कमळे एम. बी. बी. एस. झाल्याबद्दल अभिनंदन करताना संजय राजे समवेत डावीकडून कुंभश्री संचालिका सौ. बीना संजय राजे, सौ. वनिता व नथुराम कमळे, संजय राजे, डॉ. शार्दूल, डॉ. विजय कमळे व डॉ. वृषाली कमळे.

कमळे यांचे मूळ गाव पावस, जिल्हा रत्नागिरी असून, शार्दूल चे आई, वडील, काका डॉ. विनोद व काकी डॉ. रुचिता (नाशिक) डॉक्टर असून आत्या सौ.विद्या सांगवेकर या पनवेल येथील ज्युनिअर कॉलेजवर प्राध्यापक आहेत. त्यांचे पती किशोर नामदेव सांगवेकर सॉफ्टवेअर इंजिनियर आहेत. या कुटुंबाचा शैक्षणिक विकास नथुराम व सौ. वनिता कमळे यांच्या अथक परिश्रमाने झाला.

डॉ. शार्दूल व कमळे परिवाराचे समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवार यांच्या तर्फे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

धाराशिव येथे कुंभार व्यावसायिकांनाओळखपत्र वाटप संपन्न



ओळखपत्राचे वाटप करताना डावीकडून पांडुरंग कुंभार, गणेश माळी, महादेव खटावकर व मान्यवर

उस्मानाबाद तालुक्यातील कुंभार समाजातील कुंभार व्यावसायिकांना अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था जिल्हा उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाचे माती उत्खनन ओळखपत्र मिळविण्याकरता पाठपुरावा करण्यात आला. त्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले. दिनांक १९/०९/२०२२ रोजी उस्मानाबाद तालुक्याचे तहसीलदार गणेश माळी यांच्या हस्ते श्री संत गोरोबा काका यांचे प्रतिमेचे पूजन केले, त्यानंतर तहसीलदार गणेश माळी व महसूल अधिकारी प्रसाद साळुंखे यांचा समाजातर्फे सत्कार करण्यात आला, सत्कार समारंभानंतर तहसील कार्यालयाचे माती उत्खननासाठी लागणारे समाजाच्या हक्काचे ओळखपत्र वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी तहसीलदार साहेबांनी आपले मनोगत व्यक्त केले की कुंभार समाजातील कारागीर आतापर्यंत आमच्यापर्यंत आले नव्हते. ते म्हणाले की तुम्ही आमच्यापर्यंत या आम्ही तुम्हाला तुमचा जो हक्क आहे तो आम्ही देऊ, साहेबांनी सांगितले की शिंदेवाडी येथील वडार समाजास आम्ही तेथे जाऊन त्यांचे ओळखपत्र वाटप केले. तर समाजातील कारागिरांना सांगितले की समाजातील नवीन युवकांनी सुद्धा या व्यवसायात उतरावे व नवीन पद्धतीने बदलत्या काळानुसार व्यवसायात सुधारणा करा आणि शासकीय योजनेचा लाभ घ्या. आम्ही तुम्हाला कसली अडचण येऊ देणार नाही, महसूल अधिकारी प्रसाद साळुंके यांनी पण आपले मनोगत व मुलाचे मार्गदर्शन केले, नंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम पार पाडण्यासाठी जिल्हाध्यक्ष महादेवराव खटावकर व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते व सहकार्य केले. समाजातील समाज बांधव उपस्थित होते.

***



Ashok Prajapati
Mob.: +91 98198 29687

Mix 'n' Match

IMITATION | JEWELLERY
COSMETICS | BANGLES
WEDDING CLUTCH BRIDAL

Shop No. 6, Gagangiri, Sector - 17, Abhyudaya Bank Marg,
Vashi, Navi Mumbai - 400 703.
Contact : 022-2789 9974



दत्तकृपा कोल सप्लायर्स

इंपोर्टेड कोळसा व राख ठोक व किरकोळ भावात मिळेल

श्री दत्तकृपा वीट कारखाना

उत्तम प्रतीचे वीटा होलसेल भावात मिळतील.



सुहास उर्फ
सतिश चंद्रकांत कुंभार
मो. 9922234552

वीट कारखानदार व मुर्तीकार
सर्वांगसुंदर गणेशमूर्ती मिळतील.

चि. श्रीनिवास चंद्रकांत कुंभार
मो. 9822472552

निवास : मु.पो. ओझर्डे, ता. वाई, जि. सातारा.



श्री साईनाथ एंटरप्रायजेस



Expert Profile Cutters and
Dealers in Iron Goods.

किशोर गुडेकर
Mo. : 96650 65826
98226 45832

सौ. कांचन कि. गुडेकर
Mo. : 9766690922
8624067149

प्लॉट नं. २६, सेक्टर नं. ७, पी.सी.एन.टी.डी.ए., भोसरी, पुणे ४११ ०२६.
फोन : (०२०) ६५१११८६०, ६५११६७८०

CNC Profile Cutting Machine



प्रणव एन्टरप्रायझेस

प्रणव वॉटर सप्लायर्स

६५/७, निवृत्तीनगर, हडपसर, हांडेवाडी रोड,
हडपसर, पुणे ४११ ०२८.

ऑफिस

प्रोप्रा. सुधीर निवृत्ती कुंभार
१६५/क, माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८.
फोन नं. २६९९९२४२

श्री सिध्देश्वर दुध संकलन केंद्र



श्री सिध्देश्वर दुध डेअरी
शुध्द व नैसर्गिक कोणतीही प्रक्रिया न
केलेले पिशवी पॅक दुध मिळण्याचे एकमेव केंद्र

प्रोप्रा. दत्तात्रय कचेश्वर जोर्वेकर
मो. ९३२६०७३३०७

चेतन जोर्वेकर

नाशिक पुणा रोड, सह्याद्री शाळेसमोर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर



वीट कारखानदार



विनायक मच्छिंद्र मोरे
98811250995
सदस्य, कोपरगांव तालुका
कुंभार समाज संघटना

संतोष मच्छिंद्र मोरे
9922611107
मु. धामोरी, ता. कोपरगांव,
जि. अहमदनगर



वीट कारखानदार

बाळासाहेब तुकाराम उन्हाळे



मु. पो. धामोरी, ता. कोपरगांव,
जि. अहमदनगर.
मोबा. ९८७०९६७५५४

चि. राहुल बाळासो उन्हाळे
बी.ए., बी.एड.
Mo. 9011846861

प्रोप्रा. बाळासाहेब तुळशीराम गारे
मो. 9325877752





सौ. शोभा बा. गारे

चि. राकेश बा. गारे



9049889604
7558389148

संत शिरोमणी गोरोबाकाका वीट उत्पादक व वीट सप्लायर्स

आमचेकडे सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

मु.पो. चाटोरी, ता. निफाड, जि. नाशिक

अनिल शिर्के यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ संपन्न



अनिल शिर्के यांचा सत्कार करताना डावीकडून वसंत चंद्रु चव्हाण, संजय पांडुरंग राजे, सौ. अरुणा शिवाजी कुंभार, सौ. करुणा अनिल शिर्के, सत्कारमुर्ती अनिल निवृत्ती शिर्के, श्री मळाईदेवी संस्थेचे सचिव अशोकराव किसन थोरात, पांडुरंग गणपती पाटील (अध्यक्ष), भास्कर बाबुराव पाटील (उपाध्यक्ष), रमेश गणपती हिंगसे लिपिक व मान्यवर

मलकापूर : श्री मळाई देवी शिक्षण संस्थेचे ना.आ.च. विद्यालय व आदर्श ज्युनिअर कॉलेज मलकापूरचे उप. मुख्याध्यापक मा. शिर्के अनिल निवृत्ती हे आपल्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार नुकताच विद्यालयात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उपशिक्षणाधिकारी सातारा मा. श्रीकांत जगदाळे, प्रमुख पाहुणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मा. कु. मनीषा कुंभार व संस्थेचे सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे उपाध्यक्ष, शेतीमित्र मा. अशोकराव थोरात यांच्या हस्ते श्रीफळ, शाल, गणेश मूर्ती देऊन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी अध्यक्ष जगदाळे साहेब यांनी सत्कारमूर्ती विषयी बोलताना विद्यार्थी घडवणारे शिक्षक हेच खरे हाडाचे शिक्षक असतात तसेच शालेय जीवनातील संस्कार हे आपणास भावी जीवन यशस्वी होण्यासाठी उपयोगी ठरतात असे मत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे कु. मनिषा कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी व्यक्तीने आपल्या क्षेत्रावर प्रेम केले पाहिजे. ते कोणतेही असो, प्रत्येकाने विचाराने साक्षर बनले पाहिजे असे मत व्यक्त केले. सत्कारमूर्तींना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मा. अशोकराव थोरात यांनी विज्ञाननिष्ठ, कुटुंबवत्सल, विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेऊन योग्य प्रकारे मार्गदर्शन करणारे असे शिर्के सर त्यांचे विषयी गौरवोद्गार काढले. संस्थेच्या संचालिका डॉ. सौ. स्वाती थोरात यांनी सत्कारमूर्ती विषयी विज्ञान प्रेमी, कार्यतत्पर, दूरदृष्टी असणारे हसते-खेळते व्यक्तिमत्व म्हणजे शिर्के सर होय असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणारी संस्था, बौद्धिक, शारीरिक मानसिक विकास घडवणारे, सामाजिक विचार, संस्कार रुजवणारे जागृत संस्था म्हणजे श्री. मळाई देवी शिक्षण संस्था असे विचार उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

अजिंक्य माने त्याचबरोबर कार्यक्रमास उपस्थित अनेक वक्त्यांनी



मार्गदर्शन करताना उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार, डावीकडून श्रीकांत जगदाळे साहेब शिक्षणाधिकारी, अशोकराव थोरात, सदाशिव कुंभार आजीव सचिव स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व मान्यवर



शिर्के परिवारातर्फे सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

आपले विचार मांडले. याप्रसंगी विद्यालयाच्या शिक्षिका सौ. एच.एम. मुल्ला, आर. डी. पाटील, सौ. रश्मी कुंभार, ऋतुराज शिर्के, क्षितिजा शिर्के, अमेय शिर्के, स्नेहल शिर्के, आप्तेष्ट मित्र मंडळी, विद्यार्थी संयुक्ता शिंदे या सर्वांनी सत्कारमूर्ती विषयी आपले विचार व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती अनिल शिर्के आपल्या मनोगतात संस्थेविषयी ऋण व्यक्त करुन प्रदीर्घ सेवेत आलेले अनुभव, प्रसंग व्यक्त केले. तसेच यापुढेही संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पी. जी. पाटील, उपाध्यक्ष बी. बी. पाटील, संचालक वसंत चव्हाण, प्रा. संजय थोरात, अजित थोरात, संचालिका मा. डॉ. सौ. स्वाती थोरात, खजिनदार मा. तुळशीराम शिर्के, सौ. शालिनीताई थोरात, एस. टी. सुकरे, संजय शिर्के, सूर्यकांत शिर्के, मानसिंग लोखंडे, शंकरराव कुंभार, मानसिंग थोरावडे, माजी मुख्याध्यापक एस. वाय. गाडे, सत्कारमूर्तीचे सर्व नातेवाईक नांदलापुर गावचे मंडळी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक व सर्व स्टाफ, संस्थेतील शाखाधिकारी त्यांचे सहकारी, आदर्श कॉलेजच्या विभाग प्रमुख सौ. शीला पाटील, सर्व प्राध्यापक, आ. ब. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक ए. बी. थोरात, पर्यवेक्षक बी. जी. बुरुंगले, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी व परिसरातील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. ए. एस. कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन सौ. एस. ए. पाटील व सौ. एस. डी. खंडागळे यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार सौ. शीला पाटील यांनी मानले.

***

माझी सहधर्मचारिणी स्व. सौ. सुनिता सुर्यवंशी अनंतात विलीन



२८ एप्रिल हा दिवस माझ्यासाठी व कुटुंबियांसाठी अतिशय वाईट दिवस उजाडला. कारण या दिवशी आम्हा सर्वांना न सांगता सुनिता अर्थातच माझी धर्मपत्नी कायमची निघून गेली. खरं तर सुनिताची ही जाण्याची वेळ नव्हती. सुनिता ही सुर्यवंशी परिवाराची भाग्यलक्ष्मी होती. मी पोलीस खात्यात १९७३ ला भरती झालो व १९७६ मध्ये माझे लग्न सुनिताशी आमच्या मुळगावी बहाळ येथे झाले. सुनिताचे माहेर फागणे येथील. ती जगदाळे परिवारातील. तिचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. सुनिताला पाच भाऊ व पाच भावांची ती एकच लाडकी बहिण, काळाच्या ओघात तिचे सर्व भाऊ अकस्मात वारले व त्यांच्या सोबत तीन भावांचे मुले देखील वारले, त्यामुळे सुनिताच्या मनावर मोठा आघात झाला. हा आघात सहन करण्यासारखा नव्हता तरी देखील सुनिताने स्वत:ला सावरले.

मला नोकरीत २६५ रु. पगार होता. त्यातील १०० रुपये मी आई–वडिलांना पाठवीत असे. उरलेल्या १६५ रुपयात सुनिता काटकसरीने संसार चालवायची. तिने कधीच कुणाकडे मदतीचा हात पसरवला नाही. आहे त्यात समाधान मानले. नंतरच्या काळात मला विजय, प्रशांत व जयश्री अशी तीन अपत्ये झाली. या तिनही मुलांवर सुनिताने अतिशय छान संस्कार करुन त्यांना घडविले, व त्यांना सुसंस्कारीत करुन मानवतावादाची शिकवण दिली. त्यांना कशाचीही उणीव भासू दिली नाही, सुनिताने सर्व घर गोकुळासारखे ठेवले होते, त्यानंतर माझे भाऊ–बहिण नोकरीनिमित्त मुंबई येथे आले, त्यांना देखील सुनिताने सांभाळून घेतले. सर्वांना प्रेमाची माया दिली. कुणालाच प्रेमाची उणीव भासू दिली नाही. सुनिताचा त्याग संघर्षपूर्ण ठरला आहे. सुनिता ही अध्यात्माची निस्सीम भक्त, तिचा तिच्या भक्तीवर प्रचंड विश्वास होता. त्यातल्या त्यात ती समर्थांची दास असल्यामुळे ती समर्थ बैठकीला जात होती. नोकरीच्या निमित्ताने माझे कायम बाहेरगावी जाणे असायचे. माझी ड्युटी २४ तास व १२ महिने असल्यामुळे सुनितानेच आई व वडिलांची भूमिका समर्थपणे पार पाडली. मुंबईसारख्या महानगरात मुलं घडविणे ही सोपी गोष्ट नाही, परंतु तिने सर्व गोष्टी सहज केल्या.

राग हा तिच्या शब्दकोषात नव्हताच. आम्ही ठाण्यात जेव्हा राहयला आलो, तेव्हा आमचे कुणीच नव्हते त्या काळात माझी मानलेली मोठी बहिण पूजाताई देवराम पाटील, तीचे माहेर बोरखेडा येथील असल्यामुळे त्यांचे व आमचे संबंध वाढले या बहिणीने आम्हाला भरीव अशी मदत केली, तिचे अनंत उपकार मी कधीच विसरणार नाही, व तिचे उपकार माझ्याकडून कधीच फिटणार नाहीत. तिने आमच्या मुलामुलींच्या डिलेव्हरी काळात देखील घरच्याप्रमाणे काळजी घेतली. खरं तर पूजाताई आमच्या कुटुंबाचा एक भागच होऊन बसली आहे. माझा लहान भाऊ रघुनाथ सुपडू सुर्यवंशी पोलीस खात्यात एक नंबरने पास झाला, परंतु त्याचे लीस्टमध्ये नाव आले नाही. तेव्हा माझ्या सुनिताने त्या भावाला टेलरींग कोर्स करायला लावला. त्याचे इथेही मन लागेना, नंतर सुनिताच्या भावाने धुळे येथे माझ्या लहानभावाचे काम एम.एस.ई. बोर्डामध्ये करुन दिले. धन्य ती सुनिता, तिला मी कधीच विसरु शकत नाही.

सर्वकाही सुरळीत असतांना २३/१२/२०१७ रोजी सुनिता गार्डनमध्ये फिरायला गेली, तेथे टाईल्सवर मोसंबीचे साल पडले होते. त्या सालीवरुन सुनिताचा पाय घसरला, आम्ही तिला दवाखान्यात नेले, तेथे फोटो काढला, उपचार केले, तेव्हा सुनिताचा पाय फॅक्चर होता, तर सुनिताच्या दोन्ही किडन्या फेल झाल्या असल्याचे डॉक्टरांनी सांगितले, तेव्हा आमच्या सर्वांच्या पायाखालची वाळू सरकली, काय करावे आम्हाला सुचतच नव्हते, तेव्हा मी सुनिताला म्हणालो, मी तुला किडनी डोनेट करेल, हे ऐकल्यावर सुनिता म्हणाली, आता माझं काय उरलं आहे. मी पूर्णपणे समाधानी आहे. माझे आयुष्य सार्थकी लागले आहे. परंतु मी तिला पुन्हा समजावले, आम्ही पुन्हा डॉक्टरांकडे गेलो, तेथे माझी किडनी मॅच झाली. आम्हा सर्वांना आनंद झाला. हॉस्पिटलमध्ये रुटीन चेकअप सुरु झाले. किडनी डोनेट केली, तेव्हा माझ्यासह धर्मचारिणीची सेवा माझी दोन्ही मुलं, तसेच परदेशातील माझी मुलगी नातेवाईकांनी व शेजारच्या पाजारच्यांनी पूर्णपणे केली.

अशातच आमच्या कुटुंबाला आमचे राहते घर अपूर्ण पडू लागले, सर्वांना प्रायव्हसी देता येत नव्हती, तेव्हा सुनिताने धाडसी निर्णय घेतला व मुलांना सांगितले की, तुम्हाला स्वतंत्र घर देऊन, स्वतंत्रता बहाल करायची आहे. त्यावेळी मुले, सुना नातवंडे मी स्वत: रडू लागलो. व आश्चर्यचकित झालो, कारण या घरात जवळपास १० जणांचे कुटुंब व्यवस्थितरित्या राहत होते. लहान मुलगा प्रशांत याला घराजवळ सुनिताने एक ब्लॉक घेऊन दिला. २/४/२०२२ रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी गृहप्रवेश करुन त्याने सर्वांना पुरणपोळीचे जेवण दिले. आम्ही प्रशांतकडे जवळपास ८ ते १० दिवस राहिलो.

दिनांक २८/४/२०२२ ला सुनिताची तब्येत अचानक बिघडली, तिचा बी.पी. लो झाला, आम्ही तिला हॉस्पिटलला ॲडमिट केले. परंतु सायंकाळी तिने सर्वांचा निरोप घेऊन ती अनंतात विलीन झाली. विशेष म्हणजे तिने शेवटच्या काही तासात सर्वांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व सुहास्य वंदन केले व ती गेली, सुनिता गेल्यामुळे मी माझे सर्वस्व गमावून बसलो आहे. ४६ वर्षांचा हा प्रवास एका क्षणात संपेल असे कधीच मला वाटले नव्हते.

सुनिताने धनयोगापेक्षा जनयोग चांगल्या प्रकारे जोपासला होता. कुटुंबप्रमुख म्हणून तिने आपली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडली होती. मला माझ्या नोकरीत व संसारात सुनिताने मोलाची साथ दिली. त्यामुळेच मी माझी नोकरी व कुटुंब चांगल्याप्रकारे सांभाळू शकलो. स्नान–तनाला, ध्यान–मनाला, दान–धनाला, योगी–जीवनाला, प्रार्थना– आत्म्याला व व्रत–स्वास्थ्याला या सर्व गुणांची खाण सुनिताकडे होती. ती मला नेहमी म्हणायची मी माझ्या गरजा आवरत्या घेतल्या. आनंद आपल्या घरात आला. मी माझा राग आवरता घेतला. शांतता आपल्या घरात परत आली, मी नि:स्वार्थ कार्य केलं. मला समाधानाचं धन मिळालं. मी एखाद्याच्या मदतीसाठी हात पुढे केला. दु:ख माझ्यापासून हजारो मैल दूर गेलं. सुनिताने नेहमीच दुभंगलेली मने व विस्कटलेली नाते जोडली. साने गुरुजींच्या सेवा–त्याग–करुणा यासारख्या नितिमूल्यांवर आधारीत जीवनाचा मार्ग सुनिताने अंगीकारला होता. सुनिताने माणुसकीच्या नात्यातून अनेक नाती जपली व टिकवीली सुद्धा. स्वत:साठी माणूस जगतो, परंतु इतरांसाठी जगण्यात जो आनंद मिळतो त्याचे मूल्यांकन होऊच शकत नाही, असे उदात्त कोटीचे विचार सुनिताचे होते.

भल्याने परमार्थी भरावे, शरीर सार्थक करावे.
व पूर्वजा उद्धरावे, हरीभक्ती करुनी.

या समर्थांच्या बोधाप्रमाणे सुनिताचे जीवन सार्थकी लागले आहे. सफल झाले आहे. तिला भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. जय सद्गुरु...!

– भगवान सुपडू सुर्यवंशी (बहाळकर)
सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरिक्षक–मुंबई

***

मोहन जगदाळे यांच्या दातृत्वाला मानाचा मुजरा...

।। निश्चयाचा महामेरु अखंडस्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी ।।

-प्रकाश कुंभार, बारामती



नाशिक : महाराष्ट्र राज्य कुंभार विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनरावजी जगदाळे साहेब यांनी त्यांच्या वडिलांच्या ९१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून, आपली जन्मभूमी टाकेद खुर्द मधील वडिलोपार्जित जमीन गावच्या ग्रामपंचायत कार्यालयासाठी दान केली आणि एक नवा आदर्श समाजातील आणि समाजाच्या बाहेरील लोकांसाठी घालून दिला.

समाजाची सेवा करीत असताना देण्याची वृत्ती काय असते, ते या व्यक्तिमत्त्वाकडूनच शिकावं. टाकेद खुर्द गावातील स्मशानभूमीची झालेली जिर्णावस्था पाहून मोहनरावांच मन हेलावलं, जीवनाचे अस्तित्व जिथं संपणार आहे ती जागा कशी असावी, याचे संकेत गावातील प्रतिष्ठितांना समजावून सांगितल्यानंतर, मोहनरावांनी रोख १,००,००० (एक लाख) रुपये गावचे सरपंच, ग्रामसेवक आणि सदस्यांच्या हाती आज देणगी म्हणून सुपूर्त केले. त्यालाही निमित्त होतं वडिलांच्या ९१ व्या वाढदिवसाचच.

ज्या कुंभार समाजामध्ये आपण जन्माला आलो त्या समाजाच्या विकासाची अखंड धुरा तर मोहनरावांनी आपल्या खांद्यावर घेतलीच आणि संपूर्ण राज्यातील कुंभार समाजाच्या विकासाच चित्र बदलूनच टाकलं. पण ज्या गावात आपण जन्माला आलो, त्याही गावचे आपण देणं लागतो म्हणून जन्मभूमीच्या ऋणातुन थोडं उतराई व्हावं म्हणूनच मोहनरावांनी आपली पै–पै जमवलेली पुंजी गावच्या सत्कार्यासाठी दान केली.ना कोणत्या प्रसिद्धीची अपेक्षा, ना कोणता डामडौल, ना कोणती जाहिरात, ना कोणत्या पदाचा हव्यास. अशा या आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या पित्यास ९१ व्या वाढदिवसानिमित्त लाख लाख हार्दिक शुभेच्छा मा. एकनाथराव जगदाळे यांना सदैव आनंदी, निरोगी, दीर्घायुष्य लाभो ही कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे ईश्वरचरणी प्रार्थना अन् मोहनरावांच्या या दानशूर वृत्तीस आमचा मानाचा मुजरा.

***



' कुंभार ' : इतर मागास प्रवर्गातील अतिमागास जात.

शरदराव वाडेकर

१) सन २०२१ आणि सन २०२२ ही वर्षे 'इतर मागास प्रवर्ग (ओबीसी)'चे दृष्टीने ऐतिहासिक म्हणावीत इतकी महत्वाची आहेत. 'नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र)' म्हणूनही हा प्रवर्ग ओळखला जातो. ४ मार्च २०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठीचे २७% आरक्षण खारीज केलेचा न्यायनिर्णय निर्गमित केला आणि इतर मागास वर्ग (ओबीसी) हा प्रवर्ग चर्चेच्या केंद्रस्थानी आला. महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतीं मधील नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठीचे (इमाव) २७% आरक्षण या न्यायनिर्णयामुळे बाधित झाले आणि महाराष्ट्रातील अवघे राजकीय व सामाजिक क्षेत्र ढवळून निघाले. त्याचे पडसाद सन २०२२ मध्ये आपण अनुभवत आहोत. सन २०२१ मध्येच संसदेत १२७ वी घटनादुरुस्ती पारित होऊन एखाद्या जातीला इतर मागासवर्ग प्रवर्ग म्हणून घोषित करण्याचे घटनात्मक अधिकार पुन्हा राज्यांकडे सोपवले गेले.

२) जातनिहाय जनगणनेची शेवटची अधिकृत आकडेवारी १९३१ च्या जनगणनेची आहे आणि त्यानुसार सध्या इतर मागास प्रवर्गात असलेल्या जातींचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण निम्म्याहून थोडे अधिक असावे असे संकेत मिळतात. १९८० साली मंडल आयोगानेही याच १९३१ च्या जातनिहाय जनगणनेचा आधार घेतल्याचे दिसते. सन २०११ मध्ये केंद्र शासनाने देशात जातीचा उल्लेख करुन सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण केले. मात्र त्याची आकडेवारी अधिकृतपणे जाहीर केलेली नाही. दरम्यान इतर मागास प्रवर्गांतर्गत विविध जातींनी आजवर घेतलेल्या शैक्षणिक, नोकरीविषयक आणि राजकीय आरक्षणाच्या लाभांतदेखील प्रचंड असमानता असुन काही थोड्या जातींनी या आरक्षणाचा प्रमुख लाभ उठवला असुन इतर मागास प्रवर्गांतर्गत अतिमागास जातींचा वेगळा कप्पा करुन त्यांना इमाव अंतर्गत स्वतंत्र व जास्त आरक्षण कोटा उपलब्ध व्हावा अशी मागणी जोर धरु लागलेय. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर 'कुंभार' जातीच्या सद्यःस्थितीबाबत वस्तुनिष्ठ चिंतन होणे गरजेचे आहे आणि म्हणुनच हा लेखप्रपंच.

३) मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीचे सुरवातीच्या टप्प्यातील अश्मयुगाचे उत्तरार्धात भाजणे, शिजवणे आणि साठवणुकीसाठी मातीची भांडी तयार करुन ती वापरणेस सुरवात झाली. त्या कलेचा जनक असलेला मातीकला कारागीर म्हणजेच कुंभार होय. चाक हे औद्योगिक क्रांतीचे चिन्ह आहे असे आपण समजतो. मात्र चाकाची रचना प्राचीन काळी कुंभार कारागिरांनी सर्वप्रथम करुन त्याचा मातीच्या विविध वस्तु बनवणेसाठी वापरदेखील केला आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीनुसार कुंभार हे विश्वनिर्मात्या ब्रम्हदेवाचे वंशज मानले जातात, म्हणूनच कुंभारांना 'प्रजापती' म्हणूनही संबोधले जाते. रुग्वेदकाळापासूनच कुंभार अस्तित्वात असल्याचे दाखले आहेत.

४) हिंदू धर्मशास्त्रात कुंभाराने घडवलेल्या मृत्तिका कलशाला पूजेत अग्रस्थान दिलेले आहे. मात्र हिंदू चातुर्वर्ण समाजव्यवस्थेत कुंभारांचे वर्गीकरण बारा बलुतेदारांमध्ये शुद्र म्हणून केले गेले. तेथपासून कुंभारांचा सामाजिक दर्जा खालावला आहे.

५) माती, पाणी आणि इंधन जेथे उपलब्ध होईल तेथे जायचे आणि मातीच्या उत्पादनांची तेथे निर्मिती करुन परिसरात विक्री करायची आणि नंतर अशाच उत्पादनांची गरज असलेल्या नविन भागात माती, पाणी आणि इंधनाच्या उपलब्धतेनुसार स्थलांतरीत व्हायचे अशी भटक्या जमातीची प्रवृत्ती मुलत: या समाजात दिसून येते. नंतरच्या कालावधीत जेथे कुंभार धंद्यासाठी कच्चा माल आणि ग्राहकांची शाश्वतता जाणवली त्या ठिकाणी कुंभार समाजाचे कुटुंब काबीले स्थिरावल्याचे चित्र दिसते. त्यामुळे आजही ठिकठिकाणी कुंभारवाडे या स्वरुपात सर्वसाधारणपणे कुंभार समाजाची कुटुंबे एकवटलेल्या स्वरुपात रहिवास करताना दिसतात. त्यामुळे आपल्या लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदानावर सकारात्मक अथवा नकारात्मक प्रभाव टाकण्याची ताकद या समाजात आहे. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येत साधारणपणे तीन टक्केचे आसपास कुंभार समाजाची लोकसंख्या असावी असा अंदाज आहे.

६) कुंभारकाम, मुर्तीकाम आणि वीटकाम हे ढोबळमानाने कुंभार व्यवसायाचे तीन प्रांत म्हणता येतील. कुंभारकामात मातीपासून गाडगी, मडकी, माठ, रांजण, सुरई, खुजे, तव्या, खाप–या, तंदूर, झाकण्या, कढई, भानवल्या, पणत्या, कुंड्या, कौले, ढापे, चुली, शेगड्या इत्यादी वस्तू बनवल्या जातात. मुर्तीकामात गणपती, गौरी, हरितालीका, दुर्गामातेच्या व इतर मुर्ती बनवणे, नागपंचमीसाठी नाग, बैलपोळ्याचे बैल, दिवाळीत बनवल्या जाणाऱ्या किल्ल्यांसाठी मावळे, बाहुले इत्यादी मातीच्या वस्तु बनवल्या जातात. वीटकामात घर बांधकामासाठी लागणाऱ्या विटा बनवल्या जातात. त्यामुळे कुंभार समाजात उपजतच उत्कृष्ट मातीकला कारागिरांचे प्रमाण मोठे आहे.

७) कुंभार समाजाचे मातीकला व्यवसाय हे उदरनिर्वाहाचे पारंपारिक साधन राहिले आहे. पावसाळ्याच्या कालावधीत हा व्यवसाय जवळपास बंदच रहात असल्याने सहा महिने व्यवसाय करायचा आणि वर्षभर काटकसरीने उदरनिर्वाह चालवायचा अशी गरिबीची स्थिती कुंभार समाज पूर्वापार अनुभवत आलाय. त्यातच खालील घडामोडींमुळे कुंभार व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होऊन त्याचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे कुंभार समाजातील गरिबी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

७.१) तांबे, पितळ, स्टेनलेस स्टील, अल्युमिनीअम, प्लास्टीक यांचा भांडी बनवणेसाठी वापर सुरु झाल्याने मातीच्या भांड्यांची मागणी प्रचंड प्रमाणात घटली.

७.२) शीतकपाट (रेफ्रीजरेटर) आल्यापासून थंड पाण्यासाठी मातीच्या माठांची मागणी लक्षणीय प्रमाणात घटली.

७.३) इमारत बांधकामातील नविन तंत्रात सिमेंट कॉंक्रीट ब्लॉक्स, आरसीसी भिंती, जिप्सम बोर्डस्, खाणीतील चीरे अशा नवनविन पर्यायांचा वापर सुरु झाल्याने इमारत बांधकामासाठीची विटांची मागणी झपाट्याने कमी होत आहे असे सध्याचे चित्र आहे. पत्रे आणि आरसीसी स्लब्समुळे छपरासाठीची मातीची कौले आणि ढापे यांची मागणी प्रचंड प्रमाणात कमी होऊन जवळपास नगण्य झाली आहे.

७.४) केरोसीन आणि नंतर एलपीजी गसचा स्वयंपाकासाठी वापर मोठ्या प्रमाणात सुरु झाल्याने मातीच्या चुलींची मागणी खुपच खालावली आहे.

७.५) माती म्हणजे कुंभाराचा कच्चा माल. जागा जमिनींचे भाव प्रचंड प्रमाणात वाढल्याने माती मिळणे अवघड व खर्चिक झाले आहे. पूर्वी जवळपास मिळणारी माती आता दूरवरुन आणावी लागते, त्यामुळे मातीवरील वाहतूक खर्चदेखील खुपच वाढला आहे.

७.६) माती कमावण्यासाठी त्यात निर्माण करावयाच्या वस्तुंनुसार राख, तुस, घोड्याची लीद, शेण इत्यादी घटक मिसळावे लागतात. त्यांची उपलब्धतादेखील कमी आणि खर्चिक झाली आहे.

७.७) कुंभारकाम व वीटकामात वस्तु पक्की बनवण्यासाठी भाजणेची प्रक्रिया अपरिहार्य आहे. मात्र ज्वलनासाठीचे लाकूड, कोळसा, तूस यांसारखे इंधन पूर्वीसारखे सहजगत्या उपलब्ध होत नाही आणि प्रचंड महागदेखील झाले आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळ, हरित लवाद यांची प्रदुषणविषयक अनेक बंधने या धंद्यासाठी अतिशय जाचक ठरली आहेत.

७.८) माती उत्खननाबद्दल महसुल यंत्रणा तर भाजण्याच्या प्रक्रियेबद्दल प्रदुषण नियंत्रण मंडळ/हरित लवाद यांच्या कारवाईची टांगती तलवार अशा तणावपूर्ण वातावरणात सर्वसामान्य कुंभार व्यावसायिकाला धंदा करावा लागतो. यामुळे या धंद्यातुन मिळणारे उत्पन्न व नफ्याचे प्रमाण खुपच कमी झाले आहे.

७.९) मुर्तीकामात प्लास्टर आफ परीसचा वापर सुरु झाल्यापासुन चांगल्या कलाकाराकडून मास्टर साचा बनवून घेऊन कोणीही ऐरागैरा मुर्ती छापू लागला. त्यातच मुर्तीकलेसाठीची माती आणि रंग यांचेही भाव सतत वाढत गेल्याने मुर्तीकला ही कलेऐवजी भांडवली व्यवसाय झाली आणि मुर्तीकलेतील जातीवंत कलाकारांच्या काही पिढ्या भांडवलाअभावी त्यातून बाद झाल्या. पूर्वी मुर्तीचे कारखानदार असलेले कुंभार समाजाचे अनेक कलाकार अल्प रोजगारावर भांडवलदारांकडे नोकर म्हणून राबू लागले. त्यातच प्लास्टर ऑफ परीस की शाडूची माती हा वाद न्यायालयात गेल्याने आणि न्यायालयीन निर्णयानंतरही विविध स्तरांवरील अंमलबजावणीत एकसूत्रता नसल्याने कुंभार समाजातील मुर्तीकारांना आर्थिक नुकसानीबरोबरच प्रचंड मानसिक तणावाचादेखील सामना करावा लागला आहे.

७.१०) महाराष्ट्रात मातीकलेत आधुनिक तंत्रद्न्यानाचा वापर करणेबाबत वेळीच कार्य न झाल्याने गुजरातसारख्या अन्य राज्यातुन महाराष्ट्राच्या मोठ्या शहरांत मोठ्या प्रमाणात मातीचा तयार माल विक्रीसाठी येत असल्याने इथल्या स्थानिक कुंभार व्यावसायिकांच्या धंद्यावर विपरीत परिणाम झाला आहे.

८) मात्र अलिकडे चांगल्या आरोग्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापर करणेबाबतची जागरुकता हळूहळू का होईना पण वाढताना दिसतेय हा जनमानसाचा कल कुंभार समाजासाठी आशादायक आणि दिलासादायक आहे. मात्र कुंभार व्यवसायात लक्षणीय वाढ होणे इतका त्याचा प्रभाव अद्याप वाढलेला नाही. मातीच्या भांड्यात बनवलेल्या अन्नात मातीतील खनिजे व मायक्रोन्युट्रीअंटस् मिसळल्याने ते अधिक पोषक बनते, मातीच्या भांड्यांत अन्न शिजवताना त्याचे विघटन अल्प प्रमाणात झाल्याने त्यातील पोषक तत्वांचे संरक्षण होते. या बाबी विविध शासकीय, निमशासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्थांमार्फत जनतेपर्यंत पोहोचवल्यास आणि शास्त्रशुध्द पध्दतीने मातीच्या भांड्यांच्या निर्मितीसाठी संशोधन करुन तंत्र विकसित केल्यास मातीच्या भांड्यांची मागणी लक्षणीय प्रमाणात वाढणेची शक्यता आहे.

९) महाराष्ट्र शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या महाराष्ट्रातील जातींच्या वर्गवारीत कुंभार समाज सध्या 'इतर मागासवर्ग संवर्गात (Other Backward Class)' समाविष्ट आहे. मात्र रोहिणी आयोगाचे अहवालानंतर इतर मागासवर्ग प्रवर्गांतर्गत नविन उपप्रवर्ग तयार करण्याचा विचार झाल्यास खालील वस्तुनिष्ठ बाबी विचारात घेऊन कुंभार समाजाचा समावेश 'इतर मागासवर्ग (अतिमागास)' वर्गवारीत होणे आवश्यक आहे.

९.१) मुळातच कुंभार व्यवसाय पावसाळ्यात ठप्प असल्याने वर्षातील सहा महिनेच करावयाचा व्यवसाय आहे. तसेच वर परिच्छेद ७ मध्ये विस्ताराने नमुद केल्याप्रमाणे कुंभार व्यवसायाचा ऱ्हास झाल्याने कुंभार समाजातील गरिबी व बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. कुंभार कुटुंबांचे दरडोई सरासरी उत्पन्न त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्या इतकेदेखील पुरेसे नाही. मात्र कुंभार समाजात मातीकला कारागिरांचे प्रमाण मोठे असल्याने शासनाकडून सवलती मिळाल्यास स्वयंरोजगाराला मोठा वाव आहे.

९.२) कुंभार समाजात शेतजमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अपवादात्मक म्हणावे इतके अल्प आहे. त्यामुळे कुंभार व्यवसायात उपजिवीकेसाठी पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने अनेक कुंभार कुटुंबे शेतमजुर म्हणून राबतात.

९.३) कुटुंबाची आर्थिक स्थिती गरिबीची असल्याने उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कुंभार समाजात अतिशय अल्प आहे.

९.४) शासकीय, निमशासकीय यंत्रणांत कुंभार समाजातील नोकरदारांचे प्रमाण अपवादात्मक म्हणावे इतके नगण्य आहे आणि दिवसेंदिवस अधिकच खालावत आहे. खाजगी नोकऱ्यांबाबतही अशीच शोचनीय स्थिती आहे.

९.५) कुंभारवाडे स्वरुपातील एकवटलेल्या रहिवास पध्दतीमुळे लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदानावर सकारात्मक अथवा नकारात्मक प्रभाव टाकण्याची क्षमता कुंभार समाजात असली तरी संसद, राज्य विधीमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था यांवर निवडून आलेल्या कुंभार समाज सदस्यांची व पदाधिकाऱ्यांची संख्या अपवादात्मक म्हणावी इतकी नगण्य आहे.

१०) वरील सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणून महाराष्ट्रातील कुंभार समाजाची सद्यस्थिती 'आर्थिकदृष्ट्या, व्यावसायिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, राजकीयदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्यादेखील अतिशय मागासलेला समाज' अशी असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कुंभार समाज 'इतर मागासवर्ग (अतिमागास)' वर्गवारीत समावेश होणेस सर्व दृष्टीने पात्र असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

***

क्रांतीवीर देशभक्त - रंगराव कुंभार आण्णा



सातारा जिल्ह्यात अनेक पराक्रमी वीर होऊन गेले. त्यांचे देह गेले असले तरी त्यांचा वीरबाणा आजही जिल्ह्यात वावरत आहे. एकोणीसशे बेचाळीसच्या भारतीय क्रांतीत कराड तालुक्यातील इंदोली हे संपूर्ण गावच सहभागी झाले होते. १९४२ च्या या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या इंदोली येथील कुंभार समाजातील कार्यकर्त्यांची अशीच एक अलौकिक यशोगाथा.

इंदोली ता. कराड, जि. सातारा येथील आबा अमृता कुंभार व पत्नी चंद्राबाई यांना दि. १०/७/१९०६ रोजी पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव रंगराव ठेवण्यात आले. रंगराव लहान असतानाच वडील अमृता यांचे निधन झाले. त्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी चंद्राबाईवर येऊन पडली. त्यावेळी रंगराव इंदोली शाळेतील इन्फंट (पहिली) वर्गात १९२० साली शिकत होते. वडिलांच्या जाण्याने शाळेला जाणे बंद झाले. आईला गाडगी, मडकी, चुली करण्यासाठी ते मदत करु लागले. दिवसामागून दिवस जात होते. चंद्राबाईने मंद्रुळ कोळे खुर्द (ढेबेवाडी), ता. पाटण येथील तुकाराम कुंभार यांची मुलगी पाहून रंगरावचे लग्न केले. तीचे नाव होते भागिर्थीबाई.

गावात सर्व समाजातील त्यांचे मित्र होते. त्यामुळे व्यवसायाबरोबरच त्यांची विचारांची देवाण-घेवाण होत असे. त्यातूनच सामाजिक समतेचे विचार त्यांच्यात रुजले. ते १९३५ साली चार आणे भरुन राष्ट्रीय काँग्रेसचे सभासद झाले. स्वराज्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव करावा. याबाबत कराची येथे भरुन राष्ट्रीय काँग्रेसचे सभासद झाले. स्वराज्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव करावा. याबाबत कराची येथे झालेल्या राष्ट्रीय सभेचे ठरावातील निर्णयाचे त्यांनी अवलोकन केले. त्यातूनच त्यांच्यात राष्ट्रीय भावना व स्वातंत्र्य संग्रामाची बीजे रुजली गेली.

काँग्रेस कार्यकर्त्यांचे मेळावे, ब्रिटीश सरकार विरुद्ध करावयाचा संघर्ष या विचारातून ते स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत ओढले गेले. ८ ऑगस्ट १९४२ ला राष्ट्रपिता महात्मा गांधींनी सर्व देशभर ब्रिटीशांचे विरुद्ध स्वातंत्र्य लढा पुकारला. सर्व भारतीय जनतेस काँग्रेसने ''करेंगे या मरेंगे'' असा आदेश दिला. यावर ब्रिटीश सरकारने दि. ९ ऑगस्टच्या पहाटेसच भारतातील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना पकडून जेलमध्ये टाकले. कै. यशवंतराव चव्हाण (उपपंतप्रधान) यांच्याकडे त्यावेळी सर्व सातारा जिल्हाभर जनजागृती व कार्यक्रमाची आखणी करणे व तो व्यवस्थितपणे पार पाडणेची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी ब्रिटीश सरकारकडून कार्यकर्त्यांना अटक होऊ नये व स्वातंत्र्य चळवळ चालू रहावी म्हणून तालुकावार व गटवार कार्यकर्त्यांना भूमीगत राहून काम करणेच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे रंगराव कुंभार व त्यांचे सहकारी ब्रिटीश सरकारकडून अटक होऊ नये म्हणून भूमिगत झाले. भूमिगत होणे म्हणजे ब्रिटीशांचे पोलीसांना सापडू नये याची काळजी घेणे. दिवसा शांत रहाणे अथवा डोंगर कपारीत अडचणीचे ठिकाणी थांबणे. रात्री गावोगावी जाऊन स्वातंत्र्यासंबंधी सभा, मेळावे घेणे. अशा वेळी जेवण मिळे अथवा न मिळे. परंतू ज्या गावाजवळ जाणार असतील त्या गावात कार्यकर्त्यांना निरोप जात. कोणीही त्यांच्या ठरलेल्या ठिकाणी ५-२५ लोकांचे जेवण तयार करुन पोहोच करत असत. अशा प्रकारे जनतेचाही यात सहभाग होता. भूमिगत झालेले ओळखू नये म्हणून सर्व कार्यकर्त्यांची टोपण नावे ठेवणेत आली होती. रंगराव यांचे ''रंगु'' असे नाव ठेवले होते. काही वेळेस त्यांना राघू या नावाने संबोधित व त्याप्रमाणे ते एकमेकांशी बोलत असत.

इकडे नव्या नवलाईने सासरी आलेल्या भागिर्थीबाईस यातले काहीच कळत नव्हते. परंतु नवरा काहीतरी चांगले करतोय एवढेच तिला समजत होते. रंगराव भूमिगत झालेले घरी वृद्ध आई चंद्राबाई व पत्नी भागिर्थीबाई या दोघींवर संसाराची जबाबदारी आली. माती आणणे, घोड्याची लीद गोळा करणे, माती तुडवून तयार करणे व एखाद्या नातेवाईकाकडून चाकावरील कामे, मडकी वगैरे करुन घेणे. चुली करणे बलुत्यावर देणे, धान्य गोळा करणे अशा प्रकारे उपजिविका चालू ठेवली व कितीही कष्ट पडले तरी दोघींनी मुलाच्या/पतीच्या कार्यात जेवढा साथ देता येईल तेवढी द्यावयाची असे मनोमन ठरविले. तत्कालीन समाजाकडून रंगराव यास संसार करायचा सोडून कायतरी नाद लागलाय अशी दूषणे सुद्धा ऐकावी लागत होती.

असे असले तरी एक गरीब कुंभाराचा पोर देश म्हणजे काय? सरकार म्हणजे काय? हे कळत नव्हते अशा वयात मनाच्या उमेदीने राष्ट्रीय झेंडा तिरंगा खांद्यावर घेऊन या चळवळीत सामील झाला, यात राजकिय जागृती व जीवंतपणा तसेच इथल्या मातीचा गुणच म्हणावयाचा. महात्मा गांधींच्या ''करेंगे या मरेंगे'' या आदेशाचे शब्दश: पालन करावयाचे, सरकारच्या हाती न लागता ब्रिटीश सत्तेचे जास्तीत जास्त नुकसान करावयाचे, प्रत्येकाने धोका पत्करायचा व तो स्वत:चे जबाबदारीवर, स्वेच्छेने पत्करायचा, कुणी कुणाला दोष येईल असे वागावयाचे नाही आणि एवढी ज्याची तयारी असेल त्यानीच यात सहभागी व्हायचे असे ठरले. रंगराव यांनी हा धोका पत्करला.

या विध्वंसनाच्या कार्यात वाहतुकीच्या व दळणवळणांच्या साधनांचा नाश करणे, शाळा बंद पाडणे, पोस्ट लुटणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, बुलेटीन्स वाटणे ही प्रमुख कामे होत. या कार्यात कराड भागातील यशवंतराव चव्हाण, माधवराव जाधव, गौरीहर सिंहासने, बाबूराव कोतवाल, कासेगांवचे धन्वंतरी, बाबुजी पाटणकर, मसूरचे राघुआण्णा लिमये, इंदोली गावातील रंगराव, दिनकरराव निकम, शंकरराव करंबेळकर, परशुराम कोडगुले, तुकाराम कोडगुले कवठे ता. वाई येथील किसनवीर अशी मंडळी अग्रभागी होती.

रंगराव भूमिगत असताना त्यांना प्रसंगी आईचे आजारपण, पत्नीला भेटणे यासाठी गुपचूप सरकारला अथवा गावातील खबऱ्यांना माहिती न होता घराकडे यावे लागे. एकदा असेच ते घरी मुक्कामास आले असता पोलिसांना कोणीतरी खबर दिली. पोलिसांनी पहाटेच येऊन घराभोवती पहारा सुरु केला. त्यांचेवर डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट सातारा यांचेकडील गुन्हा क्र. डी. एस. रुल सेक्शन २६ प्रमाणे वारंट असलेने सकाळी राहते घरी दि. ९/२/१९४३ रोजी त्यांना अटक केली. अटकेनंतर त्यांना उंब्रज, कराड, विसापूर, सातारा या जेलमध्ये ठेवण्यात आले. नंतर दि. २६/४/१९४३ रोजी पुणे येथील येरवडा जेलमध्ये दाखल करण्यात आले. नंतर डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट पत्र न. एमएजी/२२९९/दि. १९/८/१९४३ रोजी त्यांची विनाअट

सुटका करण्याचा आदेश झाला. त्याप्रमाणे येरवडा जेलमधून त्यांची २१/८/१९४३ रोजी सुटका करण्यात आली.

असे असले तरी जेलमधून सुटून आल्यानंतर चळवळीतील सहभाग त्यांचा पुन्हा जोमाने सुरु झाला. कराडचे यशवंतराव चव्हाण, माधवराव जाधव, बाबुराव कोतवाल, डॉ. काळे, बी.बी. काळे, परशराम कोडगुले, तुकाराम कोडागुले, टुरिंग (खाशाबा पाटील), डॉ. पावस्कर, भाऊसाहेब पालकर, बाबूराव नलवडे, बाळ भुर्के इ. २५-३० जण सहभाग घेत असत. काही भूमिगत तर काही बरोबर रहात. खरे म्हणजे ते भूमिगत सरकारला होते. मात्र जनतेसाठी कधीच नव्हते. हजारोंनी जनता रात्रंदिवस बरोबर होती. शेजारी पोलीसांचे, लष्कराचे तळ असत पण हजारो लोकांच्या सभा बत्त्या लावून चालत, पण सरकारला खबर नसे. अशा प्रकारे ब्रिटीश सरकारला त्यांचा उपद्रव वाढू लागला म्हणून कार्यकर्ते तसेच रंगराव यांचेवर डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांचेकडे सरकारकडून कराड गुन्हा क्र. २८३/१९४४ दाखल करण्यात आला. भूमिगतांना पकडणेसाठी पोलीसांवर सरकारचे दडपण वाढले.

एके दिवशी पोलीस अधिकारी रंगराव यांचे घरी आले. आई चंद्राबाई व पत्नी भागिर्थीबाई यांचेकडे रंगराव कोठे असलेचे विचारले, त्यांनी माहित नसलेचे सांगितले. मात्र त्यांना ते घरी असल्याचा संशय आल्याने त्यांनी धान्याची कणगी ढकलून दिल्या व सर्व घरभर शोध घेतला. ते न सापडल्याने त्यांनी चंद्राबाई व भागिर्थीबाईंना अटक केली. सगळा गाव जमला होता. चंद्राबाईंनी सांगितले रंगाला निरोप द्या, आमची काळजी करु नको पण तुझी चळवळ चालू राहू दे. काय हा बाणा, कोठून आलं होतं एवढं त्यांच्यात बळ, त्यांना अटक करुन रात्रभर उंब्रज जेलमध्ये ठेवले व दुसऱ्या दिवशी त्यांना सातारा जेलमध्ये हलविण्याचे ठरले. ही बाब गावचे जेष्ठ सहकारी व चळवळीचे मार्गदर्शक दिनकरराव निकम यांना समजली ते कोल्हापूर-सातारा हायवेवर इंदोली फाट्यावर उंब्रजवरुन येणाऱ्या पोलीस गाड्यांची वाट बघत थांबले. गावातील बायका-माणसे गोळा झाली होती. त्यांना घेऊन जाणाऱ्या गाड्या अडविण्यात आल्या. त्यांना दिनकरराव बापूंनी सांगितले हिम्मत असेल तर रंगरावला शोधून पकडा बायकांना कशाला त्रास देता. तोपर्यंत गावातले आणखी लोक जमले. मग जनमताचा रेटा पाहून त्यांना सोडून देण्यात आले. मग सर्व गावकऱ्यांनी त्यांना सन्मानाने घरी नेऊन सोडले. पण अटक झाल्याचा त्यांच्या चेहऱ्यावर लवलेशही नव्हता. पण एक आत्मविश्वास व जिद्द दिसत होती.

इकडे भूमिगतांना पोलीसांचे दडपण वाढल्याने राहण्याची ठिकाणे बदलावी लागत होती. पावसाळ्याचे दिवस होते. रंगराव व कासेगांवकर वैद्य धन्वंतरी दोघेजण हिंगनोळ्यास मुक्कामाला होते. कोणीतरी उंब्रज पोलीसांना याची खबर दिली. सकाळीच पोलीसांनी गावाला वेढा दिला. एक एक घर शोधत पोलीस फिरत होते. ते दोघे गावाच्या पूर्वेस तारळी नदी आहे. ते नदीच्या बाजूला आले. पाठीमागे पोलीसांचा पाठलाग, समोर खाली पाहिजे तर उभे होते तेथून ३५-४० फुट खोल नदी. तीही पावसाळ्यात तुडुंब दुथडी भरुन वहात होती. खाली पाण्याचा अंदाज नव्हता. मात्र रंगराव यांनी क्षणार्धात वरुन उडी मारली व पोहत पलीकडे गेले. हीच ती ''हनुमान उडी'' आजही ते ठिकाण पाहिले तर या वीर पुरुषाच्या धाडसाचे आश्चर्य वाटते. मात्र सरकारला ते अखेरपर्यंत सापडले नाहीत.

अशाप्रकारे अनेक दुर्धर व अडचणीचे प्रसंगातून त्यांना जावे लागले. कर्ता पुरुष घरात नसल्याने इकडे प्रपंचातही अडचणी वाढत होत्या. थोडक्यात रंगराव यांची ऐन तारुण्यात संसाराची होळीच चालू होती. घरी आईचे आजारपण वाढत चालले होते. मग त्यांनी घराकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. रंगराव यांचा लग्नानंतरचा सर्व काळ चळवळीतच गेला होता. मुलबाळ नव्हते. आईला मुलाची वंशवेल वाढलेली पाहण्याची ओढ लागली होती. पण तिच्या ते नशिबी नव्हते. दि. ५/११/१९४७ रोजी तीचे निधन झाले व एक वीरमाता देवाघरी गेली.

पत्नी भागिर्थीबाई हिच्या प्रकृतिच्या तक्रारी होत्या. औषधोपचाराचा उपयोग होत नव्हता. तेव्हा त्यांचे जोडीदार उंब्रजचे डॉ. शहा यांनी त्यांना कोल्हापूर येथे एक चांगली ब्रिटीश डॉक्टर आलेली आहे. त्यांच्याकडे आपण जाऊ या असे सांगीतले त्याप्रमाणे कोल्हापूरला गेले. मग त्यांच्या औषधोपचाराने त्यांना बरे वाटले, गुण आला. थोड्याच दिवसात दि. २९/११/१९४८ रोजी त्यांना पुत्ररत्न झाले. आईचे नाव चंद्राबाई म्हणून मुलाचे नाव रामचंद्र ठेवले. ही स्वातंत्र्यानंतरची फलप्राप्ती होती. नंतर त्यांना तीन मुली व दोन मुले झाली. रंगराव यांना शिक्षणाचे महत्त्व कळाले होते. त्यांनी कितीही अडचणी आल्या तरी शिक्षणाचा मार्ग सोडावयाचा नाही असे ठरविले होते.

दरम्यान या क्रांतीवीरांचे कार्याची दखल घेऊन केंद्र शासनाने पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे हस्ते दि. १५/८/१९७२ रोजी त्यांना ताम्रपट प्रदान करुन गौरव केला. तसेच महाराष्ट्र शासनानेही वसंतदादा पाटील, मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव केला.

मुलगा रामचंद्र उर्फ बबन हा पुढे जुलै १९७२ मध्ये बी.कॉम. टी.डी., जी.डि.सी. ॲन्ड ए. झाला. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे जेष्ठ सहकारी किसनवीर हे त्यावेळी सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. रंगराव यांनी त्यांची भेट घेतली. किसनवीर आबांनी त्यांना सर्व मुलांना शिक्षण देण्याचा मोलाचा सल्ला दिला. शिवाय रामचंद्र यास चारच दिवसात जिल्हा मध्यवर्ती बँकेत नोकरीत रुजु करुन घेतले. अशा प्रकारे रंगराव यांना तीन मुली श्रीमती हिराबाई, सौ. ताराबाई, सौ. सिंधू (सेवानिवृत्त शिक्षीका) तर मुले रामचंद्र उर्फ बबन (जिल्हा बँक), बाबासाहेब (इरीगेशन, महाराष्ट्र शासन) व प्रविण दुध डेअरी इंदोली असून त्यांची संसारवेल चांगली बहरली आहे.

स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या कामाची व सहभागाची अजुनही आणखी माहिती उपलब्ध आहे. परंतू लेखन मर्यादा विचारात घेऊन सध्या एवढाच लेखन प्रपंच अनुभवू या. रंगराव यांचे दि. २५/७/१९८७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले व एक क्रांतीची ज्योत शांत झाली. नंतर पत्नी भागिर्थीबाई यांचेही दि. २५/३/१९९५ रोजी निधन झाले व स्वातंत्र्य चळवळीतला आणखी एक दुवा निखळला, ज्योत मालवली. अशा क्रांतीवीरास, वीरमातेस व वीर पत्नीस विनम्र अभिवादन! अशा माता पित्यांच्या पोटी पुन्हा जन्म मिळावा ही परमेश्वराकडे प्रार्थना. भारत माता की जय!

- आर. आर. कुंभार (रामचंद्र (बबन) रंगराव कुंभार), सातारा

***

छंद नाणी संग्रहाचा





– अक्षय सुनिल जाधव (नाणेशास्त्र अभ्यासक, ऑस्ट्रेलिया)

छंद म्हटला की, बरेचवेळा शाळेतील तोंडी परीक्षेत दिलेली लांबलचक यादीच आठवते. काड्यापेट्याची खोकी, पोस्टाची तिकिटे, नदीवरील शंख–शिंपले ते अगदी रंगबेरंगी कागद गोळा करणं असे अनेक चित्रविचित्र छंद ऐकायला मिळायचे. अर्थात छंद म्हटलं की काहीतरी सतत करत रहावसं वाटतं, मग ते कितीही सामान्य असलं तरी त्यातून मिळणारा आनंद काही वेगळाच असतो. मलाही एक सहज जडलेला परंतु थोडासा हटके छंद म्हणजे जगभरातील स्मरणीय नाणी व नोटा जमा करणं. हा छंद जडला तो मी इयत्ता चौथीत असताना म्हणजे साधारण २००४ साली. त्यामागे एक छोटीशी आठवण आहे. एका दिवाळीची! एकत्र कुटुंबात दिवाळी साजरी करण्याची मजा काही वेगळीच असते. त्या धनत्रयोदशीला आजोबांनी कपाटातून काढलेली पेटी माझ्या आयुष्यात वेगळीच कलाटणी देऊन गेली. पेटीतून काढलेल्या जुन्या नोटांनी व नाण्यांनी नकळत माझे लक्ष वेधून घेतले. त्यातील १८३५ सालचे ईस्ट इंडिया कंपनीच एक क्वार्टर आण्याचं नाणं पाहून अश्या जुन्या नाण्यांचे आणि नोटांबद्दलचं एक निराळाच कुतूहल माझ्या मनात निर्माण झालं. आजोबांना हट्ट करुन मिळवलेलं ते पहिलं आणि अविस्मरणीय नाणं आजही माझ्या संग्रही आहे. या प्रसंगामुळे अशा प्रकारची जुनी नाणी जमा करण्याचं छंद मला जडला आणि आजही तो कायम आहे. गेल्या १६ वर्षांपासून तब्बल ४५ हून अधिक विविध देशातील, निरनिराळी, वापरात असलेली–नसलेली, ऐतिहासिक, स्मरणीय अशी ४१० नाणी व काही निवडक नोटा असा संग्रह माझ्याकडे जमला आहे.

या नाण्यांच्या संदर्भात घडलेले अनेक किस्से आठवले कि आजही मनात नकळत हसू येते. बसच्या तिकिटाचे नेमके सुट्टे पैसे नसल्यामुळे, इच्छा नसतानाही २ रुपयांचे शिवाजी महाराजांचे चित्र असलेले नुकतेच मिळालेले नाणे बस कंडक्टरला द्यावं लागणं, पण अचानक शाळेबाहेरील पेरुवाल्या आज्जीकडून पेरु घेताना तसंच नाणं परत मिळणं, आज्जीने दिलेल्या खाऊच्या पैशात नेमकं चित्र असलेलं नाणं मिळणं आणि मग ते खर्च न करता तसंच बंद डब्यामध्ये जमा करणं. असे बरेच मजेशीर अनुभव मला मिळत गेले. पुण्यात शिक्षण घेत असताना एका नाणी प्रदर्शनात माझा संग्रह प्रदर्शित करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी प्रदर्शन पाहण्यास आलेल्या लोकांकडून मिळालेली कौतुकाची थाप मला आजही हा छंद जोपासायला प्रेरित करते.

उच्चशिक्षणासाठी ऑस्ट्रेलियाला आल्यानंतर मात्र माझ्या या संग्रहात खूपच भर पडली. माझ्या अनेक आंतरराष्ट्रीय मित्र–मैत्रिणींची हा संग्रह वाढवण्यात खूप मदत झाली. परदेशात अनेक मुलाखतीत माझी ओळख एक भारतीय गृहस्थ मा. संजय जैन यांच्याशी झाली. त्या व्यक्तीने अक्षरश: आपले संपूर्ण आयुष्य ह्या छंदासाठी वेचले आहे. माझा संग्रह पाहून ते इतके खूश झाले की त्यांनी स्वत:च्या संग्रहातील काही निवडक प्राचीन नाणी मला देऊ केली. त्यामध्ये युरोपियन युरोच्या आधी वापरात असलेल्या विविध देशांच्या कालबाह्य नाण्यांचा समावेश आहे. ॲडिलेड मध्ये आल्यानंतर 'नुमिस्मॅटिक सोसायटी ऑफ साऊथ ऑस्ट्रेलिया'चा सभासद होण्याची सुवर्णसंधी मला मिळाली. त्या निमित्ताने मी या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक परदेशी लोकांच्या संपर्कात आलो आणि खूप साऱ्या नवनवीन गोष्टी शिकत गेलो. हा छंद जोपासण्यासाठी ज्यांची ज्यांची मदत झाली त्या सर्वांचे मी मनापासून धन्यवाद मानतो. तुम्ही दिलेले हे छोटेसे योगदान देखील माझ्यासाठी नक्कीच अविस्मरणीय आहे आणि त्यांच्या रुपात तुम्ही कायम माझ्यासोबत असाल असं म्हणतात की पैसा सर्वच गोष्टी विकत घेऊ शकत नाही परंतु माझ्या आयुष्यात ह्याच छंदाने तुमच्या सारखी गोड माणसे माझ्याबरोबर आयुष्यभरासाठी जोडली गेलेली आहेत. आज डिजिटल चलनाची अनेक जणांनी धास्ती घेतली असली तरी कॅशलेस होणाऱ्या या जगाचा गेल्या २५० वर्षाचा इतिहास ह्या नाणी व नोटांच्या रुपाने माझ्याकडे कायमस्वरुपी राहील.

***

आमचे प्रेरणास्थान



कै. माणिकराव वालजी बोरसे



प्रोप्रा. दत्तात्रय माणिकराव बोरसे
9422230979



प्रशांत द. बोरसे
B.E. (Mech)
7798173900

सुधाकर द. बोरसे 9422318644
B.E. (Mech)

ISO 9001:2000 registered Company

दत्ता एंटरप्रायझेस

स्पेशालिस्ट
टुलरूम प्रोडक्ट,
सी.एन.सी. पंच प्रेस, टूलींग,
डाईज अँड मोल्ड, झिंग फिक्चर्स

सर्व्हे नं. ३८, काळे पडळ, गंगा मिनी गार्डनजवळ, हडपसर, पुणे - २८
Email : data_enterprises@rediffmail.com

शोकांतिका रुढी परंपरेची

– राजश्री कुंभार, कराड



मला बोलायचे आहे. त्या 'दोन' शब्दांबद्दल जे शब्द मी लहानपणा –पासून ऐकत आलेली आहे. जे प्रत्येक समाजात बोलले जातात. 'विधवा' व 'सौभाग्यवती' तुम्हाला माहित आहे, हे शब्द कोणी तयार केले असावेत? तर हे शब्द कोणत्याही देवांनी तयार केले नाहीत. तर तुमच्या माझ्यासारख्या लोकांनी तयार केले व समाजातील स्त्रियांवर दुय्यमस्थान देण्यासाठी त्यांच्यावर लादले. स्त्री ही फक्त आणि फक्त स्त्री असते. ना ती कधी विधवा असते आणि ना कधीही सौभाग्यवती!

पूर्वी नवरा गेला की, सती जायची प्रथा होती. आगरकरांसारख्या महान समाजसुधारकांनी ही प्रथा बंद केली. पूर्वी स्त्रीला विद्रुप करण्याचीही प्रथा होती. केस कापून तिला विद्रुप केले जायचे. पूर्वीच्या समाजकंटकांनी या प्रथा सुरु केल्या. त्या स्त्रीकडे कोणी पाहू नये. हा प्रथेमागचा उद्देश. आता सुद्धा प्रथा चालूच आहे. फक्त त्याचे स्वरुप वेगळे आहे. स्त्रीने कुंकू लावायचे नाही. मंगळसुत्र घालायचे नाही.

लग्नामध्ये स्त्रीला मंगळसुत्र घातले जाते व नवरा गेला की ते काढायचं असं का? नवरा जरी गेला असला तरी बायको अशीच तिची ओळखं असते आणि त्याच नावंही असतंच ना तिच्या नावापुढे, मग मंगळसुत्र काढायचं कशासाठी आणि नवरा गेला यात तिचा दोष काय? प्रत्येक माणूस हा आपापल्या कर्मानुसार फळं भोगत असतो. त्याच आयुष्य किती असावं कसं असावं हे ज्याच्या त्याच्या कर्मावर अवलंबून असतं. दुसरं असे की, कुंकु लावणं कानात नाकात गळ्यात पायात घालणं अलंकार परिधान करणं हे तर ती लहानपणापासूनच करत आलेली आहे. बांगडी ही एक काच आहे. हिरवा रंग हा इतर रंगापैकी एक, मंगळसुत्र हे धातुचे असते. त्याला फक्त वाटीचा आकार दिलेला असतो. हळद कुंकु हे हळकुंडापासून बनवलेले असते आणि हे स्त्रीच्या शरीरासाठी लाभदायक असते म्हणूनच ते वापरले जाते. या सर्वांमागे शास्त्रीय कारण आहे. त्याचा जीवनाच्या जगण्याशी काहीही संबंध नाही. माणूस जन्माला येतो. जीवन जगतो व मरण पावतो. (स्त्री–पुरुष) नवरा–बायको हे एकमेकांच्या साथीने जीवन जगण्यासाठीची एक व्यवस्था आहे. जगाच्या उत्पत्तीसाठीची व्यवस्था. कुणी कधी जन्माला यावं कुणी कधी मरावं हे कुणाच्याही हातात नाही.

अलीकडे यामध्ये बदल होऊ लागला आहे. काही समाजसुधारक व्यक्ती यामध्ये बदल करु लागल्या आहेत व स्त्रीयाही पुढाकार घेऊ लागल्या आहेत. स्त्रीनेच स्त्रीला समजून घेतले पाहिजे. या प्रथांना पूर्णविराम दिला गेला पाहिजे. आज एका स्त्रीवर ही वेळ आली. उद्या कोणावरही येऊ शकते. प्रत्यक्ष परमेश्वरानेच यामध्ये काही हस्तक्षेप केला नाही तर तुम्ही आम्ही करणारे कोण? परमेश्वराने असं काही केले आहे का? की हिचा नवरा गेला की, तिचा एक पाय गेला किंवा एक हात गेला किंवा एक डोळाच गेला. परमेश्वराने स्त्रीवर काही अन्याय केला आहे का? तर मग तुम्ही आम्ही अन्याय करणारे कोण?

कोणत्याही बापाला, भावाला किंवा मुलाला आपली मुलगी किंवा बहीण, किंवा आईला अशा अवस्थेत पहायला आवडेल का? कदाचित स्वत: त्या स्त्रीलाही आवडणार नाही पण लोक काय म्हणतील म्हणून चालत आलेल्या रुढी परंपरा ती भीतीने स्विकारत राहिली.

आपण २१ व्या शतकाचे साक्षीदार होणार आहोत. ही प्रथा बंद व्हायला हवी. यामध्ये पुरुष मंडळींचा सहभाग महत्त्वाचा आहे. स्त्रीला हे असं जीवन जगायला लाज वाटते. आधीच पतीच्या निधनाने दु:खी झालेली स्त्री रिकामा गळा बघून आणखीनच दु:खी होते. ती कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभागी होत नाही का? माणसाचा जन्म हाच मुळी आनंदाने जगण्यासाठी आहे. परमेश्वराने निसर्गामध्ये फक्त आनंदाची उधळण केली आहे. माणसाने दु:खाची उधळण का करायची? आनंदाचा उपभोग घेण्यासाठी परमेश्वराने या देहाची निर्मिती केली आहे. तुम्हीही आनंदाने जगा व इतरांनाही आनंदाने जगू द्या. रुढी परंपरांच्या मागे लागून आनंदाची माती करु नका.

***

कुंभश्री मित्र परिवाराच्या सभासदांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



निवास
५४, जानकीनगर, पंचायत समिती
कार्यालय समोर, वाडीभोकर रोड,
देवपूर, जि. धुळे ४२४ ००२.



श्री. दगाजी धुडकू चव्हाण
कुंभश्री प्रतिनिधी धुळे जिल्हा

सौ. ठर्मिलाबाई दगाजी चव्हाण

इंजि. हेमंतकुमार दगाजी चव्हाण — **सौ. सुरेखा हेमंतकुमार चव्हाण**
प्रा. रविंद्रनाथ विश्वनाथ मेनकर — **सौ. योजना रविंद्रनाथ मेनकर**
डॉ. गोकुळ भाऊराव चित्ते — **सौ. वैशाली गोकुळ चित्ते**
इंजि. किरण धोंडीराम जगताप — **सौ. आश्विनी किरण जगताप**

इंजि. प्रितेश मेनकर B.E.Mech., चि. शिवम चव्हाण, कु.शिवानी चित्ते,
चि. शिवांशु मेनकर, चि. ओम जगताप, कु. सानवी चित्ते,
चि. शिवांग जगताप

नम्र विनंती

आपण ऑनलाईन फॉर्म व पैसे भरले असतील परंतु आपणास आजपर्यंत पावती आली नसेल किंवा आपले नाव कुंभश्री बेवसाईट वर असेल पण अंकात येत नसेल तर मोबा. 9503428987/ या नंबरवर WhatsApp करावे तसेच पैसे भरल्याची पावती (स्क्रिन शॉट), आपले आधार कार्ड, शेवटच्या वर्षाचे शैक्षणिक सर्टीफिकेट, पगाराची स्लिप, आपल्या निवासाचा संपुर्ण पत्ता, आपल्या WhatsApp Mob. No. सहित E-mail वर पाठवावा. तसेच घटस्फोटित किंवा विधवा-विधुर असेल तर घटस्फोटाचे पेपर किंवा जोडीदाराच्या मृत्युचा दाखला मेलवर पाठवणे बंधनकारक आहे. **सर्व पेपरची पुर्तता झाल्याशिवाय आपला फॉर्म ॲक्टिव्हेट केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** email : kumbhshree@gmail.com

वधु पाहिजे

डॉक्टर

ID10157: डॉ. मुकेश लक्ष्मण क्षीरसागर. जन्म-२६/१०/९३, जन्मवेळ व ठिकाण – पहाटे ५ अस्वाद जालना, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.एच.एम.एस+ पी.जी.डी.इ.एम.एस., नोकरी-आशिर्वाद स्वत:चे हॉस्पिटल, उत्पन्न – ५०,०००/-अपेक्षा – अनुरुप.

ID8886: डॉ. केदार गुरुपाद कुंभार. जन्म-१२/११/९०, जन्मवेळ व ठिकाण – संध्या ६.३७ भोगावती परिते, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.बी.बी.एस + डी.एम.आर.इ., नोकरी-माहेर मॅटर्निटी हॉस्पिटल स्वत:चे इस्पूरली, उत्पन्न – ३,००,०००/-अपेक्षा – अनुरुप.

ID10083: डॉ. राजपाल सुभाष चव्हाण. जन्म-९/९/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे १२.०२ भिवंडी, उंची-५.१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.बी.बी.एस, + पी.जी. सेकंड इयर रेडिओ शिकत आहे, अपेक्षा – अनुरुप

ID8985: डॉ. मनिष अशोकराव साळुकर (लिंगायत) जन्म-८/८/८७, जन्मवेळ व ठिकाण – पहाटे६.०५ यवतमाळ, उंची-५.६, वर्ण – गोरा, शिक्षण – एम.बी.बी.एस, नोकरी-मेडिकल ऑफिसर यवतमाळ, पगार – ८५,०००/ – अपेक्षा – अनुरुप

एम.फार्म, बी.फार्मसी, डी.फार्मसी.

ID10421: चि. ओंकार कोंडीराम जगताप. जन्म-२४/१२/९२, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २.५० मरळी, उंची-५.६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.फार्मसी, नोकरी – प्राथमिक आरोग्य केंद्र लाडेवाडी, पगार – १३,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

ID10310: चि. पवन संजय पाटील. जन्म-२५/४/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ५.३० मरळी, उंची-५.४, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.फार्मसी, नोकरी – खाजगी मुंबई, पगार – ५०,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

ID10295: चि. गणेश विकास कुंभार. जन्म-२२/७/९४, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २.२० मांडवगण फराटा, उंची-५.८, वर्ण-गोरा, शिक्षण-डी.फार्मसी, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ५०,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

ID10182: चि. योगेश आनंदा कुंभार. जन्म-२७/१०/९३, जन्मवेळ व ठिकाण-१.०८ चिखली कसबा, उंची-५.६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.फार्मसी, मेडिकल दुकान टाकणार आहे. अपेक्षा- मेडिकल क्षेत्रातील हवी.

ID10003: चि. संतोष उत्तमराव पिंपळे (लिंगायत). जन्म-१३/६/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २ नांदेड, उंची-५.५, वर्ण-सावळा, शिक्षण-डी.फार्मसी+बी.ए., नोकरी-खाजगी मुंबई, पगार-३०,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

ID10033: चि. सागर शिवाजी कुंभार. जन्म-१७/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.२५ मलकापुर कोल्हापुर, उंची-५.१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.फार्मसी, नोकरी-खाजगी पुणे, पगार-३०,७५१/-, अपेक्षा- समशिक्षित.

ID9895: चि. किशोरकुमार विजयकुमार घटकार. जन्म-१३/१/९०, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी २.३१ डोंगरशेळकी, उंची-५.६, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.फार्मसी, स्वत:चे मेडिकल दुकान पुणे, उत्पन्न-६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

सर्व क्षेत्रातील बी.ई.

ID10517: चि. सौरभ मानसिंग थोरावडे. जन्म-७/५/९५, जन्मवेळ व ठिकाण-२२.५० इस्लामपुर, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार – १,००,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10515: चि. दृष्यत सदाशिव वाल्हेकर. जन्म-१४/११/९८, जन्मवेळ व ठिकाण-६.५५ दौंड, उंची-५:१०, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार – २५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10504: चि. प्रथमेश राजेंद्र साळवी. जन्म-२२/१/९६, जन्मवेळ व ठिकाण-११.२० गुहागर, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-मर्चंट इंजि + मरिन इंजि., नोकरी-मर्चंट नेव्ही, पगार – १,१५,०००/-, अपेक्षा – अनुरुप.

ID10503: चि. प्रशांत महादेव कुंभार. जन्म-१८/१०/९४, जन्मवेळ व ठिकाण-२.१० मुंबई, उंची-५:६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार – २७,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10498: चि. रामानंद सुनिल क्षिरसागर. जन्म-५/६/९५, जन्मवेळ व ठिकाण-७.४५मुंबई, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार – ८५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10468: चि. शिवानंद मलाप्पा कुंभार. (लिंगायत) जन्म-८/११/८७, जन्मवेळ व ठिकाण-११ जत, उंची-५:८, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार – ४०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9492: चि. ओंकार नारायण कुंभार. जन्म-२८/५/९४, जन्मवेळ व ठिकाण-९.५५ मुरगुड, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी बंगलोर, अपेक्षा-अनुरुप.

ID10426: चि. अक्षय दिलीप अष्टुरकर. जन्म-२४/२/९५, जन्मवेळ व ठिकाण-१३.०५ कोल्हापुर, उंची-६.१, वर्ण-निमगोरा, शिक्षण-एम.एस., नोकरी-खाजगी जर्मनी, पगार – ३,४०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10474: चि. गणेश शिवाजी रसाळ. जन्म-५/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ५.३० साकुर, उंची-५:६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्यु, नोकरी-खाजगी पुणे, पगार – ९०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9493: चि. रोशन रमेश जांबवडेकर. जन्म-२९/९/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.५६ मुंबई, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्यु, नोकरी-खाजगी मुंबई, पगार – १,१०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10449: चि. अभिषेक संजय साळुंके. जन्म-५/४/९२, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १.०४ पुणे, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार वार्षिक - ७.५ लाख, अपेक्षा-अनुरुप.

ID9288: चि. स्वप्नील विनोद कुंभार. जन्म-२९/१२/९५, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १२.२४ पुणे, उंची-५:७, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी, पगार - ९०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9623: चि. संकेतकुमार संपत कर्वे. जन्म-४/३/९५, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी २.१८ नाशिक, उंची-५:८, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी यु.के., पगार - १,३५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9542: चि. राकेश शिवाजी कुंभार. जन्म-३१/६/९३, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ८.५ कोल्हापुर, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-इ.ॲन्ड टी.सी., नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ५८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10442: चि. दिग्विजय संजय कुंभार. जन्म-२६/२/९०, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ४.३० फलटण, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ८७,५००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10435: चि. मनोज इंद्रमोहन मेंढेकर. जन्म-२४/४/९३, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक, स्व:ताचा व्यवसाय, उप्तन्न-६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10425: चि. प्रफुल्ल प्रमोद कुंभार. जन्म-२९/७/९४, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ५.३० माळशिरस, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक, नोकरी-खाजगी पुणे, पगार - २३,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10409: चि. पद्मेश रामचंद्र कुंभार. जन्म-२०/६/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.१२ बेळगाव, उंची-५:१, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु, नोकरी-खाजगी पुणे, पगार - २,१०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10412: चि. सौरभ संजय जगताप. जन्म-१३/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ११.३० पुणे, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ६८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10414: चि. ओमकार बाळकृष्ण खेडेकर. जन्म-२/५/९८, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ११.४५ पुणे, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक, नोकरी-खाजगी पुणे, पगार - ४०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10387: चि. निरंजन संजय कुंभार. जन्म-२५/१/९४, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ६.०५ कार्वे, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक + एल.एल.बी., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ४५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10385: चि. धनंजय देविदास कुंभार. जन्म-३/२/९३, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ९.३० करमाळा, उंची-५:६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक, अपेक्षा-अनुरुप.

ID10036: चि. सौरभ वसंत कुंभार. जन्म-२५/५/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.३५ कराड, उंची-५:१०, वर्ण-निमगोरा, शिक्षण-केमिकल, नोकरी-खाजगी रत्नागिरी, पगार - २५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10367: चि. दर्शन चंद्रकांत कुंभार. जन्म-२०/७/९५, जन्मवेळ व ठिकाण-रात्री १०.१५ पुणे, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10360: चि. कौस्तुभ अरविंद कुंभार. जन्म-२५/५/९५, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.४० कराड, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक, नोकरी-खाजगी पुणे, पगार - ३५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10352: चि. प्रथमेश बाळासाहेब कुंभार. जन्म-१५/४/९५, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ६.१० मंचर, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु+ एम.बी.ए., नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ७७,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10346: चि. निखिल नारायण कुंभार. जन्म-१५/१/९१, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ६.५५ ठाणे, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु + एम.बी.ए., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ६८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10345: चि. चैतन्य राजेंद्र जगताप. जन्म-१६/२/९७, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.३४ मंचर, उंची-५:९, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ३३,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10322: चि. विवेक पुंडलिकराव भामोदकर. जन्म-२/७/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी १०.१० पथ्रोड, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक + एम.बी.ए., नोकरी-खाजगी ठाणे, पगार - ४८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID: चि. रितेश रविंद्रनाथ मेनकर. जन्म-११/१/९४, जन्मवेळ व ठिकाण- रात्री ९.३० जातेगाव, उंची-१६३ सेमी., वर्ण-गोरा, शिक्षण-मेक. + एम.बी.ए., नोकरी-खाजगी पुणे, पगार -८०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10319: चि. चैतन्य चंद्रकांत कुंभार. जन्म-१०/५/९४, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ५.०२ इंदापुर, उंची-५:४, वर्ण-निमगोरा, शिक्षण-ऑटोमोबाईल, नोकरी-खाजगी चेन्नई, पगार - ६६,६६६/-, अपेक्षा-अनुरुप.

ID: चि. रोहन रमेश कुंभार. जन्म-१४/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.३० सासवड, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - १,१५,०००/-, अपेक्षा-समकक्ष

ID10304: चि. संकेत नरेंद्र राजे. जन्म-२४/१२/९६, जन्मवेळ व ठिकाण-९.१२ पुणे, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी-खाजगी दुबई, पगार -३,०७,६००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10305: चि. संकेत वसंत पेडणेकर. जन्म-१२/३/८९, जन्मवेळ व ठिकाण-१६.४४ मुंबई, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-डिप्लोमा + बी.ई. (इ. ॲन्ड टी.सी.), नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ८७,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10294: चि. ऋषिकेश हेमंत डेंगळे. जन्म-१८/९/९७, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी ३ पुणे, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी-खाजगी बाणेर, पगार - १,००,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10290: चि. उत्कर्ष गजानन कुंभार. जन्म-१८/१/९४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ६.१५गारगोटी, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी - खाजगी एरोली, पगार - २५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10286: चि. संकेत रत्नाकर कुंभार. जन्म-१२/८/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.०२ मुंबई, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ६२,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10275: चि. विशाल शरद कुंभार. जन्म-१५/६/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.५० कोल्हापुर, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-पी.एच.डी. मेकॅ. नोकरी - मुंबई, पगार - ६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID8568: चि. बालाजी सोपान कुंभार. (लिंगायत) जन्म-२/१०/९३, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-इलेक्ट्रीकल, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न - ३,५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10245: चि. कैलास बळवंत वागवेकर. जन्म-८/२/९१, जन्मवेळ व ठिकाण-१७.३०कोल्हापुर, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.टेक+बी.ई., स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10246: चि. सिद्धेश बाळकृष्ण कुंभार. जन्म-७/७/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ११.१४ मुंबई, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅनिकल+ एम.बी.ए.+पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा, नोकरी-खाजगी मुंबई, अपेक्षा-अनुरुप.

ID10228: चि. योगेश वसंत भागवत. जन्म-३१/१०/९१, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २.४५ मुंबई, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्पुयटर, नोकरी - खाजगी, अपेक्षा-अनुरुप.

ID10223: चि. क्षितीज विलास टाकळीकर. जन्म-१४/८/९६, जन्मवेळ व ठिकाण-९.१८ नांदेड, उंची-५:११, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10207: चि. शिवराज अर्जुन कुंभार. जन्म-९/५/९४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी १०.३५ कोल्हापुर, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.बी.ए., नोकरी -खाजगी, पगार - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10220: चि. श्रीहरी रामचंद्र कुंभार. जन्म-१५/३/८९, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १.३० कणकवली, उंची-५:६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.ई., नोकरी -सरकारी एम.एस.इ.बी, पगार वार्षिक - ७ लाख, अपेक्षा-अनुरुप.

ID10218: चि. श्रीधर परशुराम कुंभार. जन्म-३/८/९०, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ०.४८ सांगली, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.टेक, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ५८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10215: चि. विशाल संजय वाघमारे. जन्म-२४/२/९७, जन्मवेळ व ठिकाण-१२.४५ अ.नगर, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.टेक, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ६५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10214: चि. रोहित श्रीकांत कोळेकर. जन्म-१२/१०/९०, जन्मवेळ व ठिकाण-५.४५ कोल्हापुर, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.ई., नोकरी - खाजगी कोल्हापुर, पगार - ४०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10212: चि. सुजय नरेंद्र कुंभार. जन्म-३/७/९५, जन्मवेळ व ठिकाण - १२.२५ सातारा, उंची-६फुट, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅ., नोकरी - खाजगी दिल्ली, पगार - ५५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10199: चि. कौस्तुभ जयंत कमळे. जन्म-१५/६/९२, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ७.३८ कल्याण, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅनिकल, नोकरी-खाजगी अबुदाबी, पगार-५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10188: चि. किरण जालींदर कुंभार. जन्म-९/१२/९१, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ६ मुंबई, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ई, नोकरी-खाजगी पुणे, पगार-५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10187: चि. अक्षय वसंत कुंभार. जन्म-१३/९/९१, जन्मवेळ व ठिकाण-२०.१५ खानापुर, उंची-५:११, वर्ण-निमगोरा, शिक्षण-इले. ॲन्ड टेली, नोकरी-खाजगी, पगार-५५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10169: चि. अक्षय माधवराव कानगुले. जन्म-१/७/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.५५ बनवास, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ई., नोकरी-खाजगी, पगार-१,७०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10161: चि. सौरभ कृष्णा विश्वासराव. जन्म-१२/०६/९१, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.४५ पुणे, उंची-५:६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-ऑटो+पी.जी.डी.एम., स्वत:चा व्यवसाय पुणे, उत्पन्न - अंदाजे ६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10122: चि. आदित्य प्रमोद माहुलीकर. जन्म-२६/१२/९४, जन्मवेळ व ठिकाण-२०.३५फलटण, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ई. + एम.बी.ए., नोकरी - खाजगी पुणे, पगार - २८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9182: चि. अमित दिपक राजे. जन्म-१८/९/९२, जन्मवेळ व ठिकाण-८.२५ कोरेगांव, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक, नोकरी-खाजगी पुणे, पगार वार्षिक - ९.५, अपेक्षा-अनुरुप.

ID10109: चि. सागर विलास कुंभार. जन्म-१७/५/९३, जन्मवेळ व ठिकाण-रात्री १०.५५ इचलकरंजी, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅनिकल, नोकरी-खाजगी पुणे, पगार-४५,८३३/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10066: चि. विनय अनंत मंगळकर. जन्म-३१/७/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.१५गिरड पाचोरा, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-इ ॲन्ड टी.सी., नोकरी-खाजगी मुंबई, पगार-७५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10093: चि. ऋषिकेश शिवाजी कुंभार. जन्म-२/७/९०, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ६.२२ किर्लोस्करवाडी, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार-७०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10091: चि. हर्षल अर्जुन सोनावणे. जन्म-७/११/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी १०.१५ शहादा, उंची-५:७, वर्ण-निमगोरा, शिक्षण- पॉलिमर + एम.एस., नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10082: चि. अक्षय अनिल कुंभार. जन्म-१२/११/९२, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी १०.५० महाड, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण- कॉम्प्युटर + मास्टर इन इनफरमेशन सिस्टिम यु.एस.ए., नोकरी-खाजगी पुणे, पगार - १,५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10075: चि. सुरज मदन कुंभार. जन्म-७/९/९०, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅ., नोकरी-खाजगी बंगलोर, पगार-८०,०००/-, अपेक्षा-



अनुरुप.

ID10054: चि. स्वप्निल नामदेव कुंभार. जन्म-२२/८/८९, जन्म वेळ व ठिकाण-पहाटे ६.३० गडहिंग्लज, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-केमिकल, नोकरी-खाजगी रत्नागिरी, पगार-६२,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10051: चि. शिवराज कृष्णा कुंभार. जन्म-२६/४/९१, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ४.४५ कराड, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.टेक., नोकरी-खाजगी बॅगलूरू, पगार-१,७०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9056: चि. शंतनु शामराव कुंभार. जन्म-५/३/९२, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ३ मुंबई, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-इलेक्ट्रिकल, नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID9136: चि. अजिंक्य विश्राम जोर्वेकर. जन्म-२६/११/९३, जन्म वेळ व ठिकाण-पहाटे ४.२५ राजापुर, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅनिकल+ डिप्लोमा (मेकॅ), नोकरी-खाजगी नवीमुंबई, पगार-३२,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10016: चि. प्रशांत बाळासाहेब सडोलीकर. जन्म-२१/९/९१, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ६.५० कराड, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-इ.ॲन्ड टी.सी., नोकरी - खाजगी पुणे, पगार - ४५,०००/-, अपेक्षा - बी.ई., डॉक्टर, जॉब करणारी, पुण्यास प्राधान्य.

ID9990: चि. स्वप्निल रमेश वाडकर. जन्म-८/५/९१, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.४० अकोला, उंची-५:११, वर्ण-निमगोरा, शिक्षण-एम.टेक, नोकरी-खाजगी जपान, पगार -२,३६,५००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID9997: चि. विशाल गोरखनाथ गोरे. जन्म-११/९/९३, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.५५ पुणे, उंची-५:९, वर्ण-निमगोरा, शिक्षण-इलेक्ट्रॉनिक, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ४५,०००/-, अपेक्षा - बी.ई., डॉक्टर, जॉब करणारी, पुण्यास प्राधान्य.

ID9994: चि. प्रतिक हनुमंतराव कुंभार. जन्म-२२/२/९४, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे १२.४० सातारा, उंची-५:७, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेकॅ., नोकरी-खाजगी हैद्राबाद, पगार -३८,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID9981: चि. संदेश व्यंकटराव कुंभार. जन्म-१८/३/९१, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ९ पाटण, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-इनव्हायरमेंट सायन्स, नोकरी-खाजगी पुणे, पगार वार्षिक-५ लाख, अपेक्षा - अनुरुप, इंजि, एम.सी.ए, नोकरी असावी.

ID9957: चि. श्रीराज निलेश खेडकर. जन्म-६/१/९१, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-सिव्हिल + जी.डी.आर्ट, स्वत:चा व्यवसाय पुणे, उत्पन्न - ४०,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID9963: चि. रोहित यशवंत कुंभार. जन्म-२६/२/९०, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.२५ कुर, उंची-५:७, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेकॅ., स्वत:चे कोचिंग क्लासेस सांगली, उत्पन्न-४० ते ५० हजार, अपेक्षा - अनुरुप, सुसंस्कृत, बी.ई. बी.सी.ए., एम.बी.ए., डॉक्टर.

ID9952: चि. शैलेश अंकुश डेंगळे. जन्म-२२/९/९४, जन्मवेळ व ठिकाण-८.०० लातुर, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-इ.ॲन्ड टी.सी., नोकरी - खाजगी पुणे, अपेक्षा - अनुरुप.

ID9949: चि. ओंकार राजाराम कुंभार. जन्म-२०/४/९३, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-आय.टी., नोकरी - सरकारी मुंबई, पगार - ४५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

